Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साहित्य नवनीत

सावरकर

४२म
४३

हिंदु हृदय सम्राट
स्वा. वीर वि. दा. सावरकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकालय, गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय
स्तक संख्या .४३म/५३
जिका संख्या ३७६:६
पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना
नत है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक समय
पुस्तक अपने पास नहीं रख सकते।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CHECKED 1973

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदु हृदयसम्राट

स्वातंत्र्य वीर वि. दा. सावरकर

सावरकर-साहित्य नवनीत

संपादक :

भा. द. खेर

प्रस्तावना :

आचार्य प्र. के. अत्रे

महाराष्ट्र
ग्रंथ भांडार
गिरगांव : मुंबई ४

मूल्य दहा रुपये

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशक :

शंकर वामन कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
गिरगांव : मुंबई ४.

ऋते ज्ञानान्न मुक्तिः
पुस्तक सं. ...
...
गुरुकुल ग्रन्थालय कांगड़ी.

• • •

प्रथमावृत्ति
२८ मे १९५८

• • •

मुद्रक :

ना. अ. मेहेंदळे,
जीवन मुद्रणालय,
५५१, बुधवार, पुणें २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंथन करण्यापूर्वी –

खरें जीवंत साहित्य हा महान् पुरुषाच्या उत्तुंग प्रतिभेचा एक हुंकार असतो. स्वा. सावरकरांचें साहित्य हें केवळ जीवंत साहित्य नसून तें एक ज्वलंत साहित्य आहे. सावरकरांच्या अशा साहित्यांत वाचकाला त्यांच्या विविध पैलूंचें दर्शन घडल्याविना राहणार नाहीं. त्या प्रत्येक पैलूंत उभ्या विश्वाला कार्यान्वित करण्याची अपार स्फूर्ति व चेतना देण्याचें महान् सामर्थ्य सामावलेलें आहे. सावरकरांच्या साहित्यांत संध्यासमयींच्या मंद पण चेतोहारी रम्य सुवर्णछटा दृग्गोचर होणार नाहींत, तर त्यांच्या साहित्यांत ज्वलंत ज्वालामुखींचे दर्शन घडेल. प्रखर क्रांतिवादाचे महान् प्रणेते, तेजस्वी प्रतिभेचे महाकवि, संशोधक बुद्धीचे इतिहासकार, प्रगाढ प्रज्ञेचे भाष्यकार, तर्कसिद्ध पंडित आणि ओजस्वी वाणीचे वक्ते या दृष्टीनें स्वा. सावरकरांचें बहुविध दर्शन आज साऱ्या जगाला ज्ञात झालें आहे. हे त्यांचे सारे व्यक्तिगत गुण त्यांच्या साहित्यांत प्रकर्षानें प्रतिबिंबित झालेले दिसतील. सावरकरांची वैचारिक बैठकच मूलग्राही तत्त्वज्ञाची आहे सशस्त्र क्रांतिवाद असो, समाजसुधारणा असो, स्फूर्तिप्रद साहित्यनिर्मिति असो, भाषाशुद्धि-लिपीशुद्धि असो, हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार असो किंवा शुद्धि-संघटन असो, त्या त्या प्रांगणांत कार्यान्वित असतांना सावरकर एकदम गरुड-झेपेनें मूलगामी तत्त्वज्ञानाच्या बैठकीवर आरूढ होतात आणि अशी कांहीं तेजस्वी, ओजस्वी, प्रगल्भ आणि विशाल तत्त्वप्रणाली उद्घोषित करतात कीं ती पाहून कोणीहि अगदीं भयचकित होऊन जावें आणि त्यांच्याविषयींच्या परमादरानें नतमस्तक बनावें ! पृष्ठभागावर खळाळणाऱ्या एखाद्या सागराच्या उदरांत मूल्य-वान् अशीं अनंत रत्नें गवसावींत त्याप्रमाणें वरवर प्रक्षोभक दिसणाऱ्या त्यांच्या व्यक्तिनिष्ठ साहित्यांत भावी पिढीच्या हातीं असंख्य मौलिक रत्नें लागतील, यांत कांहींच शंका नाहीं. सावरकरांच्या अशा अनंत साहित्याचें मंथन करून त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त अमृतरूपीं अमर नवनीत घुसळून काढण्याचा हा प्रयत्न त्याचसाठीं केला आहे. परम पवित्र अशा महान् रघुवंशाचें वर्णन करण्यास प्रारंभ करण्यापूर्वीं कविकुलगुरु कालिदास म्हणतो कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" सूर्यकुलोत्पन्न असा रघुवंश कोणीकडे आणि माझी अल्पविषयगामी बुद्धि कोणीकडे ! अशा या माझ्या अल्पमतीच्या होडग्यानें मी रघुवंशाचा महासागर तरून जाण्याची इच्छा करीत आहे." सावरकरांच्या साहित्याचें मंथन करतांना कोणाहि साहित्यभक्ताची हीच करुणावस्था होईल यांत काय संशय ? स्वा. सावरकरांच्या अमृतरूपी साहित्याचें नवनीत वाचकांच्या हातीं देण्याचा आमचा हा प्रयत्न आहे, याहि स्थितींत वाचकांना रुचेल अशी आशा धरण्यास आम्हांला मुळींच प्रत्यवाय दिसत नाहीं. अमृताच्या एका बिंदूतहि अमरत्वाचा अंश अन्तर्भूत असतो तद्वत् सावरकरांच्या या लहान ग्रंथांत त्यांच्या महान् प्रतिभेचा दिव्य साक्षात्कार वाचकांना घडेलच घडेल !

सावरकरांच्या साहित्यांतून नेमकें हेंच साहित्य कां निवडलें हें सांगणें कांहींसें कठीण आहे. कारण अमृत सागरातून हाताला लागलेलें कोणतेंहि अमृतकण टिपले गेले तरी त्या अमृतकणांतील अमरत्वाला थोडीच बाधा येणार आहे ?

या अमर संग्रहाला **आचार्य प्र. के. अत्रे** यांच्यासारखा पुरुषसिंह, चोखंदळ समीक्षक, यथोचित प्रस्तावना लिहिण्यास लाभला हीहि एक महत्भाग्याची घटना आहे. त्यांच्या कार्याचा पसारा अचाट आहे. वेळांत वेळ काढून आत्यंतिक भक्तिभावानें आणि कमालीच्या आपुलकीनें, त्यांनीं या ग्रंथाला प्रदीर्घ प्रस्तावना लिहून दिली. याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. आचार्य अत्रे हे तर सावरकर वाङ्मयाचे प्रथमश्रेणीचे एक डोळस अभ्यासक. त्यांनीं लिहिलेली प्रस्तावना ही या ग्रंथाचे एक भूषणच आहे.

हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें कार्यांतील महत्त्वपूर्ण कामगिरी कुशल रीतीनें हाताळल्याबद्दल **श्री. बाळाराव सावरकर** यांना शतशः धन्यवाद. पुण्याचे **श्री. द. वि. जोग** यांनीहि जे सहाय्य केलें त्याबद्दल त्यांनाहि धन्यवाद दिले पाहिजेत.

वाचकांनीं हा साहित्यरूपीं अमृतकुंभ हातीं घेऊन त्याचें स्वागत करावें व स्वतः धन्य व्हावें, अशी त्यांना प्रार्थना करणें अस्थानीं होणार नाहीं.

२, नारायण पेठ
पुणें २
१८।६।५८

— भा. द. खेर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या 'अमृत महोत्सवा' चा मुहूर्त साधून त्यांच्या साहित्याचें हें सुंदर 'नवनीत' मराठी वाचकांच्या हातीं ठेवण्यांत त्याच्या प्रकाशकानीं जी समयोचितता आणि योजकता दाखविली आहे ती अत्यंत अभिनंदनीय आहे. सावरकर म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासामधलें एक ओजस्वी पर्वच आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं त्यांनी आपल्या सर्वस्वाचा जो होम केला आणि जे दैदीप्यमान पराक्रम केले त्याला तुलना नाहीं. त्यांचें जीवन म्हणजे मृत्यूला मूर्तिमंत आव्हानच होय. श्रीशिवछत्रपतीपासून स्वातंत्र्यवीरांची जी उर्जस्वल परंपरा महाराष्ट्रामधें निर्माण झाली आणि ज्या परंपरेंत गेल्या चार शतकांत कित्येक महान् नरनारी रत्नें निर्माण झाली, त्या परंपरेमध्यें सावरकर एकाद्या कोहिनूर हिऱ्यासारखे चमकत राहतील. त्यांचें साहित्य म्हणजे स्वातंत्र्यप्रीतीचें आणि देशभक्तीचे धगधगतें अग्निकुंडच होय. त्यांच्या वाणीमधून आणि लेखणीमधून ज्वाला आणि ठिणग्याखेरीज दुसरें कांहींच बाहेर पडलें नाहीं. त्यांचा एकेक शब्द म्हणजे आगगाडीच्या एंजिनमधला लाल रसरशीत दगडी कोळसा. त्याच्या धगीनेंच सर्वांगाचा भडका उडावयाचा. सारा समाज—नव्हे सारा देश पेटवण्याची ज्याच्या वाङ्मयामध्यें विलक्षण दाहकता आहे असा सावरकराखेरीज दुसरा लेखक ह्या भारतांत क्वचित्च होऊन गेला असेल. आमच्या लहानपणीं तर त्यांच्या 'सिंहगडच्या पोवाड्या' नें साऱ्या महाराष्ट्राला आग लावली होती ह्याचे स्मरण अद्याप आम्हांला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते धन्य मराठे गडी,
घेति रणिं उडी
करूनि तांतडी
देशार्थ मृत्युही वरिला
शाहिस्ता चरचर चिरिला
गनिमांनी वचक बहु धरिला
किंवा
निर्जीव अन्न कां रुचे
उदर शत्रुचे
फोड तेथिचे
आंतड्यांनि भूक शमवावी
रक्तानि भूक शमवावी
मांसानि भूक शमवावी
घ्या गड कडकड चावुनि अधरा
धांवा ये काजीं,
प्रेमें आजि सिंहगडाचा पोवाडा गा जी

ह्या त्यांच्या ओळीच्या संथा महाराष्ट्रांत तरुण त्यावेळीं घरोघर घोकीत बसले होते. त्यांच्या 'जोसेफ मॅझिनी' ची प्रस्तावना तर पहिल्या ओळीपासून तो शेवटच्या ओळीपर्यंत घडघड म्हणून दाखविणारे कितीतरी तरुण त्यावेळीं आढळले असते. 'स्वातंत्र्य हें फायद्याचें आहे म्हणून नव्हे तर ते मर्दाचें कर्तव्य आहे, म्हणून ते मिळवले पाहिजे. भाकर स्वस्त आहे किंवा महाग आहे हा प्रश्न नाहीं. त्या भाकरीवर गुलामगिरीचा शिक्का आहे कीं नाहीं हा मुख्य प्रश्न आहे' ही त्या प्रस्तावनेंमधील सावरकरांची अमर सुभाषितें त्या वेळेपासून आमच्या डोक्यांत घुसून बसली आहेत. आणि त्यांचा '१८५७ चें स्वातंत्र्य समर' हा ग्रंथ तर भारतीय क्रांतीची अमरगीताच होऊन बसला आहे. ब्रिटिश राज्य उलथून पाडण्यासाठीं प्रचंड सैनिकी युद्ध कसें उभारावे ह्याचा तो ज्वलंत इतिहासच आहे. गेल्या पन्नास वर्षांत ह्या देशांत किंवा ह्या देशाबाहेर भारताच्या सशस्त्र क्रांतीचे जेवढे म्हणून कांहीं प्रयत्न झालें त्या सर्वांची प्रेरणा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे हा एकच ग्रंथ. हिंदुस्थानाच्या अगदीं कानाकोपऱ्यांत ह्या ग्रंथाचा गुप्तपणें प्रचार झाला. अमेरिकेमधल्या गदरपक्षानें त्याचें पंजाबी, हिंदी आणि उर्दू भाषांतून भाषांतर करविलें. भगतसिंहानें आणि त्याच्या सहकाऱ्यांनीं ह्या ग्रंथाच्या दोन इंग्रजी आवृत्त्या छापून काढल्या आणि नेताजी सुभाषचंद्रांनीं तर आपल्या 'आझाद हिंद फौजे' मधील, प्रत्येक सैनिकाला पाठ्य पुस्तकाप्रमाणें ह्या ग्रंथाचा अभ्यास करावयाला लावला. सारांश, गेल्या अर्ध-शतकांतील बहुतेक सर्व भारतीय क्रांतिकारकांना क्रांतीचा गुरुमंत्र स्वातंत्र्यवीर सावरकरांचा साहित्यानें दिलेला आहे. ह्या दृष्टीनें भारतीय क्रांतीच्या आणि स्वातंत्र्याच्या 'भव्य आणि जाज्वल्य' इतिहासांत सावरकर साहित्याचें अनन्य साधारण स्थान आहे.

सावरकरांचे अथांग साहित्य सामग्र्यानें वाचणें हें सर्व सामान्य वाचकांना शक्य नाहीं. त्या दृष्टीनें सावरकरांच्या विविध आणि विशाल साहित्याचें मंथन करून काढलेलें हें 'नवनीत' त्यांच्या प्रतिभेच्या सामर्थ्याचे देदीप्यमान चमत्कार यथार्थ स्वरूपांत प्रकट करील ह्यांत कांहीं शंका नाहीं. मराठी साहित्यामधें असें कोणतेंही क्षेत्र नाहीं कीं ज्या मधें सावकरांची लेखणी दिमाखानें संचार करीत नाहीं. कथा, कादंबरी, नाट्य, निबंध आणि काव्य ह्या वाङ्मयाच्या सर्व दालनांत त्यांच्या प्रतिभेनें आणि कल्पनेनें एकाही पेक्षां एक भव्य आणि दिव्य विलास करून दाखविलेलें आहेत. त्यांची भाषा म्हणजे एकाद्या ज्वालामुखीच्या तोंडांतून वहाणाऱ्या लाव्हारसाच्या प्रवाहासारखीं वाटतें. विचार, भावना आणि भाषा ह्यांचे जळजळीत रसायन बनवून ते पराकाष्ठेच्या त्वेषानें, आवेशानें आणि झपाट्यानें उधळणारा त्यांच्यासारखा 'गोलंदाज' लेखक निदान आम्ही तरी पाहिला नाहीं. स्वतंत्र भारतामध्यें आमच्या राष्ट्रीय पुण्यसरिता मुक्त झाल्या, पण ह्या पुण्यसरितामधील पुण्यतम सरिता जी सिंधु ती मात्र अद्याप आमच्या महाराज्यांत सामावलेली नाहीं हा हृदयभेदक विचार व्यक्त करतांना त्यांची भाषा जें तेजःपुंज रूप धारण करते तें पाहून अक्षरशः डोळे दिपतात तें सर्वच 'सिंधुस्तोत्र' येथें देण्याचा मोह आम्हांला आवरत नाहीं.

"सिंधूस आम्ही विसरूं ? सिंधूवांचून हिंदू ? अर्थावाचून शब्द ! प्राणावाचून कुडी ! अशक्य, अशक्य, अशक्य. जोंवर एक तरी हिंदु जिवंत आहे तोंवर तो सिंधूस विसरणें शक्य नाहीं. जिच्या कांठावर आमच्या प्राचीनतम वेदर्षीनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऋचांची पहिली सामगायनें गायिली, जिच्या पुण्यसलिलानी आपल्या संध्या-वंदनांतली अर्घ्यें दिली. आणि जिला अत्यादरानें वेदांतील देवतामध्यें स्थान देऊन तिच्यावर सुंदरांतील सुंदर सूक्तें रचलीं, त्या तुला, हे अंबितमे, नदीतमे, देवितमे सिंधू, आम्ही कधींही विसरणार नाहीं. तुझ्या परिसरामधें आमच्या प्राचीनतम राजर्षिंनी नि ब्रह्मर्षींनी केलेल्या यज्ञांच्या प्रदीप्त हुताशनांत जेव्हां हवी समर्पिले, तेव्हां अंतराळांत उंच उंच दरवळत गेलेल्या त्यांच्या सुगंधानी लालायित होऊन इंद्र, वरुण, मरुतादिक देव त्यांचे त्यांचे हविर्भाग स्वीकारण्यास तुझ्या तीरीं येत आणि सोमरसासमवेतच तुझें सुमधुर सलिल पिऊन प्रसन्न होत. त्या तुला हे सुरसरिते सिंधु आम्ही कधींही विसरणार नाहीं. तुला इतर कोणीही जरी एकवेळ विसरले तरी हे स्रोतःस्विनी सिंधु, हा आमचा एकटा महाराष्ट्र उठून तुला पुन्हा विमुक्त केल्यावाचून रहाणार नाहीं. ”

मॅझिनी चरित्राच्या 'प्रस्तावने' चा शेवट करतांना सावरकरांच्या भाषेचा हा दाहक दिमाख पहा.

“ज्याचा जन्म परतंत्रतेंत झालेला आहे, परंतु जे आपल्या पराक्रमानें त्या परतंत्रतेचें निर्दालन करून आपला स्वदेश स्वतंत्र झालेला पहातात व स्या स्वतःच्या कर्तत्रगारीनें दास्यमुक्त केलेल्या भूदेवीच्या अंकावर आपले शुभ्र मस्तक ठेवून चिन्मय होतात, त्यांच्या आनंदाला सीमा नाहीं. जर जगांत कांहीं निर्मल सुखाचे क्षण असतील तर त्याच्यांत तो क्षण शुद्ध सुखाची परम सीमा करणारा होय कीं, ज्याक्षणीं आपल्या अत्यंत प्रिय देशजननीला ज्यानें असह्य दुःख दिलें तो शत्रू मार खात खात देशाच्या हद्दीबाहेर पळून चाललेला आहे हें पाहतां येते. जर निर्मळ धन्यतेचा एखादा दिवस असेल तर तोच होय कीं, ज्या दिवशीं देश-जननीला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून रणांगणांतून देशभक्त परतत आहेत व त्या स्वातंत्र्यासाठीं पतन पावलेल्या देशवीरांच्या आत्म्यांना संबोधून अशी गर्जना करीत आहेत कीं, 'देशवीर हो, आपला देश स्वतंत्र झाला आहे. तुमच्या रक्ताचा सूड उगविला आहे!'”

सावरकरांच्या प्रतिभेचे सव्यसाचित्व हे आहे कीं क्रांतीचा अंगार ती जितक्या प्रखरतेनें उधळते तितक्याच कोमलतेनें काव्याचीही कारंजीं तिच्यामधून उचंबळू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शकतात. हा नमुना बघा. 'ज्या जगांत रात्रीं चांदण्या आहेत. उषःकाल गुलाबी आहेत. तारुण्य टवटवीत आहे. निद्रा गाढ आहे. भोगांत रुचि आहे. योगांत समाधि आहे.—देवा, तें हें जग तूं आमच्या सुखासाठींच निर्मिलेस असें आम्हांला कां वाटूं नये ? देवा, तूं आमची खरी आई आहेस — आईला देखील दूध येते — तूं दिलेंस म्हणून !" गौरवाची एवढी सुमनांजली देवाच्या मस्तकावर वाहिल्यानंतर त्याच हातानें उधळलेली ही 'लाखोली' आता वाचा : "ही सुगंधी फुलें, हें सुस्वर पक्षी, तो मनोहर पिसारा पसरून नाचणारे हें सुंदर मोरांचे थवे, रानचे रान अकस्मात् पेटून भडकलेल्या वणव्यांत, चुलींत वांगे भाजावें तसे फडफड करतात न करतात तोंच भाजून राख करून टाकतो — तो कोण ? गाय दिली तो दयाळू, तर त्याच गाईचे दूध पिऊन तिच्याच गोठ्यांत बीळ करून रहाणारा तो विषारी साप त्या गाईचे दूध देवाच्या नैवेद्यासाठीं काढावयास येणाऱ्या व्रतस्थ साध्वीला कडकडून डसून तिचा जीव घेणारा तो साप, तो ज्यानें दिला तो कोण ? प्रत्येक भोगामागे रोग, केसागणिक ठणठणारे केसतोड, नखानखांचे रोग, दांतादातांचे रोग, ते कण्हणें, त्या कळा, ती आग, त्या साथी, ती महामारी, ते प्लेग, ती अतिवृष्टि, ती अनावृष्टि, ते उल्कापात—हे कोणी केलें ?" हें जगड्व्याळ विश्व परमेश्वरानें कोणत्या हेतूनें वा हेतूवाचून निर्माण केले त्याच्याबद्दल माणसानें निष्कारण तर्ककुतर्क करीत बसूं नये हा एक तात्विक विचार चित्रमय स्वरूपांत प्रकट करण्यांत सावरकरांचे कौशल्य पहा. "पृथ्वीवर जेव्हां नुसत्या प्रचंड सुसरीच सुसरी नांदत होत्या नि मनुष्याचा मागमूसही नव्हता, तेव्हांही नद्या वाहत होत्या, झाडें फुलत होती, वेली फुलत होत्या. मनुष्यावांचून तर काय, पृथ्वी नव्हती तेव्हांहि हा सूर्य असाच आकाशांत भटकत फिरण्यास भीत नव्हता, आणि हा सूर्यहि जरी त्याचा साधा ग्रहोपग्रहसुद्धां हरवला तरी एक काजवा मेला तर पृथ्वीला जितकें चुकलेसें वाटतें तितकें देखील ह्या सुविशाल विश्वाला चुकलेसें वाटणार नाहीं. ह्या विश्वाच्या देवाला एक पलाचेंही सुतकी असे शंभर सूर्य एकाद्या साथींत एका दिवसांत जरी मरूं लागले तरी धरावे लागणार नाहीं !"

स्वातंत्र्याइतकाच शुद्ध बुद्धिवादाचा अत्यंत निकरानें पुरस्कार करतांना सावरकरांनीं समाजाच्या रोषा-लोभाची सुतराम् परवा केली नाहीं. पारतंत्र्यावर हल्ला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चढवतांना त्यांनीं जसे अक्षरशः तळहातावर शिर घेतलें होतें, त्याप्रमाणें समाजांतील जुलमी अन् अन्यायी रूढीवर आणि दुधखुळ्या देवभोळेपणावर मारा करतांना त्यामुळें आपल्या लोकप्रियतेला आपल्याला मुकावें लागेल ह्याची त्यांनीं बिल्कूल परवा केली नाहीं. राजकीय दृष्ट्या सावरकर जेवढे क्रांतिकारक होते तेंवढेंच सामाजिक बाबतींतही ते उडखोर होते. गाईला देवता समजून हिंदुलोकांनीं तिची पूजा करावी ह्या रूढाचाराचे त्यांनीं जेवढे वाभाडे काढले तेवढे कोणीही काढले नसतील. "गोठ्यांत उभ्या उभ्या गवतकडबा खात असलेल्या एकीकडे खातां खातांच उभ्या उभ्या दुसरीकडे मलमूत्रोत्सर्ग निःसंकोचपणें करणाऱ्या, थकवा येतांच रवंथ करीत त्याच मलमूत्रोत्सर्गांत स्वेच्छया बैठक मारून बसणाऱ्या, शेपटीच्या फटकाऱ्यानें स्वतःच्या शेणमूत्राचा तो चिखल अंगभर उडवून घेणाऱ्या, दावें सुटून थोडा फेरफटका करण्याची संधि मिळतांच अनेक समयीं कोठेंतरी जाऊन घाणींत तोंड घालणाऱ्या नि तसेंच ओठ चाटीत गोठ्यांत आणून बांधल्या जाणाऱ्या त्या गाईस शुद्ध नि निर्मळ वसनें नेसलेल्या सोंज्वळ ब्राह्मणानें वा महिलेनें हातीं पूजापात्र घेऊन गोठ्यांत पूजावयास जावे नि तिच्या शेपटीस स्पर्शून आपलें सोवळें न विटाळतां उलट अधिक सोज्वळलें आणि तिचें तें शेण नि तें मूत्र चांदीच्या पेल्यांत घोळून पितांना आपलें जीवन अधिक निर्मळलें असें मानावें !"

उपयुक्ततेच्या दृष्टीनें कुत्रा हा गाईपेक्षां अधिक उपकारक असतांना त्याची आपण जी अक्षम्य विटंबना करतो त्यांचे किती प्रभावी चित्र सावरकरांनीं रेखाटलेले आहे तें पहा. "गाईनें दूध दिलें तर कुत्र्यानें अनेक प्रसंगीं मनुष्यास जीवदान दिलेले आहे. मुलांचा मित्र, मृगयेची बंदूक, घराचे कुलूप, पडतो दाराशी, खातो भाकरीचे तुकडे, करून घेतो साऱ्यांची हडहड, नुसते यू म्हटलें कीं चटकन् त्यानें पाय चाटूं लागावें इतका विनम्र, संकटांत जिवास जीव देण्याइतका कृतज्ञ, शिवाय शेतकऱ्यापासून शाहू सम्राटापर्यंत ज्याचा त्याचा एकनिष्ठ चाकर ! त्या कुत्र्यास सन्मान कोणता, वेतन काय ? तर त्याचें नांव ही एक शिवी !"

हिंदु समाजांत 'अभक्ष्य' आणि 'अपेय' ह्यांचे जें ब्राम्हणी थोतांड अनेक शतकापासून माजून राहिले आहे त्यावरही सावरकरांनी कडकडून हल्ला चढविलेला आहे. त्यांनीं अगदी स्पष्टपणें सांगितले आहे कीं, "काय खावें नि काय प्यावें हा प्रश्न धर्मशास्त्राचा नसून तो वैद्यकशास्त्राचा असल्यानें जे रुचेल नि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पचेल ते वैद्यकशास्त्रदृष्ट्या स्वच्छ नि आरोग्यानुकूल असलेल्या कोणत्याही माणसाच्या हातून किंवा पंक्तीस बसून खाण्यास कांहीं एक प्रत्यवाय नाहीं. ब्रॉंकायटीस झाला तर थोडी ब्रॅण्डीसुद्धा घेतलीच पाहिजे. त्यावेळीं ती आवश्यकच असते. मिळेल तें नि पचेल ते खाऊन जगांत मानानें जगावयाला शिकले पाहिजे तोच आहे आजचा धर्म."

महात्मा गांधी आणि गांधीवाद ह्या नांवानें ओळखले जाणारे त्यांचे यंत्र-विरोधी आणि अहिंसावादी तत्त्वज्ञान ह्यांची तर सावरकरांनी संधि सांपडेल तेव्हां तेव्हां अशी कांहीं टर उडवली आहे कीं कांहीं विचारूं नका. मनुष्य हा शरीरानें अत्यंत दुबळा आहे. कोणत्याही श्वापदापुढें टिकाव धरणें त्याला अशक्य आहे. 'माणसाला सुळे नाहींत. शिंगे नाहींत. राठ किंवा केसाळ कांतडे नाहीं. पंख नाहींत. चोंच नाहीं. नखे नाहींत. दंष्ट्रा नाहीं. दंश नाहीं. नांगीही नाहीं. इंग्रजांनी निःशस्त्र करण्याच्या आधीं कितीतरी युगें माणसाला सृष्टीनें निःशस्त्र केलें आहे. असें असून मनुष्य आज साऱ्या प्राण्यांचा राजा, शास्ता आणि जेता म्हणून मिरवतो आहे. कशाच्या बळावर? कळीच्या हत्याराच्या. यंत्राच्या! यंत्रानें मनुष्य दुबळा होत नाहीं. उलट त्यानें आपली दुर्बलता यंत्राच्या सामर्थ्यावर मारून टाकून तो सर्व प्राण्यांत आज प्रबळतम झालेला आहे—मंत्रबळें नव्हे तर यंत्रबळें. यंत्र हा शाप नसून मनुष्याला अतिमानुष करणारें विज्ञानाचे वरदान आहे.' यंत्राच्या ह्या सावरकरी समर्थनाला गांधीवादाजवळ कांहींही उत्तर नाहीं.

स्वामी श्रद्धानंदाची हत्या करणाऱ्या भाई रशीदला जे महात्मा गांधी 'भाई' म्हणाले, त्यांनींच एका इंग्रजाचा वध करणाऱ्या गोपीनाथ सहाला 'हिंसक' ह्या विशेषणानें निषेधले. त्यावेळीं ढोंगानें आणि विसंगतीनें भरलेल्या महात्माजींच्या अहिंसा तत्त्वज्ञानाची सावरकरांनीं अशी कांहीं बंभेरी उडवली म्हणतां. भयानक उपरोधानें भरलेल्या आपल्या त्या लेखाची अखेर त्यांनीं अशी केली आहे. 'प्रत्यक्ष बहिणीवरही बलात्कार करावयास येणाऱ्या पाप्यावरही निरुपायानें शस्त्र चालविणें हीहि हिंसा असल्यानें, ती करूं नये म्हणून म्हणणारे महात्माजी इंग्लिशाचा पक्ष घेऊन जर्मन लोकांची कत्तल उडविण्यासाठीं इंग्रजी सैन्यांत भरती व्हा म्हणून हिंदी तरुणांस उपदेश करीत आजारीं पडे तों अट्टाहासानें प्रयत्न करते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

का ? ” आपल्या ‘ संन्यस्त खड्ग ’ ह्या नाटकांत एका पात्राच्या तोंडून ‘ वाटेल त्याला संन्यासाश्रमांत घेणाऱ्या आणि अशा रीतीनें लाखो लोकांस शस्त्रसंन्यासाच्या प्रतिज्ञेनें हतवीर्य करून ठेवणाऱ्या ह्या भयंकर भूलीचे भीषण परिणाम पंचवीसाव्या पिढीपर्यंत ह्या भारतास भोगावे लागतील ’ हा जो सावरकरांनीं अहिंसेला शाप देऊन ठेवलेला आहे तो फाळणीच्या वेळीं महात्माजीच्या वारसदारांनी घडवून आणलेल्या नरमेध यज्ञानें खराच ठरलेला आहे.

राष्ट्रांतील तरुणांत स्वातंत्र्य प्रेम, देशभक्ति आणि स्वाभिमान ह्या सद्गुणांचा कसा विकास होईल आणि त्याच बरोबर समाजांतील ढोंग आणि अंधश्रद्धा ह्यांचा नायनाट होऊन शुद्ध बुद्धिवादाची आणि पौरुषाची उपासना देशांतली तरुण पिढी कशी करूं लागेल ह्या एकाच ध्येयाचा आपल्या आयुष्यांत सावरकरांनीं निदिध्यास घरला. ‘ राष्ट्रीय जीवनाचें संरक्षण हीच साहित्याची आद्य चिंता असावी ’ असें मुंबईच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं मुळीं सांगूनच ठेवलेलें आहे. त्यांत ते म्हणाले, “ राष्ट्रीय साहित्य म्हणजे शस्त्रबळ-शास्त्रचर्चा नव्हे. शिवछत्रपतीनीं लेखणी टाकून ‘ भवानी ’ उचलली म्हणून तर आज ‘महाराष्ट्र-सारस्वत’ जिवंत राहिले आहे. “शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिंता प्रवर्तते.”

विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि लोकमान्य टिळक ह्यांच्याप्रमाणेंच आजच्या महाराष्ट्रीय जीवनाच्या, मराठी भाषेच्या आणि मराठी साहित्याच्या शिल्पीकरणांत स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांचा फारच मोठा भाग आहे असे त्यांचा शत्रू सुद्धा कबूल करील. आज संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यांत महाराष्ट्रामधें नवीन इतिहास आणि नवीन जीवन घडवलें जात आहे. अशा वेळीं हा लढा यशस्वी करण्यासाठीं आवश्यक असणाऱ्या पौरुषाची आणि पराक्रमाची प्रेरणा सावरकर साहित्यामधून मंथून काढलेल्या ह्या तेजस्वी ‘ नवनीता ’ च्या सेवनानें महाराष्ट्रांतील तरुणांना निःसंशय मिळेल अशी माझी श्रद्धा आहे.

झांशीच्या लक्ष्मीचा
शतसांवत्सरिक पुण्य दिन, मुंबई }

प्रल्हाद केशव अत्रे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सावरकर साहित्य नवनीत

— अमृत बिंदू

काव्य

चाफेकर नी रानडे फटका २५-२७

सिंहगडचा पोवाडा २८-३०

कमला (संक्षित) ९२-११०

रानफुलें

अनंताची आरती ४९६

सावरकरांची कविता

स्वतंत्रतेचे स्तोत्र ... ... प्रारंभ

सागरास २९४-२९५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

•

नाटकें

•

संन्यस्त खड्ग

शस्त्र संन्यास-शस्त्रस्वीकार-बुद्धरक्षण १३५–१६४

उत्तरक्रिया (निवडक उतारे) १९३–२१०

उःशाप (निवडक उतारे) ४८४–४८६

•

कादंबरी

•

मला काय त्याचें

क्रूर अत्याचार ३४६–३५३

काळे पाणी

योगानंद कीं रफिऊद्दीन ३५४–३७७

•

चरित्र ग्रंथ

•

जोसेफ मॅझिनी

जोसेफ मॅझिनी : प्रस्तावना ३१– ५०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

•

इतिहास

•

१८५७ चे स्वातंत्र्य समर

शहीद मंगल पांडे ७७- ८३

वृद्धयुवा कुंवरसिंह ८४- ९१

सहा सोनेरी पानें

यवनांतक पुष्यमित्र ४७३-४८३

•

आत्मवृत्त

•

आत्मवृत्त : पूर्वपिठिका

लिहूं कां ? २११-२१८

अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना ... २१९-२३३

हिंदी राष्ट्रसभेच्या पायाभरणींतच मुस्लिम पायाधरणीचा कालध्वम् २३४-२४५

आत्मवृत्त : खण्ड १ ला

माझ्या आठवणी (निवडक) २४६-२५२

आत्मवृत्त : खण्ड २ रा (अप्रकाशित)

" मॅझिनी " ची राजहुती आणि मुक्ति ... २७६-२८३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझी जन्मठेप
(निवडक उतारे) २५३-२७५

•

प्रबंध

•

हिंदुत्व
हिंदुत्वाची व्याख्या १११-१२५
अभिनव हिंदुध्वज १८६-१९२

•

लेख संग्रह

•

विज्ञाननिष्ठ निबंध : खण्ड १ ला
मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव ... १-११
ईश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय ! ... १२-२४
विज्ञाननिष्ठ निबंध : खण्ड २ रा
गोपालन-गोपूजन नव्हे २९६-३१४
दोन शब्दांत दोन संस्कृति ३१५-३२५
यंत्र ३२६-३४१
जात्युच्छेदक निबंध
जातिभेदाचे इष्टानिष्टत्व २८४-२९३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गांधी गोंधळ

गांधीजी आणि हे दुधखुळे हिंदु लोक ... ३४२–३४५

•

भाषणें

•

सावरकरांची भाषणें

लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या. ... ३९७–४२८

हिंदुराष्ट्र दर्शन

कर्णावती : हिंदु महासभा—अध्यक्षीय भाषण ... ३७८–३९६

अभिनव भारत सांगता समयींची उत्कृष्ट भाषणें

हे सिंधु आम्ही तुला मुक्त करूं ! ४६०–४७२

•

संकीर्ण

•

लंडनची बातमी-पत्रें

अप्रत्यक्ष प्रतिकाराचा जय व पराजय ५१–५६
लंडनमधील पहिला श्रीगणेशोत्सव ५७–६०
सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचा जंगी उत्सव ... ६१ ६२
जहालांचा निःपात करा ६३–६८
सर कर्झन वायलीना ठार मारले ! ! ६८–७१
मदनलाल धिंग्रा ७२–७६

अंदमानच्या अंधेरींतून

मरणोन्मुख शय्येवर १७७–१८५
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

•

विविध लेख व भाषणें

•

रहस्यकार आणि उपयुक्ततावाद
(केसरी : ४-८-१९२५) ... १२६-१३४

वैनायक वृत्ताचा विशेष
(रानफुलें-परिशिष्ट) ... १६५-१७६

माणसांनो ! माकडें व्हा !
(मनोहर : एप्रिल १९३५) ... ४३८-४५१

उपकारक हिंसा अहिंसाच होय
(भाषण : विलेपार्ले ४-११-१९५१) ... ४२९-४३७

पूरक धान्यें ... ...
(भाषण : आंग्रेवाडी २४-२-१९५२) ... ४५२-४५९

साधुसंतांचे बोलपट कसे पहावेत ?
(राष्ट्रधर्म : मार्च १९५२) ... ४८७-४९५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वतंत्रतेचे स्तोत्र

(चाल : चंद्रकांत राजाची)

जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥ ध्रु० ॥

राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची
स्वतंत्रते भगवति ! श्रीमति राज्ञी तूं त्यांची
परवशतेच्या नभांत तूंची आकाशीं होशी
स्वतंत्रते भगवति ! चांदणी चमचम लखलखशी
गालावरच्या कुसुमीं किंवा कुसुमांच्या गालीं
स्वतंत्रते भगवति ! तूंच जी विलसतेस लाली
तूं सूर्याचें तेज उदधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवति ! अन्यथा ग्रहणें नष्ट तेंची
मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपें तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवति ! योगिजन परब्रह्म वदती
जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवति ! सर्व तव सहचारी होतें
हे अधम-रक्त-रंजिते । सुजन-पूजिते । श्रीस्वतंत्रते

१=सूर्याचें तेज ग्रहणांत दिसेनासें होतें आणि समुद्राची थोरवीही अगस्ति ग्रहणांत–अंजलींत हस्तगत होतांच–विलुप्त झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुजसाठिं मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण

भरतभूमिला दृढालिंगना कधिं देशिल वरदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे
हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रीडा तेथें करण्याचा कां तुला वीट आला ?
होय आरसा अप्सरसांना सरसें करण्याला
सुधाधवल जान्हवीस्रोत तो कां गे त्वा त्यजिला ?
स्वतंत्रते ! या सुवर्णभूमिंत कमती काय तुला ?
कोहिनूरचें पुष्प रोज घें ताजें वेणीला
ही सकल-श्री-संयुता । आमुची माता । भारती असतां
कां तुवा ढकलुनी दिधली ?
पूर्वींचो ममता सरली
परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, कां तूं त्यजिलें उत्तर याचें दे ?
स्वतंत्रते भगवति ! त्वांमहं यशोयुतां वंदे

...पुणें १९०३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव ! : : १

✠ ✠ ✠

[हा लेख स्वा. वीर सावरकरांनीं ते रत्नागिरी येथें स्थानबद्ध असतांना लिहिला असून तो 'विज्ञाननिष्ठ' निबंध ह्या त्यांच्या पुस्तकांतून आणि कांहीं क्रमिक पुस्तकांतूनहि घेण्यांत आला आहे. कालानुक्रमें हा लेख नंतरचा असतांहि आम्हीं तो प्रारंभीं घेत आहों कारण शुभकार्यारंभीं परमेश्वराला वंदन करण्याची आपली प्रथा हेंच आहे.

मनुष्याच्या कल्पनेंतील देव आणि विश्वाचा गाडा चालविणारा देव ह्यासंबंधीं ह्या लेखांत मांडलेले विचार आम्हांस जसे अगदीं नवीन, चिरस्मरणीय आणि सत्याचा खरा आविष्कार नि शोध करणारे वाटले तसे ते अितरांनाहि वाटतील अशी आशा आहे.]

✠ ✠ ✠

वाहत्या नदींत काठी आपटली असतां त्या नदीच्या अखंड धारेचे पळभर दोन भाग झालेले भासतात. संध्याकाळीं अंधुकलेल्या अखंड आकाशांत मधेंच कुठें जी पहिली चांदणी लुकलुकूं लागते ती तशी चमकण्यासरशी ह्या अखंड आकाशाला अेक गणनाबिंदु मिळून त्याच्या चारीकडे चार बाजू चट्कन् वेगळ्या झाल्याशा भासतात.

ह्या पदार्थजातांतहि मनुष्याच्या जाणीवेची चांदणी चमकूं लागतांच त्याचे अकस्मात् दोन भाग पडतात. अुभें विश्व, अनंताच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत चरकन् कापलें जाअून दुभंग होअून पडतें. सुरूप आणि कुरूप,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुगंधी आणि दुर्गंधी, मंजुळ आणि कर्कश, मृदुल आणि कठोर, प्रिय आणि अप्रिय, चांगलें आणि वाअीट, दैवी आणि राक्षसी, हीं सगळीं द्वंद्वें मनुष्य हा ह्या यच्चयावत् विश्वाचा, वस्तुजाताचा, केंद्र कल्पिल्यामुळेंच, मध्यबिंदु समजला जातांच, अकस्मात् अुत्पन्न होतात. मनुष्यास जो सुखद तो विश्वाचा अेक भाग, मनुष्यास जो दु:खद तो दुसरा. पहिला चांगला, दुसरा वाअीट.

ज्यानें विश्वाचा मनुष्यास सुखद होणारा हा चांगला भाग निर्मिला तो देव; मनुष्यास दु:ख देणारा तो दुसरा वाअीट भाग निर्मिला तो राक्षस.

मनुष्याच्याच लांबीरुंदीचा गज घेअून विश्वाची अुपयुक्तता, बरेवाअीटपणा, मोजला असतां ह्या मोजणीचा हा निकाल फारसा चुकत आहे असें कांहीं म्हणतां येणार नाहीं.

विश्वाची अुपयुक्तता आपल्या मापानेंच मनुष्यानें अशी मापावी हेंहि अपरिहार्यच होतें. विश्वाचें रसरूपगंधस्पर्शादि सारेंच ज्ञान मनुष्याला त्याच्यापाशीं असलेल्या पांच ज्ञानेंद्रियांनींच काय तें कळूं शकणार. विश्वांतील वस्तुजात अेकेकीं गणून, तिचें पृथक्करण करून, ते घटक पुन्हा मोजून त्या अमर्याद व्यापाची जंत्री करीत राहिल्यानें विश्वाच्या असीम महाकोषांतील वस्तुजाताचें मोजमाप करणें केवळ अशक्य असें समजून आपल्या प्राचीन तत्त्वज्ञान्यांनीं, आपल्या पांच ज्ञानेंद्रियांनींच ज्या अर्थीं हें सर्व विश्व केव्हांहि जें कांहीं आकळलें जाअूं शकणारें आहे तें जाअूं शकतें, त्या अर्थीं त्याचें ‘पंचीकरण’ करणें हाच वर्गीकरणाचा अुत्कृष्ट मार्ग होय असें जें ठरविलें तें अेका अर्थीं क्रमप्राप्तच होतें. अितकेंच नव्हे तर तो त्याच्या अप्रतिरथ बुद्धिमत्तेचा त्या काळाचा अेक आश्चर्यकारक विजयच होता ! ज्ञानेंद्रियेंच जर पांच तर विश्वाचें यच्चयावत् वस्तुजात त्यांच्या त्या पांच गुणांपैकीं कोणत्यातरी अेका वा अनेक गुणांचेंच असणार. अर्थात् त्या पांच गुणांच्या तत्त्वांनीं, पंचमहाभूतांनींच, तें घडलेलें असणार. ह्या विश्वदेवाचा आम्हांशीं जो कांहीं सवाद होणें शक्य आहे तो ह्या त्याच्या पांच मुखांनींच काय तो होणार म्हणूनच तो विश्वदेव, तो महादेव पंचमुखी होय !

आपल्या ज्ञानेंद्रियांनीं विश्वाच्या गुणधर्माचें आकलन करण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो विश्वदेव, तो महादेव पंचमुखी होय !

मनुष्याचा हा यत्न जितका अपरिहार्य नी सहज तितकाच स्वतःच्या अंतःकरणानें त्या विश्वाला निर्मिणाऱ्या देवाच्या अंतःकरणाची कल्पना करण्याचा मनुष्याचा यत्नहि साहजिकच होता. त्यांतहि मनुष्याला सुख देण्यासाठींच कोण्या दयाळु देवानें ही सृष्टि निर्मिली असली पाहिजे, ह्या मानवी निष्ठेला अत्यंत प्रबळ असा पाठिंबा ही सृष्टिदेवीच प्रतिपदीं, प्रतिपलीं तिला तशी लहरच आली कीं सारखी देत राही. आजहि देतेच आहे !

खरोखर, मनुष्याच्या सुखसोयीसाठीं त्या दयाळु देवानें ही सृष्टीची रचना किती ममताळूपणानें केली आहे पाहा ! हा सूर्य, हा समुद्र–किती प्रचंड हीं महाभूतें ! पण मनुष्याच्या सेवेस त्यांनादेखील त्या देवानें लावलें. दुपारीं तहान तहान करीत मुलें खेळून दमून येतील तेव्हां थंडगार नी गोड पाणी मिळावें म्हणून आओ सकाळींच विहिरीचें पाणी भरून ‘कुज्यां’ त घालून गारत ठेवते, तशा ममतेनें अुन्हाळयानें नद्या सुकून जाण्याच्या आधींच हा सूर्य त्या समुद्रांतलें पाणी किरणांचे दोर खोलखोल सोडून भरतो, मेघांच्या ‘कुज्यां’-तून सांठवून ठेवतो, आणि तेंहि मध्यंतरीं अशी कांहीं हातचलाखी करून, कीं समुद्रांत असतांना तोंडीं धरवेना असें खारट असणारें तें पाणी किरणांच्या कालव्यांतून त्या आकाशाच्या विस्तीर्ण सरोवरांत सांचतांच अितकें गोड नी गार व्हावें कीं जें पाणी पिण्यासाठीं देवांच्याहि तोंडास पाणी सुटावें ! पुन्हां समुद्राचें खारट पाणी माणसासाठीं गोड करून देण्याच्या धांदलींत साराचा सारा समुद्र गोड करून टाकण्याची भलतीच चुकीहि न होअील अशी तो दयाळु देव सावधगिरीहि घेववितो–अेका वर्षांत हवें तितकेंच पाणी गोड करून आट-विण्याअितकीच शक्ति सूर्यकिरणांत आणि सांठविण्याअितकीच शक्ति मेघांत ठेविली जाते. नाहींतर सारा समुद्रच गोड झाल्यानें मनुष्यास मीठ मिळणें बंद होअून त्यांचा सारा संसार अळणी व्हावयाचा !

हे पशु पाहा ! मनुष्याच्या सेवेला आणि सुखाला हवे तसेच विविध, हवे तितकेच बुद्धिमान्, वाळवंटांतलें तें मनुष्याचें तारू–म्हणून कांटे खाअून पाण्यावांचून महिनोगणती चालण्याची युक्ति त्या अुंटाला शिकविली. तो घोडा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किती चपळ ! त्याच्यावर स्वारी भरणाऱ्या मनुष्यास भर रणांगणांतहि संभाळून वाहण्याअितकी नि मनुष्याशीं अत्यंत प्रामाणिकपणें वागण्याअितकी बुद्धि त्याला देवानें दिली. पण मनुष्यावरच स्वारी भरण्याअितकी बुद्धि मात्र दिली नाहीं ! ही गाय पाहा. अेका बाजूला सुकें गवत ढकलावें नी दुसऱ्या बाजूला त्याचें बनलेलें ताजें ताजें जीवनप्रद दूध चरव्या भरभरून काढीत बसावें ! असें तें आश्चर्यकारक रासायनिक यंत्र ज्या देवानें घडविलें तो खरोखरच किती दयाळु असला पाहिजे ! आणि पुन्हा प्रत्येक वेळीं जुनें यंत्र मोडतांच नवें घडण्याचे श्रमसुद्धां मनुष्याला पडूं नयेत अशी सोय त्यांतच केलेली; पहिल्या यंत्रांतच गवताचें दूध करून देतां देतां तसलींच नवीन अजब यंत्रें बनविण्याचीहि व्यवस्था केलेली !

अेक गव्हाचा दाणा पेरला कीं त्याचे शंभर दाणे ज्या जगांत होअून अुठतात; अेक आंबा ! रसानें, स्वादानें, सत्त्वानें कोण भरपूर भरलेलें तें देवफळ ! पण तरीहि तें अितकें सुपीक कीं अेक आंबा रुजविला कीं त्याचा वृक्ष होअून प्रतिवर्षी हजार हजार आंबे त्याला लागावे नी असा क्रम वर्षानुवर्षे चालावा; फार काय सांगावें; अेका आंब्याच्या फळापासून होणारीं तीं लाखों फळें सगळीच्या सगळीं जरी मनुष्यांनीं खाल्लीं तरी पुन्हा आंब्यांचा तोटा म्हणून पडूंच नये यासाठीं आंब्याच्या झाडांच्या फांदीचीच कलमें करून त्यांच्या आंबरायांच्या आंबराया भरभराटण्याची सोय ज्या जगांत देवानें केलेली आहे; अेका कणाचा मण होणारीं हीं तांदूळ, बाजरी, जोंधळे प्रभृति नानाविध सत्त्वस्थ धान्यें; अेक बी पेरली की अेका पिढीस सहस्रावधि रसाळ फळें पुरविणारीं हीं फळझाडें; हे फणस, पपनस, अननस, द्राक्षें, डाळिंबें, या गवतासारख्या अुगव म्हणतांच अुगवणाऱ्या अति रुचकर, बहुगुणी, विविधरस शाकभाज्या, फळभाज्या; ज्या जगांत पुरून अुरताहेत, ज्याचा गाभाच गोड आहे, तो साखरेच्या पाकानें ओतप्रोत भरलेला अूसदेखील ज्या जगांत अितका पिकतो कीं त्याचे मळेच्या मळे माणसांना नकोसे झाले म्हणजे बैल खाअून टाकतात–त्या जगास निर्मिण्यांत देवानें मनुष्यावर जी अमर्याद दया केली आहे तीविषयीं मनुष्य त्याची अुतराअी होणार तरी कसा ! !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तशीच ही मनुष्याच्या देहाची रचना! पायाच्या तळव्यापासून तों मज्जांतील सूक्ष्मातिसूक्ष्म पिंडानुपिंडापर्यंत ह्या शरिराची रचना मनुष्याला सुखदायी होईल अशीच सुसंवादी करतांना हे मनुष्याच्या देवा, तूं जी केसानुकेसागणिक काळजी घेत आला आहेस ती कुठवर सांगावी! मनुष्याचा हा अेक डोळा जरी घेतला तरी, किती युगें, किती प्रयोग, किती अनवरत अवधानें करून तूं हा आज आहे तसा घडवूं शकलास! प्रथम प्रकाशाला किंचित्-संवादी असा अेक नुसता त्वग्बिंदु: प्रकाशाला नव्हे तर त्याच्या सावलीला तेवढा जाणणारा; अंधेर नि अुजेड अितकाच फरक काय तो जाणणारा तो पहिला त्वग्बिंदु; त्याच्यांत सुधारणा करतां करतां किती प्रयोग करून किती रद्द करून, पुन्हा प्रयोग रचतां रचतां शेवटीं आज मनुष्याचा सुंदर, टपोरा, पाणीदार, महत्त्वाकांक्षी डोळा तूं घडविलास! अितका महत्त्वाकांक्षी डोळसपणा त्या मनुष्याच्या डोळ्यांत मुसमुसत आहे कीं, देवा, तुझ्याच कलेंत तुझाच पाडाव करण्यासाठीं दुर्बिणीचे प्रतिनेत्र निर्मून तो तुझ्या त्या आकाशांतील प्रयोगशाळेचेंच अंतरंग पाहूं अिच्छित आहे! नव्हे, तुलाहि त्या दुर्बिणीच्या टप्प्यांत गांठून कुठेंतरी प्रत्यक्ष पहातां येतें कीं नाहीं याचे प्रयोग करूं म्हणत आहे!!

आणि त्या मनुष्याच्या डोळ्यास प्रसादविण्यास्तव सौंदर्याचा नी सुरंगांचा जो महोत्सव तूं त्रिभुवनांत चालूं केलास त्याची आरास तरी काय वर्णावी? हें पारिजाताचें सुकोमल फूल, तें सोनचाफ्याचें सुवासमत्त सुमन! हा मोराचा पिसारा पाहा, अेकेका पिसाची ती ठेवण, तें रंगकाम, ती जिवंत चमक, तें तरल नटवेंपण! आद्य कलावंत! तशा अनेक सुंदर पिसांचा पिसारा पसरून तो तुझा मोर जों जों आनंदानें अुन्मत्त होअून नाचूं लागतो तों तों देवा, तुझी ललित कलाकुसरी पाहून 'धन्य, देवा, धन्य तुझी! वारे वा!' असें वारंवार अुद्गारत माझें हृदयहि नाचूं लागतें! आणि असा पिसारा मनुष्यासहि तूं कां दिला नाहींस म्हणून किंचित् रुसूंहि लागतें. हे नयनाल्हादक रंगांचे नी श्रवणाल्हादक गोड लकेऱ्या घेणारे शतावधि पक्ष्यांचे थवेच्या थवे ज्या जगांत मंजुळ आनंदाचे किलबिलाट करीत आहेत; गुलाब, चमेली, बकुळ, जाअीजुअी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चंपक, चंदन, केतक केवड्यांचीं बनेंच्या बनें सुंदर फुलांचे सडे पाडीत आहेत आणि सुगंधानें सारा आसमंत दरवळून सोडत आहेत; माणसांतून या प्रीति-रति आणि मानससरोवरांतून ह्या कमलिनी कुमुदिनी विकसत विलसत आहेत ; ज्या जगांत रात्रीं चांदण्या आहेत, अुषःकाल गुलाबी आहेत, तारुण्य टवटवीत आहे, निद्रा गाढ आहे, भोगांत रुचि आहे, योगांत समाधि आहे--देवा ! तें हें जग ज्या तूं आम्हां मनुजांना अितकें सुखमय होअूं दिलेंस, होअूं देत आहेस, त्या तूं तें आमच्या सुखासाठींच असें निर्मिलेंस असें आम्हांस कां वाटूं नये? आम्हांला जशी आमच्या लेकरांची माया आहे म्हणूनच आम्ही त्यांच्या सुखासाठीं, जपतों, तसेंच आमच्या सुखासाठीं अितकें जपणाऱ्या देवा, तुला आम्हां मनुष्यांची माया असलीच पाहिजे. आम्ही माणसें, देवा, तुझीं लेंकरें आहोंत; तूं आमची खरी आअी आहेस ! आअीलादेखील दूध येतें-तूं दिलेंस म्हणून ! आम्ही मनुष्यें तुझे भक्त आहोंत, आणि देवा, तू आम्हां मनुष्यांचा देव आहेस.

अितकेंच नव्हे, तर तूं आम्हां मनुष्यांचाच देव असून तुझ्यावांचून दुसरा देव नाहीं ! हें सारें जगत् तूं आमच्या सुखसोयीसाठींच घडविलें आहेस! !

मनुष्याच्या अिच्छेस जुळेशी ही विचारसरणी सत्यास जुळेल अशीहि ठरली असती-- जर या जगांतील प्रत्येक वस्तु नी प्रत्येक वस्तुस्थिति मनुष्याला सुखकारक नी अुपकारक अशीच असती तर ! पण मनुष्याच्या दुर्दवानें या साऱ्या जगांतील तर राहोतच, पण ज्या पृथ्वीस तो मनुष्य प्रथम तरी ' सारें जग ' म्हणून स्वाभाविकपणेंच संबोधित होता, जिला विश्वंभरा, भूतधात्री, अशा नांवानें तो अजूनहि गौरवितो, त्या पृथ्वीवरील वस्तुजातहि वा वस्तुस्थितीहि मनुष्यास सर्वस्वी अनुकूल नाहीं; अितकेंच नव्हे, तर अुलट अनेक प्रकरणीं मारकच आहे.

ज्या सूर्याचे नी समुद्राचे मनुष्यावर झालेले अुपकार आठवून आठवून आत्तांच त्याचीं स्तोत्रें गाअिलीं तो सूर्य नी तो समुद्रच पाहा ! अुन्हानें तापून चक्कर येअू लागलेल्या अवश वाटसरूवर, लाठीच्या पहिल्या दोनचार तडाक्यांनीं अर्धमेला होअून गेलेल्या सापावर आपण जसा शेवटचा टोला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मारून तो साप पुरता ठार करतों तसा— हा सूर्य आपल्या प्रखर किरणांचा शेवटचा तडाखा मारून त्या मनुष्यांना ठिकच्या ठिकाणीं ठार करण्यास चुकत नाहीं ! ज्या भारतांत त्या सूर्यास लक्षावधि ब्राह्मण, सकाळ—संध्याकाळ अर्घ्य देण्यास अुभे असत, त्याच भारतांत, त्या धर्मशील काळींहि दुर्गादेवीच्या दुष्काळांचा सुकाळ करून बारा बारा वर्षे आपली प्रखर आग सारखी वर्षत लाखों जिवांस जिवंत भाजून काढीत आला आहे ! कुराणांत, तौलिदांत, भाविक पैगंबरांनीं स्तुति केली आहे कीं, ' मनुष्यासाठीं, हे देवा, हे किती असंख्य मासे, किती रुचकर अन्नाचा हा केवढा अखंड सांठा तूं या समुद्रांत ठेवला आहेस ! ' पण तोच समुद्र मनुष्यास जशाचा तसाच गिळून पचवून टाकणाऱ्या अजस्र सुसरींना आणि प्रचंड हिंस्र माशांनाहि निःपक्षपातानें पाळीत आहे ! मनुष्यांचीं तारवें पाठीवर वाहून नेतां नेतां, सदय वाटाड्याचें सोंग घेअून चाललेला वाटमाऱ्या जसा भररानांत त्याच बायाबापड्या वाटसरूंवर अुलटून त्यांचे गळे कापतो, तसा हा समुद्र अकस्मात् हजारों माणसांनीं भरलेलीं तीं तारवें नी त्या प्रचंड टिटानिका बोटी आपल्या पाठीवरून फेकून आपल्या भयंकर जबड्यांत ढकलतो— गट्कनी गिळून टाकतो ! अेकादी राक्षशीण रागावली तर अेकाद्या लेकराची मानगुटी नदींत दाबून, त्याचा गुदमरून जीव जाअीतों धरील ! अेकादी हिंस्र सुसर फार तर दोनतीन सुरेख कुमारिकांना नदींत अुतरून लाजत लाजत स्नान करीत असतां त्यांचे काकडी-सारखे कोवळे लुसलुशीत पाय दातांत धरून हिसडून गटकन् गिळून टाकील; पण ही गंगामाय, ही जमनाजी, ही देवनदी जार्डन, हा फादर थेम्स, हजारों कुमारींची— मुलांलेंकरांची— मान अेका मानेसारखी, आपल्या पाण्यांत याचा अवश जीव गुदमरून ठार होअीतों दाबील, नगरेंचीं नगरें त्यांचा पाया हिसडून गिळून टाकील.

अिंजिलकुराणादिक धर्मग्रंथांत भाबडी भक्ति लिहून गेली कीं, बोकड, कोंबडी, ससा, शेळी, हरीण हेहि नानाविध प्राणी मनुष्यांना पुष्कळ मांस मिळावें म्हणून, हे दयाळु देवा, तूं निर्मिलेस ! पण त्यांच्या रुचकर मांसानें, स्मरणानें तोंडास पाणी सुटलेल्या त्या भक्तीस ह्याचें अगदींच कसें विस्मरण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडतें कीं ह्याच जगांत त्याच देवानें मनुष्याचेंहि मांस खाण्यासाठीं सिंह, वाघ, चित्ते, लांडगे हेहि निर्मिलेले आहेत. हे दयाळु देवा, तूं माणसाचीं कोळींकोळीं मुलें अशाचसाठीं निर्मिलींस कीं, आम्हांस काकडीसारखी मुखशुद्धि सदोदित मिळावी अशी मनुष्यास फाडून चिरफाडून खाल्ल्यानंतर त्याच्या हाडांवर ढेंकरा देत बसलेल्या सिंहांच्या नी लांडग्यांच्या रक्ताळलेल्या तोंडांतली कृतज्ञ स्तुतीहि त्याच देवास पावत आहे! आशिया आणि आफ्रिका यांस जोडणारे खंडच्या खंड ज्या दिवशीं महासागरांत, त्या खंडावरील वरमाला घेऊन उभ्या असलेल्या लक्षावधि कुमारिकांसह, दूधपाजत्या आयालेकरांसह, अर्धभुक्त प्रणयी जनांसह, पूजांजलि वाहत्या भक्तांसह, त्याच देवाची स्तुति चाललेल्या लाखों देवालयांसह ते खंडच्या खंड त्याच देवानें ज्या दिवशीं त्या महासागरांत गणपति डबकन् बुडवावा तसें बुडविलें त्याच्या दुसऱ्या दिवशीं हीच उषा, हीच वेदांनीं गाइलेली उषा, असेंच गोड गुलाबी हास्य हंसत त्या शुकशुकाट दृश्याकडे पहात होती! कुराणांत म्हटलें आहे कीं, 'चंद्र निर्मिला, अशासाठीं कीं, मनुष्याला निमाज पढावयाच्या वेळा कळाव्या!' पण जो जो निमाज पढे त्या त्या अिस्लामियांची, त्या मुल्ला-मौलवीमशिदीसुद्धां कत्तल करून, त्या खलिफाच्या घराण्याची राख-रांगोळी उडवून त्या लाखों मुस्लिमांच्या कापलेल्या डोक्यांच्या ढिगावर ज्या दिवशीं तो निमाजाचा कट्टर शत्रु चेंगिजखान चढून जाऊन शांतपणें बसला, त्या रात्रीं त्या बगदाद नगरीं हाच चंद्र त्या चेंगिझखानालाहि त्याच्या वेळा पलें पलें मोजून असाच बिनचूक दाखवीत शांतपणें आपली कौमुदी विचरीत होता.

हीं सुगंधीं फुलें, हे सुस्वर पक्षी, तो मनोहर पिसारा पसरून नाचणारे हे सुंदर मोरांचे थवे, रानचें रान अकस्मात् पेटून भडकलेल्या वणव्यांत, चुलींत वांगें भाजावें तसें फडफड करतात न करतात तोंच भाजून राख करून टाकतो–तो कोण? गाय दिली तो दयाळु, तर त्याच गाअीचें दूध पिऊन तिच्याच गोठ्यांत बीळ करून राहणारा तो विषारी साप, त्या आअीचें दूध देवाच्या नैवेद्यासाठीं काढावयास येणाऱ्या व्रतस्थ साध्वीला कडकडून डसून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिचा जीव घेणारा तो साप, तो ज्यानें दिला तो कोण ? प्रत्येक भोगामागें रोग, वे सार्गणिक ठणठणणारे केसतोड, नखानखांचे रोग, दांतादांताचे रोग, तें कण्हणें, त्या कळा, ती आग, त्या साथी, ती महामारी, ते प्लेग, ती अतिवृष्टि, ती अनावृष्टि, ते अुल्कापात ! जिच्या मांडीवर विश्वासानें मान ठेवली ती भुअीच अकस्मात् अुलटून मनुष्यांनीं गजबजलेले प्रांतचे प्रांत पाताळांत जिवंत पुरून गडप करून टाकणारे ते भूमिकंप !! आणि कापसाच्या राशीवर जळती मशाल कोसळावी तसें ह्या पृथ्वीच्या अंगावर कोसळून अेखाद्या गवताच्या गंजीसारखी भडभड पेटवून देणारे ते दुष्ट धुमकेतु—ते कोणीं केले ?

जर ह्या विश्वांतील यच्चयावत् वस्तुजाताच्या मुळाशीं त्यांना धारण करणारी, चालन करणारी, किंवा जिच्या क्रमविकासाचे ते परिणाम होत आले आहेत अशी जी शक्ति आहे तिला देव म्हणावयाचें असेल तर त्या देवानें हें सारें विश्व, मनुष्यांस त्याचा मध्यबिंदु कल्पून केवळ मनुष्याच्या सुखसोयींसाठींच निर्मिलें ही भावना अगदीं भाबडी, खुळी आणि खोटी आहे असें मानल्यावांचून वरील विसंगतीचा अुलगडा होअूंच शकत नाहीं.

कोणत्या हेतूनें वा हेतुवांचून हें जगड्व्याळ विश्व प्रेरित झालें तें मनुष्याला तर्कितादेखील येणें शक्य नाहीं. जाणतां येणें शक्य आहें तें अितकेंच कीं, कांहीं झालें तरी मनुष्य हा ह्या विश्वाच्या देवाच्या खिसगणतींतहि नाहीं. जशी कीड, मुंगी, माशी, तसाच ह्या अनादिअनंत कालाच्या असंख्य अुलाढालींतील हा मनुष्यहि अेक अत्यंत तात्पुरता आणि अत्यंत तुच्छ परिणाम होय. त्याला खायला मिळावें म्हणून धान्य अुगवत नाहीं, फळें पिकत नाहींत, कोथिंबीर खमंग झालेली नाहीं. धान्य पिकतें म्हणून तो खाअू शकतो अितकेंच काय तें. त्याला पाणी मिळावें म्हणून नद्या वाहत नाहींत. नद्या वाहतात म्हणून पाणी मिळतें अितकेंच काय तें. पृथ्वीवर जेव्हा नुसत्या प्रचंड सुसरीच सुसरी नांदत होत्या नी मनुष्याचा मागमूसहि नव्हता तेव्हांहि नद्या वाहत होत्या, झाडें फुलत होतीं, वेली फुलत होत्या. मनुष्यावांचून तर काय, पृथ्वी नव्हती तेव्हांहि, हा सूर्य असाच आकाशांत भटकत फिरण्यास भीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हता, आणि हा सूर्यहि जरी त्याच्या साऱ्या ग्रहोपग्रहांसुद्धां हरवला तरी, अेक काजवा मेला तर पृथ्वीला जितकें चुकलेसें वाटतें तितकेंदेखील या सुविशाल विश्वाला चुकलेंसें वाटणार नाहीं. ह्या विश्वाच्या देवाला अेक पलाचेंहि सुतक, असे शंभर सूर्य अेखाद्या सांथींत अेका दिवसांत जरी मरूं लागले तरी, धरावें लागणार नाहीं !!

तरीदेखील ज्या कोणाच्या हेतूनें वा हेतूवांचून ही विश्वाची प्रचंड जगड्व्याळ अुलाढाल चालू आहे तींत अेक अत्यंत तात्पुरता नी अत्यंत तुच्छ परिणाम म्हणून कां होअीना, पण मनुष्याला, त्याच्या लांबीरुंदीच्या गजानें मापतां यावें असें, त्याच्या संख्येंत मोजतां यावें असें, अितकें सुख नी अितक्या सोयी अुपभोगितां येतात हा मात्र आणि अेवढाच काय तो ह्या विश्वाच्या देवाचा मनुष्यावर झालेला अुपकार होय ! मनुष्याला ह्या जगांत जें सुख मिळूं शकतें तेवढेंहि मिळूं न देण्यासारखीच जर ह्या विश्वाची रचना ह्या विश्वाच्या देवानें केली असती, तर त्याचा हात कोण धरणार होता ? हे सुगंध, हे सुस्वर, हे सुखस्पर्श, हें सौंदर्य, हें सुख, ह्या रुची, ह्या सोयी आहेत, त्याहि अमूप आहेत ! ज्या योगायोगानें मनुष्यास ह्या सर्व लाभत आहेत त्या योगायोगाला शतशः धन्यवाद असोत ! ज्या विश्वशक्तींनीं कळत न कळत असा योगायोग जुळवून आणला त्यांना त्या अंशापुरतें मनुष्याचा देव म्हणून संबोधिल्याचें समाधान आपल्यास अुपभोगितां येअील, अुपकृत भक्तीचें फूल वाहून त्यास पूजितांहि येअील !

परंतु त्यापलीकडे ह्या विश्वाच्या देवाशीं, वाटच्या भिकारड्यानें सम्राटाशीं जोडूं पहावा तसा कोणचाहि बादरायणसंबंध जोडण्याची लचाळ हाव मनुष्यानें आमूलात् सोडून द्यावी हेंच अिष्ट ! कारण तेंच सत्य आहे ! आपलें चांगलें तें देव करील, देव चांगलें करील तर मी सत्यनारायण करीन ही आशा, हा अवलंब, अगदीं खुळचट आहे ! कारण तो अगदीं असत्य आहे. ज्या ज्या संकटांतून आपणांस सोडविलें म्हणून आपण देवाचा सत्यनारायण करतों, त्या त्या संकटांत प्रथम आपणांस ढकलतो कोण ? तोच सत्यनारायण, तोच देव ! जो प्रथम आपला गळा कापतो आणि नंतर त्यास मलम लावतो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याची मलम लावण्यासाठीं पूजा करावयाची तर प्रथम गळा कां कापलास म्हणून त्याची आधीं यथेच्छ शोभाहि करावयास नको काय ? विश्वाच्या देवाच्या ठायीं ह्या दोन्हींहि भावना अनाठायीं नी असमंजस आहेत.

ती विश्वाची आद्यशक्ति ज्या कांहीं ठराविक नियमांनीं वर्तते आहे ते तिचे नियम समजतील ते समजून घेऊन त्यांतल्या त्यांत आपल्या मनुष्य-जातीच्या हिताला नी सुखाला पोषक होईल तसा त्यांचा साधेल तितका उपयोग करून घेणें इतकेंच मनुष्याच्या हातांत आहे. मनुष्यजातीच्या सुखाला अनुकूल तें चांगलें, प्रतिकूल तें वाईट, अशी नीतिअनीतीची स्पष्ट मानवी व्याख्या केली पाहिजे. देवास आवडतें तें चांगलें; आणि मनुष्यास जें सुख-दायी तें देवास आवडतें ह्या दोन्ही समजुती खळचट आहेत; कारण त्या असत्य आहेत. विश्वांत आपण आहोंत पण विश्व आपलें नाहीं; फार फार थोड्या अंशीं तें आपणांस अनुकूल आहे; फार फार मोठ्या अंशीं तें आप-णांस प्रतिकूल आहे–असें जें आहे तें नीटपणें, धीटपणें, समजून घेऊन त्याला बेधडकपणें तोंड देणें हीच खरी माणुसकी आहे ! आणि विश्वाच्या देवाची खरी खरी तीच पूजा ! !

✠ ✠ ✠

सावरकरांचे विज्ञान निष्ठ निबंध, भाग १ (मराठी): मूल्य रु. १–८ आ. हा वीर सावरकरांच्या निबंधांचा संग्रह आहे.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अीश्वराचें अधिष्ठान म्हणजे काय ? : : २

✠ ✠ ✠

[हाहि लेख रत्नागिरीच्या स्थानबद्धता कालांतीलच आहे. ‘ परंतु तेथें अीश्वराचें अधिष्ठान पाहिजे ’ हें सुभाषित मराठी माणसाला अगदीं पाठ आहे. पण हें ‘ अधिष्ठान ’ म्हणजे काय याचें अुत्तर आपणाला ह्या लेखांत आढळेल.]

✠ ✠ ✠

।। सामर्थ्य आहे चळवळीचें ।।
।। जो जो करील तयाचें ।।
।। परंतु तेथें भगवंताचें ।।
अधिष्ठान पाहिजे ।।

--श्रीरामदासस्वामी.

शिवकालीन महाराष्ट्रांतील क्रांतिकारक अशा असामान्य पुढाऱ्यांत आपल्यापरी असामान्य स्थान पावलेल्या समर्थ रामदासस्वामींची ही ओवी विजेची अेक ज्योत आहे ! अितकी तेजस्वी ! शिवकालीन महाराष्ट्राच्या प्रचंड कर्तृत्वशक्तीची नी हिंदु स्वातंत्र्यसमराची केवळ रणघोषणा !

तिच्यांतील शेवटच्या दोन चरणांत जें सांगितलें आहे कीं, ‘ परंतु तेथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे ’ त्या शब्दांनीं समर्थ रामदासांच्या मनांत कोणचा अर्थ व्यक्तविण्याचें अुद्दिष्ट होतें तें आतां नक्की सांगणें यद्यपि दुर्घट आहे. तथापि त्यांचा अर्थ कांहींहि असला तरी त्या ओवीचें तेजस्वी कार्य ती करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेली. त्या परिस्थितींत मुसलमानी धर्मवेडाच्या अुन्मादाची नांगी ठेचण्यास समर्थ होओील असें चैतन्य महाराष्ट्रांत संचरविण्यास त्या काळीं ती कारण झाली, हें तिचें समर्थन पर्याप्त आहे. यास्तव तिचा आज जो अेक अर्थ सर्व-साधारणपणें समजला जातो नी ज्या अर्थाच्यायोगें राष्ट्रांत आज अनर्थकारक अशी अेक वृत्ति अुत्पन्न होत आहे त्या अर्थास निषेधिण्यामध्यें त्या ओवीचा वा तिच्या त्या तेजस्वी नी कर्मयोगी निर्मात्याचा लवलेशहि अनादर घडण्याचा दोष संभवत नाहीं. त्या ओवीचा मूळचा अर्थ काय होता हा प्रश्न या लेखांत आमच्यापुढें नसून त्या ओवीचा आज केला जाणारा अर्थ आजच्या परिस्थितींत किती अनर्थकारक आहे नी तिच्यांत जें तत्त्व अनुस्यूत केलेलें आहे म्हणून साधारणतः समजलें जातें, तें अैतिहासिक नी तात्त्विक दृष्टचा किती अतथ्य आहे हें काय तें या लेखांत आम्ही दाखवूं अिच्छितों.

चळवळीचें, म्हणजे मानवी प्रयत्नांचें सामर्थ्य किती जरी वाढविलें तरी ज्या चळवळीला भगवंताचा पाठिंबा नाहीं ती चळवळ अयशस्वी झालीच पाहिजे ह्या तत्त्वाचा अर्थ नक्की करतांना भगवंताचा पाठिंबा म्हणजे काय, तें अीश्वराचें अधिष्ठान म्हणजे काय ह्याचा प्रथम स्पष्ट अुलगडा झाला पाहिजे. जर भगवंताच्या अधिष्ठानाचा अितकाच अर्थ असेल कीं, अैहिक आणि मानवी अुपायांच्या हातींच यशाची किल्ली नसून मनुष्याच्या, ज्ञानाच्या नी शक्तिच्या पलीकडे ज्या अनेक अज्ञात, अज्ञेय, प्रचंड अशा अमानुष विश्वशक्ति आहेत, त्यांच्या आघात-प्रत्याघातांच्या टकरींतहि त्या यशाचा वा अपयशाचा संभव असतो, तर तो अर्थ बरोबरच आहे! अत्यंत क्षुद्र अशा गवताच्या काडीच्या हालण्यापासून तो भूकंपाच्या, सूर्यमालांच्या प्रलयंकर अुत्पाता-पर्यंत ज्या विश्वशक्तींच्या अुलाढाली नी टकराटकरी चाललेल्या आहेत, त्या सार्‍या बलाबलांचें त्यापुरतें फलित (Resultant) म्हणजेच कोणतीहि घटना होय. ह्या तात्त्विक अर्थी कोणच्याहि चळवळीचें यशापयश हेंहि अेक फलितच असल्यामुळें मानवी अुपायांच्या पलीकडील त्या अमानुष शक्तीचा व्यापार हेंच त्यांचें महाकारण होय. त्यांस जर अीश्वराचें अधिष्ठान म्हणावयाचें असेल तर मानवी अुपाय नी साधनें हीं प्रत्यक्ष कारणेंच कोणत्याहि यशाचीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशेष कारणें नसून तीं अमानुष विश्वशक्तीची गुंतागुंत, तें 'दैवं चैवात्र पंचमम्,' तो योगायोग, हें त्याचें महत्कारणहि अनुकूल असलें पाहिजे हें म्हणणें यथार्थ आहे. मानवी चळवळ कितीहि सामर्थ्यसंपन्न असली आणि ती कितीहि यशस्वी झाली तरी त्या यशाचें सर्व यश मनुष्यकृत प्रयत्नासच नसून अतिमानुष शक्तींचा व्यापारहि त्यास अनुकूल असाच घडत गेला; दैवाचा फांसाहि तेंच दान देणारा पडत गेला; आणि त्या दैवास देवाची अिच्छा म्हटलें तर देवाचें, ओीश्वराचें, अधिष्ठान त्यास लाभले म्हणून तें यश आलें, ही जाणीव व्यक्तविण्याचाच जर ह्या ओवीचा अुद्देश असेल तर तिच्यांतील तें तत्त्व अगदीं यथातथ्य आहे यांत शंका नाहीं. किंबहुना ज्याला आपण आपल्या मानवी समजुतीसाठीं मानवी यत्न वा मानवी अुपाय म्हणतों, तेंहि वास्तविक पाहतां त्या अतिमानवी शक्तीचाच अेक प्रादुर्भाव आहे.

परंतु ह्या ओवीचा अर्थ अशा तात्त्विक अर्थी क्वचित्‌च कोणी घेत असेल ! सामान्यतः तिचा अर्थ असाच घेण्यांत येतो कीं मनुष्य ज्याला ज्याच्या त्याच्यापरी नीति वा अनीति म्हणतो, न्याय व अन्याय म्हणतो, दैवी संपत् वा आसुरी संपत् म्हणतो, धर्म वा अधर्म म्हणतो, त्यापैकीं पहिलें तें सत्य नी दुसरें तें असत्य असून जी चळवळ त्या मानवी सत्याच्या पायावर अुभारलेली असते, त्या मानवी न्यायाची पोषक असते, त्या मानवी धर्माचें ब्रीद मिरविते; तीच काय ती यशस्वी होते ! ओीश्वर तिच्यावर कृपा करतो अशा अर्थी ओीश्वराचें अधिष्ठान जिला लाभत नाहीं, ती चळवळ कितीहि प्रबळ असली तरी ती यशस्वी होत नाहीं. यास्तव चळवळ करणारांनीं प्रथम तें भगवंताचें अधिष्ठान संपादिलें पाहिजे, ओीश्वराची कृपा अर्जिली पाहिजे. आणि ही ओीश्वराची कृपा संपादिण्याचा मार्ग कोणता ? तर अर्थातच पंचाग्निसाधन, पाण्यांत अुभें राहून द्वादशवार्षिक नामजप, योग–साधन, अुपासतापास, अेकशेआठ सत्यनारायण, अेक कोटि रामनाम जप, संतत धारेचीं अनुष्ठानें, रेडे वा बोकड मारणारे नवस, हजार वाती लावणें, लक्ष दुर्वा वाहणें, स्नानसंध्या, जपजाप्य, नामसप्ताह, पुरश्चरणें–पारायणें, गोग्रास, ब्राह्मणभोजनें, यज्ञयाग, दक्षिणादानें प्रभृति जे शतावधि अुपाय श्रुतीपासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शनिमहात्म्यापर्यंत देवास संतोषविण्यास्तव वर्णिलेले आहेत त्यांस आचरणें हा होय. या अर्थी जिला तपस्या म्हणतात ती आधीं, मग मानवी चळवळ.

वरील मत खरें कीं खोटें हें पाहण्यापूर्वी अितकें स्पष्ट सांगून टाकतों कीं, वर अुल्लेखिलेल्या जपतपादि साधनांची आत्मशुद्धि वा पारलौकिक मोक्ष प्रभृति जीं फळें आहेत त्यांचा अूह या लेखांत आम्ही करीत नसून जीं त्यांचीं फळें प्रत्यक्ष अनुभवांत केव्हांहि निश्चितपणें मिळालेली नाहींत तीं त्यांचीं फळें नव्हत अितकेंच येथें विषदावयाचें आहे. त्या साधनांविषयीं किंवा त्यांच्या आध्यात्मिक वा पारलौकिक परिणामांविषयीं ज्यास जसा आदर नी निष्ठा असेल तसें त्यांनीं त्यांस सुखेनैव आचरावें. त्यापासून लाभणारा आत्मप्रसाद हा भौतिक अशा कोणच्याहि आनंदाहून निरुपम आंतरिक सुखाची जोड ज्यांस देअू शकतो त्यांनीं त्यास सुखेनैव आस्वादावें. परंतु तशा अर्थाच्या औश्वरी अधिष्ठानावर, वरील ओळींत ज्या राष्ट्रीय अुत्थानादिक भौतिक चळवळींच्या अैहिक यशाचा अुल्लेख केलेला आहे, तें यश वा अपयश बहुधा मुळींच अवलंबून नसतें; तर मुख्यतः तिच्या भौतिक सामर्थ्यावर अधिष्ठित असतें, अितकेंच येथें दाखवावयाचें आहे.

महाराष्ट्रेतिहासाच्या अेका पानाच्या दोन बाजू

मुसलमानांच्या हातून हा हिंदुस्थान देश सोडण्यासाठीं हिंदुपद–पादशाहीचें जें प्रचंड स्वातंत्र्ययुद्ध आम्हां हिंदूंनीं ठाणलें नी जिंकलें त्याच्याच पुराव्यानें त्या काळीं रचल्या गेलेल्या वरील ओवींतील अर्थावर हें भाष्य नेहमीं करण्यांत येतें कीं ती प्रचंड राष्ट्रव्यापी अुठावणी, ती चळवळ, यशस्वी होण्याचें मुख्य कारण तिच्या मुळाशीं असलेलें औश्वरी अधिष्ठान हेंच होय. नाना साधुसंत हरिनामाचा जो अखंड घोष महाराष्ट्रांत दुमदुमवीत राहिले, ज्ञानेश्वरांसारख्यांनीं यौगिक सिद्धि संपादिल्या, अलौकिक चमत्कार करणारे सहस्त्रावधि पुण्यपुरुष जी जपतपअनुष्ठानव्रतवैकल्यादि प्रकारांनीं औश्वरी कृपा संपादिण्यास्तव जी तपस्या करीत होते तीमुळें भगवंत प्रसन्न झाले. ते अशा अर्थाचें औश्वरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अधिष्ठान मिळालें यास्तव ती चळवळ समर्थ आणि यशस्वी ठरली. अशा कोटिक्रमानें हिंदुपदपादशाहीस्तव आम्हां हिंदुवीरांनीं झुंजून तो जो जय मिळविला त्या जयाचाच नी त्या झुंजीचाच पुरावा ज्या अर्थी ह्या ओश्वरी अधिष्ठानाच्या सिद्धान्तास देण्यांत येतो त्या अर्थीं त्याच काळच्या अितिहासाची छाननी करून आम्हीं तो पुरावा किती लंगडा आहे हें दाखवूं अिच्छितों. किंबहुना ती हिंदुपदपादशाही त्या साधनांनीं किंवा तशा ओश्वरी अधिष्ठानानें जिंकली गेली नसून, तो भौतिक विजय, अशा स्वातंत्र्ययुद्धास जीं भौतिक साधनें संपादूं शकतात तशा भौतिक साधनांनींच आम्हीहि संपादूं शकतों हें सिद्ध करण्यास त्या काळासारखें दुसरें समर्पक अुदाहरण सांपडणें दुर्मिळ असल्यामुळें तेंच आम्हीं आमच्या वतीचा पुरावा म्हणून आपण होअून निवडतों.

साधारणतः सन १३०० ते १६०० पर्यंतच्या कालास महाराष्ट्राच्या अितिहासाचें, भारताच्या अितिहासाचें कां म्हणाना, अेक पान कल्पिलें तर त्यांत ह्या ओश्वरी अधिष्ठानाच्या दृष्टिकोनांतून केवढें आश्चर्य दिसून येतें तें पाहा ! प्रथमदर्शनींच ज्ञानेश्वरांसारख्या महायोग्याचें दर्शन घडतें. जर कधीं तपस्येनें, योगानें, पुण्याओनें कोणा मनुष्यांत भगवंताचें अधिष्ठान सुव्यक्त झालें असेल तर तें ह्या अलौकिक पुरुषांत होतेंच होतें. रेड्याकडून त्यांनीं वेद म्हणविले; भिंतींना चालविलें; हरिनामाच्या गजरानें महाराष्ट्र दणाणून सोडलें; तें ज्ञानेश्वर, ते निवृत्ति, ते सोपान, ती मुक्ता आपल्या अलौकिक दैवी संपत्तीची महाष्ट्रभर नुसती लूट करवीत होतीं. जिकडे तिकडे दैवी चमत्कार ! त्यांच्या मागोमाग नामदेव, जनाबाओ, गोरा कुंभार, दामाजीपंत, सावता माळी, रोहिदास चांभार, चोखा महार, सारे जीवन्मुक्त, साऱ्यांस प्रत्यक्ष पांडुरंग प्रसन्नपणें भेटीगांठी देत आहेत, घेत आहेत. त्यांच्या मागोमाग ते अेकनाथ, ते तुकाराम ब्राह्मणवाड्यापासून महारवाड्यापर्यंत महाराष्ट्रांत घरोघर साधुसंत, घरोघर यौगिक, सिद्धि, घरोघर देवाचें येणें-जाणें, प्रत्यहीं सकाळीं कोण्यातरी अलौकिक चमत्काराची ताजी बातमी ! आज काय रेडा वेद बोलला, उद्यां दामाजीपंतांसाठीं प्रत्यक्ष देवानें विठू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराचा वेष घेऊन बादशहाच्या भरदरबारीं दंडाच्या द्रव्याच्या राशीच्या राशी ओतल्या ! तोंच नवीन बातमी कीं तें द्रव्य बादशहा स्पर्शू लागतांच त्यांची फुलांची रास झाली ! कधीं देव रोहिदासाच्या घरीं जोडे शिवीत आहेत, कधीं अेकनाथाच्या घरीं पाणी भरीत आहेत, कधीं जनाबाअीचें दळण दळीत आहेत, कधीं नामदेवाबरोबर जेवीत आहेत, कधीं पंढरीचें देअूळ गर्‌कन् फिरत आहे. आज चोख्या महाराच्या पंगतीस बसून पांडुरंग प्रेमभादानें मिटक्या मारीत आहे, अुद्यां चोख्यास गाडीला बांधून फरफटत ठार मारण्याची शिक्षा दुष्ट लोकांनीं दिली असतां स्वत: श्रीकृष्ण येअून तें जूं हातांनीं धरून आडवीत आहेत, कोणाच्या दाराशीं दत्तात्रेय आपलीं कुत्रीं घेअून अुभे आहेत तर कोणाच्या हातीं ग्रंथ लिहिण्यास विठोबा लेखणी अुचलून देत आहेत. मेलेलीं माणसें जिवंत होत आहेत, जिवंत माणसें जिवंतपणीं पुरून घेअून समाधिस्थ होता आहेत. माणसामाणसांशीं देव बोलत आहेत, जेवत आहेत. मूर्तिमान् प्रत्यक्ष रामचंद्र कथा अैकत आहेत, मूर्तिमान् प्रत्यक्ष हनुमान संतामागें अुभे राहून कथेस साथ देत आहेत ! त्या काळची ही संतचरित्राची बाजू वाचीत असतां असें वाटतें की ही महाराष्ट्रभूमि त्या काळीं माणसांची भूमि नसून देवांचीच भूमि झालेली होती. महाराष्ट्र हेंच त्या काळीं देवांचें राहतें घर झालेलें होतें, वैकुंठ नव्हतें !

परंतु पुण्यशील, जपतपयोगयोगांनीं पवित्र अलौकिक चमत्काराचें जें युग, देवाच्या कृपेची जी छायाच, जें अीश्वराचें मूर्तिमंत अधिष्ठान अशी ही महाराष्ट्राच्या अितिहासांतील ह्या पानाची सुवर्णाक्षरांत लिहिलेली बाजू वाचून आपण जों त्याच पानाची दुसरी बाजू अुलटतों तों काय आढळतें ? भगवंताचें अधिष्ठान जर कशांत वरील अर्थी असू शकत असेल तर तें त्या पुण्यतम काळीं महाराष्ट्रांत होतेंच होतें. आणि जर भगवंताच्या अशा अधिष्ठानामुळेंच राष्ट्राचें भौतिक सामर्थ्य, राज्य, स्वातंत्र्य हीं यशस्वी होत असतील तर त्या काळच्या महाराष्ट्रीय स्वातंत्र्याची नी राज्याची प्रबळता अद्वितीय, दुर्धर्ष, अजिंक्य अशीच असावयास पाहिजे होती. पण सुवर्णाक्षरानें

(सा...२)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिहिलेली ही ह्या पानांची देवाधिष्ठित बाजू अुलटतांच दुसरी बाजू जी दिसते ती देवांच्या भौतिक विजयाची नसून राक्षसांच्या विजयाची होय ! ! या देवाच्या अधिष्ठानानें सुसंपन्न काळांतच महाराष्ट्राचें असलेलें स्वातंत्र्य नी राज्य धुळीस मिळवून त्या देवाच्या अधिष्ठानावर राक्षसांच्या राज्याची टोलेजंग अुभारणी झालेली आढळते ! पुण्यशील अशा त्या देवांच्या लाडक्या लोकांवर जय मिळाला त्या पापी पण प्रबळ अशा मुसलमानी अत्याचारास ! !

हाय हाय ! काय दुष्ट योगायोग पाहा ! परमयोगी ज्ञानेश्वरमहाराजांनीं 'ज्ञानेश्वरी' लिहून आपली लेखणी खालीं ठेवली न ठेवली, तोंच अल्लाअुद्दीन खिलजी अवघ्या दहापंधरा हजार सैन्यास घेअून ह्या कोटचवधि हिंदूंनीं गजबजलेल्या दक्षिणेंत, बकऱ्याच्या कळपांत वाघ घुसावा तसा घुसला ! ज्ञानेश्वरांच्या भगवंताच्या अधिष्ठनाचा पूर्ण पाठिंबा असणाऱ्या त्यांच्या आश्रयदात्या त्या रामदेवरावास अल्लाअुद्दीन विंध्याद्रि अुतरून आल्याची बातमीदेखील पुरती कळली नव्हती, तोंच त्यानें थेट देवगिरीवर चढाओ केली नी रामदेवरावाच्या हरिभक्त अशा हिंदूंच्या अफाट सैन्याचा त्या हरिद्वेष्टयानें चक्काचूर अुडविला, त्याचें हिंदुराज्य बुडविलें, तें परत स्थापूं निघालेल्या परमशूर शंकरदेवास जितें धरून अंगाचें कातडें सोलून ठार मारिलें ! ज्ञानेश्वर, निवृत्ति, सोपान, मुक्ता, नामदेव, गोरा कुंभारप्रभृति संतमहंत घरोघर देवाशीं हंसत, जेवत, बोलत असतां, भगवंताचें अधिष्ठानच काय पण महाराष्ट्र भगवंताची प्रत्यक्ष राजधानी झालेली असतां तिकडे बहार–बंगाल–अयोध्या–काशींत हिंदुराजश्री मुसलमानांच्या घोडयाच्या टापाखालीं तुडविली जात होती. रजपूत वीरांच्या झुंडीच्या झुंडी रणारणांत कत्तल केल्या जात होत्या. आज कां अुद्यां येवढाच प्रश्न, पण विंध्याद्रि अुतरून तो मुसलमानी प्रलय दक्षिणेवर कोसळणार हें स्पष्ट झालें होतें. ज्ञानेश्वराच्यापुढे ऋद्धिसिद्धि हात जोडून अुभ्या असतां रेडयाच्या मुखें ते वेद बोलवूं शकले, पण 'रामदेवराजा, अल्लाअुद्दीन तुझ्यावर, चालून येतो आहे बघ' म्हणून टपालवाल्यालाहि जी सूचना देतां आली असती ती मात्र ज्ञानेश्वरांना रेडयांच्या तोंडून वा स्वतःच्या तोंडून रामदेवरावास देतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आली नाहीं !! ज्ञानेश्वर निर्जीव भिंती चालवूं शकले, पण सजीव माणसें आपल्या मंत्रबळें चालवून विंध्याद्रीच्या खिंडींत अल्लाअुद्दीनाचा मार्ग रोखण्यासाठीं अुभीं करूं शकले नाहींत ! ! सन १२९४ त अल्ला-अुद्दीनानें दक्षिणेंत पहिला पाय टाकला आणि अितक्या त्वेषानें मुसलमानांनीं रणांगणांत हिंदूना पिटलें, त्यांच्या राजधान्या, राज्यें, सैन्यें, देवदेवता अुद्ध्वस्त करीत अितक्या दुर्धर्ष वेगानें ते पुढें घुसले कीं, १३१० च्या आंत त्यांनीं रामेश्वरापर्यंत सारें राज्य निर्हिंदु करून रामेश्वराला मशीद बांधली ! अिकडे विठूरायाची नगरी भगवंताच्या नामघोषानें दणदणतच होती, संतांचें जाळें गांवोगांव पसरत होतें, त्यांच्या घरांत प्रत्यक्ष देव येअून जोडे शिवीत होते, मडकीं घडीत होते, दळणें दळीत होते–बादशहाची खंडणी भरीत होते !–जपजाप्यव्रतवैकल्य, योगयाग, नामसप्ताह, स्नानसंध्या यांचा नुसता पर्वकाळ गजबजला होता ! तिकडे मुसलमानांची अेक सोडून पांच पादशाहृया हिंदूच्या अुरावर नाचत होत्या ! हिंदूंच्या घरांतून 'देवलदेवी' रावण पळवीत बाटवीत होते पण प्रत्येक देवास दोहोंपेक्षा जास्त हात असूनहि त्यापैकीं अेकानेंहि अल्ला-अुद्दीनाचा वा मलिकंबराचा हात धरला नाहीं ! बादशहाची खंडणी भरली पण 'तूं हरिद्वेष्टा ! माझ्या हरिभक्तापाशीं खंडणी मागणारा तूं कोण ?' म्हणून गर्जत दाढी ओढून त्यास हिंदु–सिंहासनावरून खालीं खेचलें नाहीं. जनाबाअीचें दळण दळणाऱ्या कनवाळू देवानें त्या दळणापेक्षां कोटि पटींनी हिंदुराष्ट्रास ज्या दळणाची आवश्यकता होती तें दळण दळण्यास सरसावून त्या हरिद्वेष्टयांच्या राजसत्तेसच आपल्या क्रोधाच्या जात्यांत दळून भरडून निर्दाळून टाकलें नाहीं ! पुण्यपुरुष अेकनाथ भगवंताचें अधिष्ठान संपादिलेलें, त्यांच्या तोंडावर जातां येतां पापी यवन थुंके ! हिंदूचीं हजारों तरुण मुलें-मुली गुलाम होत असतां, राजकन्या दिल्लीच्या राजवाड्यांत मुसलमानांच्या दासी झाल्या असतां, रोहिदासाच्या घरीं जोडे शिवीत बसणाऱ्या कृपाळु देवास त्यांची करुणा आली नाहीं ! जें जें देअूळ तें तें काशीरामेश्वरपर्यंत पाडलें, जें जें देअूळ पाडलें त्याची मूर्ति मशिदीची पायरी केली ! पण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवास त्या मुसलमानी अत्याचाराचा राग आला नाहीं ! पण अिकडे कोणी हिंदु अेखादा नारळाचा नवस जरी फेडायचा विसरला ना, किंवा अेखादा हिंदु गांवबहिरोबास वार्षिक बोकड मारायास चुकला ना, कीं तोच देव काय रागावें !—ह्या हिंदु माणसाचा कुळक्षय होअी वा त्या गांवावर महामारीच्या गाढवाचा नांगर फिरे !

रामदेवराव गोब्राह्मणप्रतिपालक होता, न्यायी होता त्याच्या पक्षाला सत्य होतें, भगवंताचें अधिष्ठान त्याच्या राज्याचें अधिष्ठान होतें; पण त्याच्या राज्याचा चक्काचूर अुडविला ! कोणीं ? जो अन्यायी होता, ज्याचा पक्ष आत्यंतिक असत्याचाच पक्षपाती, जो केवळ गोब्राह्मणविध्वंसक, यज्ञनिंदक, मूर्तिभंजक, भगवंताच्या अधिष्ठानीं आम्हीं जीं पंचमहापातकें समजतों तीं ब्रह्महत्यादि पंचमहापातकें हींच ज्यांचीं पंचमहापुण्यें, त्या भगवद्विद्वेषी मुसलमानी अत्याचारानें त्या भगवंताच्या अधिष्ठानावर अुभारलेल्या सदाचारी, स्नानसंध्याशील हिंदु साम्राज्याच्या, ठोकरीसरशीं ठिकऱ्या अुडविल्या!

जी गोष्ट मुसलमानांची तीच गोष्ट किरिस्तावी पुर्तूगीजांची ! आम्हीं ज्यांस भगवंताचें अधिष्ठान समजतों तें त्यांच्या चळवळींत कुठलें असणार? अुलट आमच्या देवाचा विद्वेष तें त्यांच्या चळवळीचें अधिष्ठान ! पण यश त्यांना मिळालें ! कुठें पोर्तुगाल ! तेथून मूठभर लोक येतात काय, गोमांतकांत घुसतास काय, आणि घोड्याच्या अेका फेरफटक्यासरशीं साऱ्या देशभर, नगरोनगरीं त्यांच्या राज्याचे झेंडे लावतात काय ! मारहाण जाळपोळ. धर कीं बाटीव, नाकारलें कीं कर ठार, अशी त्या चांडाळांनीं हिंदूंवर धार्मिक छळाची नुसती आग पाखडली ! शेंकडों पितीं लेंकरें, तरुण कन्या, दास करून युरोप–आफ्रिकेच्या बाजारीं बाजारीं भाजीसारखीं विकलीं. मुंजी, लग्नें, पूजा, सारे हिंदु संस्कार दंडनीय ठरले. जीव घेअून, लोकच नव्हेत तर देवहि आपल्या मूर्ति भंगू नयेत म्हणून, श्रीमंगेश, शांतादुर्गा प्रभृति देवहि पळाले, आणि तेहि आपल्या भक्तांस सुरक्षितपणें आपल्या खांद्यावर घेअून आपल्या पायांनीं नव्हे, तर भक्तांच्याच खांद्यावर आपल्या पालख्या लादून !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

४३म/४३ ३१८६४
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुस्लिम व ख्रिश्चनांच्या वल्गना !

" अगदीं बरोबर ! " वरील विवेचन वाचून प्रत्येक मौलवी आणि मिशनरी म्हणेल, " शाबास ! हिंदूंचा भगवान् खोटा पडला हें अगदीं बरोबर आहे ! जपजाप्यादिक हिंदु पुराणांच्या साधनांनीं देव पावत नाहीं, हा पुराणाचा पराजय अितकेंच सिद्ध करतो; आणि कुराण-बायबलाचा विजय सिद्ध करतो कीं देवाचें अधिष्ठान मूर्तिभंजक धर्मासच असतें; कुराण-बायबलांतील निमाज, रोजा, क्रॉस, ख्रिस्तमसादिक साधनांनींच देव पावूं शकतो ! " भगवंताच्या अधिष्ठानाच्या अशा वल्गना पीरपाद्र्यांनींहि हजारों वेळां केल्या होत्या. पण त्यांच्या अितिहासांनीं त्याहि तशाच खोटया पाडल्या ! कशा तें पाहा–

मुसलमानी धर्माच्या अुदयासरशीं अरब लोकांस आश्चर्यकारक विजय अेकामागून अेक मिळत गेले. ते मिळाले त्यांच्या ' चळवळींतील ' सामर्थ्यानें, ' भौतिक ' सामर्थ्यानें आणि त्यांच्या शत्रूच्या भौतिक दुर्बलतेनें. पण ते समजले कीं कुराणांतील मूर्तिभंजक धर्माचाच हा परिणाम आहे, अल्ला मुसलमानांस साहाय्यार्थ देवदूतांचीं सैन्यें गुप्तपणें धाडतो; काफर वा किरिस्ताव मुस्लिमांपुढें केव्हांहि टिकूं शकणार नाहीं ! अशा भावनेनें ते भारले होते, पोर्तुगालपासून पेकिनपर्यंत ते प्रलयासारखे भरभराटत गेले; पण त्यांच्यापेक्षां भौतिक साधनांच्या, शिस्त, शिशाच्या गोळ्या, तडफेची नी तरवारीची धार यांच्या साहाय्यानें सुसज्ज होअून मुस्लिम नसलेले लोक जेव्हां अुठले तेव्हां कुराणास खोटें म्हणणाऱ्या स्पॅनिश किरिस्तावांचाहि विजय झाला ! मुसलमानांसहि त्यांच्या कुराणांतील भगवंताचें अधिष्ठान असून नसून सारखेंच झालें. निमाज पढणाऱ्या लोकांच्या सरसकट कत्तली निमाजास पाखंड म्हणणाऱ्या ' काफरांनीं 'हि केल्या. ख्रिस्ती भौतिक सामर्थ्यानें दुर्बल होते. तेव्हां मुस्लिमांनीं ख्रिस्त्यांना जिंकलें; मुस्लिम आपसांतील फाटाफूट, अज्ञान, भीरुता यांनीं दुबळे होतांच ख्रिस्त्यांनीं मुस्लिमांस जिंकलें, कुराणाच्या शास्त्रास ख्रिस्त्यांनी लटकें पाडलें नी ख्रिस्त्यांच्या बायबलास कुराणानें लटकें पाडलें. फार काय ' माझाच जेहोवा सगळयांवर विजयी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतो ' म्हणून गर्जणाऱ्या ज्यूंची जी गत मुस्लिम ख्रिश्चनांनीं केली तीच गत मूर्तिपूजकाला कधींहि विजय देणार नाहीं ' म्हणून गर्जणाऱ्या ख्रिस्ती मुस्लिमांची मराठ्यांनीं केली. कारण सन १६०० पर्यंत हिंदूंचा धुव्वा अुडविणाऱ्या त्याच पोर्तुगीजांच्या, मुस्लिमांच्या राज्यांपेक्षां हिंदूंनीं सन १६०० च्या पुढें आपली संघटना, शिस्त, तडफ अेकंदरींत वरचढ केल्यानें, चळवळीला अवश्य तें सामर्थ्य संपादिल्यानें, भौतिक साधनें जीं प्रत्यक्ष सृष्टींत यश देतात त्यांची जुळवाजुळव ठाकठीक केल्यानें, कोठारांतील दारू कोरडी, हातांतील तलवार तिखट, भाल्याचें पातें टोंकदार, वाघनखें झांकलेलीं, अशी भौतिक सज्जता मुस्लिमांहून वरचढ केल्यानें सन १६०० पासून सन १८०० पर्यंत महाराष्ट्रांतील हिंदूंनीं अहिंदूंस रणांगणांत चोपून काढलें! त्याच मूर्तिपूजक हिंदूनें, कुराणांतील नी बायबलांतील ' मूर्तिभंजकांस जय मिळतो ' म्हणून सांगणारीं सारीं शास्त्रें लटकीं पाडून, मूर्तिभंजक ख्रिस्ती वा मुस्लिम जिथें भेटला तिथें पिटला. पुराण पूर्वी कुराणानें खोटें पाडलें; आतां पुराणानें कुराणास खोटें पाडलें. केवळ चळवळींच्या भौतिक सामर्थ्यानेंच अुभारलेल्या त्या महाराष्ट्रीय हिंदुपदपादशाहीवर अहिंदूंची—

॥ अिराणापासुनि फिरंगाणपर्यंत शत्रुची अुठे फळी ॥
॥ सिंधुपासुनी सेतुबंधपर्यंत रणांगणभू झाली ॥ १ ॥
॥ तीन खंडिच्या पुंडांची त्या परंतु सेना बुडवीली ॥
॥ सिंधुपासुनि सेतुबंधपर्यंत समरभू लढविली ॥ २ ॥

आणि आश्चर्य हें कीं, जों जों स्नानसंध्याशील देवांचें अधिष्ठान सुटत चाललें, महाराष्ट्रांत संतमहंतांचें पीक हटत चाललें, धार्मिक अुपायांपेक्षां भौतिक साधनांवर अधिक भर पडत चालला, देवांचें अधिष्ठान कमीकमी होऊं लागलें, तों तों यशाचें माप पदरीं भरभरून पडत चाललें.

सारांश, ज्या महाराष्ट्रीय अितिहासाला अुल्लेखून ही सामर्थ्याची ओवी रचली गेली त्याच हिंदुमुसलमानांच्या महायुद्धाचा पुरावा असें दाखवितो कीं, ' सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील तयाचें, ' अितकेंच काय तें खरें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अैहिक यश ज्या चळवळीस हवें तिनें अैहिक, भौतिक, प्रत्यक्ष सृष्टीत अुपयोगी पडतील तेवढीं साधनें संपादून विपक्षावर 'सामर्थ्यी 'त मात केली कीं ती चळवळ बहुधा यशस्वी होते. मग तिला ज्याच्या त्याच्या धार्मिक पोथ्यांतील कल्पनांप्रमाणें न्यायाचा, पुण्याचा, स्नानसंध्याशील अुपायांनीं मिळविल्या जाणाऱ्या भगवंताच्या आध्यात्मिक अधिष्ठानाचा पाठिंबा असो वा नसो ! हीच गोष्ट जगांतील पारशी, ख्रिस्ती, मुसलमानी, यहुदी प्रभृति यच्चयावत् धर्मग्रंथांतील वचनांची नी त्यांच्या अितिहासाची आहे. ह्या प्रत्येक ग्रंथास अीश्वरदत्त म्हणून त्या त्या लोकांनीं मानलें. त्यांतल्या अेकाचा देव तो दुसऱ्यांचा राक्षसहि असूं शके. तो तो देव त्या त्या ग्रंथांत वारंवार गर्जत राही कीं, मी माझ्याच भक्तांना 'काफरा'वर, 'पाखंडा'वर, म्हणजेच त्या ग्रंथांतील कर्मकांडांचें अनुसरण न करणारावर सदोदित विजय देअीन. ह्या आपल्या देवांच्या अधिष्ठानाचें साहाय्य आपापल्या अुठावणीस मिळावें म्हणून त्या त्या लोकांनीं त्या त्या ग्रंथांतील, बहुधा अत्यंत परस्परविरुद्ध धार्मिक कृत्यें केलीं. कोणीं गोवध करून भगवंताचें अधिष्ठान संपादूं गेलें, तर कोणीं गाअीला तर काय पण तिच्या गोमयगोमूत्रालाहि पवित्र मानून ! पण अैहिक यश असें त्यांपैकीं कोणालाहि अशा ह्या भगवंताच्या अधिष्ठानानें मिळूं शकलें नाहीं! ज्याच्या चळवळींत अितरांहून अवश्य त्या भौतिक साधनांचें 'सामर्थ्य 'अधिक होतें ते त्यापुरते अैहिक विजय मिळवूं शकले, तें भौतिक सामर्थ्य लोपतांच त्यांच्या त्यांच्या देवांसुद्धां नाश पावले ! मनुष्यांनीं आपापल्या लहरींप्रमाणें ज्या धर्माधर्माच्या, न्यायान्यायाच्या, पापपुण्याच्या बऱ्यावाअीट कल्पना केल्या त्यांचा 'देवास' कांहीं अेक पक्षपाती अभिमान दिसत नाहीं. तेव्हां ज्यांना ज्यांना आपल्या चळवळीस अैहिक यश हवें, त्यानें त्यानें आमच्या पक्षास देव आहे, सत्य आहे; यास्तव तो आमचा पक्ष विजयी होणारच अशा वल्गना करण्याचें आणि आंधळ्या निष्ठेंत निश्चित राहाण्याचें सोडून धार्मिक अर्थी भगवंताच्या अधिष्ठानाच्या नादीं न लागतां 'सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील तयाचें,' अितकेंच काय तें खरें मानावें आणि वैज्ञानिक, सामर्थ्यशाली, प्रत्यक्षनिष्ठ अशा अैहिक साधनांनीं विपक्षांहून वरचढ होण्याचा यत्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावा. अैहिक विजयाचा मार्ग हाच ! अन्यायीं, परापद्रवी, व्हावें असें नव्हें; तर न्याय झाला तरी तो ' समर्थ ' नसेल तर व्यर्थ होय-समर्थ अन्याय त्याच्यावर कुरघोडी केल्यावांचून राहणार नाहीं. दुर्बल पुण्याअिहि पंगु होय, हें विसरूं नये. नुसत्या अेकशेंआठ तर काय पण अकराशेंआठ सत्यनारायणांच्या पूजा केल्या तरी अैहिक यश मिळणार नाहीं. कारण तें चळवळीच्या भौतिक सामर्थ्यावरच काय तें अवलंबतें! असत्यनारायणाचें पूजकहि ह्या जगांत वारंवार यशस्वी होतात, फार काय सारें जग निर्देव करूं निघालेला रशिया आज अैहिकदृष्टया परम बलिष्ठ म्हणूनच परम यशस्वी झालेला आहे कीं नाहीं? ' निर्देव ' म्हणून त्याचें वैभव टिकणार नाहीं म्हणाल तर तें ' सदेव ' अशाहि कोणाचें टिकलें नाहीं! ! श्रीकृष्णाची द्वारका समुद्रांत बुडाली; प्रत्यक्ष मदिनेंतील मशीद घोडशाळा बनली; ' जेहोवा 'चें सुवर्णमंदिर तडकलें; जीससला रोमनें फांशीं दिलें-क्रुसिफाय केलें ! ! ! ' अस्पृश्यता काढतां म्हणून बिहारचा भूकंप झाला ' असें म्हणणारा सनातनी समाज, आणि ' अस्पृश्यता ठेवतां म्हणून तो भूकंप झाला ' असें बजाविणारा सुधारकी ढोंगीपणा हा जितका खुळचट आहे तितकाच कोटि रामनाम जपानें वा निमाजपढाअीनें राष्ट्रावरील भौतिक सर्वारिष्ट शांत करूं निघालेला भाबडेपणाहि खुळचट आहे ! रामास हराम समजणारेहि अैहिक सामर्थ्यास संपादून वैज्ञानिक बळानें जे अैहिक यश मिळवूं शकतात तें अैहिक यश ज्यास हवें, त्यानें तें अद्ययावत् वैज्ञानिक सामर्थ्य संपादावें. चळवळींत तें सामर्थ्य असलें तर भगवंताच्या अधिष्ठानावांचून कांहीं अडत नाहीं. तें सामर्थ्य नसलें तर भगवंताच्या अधिष्ठानासाठीं कोटि कोटि जप केले तरी अैहिक यश मिळत नाहीं, ह्याच सिद्धान्त ! !

✠ ✠ ✠

सावरकर साहित्य : विज्ञाननिष्ठ निबंध खण्ड १ : सावरकरांच्या निबंधांचा हा संग्रह आहे. मूल्य रु. १-८ आ.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चाफेकर नी रानडे फटका : : ३

✠ ✠ ✠

[वयाच्या सोळा-सतराव्या वर्षी, ख्रिस्ताब्द १८९९ मध्यें रचलेला हा फटका आहे. रचणाराचें नांव ज्या शेवटच्या चौकांत आलें आहे तो चौकहि नांवाचीं अक्षरें ठळक अक्षरांत छापून येथें प्रसिद्ध करीत आहोंत.]

✠ ✠ ✠

– १ –

महच्चरित सत्सुधांबुधीमधि करूं सुमन हें पाणबुडे ।।
अखंड-सद्‌गुणमण्डित मौक्तिक निधान सद्यश मग अुघडे ।। ध्रु० ।।
हांगकांगहुनि ठिणगि अुडोनी गांठी अवचित मुंबअिला ।।
अपूर्व अवचित अघोर रूपें प्लेगहुताशन संचरला ।। १ ।।
हाय ! बाप ! हा ! अरेरे ! करी गाअि ! अगाअी ! नरमहिला ।।
भयाण शब्दश्रवणें शेषहि टाकूं पाही धृत महिला ।। २ ।।
युवतीस्फुंदन वृद्धाक्रंदन तो प्राणांतिक कण्ह यांहीं ।।
भुतें भयंकर किंकाळति त्या भयासही जें भयदाअी ।। ३ ।।
काळापरिसहि काळहृदय तो विषापरिसहि विषारि तो ।।
पवनापरिसहि जवन असोनि गिरिपरि अचलत्वा धरितो ।। ४ ।।
भारतभूचें कुंकुम केलिस स्वतंत्रता जिथ पावतसे ।।
धन्य अशा श्रीपुण्यपत्तना पहावया हा धावतसे ।। ५ ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

– २ –

हां हां म्हणतां क्षणाभीतरीं असंख्य गवसति काळ-करीं ॥
अुदास दु:खित जनांस छळुनी न्यायाची पर राळ करी ॥ १ ॥
प्रेताजवळीं गिधाड धडके तसा त्वरेनें धांवतसे ॥
भुतावलीसम मृतालयातें सोजिरगण हा पावतसे ॥ २ ॥
क्रौर्यें अुद्धत शुद्ध भैरवचि मद्यधुंदिनें धुंद सदा ॥
आप्तवियोगें युक्तजनातें सवतभाषणें छळति तदा ॥ ३ ॥
प्लेग मृतातें असो वा नसो वसोंच परि धनि अटकावी ॥
शिरा घरामधिं करा लूट हो कोण तुम्हांला हटकावी ॥ ४ ॥

– ३ –

हाल हाल बहुकाल करोनि चार मांडिले हवे तसे ॥
छळुनि सोडिली सकल प्रजा मग ' खून ' पडे हें नवल नसे ॥ १ ॥
अबलाबाला बालांचे ह्या शाप सहस्त्रावधि होती ॥
करितां गमते कृती गोड जी भरितां कडवट कां होती ? ॥ २ ॥

– ४ –

लालभडक ते नेत्र, बंधुवर बाळकृष्ण दे धीर मना ॥
श्रीदामोदर सिद्ध जाहला जायालागीं खलदमना ॥ १ ॥
कान्ता वदली, " कान्ता, जातां देशहिताला करावया ॥
पतिराया, घ्या निरोप जावें त्वरित कीर्तिला वरावया " ॥ २ ॥
पवन जवन परि मागें सारित ' गणेशखिंडि ' प्रति आला ॥
कालासम मग समया साधितो घालायाला तो घाला ॥ ३ ॥
भक्ष्य रँड बहु मस्त देखतां सिंह धावला बगीकडे ॥
गोळी सुटली, गडबड मिटली, दुष्ट नराधम चीत पडे ॥ ४ ॥

– ५ –

द्रवीडबंधू द्राड श्वान जे स्वोदरपूर्तिस्तव नाना ॥
चार आचरिती फितुरि कराया शरम वाटली यांना ना ॥ १ ॥
श्री चाफेकर त्वरें अटकले फरासखान्यामाझारीं ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तदा अंतरीं करिति विचारा, " कबूल व्हा घडगती तरी ॥ २ ॥
ज्याच्यासाठीं प्राणसंकटीं लोटियलें म्यां अुठाअुठीं ॥
कठिण काळ मद्देशबंधुजन मत्कृत्यांस्तव कां कंठी ? ॥ ३ ॥
सज्जन संघावरी कोसळति दुःखाद्रीचे थोर कडे ॥
दहा जणांच्या हितार्थ जाअु अेक काय मग त्यांत नडे !" ॥ ४ ॥

— ६ —

न्याय--नाटकीं थाट अुडाला वाट ना मिळे रतिभर ती ॥
मूर्ति मनोहर अवलोकुनियां जनकुतूहला ये भरती ॥ १ ॥
चकित टकमकां सर्व पाहती धन्यचि छाती मग म्हणती ॥
कुणी धाडसी, कुणी पिसे वा कुणी वीरवर त्यां गणती ॥ २ ॥
फांशी चढती प्राणपांखरूं देहपिंजऱ्यांतुनी अुडे ॥
वीर कृतीनें राष्ट्रामाजी पराक्रमाचें तेज चढे ॥ ३ ॥

— ७ —

पराक्रमाच्या तेजा तुमच्या त्रासुनि निंदिति जरि घुबडें ॥
वीरकथा तुमची ही गाअिल पिढी पिढी नव पुढें पुढें ॥ १ ॥
शतकामागें हेंच चमकतें तेज आज जे खुनी दिसे ॥
दिसे आंधळ्या, दुबळ्या, धूर्ता जें, तें बहुधा तसें नसे ॥ २ ॥
वितंडवादी पंडित बनतो, साधुश्रेष्ठहि तो सोदा ॥
नाना सद्गुण दुर्गुण ठरती, वक्रकाल हा हरि भोदा ॥ ३ ॥
अन्याय प्रवणांना दंडू, रणीं पुढेंची पद ज्यांचें ॥
ठरति कसे अपराधी ते जे करिति दमन पर सत्तेचें ॥ ४ ॥
फांशी ना ती यज्ञवेदिका रक्तें न्हाली जी तुमच्या ! ! ॥
सांडुनि होवो त्याचि राष्ट्ररणिं सार्थक रक्ताचें अमुच्या ॥ ५ ॥
कार्य सोडुनि अपुरें पडलां झुंजत ? खंती नको ! पुढें ॥
कार्यीं चालवूं गिरवुनि तुमच्या पराक्रमाचे अम्हीं धडे ॥ ६ ॥

✠ ✠ ✠

चाफेकर नि रानडे यांजवर फटका : मूल्य सहा आणे.
परचुरे प्रकाशन, मुंबअी.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिंहगडचा पोवाडा : : ४

✠ ✠ ✠

[महाशाळेंत (कॉलेजमध्यें) शिकत असतांनाच १९०५ मध्यें ' सिंहगड आणि 'बाजी प्रभु ' हे दोन पोवाडे देशभाट वि. दा. सावरकरांनीं रचले, ते प्रसिद्धिले गेले आणि परक्या ब्रिटिश शासनानें त्यांवर बंदी घातली, तरीहि अनेक तरुणांनीं हे पोवाडे मुखोद्‌गत करून ठेवल्यामुळें त्यावरील बंदी अुठली तेव्हा ख्रिस्ताब्द १९४६ मध्यें ते प्रसिद्ध करता आले. त्यांपैकीं सिंहगडमधील हे प्रारंभीचे चार चौक आहेत.]

✠ ✠ ✠

– १ –

धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यची तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ।। धृ ० ।।
देशामाजी कहर गुजरला पारतंत्र्य–जहरें ।
हलाहलहि ह्या परदास्याहुनि गळा गांठितां बरें ।। १ ।।
गोमातांची मान आंणि ती शिखा–ब्राह्मणांची ।
परदास्याची सुरी बंधुनों चिरीं अेकदाची ।। २ ।।
देश हिंदुचा हाय तयाचा मालक म्लेंछ ठरे ।।
परि परमेशा फार दिवस हें रुचल केंवि बरें ।। ३ ।।
चाल:–मग आर्य देशतारणा । अधममारणा । कराया रणा ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परदास्यरात्रि नाशाला ।
शिवनेरी श्रीमान् आला ।
स्वातंत्र्यसूर्य अुदयाला ।
त्या सूर्याचा किरण रगांगणिं तळपे तानाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

— २ —

ठायीं ठायीं वीर मावळा सरसावुनि भाला ।
रामदासमत छत्रपतींचा अनुयायी झाला ॥ १ ॥
स्वातंत्र्य–श्रीतोरण तोरणगड अवघड पडला ।
भगवा झेंडा त्या भाल्यासह सरसर वरि चढला ॥ २ ॥
प्रतापगडिची शांत कराया स्वतंत्रता देवी ।
पुढती फाडुनि अफझुल्याला भग तो मग ठेवीं ॥ ३ ॥
चाल:—ते धन्य मराठे गडी । घेती रणिं अुडी । करुनि तांतडी ।
देशार्थ मृत्युहि वरिला ।
शाहिस्ता चरचर चिरिला ।
गनिमांनि वचक बहु धरिला ।
झुरति रिपु परि अजुनि नांदतो सिंहगडांमाजी
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥ ४ ॥

— ३ —

जरा ढीलाअी पाहुनी वदली जिजा शिवाजीला ।
गड सर केल्याविण वरणेना अन्न शपथ तुजला ॥ १ ॥
परके बाला-भूमातेला ते लाथा देतां ।
अन्न न गमतें गोमांसाचा घांसचि तो घेतां ॥ २ ॥
गुलामगिरीची बेडी पायीं तशीच धरिता ना ? ।
गुलामगिरिच्या नरकामाजीं तसेच पचता ना ? ॥ ३ ॥
चाल :— निर्जीव अन्न कां रुचे । अुदर शत्रुचे । फोड तेथिचे ।
आतड्यांनि भूक शमवावी ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रक्तानिं भूक शमवावी ।
मांसानिं भूक शमवावी ।
द्या गड कडकड चावुनि अधरा धांवा ये काजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ।। ४ ।।

–४–

धन्या माता जिजा तिलाची शिवबा सुत साजे ।
स्वतंत्र झाल्यावीण सुताला अन्नहि दे ना जे ।। १ ।।
स्वातंत्र्याच्या सुखनीमाजी जन्म स्वतंत्रांचे ।
गुलामगिरिच्या अुकिरड्यावरि गुलाम निपजाचे ।। २ ।।
श्वानहि भरितें पोट बापुडे चघळुनियां तुकडे ।
शेणामाजी बांधुनि वाडे नांदति शेणकिडे ।। ३ ।।
चालः–संसार असा जरि करी । मनुजता तरी । कशासी धरी
हो तुच्छ किडाचि न कां तो ।
जो गुलाम असुनी हसतो ।
परदास्यीं स्वस्थचि बसतो ।
धिक् धिक् वदला श्री शिव घेअुनि गड राखूं बाजी ।
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ।। ४ ।।

✠ ✠ ✠

सिंहगड – (पोवाडा) मूल्य आठ आणे.
बाजीप्रभु (पोवाडा) मूल्य आठ आणे.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जोसेफ मॅझिनी : प्रस्तावना : : ५

✠ ✠ ✠

[१९ व्या शतकांतील अिटालीच्या स्वातंत्र्ययुद्धाचे वैचारिक नेते आणि स्फूर्तिदाते मॅझिनी यांचें चरित्र वीर सावरकरांनीं मराठींत ख्रिस्ताब्द १९०७ मध्यें लिहिलें. तें तत्काळ प्रसिद्ध होअून त्याची प्रथम आवृत्ति अेका वर्षाच्या आंत संपली. अनेक हिंदु तरुणांना ह्या पुस्तकानें स्वातंत्र्यार्थ लढण्याची स्फूर्ति दिली अितके त्यांतील विचार प्रेरक आहेत. म्हणूनच परकीय ब्रिटिश शासनानें ह्या पुस्तकाच्या प्रकाशनावर १९०८ मध्यें बंदी घातली. ती बंदी १९४६ मध्यें अुठली. अशा ह्या तेजस्वी पुस्तकाची ही अनेकांची स्फूर्तिदायी प्रस्तावना येथें दिली जात आहे.]

✠ ✠ ✠

शास्त्रांचीं प्रमेयें हीं कालदेशांनीं मर्यादित नसतात. भूमितीचे सिद्धान्त हे ग्रीसमध्यें जितके सत्य आहेत तितकेच ते हिंदुस्थानांतहि आहेत व ते युक्लिडच्या काळीं जितके यथार्थ होते तितकेच आजहि आहेत. मानवी जातीचें विस्तृत क्षेत्र व कालाची अनंतता ध्यानांत घेअून त्यांच्या अनुरोधानें बसविलेले जे सिद्धान्त असतात ते सर्व कालीं व सर्व मनुष्यांना सारखेच लागू आहेत. असले सर्वसाधारण सिद्धान्त पठन करणें व त्यांचा आपल्या स्वतःच्या अुन्नतीसाठीं अुपयोग करणें हें अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक मनुष्य मागच्या अितिहासाचा व अनुभवाचा फायदा न घेतां मनुष्यजातीनें आरंभीं केलेल्या चुका पुन्हां करूं लागल्यास मानवी अुत्क्रांति खुंटली असेंच म्हणावें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागेल. मनुष्यजातीनें जे प्रश्न सोडवून ठेविले आहेत ते पुन्हां सोडविण्यांत काल व्यर्थ घालविण्यापेक्षां त्या प्रश्नांचीं कालदेशांनीं अमर्यादित अशीं अुत्तरें जीं अनेक तत्त्ववेत्त्यांनीं सिद्धान्तरूपानें ग्रथित केलेलीं आहेत, तीं समजावून घेअून ज्या प्रश्नांचीं अुत्तरें मनुष्यजातीला अजून मिळालीं नाहींत ते प्रश्न सोडविण्यांत तो काल घालविणें हेंच श्रेयस्कर आहे. मानवी अुत्क्रांति सुलभ करण्यासाठीं तत्त्ववेत्त्यांनीं जगाचा आजपर्यंतचा अनुभव व्यर्थ न जाअूं देतां त्याचें सूक्ष्म परीक्षण करून सर्वव्यापी तत्त्वें सिद्ध केलेलीं आहेत. ज्योतिषशास्त्र, भूमितिशास्त्र, रसायनशास्त्र वगैरे शास्त्रांचीं आज जीं रूपें दिसत आहेत तीं मनुष्यांच्या निरनिराळ्या अनुभवावरून सर्वमान्य ठरलेलीं तत्त्वें संग्रहित केल्यानेंच शक्य झालेलीं आहेत. त्या शास्त्रांतील तीं सर्वव्यापी तत्त्वें सर्व देशांना व सर्व कालीं लागू होणारीं असल्यानें त्यांचा फायदा मुद्दाम करून न घेतां पुन्हां 'पहिले पाढे पढ पंचावन' करीत बसणें हा मूर्खपणाचा कळस आहे. ही गोष्ट अशी ज्योतिषशास्त्र, भूमितिशास्त्र व रसायनशास्त्र वगैरेंना लागू आहे, तशीच ती राजकारण शास्त्रालाहि लागू आहे. राजकारणशास्त्राची अुत्क्रांति मनुष्याच्या प्रगमनाबरोबरच होत आलेली आहे. राजकारणशास्त्रांतहि अितर शास्त्रसत्यांप्रमाणेंच कांहीं तत्त्वें कालदेशानें अमर्यादित अशा महत् सत्यांच्या योग्यतेला पावलेलीं आहेत. त्या सत्यांचें ज्ञान असणें, मनुष्यजातीच्या आजपर्यंतच्या अनुभवाचा फायदा घेणें, भूतकालाच्या यष्टीचा भविष्यन्मार्गगमनास आधार घेणें व "अितिहासप्रदीपेन मोहावरणघातिना लोकगर्भ-गृहं कृत्स्नं यथावत्" संप्रकाशित करण्यास तत्पर होणें हें अत्यंत श्रेयस्कर आहे. अितर राष्ट्रांनीं अनेक शतकें त्रास सोसून व अनेक देहांचे बळी देअून जीं महत् तत्त्वें शोधून काढलीं आहेत त्यांचा अुपयोग न करून घेतां जर अेखादा देश अज्ञानांत जाणून बुजून चांचपडत राहत असेल तर ह्या राष्ट्रीय आंधळेपणाबद्दल त्यास परिणामीं भयंकर पश्चात्ताप झाल्याशिवाय राहणार नाहीं. आग लागली असतां त्यावर पाणी ओतावें हें सर्वमान्य तत्त्व मुद्दाम फेटाळून त्या आगीवर घृताचा वर्षाव करून ती विझते कीं नाहीं म्हणून धिमेपणानें प्रयत्न करणाऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पढतमूर्खाला त्या आगीच्या डोंबांत दग्ध होण्याशिवाय दुसरें काय बक्षिस मिळणार आहे ? अशी स्थिति माझ्या प्रिय आर्यभूमीची होऊं नये म्हणून माझ्या तरुण देशबंधूंनीं राजकारणांतील अंतिम सत्यें व महत् सिद्धान्त शिकावे अशी माझी अुत्कट अिच्छा आहे. हीं सत्यें शिकण्यास राजकारण-शास्त्रांत ज्यांनीं अग्रेसरत्व मिळविलें आहे त्यांच्या अुपदेशामृताच्या प्राशना-शिवाय दुसरा अुत्तम मार्ग नाहीं; व राजकारणशास्त्रांत ज्यांनीं अग्रेसरत्व मिळविलें आहे, अशा तत्त्ववेत्त्यांमध्ये महाभाग मॅझिनी हा तरुण राष्ट्र-भक्तांना अुत्साहक, दिव्य, प्रेमळ नि अुदात्त अशा राष्ट्रमंत्रांची दीक्षा देण्यास समर्थ गुरु आहे.

"नाहीं, नाहीं, राष्ट्रें कधींहि मरत नाहींत. परमेश्वर गांजलेल्यांचा कैवारी आहे. त्यानें मनुष्याला स्वातंत्र्यांत राहण्यासाठीं अुत्पन्न केलें आहे. तुम्हीं मनांत आणा कीं तुमचा देश स्वतंत्र झालाच !" याहून अधिक अुत्साहक असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? "अेकदां मनुष्यानें असा निश्चय केला कीं मी स्वातंत्र्य, स्वदेश व मानव्य यांवर भक्ति करितों कीं मग त्यानें स्वातंत्र्यासाठीं, स्वदेशासाठीं व मानव्यासाठीं लढलेंच पाहिजे, अखंड लढलें पाहिजे, सर्व आयुष्यभर लढलें पाहिजे, शक्य त्या त्या शस्त्रानें लढलें पाहिजे, तिरस्कारापासून तों मरणापर्यंत सर्व संकटें तुच्छ मानिलीं पाहिजेत, द्वेषाला व निंदेला तोंड दिलें पाहिजे, दुसऱ्या कोणच्याहि फलाची आकांक्षा न करतां फक्त कर्तव्य म्हणून त्यानें तत्पर झालें पाहिजे !" याहून अधिक दिव्य असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? "प्रीति करा, तरुणहो, प्रीति करा, मनुष्याला परमेश्वराकडे नेणारी प्रीति ही सोपानपरंपरा आहे. कुटुंबावर प्रीति करा, स्वदेशावर प्रीति करा. तरुण हो, मनुष्यजातीवर प्रीति करा !" याहून अधिक प्रेमळ असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? व "नुसती इटली स्वतंत्र होअून काय अुपयोग ? आपण स्वतंत्र होतांच दुस-ऱ्यांना स्वतंत्र केलें पाहिजे," याहून अधिक उदात्त असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? अशा या राष्ट्रीय मंत्रांचा मंत्रद्रष्टा जो अिटलीचा स्वातंत्र्य-

(सा...३)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाता देशभक्त मॅझिनी त्याचें आत्मचरित्र व कांहीं राजकीय लेख तरुणांनीं वाचणें आवश्यक आहे. या लेखांनीं दोन कोटि लोकांना चैतन्य आलें. या लेखांनीं अिटली देश स्वतंत्र झाला आहे. मॅझिनीनें हीं तत्त्वें केवळ अिटली-करितांच सांगितलेलीं नाहींत. अिटली निमित्तमात्र असून हीं राजकारण-शास्त्रांतील महत्सत्यें त्या महात्म्यानें सर्व मनुष्यजातीसाठीं प्रकट केलेलीं आहेत. हा स्वातंत्र्यसुधेचा मेवा सर्व संतप्त भूमिकांकडे वळला आहे. चातकांनों, ही संधि साधून आपापल्या तृषा भागवून घेणें हें आतां तुमच्या हातीं आहे !

यापेक्षां मॅझिनीच्या लेखांचीं **प्रस्तावना** मी पामर जास्त ती काय लिहि-णार ? तथापि या पुस्तकांत त्याचे निवडक लेख तुटक रीतीनें भाषांतर केलेले असल्यानें मॅझिनीच्या सर्व मतांची बरोबर सांखळी जुळविणें हें जरा अवघड जाणार आहे. अतदर्थ या महात्म्याच्या राजकीय मतांची दिग्दर्शना होअील तितकी त्याच्याच वाक्यांत गुंफून संक्षिप्त व साररूपानें तयार केली असतां ती समजण्याला सुलभ पडेल अशा आशेनें मी तसें करण्याचा प्रयत्न करीत आहें.

जगामध्यें आजपर्यंत जेवढ्या राज्यक्रांत्या झाल्या त्या सर्वांहून अिटलीच्या राज्यक्रांतींत अुदात्त वृत्तींचा कळस झालेला आहे. स्वदेशाभिमानाची ज्योत अितकी प्रज्वलित झालेली होती, प्रत्येक देशभक्त व्यक्तिविषयक सुखाबद्दल अितका अुदासीन होता, स्वदेशासाठीं सर्वस्व वाहण्याची अितकी चढाओढ सुरू होती, परक्या सत्तेकडून हें चैतन्य दाबून टाकण्यासाठीं इतके भयंकर जुलूम करण्यांत येत होते, त्या जुलुमांत देशभक्तांचे तांडे चिरडले जात असतांहि प्रत्येक वर्षीं लोकक्षोभाची अुसळी अितकी विलक्षण व निधड्या छातीची होत होती व अखेर साठ वर्षांवर लढून लढून देशवीरांनीं अितक्या चिकाटीनें यश मिळविलें कीं, या सर्व महत्कृत्यांनीं व महनीय नरमण्यांनीं अलंकृत अशी दुसरी राज्यक्रांति आजपर्यंत झालेली नाहीं, असें अितिहासास कबूल करावें लागतें. या अिटलीच्या राज्यक्रांतींत सद्‌गुणांचा जो अितका अुत्कर्ष झाला याचें मुख्य कारण हें आहे कीं, ती राज्यक्रांति ही व्यक्तीसाठीं, लोभासाठीं किंवा **द्वेषासाठीं** झालेली नसून तिचा पाया अत्यंत अुन्नत अशा महत्तत्त्वांवर रच-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेला होता. " मोठाल्या क्रांत्या ह्या तरवारीपेक्षां तत्त्वांनींच घडवून आणलेल्या असतात." तरवारीशिवाय तत्त्वांचा जय होत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे व म्हणून अिटलीनें तरवार अुपसली. परंतु " त्या तरवारीच्या अग्रभागीं जर सत्याचें अधिष्ठान नसतें तर त्या तरवारीला तिनें स्पर्शहि केला नसता." ज्या तत्त्वांवर या पवित्र स्वातंत्र्ययुद्धाचा पाया रचला होता तीं तत्त्वें प्रथमतः मॅझिनीनें अिटलीस शिकविलीं. अिटलीच्यासाठीं लढलेल्या देशभक्तांमध्यें मॅझिनीच्या "तरुण अिटलींत" ज्यांनीं शिक्षण घेतलें नव्हतें असे लोक फारच थोडे होते. ह्या तत्त्वविचारांत व अितर राजकारणपटु कारस्थान्यांच्या अुपदेशांत अेक महत्त्वाचा भेद आहे. मॅझिनीचें राजकारण हें केवळ अैहिक व स्वार्थप्रवृत्तीचें नव्हतें. तसें असतें तर त्या राजकारणानें प्रवृत्त झालेल्या देशवीरांच्या अंतःकरणांत अितक्या अुदात्त वृत्तीचा अुदय झाला नसता. मॅझिनीचें राजकारण हें प्रवृत्ति व निवृत्ति ह्यांचें अेकीकरण होतें. त्याच्या राजकारणाची अिमारत ही नीतीच्या पायावर अुभारलेली होती. हें सिद्ध केल्यानें त्या वेळपर्यंत राजकारणाची थोर पुरुषांकडून जी अवहेलना होत असे ती नष्ट झाली. राजकारण हें स्वार्थाचें व अप्पलपोटेपणाचें शास्त्र आहे व यांत जो बळी तो कानपिळी या पशुवृत्तीचाच अंमल आहे अशी सर्वत्र समजूत असल्यानें या राजकारणाचा साधुपुरुषांना तिटकारा येणें साहजिक होतें. दुसऱ्याच्या देशावर घाला घालणें, त्याचें स्वातंत्र्य लुबाडून घेणें, हें जर राजकारण असेल–तोंपर्यंत व अजूनहि तें बहुतेक राष्ट्रांकडून तसेंच आहे असें मानण्यांत येतें–तर मग त्या राजकारणांत व नरकांत भेद कोठें राहिला ? मॅझिनीनें राजकारणास या नरकगामी कल्पनेपासून मुक्त केलें. राजकारण हें परमेश्वरी कर्तव्य आहे असें त्यानें स्पष्ट रीतीनें सिद्ध केलें. प्रवृत्ति व निवृत्ति हीं दोन परस्पर विरोधी तत्त्वें नसून तीं अेकाच मार्गाच्या दोन भिन्न भागांचीं नांवें आहेत असें त्यानें प्रतिपादन केलें. " नाहीं, स्वर्ग व पृथ्वी यांच्यामध्यें विरोध आहे किंवा तीं भिन्न आहेत हें सत्य नाहीं. नाहीं, स्वर्गांत सत्य व न्याय्यांचें अीश्वरी राज्य चालावें व पृथ्वीवर असत्य व अन्याय्य यांचा अंमल चालावा हें खरें नाहीं. पृथ्वी ही स्वर्गाची शिडी आहे." राजकारणाला स्वार्थपरायणतेचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिडिस स्वरूप देणाऱ्या लोकांची चुकी अशा रीतीनें अुघडकीस आणून मग मॅझिनीनें फाजिल धर्माभिमान्यांचा समाचार घेतला आहे धर्मानें राजकारणांत लक्ष घालणें अवश्य आहे अितकेंच नव्हे तर त्याचें कर्तव्य आहे. राजकारण म्हणजे समाजाची, स्वदेशाची व स्वराष्ट्राची दास्यमोचना व संवर्धना होय. तिकडे दुर्लक्ष करणें म्हणजे मनुष्यजातीवर आलेलें भयंकर संकट निमूटपणें पाहण्याचें अक्षम्य पातक करणें होय. धर्माची खरी व्याख्या म्हणजे मनुष्यमात्राचें धारण करणें ही होय. मनुष्यमात्र दास्यपंकांत किंवा अनीतींत पचत असतां आपण तेवढें स्वतःस मुक्त करून घेअू ही समजूत ढोंगीपणाची आहे. भूतदयेशिवाय स्वतःच्या मुक्तीला दुसरा मार्ग नाहीं. “ तुमची जेव्हां चौकशी होअील तेव्हां परमेश्वर तुम्हांला असें विचारणार नाहीं कीं ‘ तुम्हीं स्वतःच्या कल्याणासाठीं काय केलेंत ?’ तर तो तुम्हांला असेंच विचारणार आहे कीं ‘तुम्हीं भूतमात्रांच्या कल्याणाकरितां काय केलें आहे ? मीं जे स्वदेशबंधु तुम्हांला दिले त्यांच्या कल्याणाकरितां काय केलें आहे ?’ हें भूतमात्रांचें अंतिम कल्याण करण्यासाठीं, त्यांची ज्ञानानें व पावित्र्यानें आत्मोन्नति होण्यासाठीं व त्यांना सत्कृत्यें करण्यास सामर्थ्य येण्यासाठीं पहिली अत्यंत आवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे त्यांचें दास्यविमोचन करणें—त्यांस स्वातंत्र्य मिळवून देणें—ही होय. जोंपर्यंत अेखाद्या व्यक्तीला तुरुंगांत बांधून टाकिलें आहे तोंपर्यंत, तिच्या हातून सत्कृत्यें घडणें व प्रगमन होणें हें जितकें अशक्य आहे तितकेंच जोंपर्यंत अेखादा देश राजकीय पारतंत्र्यांत खिळून टाकलेला आहे तोंपर्यंत त्याच्या हातून मानवी प्रगमनाला मदत होणें हें अशक्य आहे. अशा स्थितींत, “ आपण सर्वजण अेकमेकांच्या मुक्ततेबद्दल जबाबदार आहोंत. जर आपण आपल्या अितर मानवी बंधूंस परवशतेंत व अज्ञानांत तसेंच पडूं देअूं, तर परमेश्वराचा द्रोह केल्याचें महत्पाप आपल्या माथीं बसेल. स्वतःची अुन्नति व मुक्तता करण्याचा अेकच मार्ग आहे, व तो सर्वांना मुक्ति मिळेल असा प्रयत्न करणें हा होय. ” आपण ज्या देशांत जन्मलों व ज्या देशाचें अन्न खाल्लें त्याचें कर्ज फेडल्याशिवाय आपणास स्वर्गाचीं दारें खुलीं होणार नाहींत, हें व्यक्तिविषयक मोक्षासाठीं धडपडणाऱ्या ढोंगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधूंस किंवा ख्रिस्ति धर्माभिमान्यांस कळलें पाहिजे.

" भूतांची दया हें भांडवल संतां। आपुल्या ममता नाहीं देहीं ॥
तुका म्हणे सुख पराचिया सुखें। अमृत हें मुखें स्रवतसें ॥ "

हें खरें धर्मरहस्य होय, व म्हणून धर्माभिमान्यांस व धर्मोपदेशकांस मॅझिनी विचारतो, " अहो धर्माधिकारी हो, तुमचाहि जन्म या भूमींतच झाला नाहीं काय ? तुम्हांलाहि या भूमीनेंच पोसलें नाहीं काय ? हिच्याच दुधावर तुम्ही वाढला नाहीं काय ? मग ती जुलमाखाली चिरडत असतां तुम्ही स्वस्थ बसून स्वर्गांत कसे चढाल ? तुम्हाला देश नाहीं काय ? तुम्हाला भूतदया नाहीं काय ? तुमच्या या कृतघ्नतेनें तुम्हीं पापी ठरत आहां. धर्म हा आतां तुमच्या छावणींत नसून तो आमच्या छावणींत आलेला आहे. बायबलमध्यें स्वातंत्र्य पवित्र मानलें नाहीं काय ? व तुमचा देश पारतंत्र्यानें अपवित्र झालेला नाहीं काय ? मग सर्वत्र स्वातंत्र्य नांदावें, मनुष्यांतील द्वेषभाव नष्ट व्हावा, धर्माचा खरा जयजयकार व्हावा, अशी जर तुमची खरी अिच्छा असेल तर तुम्हीं आम्हांस मिळा. " अशा रीतीनें धर्म हा राजकारणाचा विरोधी नाहीं हें मॅझिनीनें आपल्या अधिकारयुक्त वाणीनें प्रतिपादन केलें. तो स्वतःच अेका ठिकाणीं म्हणतो कीं, " राजकारणाला आम्ही धर्माच्या अुच्चतेप्रत नेलें. " जे कारस्थानपटू धर्माचा व नीतीचा धिक्कार करून राजकारणाला धर्म नाहीं म्हणून म्हणत होते व जे धर्मपटु राजकीय स्थितीकडे दुर्लक्ष करून धर्माला राजकारण नाहीं म्हणून म्हणत होते त्या दोन्ही पक्षांचें अपराध व दोष अुघडकीस आणून, " आयुष्यांत भिन्नता नाहीं, आयुष्य अेकरूप आहें, परमेश्वराच्या आज्ञा परस्परविरोधी नाहीत. परमेश्वरी आज्ञा अेकच आहे व ती सर्वांना सारखी लागू आहे. " अशा पवित्र व अुदात्त तत्त्वाचा मॅझिनीनें अुच्चार केला. राज्यक्रांतिकारक पुढाऱ्यांत नीति व धर्म यांच्या पावित्र्यांतून ज्याला राज्यक्रांतीची स्फूर्ति मिळाली आहे असा महात्मा मॅझिनीशिवाय अन्यत्र सांपडणें हें युरोपच्या अितिहासांत दुर्लभ आहे हें मॅझिनीचें विशिष्ट कर्तृत्व आहे. त्याच्या व त्याच्या अुपदेशानें प्रवृत्त झालेल्या तत्कालीन अिटालियन देशवीरांच्या आयुष्यांत जो अुदात्तपणा व जें पावनत्व दिसून येतें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें सर्व वरील नीतितत्त्वाचें फल आहे. स्वार्थासाठीं नव्हे तर परमेश्वरी कर्तव्य म्हणून स्वदेश स्वतंत्र करण्यास जे देशवीर तयार होतात त्यांच्या तरवारीपुढें ऑस्ट्रियाचा काय, पण गर्वानें मदांध झालेला वाटेल तो देश चळवळ कांपूं लागेल. जर सर्व लोकांचीं मनें राजकारण व धर्म हे अेकरूपच आहेत अशा पूत निष्ठेनें अुद्युक्त होतील तर या जगांत पारतंत्र्याचें नांवदेखील अुरणार नाहीं. **राजकारणाला धर्म आहे व धर्माला राजकारण आहे**, हें महत् सत्य, हें कालदेशाबाधित सत्य, हें परमेश्वरी सत्य ओळखून "जर माझ्या प्रिय देशभूमीचे दोन कोटि लोक 'आतां स्वातंत्र्य मिळवावयाचेंच' असें म्हणून उठले तर त्यांना अेक ऑस्ट्रिया तर काय पण असे तीन ऑस्ट्रिया अेकत्र झाले तर त्यांचा अुच्छेद करून आपलें स्वातंत्र्य परत मिळवतां येअील !" दोन कोटि देशबंधूंवरच त्या महात्म्याची ही केवढी अुडी ! मग जर त्याच्या देशाची लोकसंख्या याहून दहा पांच पट असती व त्याचा शत्रु जर ऑस्ट्रिया अेवढाच असता तर त्यानें स्वदेशस्वातंत्र्य मिळवावयास अेक क्षणहि लागूं दिला नसता ! मर्दांची गोष्ट अशीच आहे. धर्म व स्वराज्य या तत्त्वद्वयाची अेकरूपता मॅझिनीच्या शब्दांत अैकिल्यावर कोणाहि महाराष्ट्रीयाला महाराष्ट्राच्या मॅझिनीची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. सत्पुरुष हे परमेश्वराच्या अंशानें संभूत झालेले असल्यानें त्यांचे आत्मे हे भिन्न नसतात व म्हणूनच त्यांचे विचारहि परस्परांशीं विसंगत होत नाहींत. निरनिराळ्या देशांतील त्यांचीं नांवें तेवढीं वेगळीं, बाकी तत्त्व अेकच. अिटालीमध्यें जन्मलेल्या रामदासांना मॅझिनी म्हणतात व हिंदुस्थानांत जन्मलेल्या मॅझिनीला रामदास म्हणतात. बाकी दोघेहि अेकच तत्त्व सांगतात कीं, राजकारण धार्मिक असेल तरच तें पवित्र आहे व धर्म राजकीय असेल तरच तो पवित्र आहे. "अमका मनुष्य धार्मिक आहे असें मला कळतांच मी पहिला प्रश्न हा विचारीन कीं त्यानें लोकांच्या मुक्ततेसाठीं काय केलें आहे व काय सोसलें आहे ? अमका 'मनुष्य' आहे असें कळतांच मी पहिला प्रश्न हा विचारीन कीं तो गुलाम आहे काय ? कारण जो गुलामगिरींत स्वस्थ राहतो तो मनुष्य नसून ती नुसती जड माती आहे !"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"**आयुष्य हें चैन नसून आयुष्य हें कर्तव्य आहे.**" राजकारणांतील अगदीं प्रथम आधारभूत कर्तव्य म्हटलें म्हणजे स्वदेश–स्वातंत्र हें होय. मनुष्यजाति, स्वदेश, कुटुंब व व्यक्ति अशा पायरीनें मनुष्यांची कर्तव्यतारतम्यता आहे. या परंपरेच्या वांटचाला जीं राजकीय कर्तव्यें आलीं आहेत त्यांमध्ये स्वदेशस्वातंत्र्य हें प्रधान कर्तव्य आहेच आहे, परंतु राजकीय कर्तव्यासाठींच केवळ नव्हे तर अितर सर्व कर्तव्यें मनुष्याकडून यथास्थित रीतीनें पार पाडण्यास स्वदेशस्वातंत्र्य आधीं मिळविलें पाहिजे. व्यक्तीचीं किंवा कुटुंबांचीं कर्तव्यें जर त्यांच्या स्वदेशपारतंत्र्यांत असतील तर कधीहि यथास्थित चालवयाचीं नाहींत. लोकांत असत्य व दारिद्रय माजून तो देश भ्याड व कमकुवत होतो. त्या देशाला ज्ञान देणें अशक्य होतें. "जेथें शिकण्यास दारिद्रानें वेळ मिळत नाहीं तेथें नुसत्या शाळा उघडून काय होणार ?" या राजकीय पारतंत्र्यानें देशांतील व्यक्ति व कुटुंब यांचीच वाढ खुंटते असें नाहीं, तर मनुष्य जातीची वाढहि तितक्या प्रमाणानें खुरटत जाते. "प्रत्येक देशाला मनुष्यजातीच्या अुत्क्रांतींत भर टाकण्यासाठीं अेक विशिष्ट कामगिरी सांगितलेली असते. परंतु पारतंत्र्यामुळें तो देशच अस्तित्वांत आहे असें म्हणतां येत नसल्यानें त्याच्या वांटचाला आलेलें कर्तव्य त्या देशाकडून घडणें अशक्य होतें व म्हणून तितक्या मानानें मनुष्यजातीची अुन्नति अडकून राहते. सर्व देशाची अुन्नति म्हणजे मानव्याची अुन्नति. परंतु जोंवर पारतंत्र्यानें कांहीं देश नीचतेला खिळून टाकलेले आहेत तोंवर मानव्य अुन्नतीला जाणार कसें ? म्हणून **व्यक्तीच्या, कुटुंबाच्या, समाजाच्या व मनुष्यजातीच्या सर्व प्रकारच्या अुन्नतीचें मुख्य साधन जें राजकीय स्वातंत्र्य तें संपादन व संरक्षण करणें हें प्रथम कर्तव्य होय.** ही परमेश्वराची आज्ञा होय. ही धर्माची आज्ञा होय.

परंतु हें राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचें कर्तव्य पार पाडण्यास मार्ग कोणचा योजावा ? स्वातंत्र्य परत कसें मिळवावें ? मॅझिनी जन्मला त्याच वेळेस अिटलीच्या लोकांनीं अेक प्रश्न सोडविलेला होता कीं, स्वदेशाची उन्नति ही भिक्षांदेहीनें किंवा परक्यांच्या मदतीनें केव्हांहि होणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" तुम्हांला भिक्षा मागून स्वातंत्र्य मिळेल अशी आशा आहे काय ? नाहीं, नाहीं, या भिक्षांदेहीनें स्वातंत्र्य मिळणार नाहीं." त्यांच्यापुढें जें काम होतें तें अुंच व धिप्पाड मनुष्यांचें होतें, व तें काम करण्यासाठीं ते जमिनीवर सपशेल पसरले. " त्यांनीं प्रत्येक मुख्य प्रवानाच्या थापांनी भुलून जावें. त्यांनीं भिकार सवलतींत संतुष्ट राहवें, व त्यांनीं प्रचंड लोकशवतीवर विश्वास ठेवण्याचें सोडून देअून परक्यांच्या दारांशीं जोगवा मागण्याचा अुपक्रम करावा. " परंतु या अुपक्रमाचा अुपसंहार लवकरच झाला. अिटलीचे धूर्त पुढारी या परक्यांच्या थापाथापीला फार दिवस भुलले नाहींत. त्यांच्या तेव्हांच ध्यानांत आलें कीं, ऑस्ट्रियानें जें आपणांस जिंकिलें आहे तें आपल्या अर्जांच्या चिटोऱ्यांनीं आपणांस मुक्त करण्याकरितां नव्हे. राष्ट्रांच्या अितिहासांत बहुश: आढळून येणारें हें भिक्षांदेहीचें व्यसन अिटलीस लागलें होतें. पण तें तावडतोब सुटलें. शंभर शंभर वर्षे परक्यांच्या दारीं लाथा बसत असतां व हजारों वेळां विश्वासभंग झाला असतांहि पुन्हां अेकदां कटोरा घेऊन भिक्षा मागण्याअितका अिटलीदेश राजनिष्ठ झालेला नव्हता. त्याच वेळेस पोलंड, स्पेन वगैरे देशांत राज्यक्रांतीची लाट अुसळली होती. तीमुळेंहि अिटलींतील लोकांत आत्मनिष्ठा उत्पन्न झाली. परंतु अशा भयंकर राज्यक्रांत्या आजूबाजूस चालत असतांहि त्यांच्याकडे पाहून ज्यांना आपल्या गुलामगिरीची व भिक्षांदेहीची शरम वाटत नाहीं, असे देश या भूमीवर काय थोडें आहेत ? पण अिटली अितकी मंदट झालेली नव्हती. ती खडबडून जागी झाली. या जागृतीचा परिणाम चहूंकडे दिसूं लागला. स्वदेशाची प्रीति ही वाङ्मयांत प्रथम प्रादुर्भूत झाली. नंतर अिटलीमध्ये स्वदेशी चळवळ सुरू झाली. मिलनमध्यें तर या स्वदेशी चळवळीचा कळसच झाला होता. प्रत्येक अुदात्त व धाडसी कृत्यांत तरुणवर्ग जसा सदोदित आघाडीवर असतो तसाच तो अिटलीच्या राज्यक्रांतींतहि होता. मिलनमध्यें ऑस्ट्रियाच्या तंबाखूवर विद्यार्थ्यांनीं कडक बहिष्कार टाकला. रस्त्यारस्त्यांतून विद्यार्थ्यांनीं नाकेबंदी केली व कोणी ऑस्ट्रियाची विडी ओढतांना पाहिला कीं त्याला हाणमार करून देण्याचा सपाटा चालविला. या स्वदेशी चळवळीला लवकरच पूर्ण राजकीय स्वरूप प्राप्त झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अमेरिकेंतहि स्वातंत्र्ययुद्धाच्या आधीं अशीच स्वदेशी चळवळ अुत्पन्न झाली होती. काय विलक्षण प्रकार आहे ! अितिहासाची पुनरावृत्ति होते ती अशी. अितिहासांत स्वदेशी चळवळीचें पर्यवसान राज्यक्रांतींत व स्वातंत्र्यप्राप्तींत झाल्याचीं हीं अुदाहरणें कांहीं आकस्मिक रीतीनें घडून आलेलीं नाहींत. ते कांहीं अपघात नाहींत. त्यांच्या या विलक्षण साम्याचें विवरण करतां येणें शक्य आहे. स्वदेशी चळवळ म्हणजे 'दुसऱ्याच्या लुटारूपणास आळा घालून आपल्या हक्कांचा बचाव करणें होय. आपले हक्क काय आहेत हें सामान्य लोकांस अेकदम कळत नाहीं. म्हणून प्रथम त्यांच्या ग्राहकशक्तीला अितकेंच कळतें कीं परक्यांच्या व्यापारानें आपण बुडत आहोंत. म्हणून तें त्या व्यापारावर बहिष्कार घालण्यास तयार होतात. अितकी त्यांची तयारी झाली की अर्थातच परके लोक आपल्या व्यापाराच्या संरक्षणार्थ जुलमी अुपाय योजूं लागतात. हा जुलूम सुरू झाला कीं प्रथमतः व्यापारावरच बहिष्कार घालणारे लोक अनायासेंच सत्य मार्गाला लागतात. त्यांना कळूं लागतें कीं निर्जीव परदेशी कापडावर किंवा तंबाखूवर अगर चहावर बहिष्कार घालून कांहीं अुपयोग नाहीं. या निर्जीव वस्तूवर राग काढण्यांत काय अर्थ आहे ? खरा राग या निर्जीव वस्तूंना ज्या सजीव वस्तूंचा आधार आहे त्यांच्यावरच अुगविला पाहिजे. परक्या मालाला नव्हे तर परक्यांनाच बहिष्कार घातला पाहिजे. तंबाखूलाच नव्हे तर या ऑस्ट्रियन लोकांना व चहालाच नव्हे तर या अिंग्रज लोकांना आपल्या देशांतून हुसकून दिलें पाहिजे. अशा विचारपरंपरेनें अिटालियन व अमेरिकन लोकांमध्यें स्वदेशी चळवळीचें स्वातंत्र–युद्धांत रूपांतर झालें. मॅझिनीचे आधीं जें देशभक्त होऊन गेले, त्यांनीं अिटलीचें राजकारण या स्थितींत आणून ठेविलेलें होतें. चहूंकडे परक्या सत्तेबद्दल असंतोष माजला होता. आपलीं दुःखें भिक्षावृत्तीनें कमी होणार नाहींत ही बहुतेकांची खात्री झालेली होती व स्वदेशी चळवळीसारख्या आत्मनिष्ठेच्या चळवळींचा प्रादुर्भाव झालेला होता. अितकेंच नव्हे तर कांहीं कांहीं पुढाऱ्यांना स्वातंत्र्याची लालसाहि अुत्पन्न झाली होती. परंतु ही स्वातंत्र्याची लालसा सर्व लोकांना कशी कळवावी ? परक्यांना अिटलींतून घालवून दिल्याशिवाय अिटली देश कधींहि वर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यावयाचा नाहीं हें लोकांना कसें शिकवावें ? वर्तमानपत्रें व अुघड सभा असंतोष अुत्पन्न करीत होत्या. परंतु या असंतोषाला कृत्याचें स्वरूप देणें आवश्यक होतें. कारण ऑस्ट्रियाला हुसकून द्या असें अुघड रीतीनें कोणालाच सांगतां येअीना व लाक्षणिक भाषेंत सांगितलें असतां तें सामान्य जनांना कळेना. यापेक्षाहि मोठी अडचण म्हणजे ही असे कीं, नुसतें ऑस्ट्रियाला हुसका अितकेंच म्हणून कार्य भागत नाहीं. तर त्या राष्ट्रकृत्यासाठीं काय अुपाय योजावे याचें शिक्षण व याची सामुग्रीहि जमविली पाहिजे होती. स्वातंत्र्य मिळवा अितकेंच म्हणून स्वस्थ बसावयाचें नव्हतें. तर त्या स्वातंत्र्ययुद्धाची तयारी करणेंहि अवश्य होतें. हीं दोन कृत्यें कशीं पार पाडावीं ?

हीं कृत्यें अुघड रीतीनें घडवून आणणें अशक्य होतें. कोणत्याहि परतंत्र राष्ट्राची ह्या पायरीपर्यंत मजल आली कीं त्याच्यापुढें हाच महत्त्वाचा प्रश्न येअून पडतो. स्वातंत्र्य पाहिजे ही अस्पष्ट अिच्छा अुत्पन्न झालेली असतें. पण बहुजनसमाजाला ती स्पष्टपणें कशी कळवावी ? भिक्षा मागून कांहींहि प्राप्ति होणार नाहीं व शेवटीं शक्तिदेवीचीच अुपासना करावी लागणार, हें त्यांस अंधुक रीतीनें कळूं लागतें. परंतु राष्ट्राला सशक्त व सशस्त्र कसें करावें हें मात्र त्यांस सांगतां येत नाहीं. " अशा स्थितींत '**गुप्त मंडळचा**' शिवाय परवशतेंतून सुटण्याचा दुसरा अुपाय नाहीं. जेव्हां सत्यप्रतिपादनाची बंदी झालेली असते, जेव्हां पवित्र कार्यालाहि आरंभ करण्याची चोरी झालेली असते, जेव्हां स्वदेश हा अेक भला थोरला तुरुंग बनलेला असतो, तेव्हां त्या तुरुंगांतून सुटून स्वातंत्र्याच्या पवित्र वातावरणांत श्वासोश्छ्वास करण्याचा अीश्वरी हक्क शाबित करण्यासाठीं आम्हां कैद्यांना **गुप्त कट** हा अेकच मार्ग आहें. आम्हीं गुप्त मंडळचा करूं, गुप्त कट करूं, वेळ येतांच त्या तुरुंगाच्या खिडक्या उघडून टाकूं, त्यांच्या गजाचे तुकडे अुडवूं, त्यांच्या दरवाज्यांना लाथेसरशीं फोडून टाकूं व त्या तुरुंगवाल्यांच्या छातीवर नाचत नाचत आम्ही मोकळ्या हवेंत येअूं—आम्हीं स्वतंत्र होअूं !" जेथें सत्यप्रतिपादनाची अधम सत्तेनें बंदी केलेली नाहीं तेथें गुप्त मंडळचा व गुप्त कट हा गुन्हा होय. **परंतु जैथें सत्यप्रतिपादनाची अधमांच्या जुलुमानें**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बंदी झालेली आहे तेथें गुप्त मंडळचा ह्या पवित्रतम आहेत. नव्हे, नव्हे, सत्य प्रतिपादनाचा तो अेकच मार्ग आहे. " गुप्त मंडळचांचा पहिला फायदा असा आहे कीं, गुप्त सभा भरवून त्यांत स्वातंत्र्याचें शिक्षण स्पष्टच अुत्तम रीतीनें देतां येतें, तें लोकांस ताबडतोब कळतें व परकीय सरकारास दाबणें अशक्य होतें. मझिनी म्हणतो, " या मार्गानें तुम्हीं तरुणांस जें सत्य तें स्पष्ट रीतीनें सांगा. त्यांच्यापासून कांही लपवून ठेवूं नका. त्यांना निर्जीव यंत्रा-प्रमाणें न वागवितां त्यांना जिवंत व चैतन्ययुक्त मनुष्यांप्रमाणें आदरानें वागवा म्हणजे त्यांच्यांत काय तेज आहे तें तुम्हांस कळून येअील. " गुप्त मंडळयांचा प्रसार परकी सरकारास दावणें अगदीं अशक्य होतें, अितकेंच नाहीं, तर अेखादी दुसरी गुप्त मंडळी अुघडकीस आणली असतां त्यापासून त्यांचा तोटाच होतो. गुप्त मंडळीचा स्फोट हा ज्वालामुखीच्या स्फोटासारखा आहे. तो दबून असतो तोंपर्यंतच परकीयांचें जीवन सुरक्षित असतें. परंतु तो स्फोट होतांच त्यांतील तप्त रसानें परवश लोकांवर चैतन्याची जंगी लाट पसरते. जेथें नसतात तेथें गुप्त मंडळचा अुत्पन्न होतात, व विशेषत: परक्यांचें धैर्य छिन्नभिन्न होअून जातें. पाय ठेवावा तेथें भुयार आहे कीं काय अशी त्यांना भीति पडून त्यांची गति कुंठित होते व कोठें फटाका अुडाला कीं त्यांना बॉम्बशेल आल्याचा भास होतो. त्यांच्या अधिकारीवर्गास जिवाच्या आशेनें नोकऱ्या सोडाव्या लागतात. अशा रीतीनें सर्वत्र भीति अुत्पन्न होते आणि भीक नको पण कुत्रा आवर अशी परक्यांची त्रेधा अुडते. सारांश, दुसरा फायदा असा आहे कीं फार थोडचा शक्तीनें गुप्त मंडळयांना परकी सरकारास गांगरून सोडतां येते. मॅझिनी म्हणतो, " ते शंभर होते, पण त्यांनीं युरोपचीं सिंहासनें, साम्राज्यें, आज्ञापत्रकें, तुरुंग, फांशी वगैरे सर्व राक्षसांना थरथर कांपविलें होतें." तिसरा फायदा म्हणजे, लढाअीची तयारी करतां येते. हें काम अुघड रीतीनें करणें अगदीं अशक्य होते. तें अशक्य कार्य मॅझिनीनें आपल्या गुप्त कटांनीं शक्य करून दाखविलें. याशिवाय अेक केंद्र अुत्पन्न होतें. संघशक्तीनें सर्व बेत पार पाडता येतात व सर्व लोकांना अेक मार्ग, अेक दिशा व अेक उद्दिष्ट देतां येतें. अशा अनेक फायद्यांचा विचार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून मॅझिनीनें " **तरुण अिटली** " स्थापन केली. या 'तरुण अिटली 'च्या अुपदेशानेंच अिटलीला स्वातंत्र्य मिळालें व अिटलीचें अैक्य झालें. अिटलीच्या स्वातंत्र्यार्थ झगडलेल्या अनंत देशवीरांचें शिक्षण 'तरुण अिटलीं 'त झालेलें होतें. " तरुण अिटली 'नें माझ्या देशांतील भिन्न पंथ मोडून टाकून स्वदेश अेक केला. त्यापूर्वी अिटलीच्या अैक्याला लोक हंसत होते.अिटलीचें राष्ट्रैक्य मनोराज्य आहे, असें सर्व पुढारी म्हणत होते. परंतु 'तरुण अिटली 'नें माझ्या देशांत नवीन युगाला प्रारंभ केला. " 'तरुण अिटली'नें हें युगांतर करण्याचें कार्य कसें सिद्धीस नेलें याची फोड करण्याकरितां तिच्यांतील श्रम-विभागाचें निरनिराळें विवेचन केलें पाहिजे. " तरुण अिटली'चें साह्य मिळ-विण्यासाठीं ती दुहेरी कार्यक्रमाची योजना करीत आहे. शिक्षण व युद्ध-शिक्षण युद्धाला मदत करील व युद्ध शिक्षणाला मदत करील, " अशा दुहेरी कार्यक्रमाचें वर्गश: विवरण केलें म्हणजे मॅझिनीनें आपलें अचाट कर्म कसें सिद्धीस नेलें व नेवविलें हें स्पष्ट होअील.

प्रथमत: मॅझिनीनें अिटलीला कोणचें शिक्षण दिलें हें पाहिलें असतां या महात्म्याचे विचार किती प्रगल्भ व पवित्र होते, हें सहज दिसून येतें. पूर्वी सांगण्यांत आलेंच आहे कीं मॅझिनीचें सर्व राजकारण नीतीच्या पायावर अुभार-लेलें होतें. "**आपल्यापुढें जें कार्य आहे तें लहानसहान कार्य नाहीं. आपण देवानें जें कार्य केलें तेंच करीत आहोंत. आपण लोकनिर्मिति करीत आहोंत ! आपण स्वराष्ट्र अुत्पन्न करीत आहोंत.** " याहून दिव्यतर कर्तव्य तें कोणचें असणार ? " परमेश्वरानें अगदीं स्पष्ट अशा आज्ञेनें सांगितलें आहे कीं, अिटली हा अेक स्वतंत्र देश आहे. समुद्राच्या व पर्वताच्या रेखा आपल्या दिव्य करांगुलीनें आंखून देवानें अिटली देश अिटालियनांस दिलेला आहे." तेव्हां अिटालियन लोकांचें पहिलें कर्तव्य म्हणजे ह्या अीश्वरी आज्ञेप्रमाणें अिटली स्वतंत्र करणें होय. 'तरुण बंधू हो, स्वदेश हे परमेश्वरानें आपणांस दिलेलें घर आहे. या घरांत राहून त्याच्या आश्रयाखालीं तुम्हीं वाढावें व वाढत वाढत अखेर मनुष्यजातीसह अंतिम स्वरूपाला जावें अशी त्याची अिच्छा आहे. हें निसर्गनिर्मित गृह अिटालियनांना वाढण्याकरितां आश्रय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून दिलेलें असून परक्यांनीं अेक तुरुंग बनवून ठेवला आहे. म्हणून अिटलीच्या पुत्रांचें पहिलें कर्तव्य म्हणजे स्वदेश स्वतंत्र करणें हें होय. मॅझिनीनें आपल्या गुप्त संस्थेंतून पहिलें शिक्षण या तत्त्वाचें दिलें. " प्रथम स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे. दास्यमुक्तता झाली पाहिजे. अितर सर्व प्रश्न मागाहून सुटतील. " " आपणांस अनेक हक्क नको असून अेकच हक्क पाहिजे आहे व तो हक्क म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य--दास्यमुक्तता--हा होय; " **व हें स्वातंत्र्य तें फायद्याचें आहे म्हणूनच नव्हे, तर तें मर्दांचें कर्तव्य आहे म्हणून मिळविलें पाहिजे.** " अिटलीमध्यें भाकर स्वस्त आहे किंवा महाग आहे हा मुख्य प्रश्न नाहीं. त्या भाकरीवर गुलामगिरीचा शिक्का आहे कीं नाहीं हा मुख्य प्रश्न आहे." मग ऑस्ट्रियानें अनंत हक्क जरी दिले असते तरी अिटलीचे लोक स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय राहतेना. मॅझिनीनें स्वातंत्र्याला कर्तव्याचें स्वरूप दिल्यानें ऑस्ट्रिया अेकदम हतवीर्य झाला. त्यावेळपर्यंत जरा जास्त कमी चळवळ झाली कीं लहानलहान हक्क देअून ऑस्ट्रिया खुबीनें चळवळी मारून टाकीत असे. परंतु आतां, " हक्कांचा प्रश्न नसून हक्काचा आहे " शिवाय आपण स्वातंत्र्यसंपादनांत अेक अत्यंत पवित्र कर्तव्य करीत आहोंत अशी तरुणांची भावना झाल्यानें त्यांच्या अुदात्त वृत्ति जाग्या झाल्या. तुरुंगांत देशवीर राष्ट्रगीतें गाअूं लागले व फांशींवर " जो स्वदेशासाठीं मरतो तो चिरंजीव होतो, " या महामंत्राचा जयघोष करूं लागले. " तरुणांना कर्तव्यबुद्धीनें उद्दीपित करा, ध्येयाची भक्ति शिकवा, म्हणजे त्यांच्या अंगांत काय सामर्थ्य आहे हें तुम्हांला कळेल," असें तो महात्मा अुगीच म्हणत नसे. अिटलींत १८३१ पासून तों १८७० पर्यंत दरसाल कोठेंना कोठें तरी अेक बंड होतच असे. अितकी चिकांटी धरून स्वदेशभक्तांनीं अखेर विजय संपादन केला. बंडामध्यें बायकांनीं जे पराक्रम केले तें अितर निर्जीव देशांतील पुरुषांनादेखील लाज आणतील.

" तरुण लोक पुस्तकें टाकून बाहेर पडले, तरुण स्त्रिया फंडासाठीं रस्तोरस्तीं भिक्षा मागूं लागल्या, स्वयंपाकी लोक आपल्या सोधण्यासुद्धां रस्त्यांत अुड्या घेअूं लागले व ऑस्ट्रियन शिपायी शहरांत शिरूं पाहतांच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्यावर टेबलें, कौलें, सुऱ्या, खांब, दगड, तापलेल्या सळया, कढणारें तेल यांचा वर्षाव होऊं लागला !" अशा कृतनिश्चयानें अिटली लढली ! अनंत अपजय आले तरी ती लढली. कारण, "प्रत्येक अपजय ही जयाची अेक पायरी आहे," अशी त्यांना 'तरुण अीटली' नें दीक्षा दिली होती परंतु नुसतें स्वातंत्र्यप्राप्तीचें कार्य म्हणजे कांहीं अंतिम कार्य नव्हे. कारण, "जोंपर्यंत लढाअी सुरू आहे तोंपर्यंत लोक अेकत्र राहतील, परंतु ती बंद होतांच अिटली, देशांतील निरनिराळ्या प्रांतांत यादवी माजूं लागेल." म्हणून मॅझिनीचें दुसरें तत्त्व म्हणजे "**राष्ट्रैक्य**" हे होय. अिटलीच्या भिन्न भिन्न प्रांतांत पूर्वीपासून अितकी यादवी माजलेली होती की, ते निरनिराळे देशच झालेले होते. लहान लहान संस्थानें हीं अेकमेकांशीं अखंड लढाया करीत होतीं. शहरें अेकमेकाशीं भांडत होतीं. अशा स्थितींत अिटली देशाचें मिळविलेलें स्वातंत्र्य कायम रहाण्यास त्यांचें राष्ट्रैक्य होणें आवश्यक होतें.

अशा रीतीनें प्रथम दास्यमुक्तता व मग राष्ट्रैक्य हीं दोन तत्त्वें सांगितलीं. परंतु, "आपलें काम नुसतें नाशकारक नाहीं. तर आपणांश नाश केल्यानंतर त्या नाशांतूनच सृष्टि अुत्पन्न केली पाहिजे." ही सृष्टि अुत्पन्न करावयाला अिटलीच्या सुदैवानें योग्यतम असाच सृष्टिकर्ता मिळाला होता यांत शंका नाहीं. राष्ट्र स्वतंत्र झालें व त्यांतील निरनिराळे प्रांतिक भेद मोडून व द्वेष नाहींसे करून तें अेक झालें म्हणजे मग तेथें तें स्वातंत्र्य व ती अेकराष्ट्रीयता कायम राहण्यास अंतर्गत स्वतंत्रता मिळाली पाहिजे. "जुलूम म्हटला कीं तो त्याज्य आहे मग तो परक्यांचा असो किंवा स्वकीयांचा असो, तो धार्मिक असो किंवा राजकीय असो." म्हणून राष्ट्रामध्यें व्यक्तिस्वातंत्र्य. धर्मस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य हीं अवश्य असली पाहिजेत. परंतु जेथें राजसत्ता आहे तेथें असमता अुत्पन्न होतेच होतें. मनुष्यांत सद्‌गुण व योग्यता या योगांनीं जेवढे भेद झाले असतील: तेवढेच भेद न्याय्य व अुन्नतिमूलक आहेत, बाकी सर्व प्रकारची असमता ही अत्यंत गर्हणीय होय, व म्हणून राजसत्ता ही गर्हणीय आहे. मॅझिनीचें सर्व राजकारण जसें नीतिमत्तेला धरून होतें तसेंच त्याचें **लोकसत्तावादित्वहि** नीतीच्या भक्कम पायावर अुभारलेले होतें. शिवाय अिटली-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारख्या देशाला कायमपणा देणारी लोकसत्तेशिवाय दुसरी राज्यपद्धति शक्य नव्हती. मॅझिनी स्वतः राष्ट्राच्या बहुमताला विरुद्ध नव्हता. "राष्ट्रीय आज्ञेचा मी बंदा आहें. परंतु माझी अशी खात्री आहे कीं, **लोकसत्तेशिवाय दुसऱ्या सर्व राज्यपद्धति अन्यायमूलक व अनीतिमान आहेत.**" अिटलीनेंहि लोकसत्तेचींच योजना करावी असा मॅझिनीचा अत्याग्रह होता. "तुम्हीं राजसत्ता नेमाल तर कांहीं दिवस शांतता राहील. परंतु कायमची शांतता राहणार नाहीं. पहिली राज्यक्रांति संपतांच दुसरी सुरू होअील;" अशा अर्थी त्यानें वारंवार सूचना द्याव्या, व त्या भविष्यांचें सत्यत्व लोकांच्या निदर्शनास आपल्या आयुष्यांत आलें नाहीं, तथापि भावी कालांत तें आल्याशिवाय राहणार नाहीं अशी त्याची पक्की भावना होती, व अेतदर्थ 'तरुण अिटलीं'त लोकसत्तेचें तत्त्व अंगीकृत केलेलें होतें. अशा रीतीनें **दास्यमुक्तता—राष्ट्रैक्य—समता—व लोकसत्ता** ह्या तत्त्वचतुष्टयाचें शिक्षण 'तरुण इटलीं'त दिलें जाअी. हीं तत्त्वें इटलीच्या अंतःकरणावर मॅझिनीनें कोरून ठेविलीं आहेत. त्यांचा बहुतेक जय झालेलाच आहे व जो थोडा राहिला आहे तोहि भविष्यत्कालीं होणारच होणार यांत कोणालाहि शंका नाहीं.

'तरुण अिटलीं'च्या 'शिक्षणा'च्या कार्यक्रमाचा हा विस्तार झाला. आतां 'युद्ध' कांडाचा थोडासा प्रपंच केला पाहिजे. ऑस्ट्रियाशीं युद्ध केल्याशिवाय आपलें स्वातंत्र्य परत मिळणार नाहीं ही मॅझिनीची पूर्ण खात्री होती. "**लढाअीशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाहीं.** भयंकर, तुमुल, दीर्घ, निकाराची लढाअी केल्याशिवाय आपणांस दुसरा मार्ग नाहीं." असल्या वेळीं लढाअी करणें हें पाप नाहीं. "जेव्हां अेखाद्या सत्याचा जयजयकार करावयाचा असतो किंवा अेखाद्या असत्याचा विनाश करावयाचा असतो तेव्हां लढाअी पवित्र आहे." अिटलीमध्यें ही लढाअी करणें हें फार कठिण झालें होतें. त्यांच्यापाशीं युद्धोपयोगी हत्यारें नव्हतीं किंवा तीं बाळगण्याची परवानगी नव्हती. अशा स्थितींत अिटलीशिवाय दुसरें अेखादें राष्ट्र सांपडलें असतें तर तें गर्भगळित होअून लढाअीचें नांव काढण्यासहि भिअूं लागलें असतें. परंतु अिटली असल्या संकटांना भीक घालणारी नव्हती. तिच्यांतील शूर व तरुण लोक हे स्पेन,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अमेरिका, जर्मनी, पोलंड वगैरे देशांत गेले व तेथें युद्धकलेचें ज्ञान शिकले. ग्यारिबाल्डी, रिसीओटी वगैरे 'तरुण इटली'चे सभासद अशाच रीतीनें युद्ध-कलेंत निष्णात झाले. दुसरा बेत असा योजला होता कीं, अिटलीच्या हद्दी-बाहेर परंतु लगत्या लगत्यांनीं जर्मनी वगैरे देशांतून हत्यारें विकत घेअून त्यांचे खजिने करून ठेवावयाचे व स्वदेशांत गडबड झाली कीं लगेच हद्द फोडून आंत घुसण्याचा प्रयत्न सिद्धीस न्यावयाचा. अेकदां हद्द फोडली कीं मग बाहेरून शस्त्रें आंत आणण्यास मार्ग मोकळा झाला. तिसरा अुपाय असा योजला होता कीं, स्वदेशांत गुप्त रीतीनें हत्यारें तयार करण्याचे अगदीं लहान परंतु पुष्कळ व अंतरा अंतरावर असे गुप्त कारखाने काढावे. चवथी युक्ति अशी योजली होती कीं गुप्त मंडळ्यांनीं अितर देशांत हत्यारें खरेदी करून तीं मालाच्या जहाजांतून लपवून धाडावीं. पुष्कळ वेळां हें अुघडकींसहि येत असे.

या सर्व युक्त्याहून मॅझिनीनें व त्या काळच्या अिटालियन देशभक्तांनीं मुख्य अुपाय जो योजला तो सैन्य वळविण्याचा होय. ऑस्ट्रियाच्या लष्करांत जेवढे अिटालियन होते तेवढ्यांवरील अंमलदारांना 'तरुण अिटली'ची दीक्षा मिळालेली होती. परकीय सरकाराला तद्देशीय सैन्य ठेवल्यावांचून कोणच्याहि देशावर राज्य करितां येणें शक्य नसतें. अशा स्थितींत लष्करी शिपायांना जर स्वदेशाकडे वळवितां आलें तर त्याचा दुहेरी अुपयोग होतो. अेक तर पर-क्यांचा विश्वास अुडून जातो व आयत्या वेळीं ते घाबरे होतात, व दुसरे असें कीं राष्ट्रपक्षास आयते शिकलेले व सशस्त्र लोक मिळूं शकतात. "लष्करी शिपाअी वळवितांना त्यांच्या वरचे अधिकारी तेवढे वळविले म्हणजे झालें. तेहि अगदीं वरचे अधिकारी नव्हेत. तर दुय्यम प्रतीचे सुभेदार, मेजर वगैरे अधिकारी वळवावे." हें लष्कर वळविण्याचें काम रशियामध्ये फार कठिण जातें आहे; कारण तेथें दोन्ही पक्ष अेकाच जातीचे व देशाचे आहेत. परंतु अिटलींत हें काम सहज करतां आलें. कारण परकीयांचा तिरस्कार व स्वकी-यांचा लोभ हा मनुष्यमात्रांत निसर्गतःच कायम असतो. त्यास चेतना देणारा मॅझिनी मात्र भेटला पाहिजे. असो, थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वातंत्र्ययुद्धाची तयारी अशा रीतीनें करावी असा मॅझिनीचा कार्यक्रम होता. परंतु ही तयारी साधारण झाली म्हणजे युद्ध जें करावयाचें तें मोठमोठ्या लढाया देण्याचें नसून 'गनिमी काव्याचें' होय. मॅझिनीचा या गनिमी काव्यावर पूर्ण भरंवसा होता. ग्यारिबाल्डीहि गनिमी युद्धांत निष्णात होता. "परक्यांच्या जोखडाला झुगारून देण्याची ज्यांची ज्यांची अिच्छा असेल त्या त्या राष्ट्रांनी गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचाच आश्रय केला पाहिजे." गनिमी काव्यानें शत्रूप्रमाणें आपल्या सैन्यास कवाअीत येत नसल्यानें जी अुणीव राहिलेली असते ती भरून निवते. शिवाय लोकपक्षाच्या लहान लहान टोळ्या चोहोंकडे पसरून दिल्या म्हणजे शत्रूच्या विस्तीर्ण सैन्याला देशभक्तांच्या मूठभर सैन्यानें गुंतवून ठेवितां येतें. गनिमी काव्याला युद्धकलेचें कांहीं विशेषसें ज्ञान लागत नसल्यानें निश्चयी व करारी अशा देशभक्तांच्या मनांत येतांच त्याला आरंभ करतां येतो व जसजसें युद्ध जुंपत जातें तसतसें त्या देशभक्तांस लढाअीचें ज्ञान व अनुभव मिळूं लागतो. "गनिमी काव्यानें जंगी पराभवाचें भय नसतें." गनिमी टोळ्या सुटसुटीत असल्यानें त्या वाऱ्यासारख्या चहूंकडून हिंडूं लागतात व शत्रूचें अवजड सैन्य वेड्यासारखें मागून पुढें व पुढून मागें हेलपाटे घालीत बसतें. शिवाय, परक्यांना गनिमी काव्याचा केंव्हांहि आश्रय करतां येत नाहीं.कारण त्यांस या मुलुखाचें ज्ञान नसतें व त्यांना तेथील लोक अनुकूल नसतात.

ज्यांचा जन्म परतंत्रतेंत झालेला आहे, परंतु जे आपल्या पराक्रमानें त्या परतंत्रतेचें निर्दालन करून आपला स्वदेश स्वतंत्र झालेला पाहतात व त्या स्वतःच्या कर्तबगारीनें दास्यमुक्त केलेल्या भूदेवीच्या अंकावर आपलें शुभ्र मस्तक ठेवून चिन्मय होतात, त्यांच्या आनंदाला सीमा नाहीं! जर जगांत कांहीं निर्मल सुखाचे क्षण असतील तर त्यांच्यांत तो क्षण शुद्ध सुखाची परम सीमा करणारा होय कीं, ज्या क्षणीं, आपल्या अत्यंत प्रिय देशजननीला ज्यानें असह्य दुःख दिलें तो शत्रु मार खात खात देशाच्या हद्दीबाहेर पळून चाललेला आहे हें पाहतां येतें. जर निर्भेळ धन्यतेचा अेखादा दिवस असेल

(सा...४)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर तोच होय कीं, ज्या दिवशीं देशजननीला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून रणांगणांतून देशभक्त परतत आहेत व त्या स्वातंत्र्यासाठीं पतन पावलेल्या देशवीरांच्या आत्म्यांना संबोधून अशी गर्जना करीत आहेत कीं, "देशवीर हो, आपला देश स्वतंत्र झाला आहे ! तुमच्या रक्ताचा सूड अुगविला आहे ! " हें सुख व ही धन्यता ज्या थोडया महात्म्यांच्या नशिबीं आहे, त्यांत भगवान् मॅझिनीची गणना आहे.

✠ ✠ ✠

जोसेफ मॅझिनी (मराठी) १९०७ मध्यें लंडन (अिंडिया हाअूस)येथें लिहिलें. त्याच वर्षीं पहिली आवृत्ति होअून संपली. पुढें ब्रिटिश शासनानें त्याच्या प्रकाशनास बंदी केली. १९४६ मध्यें त्यावरील बंदी अुठतांच त्याची दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्यांत आली. मूल्य ५ रुपये.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लंडनचीं बातमीपत्रें : : ६

✠ ✠ ✠

[बार–ॲट–लॉ ह्या परीक्षेचा अभ्यास लंडनमध्यें करत असतांना, कै. शि. म. परांजपे यांच्या 'काळ' पत्राला चोवीस पंचवीस वयाचे तरुण श्री. वि. दा. सावरकर लंडनहून जीं बातमीपत्रें पाठवीत असत. तीं लंडनचीं बातमीपत्रें ह्या पुस्तकांत प्रकाशित करण्यांत आलीं असून पुढील सहा वार्तापत्रें हीं ह्या पुस्तकांत दिलीं आहेत.

ह्या वार्तापत्रांवरून १९०७–८ ह्या काळांतच स्वातंत्र्यचळवळीच्या मार्गाविषयीं वीर सावरकरांचें मत किती ठाम होतें आणि शस्त्राचाराचा अत्यंत अडचणींचा, जीवघेणा मार्ग त्यांनी कां स्वीकारला आणि कसा पार पडला ह्याची कल्पना येईल.]

✠ ✠ ✠

अप्रत्यक्ष प्रतिकाराचा जय व पराजय

(ता. १९ जुलै १९०७) लंडन

फ्रान्स देशामध्यें राजकारणशास्त्रांतील सर्व प्रमेयांना कांहीं विलक्षण बहार येतो यांत शंका नाहीं. राजा हा विष्णूचा अंश आहे हें दोषत्वपोषक थोतांड फ्रान्समध्येंच फोफावलें होतें. पण त्या थोतांडाचा नायनाट करण्यासहि फ्रान्समध्येंच लोक प्रथम पुढें आले. अठराव्या शतकांत रूसो व व्हालटेअर या तत्त्ववेत्त्यांचा फ्रान्समध्येंच अुदय झाला. "The Declaration of the Rights of Man" या अभूतपूर्व लेखाचा प्रादुर्भाव फ्रान्समध्यें झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्या तत्त्वानें सर्व जगांत नवीन युगाला आरंभ केला, अन्यायमूलक व जुलमी राजसत्तेच्या भूगोलावर ज्यानें घाव घातला व ज्याचा दिग्विजय होण्यासाठीं सर्व चराचर अुत्सुक झालेले आहेत तें लोकसत्तेचें तत्त्व प्रथम फ्रान्समध्यें भरभराटीस आलें. १७८९ पासून १८४८ पर्यंत फ्रान्समध्यें अितक्या निरनिराळ्या प्रकारच्या राज्यरचना झाल्या आहेत कीं, सर्व जगाला भिन्नभिन्न राज्यरचनेचे गुणधर्म शिकविण्यासाठीं फ्रान्स ही सृष्टिकर्त्यानें अेक मोठी प्रयोगशाळाच अुघडलेली आहे कीं काय असा भास होअूं लागतो. अप्रतिहत राजसत्ता, नियमित राजसत्ता, अराजकता, लोकनियुक्त राजसत्ता, लोकप्रतिनिधिता, संयुक्त लोकसत्ता, अशा परंपरेनें शक्य तेवढ्या निरनिराळ्या राज्यरचना योजित योजित हल्लीं फ्रान्सनें लोकसत्ता पसंत केलेली आहे. फ्रान्समध्यें गेल्या दोनशें वर्षांत ह्या राज्यरचना अितक्या वेळां बदलल्या गेल्या आहेत कीं सरासरीनें दर दहा वर्षांनीं फ्रान्समध्यें अेक नवीन व घनघोर राज्यक्रांति होत होती; सुमारें पन्नास वर्षें जर कोणची राज्यरचना फ्रान्समध्यें अेकसारखी टिकली असेल तर ती हल्लीची लोकसत्ताच होय. अितक्या राज्यक्रांत्या झालेल्या असल्यामुळें राज्यक्रांतीच्या बहुतेक साधनांचा अुपयोग फ्रान्सनें केलेला आहे. त्यांतहि फ्रेंच लोकांचीं मनें निसर्गतःच अत्यंत सूक्ष्मचेतन व प्रतिकारमय असल्यानें त्यांच्या देशांतील कोणत्याहि चळवळींत अेकप्रकारचें अद्‌भुतत्व व मनोरमत्व दिसून येतें. त्यांच्या अितिहासांत क्रांतीच्या सर्व आयुधांचे विशिष्ट गुणधर्म अितक्या स्पष्ट रीतीनें दृग्गोचर झालेले आहेत व ते प्रयोग अितक्या कवित्वयुक्त भाषेंत लोककृतींनीं कालाच्या पुस्तकांत लिहिलेले आहेत कीं, राजकारणशास्त्राचा प्रयोगसुलभ व मनोरंजक ग्रंथ फ्रान्सच्या अितिहासाशिवाय अितरत्र आढळणें बरेंच दुर्मिळ आहेत.

अशा या प्रयोगशाळेंत राज्यक्रांतीचें नवीन साधन म्हणून सर्वत्र विकलें जाणारें Passive Resistance–अप्रत्यक्ष प्रतिकाराचें–जें तत्त्व, त्याचें रासायनिक पृथक्करण करणें सांप्रत अत्यंत अिष्ट आहे. अप्रत्यक्ष प्रतिकार हा बहुतेक देशांच्या कायदेशीरपणाच्या कक्षेंत आलेला असतो; म्हणजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अप्रत्यक्ष प्रतिकार करणें हा राजद्रोह होत नाहीं. ज्या सरकारविरुद्ध आपणांस जाणें असेल, त्या सरकारच्या हाताखालीं नोकरी न करणें, अितरांनीं नोकरी न करावी असा अुपदेश करणें, त्या सरकारच्या शाळांशीं, संस्थांशीं व न्यायसदनांशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध न ठेवणें, त्या सरकारला पैशांचें साह्य होअूं नये म्हणून त्याला कर्ज न देणें, त्यांच्या व्यांकांतून पैसे ठेवणें बंद करणें, फार काय, पण त्या सरकारला करहि न देणें हे सर्व अप्रत्यक्ष प्रतिकाराचे मार्ग आहेत. सरकारचा कायदा प्रत्यक्ष शस्त्र घेअून न मोडतां अप्रत्यक्ष रीतीनें तो निरुपयोगी करणें व तिकडे पूर्ण दुर्लक्ष करून त्या सरकारास पदोपदीं अडविणें, ही अप्रत्यक्ष प्रतिकाराची विधिनिषे त्मक व्याख्या होय. सरकारच्या राज्ययंत्रावर प्रत्यक्ष हल्ला न करतां त्याचें चालन न करण्याचा संप त्या यंत्रावरील मजुराकडून करविणें हा अप्रत्यक्ष प्रतिकार होय. मुंबअीच्या अेकाद्या गिरणीचा धनी आपलें म्हणणें अैकत नसला म्हणजे त्याला तसें करणें भाग पाडण्याकरितां त्याच्या गिरणींत कोणी कामच करूं नये म्हणून जसा मजूर लोकांचा संप होतो, तसाच सर्व लोकांचा संप करून सरकारचें राज्ययंत्र बंद पाडण्याचा जो प्रयत्न तो अप्रत्यक्ष प्रतिकार होय. अशा या अप्रत्यक्ष प्रतिकाराचा आश्रय धरून वाटेल त्या सरकारास ताळ्यावर आणतां येअील अशी हल्लीं बऱ्याच लोकांची कित्येक देशांमध्यें प्रवृत्ति होत चाललेली आहे. त्याचें असें म्हणणें असतें कीं जर आम्हीं सर्वांनीं सरकारची नोकरी सोडून दिली तर कर वसूल कोण करणार ? पोलीस कोण होणार ? आणि सरकारला शिपाअी कोठून मिळणार ? अशा अवस्थेंत सांपडलेलें सरकार अेका दिवसांत अेक नामशेष तरी झालें पाहिजे किंवा अेक शरण तरी आलें पाहिजे. शस्त्र हातीं न घेतां, रक्ताचा अेक थेंबहि न सांडतां फार काय परंतु राजद्रोहाची जोखीम अंगांवर न घेतां राज्यक्रांतीसारखें प्रचंड कृत्य करण्याचें अप्रत्यक्ष प्रतिकार हें अेक अभूतपूर्व साधन आपण शोधून काढलें आहे, असा ह्या विसाव्या शतकाला यथार्थ गर्व वाटत असे. तथापि या नवीन साधनांचा अुपयोग मात्र आजपर्यंत अगदीं बेमालुम रीतीनें कोणीहि केलेला नसल्यानें राज्यक्रांति करण्यास हें साधन किती अुपयोगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडेल याचा व्यावहारिक निकाल अजून लागलेला नव्हता.

परंतु अितर सर्व साधनांप्रमाणेंच राज्यक्रांतीच्या या नवीन साधनाचाहि प्रयोग फ्रान्समध्यें गेल्या पंधरवड्यांत करण्यांत आला. फ्रान्सच्या दक्षिणेकडच्या सर्व प्रांतांत दारूच्या मळेवाल्यांचा व फ्रान्सच्या सरकारचा कराच्या बाबतीवरून तंटा पडला, आपलें म्हणणें त्या हजारो शेतकरी लोकांनीं सरकारच्या कानावर टोलेजंग सभा भरवून व अर्ज करून घातलें. परंतु या अर्जाप्रमाणें वागण्याचें सामर्थ्य नसल्यानें वा अिच्छा नसल्यानें फ्रेंच सरकारकडून त्याचा समाधानकारक निकाल लागला नाहीं. दक्षिणेकडच्या फ्रेंच लोकांचा अुद्देश जरी राज्यक्रांति करण्याचा नव्हता, तथापि सरकारास आपलें म्हणणें अैकण्यास भाग पाडण्यासाठीं निर्वाणीचें शस्त्र अुपसावें असा त्यांनीं निश्चय केला व या कामीं कोणत्याहि जुन्या साधनांची योजना न करतां त्यांनीं नवीन प्रचलित होअूं पाहणाऱ्या अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब केला. कोणतीहि गोष्ट संघशक्तीनें कशी करावी ह्याचें फ्रेंच लोकांस बाळकडूच मिळालेलें असल्यामुळें व त्यांच्या प्रतिभामय व अुत्साही स्वभावामुळें गेल्या आठवड्यांत अभूतपूर्व, मनोहर व अत्यंत बोधप्रद अशा रीतीनें अप्रत्यक्ष प्रतिकाराचा प्रयोग फ्रान्सच्या रंगभूमीवर करून दाखविण्यांत आला. त्या प्रयोगांत अणुरेणूअितकी काटकसर किंवा हयगय झालेली नव्हती. नारबोने ह्या शहरीं प्रथमतः मुख्य पुढाऱ्यांची गांठ घेण्यास दक्षिण प्रांताचे लोक येअूं लागले. हजारों लोकांच्या हजारों मिरवणुकी निरनिराळ्या शहरांपासून निघून नारबोनेकडे वळल्या. त्या रात्रीं नारबोने शहरांत अितका अफाट समाज जमला होता कीं त्यांना निजावयास शहरांत जागा मिळेना. चर्चेस व सार्वजनिक स्थलें सर्व अुघडीं केलीं तरी लाखों शेतकरी बाहेर राहिले व मग रस्त्यांतून लोकांनीं निजण्यास आरंभ केला. रस्त्यांना जणूं काय मांणसांची फरसबंदी केलेली आहे अितकीं दाट माणसें, स्त्रिया, पुरुष, मुलें सर्व शहराच्या रस्त्यांत निजलीं. तरी समाज अजून अुरलेलाच होता. म्हणून शहराच्या नजीकच्या शिवारांत लोक शिरले ! पहांट होतांच तिथिनिश्चयाची सभा भरली व जमलेल्या कमिटीनें कोणत्या तिथीला सर्व दक्षिण प्रांतांत अप्रत्यक्ष प्रतिकाराला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अेकदम आरंभ करावयाचा हें सर्वत्रांस कळविलें. या वेळेस कोठेंहि बेकायदेशीर वर्तन घडलें नाहीं. अखेर संकेत-समय आला व अप्रत्यक्ष प्रतिकाराला आरंभ झाला. परंतु तो अितर देशांत जसा झाला असता तसा नव्हे. फ्रान्समध्यें सर्व चळवळींना चालन जसें कवित्वपूर्ण व अद्भुततेनें देण्यांत येतें तसेंच येथेंहि घडलें. ठरलेल्या वेळेला नारबोने येथील चर्चेसमधील घंटा वाजूं लागल्या व लगेच दक्षिणेंतल्या शेंकडों शहरीं व खेडेगांवीं अप्रत्यक्ष प्रतिकार सुरूं झाला ! हजारों कार-कुनांनीं नोकऱ्या सोडल्या, मुलांनीं शाळा सोडल्या, शहरांतील म्युनिसिपालिटचा मोकळ्या झाल्या. सर्व दक्षिणेंतील शहरांच्या मुख्य मेंबरांनीं त्या ठरलेल्या तासाला राजिनाम्याच्या तारा पॅरिसला धाडल्या व खुद्द पॅरिसच्या लोक-सभेंतील दक्षिणेकडचे सभासद सभा सोडून चालते झाले ! सरकारी बिल्ले व पट्टे व अधिकार दंड हजारांनीं व लाखांनीं झुगारून देण्यांत आले व अशा रीतीनें अेका तासांत फ्रान्सच्या दक्षिणेकडील विस्तीर्ण प्रांतांत राज्यरचना नामशेष झाली ! पोलीस अुरले नाहींत. सैन्यानें गोळ्या घालण्याचें नाकारलें! ह्याहून प्रत्यक्ष प्रतिकाराची अशी चांगली रचना करणें हें अगदीं अशक्य आहे. राजकारणशास्त्रांतील अितर गोष्टींप्रमाणेंच अप्रत्यक्ष प्रतिकार किती पूर्ण रीतीनें व कशा कौशल्यानें करावा हें सर्व जगास फ्रान्सनेंच शिकविलें ! अप्रत्यक्ष प्रतिकाराचा हा पूर्ण विजय होय !

परंतु फ्रान्समध्यें अप्रत्यक्ष प्रतिकार काय करूं शकतो हें जसें त्या लोकांनीं सप्रयोग सिद्ध करून दाखविलें त्याचप्रमाणें तो काय करूं शकत नाहीं हेंहि गेल्या आठवड्यांत तेथेंच सिद्ध झालें. मानवी मनाच्या हल्लींच्या स्थितींत अप्रत्यक्ष प्रतिकारानें सर्व निकाल लागणें दुर्घट आहे, त्या मताला सत्याचा तत्त्वापेक्षां अजून बळाच्या सामर्थ्यानेंच सर्व गोष्टींचा निकाल लावण्याची कशी चटक लागलेली आहे व म्हणून सामर्थ्याच्या—शरीरसाम-र्थ्याच्या—लष्करी सामर्थ्याच्या—अभावीं अप्रत्यक्ष प्रतिकार कसा लंगडा पडतो हें फ्रान्समध्यें फार चांगल्या रीतीनें सिद्ध झालेलें आहे. अप्रत्यक्ष प्रतिकारानें सर्व काम होअील असें वाटणाऱ्या पुढाऱ्यांना दुसऱ्या प्रांतांतून आणलेल्या लोकां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडून पकडण्यांत आलें. सर्व दक्षिणभर शिपायांचा गराडा पडला, लष्करी कायदा सुरू झाला, वक्तृत्व व सभा बंद पडल्या व लोकांना नुसत्या धाकदपटशानें सरकार गांगरेल ही जी आशा होती ती नष्ट झाली ! अर्थात् लोकांनींहि शस्त्रें अुपसलीं, आपल्या अप्रत्यक्ष प्रतिकाराचा त्याग करून प्रत्यक्ष प्रतिकाराकडे ते वळले व आतां दोन हात होअून शेवटचा काय निकाल लागतो हें कळणें हें त्या अुभयतांच्या हातांतील जोरावर अवलंबून राहणार ! म्हणजे अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या मागें लष्करी सामर्थ्य असलें तरच तो विजयी होतो, नाहींतर त्याचाहि—त्या अप्रत्यक्ष प्रतिकाराचाहि—दुर्बलत्वानें पराजय होतो हें सप्रयोग सिद्ध केलें गेलें !

सरळ विचारपद्धतीनेंहि हेंच सिद्ध होतें. अप्रत्यक्ष प्रतिकारांत अेकूण अेक मनुष्य अत्यंत अुदात्त होअील असें गृहींत धरलेलें असतें. सर्वजण सरकारी नोकऱ्या सोडतील हा त्याचा मूळारंभ असतो. परंतु दारिद्र्यानें निष्कांचन झालेल्या लोकांत अिच्छा असली तरीहि अितकी अुच्चस्वार्थपरावृत्ति तोलून धरण्याची शक्ति नसते. दुसरी गोष्ट अशी कीं, अप्रत्यक्ष प्रतिकारांत विरुद्ध पक्षहि अत्यंत अुदात्त आहे, ठरविलेले कायदे तो कधीं मोडणार नाहीं व नवीन जुलमी कायदे तो कधीं करणार नाहीं, असें गृहीत धरून चालण्यास आरंभ होतो. परंतु ही गोष्ट सर्वस्वी अशक्य आहे. जो लोकसंमतीच्या विरुद्ध जाण्याअितका नीच असतो तो वेळेवर नवीन कायदे करून वा जुने अुकरून काढून ती लोकसंमती व तिचा अप्रत्यक्ष प्रतिकार बळानें दाबून टाकण्याअितका क्रूरहि असतो. अिंग्लंडमध्यें कांहीं स्त्रियांनीं आम्हीं कर देत नाहीं असें म्हणतांच सरकारनें त्यांस अुचलून तुरुंगांत फेकलें! तरी अिंग्रजी बायका व अिंग्रजी पुरुष यांचा हा आपला आपसाआपसांतील प्रेमकलह आहे ! संप करून खाजगी गिरण्यांच्या मालकांनाहि ताळ्यावर आणणें मजुरांना कठीण जातें ! मग ज्या सरकारला पैशाचें, सैन्याचें व शस्त्रास्त्राचें सबलत्व आहे तें सरकार नुसत्या रडक्या प्रतिकाराला भीक कधींहि घालणार नाहीं.

ह्या फ्रान्समधल्या प्रकरणावरून जगानें जो बोध घ्यावयाचा तोच आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुराणांतील अेका कथेंतहि फार मार्मिक रीतीनें दिलेला आहे. वसिष्ठाची कामधेनु ही विश्वामित्र मागूं लागला. वसिष्ठऋषीनें ती न देण्याबद्दल शक्य ते आढेवेढे घेतले. त्यानंतरहि जेव्हां विश्वामित्र अैकेना, तेव्हां मग वसिष्ठानें अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या तत्वाप्रमाणें निदान त्याला साहाय्य तरी करावयाचें नाहीं असा निश्चय केला. 'मी तरी माझ्या कामधेनूला जावयाला सांगत नाहीं, मी तिला सोडणार नाहीं, मी ती नेण्याच्या कामीं तुला कोणतेंहि साहृय देणार नाहीं,' अितकें सांगून तो तपोधन-मुनि स्वस्थ अुभा राहिला. परंतु विश्वामित्रानें ती कामधेनु सोडण्यासाठीं स्वतःच्या सैनिकांस आज्ञा दिली. त्या वेळीं 'दण्डें ताडूनि नेतां फोडी ती धेनु फार हंबरडे। तेव्हां आश्रमवासी द्विज, मृग, खग देवता कदंव रडे.' परंतु या देवतादिकांच्या रडक्या प्रतिकारानें काम भागेना ! अखेर "धेनुमिषें त्या मुनीची सुतपस्यासिद्धी" जेव्हां कोपली व त्या कामधेनूच्या अंगांत दबून वसलेल्या हजारों क्षत्रियांनीं जेव्हा तरवारीवर तरवारी आदळल्या, तेव्हांच मात्र वसिष्ठांची कामधेनु वसिष्ठांना परत मिळाली !

लंडनमधील पहिला श्रीशिवोत्सव

(ता. २९ मे १९०८) लंडन

मनुष्यें मरतात पण त्यांचीं सत्कृत्यें जिवंत राहतात सत्कृत्यें या मर्त्य जगांत अमरत्व देणारीं अपूर्व रसायनें आहेत. त्या सत्कृत्यांतलें लवमात्र ग्रहणहि आत्म्याचें अमरत्व सिद्ध करतें. मग ज्यानें सत्कृत्यांच्या अुत्कर्षस्थानीं बसणाऱ्या स्वदेशस्वातंत्र्याचें प्रस्थापन केलें त्या महात्मा शिवभूपाचें नांव प्रत्येक येणाऱ्या वर्षी अमरत्वाचे नवीन ताम्रपट मिळवीत आहे ह्यांत काय नवल असणार ? शिवनेरीच्या डोंगरांत १६२७ त जन्मलेलें बालक १९०८ सालीं जिवंत आहे, तारुण्यभरांत आहे, दिग्विजयां दंग आहे, दरसाल नवीन समुद्र पादाक्रांत करीत आहे, नवीन किनारे गांठीत आहे, नवीन भाषांना माहीत आहे, व नवीन कंठांतून, हृदयांतून, वाङ्मयांतून त्याचीं सिंहासनें व त्यांचे जयजयकार दुमदुमत चालले आहेत ! मृत्यूचा पाश कोणाला तोडावयाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे काय ? काळाअितकेंच अमर्यादित अमरत्व कोणास पाहिजे आहे काय ? असेल तर अेक अुपाय म्हणजे स्वदेश स्वातंत्र्याच्या रणांगणांत त्यानें हरहर म्हणावा ! कधींहि मरण न येण्याचें अेक साधन म्हणजे स्वदेश-स्वातंत्र्यास्तव तत्काल मरण हा होय !

असा न मरण्यासाठीं जो मेला त्या शिवभूपाच्या जयजयकारानें लंडननगर गेल्या आठवड्यांत प्रथम निनादन पावलें. येथील फ्री अिंडिया सोसायटी द्वारा गेल्या शनवारीं श्रीशिवरायाचा जन्मोत्सव करण्यांत आला. त्याच्या अुच्चासनस्थित मूर्तिपुढें व त्याच्या स्वतंत्र निशाणाखालीं मद्रास, बंगाल, मुंबअी, पंजाब असे सर्व दिशांचे व हिंदु, मुसलमान, पारशी, यहुदी असे सर्व धर्मांचे हिंदी लोक शिवभूपाची पूजा बांधीत होते. असले अुत्सव व असले प्रसंग म्हणजे कित्येकांनीं अशक्य म्हटलेल्या हिंदी राष्ट्रैक्याची मूर्त शक्यता होत. दे. आयर, बी. अे., यांनीं शिवाजीच्या चरित्राचें तात्त्विक स्वरूप सांगतांना म्हटलें कीं, शिवाजीसारख्या विभूतींचे जन्म म्हणजे आमची आर्यजाति अजून वेदकालाअितकीच व जरूर तर त्याहून जास्तहि चैतन्यानें युक्त आहे असें प्रथित करणारी गर्जना होय. जो शिवाजी त्यावेळेस मुसलमानांविरुद्ध लढला तोच शिवाजी न्यायी मुसलमानांच्या वतीनें लढला असता. कारण शिवाजीचें लढणें हें विशिष्ट जातीविरुद्ध नसून अन्यायाविरुद्ध आहे. तें दास्याविरुद्ध आहे, तें गुलामगिरीविरुद्ध आहे. ज्या मराठी भात्यांतून हा बाण निघाला त्याच मराठी भात्यांतून आणखी असले बाण कधीं निघतील म्हणून आम्हीं सर्व हिंदुस्थानवासी शिवाजीच्या महाराष्ट्रभूमीकडे अपेक्षाविव्हलतेनें पाहत आहोंत. दे. आयरप्रमाणेंच दे. येरुलकर (यहुदी), दे. मास्तर (पारशी) अित्यादि गृहस्थांनींहि वक्तृत्वपूर्ण स्तुतीनें श्रीशिवरायाचा सत्कार केला. शेवटीं दे. सावरकर यांचें अध्यक्षाच्या नात्यानें जवळजवळ अेक तासभर आवेशयुक्त भाषण झाल्यावर शिवभूपाच्या स्वातंत्र्याच्या जयजयकारांत मंडळी परत फिरली. या अुत्सवाचें श्रेय दे. देशमुख, दे. रत्नभू (मद्रास) अित्यादि गृहस्थांकडे आहे.

श्रीशिवाजीच्या जयजयकारानें हिंदुस्थानवासियांचीं अंतःकरणें अभि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानानें स्फुरण पावत असतांनाच हल्लीं अिंग्लंडच्या रंगभूमीवर चाललेल्या 'बंडाच्या नाटका 'नें त्यांच्या हृदयाला संतापाचे चटके बसत आहेत. १८५७ च्या बंडाला ५० वर्षें नुकतींच झाल्यामुळें अिंग्लंडमध्ये त्याचें स्मरण विशेषच जोरानें अिंग्लिश लोकांच्या झोंपा मोडीत आहे. लॉर्ड रॉबर्टसनें अिंग्लिश व्हेटरन्सकरितां काढलेला फंड हिंदुस्थानानें अैकलाच असेल. त्या फंडाच्या जागृतीचा परिणाम हल्लीं अिंग्लंडमधल्या कित्येक रंगभूमीवरहि दिसू लागला आहे. ५७ चें बंड म्हणून अेक नाटक कित्येक रंगभूमीवर हल्लीं होत असतें. त्यांत प्रथम बंडाच्या गुप्त सभा दाखविण्यांत येतात. फिरंग्यांना हिंदुस्थानांतून हुसकून द्या म्हणून अुपदेश होअून बंडास प्रारंभ होतांच बहादुरशहा येतो व हिंदुस्थानचा मुकुट सर्व बंडवाले त्याच्या मस्तकावर ठेवतात. हा प्रकार चालला असतां सर्व अिंग्रजी प्रेक्षक धिक्काराच्या आरोळ्या ठोकतात. पुढें कानपूरची कत्तल होते. बंडवाले 'फिरंगी फिरंगी ' असें म्हणत नाशाचा जबडा अुघडतात. नंतर हिंदुस्थानचें स्वतंत्र निशाण फडकावीत बंडवाले मिरवणुकी काढतात. हें पाहतांच अिंग्रजी प्रेक्षक संतापाच्या आरोळ्या ठोकूं लागतात. शेवटीं बऱ्याच लढाया होअून बंडवाल्यांना तोफेच्या तोंडीं देण्यांत येतें व त्यांचे हालहाल करण्यांत येतात तेव्हां अिंग्लिश थिअेटरें टाळ्यांच्या गजरानें दणाणून जातात !

या 'बंडाच्या नाटका ' नें अिंग्रजांच्या मनोवृत्ति संतोष पावत आहेत, परंतु या योगानें सत्तावनचें बंड म्हणजे काय होतें हें जाणण्याची हिंदी लोकांची अुत्कंठाहि जास्तच वाढत आहे. तिचें फल पुढील आठवड्यांत होणाऱ्या सत्तावनच्या जन्मतिथीच्या अुत्सवांत दिसून येअील. ता. १० मे ला सत्तावनचा टोलेजंग अुत्सव करण्यासाठीं लंडनमध्यें हिंदी लोकांची सिद्धता चाललेली आहे व तिचा वृत्तान्त पुढील बातमीपत्रांत वाचकांस कळविण्यांतहि येअील. सदर अुत्सवाची आमंत्रणपत्रिका व कार्यक्रमपत्रिका पुढें दिल्याप्रमाणें आहे:—

Bande Mataram

☆

To Commemorate

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

The Anniversary of the
INDIAN NATIONAL RISING OF
1857

A

Meeting of Indians in England
Will be held at India House, 65 Cromwell
Avenue, Highgate N.
on
Sunday, the 10th of May, 1908, at
4 p. m.

You and all your Indian friends are cordially invited
to be present

☆

PROGRAMME

1 National Songs
2 National Prayer
3 Tributes to the sacred memory of,
Emperor Bahadur Shaha
Shrimant Nanasaheb
Rani Lakshmibai
Maolavi Ahmad Shah
Raja Kuvar Sinh
And other martyrs
4 Declaration of Self-denial
5 President's speech
6 Distribution of Prasad
7 National Songs

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचा जंगी अुत्सव

(ता. ५ जून १९०८) लंडन

गेल्या आठवड्यांत अिंग्लंडमध्यें राहत असलेल्या हिंदी जनसमूहांत आजपर्यंत केव्हांहि अनुभवास न आलेली विलक्षण चळवळ अुडालेली होती. सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराची जन्मतिथि जसजशी जवळजवळ येअूं लागली तसतशी हिंदी लोकांमध्यें तो जन्मोत्सव अपूर्व थाटानें साजरा करण्याची स्फूर्ति अधिकाधिक स्फुरण पावूं लागली. मे महिन्याला आरंभ होतांच प्रत्येक गल्लीं-गल्लींतून हिंदी लोकांच्या टोळ्या जमवून, त्यांना जन्मोत्सवाचें महत्त्व, तत्प्रीत्यर्थ केला जाणारा स्वार्थत्यागाचा तपस्यामास, त्या समारंभाचा अेकंदर कार्यक्रम, सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचें खरें स्वरूप अित्यादि गोष्टी विवरण करून सांगण्यासाठीं प्रत्यहीं लहान लहान सभा भरत होत्या व त्यांतून अुत्साही देशसेवक अुपदेश देत हिंडत होते. या त्यांच्या विवरणाचे व ह्या प्रत्यहीं चालू असणाऱ्या गल्ल्यागल्ल्यांमधील छोटेखानी सभांचें ओघ अेकत्र होत होत अखेर ता. १० मेच्या पुण्यदिवशीं त्यांचा प्रचंड व अेकत्रित ओघ अिंडिया हाअूसकडे लोटूं लागला. कारण अिंडिया हाअूसच्या हॉलमध्येच १० मे ची **टॉलेजंग सभा** भरण्याचें ठरलें होतें. अिंडिया हाअूसचा हॉल या कार्याकरितां फारच सुंदर रीतीनें शृंगारलेला होता. श्रोतृसमाजाच्या समोरील बाजूला अेक भव्य रक्तवस्त्र लावलेलें असून त्यावर पुष्पमालांच्या पंक्ति गुंफलेल्या होत्या व त्या नानाविध रंगांच्या पुष्पमंडपांत अर्धाफूट जाडीच्या अक्षरांनीं सोनेरी, हिरव्या, श्वेत व गुलाबी रंगांत राजा बहादुरशाह, श्रीमंत नानासाहेब, राणी लक्ष्मीबाअी. मौलवी अहमदशाह, राजा कुवारसिंह व १८५७ सालीं झुंजलेले आणखी कांहीं योद्धे या सर्वांचीं नांवें अभिनंदनार्थ स्मरण म्हणून कोरून लिहिण्यांत आलेलीं होतीं. या भव्य स्मृतिपटाच्या भोंवतीं निरनिराळ्या देशभक्तांच्या तसबिरीहि लावलेल्या असून, त्या हॉलमध्यें मनोहर पुष्पांच्या लहान झाडांच्या कुंड्या सर्वत्र खुल्या ठेवलेल्या होत्या. अुदबत्त्यांच्या सुवासाचा अेकच दाट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिमल येअून, पेटीच्या सुस्वर स्वरांनीं व दे. वर्मा यांच्या राष्ट्रगीत–गायनानें सर्वत्र अुदात्त स्फूर्तीचा संचार झाला होता. वंदेमातरम्च्या घोषानें तो सर्व रस्ता दुमदुमून गेलेला असतांना सभेंत दुपारीं ४।। वाजतां अध्यक्षांची स्वारी निवडक मंडळींसह प्रवेश करती झाली. अध्यक्षांची स्वारी म्हणजे दुसरी कोणी नसून पॅरिसचे प्रसिद्ध देशभक्त राणासाहेब हेच होत. हें पॅरिसहून मुद्दाम या समारंभासाठीं आलेले होते. त्यांच्याबरोबर पॅरिसहून दुसरी मंडळीहि आलेली असून त्यांच्या आगमनानें समारंभास विशेष शोभा आलेली होती. प्रख्यात देशभक्त विदुषी मिसेस कामा यांचें अेक स्फूर्तिदायक पत्रहि अध्यक्षांबरोबर आलेलें होतें. प्रथमतः राष्ट्रीय गीतें झाल्यावर देशभक्त आयर, बी. अे., यांनीं राष्ट्रीय प्रार्थना केली. याच सुमारास लोकांची अितकी दाटी झाली कीं, हॉलच्या बाहेर रस्त्यांपर्यंत लोकांना अुभें राहणें भाग पडलें. केंब्रिज, ऑक्सफर्ड, सारेन्सेस्टर, रेडिंग असल्या दूरच्या ठिकाणांहूनहि हिंदी लोक हा सभेला लोटले होते. त्यांतहि देशभक्त हिंदी स्त्रीजनांच्या आपल्या आगमनानें व राष्ट्रगीत गायनानें सर्वांस अुत्साह आणून दिलेला होता. राष्ट्रप्रार्थना झाल्यावर राजा बहादुरशाह व श्रीमंत नानासाहेब यांचा स्मृतिगौरव करण्यासाठीं दे. सावरकर सत्तावनच्या क्रांतीच्या अितिहास-स्वरूपसंबोधनपर भाषण केल्यानंतर वंदेमातरम्च्या घोषांत सर्व सभा अुभी राहून त्या अुभयवीरांच्या नांवांचा त्रिवार जयघोष करण्यांत आला. दे. खान यांनीं राजा कुवारसिंह यांचा स्मृतिगौरव केला. दे. दास, बी. अे., यांनीं राणी लक्ष्मीबाअींचा व मास्तर (पारशी) व दे. येगलकर (यहुदी) व अितर वक्ते ह्यांनीं अितर देशवीरांचा स्मृतिगौरव केल्यानंतर अध्यक्षांचें अुत्साहक भाषण झालें व त्या भाषणांच्या शेवटीं स्वार्थत्यागाच्या शपथा घेण्यांत आल्या. जेव्हां डॉक्टर, प्लीडर बॅरिस्टर, अेडिटर, युनिव्हर्सिटी–पदवीधर, व्यापारी, मोतीवाले, तरुण व वृद्ध, स्त्रिया व पुरुष अेकामागून अेक या स्वार्थत्यागी मासांत कडक तपस्या करण्याच्या प्रतिज्ञा करूं लागले, तेव्हांचा अुत्साह अवर्णनीय आहे. सर्वजणांच्या हृदयावर ह्या तपस्यामासाकरितां मुद्दाम तयार केलेल्या वीरस्मृतिमुद्रा झळकत होत्या. कोणीं महिनाभर अुपास करण्याच्या शपथा घेतल्या,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणीं मद्यपान सोडलें आणि कोणीं धूम्रपान सोडलें; महिनाभर थिअेटर-मध्ये जाणें नाहीं, कोणतेंहि चैनीचें कृत्य करणें नाहीं व या रीतीनें जे जे पैसे वांचतील ते ते सत्तावनच्या देशवीरांसाठीं अुभारलेल्या कोशांत देअून टाकावयाचे! या फंडाच्या वसुलीसाठीं पदवीधरांनीं भिक्षेच्या शपथा घेतल्या व मुद्दाम केलेल्या झोळ्या घेअून हे राष्ट्रीय भिक्षेकरी आज सर्व आठवडा-भर घरोघर भिक्षा मागत हिंडत आहेत व या योगानें सर्वत्र राजकीय चर्चेचीं पारायणें अिंग्लंडमध्ये प्रत्येक हिंदी घरीं चाललेलीं आहेत. फंडास मिसेस कामानें पंचाहत्तर रुपये धाडले तें प्रसिद्ध करण्यांत आलें. दे. राजा-जीनेंहि आपलें मे महिन्याचें सर्व अुत्पन्न देशवीरांस अर्पण केलें. हे व अितर स्वार्थत्यागविधि झाल्यावर पुनः मिसेस दत्त या देशभक्त विदुषीनें राष्ट्रगीतें गायलीं. प्रसादासाठीं बनविलेल्या चपात्या वांटण्यांत आल्या व वंदे-मातरम्च्या जयघोषांत व देशवीरांच्या स्मृतिघोषांत ती अभूतपूर्व सभा विस-र्जन पावली. अितका हिंदी समाज व अितका अमर्याद अुत्साह या लंडन शहरीं पाहिल्याचें कोणासहि आठवत नाहीं! चपात्याच प्रसादासाठीं अशाकरिता वांटल्या कीं सत्तावनाच्या क्रांतियुद्धांच्या आधी अशाच ' चपात्या ' देशभर गुप्तरूपानें वांटल्या गेल्या होत्या!

* * *

जहालांचा निःपात करा!

(ता. ९ अेप्रिल १९०९) ता. १९ मार्च, लंडन

'Crush the extremists; rally round the moderates.'– ' जहालांचा निःपात करा व मवाळांशीं मिळतें घ्या '– या सूत्राचा अवलंब केल्यानें हिंदुस्थानांतील आपली सत्ता पुन्हां सबल व सतेज होअील असा ब्रिटिश लोकांना स्वतः लॉर्ड मोर्ले यांच्याकडून अुपदेश देण्यांत आला व या रामबाण औषधाचा प्रयोग करण्यास निरंकुशत्वानें आरंभ केला.

परंतु मवाळांना मिळतें घेणें कितीहि सुलभ जात असलें तरी जहालांचा निःपात करणें हें तितकें कांहीं सुलभ नाहीं. निःपात कसा करणार? मायावी थापांनीं? तो काळ आतां निघून गेला आहे! तुरुंगानें? ' बंदी नसे त्यांतील कोण बोला। जो लोक दैवें परदास केला॥ तो बंदि तद्भूहि तुरुंगशाळा॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारागृहाचें भय काय त्याला ? '॥ हद्दपारीनें ? सक्तमजुरीनें ? फांसानें ? बंदुकीनें ?—कशानें त्यांचा निःपात करणार ? प्रल्हादाचें हरि-नाम व गोकुळचा गोविंद–त्यांच्या निःपातासाठीं जें शस्त्र अुपसलें जाअील त्या शस्त्राचाच निःपात होत असे ! ! सुप्त क्रांतीचीं हीं बीजें वेगानें फोफावत अुत्पतन पावत असतांना त्यांचा निःपात आतां कोण करूं शकणार ? कसा करूं शकणार ! !

आणि निःपात करण्याचा निश्चय करून जरी कोणी सज्ज झाला तरी ज्याचा निःपात करणें आहे तो जहाल ओळखणेंहि कांहीं सुगम नाहीं. कोण जहाल ठरवितां येअील ? आतां पांचसहा वर्षांपूर्वीं दे. गोखले जहाल होते. व तीन चार वर्षांपूर्वीं सुरेंद्रबाबू जहाल होते; परंतु त्यांच्या निःपक्षापाताची जर कोणाला आतां जास्त भीति वाटत असेल तर ती खरी सरकारलाच होय ! त्यांना हद्दपारी न व्हावी म्हणून लोकपक्षापेक्षां अिंग्रजच देवाची व सरकारची जास्त प्रार्थना करीत आहेत. काल मारक्या वाटणाऱ्या या गाअी आज अितक्या ज्या निरुपद्रवी वाटूं लागल्या आहेत त्या त्यांच्यामध्यें कांहीं फेर-फार झाल्यामुळें नव्हे तर गाअीहून जास्त भयंकर प्राणी क्षितिजावर येअूं लागल्यामुळें होय व म्हणूनच १–१॥ वर्षांपूर्वीं बिपिनचंद्र पाल म्हणजे अेक जहालांचे अग्रणी समजले गेले व आतां मात्र खरा जहाल हातीं लागला असें वाटून सरकार त्याचा निःपात करण्यास सोटा अुगारूं लागलें तोंच पंडित शामजींची डरकाळी अैकूं आली. पण महाबलाढ्य वाटणारा बिपिनचंद्र पालच आज सरकारला अेक साधारण कायदेशीर, फक्त जरा जास्त कुरकुऱ्या स्वभावाचा नेमस्त बाबू आहे असें वाटूं लागलें. तेव्हां दिवसेंदिवस जहालांचा निःपात करणें हें जितकें कठीण होत आहे तितकाच खरा जहाल कोण हें ओळखणेंहि अशक्य होत चाललेलें आहे.

प्रयत्नाअंतीं आपल्यास यश येअील असें जाणून या दुर्घट कार्याला सर-कारनें हात घातला. हिंदुस्थानांत अेकीकडे चाबकाचे मार देत दुसरीकडे ममताळू कुरवाळणें सुरू झालें व जी मात्रा हिंदुस्थानांत लागूं पडेल असें वाटतें तीच अिंग्लंडमधल्या या दोन वर्षांत फारच अुन्मत्त होत चाललेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदी विद्यार्थ्यांनाहि देण्यांत आली. पार्लमेंटमध्यें सुधारणा देण्याविषयीं रोज रात्रीं वाद चालू आहे; हिंदुस्थानच्या अितिहासांतहि अत्यंत प्रागतिक वस्तु-क्रांति-घडवून आणण्याची दवंडी पिटविली जात आहे व त्या योगानें नेमस्त पक्षाला — परंतु लंडनमध्यें या पक्षाचें नांवहि अुरलेलें नाहीं म्हणा — मिळवून घेण्याचा ज्या समयीं दिमाख दाखविला जात आहे त्या समयीं लंडनमधल्या अेकूण अेक विद्यार्थ्यांवर अपमानास्पद आरोप सुरू आहेत. अिंडिया हाअूसवर रात्रंदिवस सक्त पहारा बसला आहे. पंडित शामजींच्या नांवानें सर्वत्र खडे फुटत आहेत. बिपिनचंद्र पाल व अितर गृहस्थ यांच्या पायांत डिटेक्टिव्हांची मांदी लुडबुडत चालली आहे ! परंतु या सर्व द्वेषाचा व संशयाचा परिणाम काय झाला ? अेका गुप्त पोलिसाला विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, ह्या धास्तीनें हिंदी विद्यार्थी भिअून राजकारण सोडतील अशी सरकारची अटकळ आहे. या अटकळीचें प्रत्यंतर हेंच मिळालें कीं अिंडिया हाअूसमधल्या सभांना कधींहि लोटत नसे अितकी गर्दी आतां दर रविवारीं लोटत आहे ! पंडित शामजींची ऑक्सफर्डमधील हर्बर्ट स्पेन्सरची देणगी त्या युनिव्हर्सिटीनें झिडकारून परत करावी म्हणून युनिव्हर्सिटींत चळवळ होतांच लंडनमध्यें भर सभेंत पंडितजींच्या देशभक्तीचा गौरव करून अभिनंदनपर ठराव त्यांना धाडण्यांत आला. लंडनमध्यें या सरकारी निःपातमोहिमेला लोक किती दबले आहेत हें समजण्यास अेकच गोष्ट सांगणें बस्स होअील कीं हिंदुस्थानांत सुरेंद्र हे जसे सरकारला नेमस्त वाटले तसें लंडनमध्यें सरकारला —— कृपेला पात्र नसला तरी —— भीतीला आपला पुरुष म्हटला म्हणजे बिपिनचंद्र पाल हे होत ! लंडनमध्यें बिपिनबाबू नेमस्त आहेत असें अिंग्लिश पत्रें अुघड म्हणतात अितकी लंडनची व अिंग्लंडची हिंदी वसाहत सरकारच्या निःपातमोहिमेला भ्यायली ! ! !

अर्थातच अिंग्लंडचीं सर्व पत्रें चिडून गेलीं. पंडित शामजींनीं देशवीरांचें स्मारक अुभारावें व ‘ दे. खुदीराम बोस, कन्हय्यालाल वगैरे तरुणांना देशवीरत्वाचा मान मिळणें योग्य आहे, ’ हे राजद्रोही ‘ अिंडियन सोशिया-

(सा...५)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लॉजिस्ट ' पत्रांत प्रसिद्ध केल्यापासून त्यांच्यावर शिव्याशापांचा वर्षाव सुरू झाला. बिपिनचंद्रानेंहि या कागदी लढाअींत अेक फैर झाडून दिली. अिव्हिनिंग स्टँडर्ड या दैनिक पत्रानें विद्यार्थ्यांवर हल्ला करण्याचें पत्करलें व Seditious Students, Rebellious Indians " वगैरे मथळ्यांखालीं प्रथम आडून गोळीबार सुरू केले. शेवटीं आडपडदा सोडून दे. सावरकर यांच्यावर अुघड रीतीनें दोषारोप करण्यास त्यानें आरंभ केला. सर्व विद्यार्थ्यांना बेबंद करण्यास प्रवृत्त करणारे हेच गृहस्थ होत असा त्याचा अजमास आहे ! या निरर्गल लेखाला दे. सावरकर यांच्या अेका स्नेह्यानें कडक व धमकावणीचें अुत्तर धाडतांचस्टँडर्डचे संपादक जरा स्वस्थ बसले व अेक दिवस सर्वांना आश्चर्यचकित करून टाकणारा देखावा घडून आला तो असा:–

ह्या दैनिक स्टँडर्डचे प्रतिनिधि दे. सावरकर ह्यांना भेटावयास आले ! पंधरा दिवस अद्वातद्वा ज्यानें टीका केली त्यांनीं ही भेटीची तसदी आधींच घेतली असती तर कांहीं बिघडलें नसतें ! तथापि त्या प्रतिनिधींची दे. सावरकरांनीं मन:पूर्वक भेट घेतली; खुद्द अेडिटर म्हणतात :— " Presently a spectacled Indian, with youth and intelligence stamped upon his greetings. It was Mr. V. D. Savarkar. " अिंडियन राजकारण, अिंडिया हाअूस, हिंदी विद्यार्थी व अितर चळवळी वगैरे विषयांवर तासभर संवाद झाला व ती हकीकत—कांहीं खरी कांहीं खोटी—दुसऱ्या दिवशीं स्टँडर्डमध्यें प्रसिद्ध झाली. तथापि अितर पत्रांनीं शिवीगाळी अजून चालविली आहे. त्यांतल्या त्यांत ' Sunday Chronicle ' या पत्राच्या बातमीदारानें जराशी वस्तुस्थितीस धरून हकीकत दिलेली असल्यानें त्याचे अेक-दोन अुतारे दिल्यास खरी स्थिति थोडीबहुत अुघडकीस येअील.

Sunday Chronicle चा बातमीदार अिंडिया-हाअूसमध्यें दे. सावरकरांच्या भेटीला आला. इंडिया हाऊसवर अितर पत्रकार जे आरोप करतात त्याप्रमाणें तेथें भयंकर असें कांहीं अेक दिसलें नाहीं असें स्पष्ट म्हणून लेखक Cambel Green म्हणतो ' It mny be that any eyesight is not

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

good ! It is a house of mystery. Mr. Shyamji Krishnavarma works for the independence of India. If he does not approve the assassinations of British officials who accidently or incidently suffer thereby he excuses them. He has offered five thousand Rupees towards a fund of Indian Martyrs Memorial for the men hanged in Bengal ! Anyhow the shadow of Krishnavarma is on India House. That is to be fair and to say the least. Now what is the answer ? I had an opportunity of a long friendly discussion with Mr. V. D. Savarker, who seems to be only the spokesman for the students but the spokesman for Mr. Shyamji Krishnavarma. He is a young Gray's inn Law Student, 23 years age at a guess. He has a clear olive complexion, clear, deep penetrating eyes, a width of jaw, such as I have seen in few men. His English is excellent. If I mistake not Mr. Savarkar will go far—— I hope he will go far in the right direction. अिंडिया हाअूससंबंधींचीं प्रश्नोत्तरें देतांना तो म्हणतो " मीं विचारल्यावरून ते म्हणाले कीं अिंडिया हाअूस हीं अेक विद्यार्थिनिवाससंस्था आहे. येथें येण्यास अमुकच राजकीय मतें लागतात असा बिलकूल नियम नाहीं. अेक जो नियम आहे तो अेवढाच कीं रहिवाश्यानें अेक पौन्ड द्यावे व राहणें-खाणें अुपभोगावें. कृष्णवर्मा घराच्या भानगडींत कधींच पडत नाहींत. होय, तेथें राजकीय विवाद होतात, पण तसें तुम्हीं खुद्द सरकारी निवासस्थान स्थापलें तरी तेथेंहि चालल्याशिवाय कधींहि राहणार नाहींत. राजकारण प्रस्तुत प्रसंगीं आमचा प्राण आहे. अिथें तुम्हीं म्हणतां तसें म्हणणारी व ब्रिटिशांचे राज्य कल्याणकारक आहे असें म्हणणारी मंडळीहि येतात. वादविवाद चालतात. सत्य व कोटिक्रम ज्यांच्या बाजूला असतो त्यांचीं मतें पसार पावतात.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते लेखक म्हणतात–Let me state a fact before an impression. The. fact is Mr. V. D. Savarkar believes in India for the Indians, in the complete imancipation of India from the British rule. He says, India has nothing for what to thank the English, are less it be the denationalisation, as he calls it, of the Hindus." स्वतःचे विचार बरेच विस्तृत रीतीनें देऊन ते लेखक अेक गोष्ट वगळतात. असें म्हणतात कीं हे गृहस्थ रॅडिकल म्हणजे गोखल्यांच्या आशाकेंद्र लिबरलाहूनहि लिबरल आहेत, तरी त्यांनीं असें स्पष्ट कबूल केलें कीं हिंदुस्थानच्या पदरांत आम्हीं कितीहि सुधारणा टाकल्या तरी हिंदुस्थानवर ब्रिटिशांचें राज्य आम्ही तसूंहि न मागें फिरतां गाजविणार. तरवारीनें आम्हांस घालविल्याविना आम्ही जाणारे नाहीं व तरवार तुम्हांपाशी शिल्लक नाहीं. सबब अुभयहितासाठीं ब्रिटिश राज्यच हिंदुस्थानांत असणें अुत्कृष्ट आहे. अितर पुष्कळ संवाद झाला हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे कीं हे लेखक अितर पत्रकारांनीं केलेले आक्षेप यथातथा नसावे असें कबूल करतात. "Mr. Savarkar said, 'We do not mind detectives watching outside and following us, if the climate suits them !' That last is a quite English touch. It shows how the British hand has moulded the intellect of young India. It has even breathed into it the British Joke . . . . I have no evidence of fact which should justify me in traversing the statement of this nimble-minded young leader of India House."

डेलिमेल, मँचेस्टर डिस्पॅच वगैरे पत्रांनींहि सावरकरांच्या भेटी घेअून हकीगती दिलेल्या आहेत.

✠ ✠ ✠

सर कर्झन वायलीना ठार मारलें!!

(ता. ३० जुलै १९०९) लंडन

खुद्द लंडन शहरामध्यें, हिंदी अिंग्रजी डिटेक्टिव्हांची आज दीड महिना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येथील झाडून हिंदी लोकांवर सक्त पाळती असतांनाहि, सर कर्झन वायली-सारख्या अिंडिया ऑफिसच्या केवळ अत्यंत प्रमुखच नव्हे, नांवाजलेल्या अधिकाऱ्याचा खून झाल्याची वार्ता हिंदुस्थानांत विद्युन्मार्गानें येऊन आतां शिळीहि झाली असेल. सर कर्झन वायली हे अिंडिया ऑफिसचें मुख्य केंद्र असून येथील हिंदी विद्यार्थ्यांच्या सहवासासाठीं, ते त्यांना मदत करावी म्हणून, सरकारी धोरणाप्रमाणें सतत अविश्रांतपणें झटत असत. सेक्रेटरी ऑफ स्टेट हे प्रत्येक अुगवत्या मावळत्या प्रधान मंडळाबरोबर बदलतात परंतु हिंदुस्था-नच्या कारभाराचीं सारीं सूत्रें व खरी दिशा, अिंडिया ऑफिसमध्यें कायम असलेल्या अधिकाऱ्यांच्याच हातीं असतात. ह्या अधिकाऱ्यांत सर कर्झन वायली हे अप्रतिम चातुर्यसंपन्न असत. यांना माहित नाहीं असा हिंदी मनुष्य अिंग्लंडांत नसे. राजकारणांतील व व्यक्तिविषयक प्रत्येक बातमीची अित्थंभूत माहिती या पुरुषाजवळ ठेवलेली असे. फार काय, पण हिंदुस्थानच्या कारभाराचीं सूत्रें बाह्यतः हातीं असलेल्या सेक्रेटरी ऑफ स्टेटचे सर कर्झन वायली हे प्रत्यक्ष नयनच होते. हिंदुस्थानांतहि अिंग्रजी राज्याच्या अिमानी सेवेनें २० वर्षेपर्यंत यांनी नांवलौकिक संपादिला होता.

× × ×

लॉर्ड मोर्लेंहूनहि अँग्लोअिंडीयन लोकांत ज्यांची अुणीव जास्त भास-णारी आहे अशा या महापुरुषास भयंकर व निर्दयपणानें मारल्याचा आरोप ज्या तरुणावर आहे त्याचें नांव दे. मदनलाल धिंग्रा असें आहे. या तरुणाची चौकशी अजून चाललेली आहे. दे. धिंग्रा यांच्या पूर्ववृत्तांतांतील कांहीं कांही गोष्टी आतां प्रसिद्ध होत आहेत. गेल्या सालीं यांनींहि अितरांप्रमाणें आपल्या कोटावर ५७ ची वीरस्मृतिमुद्रा धारण केलेली होती. परंतु कॉलेजमध्यें कोणाअेका स्नेह्यानें चेष्टेनें मुद्रा दूर फेकली हें पाहतांच हा तरुण अितका चवताळला कीं तो अेक सुरा घेअून त्याच्या अंगावर तुटून पडला ! दुसऱ्या अेका समयीं जपानी लोकांच्या शौर्याबद्दल गोष्टी चाललेल्या असतांना दे. धिंग्राला या गोष्टी फार वेळ न रुचून तो तरुण म्हणाला कीं त्यांत कांहीं विशेष नाहीं. माझें हिंदुराष्ट्रहि तितकेंच शूर व साहसी आहे व लवकरच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमच्याहि धाष्टर्याची लोक किर्ति गाअूं लागतील. अितर हिंदी तरुण म्हणाले ‘ हा पोकळ डौल आहे. शरीरकष्ट व देशवीर त्यांत आमचे लोक अढळ राहत नाहींत. ’ शेवटीं वाद पैजेवर आला व हिंदु लोकांच्या साहसाची चुणुक तर पाहूं या, म्हणून अेकानें अेक टांचणी घेअून धिंग्राच्या हातावर टोचण्याचा आरंभ केला. धिंग्रानें तो हात तसाच्या तसाच अढळ ठेवला –टांचणी सर्व आंत रोवली व रक्त बाहेर अुसळलें तरी धिंग्रानें हात हलविला नाहीं.

× × ×

या खुनाचा निषेध करण्यासाठीं सोमवारीं दे. भावनगरीच्या खटपटीनें अेक हिंदी लोकांची सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं दे. आगाखान हे होते. सभेला पुष्कळ हिंदी लोक जमलेले होते. पहिला ठराव दे. भावनगरीनें पुढें आणला. त्यांत व त्यांच्या भाषणांत ज्या मनुष्याची खुनाच्या आरोपावरून चौकशी व्हावयाची आहे, अशावर तो आरोप शाबीत झाल्यावर करावी असा त्यांनीं भडिमार चढविला. नंतर दे. अमीर अल्ली अुठले. त्यांनींहि तोच प्रकार पण जरा कमी प्रमाणावर केला व वेळ थोडा आहे म्हणून अध्यक्षांनीं ठराव सभेपुढें वाचून दाखवून अेकदम कितीकांना तो पसंत आहे असें विचारलें. पुष्कळसे हात अुभारलेले दिसतांच त्यांनीं सांगितलें कीं “ सर्वानुमतें पास. ” हें वाक्य अैकतांच ‘ काय ? विरुद्ध मत ? ’ अध्यक्ष ओरडले, व सर्व मागें वळून पाहूं लागले. ‘ होय होय, माझें मत विरुद्ध आहे ’ म्हणून अधिकच जोराचा प्रतिशब्द अुसळला. ‘ त्याचें नांव टिपून घ्या ! त्याला अुभा करा ! कोण आहे तो ?’ असा अेकच गलका अुडाला. पुन्हा तोच आवाज. ‘ हा मी येथें आहें व पुन्हा अध्यक्षांना अशी विनंति करतों कीं ठराव सर्वानुमतें पास झालेला नाहीं. ’ आतां सभेंत ‘सावरकर’ ‘सावरकर’ अशी कुजबुज सुरूं झाली. सर्वांनुमतें ठराव पास करण्याची ज्यांना अत्यंत अुत्कंठा लागलेली होती त्यांनीं संतापून जाअून दे. सावरकरांना पुन्हां दटवण्याचा प्रयत्न केला. परंतु सभेच्या मध्यभागीं अुभे राहून अधिकच शांततेनें त्यांनीं पुन्हां आपलें मत विरुद्ध असल्याचें कळविलें. तेव्हां दे. भावनगरी संतापानें लाल होअून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व प्लॅटफॉर्मवरून अुडी मारून खालीं आले व 'पकडा त्याला ! धरा त्याला' म्हणून गर्जूं लागले ! तीन मिनिटेंपर्यंत विलक्षण स्तब्धता दिसली व मग अेकदम 'धरा ! बाहेर घालवा!' वगैरे किंकाळ्या फोडीत खुर्च्या व काठ्या सर्व बाजूंनीं अुठूं लागल्या. 'माझें मत कां विरुद्ध आहे हें अध्यक्षांनीं अैकावें' म्हणून दे. सावरकर हे बोलत होते. परंतु त्यांचें तें बोलणें ह्या चवताळलेल्या मूठभर लोकांच्या किंकाळ्यांत अैकूं येअीना. अध्यक्षांनीं दे. भावनगरींस मागें ओढून ह्या अतिरेकाबद्दल कानअुघडणी केली. परंतु आतां सर्व सभेंत पक्षविपक्ष होअून अेकच आरोळी अुठलेली होती. ह्या सर्वांच्या मध्यें दे. सावरकर शांतपणें अुभे असतांना अेक पामर नांवाचा युरेजियन त्यांच्या अंगाला भिडला व त्यानें त्यांच्या डोळ्यावर आघात केला. तरीहि सावरकरांनीं स्थलावरून अिंचहि मागें न सरतां व अुलट आघात न करतां 'तरीहि माझें मत विरुद्धच आहे' असें सांगितलें. त्यांच्या डोळ्याला जखम होअून रक्त भळभळां वाहूं लागलें व हें पाहतांच सर्वत्रांचा संताप विकोपास गेला. दे. सुरेंद्रनाथ बानर्जींनी संतप्त होअून 'सावरकरांना स्वमत देण्याचा पूर्ण अधिकार होता, त्यांच्यावर हात टाकणें outrageous आहे असें म्हणून सभा सोडून दिली. स्त्रीजन भयानें किंचाळत हॉलच्या बाहेर गेला. हॉलमध्यें खुर्च्या झुगारल्या जाअूं लागल्या. शिव्या प्रतिशिव्यांचा गोंधळ अुडाला व अितक्यांत हिंदी तरुणांतील अेकानें दे. सावरकरांवर ज्यांनीं प्रथम आघात केला होता त्या पामरच्या डोक्यांत काठी घातली व तोहि रक्तानें भिजून चिंब झाला. पोलिस लोक सभेंत शिरलेलेच होते व सुमारें अर्ध्या तासांत ठराव कसेबसे वाचून अध्यक्षांनीं सभा संपली असें कळविलें. दे. सावरकर यांना आधींच बाहेर नेलेलें होतें व स्नेह्याबरोबर त्यांना घरींहि पोचविण्यांत आलें होतें. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं लंडन टाअिम्सला आपलें मत विरुद्ध कां होतें वगैरे सर्व खुलासा करून अेक पत्र लिहिलें व त्यांतील त्यांच्या समर्थनाचा परिणाम होअून बहुतेक पत्रांनीं तें पत्र आपण होअून छापून प्रसिद्ध केलें. त्या पत्रानें सर्व क्षुब्ध वातावरण निवळलें आहे. तें पत्र आपल्या वाचकांसाठीं पुढील पाळीला धाडीन. डेली डिस्पॅच नामक पत्रांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अेक अुतारा मासल्यासाठीं दिला आहे.

'The pale youth, who made so dramatic a protest at yesterday's meeting of Indians held to denounce the murder of Sir Curzon Wyllie turns to be Mr. Vinayak Damodar Savarkar. He is fervent Nationalist. Mr. Savarkar who is an extremely brilliant scholar, is at present, an individual of interest, apart from his appearance at yesterday's meeting. He is a law student here whom the Benchers of his Inn refused to call, and at present, I understand he is waiting for the decision of the House of Lords to whom he has appealed. Like most of his nationalists he is a political theorist, and is deeply versed in all the literature of political liberty. He translated Mazzini's writings into Marathi.'

यांत मला असलेल्या माहितीवरून अेक चूक दिसत आहे कीं दे. सावरकर ह्यांच्यावरील ग्रेज अिनमधील केस अजून निकालांत आलेली नाहीं. जुलै १४ ला ती पुन्हां अेकदां चालणार आहे व तिचा निकाल महाराष्ट्र वाचकांना पुढें कळवीन.

✠ ✠ ✠

मदनलाल धिंग्रा !

(ता. ६ ऑगस्ट १९०९) लंडन, ता. १६ जुलै.

ज्या तरुणानें कर्झन वायली यांचा भयंकर खून केला त्याच्याविषयींची माहिती आतां वर्तमानपत्रांतून सविस्तर रीतीनें प्रसिद्ध होत आहे. टाअिम्स, डेली न्यूज, डेली क्रॉनिकलपासून तों तहत अत्यंत क्षुल्लक ग्रामपत्रिकेपर्यंत सर्व छापखाना हल्लीं दररोज व दरवडीं हिंदुस्थानच्या चर्चेनें, या खुनाच्या विवरणानें, धिंग्राच्या वर्णनानें भरलेला असतो ! ज्या दिवशीं सकाळीं खुनाची पहिली वार्ता कळली त्या दिवशीं रस्त्यारस्त्यांतून वर्तमानपत्रविके

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठमोठ्यानें ओरडत सर्व दिवसभर हिंडत होते. 'धिंग्रानें केलेला खून! हिंदुस्थानचा द्वेष! अेका हिंदूचें निधडें धाडस!' वगैरे कर्कश किंकाळ्या अैकून मी घराच्या खिडकींतून डोकावूं लागलों तों प्रत्येक घराच्या दारांशीं वर्तमानपत्रांचे अंक विकत चाललेले होते. त्या दिवशीं सर्व ब्रिटिश द्वीपामध्यें अेकूण अेक मनुष्याच्या तोंडीं 'हिंदुस्थान! हिंदुस्थान!' हा अेकच शब्द होता. तेव्हांपासून आतांपर्यंत वर्तमानपत्रांत हिंदुस्थानच्या चर्चेपुढें दुसऱ्या कोणत्याहि विषयाला थारा मिळेनासा झाला आहे. क्रिकेटची चर्चादेखील बंद पडली, तेव्हां अितर विषयांची काय कथा!

ज्या दिवशीं रात्रीं धिंग्रानें सर कर्झन वायलीवर चार गोळ्या झाडल्या त्या दिवशीं धिंग्रा खुनाच्या अेक अर्धातास आधीं मिस बेक या आंग्ल स्त्रीबरोबर–ही बाअी त्या दिवशीं ज्या संस्थेचा अुत्सव होता त्या संस्थेची सेक्रेटरी आहे–आपल्या नुकत्याच झालेल्या परिक्षेच्या गप्पा मारीत शांतपणें बसलेला होता व तेव्हांहि तो जवळ दोन पिस्तुलें, सुरी व खंजीर अशीं शस्त्रें ठेवून सर कर्झनवर पाळत ठेवीत होता! नंतर जेव्हां कर्झन आले तेव्हां तो दारापाशीं गेला व कांहीं बोलावयाचें निमित्त करून सर कर्झनजवळ अुभा राहिला. बोलण्यास आरंभ होतांच त्यानें पिस्तुल झाडलें नाहीं; तर अगदीं हलके बोलण्याचें मिष करूं लागला; तेव्हां कर्झन अधिकच जवळ आले. त्यांचें तोंड अगदीं जवळ येतांच त्यांच्या डोळ्याच्या पातें लवतें न लवतें अितक्या अवकाशांत चार गोळ्या मारल्याहि होत्या! जवळ असलेले अेक पारशी डॉक्टर लालकाका हे त्याला पकडूं लागतांच त्यांनाहि अेक गोळी घातली व ते खालीं कोसळले. सर प्रोबेन हे मागून धांवले तरी धिंग्रा न कचरतां त्यांच्याकडे झटकन फिरून कुस्ती करूं लागला व त्याचे हात पकडण्यांत अितर दोन गृहस्थ गुंतले असतांहि त्यांनीं त्या सर्वांना झिडकारीत सर प्रोबेन ह्यांना अितक्या जोरानें खालीं आदळून दिलें कीं, त्यांच्या दोन बरगड्या चिरडून गेल्या व त्यांचा चेहरा विद्रूप झाला. त्या वेळेस आणखी कांहीं अिंडियन त्याच्या अंगाशीं लगटलेले होते व त्यानेंहि आपलें पिस्तुल पुन्हां सरसावलें होतें. परंतु अिंडियन लोकांवर तें न झाडणें ठीक असें बहुधा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटून त्यानें तें परत फिरविलें व शांतपणें तो अुभा राहिला. तो अितका शांत कीं, त्याची नाडी त्वरित पाहतांच डॉक्टरनें म्हटलें कीं, येथें असलेल्या या भयंकर देखाव्याला पाहणाऱ्या सर्व लोकांत धिंग्रांची नाडी अधिक शांत व सुव्यवस्थित रीतीनें चाललेली होती ! त्याच्या खिशांत दोन कागद त्याच्या कबुलीजबाबानें व स्वसमर्थनानें भरलेले सांपडले. त्याला सगळयांनीं मिळून हातापायांनीं जखडून बांधलें असतां 'माझा चष्मा जरा नीट घालूं द्या व मग मी पुन्हां हात बांधून घेअीन' असें तो म्हणाला व चष्मा नीट बसविण्यांत आला. पोलीस-कचेरींत नेल्यावर तो डोळे मिटून भिंतीशीं डोकें टेकून कांहीं मिनिटें बसला व मग हंसून गप्पा करूं लागला. त्या रात्रीं त्याला गाढ झोप लागली होती. दुसऱ्या दिवशीं जेवणावरहि यथेच्छ ताव मारला. कांहीं दिवसांनीं त्याच्या अेकदोन स्नेह्यांनीं त्याला भेटण्यासाठीं खटपट केली व अेकजणाला परवानगी मिळून तो त्याला भेटला. तेव्हां धिंग्रा अितका निर्भय व अुल्हासी होता कीं, त्यांनीं मागितलेल्या जिनसांमध्यें अेक आरसाहि मागितला होता ! 'मला ड्रेस करण्यासाठीं येथें अेक छानदार आरसाहि धाडून दे !' म्हणून तो म्हणाला, जणूं काय त्याला लग्नाचीच तयारी करावयाची आहे ! असली निधडी छाती पुण्यकर्मांत खरोखरीच अभिलक्षणीय असते. पापकर्मांत ती मनुष्याला जास्तच हिडिस स्वरूप देते !

त्याला भेटण्याची हिंदी लोकांना सक्तमनाअी करण्यांत आलेली आहे. गेल्या वर्षापासून हिंदी विद्यार्थ्यांना अिंग्रजी वळण लावण्यासाठीं व त्यांच्यावर सूक्ष्म नजर ठेवून त्यांना राजकारणापासून परावृत्त करण्यासाठीं ज्या ज्या अनेक निरनिराळ्या संस्था निघालेल्या होत्या त्यांपैकीं मोठमोठ्या अँग्लो-अिंडियनांनीं आपल्या घरीं अिंडियन विद्यार्थ्यांस चहा पिण्यास बोलावण्याचा व अेक मोठा समारंभ करण्याचा आरंभ हीहि अेक संस्था होती. धिंग्रा हा सर्व राजनिष्ठ व अँग्लोअिंडियनांनीं चालविलेल्या संस्थेचा नियमित सभासद होता व कित्येक अँग्लोअिंडियनांचा त्याच्यावर फार विश्वास व त्याच्या राजनिष्ठेवर फार भरंवसा असे. अशा अत्यंत भरंवशाच्या मनुष्यानेंच व जिथें सच्छील विद्यार्थ्यांशिवाय राजकारणी चटोर विद्यार्थी कधीं येअूं शकत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहींत अशा चहासमारंभांतच सर कर्झनसारख्यांचा खून केल्यापासून अँग्लोअिंडियनांनीं सार्वजनिक पत्रें लिहून कळविलें आहे कीं, अिंडियन विद्यार्थि दुष्ट राजकारणांपासून परावृत्त व्हावे म्हणून हा चहासमारंभ करण्याचें आपण आजपर्यंत कबूल केलें होतें. पण आतां तसे समारंभ आपण कधींहि करणार नाहीं.सर चार्लस अिलियट यांनींहि यांची समारंभ करण्याची पाळी जवळ आली असल्यानें आपण तो समारंभ करीत नाहीं असें स्पष्ट पत्र प्रसिद्ध केलेलें आहे. हिंदुस्थानी विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्यासाठीं नुकतीच नेमली गेलेली व आजपर्यंत रात्रंदिवस नको नको होओीतोंपर्यंत काम करणारी कमिटीहि आजकाल वर डोकें काढीत नाहीं. प्रथम प्रथम गुप्तकटांच्या शोधासाठीं पोलिसनें अचाट प्रयत्न केलें असतांहि गुप्त कट मिळेना, तेव्हां चौकशी झटकन थांबली; अितकेच नव्हेतर प्रत्येक हिंदी विद्यार्थ्यांच्या पायांत लुडबुडणारे डिटेक्टिव्ह या खुनापासून जास्त होण्याच्या अैवजी मुळीच नाहीसे झाले आहेत. परंतु त्याचें मुख्य कारण असें आहे की, अित:पर अिंग्लिश डिटेक्टिव्हांच्याअैवजी अिंडियन डिटेक्टिव्ह ठेवण्याचें ठरलें आहे. मोठमोठचा वर्तमानपत्रांतून तक्रारी आल्या आहेत कीं, अिंडियन लोकांची भाषा माहिती नसल्यानें त्यांच्यावर अिंग्लिश डिटेक्टिव्ह ठेवल्यानें काडीचाहि फायदा होत नाहीं. हिंदी समजणारा अिंग्लिश डिटेक्टिव्ह ठेवला तर हे अिंडियन पंजाबींत बोलतात, मराठींत बोलतात, बंगालींत बोलतात, तेव्हां हिंदुस्थानांतून अुत्तम स्वदेशी डिटेक्टिव्ह आणावेत ही सूचना सर्वांना पसंत पडलेली आहे. परंतु आजपर्यंत काय अिथे थोडे अिंडियन डिटेक्टिव्ह होते तर आतां जास्त आणवून अधिक अुपयोग होणार आहे ! डिटेक्ट करण्यास जर कांहीं नसेल तर कितीहि डिटेक्टिव्ह जमले तरी काय करणार ? आणि दुर्दैवाची कहाणी अशी कीं, अितर गरीबगुरीब विद्यार्थ्यांच्या मागें रात्रंदिवस डिटेक्टिव्ह लागलेले असतांना मुख्य धिंग्रासारख्या भयंकर मनुष्यावर यत्किंचितहि दाब नव्हता. खुद्द डिटेक्टिव्हांचे मालक सर कर्झन वायली याचा खून ज्यांना डिटेक्ट करतां आला नाहीं त्या डिटेक्टिव्ह खात्याशीं आदिपासून आजपर्यंत सुधारणा झालीच पाहिजें अशी सर्व राजनिष्ठ व शांतताप्रिय हिंदी लोकांची मनापासून अिच्छा व विनंति आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धिंग्राच्या जबाबाची लंडनच्या रस्तोरस्तीं जाहिरात.

गेल्या आठवड्यांत धिंग्राला सेशनकमिट केलें. त्या दिवशीं संध्याकाळीं सर्व लंडन शहरांत धिंग्रानें दिलेला जबाब हाच अेक विषय होता. त्या विस्तीर्ण शहराच्या भितीभितीवरून दुकानादुकानावरून धिंग्राचें नांव अेकसारखें लटकलेले होतें. "धिंग्राचा विलक्षण जबाब." "तो म्हणतो माझा सूड माझे देशबांधव घेतीलच." "धिंग्रा स्वसमर्थनांत म्हणतो, मी देशभक्त आहें. "धिंग्रा हिंदुस्थानच्या अभ्युदयासाठीं मरतो." वगैरे मोठमोठ्या टाअिपांनीं छापलेलीं पत्रकें भिन्नभिन्न वर्तमानपत्रांच्या जाहिरातीसाठीं अेकाच रांगेनें सर्व शहरभर–नव्हे सर्व अिंग्लंडभर लटकत होतीं ! त्यानें केलेल्या क्रूर खुनानें केली नाहीं अितकी अुत्क्षोभक चळवळ त्यांनी अिंग्लंडांत आपल्या कोर्टांतील जबाबानें केलेली आहे ! सेशनमध्यें काम चालेल तेव्हां ती हकिकत देअीन. धिंग्राला फांशी होअीलच. परंतु त्याला तीच गोष्ट पाहिजे आहे. कारण परवां कोर्टाच्या जबाबाच्या शेवटीं तो म्हणाला:

I made the statement not because I wished to plead for mercy or anything of that kind. I wish that the English people should sentence me to death for in that case the vengemer of my countrymen will be all the keener. I put forward this statement to show the justic of my cause to outside world, especially to our sympathisers in America and Germany.

✠ ✠ ✠

लंडनचीं बातमीपत्रें : मूल्य रु. २–८ आ.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८५७ चें स्वातंत्र्य समर : : ७

✠ ✠ ✠

[५० वर्षांपूर्वी स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं '१८५७ चें स्वातंत्र्यसमर' हें पुस्तक मूळ मराठींत लिहिलें. परंतु तें त्या वेळीं युरोपांत नागरी टंक नसल्यानें आणि हिंदुस्थानांत तें छापणें फारच कठीण म्हणजे अशक्यच झाल्यानें त्या पुस्तकाचें अिंग्रजी भाषांतर केलें गेलें. पुढें त्याच्या अनेक भाषांतून गुप्त आवृत्त्या निघाल्या. त्या पुस्तकाचें मराठींतहि अेक भाषांतर आज प्रसिद्ध आहे. पण तें भाषांतर म्हणजे दुधाची भुकटी आणि भुकटीचें पुन्हां दुध ह्याप्रमाणें असल्यानें त्या भुकटीच्या दुधाला मूळ दुधाची चव कशी येणार ?

स्वातंत्र्यवीरांचें तें मूळ मराठी पुस्तक ४० वर्षांनंतर आतां पुन्हां त्यांच्या हातीं आलें आहे. त्यांतील हा अेक अुतारा येथें देत आहों.

पन्नास वर्षांपूर्वीं लिहिलेल्या ह्या वीर सावरकरांच्या मराठींत आपणाला अनेक अुर्दू शब्द दिसतील. ते आम्हीं तसेच ठेवले आहेत. 'शहीद' हाहि शब्द अुर्दूच आहे. पुढे अंदमानमध्यें वीर सावरकरांनीं 'शहीद' ला 'हुतात्मा' हा संस्कृतनिष्ठ शब्द योजिला.]

✠ ✠ ✠

शहीद मंगल पांडे

५७ च्या क्रांतियुद्धाच्या अितिहासांत ज्या कांहीं अभूतपूर्व गोष्टी आहेत त्यांत अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे त्या युद्धाची रचना करतांना जी गुप्तता राखण्यांत आली ती होय. सर्व हिंदुस्थानभर क्रांतिरचनेची गर्दी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुसळली असतांनाहि अिंग्रजांसारख्या धूर्त राज्यकर्त्यांना त्या चळवळीचा अितका थोडा सुगावा लागलेला होता कीं अुघड बंड होअून अेक वर्ष लोटेपर्यंतहि त्यांतील बहुतेक अधिकाऱ्यांच्या मतें बंडाचें कारण काडतुसें हें होतें. काडतुसें हें कारण किती निमित्तभूत होतें हे आताशा अिंग्रजी अितिहासकारांना कळूं लागलेलें आहे व ५७ च्या भयंकर युद्धप्रसंगीं स्वदेशाभिमानाचे व स्वधर्माभिमानाचें पवित्र स्फुरण त्या योद्धयांमध्यें कसें संचरत होतें तें आतां स्पष्ट रीतीनें अिंग्रजी अितिहासकारहि कबूल करीत आहेत.१

हिंदुस्थानसारखा विस्तीर्ण देश क्रांतिबंधनांनीं जखडून बांधणें हें कार्य लहानसहान नाहीं. सर्व युरोपच्या युरोप अेकाच अुद्देशासाठीं गुप्त बंधनानें बांधणें हें जितकें दुर्लभ आहे तितकेंच वरील कर्महि दुर्घट होय. हिंदुस्थान-

१ Mallesan writes, " In this lesser sence then, and in this only, did the cartridges produce the mutiny. They were the instruments used by the conspirators. Those conspirators were successful in the use of the instruments only because in the manner I have endevoured to point out, the mind of the sepoys and of certain sections of the population had been prepared to belive every act testifying to bad faith on the part of their foreign masters.

Mr. Medley आपल्या पुस्तकांत म्हणतो : But in fact the greased cartridges was mreely the match that exploded the mind which had, owing to varity of causes been for a long time preparing.

Mr. Disralli dismissed the greasing of the cartridges with the remark that nobody believed that to have been the real cause of the outbreak.

Charles Ball's Mutiny, Vol. I, Page 623

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारख्या विस्तीर्ण देशास राज्यक्रांतिसारख्या नाजूक कामीं अिंग्रजांसारख्या चाणाक्ष अधिकाऱ्यांच्या हातावर तुरी देअून अितक्या गुप्ततेनें संघटित करणें हें कार्य ज्यांनी केलें त्या श्रीमंत नानासाहेब, मौलवी अहमदशहा, वजीर-अल्ली नख्खीखान वगैरे पुढाऱ्यांच्या शिताफीची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. शिपाअी, पोलिस, जमीनदार, मुलकी अधिकारी, शेतकरी, व्यापारी, साहुकार वगैरे सर्व वर्गांमध्यें व हिंदु व मुसलमान या दोन जातींमध्यें अपूर्व सलोख्याचीं व प्रचंड क्रांतीचीं बीजें पेरून पेरून व तीं बीजें तेथें रुज-तांच त्या सर्वांची अुत्कृष्ट संघटना करून ज्यांनीं अिंग्रजांना ह्या सर्व प्रचंड गडबडीचा मागमूसहि लागूं दिला नाहीं त्यांच्या गुप्त रचनाकौशल्यास अिति-हासांत तोड मिळणें दुर्मिळ आहे! ही गुप्त संघटना पूर्ण स्वरूपाला पोचत असतांच बंगालमध्यें सरकारनें नवीं काडतुसें शिपायांवर बळजोरीनें लादण्यास आरंभ केला. प्रथमतः १९ व्या पलटणीवर प्रयोग करण्यांत येणार असा रंग दिसूं लागला. बंगाल्यामध्यें या फेब्रुवारी महिन्यांत सर्व पलटणीपेक्षां ३४ वी पलटण राज्यक्रांतीसाठीं अत्यंत अुत्सुक झालेली होती. ह्या ३४ व्या पलटणीचे ठाणें बराकपूरला असल्यामुळें कलकत्त्यानजिक असलेल्या वजीरअल्ली नख्खी-खानानें ती सर्व पलटण शपथपूर्वक राज्यक्रांतीच्या कार्यासि मिळवून घेत-लेली होती. ह्या पलटणीपैकीं कांहीं तुकड्या १९ व्या पलटणीकडे धाडल्या गेल्या होत्या. तेव्हां त्या तुकड्यांनीं ती १९ वी पलटणहि राष्ट्रकार्याकडे वळवून घेतलेली होती. परंतु ही स्थिति असल्या प्रचंड राज्यक्रांतिघटनेचा बिलकुल सुगावा नसलेल्या अिंग्रजी अधिकाऱ्यास माहीत नसल्यानें त्यानें त्या १९ व्या पलटणीवरच पहिल्यानें काडतुसांचा प्रयोग केला. परंतु तीं काडतुसें घेण्याचें त्या पलटणीनें अुघड रीतीनें नाकारलें व वेळ पडल्यास अेकदम शस्त्रें अुपसण्यापर्यंत आपला निश्चय असल्याचें कळविलें. . हें कृत्य पाहतांच नेह-मीच्या शिरस्त्याप्रमाणें अिंग्रजांनीं 'नेटिव्हांस' धाक दपटशा देण्याचा अुपक्रम केला परंतु आतां ती पूर्वीचीं 'नेटिव्हें' तेथें नव्हतीं. हें त्या पलटणींत चाल-लेल्या तलवारींच्या खणखणाटानें गोऱ्या अधिकाऱ्यांच्या लवकरच नजरेस आलें. परंतु हा मानभंग कांहीं दिवस मुकाट्यानें गिळण्याशिवाय त्यांना दुसरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अिलाज नव्हता. कारण त्या सर्व प्रांतांत नेटिव्ह सैन्यास दाबांत ठेवण्यासाठी अेकहि फिरंगी पलटण नव्हती; ही अडचण दूर करावी म्हणून मार्चच्या आरंभीं ब्रह्मदेशांत असलेली फिरंगी पलटण कलकत्त्यास आणविली गेली व १९ व्या पलटणीला निःशस्त्र करून कामावरून दूर करण्याचा हुकूम सुटला व ह्या हुकमाची अंमलबजावणी बराकपूरला करावयाचें ठरलें !

आपल्या बांधवांना आपल्या डोळ्यांदेखत शिक्षा होणार हें अैकूनहि स्वस्थ बसणारें बराकपूर नव्हतें. तेथें स्वातंत्र्याची ज्योत प्रत्येक तलवारींत लकाकूं लागलेली होती. परंतु त्या सर्व तलवारींत मंगल पांड्याची तलवार म्यानांत कांहीं केल्यानें धीर धरीना ! १९ व्या पलटणीप्रमाणें ३४ व्या पलटणीलाहि वेळ येतांच कंपनीच्या नोकरीवर लाथ मारून निघून जाण्याचीच अिच्छा होती व म्हणून १९ वी पलटण कंपनी आपण होअूनच काढून देत आहे हें फार अुत्तम होत आहे असें सर्व स्वदेशाभिमान्यांचे मत झालेलें होतें. सर्वांगांचा अेक विचार होअीतों अेक महिना दम घ्यावा असें धूर्त पुढारी सांगत होते व बराकपूरहून सर्व हिंदुस्थानभर निरनिराळ्या पलटणींत कोणचा दिवस ठरवावा याबद्दल सांकेतिक पत्रेंहि रवाना झालेलीं होतीं, परंतु मंगल पांड्याच्या तलवारीला दम कसा निधणार ?'

मंगल पांडे हा ब्राह्मण कुंटुबांत अुत्पन्न झालेला व क्षात्र कर्मांची दीक्षा घेतलेला तरणाबांड शिपाअी होता. स्वधर्मावर प्राणापलीकडे निष्ठा ठेवणारा, आचरणानें सच्छील, स्वभावानें तेजस्वी व वयानें तरुण अशा या मंगल पांडेच्या पवित्र रक्तांत नुकतीच देशस्वातंत्र्याचीं विद्युच्चेतना संचरलेली ! मग त्याच्या तलवारीला धीर कसा निघेल. शहीदांच्या तलवारींना कधीं धीर निघत असतो काय ? जयापजयाची कवडीमात्रहि पर्वा न करतां आपल्या तत्त्वनिष्ठेवर जे स्वतःच्या अुष्ण रक्ताचा अभिषेक करतात अशाच लोकांच्या मस्तकावर शहीदतेचा मुकुट झळकत असतो, व ह्या निष्फळ वाटणाऱ्या कढत रक्तांतूनच विजयाची मूर्ति अुदय पावत असते ! स्वदेशबंधूंचा आपल्या देखत अवमान व्हावा ही गोष्ट मंगलपांड्याच्या अंतःकरणास असह्य वेदना करूं लागली व तो आपल्या रेजिमेंटनें त्याच दिवशीं अुठावें असा आग्रह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करूं लागला. गुप्त मंडळाचे पुढारी आज अुठण्यास अनुमोदन देत नाहींत असें कळतांच त्या तरुणाचें अवसान अनिवार्य झालें, त्यानें आपली बंदूक खाड्दिशी अुचलली व '**मर्द हो अुठा**' अशी गर्जना करून त्यानें परेडच्या मैदानांत अुडी घेतली. 'अरे आतां मागें कां घेतां ? भाअीओ चला तुटून पडा ! तुम्हांला तुमच्या धर्माची शपथ आहे. चला आपल्या स्वातंत्र्यासाठीं गनिमावर तुटून पडा !' अशी गर्जना करीत तो स्वदेशबांधवांस आपल्या मागें येण्याविषयीं आव्हान करूं लागला. हें पाहतांच सार्जंट मेजर ह्यूसन ह्यानें मंगल पांड्याला धरावयाचा शिपायांना हुकूम सोडला परंतु अिंग्रजांना आजपर्यंत आढळलेले देशद्रोही शिपाअी आतां दुर्मिळ होते. सार्जंटची आज्ञा तोंडांतून निघतांच अेकहि शिपाअी मंगल पांड्यास धरावयास हालला नाहीं अितकेंच नव्हे तर मंगल पांड्याच्या बंदुकींतून सूं सूं करीत येणाऱ्या गोळीनें त्या ह्यूसनचें मढें अेका क्षणार्धांत जमिनीवर आदळून दिलें. अितकी गडबड होते आहे तोंच लेफ्टनंट बॉव्ह हाहि तेथें आला. त्याचा घोडा नाचत नाचत पुढें सरकतो आहे तोंच मंगल पांड्याच्या बंदुकीं-तून दुसरी गोळी सुटली व ताऱ्त्या घोड्याच्या पोटांत शिरतांच तो घोडा त्या लेफ्टनंटसह जमिनीवर धाडदिशीं पडला. मंगल पांड्याला पुन्हां बंदूक भरण्याचा अवसर मिळण्याच्या आधीं तो धुळींत लोळणारा लेफ्टनंट आपलें पिस्तुल काढून राहिला आहे हें पाहतांच मंगल पांड्यानें तिळमात्रहि न डगमगतां आपली समशेर अुपसली. बॉव्हनें पिस्तुल झाडलें परंतु गोळी हुकली व तो आपली तलवार काढतो न काढतो तोंच मंगल पांड्याच्या तलवारीचा रट्टा बसून तो जमिनीवर लोळूं लागला ! अितक्यांत मंगल पांड्यावर तो पूर्वीचा गोरा चालून येअूं पाहतांच जवळच्या अेका शिपायानें आपल्या बंदुकीच्या दस्त्यानें त्याचें डोकें ठेंचून टाकलें व सर्व शिपायांनीं 'मंगल पांड्यास कोणीहि हात लावूं नये' अशी गर्जना केली. तोंच कर्नल व्हीलर तेथें आला, व मंगल पांड्यास पकडण्याविषयीं हुकूम देअूं लागला. 'आम्हीं आमच्या पूज्य ब्राह्मणाच्या केसासहि धक्का लावणार नाहीं' अशी

(सा...६)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुन्हां गर्जना झाली व अिंग्लिशांच्या लाल भडक रक्ताचे पाट वाहत असलेल्या त्या देखाव्यापुढें जास्त वेळ न थांबतां कर्नलसाहेब जनरलच्या बंगल्याकडे पळून गेला. अिकडे मंगल पांडे आपल्या रक्तानें भिजलेले हात अुभारून 'मर्दहो अुठा' अशी भयानक भीमगर्जना करीत अिकडून तिकडे हिंडत होता. जनरल हिर्से ह्याला ही बातमी कळतांच तो आणखी कांहीं युरोपियन घेअून मंगल पांडे याजकडे आला. आतां मात्र आपण शत्रूच्या ताब्यांत सांपडूं असा रंग पाहून त्या देशवीर मंगल पांड्यानें फिरंग्यापेक्षां मरण जवळ करावें असा निश्चय केला व आपली बंदूक आपल्या छातीकडे रोखली, व क्षणार्धांत त्याचा पवित्र देह जखमी होअून खालीं पडला! लगेच त्या जखमी तरुणाला अिस्पितळाकडे नेण्यांत आलें व सर्व अिंग्रज अधिकारी ह्या अेका शिपायानें जें वीरत्व दाखविलें त्यानें लज्जित होत्साते आपआपल्या तंबूंत निघून गेले. ही १८५७ सालच्या मार्चची २९ वी तारीख होती.

मंगल पांडे ह्याची नंतर कोर्ट मार्शलपुढें चौकशी झाली, त्या चौकशींत त्यानें अितर कटवाल्यांचीं नांवें द्यावीं म्हणून प्रयत्न करण्यांत आले. परंतु तेजस्वी तरुणानें आपण कोणाचींहि नांवें देण्यास तयार नाहीं असें साफ अुत्तर दिलें. त्यानें हेंहि कळविलें कीं मी ज्यांना गोळ्या घातल्या त्या अिंग्रजी ऑफिसरांविरुद्ध माझा व्यक्तिविषयक कोणत्याहि प्रकारचा द्वेष नव्हता जर व्यक्तिविषयक द्वेष असता तर ते खूनच झाले असते. मंगल पांड्याचें मंगल नांव हें शहिदांच्या यादींत न देतां तें खुनी मनुष्यांच्या यादींत द्यावें लागलें असतें. परंतु मंगल पांड्याचें तें धाडसी कृत्य तत्त्वनिष्ठेसाठीं होतें. स्वदेशाच्या व स्वधर्माच्या संरक्षणासाठीं 'जयाजयौ समे कृत्वा' मंगल पांडेची तलवार म्यानांतून बाहेर पडली होती. स्वदेश व स्वधर्म यांचा अपमान पाहण्यापेक्षां मरणें बरें असा कृतनिश्चय करूनच तो बाहेर निघाला होता. ह्या कृत्यांत जशी त्याची पवित्र स्वदेशभक्ति व स्वधर्मप्रीति दिसून आली तसेंच त्या तरुणाच्या तलवारीचें पाणीहि दिसून आलें. अशा ह्या वीर तरुणाला अखेर फांशीची शिक्षा झाली. ता. ८ अेप्रिल ही त्याच्या फांशीसाठीं नेमली होती. शहीदांच्या रक्तांत काय तेज असेल तें असो परंतु त्यांच्या नाम-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्मरणानें देखील मनांत अुदात्त वृत्तींना जसा भर येअू लागतो ! मग ज्यांच्या दृष्टीला मंगल पांडेच्या प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ झाला होता त्या बराकपूरच्या सर्व नागरिकांच्या अंतःकरणांत दिव्य प्रेम अुत्पन्न झालें ह्यांत काय नवल आहे ? त्या सर्व बराकपूर शहरांत मंगल पांडेला फांशी देण्यासाठीं अेक मांगसुद्धां मिळेना. अखेर कलकत्त्याहून त्या अमंगल कृत्यासाठीं चार मांग आणवावे लागले. ता. ८ अेप्रिलच्या दिवशीं सकाळीं मंगल पांड्याला फांशी-कडे नेलें. त्याच्या भोंवती लष्करी लोकांचा पहारा होता त्यांतून मंगल पांडे धीटपणानें चालत गेला व फांसावर चढला. आपण कोणाचींहि नांवें सांगणार नाहीं असें पुन्हां अेकदां सांगतांच त्याच्या पायाखालचा आधार काढून घेण्यांत आला व मंगल पांड्याच्या शरिरांतून त्याचा पवित्र आत्मा स्वर्गाकडे जाता झाला ! !

अशा रीतीनें ५७ च्या क्रांतियुद्धाची पहिली चकमक अुडाली व अशा रीतीनें त्या क्रांतियुद्धांतील पहिला शहीद स्वर्गवासी झाला. ज्याच्या रक्तांतून ५७ च्या शहिदतेची नदी अुगम पावत आहे त्या देशवीर धर्मवीर मंगल पांड्याचें नांव आपल्या प्रत्येकाच्या वदनांत व हृदयांत अक्षय्य असलें पाहिजे. ५७ च्या सालीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यबीजाला अंकुर फुटविण्यासाठीं प्रथम मंगल पांड्यानें त्याच्यावर आपलें अुष्ण रक्त ओतलें आहे. त्या स्वातंत्र्यबीजाचा हंगाम जर पुढें मागें आला तर त्याच्या पहिल्या नैवद्याचा मान मंगल पांडेचा§ आहे.

मंगल पांडे नाहीसा झाला पण त्याचें चैतन्य सर्व हिंदुस्थानभर पसर-

---

§The name has become a recognised distinction for the rebelious report throughout India'

Charles Balls Vol. I.

This name was the origin of the sepoys generally being called the Pandes.

(Lord Roberts 41 years in India, Page 62)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेलें आहे, व ज्या तत्त्वासाठीं मंगल पांडे मेला तें तत्त्व चिरंजीव झालेलें आहे. मंगल पांडेनें सत्तावनच्या क्रांतियुद्धाला आपलें रक्त दिलें अितकेंच नव्हे तर त्या क्रांतीला मंगलत्व देण्यासाठीं आपलें पवित्र नांवहि दिलेलें आहे. ह्या क्रांतींत जे जे स्वदेशार्थ नि स्वधर्मार्थ लढले त्या सर्वांना 'पांडे' हें अभिधान लावण्याचा प्रघात आहे असलें हें पवित्र नांव प्रत्येक आअी आपल्या मुलाला स्वाभिमानपूर्वक शिकवो !

✠ ✠ ✠

वृद्धयुवा कुंवरसिंह

शेवटीं अत्यंत राजनिष्ठ म्हणून गणलेली दानापूरची नेटिव्ह फौज सन १८५७ च्या तारीख २५ जुलै रोजीं बंड करून अुठली. दानापूरला युरोपियन तोफखाना व गोरी पलटण असतांनाहि त्या तीन नेटिव्ह रेजिमेंट्स् आपल्या शस्त्रास्त्रांसुद्धां कंपनीचे युनिफॉर्मस् मात्र तिरस्कारानें फेकून देअून शोणनदाकडे निघून गेल्या. त्या दानापूरच्या ठाण्याचा मुख्य अधिकारी मेजर जनरल लायड ह्याच्या हातीं तोफखाना असतांहि भयत्रस्ततेमुळें व वार्धक्यामुळें शिपायांचा ताबडतोब पाठलाग करण्याची त्याची छाती झाली नाहीं.

अिंग्लिशांचा मेजर जनरल आपल्या वार्धक्यामुळे जरी असा पंगु झालेला होता तरी ज्या दिशेस त्या रेजिमेंट्स् चाललेल्या होत्या त्या दिशेकडे वार्धक्याला न जुमानतां ज्याच्या तलवारींत व ज्याच्या भुजदंडांत अजून तारुण्याचें तेज खेळत होतें असा अेक अप्रतिम वृद्धयुवा आपल्या जगदीशपूरच्या राजवाड्यांत मिशांवर पीळ भरीत अुभा राहिलेला होता ! आणि त्याच्याच ध्वजाकडे हे शिपाअी लोक दौडत चाललेले होते.

अिंग्रजी अंमलाचें जोखड झुगारून दिल्यानंतर ज्या अेका न्यूनतेनें आजपर्यंत स्वातंत्र्याच्या शिपायांचे व लोकांचे सर्व परिश्रम विफल होत होते ती धुरंधरत्वाची न्यूनता ह्या शहाबाद जिल्ह्यांत तरी जगदीशपूरच्या वाड्यानें अुरूं दिली नसल्यामुळें त्या जगदीशपुराकडे शोणनद अुतरून हे शिपाअी दौडत चाललेले आहेत ! कारण जगदीशपुराकडे स्वराज्यसंग्रामाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साजेल असाच अेक रजपुतकुलभूषणधुरीण अखेर त्या सैनिकांना लाभणार होता !

वृद्धयुवा–होय, तो वृद्धयुवा होता, कारण आजपर्यंत जवळ जवळ अैंशी शरद् ऋतु त्याच्यावरून गेलेले असूनहि त्याच्या आत्म्याचें तेज जिवंत निखाऱ्यासारखें अजून कढतचें कढत आहे ! आपल्या स्वदेशाचा, आपल्या स्वधर्माचा व आपल्या स्वराज्याचा अक्षम्य, अघोर नी अन्यायी अपहार करणाऱ्या अिंग्रजी सत्तेचे तुकडे अुडवीन म्हणून कुंवरसिंहानें कधींच गुप्त प्रतिज्ञा केली होती. आतां तर तो अुघडपणें कानपूरच्या श्रीमंत नानासाहेबांशीं बोलूं चालूं लागला होता. भयंकर बोल व भयंकर चाल ! हरहर महादेवाचा बोल--अफजलखानाच्या वधावरील पोवाडयाची चाल ! !

आणि त्या चालीवर हें भीषण रणगीत चालूं लागलें. कुंवरसिंहाच्या मनांतून राज्यक्रांतीचे विचार घोळत आहेत. स्वदेशस्वातंत्र्यासाठीं त्यानें सर्व क्रांतिकेंद्रांशीं दळणवळण सुरूं ठेवलेलें आहे, त्या पाटणा भागांतील हजारो शिपाअी गुप्त रीतीनें त्याला सामील झाले आहेत; अशा निरनिराळ्या वार्ता पाटण्याचा कमिशनर टेलर याला कळूं लागल्या तरी, हा अैंशी वर्षांचा वृद्ध राजा सरणाच्या अैवजीं सु-रणाकडे धांवत जाअूं शकेल, ही कल्पनाच मुळीं टेलरच्या मनाला असंभवनीय वाटूं लागली. त्यांतूनहि कुवरसिंह राजनिष्ठेचीं अितकीं पत्रें रोज लिहित आला तीं काय अुगीचच ! तथापि आंग्लजनांच्या राजकारणपटुत्वाला अपवाद नसलेल्या त्या टेलरनें कुवरसिंहास कळविलें कीं, 'आपण फार वृद्ध आहां, आपली प्रकृति फार अस्वस्थ आहे ! आपल्या अवशिष्ट राहिलेल्या सान्निध्याचा लाभ मला घडावा अशी माझी प्रबल अिच्छा असल्यानें आपण पाटण्याला माझ्या पाहुणचारासाठीं याल तर मी फार आभारी होअीन. हें आमंत्रण अस्वीकृत होणार नाहीं अशी आशा असलेला, आपला, चीफ कमिशनर टेलर.' मागें अफजुलखानानें शिवाजीस असेंच भेटीचें आमंत्रण दिलेलें होतें ! त्या धूर्त रजपुतानें तेव्हांच ताडलें कीं पाटण्याच्या चीफ कमिशनरचें हें प्रेमनिमंत्रण म्हणजे बिलकूल कळूं न देतां तुरुंगाचें दार हळूंच अुघडणें होय ! म्हणून त्यानेंहि अुत्तर लिहिलें, 'आभार, आभार !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझी प्रकृति फार अस्वस्थ आहे हें आपण लिहितां तें सत्य होय व म्हणूनच सध्यां मला पाटण्याकडे येतां येत नाहीं ! **मी बरा होतांच** तिकडे तावडतोब निघून येतो !' कुंवरसिंहा, तुझी प्रकृति अस्वस्थ खरीच आणि ती रणांगणांतील रक्तप्राशनानें जरा बरी होतांच तूं पाटण्याकडे तावडतोब जाणार आहेस हेंहि खरेंच आहे ! कशाला ? हा मात्र प्रश्न वेगळा !

अितक्यांत 'अस्वस्थ प्रकृति सुधारावयास जी औषधी पाहिजे होती तीच घेअून दानापूरचे बंड केलेले शिपाअी जगदीशपूरला येअून धडकले ! आणि राणा कुंवरसिंहाला म्हणाले 'तुम्हांस देशमातेची शपथ आहे. स्वधर्माची शपथ आहे. मानभंगाची शपथ आहे ! राणाजी म्यान फेकून द्या व स्वातंत्र्यासाठीं तलवार अुपसा ! तूं आमचा राजा, तूं आमचा नेता, तूं आमचा सेनानी आहेस ! रजपूत वंशाच्या शिरोभूषणा, तुझा हा क्षत्रियावतंस 'शय्येवरि न पडाया योग्य रणक्षितीवरीच हा काय ?' असें ते स्वराज्यासाठीं हपापलेले शिपाअी विनवूं लागले. कुंवरसिंहाचें कुलोपाध्याय शुचिप्रत ब्राह्मणहि त्याला तसेंच अुपदेशूं लागले.

Major Ayres आपल्या 'official despatches' मध्यें लिहितो 'The Brahmins have instigated him to rebellion' तेंच त्यांची नखारलेली तलवार त्याला सांगूं लागली ! तेव्हां पाटणा शहरीं अंबारींत बसून जाणें अशक्य होण्याअितकी त्याची प्रकृति पंगू होती तों अशी वर्षांचा वृद्ध रजपूत कुंवरसिंह धाडकन् अुठून अुभा राहिला ! रुग्णशय्येवरून त्यानें जी अुसळी घेतली ती अेकदम रणक्षितीवरच !

शहाबाद जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असलेल्या अरा ह्या नांवाच्या शहरीं जगदीशपुराहून निघालेले शिपाअी धांवत गेले व त्यांनीं तेथील ब्रिटिश खजिना, निशाणें, तुरुंग, कचेऱ्या यांचा अुच्छेद करून टाकून शेवटीं अेका लहानशा तटबंदीवर आपला मोर्चा फिरविला. बंड झाल्यास वेळप्रसंगीं संरक्षण करतां यावें म्हणून त्या शहराच्या धूर्त आंग्लजनांनीं या तटबंदींत दारूगोळा, शस्त्रास्त्रें, अन्नवस्त्रादि सामुग्री भरून ठेवलेली होती. शिवाय त्या शहराच्या मूठभर अिंग्रजांना मदत देण्यासाठीं पाटण्याहून ५० शिखांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुकडीहि आलेली होती. अशा रीतीनें हे शिखांसुद्धां ७५ लोक त्या तटबंदींत बंदोबस्तानें रहात असतां, ज्या प्रसंगाची तें मार्गप्रतीक्षा करीत, तो प्रसंग येऊन गुदरला व त्या तटबंदीला बंडखोर शिपायांनीं वेढा दिला.

त्या छोटयाशा तटबंदींत हे २५ अिंग्रज व ५० शीख लोक हटातटानें आपलें संरक्षण करीत असतां बाहेर शिपायांचें शेकडें त्या तटबंदीवर अेकदम चढाव करून जाण्याच्याअैवजीं आजूबाजूनें शत्रूचा कोंडमारा करण्याच्या नादीं लागलेले होते. क्वचित् असेंहि असेल कीं तटबंदी हातांत आल्यासारखीच असल्यानें तिच्यावर हल्ले करण्यांत व्यर्थ कालक्षेप वा मनुष्यहानि करण्यापेक्षा आजूबाजूच्या मुलखाचा व अितर अिंग्रजी ठाण्यांचा बंदोबस्त करणें बंडवाल्यांस जास्त फायदेशीर वाटलें असेल. त्यामुळें व कांहीं अंशीं तटबंदींतील लोकांच्या जबर गोळीबारामुळें शिपायांनीं त्या तटबंदीवर प्रत्यक्ष हल्ला करण्याच्याअैवजीं तोफा चढवून मारा चालविण्यास आरंभ केला. अेकदोनदां गुप्त भुयारें खणून तटबंदीच्या खालीं सुरूंगहि लावण्यांत आले. आंतील लोकांस थोडयाच दिवसांत पाण्याचा लवलेशहि मिळेनासा झाला.परंतु आपल्या गोऱ्या अन्नदात्याचे हे हाल पाहत स्वस्थ बसण्याअितके कांहीं शीख लोक नामर्द झालेले नव्हते. त्यांनीं अेका चोवीस तासांत त्या तटबंदींत नवीन विहिर खणली व हें विहिरीचें काम चालत असतांनाच ते राक्षसासारखें अव्याहत रीतीनें लढतहि राहिलेले होते ! तटबंदींत जे लोक लढत आहेत ते केवळ युरोपियन नसून त्यांच्यांत बहुतेक शीखच आहेत असें जेव्हां अुघडकीस आलें तेव्हां बंडवाल्यांना अत्यंत खेद झाला. कारण हा वेढा अिंग्लिशांना हिंदुस्थानीयांनीं दिलेला नसून गुरु गोविंदसिंगाला कुंवरसिंहानें दिल्यासारखाच होता ! जे अिंग्लिशांच्या बाजूनें अितक्या विलक्षण शौर्यानें परंतु असल्या नीच देशद्रोहानें लढत आहेत त्या शीखांना आपल्या बाजूस वळविण्यासाठीं रोज संध्याकाळीं बंडवाल्याचें दूत अेका खांबामागें अुभें राहून मोठयानें अुपदेशूं लागत कीं हे शीखांनों, ज्यांनीं आपलें राज्य बुडविलें, जे आपल्या देशमातेवर बळजबरी करूं पाहत आहेत, ज्यांनीं आपला धर्म पोरका केलेला आहे, त्यांच्या बाजूनें लढून तुम्ही कोणत्या नरकाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधन करीत आहां ? परंतु बंडवाल्यांनीं स्वदेशाची, स्वधर्माची, स्वहिताची, स्वातंत्र्याची वाटेल ती शपथ घालून अिंग्लिशांचा पक्ष सोडविण्याविषयीं केलेल्या ह्या हृदयद्रावक विनंत्यांचा, किंवा तुम्ही असा देशद्रोह अितःपरहि करूं लागल्यास तुम्हास आम्ही ठार मारण्यास सोडणार नाहीं, अशा त्यांनीं दाखविलेल्या भयाचा शीख लोकांवर तिळमात्रहि परिणाम झाला नाहीं. अुलट स्वकीयांच्या या दूतांनीं केलेल्या विनंतीला अुत्तर म्हणून त्यांनीं गोळ्यांचा पाअूस पाडावा—व हें पाहतांच 'भलें ! भलें ! भलें ! ' म्हणून युरोपियनांनीं त्यांची पाठ थोपटावी ! अशा स्थितींत त्या वेढ्याचें दोन दिवस लोटले. तिसऱ्या दिवशीं म्हणजे ता. २९ जुलैच्या रात्रीं त्या तटबंदींतील ती छोटीशी अिंग्रजी सेना लांबवरून अैकूं येणाऱ्या तोफांच्या आकस्मिक गडगडाटानें दचकन अुठली ! आनंदानें त्यांचीं तोंडें प्रफुल्लीत झालीं. अखेर बंडवाल्यांना ठार मारून वेढा अुठविण्यासाठीं विजयी ब्रिटिश सैन्य तर चालून येत असेल ना ?

होय; तें ब्रिटिश सैन्यच वेढा अुठविण्यासाठीं अखेर चालून येत आहे. दानापूरला जी मोठी रेजिमेंट होती तिच्यापैकीं सुमारे २०० युरोपियन गोरे गोरे लढवय्ये, १०० शीख काळेकुट्ट लढवय्ये असे कॅप्टन डनबार ह्या धाडसी योद्ध्याच्या हाताखालीं अेकत्र होअून अराला पडलेला वेढा अुठविण्यासाठीं शोणनदाच्या कांठावर आले. अिंग्रजी सेनेच्या मुखश्रीवर जो अुत्साह व विजयनिश्चितता दिसत आहे तशी कधींहि दिसलेली नसेल. त्यांना पोंचविण्यासाठीं आलेल्या आंग्ल नरनारींनीं हांसत हांसत निरोप दिले. शोणनदांत नावा चालूं लागल्या व संध्याकाळीं ७ च्या समारास अरा शहराच्या तिराला ती सेना स्पर्श करती झाली. शुक्ल पक्षाचें मनोहर शशिबिंब त्या भूमिवरील विजयी सेनेच्या विजयोत्साहाचे भागीदार होण्यासाठीं आकाशांतून त्यांच्याबरोबर चालूं लागलें. कॅप्टन डनबार, तूं ह्या शुभ्र चांदण्यांत आपल्या सेनेचा व्यूह वेळेवर अुत्तम रीतीनें रचून घे. कारण पुढें चांदणें पडेल कीं काळोख पडेल याची काय शाश्वतता आहे ? ह्या व्यूहांत नित्यक्रमाप्रमाणें हें राजनिष्ठ शीख लोकच पुढें आघाडीला अुभे केले पाहिजेत. आपल्या शौर्यो-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्कर्षाचा हा मूर्तिमंत सन्मानच कीं काय म्हणून तेहि आघाडीला राहण्यास अेका पायावर तयार आहेत.अराच्या दाट जंगलांत आपणांस नेणारा काळा वाटाड्या कुठें आहे ? त्याला पुढें करा व चला. विजयी आंग्ल सैनिकांनों, रणरंगासाठीं अुत्सुकलेल्या आपल्या तलवारी ह्या चांदण्यांत चमकावीत पुढें चला. झाडामागून झाड मागें पडत चाललें, मैलामागून मैल मागें पडत चालले व हा अरा शहराच्या नजिकचा पूलहि लागला. पण हें काय ? शत्रू कोठें आहेत ?अजून तर अेकहि 'पांड्या' (क्रांतिकारकांना अिंग्लिश सोजीर त्यांच्या रांगड्या भाषेंत 'पांड्या' म्हणत मंगल पांडे यांचे ते अनुयायी असत म्हणून) आपल्या तृषित तलवारीला तर राहोच पण दीर्घदृष्टि बंदु-कीलाहि आढळत नाहीं हें कसें ! पळाले. भ्याड ! नुसतें कॅप्टन डनबार येतो आहे हें अैकूनच ते नामर्द 'पांडे' पळून गेले ! शिकंदराचा देखील त्याच्या शत्रूंना अितका दरारा नसेल. हे चंद्रा रणसमराच्या आशेनें तूं अितका वेळ थंडीवाऱ्यांत कुडकुडत अुभा राहिलास, पण ह्या भ्याड बंड-वाल्यांचें पलायनचातुर्य काय तें तुला पहावयास मिळालें ! तर आतां जास्त निराशा करून घेण्यापेक्षां तूं सुखशय्या करण्यासाठीं आपल्या विश्वमंदिरावर रात्रींचा पडदा सोडून शय्यागृहांत परत जा. परंतु चंद्र परत फिरला तरी, डनबार तूं मात्र फिरूं नकोस. चंद्र बोलून चालून शशलांच्छन ! पण तुझ्या यशाला सिंहानें देखील लांच्छन लावण्यास न धजलें पाहिजे. म्हणून तूं परत फिरूं नकोस. आतां ही आंबराअी लागली आहे व ते भ्याड पांडे आपणांस भेटण्याचा परत संभवहि अुरला नाहीं.

पण ! हा आवाज कसला ? आंबराअींतील पानें तर सळसळत नाहींत ना ? सूं सूं सूं ! अरे बाप रे – सावध ! आंग्ल सैनिकांनों सावध ! गोळ्यांचा पाअूस दशदिशानीं झोड देत अुठला ! आला कुंवरसिंह आला ! अैंशी वर्षांचा हा योद्धा व तूं तरुणबांड ! चल बघूं कोण हरतो. आंबराअीचें प्रत्येक झाड आपल्या अनंत शाखाहस्तांत बंदुका घेअून त्या परसैन्यावर तुटून पडले ! तरुण कॅप्टन डनबारच्या अिंग्लीश सैन्यानें लढण्यास कंबर कसली. पण लढणार कोणाशीं ? शत्रूपक्षाकडील अेक मनुष्य दिसेल तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शपथ ! आंब्याच्या त्या गर्द झाडींत मध्यरात्रींच्या किर्रर अंधकारांत, त्या अुंचसखल प्रदेशाच्या आडवळणांत दबून बसलेल्या कुंवरसिंहाच्या सेनेंतील अेक मनुष्यहि अिंग्रजी सैनिकांस दिसेना ! आकाशांतील तारे व भूमिवरील काळोख ह्याशिवाय कांहीं दिसेना व ह्या दोन्हीवरहि बंदुका चालवून त्यांना जिंकणें शक्य होअीना. वायुदेवतेचा कोप होअून तिनें आपल्या झंझावातांतून तें लाललाल गोळ्यांचें वादळ फटकारीत धांवावें, तसें ह्या अिंग्लिश सैन्यावर कोण्यातरी अदेहधारी देवतेचा मारा होअूं लागला. डावीकडून मारा, अुजवीकडून मारा, समोरून मारा, पाठीमागून मारा ! अिंग्लिशांचे पोशाख पांढऱ्या रंगाचे असल्यानें कुंवरसिंहाला तें दिसत होते. परंतु कुंवरसिंहाचे लोक काळे, त्यांचे पोशाख काळे व ती रात्र काळी सगळ्या काळ्या वस्तूंचा असा अेकदिल झाल्यावर त्या काळदेहापुढें पांढरे पाय, पाय कसें धरूं शकणार ? अिंग्रजांचे पांढरे आणि शिखांचे काळे—दोन्ही पायांनीं रणांतून पाय काढला ! त्यांचा कमांडर डनबार हा पहिल्या बारांतच ठार झालेला होता. जीव घेअून पळत असतां खेड्यांत ते अिंग्रजी सैन्य कोसळलें. तिथें त्यांनीं किंचित् वेळ दबा धरण्याचा प्रयत्न करून पहाटेच्या सुमारास, त्या घोर रात्रींच्या रणावर आपले मेलेलेच नव्हेत तर जखमी सवंगडीहि सोडून देअून, आपल्या कमान्डरचें प्रेत तसेंच टाकून देअून, अुपाशी, तान्हेलें, रक्तबंबाळ झालेलें, लज्जेनें काळें ठिक्कर पडलेलें तें ब्रिटिश सैन्य जिवाच्या आशेनें शोणनदाकडे धांवूं लागलें. परंतु कुंवरसिंहापुढें धांवणें म्हणजे कांहीं साधी गोष्ट नव्हती. प्रत्येक पावलाला त्यांचें रक्त गळत चाललें ! अेकादें रानडुक्कर शिकाऱ्याच्या भाल्यानें भोसकलें जात असतां अंगांतून रक्ताच्या धारा अखंड वाहत शक्तिक्षयानें या त्या बाजूला वारंवार कोलमडत अेकाद्या रक्ताच्या वितळलेल्या मेघाप्रमाणें लाल शोणिताचा सडा घालीत घालीत धांवत चालतें तसें ब्रिटिश सैन्य शोणनदापर्यंत धांवत आलें. पण अिथें तर संकटाची परमावधि झाली ! बोटी सांपडेनात, सांपडल्या त्या वाळूंत रुतून बसल्या. ज्या रुतून बसल्या नाहींत त्यांना 'पांड्यांनीं' आग लावून दिली ! शेवटीं अेकदोन बोटी जिवंत सुटल्या ! अराचा वेढा अुठवून तेथील शूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांसुद्धां विजयगीतें गात आपलें सैन्य परत आलेलें असेल म्हणून दिनापूरच्या आंग्ल नरनारी जों नदीकिनाऱ्यावर येतात, तों त्यास त्या नावांतून अेकहि अुत्तेजक हंसणें अैकूं येअीना ! निशाण नाहीं, बँड नाहीं, कोणी वर तोंड काढीत नाहीं ! सर्वांची छाती धडधडूं लागली. माझा मुलगा, माझा भाअू, माझा बाप, माझा नवरा कालच येथून हंसत हंसत मोहिमेंत गेला होता आणि आज–देवा कृपा कर व अिडापीडा टाळ ! हा टाळण्याचा आवाज देवाला मिळण्याच्या आधींच ते अपयशी ब्रिटिश लोक दिनापूरच्या घाटावर येअूं लागले व लवकरच ही भयंकर वार्ता जिकडेतिकडे पसरली कीं चारशें पंधरा लोकांपैकीं फक्त सुमारें ५० लोकच कुंवरसिंहाच्या रट्टयांतून शाबूत राहिलेले आहेत ! अेक इंग्रज लेखक लिहितो, ' त्यावेळीं अिंग्रजी स्त्रीजनांनीं मांडलेला भयंकर आक्रोश ज्यांनीं अैकलेला असेल ते तो आजन्म विसरणार नाहींत ! कांहीं कर्कश किंकाळ्या देत आपली छाती बडवूं लागल्या, कांहीं ओक्साबोक्शीं ओरडत आपले केस तटातट तोडूं लागल्या. त्यांच्या या शोक-भरांत जर कां जनरल लॉयड त्यांच्या दृष्टीस पडतां तर या नाशाच्या अुत्पादकाला त्यांनीं जिवंत फाडून टाकलें असतें, यांत कांहीं शंका नाहीं ! ! '

✠ ✠ ✠

१८५७ चें स्वातंत्र्यसमर (अिंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराथी व तामीळ) १९०८ मध्यें लिहिलें. प्रसिद्धीपूर्वींच जप्त. १९१० मध्यें अभिनव भारत संस्थेकडून प्रथम भूमिगत आवृत्ति प्रसिद्ध. दुसरी भूमिगत आवृत्ति अमेरिकेंत हरदयाळांनी, तिसरी भारतांत भगतसिंगांनीं, चौथी सुभाष बोसांनीं पांचवी जयहिंद प्रकाशननें, १९४६ बंदी उठली. १९४७ मध्यें नथुराम गोडसे व आपटे यांनीं मराठींत प्रसिद्ध केलें. अिंग्रजी आवृत्ति Phoenix Publication नें काढली. मूल्य १५ रु. ३ आणे.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमला : : ८

✠ ✠ ✠

[दोन जन्मठेपींची शिक्षा भोगण्यासाठीं अंदमानच्या काळ्यापाण्यांतील भयानक बंदिशाळेंत, कागद, पेन्सिल, किंवा शाई हीं लिहिण्याचीं आधुनिक साधनें हातीं नसतांनाहि भिंतीवर काट्यांनीं स्वातंत्र्यकवि श्री. सावरकरांनीं अनेक स्फुट कविता आणि, 'कमला,' 'गोमांतक' नि 'महासागर' हीं तीन खंडकाव्यें अेका महाकाव्याचे वेगवेगळे सर्ग म्हणून लिहिलीं. त्यांपैकीं 'कमला' हें साधारणतः ९०० ओळींचें काव्य येथें आम्हीं साधरणतः ३०० ओळींत सादर करीत आहों. हें काव्य संक्षिप्त करतांना त्यांतील महत्त्वाचे विचार घेतले असून कथानकहि अभंग राखलें आहे.

'रानफुलें' ह्या काव्यसंग्रहांत हें काव्य संग्रहित असून त्यावांचून स्वतंत्रपणें ह्या काव्याच्या लहानमोठ्या आकाराच्या ४।५ आवृत्त्या निघाल्या आहेत.

ह्या पुस्तकांत काव्य छापतांना आम्हीं मूळ कवितांचेच क्रमांक त्या कवितेच्या शेवटीं दिले आहेत. हेतु हा कीं मधल्या किती कविता गाळल्या तें वाचकांच्या लक्षांत यावें.]

✠ ✠ ✠

(अनुष्टुप छंद.)

फुलबाग किती शोभे लहान, नटवी, करी
नटुनी थटुनी नाना नखरे वरचेवरी १

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिरवाचि कधी शालू, सितमलमलिचा कधीं,
रेशमी जरतारी वा जयाच्या पदरामधीं २
नित्य ताजे *जितें मोती पाच माणिक जन्मती:
पवनेंच तसें त्यांशीं नटवी डुलवी किती ! ३
हासतां कुंददंती ती जितमन्मथ मोहवी,
सुगंध सौम्य हास्याची ज्या चोरोनि नवी नवी ४
कला‡ अेकेक या लोकीं कामिनी सकला करी
विश्वमोहक लावण्या निज: त्या मुकुटा धरी ! ५
नौकेंत कौमुदीच्या ही नटली कितादा तरी
बाग योजनगंधा§ त्या वनदेव–पराशरीं ! ६
मांडवी ही प्रवेशाची जाअीनें विणिली जिला :
फुलें हीं हसरीं ये त्या आदरीति पलोपला ! ७
फुलें ? अहा फुलें ना तीं अुद्यानीं विहरावया
रात्रींत चोरुनी येतां अप्सरा, धरिले जयां ८
नोंद त्या दिव्य पाप्यांची ठेवूं जाअिवरी असे
चुंबनांचेंचि▣ त्यांच्या घे देवीद्वारप हे ठसे ! ९
आणि हे सोनचाफ्यां, तूं शिकलासि तरी कुठें
ही दिव्य किमया ! आम्हा स्वयंमन्य नरां जिथें २१

* जितें मोती०:–अर्थात् निरनिराळ्या रंगांचीं फुलें.

‡ कला०:–कुंददंतीच्या हास्याची अेकेक कला अर्थात् कुंदादिक फुलांनीं शोभित असलेल्या बागेच्या बहरांतील अेकेक फुल. तें सुंदरी आपल्या केसांत खोवून आपल्या सौंदर्यावर मुकुट चढवितात.

§ योजनगंधा०:–श्लेषार्थानें पराशराशीं रमलेल्या कैवर्तक कन्येस अुल्लेखिलें आहे.

▣ चुंबनांचेंचि०:–साध्या अपराध्यांचे आंगठ्यांचे ठसे घेतात. पण चोरींत सांपडलेल्या अप्सरांच्या, त्या दिव्य अपराधी म्हणून, चुंबनांचेच ठसे घेतले, तेच फुलासारखे भासत होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रुप्याचेंही करायासी जड स्वर्ण न साधतें,
ओल्या मातींत सूर्याचीं किरणें पिळुनि तिथें २२
मृदुचेतन सोन्याचीं, स्वर्णचंपक, हीं फुलें
सुगंधी तुज पाहोनी निर्मितां मन हें भुलें! २३
प्रियाची सोनचाप्याची, चमेली किती ही खुले!
तो तिच्यावरि ती त्याच्यावरतो अधळी फुलें! २४
देवताची तया आरामाची* काय मनोरमा
बाला अेक अशी येअी वेचू नित्य तिथें सुमा. ६०
ढाळी बाग सुमां मार्गीं मार्दवा बघुनी तिशी,
प्रतिपद‡ चांदण्या येतां व्योमी चंद्रकला जशी. ६१
चंद्रिकेच्या प्रभाताच्या मिश्रणांत अुषा जशी
कैशोर यौवनामाजी शोभे वी सुदती तशी. ६२
प्रातःकाळीं तिची सासू हौसेनें कथिता कधीं
'वेणीस, जा, फुलें बाले आण आवडलीं हृदीं : ८१
बागेंत तैं तिनें जावें परी हात न लावितां
पहावें जरि होवोनी ढाळिति कुसुमें लता! ८२
आणि सत्य कथी, केंसा तिच्या मोहुनि मोकळया
फुलें काय – लतांनीं त्या ढाळाव्या फुलत्या कळया!! ८३
निजाभरण कार्यींची असें न मन तें परी
देवपूजेसही तीचे खुडाया न फुलें करी! ८४
कीं फुलें खुडितां ये जो रस तो बघुनी हृदीं
वाटे, रक्त लतांचे ये! सासू जों न असें कथी : ८५
' देवकार्यीं, अहा बालें, लतांचींच सुमें किती!
यौवनाची सुमें वीरप्रसू तोडूनि अर्पिती!! ८६

* आराम–बाग, अुद्यान.

‡ प्रतिपद्–प्रतिपदा तिथि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्याचे भाव सुमांच्याची सुगंधांवरती असे
वाढले, बिसतंतूंच्या राजहंस वरी जसे : १०४
अृजुत्व, शुचिता, दैवी सात्त्विकत्वहिकां हवें
त्या मनाचे पुसाया ! त्या भ्रूकौटिल्यहि* कां शिवे !! १०५
शांत तद्दृष्टिसी सारी सृष्टि शांतिमया गमे.
रूपीं यौवन तोंही ती बालताच हृदीं रमे. १०६
रूपीं कुलीं, वयें, होता रुचला पति जो तितें
वेशींत यौवनाच्या कीं विशींत शिरला कुठें १०७
वाढवा जो नवीनाचा, आज तो सण पाडवा !
शुभे, हो शिव हें तूंतें नवें वर्ष, ॠतू नवा ! ! ११२
आशा‡ आशा तशा आजी अुष्णशीतल मानवा :
शुभे, हो शिव हे तूतें नवें वर्ष, अृतू नवा ! ! ११३
होती लावण्यलक्ष्मीची नित्य पहात ती छवी
सासूसहि प्रभातीं त्या तरी ती दिसली नवी ! ११६
वेणी घालावया सासू हौसेनें मग जैं बसे
कांहीं चिंतितची तों ही मधें खुदकनी हंसेऽ ११९
'हससी कमले कां ते' " नाही : अेक पडे मशी
स्वप्न काल मजचेंची माझी ती नलिनी जशी, १२०
सराच्या अुजव्या बाजू नाहीं काय ?, जिच्या कळया
पहिल्याच बहाराच्या झाल्याहेति फुलावया ? १२१
—ती आणि मी जशा गेलों शोधूं तो प्रियसा §अली
अुषःकालाचिया अेका वसूनि झुळकेवरी : १२२

* अितर कौटिल्य (कपट) तर राहोच पण यौवनसहज असे निष्पाप भ्रूकौटिल्य, नयनचांचल्य, देखील तिला शिवलें नव्हतें !

‡ आशा—दिशा; सर्व दिशा ह्या मानवाना त्या दिवशीं आशेसारख्या सुखदशीतोष्ण भासूं लागल्या.

§ अली:—भ्रमर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेलों गात ' तुझीची ज्या वाट पाहत राहिल्या
ये, शिलीमुख※ ! ये, स्पर्शें फुलीव चल या कळया!' १२३
आला लुब्ध अलीही तों ! –सोडुनी नलिनी परी
मेला माझ्याचि ओठाला दंश येअुनि हो करी !!! १२४
स्वप्न हे नलिनीला तों असें मंगल ना परी ?"
सासुचे ती सुखाश्रूही पाहती, वळती तरी ! १२५
स्वप्नार्थ* हृष्ट होताची, हृष्ट त्याहुनिही परी
अजाणपणचीं बालेचे हें मोहक त्या करी. १२६
प्रातःकाळीं अुषा तैशी रंगे‡ सून सुमंगली !
तिच्या वत्सल सासूच्या कोण अुत्सव अंतरीं ! १६४
वेली कल्प प्रसूनांची सून साजत, होतसे
कोठें ठेवूं अगी कोठें न ठेवूं तिजला असे ! १६५
देहधर्म नवाची तो तें बाजू बसणें दुरी,
शिवतां न जनांचें तें जाणें पाहुनि सत्वरीं. १६६
ओशाळे सुगात्स्थित्यंतरें तन्मन, होतसे
अनोळखी जनीं जावें चुकलें चुकलें तसें. १६७
सासूचा तो परी आश्वासवी हर्ष क्षणीं तिशीं:
कीं जें हर्षद सासूशी शुभ तें असणारची ! १६८
प्रेमाशीर्वचनांचा तो वर्ष न्हाणवली वरी:
तिच्याचि न परी होअी हर्ष थोर बरोबरीं. १६९

※ शिलीमुखः–भ्रमर हे विशेषण अिथें साभिप्राय आहे.

* स्वप्नार्थः–त्या यौवनोन्मुख बालिकेच्या शारीरिक स्थित्यंतराचें प्रतिबिंब मानसिक व्यापारांतहि न कळत कसें पडत चाललें होतें तेंच नलिनीच्या 'पहिल्या बहराच्या कळयांविषयीं' हें तिचें स्वप्न सूचित करीत होतें. ही कौतुकास्पद गोष्ट तिच्या प्रेमळ सासूच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाही.

‡ रंगे सुमंगलीं–ऋतुप्राप्तीच्या शारीरिक आणि धार्मिक सुमंगल संस्कारांनीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुरम्य मखरामाजी रमणी मग जें बैसे :
श्लोकांत कालिदासाच्या अुपमाच तशी दिसे ! १७०
पौर बालांगनांचें तों रम्य मंडल दाटलें :
ज्यासि त्यासि तिची सेवा करूंचि लव, वाटले: १७१
काढी रंगावली कोणी, गुंफी हार कुणी, कुणी
मांडी फरेंमरें, कोणी हंसवी तिज हांसुनी : १७२
वाढणीं गृहिणी नेतां, वाद्यें मंगल वाजतीं,
वांटिती अत्तरें, देती कुंकुमा कुसुमा किती : १७३
सधूप रुचिरें पात्रें नैवेद्यासम मांडुनी
'घेच घांस तरी' ज्या त्या प्रार्थिती कर जोडुनी : १७४
मांगल्य देवताची तैं शोभे त्या ललनांत ती,
मंदिराचें तया येअी स्वरूप मखराप्रती ! १७५
परंतु तो युवा येतां व्हावें जातिलसें कधीं !
जातांच तो परी व्हावें कधी येतिलसे हृदीं ! ! १७६
आणि काय करावें हो त्यानेंही ! वरचेवरी
वस्त्र, पुस्तक, कांहीं ना राहे कांहि तया स्थलीं ! १७७
आणि न्हांताचि ती बाला चवथ्या दिवशीं सुटे
जशी झुळुक अुद्यानीं कुठेंच्या हरवें कुठें ! १८५
बाल्यीं वागेंत तैशी कीं रमे हांसत खेळतां
परी बकुल तो येतां—अहारे मदना हता ! १८६
मुहूर्ता मग जैं धर्म्यीं शांति मंगल योजिली,
आणि माहेरिची आली सर्वहि प्रिय मंडळी १९२
त्या दिशीं पूर्णसौख्या ती ! अेके ठायिच कीं शके
माहेरी सासरीं आणि अुद्यानीं निवसूं सुखें ! १९३
अरुणासम दंपत्या तरुणा शुभ त्या दिनीं
दुकूलवसना सालंकृता सत्वर आणुनी १९४
(सा...७)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अेकासनींच होमा ज बैसवीति तया क्षणीं
जोडपें तें खुलें जैसे चंद्र आणिक रोहिणी! १९९
शुक्राच्या चांदणीमाजी जसा चंद्र तसे तधीं
अंतर्धानासि अग्नी घे दीप्ति ठेवुनि ती-मधी २००
चौकीं रंगावलीमाजी तों चौरंगहि चंदनी
चौफुलें ज्या रुपेरी तो रुंद सुंदर मांडुनी, २०१
न्हावूं घालावया नारी नेति तै अुभया तया
गच्च्यांतुनी वरी दाटे जन मौज पहावया. २०२
नाना तैलें सुगंधी त्या लावण्या अपुल्या करीं
लागली ललनांची तें चढाओढ किती तरी, २०३
सुखस्पर्श तयांचा तों धो धो वर्षचि जाहला,
गच्च्यांतुनी वरीं दोघां सुमांचा पडला सडा. २०४
कुणी त्याकरवीं तोया फेकवी लव तीवरी.
टाक चूळ कुणी तीते हळु आग्रह वा करी, २०५
फेकीं फुलें, करी कोणी रंग घालुनि केशरी
लपूनि पिचकाऱ्यांचा मारा मंगल त्यांवरी. २०६
युव्यांची युवतींची जी अशी धांदल ना परी
वृध्दही बालसे होती हांसते वरचेवरी. २१०
न्हातां अेकासनीं अैसे किती चोरि-लीं तरी
अंगें स्वयेंचि अंगासी लागताति परस्परीं. २११
मअू मअू असें कांहीं मअू तें सुख लागलें
घरीच वक्षि तो तीतें-झोंक जाअूनिया बरें! २१२
आले आहेर तीं झालीं पुण्य ब्राह्मणभोजनें,
रचिली सुमशय्याही नव ती युवती जनें. २१५
फसवूनि तिला नेती तिथें जै, सहसा तदा
हांसल्या युवती तीच्या धडकी भरतां हृदा! २१६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वधूविभूषणा लज्जा ने तिला पळवूनि ते
माय आणि तिची सासू मायेशी ‡ बसल्या जिथें. २१७
तों तिथेंच युवाही तो सहसाचि दिसे तिशीं !
येतां अेकेक ना येतीं संकटें जगतीं अशीं ! २१८
हांसूनि कौतुकें, प्रेमें पोटाशीं धरुनी तिला
सासू वदे : वदे आअी कुरवाळुनि त्याजला : २१९
लाजूं नकाचि, बैसा या, अेकत्रस्थितसे तुम्हां
डोळे भरूनि पाहूं द्या प्राणचि अमुचें अम्हां ! २२०
पाहूनि जोडपें दोघी अशा सद्‌गद कीं हृदीं
कोण आअी अणी सासू दोघांही न कळे तधीं. २२१
'पितृदेव मुकुंदाचें§ असते जरि या दिनीं
कोण हर्ष अशी होतां सून सुंदर पाहुनी !' २२२
'आणि बाअी अजी माझी असती विमला ※ जरी
मेहुण्याच्या किती ती या कौतुका करिती तरी !' २२३
अुत्सवांत असें त्याच्या नसें तें स्मरुनीं हृदीं
आनंदाश्रूंतही त्यांच्या दुःखाश्रू गळले तधीं ! २२४
तिथें मुकुल तों येअी : कुमार नवयौवनीं
वयस्य जो मुकुंदाच्या प्राणसा रुचला मनीं. २२५
राजीव लोचनांची ती नवयौवन कोमला
जोडी जिवलगांची ये विश्रमूं मग त्यां सरा. २३३
औदासीन्यें तअीं कांहीं मुकुंद मुकलाप्रती
वदे "होअि कसेसेंची मन्मनीं : हुरहूर ती २३४

‡ आअीसारखाच मायाळू.

§ मुकुंद-हें त्या युवकाचें, कमलेच्या पतीचें नांव. त्याचे वडील लहानपणींच निवर्तले. ती व्याकुल आठवण त्याच्या आअीस झाली.

※ कमलेचीहि विमल नांवाची बहीण तरुणपणींच निवर्तली. तिची आठवण कमलेच्या आअीलाहि व्याकुल करती झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कशाची न कळें लागे ! अुत्सवास्पदिंही मती
रमे न दिनिं ह्या आतां !" "खरेंचि ! रविहा किती !' २३५
–हसें मुकुल, ' छद्मी वा मूर्ख ! कीं असल्या दिना
रेंगाळतो, जसा गेहीं अनाहूतहि पाहुणा ; " २३६
मर्मी परी मुकुंदाच्या विनोद शरसा शिरें
वदे " असाचि हा कां मी कामीं ? तेंचि अहा खरें ! २३७
हें पहा मुकुला, मातें तुजहूनि जगामधें
स्थान संपूर्ण विश्वासा वद कां वसतें कुठें ! २३८
पिता निवर्ततां माझा अल्प मी असतां वयें
मोठें मला लहानाची जाहली करिती स्वयें, २३९
असे आवडती अैशी आअी ही, परि कीं पहा
मर्यादेनें न येती ज्यां सांगतां तिजही, अहा २४०
कामिनीसीहि किंवा ज्या, अशा कोमल भावना
सांगण्या सुहृदाहूनी स्थान अन्य न यौवना. २४१
संगती झुंजलों म्लेंच्छांसह राष्ट्रणीं सदा
भोगिल्या संगती साऱ्या संपदा आणि आपदा. २४६
निजलों अुठलों संगे, वेष संगत सारखे
ओळखूं न जना आलों कोण कोण असे निकें. २४७
माझ्याविना कधी ज्यानें सुख ना अुपभोगिलें
आजि त्या तुज सोडूनी भोगूं कां सुख अेकलें ! –२४८
संगाचे कामिनीच्या मी ? सुहृद्द्रोह असा तिच्या
रूप लंपटतेचे दे मंगला अृतुशांतिच्या ! २४९
म्हणुनी अससी तूं जो अविवाहितची करी–
लाडक्या कमलेसीही स्पर्श मी नचि तों तरी ! २५०
वदे मुकुल मध्येंचि साश्रुं गद्गद ' पावना
प्रेमाच्या या तुझ्या फेडूं शके न तरि कां ऋणा ! २५४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अविवाहित मीही जों तूं व्रतस्थचि तोंवरी
होशी मदर्थ, माझी ती लाडकी कमला परी ? २५८
फुलांहूनि चमेलीच्या हृद्य हास्य जिचें सदा,
संन्यस्त तूं असा होतां रतिच्या पहिल्या पदा २५९
आगींत फूल तें जाअी, हाय ! होरपळूनि कीं !
फुलासि फुलण्याहूनी पाहतां जळता सुखीं २६०
"त्यांतही आपुल्याची वा आअीच्या तुझिया पहा
सुखाचा कमलेच्याही, प्रश्न केवळ काय हा ? २७३
न सख्या अनिरुद्धाचा अेक केवळ, कीं परी
अशेष जनसौख्याचा पाळणा रतिच्या घरीं ! २७४
अशेष जनसौख्या दे धर्म तोची वदे श्रुती,
धर्मदा, शर्मदा, देवी रति – ना सुखदाचि ती !! २७५
राष्ट्रसेवेप्रती झालीं व्रतबद्ध तया अह्मा
रामदासीय दासाही तरी धर्म सुपूज्य हा; २७६
ओजस्विवीर्य–गांधर्व–विधिने अथवा अशा
पूतां वेदी विवाहाची वाढवी निजराट् यशा ! " २७७
" मुकुला मग तूं कां ना विवाह करिसी तरी ? "
" तुझ्यासम न कीं मातें आत्मप्रत्यय अंतरीं ! २७८
यद्यपी राष्ट्रधर्माचा बीजमंत्र विवाह रे,
गंगाची आटतां गंगास्नान–पुण्य कसें घडें ! २७९
परंतु परतेची जैं आपदा प्रिय भू छळी
धर्मार्थंची सख्या होती आपद्धर्म तदा बळी. २८०
अर्धभुक्तचि तैं अर्धांगीच्या बाहुलतेंतुनी
होयरे सखया जाणें हाय ह्या विषमीं रणी. २८१
भीति धीटहि त द्याया प्रीतिचा असल्या हवी :
चळती अचलांचींही शिखरें पडतां पवी, २८२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्यही श्लाघ्यही होती तैं वैवाहिक बंधरे
आत्मदुर्बल जे माझ्यासम, घातुक त्यां त्वरें. २८३
आमुची* देशभक्ती तों निर्नदीकसरोपमा,
तुझी जयांत जन्मा घे गंगा संतत त्या समा ! २९०
धर्मार्थ अेकची त्यागूं आह्मी प्राण : तुम्ही परी
कान्ता, सुतां, स्वतां: आत्मत्याग हा त्रिगुणें तरी ! २९१
ध्येस मी राष्ट्रभक्तीचे क्वचित्, जीवन हो तुझें
पितृत्वाचें, पतित्वाचें, ध्येय राष्ट्र सुभक्तिचें ! २९२
"व्यक्तिसौख्यचि तूं माझें काय ते पुसशी तरी :
मत्सखा मत्सखी तूं ती संगमूनि परस्परीं २९३
द्विधा प्रीति अशी माझी मिश्रा कामरसायनीं
धृतैक-तनु‡ कीं यावी चुंबिता कुरवाळूनी २९४
शुद्ध-संचित- तेजस्वि धृतवीर्य कुमार तूं
योग्य दीक्षित कामाचा सांग हा करण्या ऋतू ! २९५
धर्माज्ञा, जा ! मदाज्ञा, जा ! माझिचीं कमला हृदीं
ठेव जा ठेवशी आलिंगनाच्या कुलुपामधीं ! ! " २९६
'मुकुंदा ! मुकुला !' अैशा हांका मंजुल तों तिथें
नाचनाचतची येती बाला सुंदर आणि ते. २९७
आअीनें जी मुकुंदाच्या प्रेमानें प्रतिपाळिली
प्रेमला कमलेची जी सुभगा भगिनी जुळी. २९८
'मुकुंदा ! मुकुला ! ' बोले ती, 'आला छपुनी न रे
अेकली सोडुनी माते ! आतां जाल कुठें बरें ! २९९

* अविवाहित देशभक्तांना संततिरूपानें देशभक्तांची संतत परंपरा निर्मिण्याचें पुण्य लाभत नाहीं. वाहती नदी अुपन्न न होणाऱ्या सरोवरासारखें तें जीवन होय.

‡ त्यांच्या अपत्यरूपानें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुठें ? कुठें ? ' तयां अेक्या कमलें वदनावरी
मंजु मारित ती ताल प्रश्नांचा अपुल्या धरी. ३००
तलवार अणि माझी ? ते दुर्गेसमची जरी
हस्त आठ तुला होते पेलती तुज ती तरी ! " ३२४
"पुरें हो तें पुरें " ओढी करा ती मुकुलाचिया
बाही सारूनिया त्याची, गुंफुनी स्वकरीं तया, ३२५
वदे हांसत "ये तूंची, मुकुंदा, वद तत्त्वता
कीं या जोड करांतूनी कोणाचा कर कोणता ?" ३२६
आणि कैशोर–कोळें जें गोल, गोंडस, गुंफले,
निष्कलंक करांचे ती अुचलूनि धरी जुळें : ३२७
त्यांत रूपें कळे कैसें कोणाचा कर कोणता
कैशोर–कुड्मलामाजी स्त्रीपुंकेसर झांकतां ! ३२८
' कोणता कर कोणाचा ' मुकुंद हसला, ' अहा !
प्रश्नची हा नुरे वेडे या पाणीग्रहणें * पहा !' ३२९
शुक सारस मैना तों मोर बुलबुल बोलले
"ठीक ठीक ! स्वयंपाणिग्रहीं द्वित्व कसें अुरे !" ३३०
"अर्धांग हाहि ही अर्धांगिनी, यांसि अनंगतो
पूर्णांग करो !" आले वारे मंजुल गात तों ! ३३१
संकल्प झारिनें कारंज्याच्या सोडिती अप्सरा
पिलांचा अिंद्रचापाच्या थवाहीं बहु नाचला : ३३२
मंगलाष्टक गीतें तों गाति कोकिल : ढाळिती
ताज्या गुलाबपाण्यासी गुलाबलतिका किती: ३३३
अत्तरांच्या कुप्या आणी आपुल्या अुघडूनिया
मालती निशगंधांच्या कलिका सरसावल्या : ३३४
रात्र होतां, फराळाशीं जोडपीं नव बैसतां,
तांबूल तोडतां ओठीं गोड ओठहि लागतां : ३४१

* पाणिग्रहण = ' हात धरणे ': श्लेषार्थीं ' वरणें '.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असा दिनभरीं भावें देव जो नव अर्चिला
मनोभाव मनीं साक्षात् प्रभु प्रकट जाहला ! ३४२
ती स्व-स्व-प्रथमर्तूच्या शांतीचीं स्मृतिही अणी
कामव्याकुल तैं सान्या करी कामुककामिनी ! ३४३
पूजका प्रमुखाची जी मदनोत्सव मंदिरीं
त्या व्रताची-व्रतस्था ती कोमला कमलां परी ? ३४४
—गूढ अद्भुत कांहीसें घडणार अतां खरें :
अतर्क्यसौख्यभीतीचीं हृदयंगम वादळें : ३४५
लज्जा अकृतिमा देहीं दे स्वेतोद्गमही जरी :
सत्त्वशीलवतीच्या त्या तरी सात्त्विक अंतरीं ३४६
जडसें, विषयी अैसें, तमोपहतसें नसें
किमपीहि ! शिवावें हो तिला अशिव तें कसें ! ३४७
तिच्या आवडत्या त्या त्या लतांचीं विणलीं फुलें
प्रेमलेनें जअीं तीच्या अलकीं अपुल्या करें : ३४८
पाच माणिक मोत्यांचे अलंकारहि टाकितो
तन्मुखावरुनी ओवाळुनी स्वकिरणें जधीं : ३४९
नमस्कृता वदे आणी श्वश्रू चुंबुनि तीं जंव
' अष्टपुत्रवती वत्से, जा ! सौभाग्यवती भव ! !' ३५०
झणीं तो तंव तत्चित्तीं सासूचा प्रिय ' जा अतां '
नवीन जगतें दिव्यार्थाचीं जागवि अैकतां ! ३५१
सोल्हास ती अणी जाअू निघालीहि तिथें-परी
कासया कमले ?—हारे मदना ! गति खुंटली ! ३६२
लोटिली ती सख्यांनीं तों बळेंचि पतिमंदिरीं
पुढें मन, पदें घेतां मागती वरचेवरी ! ३६३
लाविलीही कडी त्यांनीं : द्वारा व्यर्थचि मारिशी
मुग्धे धके ! न तूं अैके पदांचे, परि जा कशी ३६४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंक तूं स्वमनाचेची कमले कमनीय, जा--
प्राणवल्लभ बोलावी, जा, युवा जिकडे तुझा ! ! ३६५
पुण्य मंचक शय्या ही : बैस बैस शुभे न भी :
चुंबितां कां मधेंची तूं राहसी सुटुनि अुभी ! ३६६
बैस सेजेसि ये तूं ये: स्वयें जनककन्यका
स्पर्शली जीस ती झाली रतिसेज न धन्य कां ? ३६७
देहधर्म कसासाची ? पावने प्रकटे अजी
स्वर्गंगा जीवनाची ही, हे गंगोत्रि, तुझ्यांत जी ! ३६८
ओपी हिरण्यगर्भा ‡ त्या स्वयंभू भगवान् स्वयें
नारांत ज्या: झरा त्यांचा नारि अेक तुझ्यांत ये ! ३६९
तीर्थांची अुगमा घेअी तीर्थता सजनांत § ते
तुझ्यांत : तूं ऋतुस्नाते तीर्थतेसहि तीर्थ तें ! ३७०
तरि घाल फुलांची ती माळ त्या अणि नंतरी
फुलांहूनि मअू माळा करांची निजसुंदरी ! ३७१
फुलांहूनि मअू आणि साखरेहुनिही मिठी
कंठि कोमल त्या घालीं प्रेमाची प्रमदे मिठी ! ३७२
गोड, गोड, मिठी ? वेडे, पुढें त्याहुनिहि अहा
आ[illegible] गोडी : पिअुनी तर तूं पहा ! ३७३
अंगा [illegible] समालिंगी ! विलंब पल ना करी :
कीं असामान्य गे देवी पल हा ! असल्या पलीं ३७४
--सांगावें तें कुणी कीं गे नसतीलचि तीं अुभीं
मंडलें नागकन्यांचीं पाताळीं अणखी नभीं ३७५

‡ 'अप अेव ससर्जादौ तासुबीजमवासृजत्' त्या सृष्टीचें मूलबीज धारण करणाऱ्या अपांना नारा म्हटलें आहे. 'आपो नारा अिति प्रोक्ता' मनुस्मृतींतील ह्या वचनांचा हा अुल्लेख आहे.

§ अनेक जलाशय त्यांच्या कांठीं कोणी प्रख्यात पुरुष राहिला म्हणूनच तीर्थ म्हणून पूर्व प्रख्याती पावते जाहले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अप्सरांचीं घरूनीयां करीं मंगल आरत्या :
लावुनि सनया ओंठा देवदूतततीहि त्या : ३७६
प्रतीक्षत पला ह्याची धन्य ! याचि पला क्वचित्
वर्णितील कवी भावी ' शुभशंसि '† ' प्रसन्न दिक् ! '* ३७७
कीं, कल्याणि, पलीं या जीं ओवुनी हृदयें हृदीं
प्रेरी अनंग पेराया अमृतें अमृता मधीं ३७८
--सांगावें कुणि ! --त्या दिव्या पेरणींतचि संभवा
घेणें असेल अेखादा घनश्यामल राम : वा ३७९
कालेंचि ना गुणेंहि जो ठरे आद्यकवी महा--
कवींत वसुधेमाजी, आजी त्या सम अन्य हा ३८०
वाल्मिकी वा कुणीं गीता द्रष्टा वा नव सारथी
वाङ्मी बृहस्पति शिल्पीमय : भीष्म महारथी : ३८१
किंवा मदालसा, मुक्ता, मीरा वा विदुला कुणी
लावण्याची लता किंवा अुमा देवविमोहिनी : ३८२
वा कुणी विश्ववेधांचा मनु भास्कर§ नूतन :
आश्चर्याच्या अजिंठ्याचा निर्माता, नट, नर्तन, ३८३
नाट्यकार कुणी किंवा लोकीं अद्भुतसा नव :
आसन्नमृत्यु राष्ट्रेंचीं राष्ट्रें ज्या प्रतिभेंतव ! ३८४
नवजीवन पीती तो चंद्रगुप्त, अमात्य † तो,
विक्रमादित्य वा ज्याचा म्लेच्छा विक्रम मर्दितो, ३८५
हिंदु छत्रपति श्रीमान् शिव, वीरवराग्रणी
गुरूगोविंद वा बंदा धर्मवीर नवा कुणी-- ३८६

†-* -'बभूव सर्वं शुभसंसि तत्क्षणं !' ' प्रसन्न दिक्पांसु विविक्तवाता ' प्रभृति कालिदासाच्या काव्यांतील श्लोकांचा हा अुल्लेख आहे. महापुरुषांच्या जन्माच्या स्वागतार्थ अशा घटना घडतात असे पौराणिक संकेत आहेत.

§ भास्कराचार्य. † चाणक्य.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तोंच शय्यागृहाच्या दारावर कुणाची तरी थाप पडली.

मंगलाची परा सीमा ! पेरणींतचि संभवा
घेणें असेल या दिव्या देवभूमि तुझ्यांत वा ३८७
प्रेयाचा स्वर्ग गे स्वर्ग श्रेयाचाहि लुटूं तरी
सख्या समूपभोगीं तूं घट्ट ह्या हृदयीं धरी ! ३९०
न अंग सुभगे चोरी : निर्विकल्प समाधितें
बीजसाधन हें कामासन ! तूं रत हो तिथें ! ! ३९१
आणि पंचशरा ये ये : पंचही शर या पळीं
मार रे सुकुमारीं या मन्मथा मिथुनावरी ! ३९२
प्रेमाचा स्वर्ग सोडोनी, सुखाच्या गगनांतुनीं
कर्मभूमि पुन: येशी हेंचि कीं सुचवूं झणीं ३९८
भीत भीत दुरोनिया वारे वाहत जात ते
अश्वांच्या थ्यथयाटाची ध्वनिती पडसाद ते ! ३९९
अश्व ? सुस्पष्ट ह्या टांपा ! कुणाचे ? सहसा कसें ?
तोच शय्यागृहद्वारीं थापही हळु येतसे ! -- ४००
'मुकुंदा !' थाप आली ना दार तों उघडूनिया
मुकुंद पडला प्रेमें गळयांत मुकुलाचिया ! ४०१
" स्मृति प्रिय तुझी आतां होती होतचि : ये अहा ! "
" प्रिय ? ना ! परि ये कथुं अप्रियची हतभाग्य हा ! ४०२
मुकुंदा वाच तूंची ही राजाज्ञा ! मज दर्शनी
निघणेच रणा ! " " आणी मलाहि, तरि, या क्षणीं ! ४०३
रणीं ना पडले शिंदे ? मराठा तरी कोणतां
दत्ताजींच्या न सूडासी जातां राहिल मागुता ! " ४०४
" मुकुंदा त्यांतही शत्रू म्लेंच्छ येथीलची कुणी
दुर्वार्ता अैकुनी अैशी बंडाअी करण्या झणीं ४०५
रानांत होत आहे ती जमा याचि, तयां प्रती
दंडायासी त्वरें आज्ञा श्रीभाऊ मज सोडिती. ४०६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणूनि या मुहूर्तीची छापा घालुनि तोडितों
असावधचि या रानीं जों ना संहत शत्रु तो, ४०७
अुद्युक्त अश्वसंघांच आकळूनि लगाम रे
वाट पाहति आज्ञेची शिलेदार घुसूं पुढें ! ४०८
रुसशील तसा जाता : म्हणूनि तुज भेटूनि
आलों जाअूं " " अणी मातें काय मागति ठेवुनी ? ४०९
नाहीं, नाहीं, कधीं नाहीं ! मराठा नचि काय मी ! "
परी मुकुल ना बोले संकोचें हृदयीं श्रमी. ४१०
अधोवदनची अंतीं प्रेमगद्‌गद तो पुसे
" जागे, मुकुंद, कीं माझी कमला निजली असे ? " ४११
" लागला लव कीं डोळा आतांची. " " तरी केंवि तें
त्यागूं आतांचि ती व्हावें शिलानिष्ठुर या हृदें ! ४१२
सुखस्वेदज बिंदूंची विंदी डोलत राहिली:
प्रेमसेजे न जों आली नीज ही पहिली पुरी ! ४१३
तोंच सोडुनि जावें त्वां मुकुंदा कमले कसें
फेकावें तें कसें आगीमधेंचि कमला असें ! " ४१४
" आगींतही असें फेकूं कमला न अयुक्त कीं
जरी प्रज्वलली ती कीं देवकार्य–महामुखीं ! ४१५
मुकुला सखया तूंची वदलासि सरोवरीं :
धर्मार्थची कधीं होती आपद्धर्म असे बळी ! ४१६
अुठो हिंदु : अुठो वा ना : मराठा तितुका तरी
आबालबालिका आतां मरो मारित संगरीं ! ४२०
समर्थांची अह्मी दीक्षा घेतली नचि कां ? ह्मणीं
हातावरी शिरा तूंही घेअुनी घुससी रणीं ! ४२१
सरदारचि तूं वीरा श्रीमंत प्रभु भाअुचा,
तरी मीहि नसे कांरे देहची दुसरा तुझा ? " ४२२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तोंचि शीळ हळूं आली ! आली स्फूर्ति हृदीं, मुखीं
वीरश्रीची प्रभा आली वीरवाहु फुरोनि कीं. ४२३
" अहा ! " मुकुल तों बोले पाय टाकिताची पुढें,
' सर्व सिद्ध असे सांगूं अैक शीळ सख्या सुटे ! ४२४
विलंब पल ना आतां शक्य ! हूं चल तूं ! – परी
मातेसी वा बंधू येना पलही कमला पुरी ! " ४२५
आणि सद्‌गद रे दोघे देवद्वारिं तसे झणीं
द्वारीं शय्यागृहाच्या त्या सकंप कर जोडुनी, ४२६
वदे मुकुल " देवा तूं आमुच्या कमले अणी : "
" आमुच्यां प्रेमले देवा " मुकुंद वदला झणीं, ४२७
" आमुच्या प्रेमले, आणी कमलेप्रति " बोलती
दोघेही ते; ' प्रभो रक्षा ! प्रार्थना अितुकीच ती ! ! '' ४२८
राजीव लोचनांची ती यौवनोदय भास्करा
जोडी जिवलगांची त्या साश्रुही करुनी त्वरा ४२९
निजल्या न जिन्यांसीहि कळतां अुतरें जिने,
अुल्लंघिती गृहा–ज्यारे फिरुनीं कधि पाहणें ! ४३०
अुच्छृंखलाश्वसंघांचें लगाम सुटले ढिले,
रान आले, अहा झालें ! स्वार ते सरसावले ! ४३१
खिकाळतो न घोडा वा स्वार श्वास न टाकितो :
तळावरी पडे छापा रिपुच्या सहसाचि तों ! ! ४३२
धडड धडड आगी बंदुका ओकती तों !
तळपति तलवारी ! अेकची गर्ज होतो !
सुटुनि न घटि होत्ये प्रेमशय्या जयातें
क्षण रण गमलें त्या–सत्यही स्वप्नसें तें ! ! ४३३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि भडकुनि शय्यादीप दावाग्नि माते !
वमति रुधिर रंग प्रीतिचे ! बाग पेटे !
दयित ! बकुल ! हारे ! क्रंदता तो न भेटे !
शयनि भिववि होतें–स्वप्नही सत्यसें तें ! ! ४३४

✠ ✠ ✠

कमला (मराठी) खंडकाव्य अंदमानांत लिहून प्रकाशित केलें. प्रथम प्रकाशित १९२३. मूल्य ८ आणे.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुत्वाची व्याख्या : : ९

✠ ✠ ✠

[हिंदु ह्या शब्दाची व्याख्या मोठमोठ्या विचारवंतांनीं केली आहे. परंतु ती व्याख्या करतांना त्यांच्यापुढें हिंदूचे आचार हे मुख्यतः होते. परंतु वीर सावरकरांनीं ही व्याख्या राष्ट्रीय दृष्टचा केली असून आजच्या राज्यकर्त्यांकडूनहि प्रत्यक्ष नसली तरी अप्रत्यक्षरित्या मानली गेली आहे. कारण हिंदु शब्दाची व्याप्ति देतांना आपली आजची घटना, वीर सावरकरांनीं ज्या ज्या पंथाचा 'हिंदु' मध्यें समावेश केला त्यांनाच हिंदु म्हणून मानते. 'हिंदुत्व' हा मूळ प्रबंध हिंदुत्वसम्राट् श्री. वि. दा. सावरकरांनीं ख्रिस्ताब्द १९२४ मध्यें अिंग्रजींत लिहिला. आतां बहुतेक भाषांतून याचीं भाषांतरें झालीं असून अनेक आवृत्त्या काढण्यांत आल्या आहेत.]

✠ ✠ ✠

॥ आसिंधुसिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ॥
॥ पितृभूः पुण्यभूश्चैव स वै 'हिंदु' रिति स्मृतः ॥

हिंदु हा शब्द हिंदुसंघटनाचा केवळ पायाच होय. त्यामुळें त्या शब्दाचा अर्थ ज्या मानानें व्यापक वा आकुंचित, बळकट वा ढिला, चिरंतन वा चंचल त्या प्रमाणांतच त्या पायावर अुभारलेलें हें हिंदुसंघटनाचें प्रचंड बांधकाम व्यापक, भक्कम, टिकाअू ठरणारें आहे. हिंदुमहासभा नी काय तिनें हातीं घेतलेलें, हिंदुसंघटनाचें महत्कार्य काय, त्यांचें 'हिंदु कोण' ह्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्नाचें निश्चित अुत्तर दिल्यावांचून, अेक पाअूलहि दिशाभूल न होतां पुढें पडणें अशक्य आहे, अनर्थावह होणारें आहे.

यास्तव हिंदुसंघटनाचें कार्य ज्यांनीं ज्यांनीं हातीं घेतलेलें आहे त्यांच्या अुपयोगासाठीं या अत्यंत महत्त्वाच्या हिंदु शब्दाविषयीं जी कांहीं माहिती आमच्या मतें प्रत्येक हिंदूला अगदीं मुखोद्गत असणें अवश्य आहे असें वाटतें ती सूत्ररूपानें या लेखांत देण्याचा आमचा अुद्देश आहे. ती देतांना कराव्या लागणाऱ्या त्या सूत्रमय विधानांचें स्पष्टीकरण नी समर्थन देण्याची सोयहि अशा अेका स्फुट लेखांत करतां येणें दुर्घट असल्यामुळें आम्हीं आरंभींच वाचकांना विनवितों कीं ज्यांना तें स्पष्टीकरण नी समर्थनहि पहावेसें वाटेल त्यांनीं तें आमच्या Hindutva ह्या अिंग्रजींतील मूळ ग्रंथांत किंवा निदान मराठी भाषांतराच्या, तिसऱ्या आवृत्तींत अवश्य पहावें. किंबहुना तो मूळ ग्रंथ वाचल्याविना या लेखांतील सूत्रमय विधानांना घाअीनें आक्षेपूं नये कारण त्या पुस्तकाच्या वाचनानें त्या आक्षेपांतील कित्येक आक्षेप अनायासेंच निरसले जातील असें आम्हांस वाटतें.

हिंदु शब्दाचें पुरातनत्व

(१) **हिंदु शब्द मुसलमानांनीं काढलेला नाहीं किंवा आमच्या राष्ट्रास तो प्रथमतः मुसलमानांनीं लावलेला नाहीं**—ज्या काळीं हिंदु शब्दाच्या अुत्पत्तींचें नीटसें संशोधन झालें नव्हतें त्या काळची ही दुष्ट दंतकथा ! ती कशी तें खालीं दिलेल्या 'हिंदु' शब्दाच्या अैतिहासिक अुत्पत्तीवरून दिसून येअील.

(२) **हिंदु, हिंदुस्थान, हिंद या प्राकृत शब्दांचा मूळ अुगम ऋग्वेदकालीन सप्तसिंधु या आपल्या स्वतःच्या प्राचीनतम राष्ट्रीय अभिधेंतच आहे.**—

ऋग्वेदांत 'सप्तसिन्धवः' हा शब्द दैशिक नी राष्ट्रीय अर्थी आपल्या वैदिक कालच्या पूर्वजांनीं स्वतःची राष्ट्रीय अभिदा म्हणून स्वतःस लावलेला आहे.

त्या प्राचीन कालीं आपल्या शेजारचीं अिराण, बाबिलोन, प्राचीन अरब

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रभृति राष्ट्रें हीं आपणांस त्या आपल्या 'सप्तसिन्धु' याच राष्ट्रीय अभिधेनें ओळखीत. **पारसिकांनीं** अडीच हजार वर्षांपूर्वींच्या त्यांच्या धर्मग्रंथांत आपल्या राष्ट्रास 'हप्तहिंदु' असेंच म्हटलेलें आहे. त्या काळाच्या प्राचीन **बाबोलिनिअन** ग्रंथांतून आपल्या अिकडून गेलेल्या झिरझिरीत नि सुरेख वस्त्रांना 'सिन्धु' किंवा 'सिन्धच' म्हटलेलें आहे.

अलेक्झांडरच्याहि पूर्वीं दोनशें वर्षें होअून गेलेला **ग्रीक** अितिहासकार हेकाटेऑस हाहि आपल्या प्राचीन राष्ट्रास आपल्या स्वतःच्याच सिन्धु शब्दाचें ग्रीक रूप जें Indu India या नांवानेंच अुल्लेखित आहे. बौद्धकालीं हिंदुस्थानांत येअून गेलेला **चिनी** प्रवासी ह्युयेत्संग हाहि आपल्या राष्ट्रास सिन्धु ह्या शब्दाचा चिनी अपभ्रंश जो 'शिन्दु' त्याच अभिधेनें संबोधिता झाला. फार काय; महंमद पैगंबर जन्मास येण्यापूर्वीं अरब लोक जेव्हां शैव नी शाक्त पंथांशीं सदृश्य असलेल्या अेका धर्माचे अनुयायी असत आणि जेव्हां मुसलमानी धर्माचें ठावठिकाणदेखील अरबांना ठावूक नव्हतें तेव्हांच दोन **हजार वर्षांपूर्वींच्या अेका अरब ग्रंथांत** आपल्या राष्ट्राविषयीं बोलतांना हिन्द व हिन्दु हीं नांवें गौरवानें अुच्चारलेलीं आहेत. अुदाहरणार्थ लबी बीने अख़तफ बीने तुर्कीच्या खालील ओळी पाहा :--

।। अया मुबारकल अर्जे यो शैयेनोहा मिनल हिंदे ।।
।। वा अरा दक्कला हो मअीयो नज्जेला जिक्रतुन ।। १
।। व हल्ल तज्जली यतुन अैनक सहवि अरब अतुन जिक्रा
।। व हाजे हियोन लज्जेलुर रसूला मिनजा अनल 'हिन्दजून'।।

दुसरा अरब कवि, अरबांच्या मुसलमानपूर्व धर्माचा अभिमानी असा अुमर बीने हाशीम अबुल हकम, महादेवाच्या स्तुतिपर कवितेंत लिहितोः-

।। व अह लोलहा अजरु अरमीमन 'महादेअु' व मनाजेला अिल मुददीने मिनहुम व सेयतरु ।।१।। म अस्सेर अखलका न असानन कल्ल हुम यन हुवा नजू मुन अजाअत सुम्मा गाबुल 'हिन्दु' ।।२।। व सहबी कया

(सा...८)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मा।फिल मका मिल 'हिन्दे' यौमना यकूलूना लात हज्ज न फअिन्नकतो वज्जरु ।।३।।

भविष्यपुराणाचा आधार

येणेंप्रमाणें सिंधुकांठीं निवसणाऱ्या आपल्या वैदिक काळाच्या राष्ट्राची आपली स्वत:ची जी अभिधा 'सप्तसिंधु' तीपासूनच आपलीं हप्तहिंदु, हिंदु, शिंदु, सिंधु, Indus हीं प्राचीन विशेषनांवें पडलेलीं आहेत. अुच्चार भिन्न पण मूळ शब्द सप्तसिंधु हाच. त्याची अेक साक्ष अद्यापहि जी जशीच्या तशी अुरलेली आहे ती म्हणजे सिंधुकांठच्या आपल्या राष्ट्राच्या अेका प्रांतास तरीं आपलें स्वत:चें प्राचीनतम **सिंधुदेश** हेंच नांव अद्यापहि जसेंच्या तसेंच राहून गेलेलें आहे.

(३) हिंदु, हिंदुस्थान हीं प्राकृत रूपें सप्तसिंधु, सिंधु, सिंधुस्थान ह्या संस्कृत नि स्वकीय अशा आपल्या प्राचीन अभिधांचींच प्राकृत रूपें होत ही गोष्ट आपल्या पुरातन पंडितवर्गालाहि ठाअूक होती. तीं नांवें कांहीं आजच बादरायणसंबंधानें जोडलेलीं नाहीत. ह्याविषयीं भविष्यपुराणांतील खालील रूप 'हप्तहिंदु' हें होय असें त्या पुराणांतील खालील श्लोकांत सांगितलें आहे:—

।। जानुस्थाने जैनुशब्द: सप्तसिंधुस्तथैव च ।। हप्तहिंदुर्यावनीति पुनर्ज्ञेया गुरुण्डिक ।।१।।

पुढे शालिवाहन कुलांतील राजांच्या कथा सांगतांना तें पुराण म्हणतें :

।। जित्वा शकान् दुराधर्षान् चीनतार्तरिदेशजान् ।। बाल्हीकान् कामरूपांश्च रोमजान् खुरजान् शठान्।। तेषां कोशान्गृहीत्वा च दंडयोग्यानकारयत् । स्थापिता तेन मर्यादा म्लेंच्छार्याणाम् पृथक्पृथक् ।। सिंधुस्थानमिति प्राहूराष्ट्रमार्यस्य चोत्तमम् ।। म्लेंच्छस्थानं परम् सिंधो: कृतं तेन महात्मना ।। (भविष्यपुराण प्रतिसर्गपर्व, अ. २)

(भावार्थ : बाल्हीक, चीन, तार्तारादिक म्लेंच्छ शत्रूंचें पारिपत्य केल्यानंतर त्या भूपतीनें आपल्या अुत्तम अशा आर्य राष्ट्राची सिंध ही सीमा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठरवली. सिंधूच्या अलीकडील तें आमचें सिंधुस्थान व सिंधूपलीकडील तें म्लेंच्छस्थान होय अशी मर्यादा स्थापली.) अटक अुल्लंघूं नये असा नियम जो प्रचलित झाला तोहि याच काळापासून. 'नागन्तव्यं त्वया भूप पैशाचे देशधूर्तक' या भविष्यपुराणांतील श्लोकांत ही सिंधु ओलांडण्याची बंदी सांगितली आहे.

तिकडे ती सिंधु आणि अिकडे हा सिंधु हें दोनहि अुल्लघूं नयेत; तें अुल्लंघितांच परदेशगमनाचें निषिद्ध कृत्य घडतें. ही सिंधुबंदीची सहस्त्र-दीड सहस्त्र वर्षांची पुरातन शास्त्राज्ञाहि हेंच दर्शवितें कीं, त्या प्राचीन काळापासूनच आपल्या ह्या 'सिंधुस्थानाची' मर्यादा 'आसिंधुसिंधुपर्यंता' हीच समजली जात होती.

(४) सप्तसिंध, सिंधुदेश, सिंधुस्थान प्रभृति शब्दांचें 'हिंदु' हें प्राकृत रूपहि आपल्याच प्राकृतीकरणाच्या नियमानुरूप आपल्या प्राकृतांत रूढावलें–संस्कृत शब्दांतील 'स' चा आपल्या प्राकृतांत विकल्प 'ह' होतो. मारवाडीप्रभृति बोलींत ह्याचीं भरपूर अुदाहरणें आहेत. जसें केसरी-केहरी; सप्ता-हप्ता; सत्तर-हत्तर; दश-दहा. अस्मि, असि, स्मः प्रभृतींचीं प्राकृत रूपें हीं याचींच प्रत्यंतरें होत. आपल्या प्राकृताप्रमाणेंच पुरातन पारसी हीहि संस्कृताचीच अेक प्राकृत भाषा असल्यामुळें अनेक रूपें आपल्याप्रमाणेंच तींतहि साधलेलीं सांपडतात. अेवढ्याचसाठीं तीं रूपें तिकडूनच आलीं असें होत नाहीं किंवा तेवढ्याचमुळें परकीय ठरत नाहींत. हिंदीमधील आज जी अगदी चंदभाटापूर्वींची जुन्यांतील जुनी कविता समजली जाते तींतसुद्धां हिंदुस्थान हा शब्द गौरवानें वापरलेला आहे.

॥ अटल थाट महिपाट अटल तारा थानम् ॥ अटल नगर अजमेर अटल 'हिंदव–अस्थानम्' ॥१॥

'पृथ्वीराज रासा' त पृथ्वीराजाचे समकालीन चंदभाट ह्यांच्या काव्यांत तर आपल्या राष्ट्राचें 'हिंदु' हें अभिधान अत्यंत अभिमानानें आपलें सारें राष्ट्र मस्तकीं मिरवूं लागलें असल्याचें दृश्य पानोंपान आढळतें! हिंदुत्वाच्या अभिमानानें रसरसलेलीं हीं चरणें पाहाः–

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

॥ धनि (धन्य) हिंदु पृथिराज ! जिते रजवट्ट अुजारिय ॥ धनि हिंदु पृथिराज ! बोल कलिमझ्झ अुगारिय ॥ १ ॥ धनि हिंदु पृथिराज ! जेन सुविहानह संध्यो ॥ बारबारह गृहिमुक्की अंतकाल सरबंध्यो ॥ २ ॥ आज भाग चहुवान धर आज भाग हिंदवान ॥ अिन जीवित दिल्लीश्वर गंज न सक्के आन ॥ ३ ॥

' हिंदु ' हा शब्द राष्ट्रीयच

यानंतरच्या काळाविषयीं तर बोलणेंच नको ! आर्यावर्त, भारत प्रभृति यच्चयावत् अभिधानांहूनहि ' हिंदु ' नि ' हिंदुस्थान ' हेच शब्द आमच्या राष्ट्राचे नि राष्ट्रीय जीवनाचे मूर्धाभिषिक्त आदर्श, अभिमान नि अभिधान होअून बसले. प्रासादापासून पर्णकुटीपर्यंत ' मी हिंदु ' ही जाणीव रसरसूं लागली. मी आर्य, मी भारतीय हे न जाणणारे लाखो लोक सांपडले असते पण मी ' हिंदु ' ही जाणीव झोपडी झोपडीपर्यंत कोटचानुकोटि हिंदूंत मुरून गेली. श्रीगुरु गोविंदसिंगांनीं तिकडे पंजाबांत आपलें जीवनकार्य स्वतःच्याच शब्दांत जें सांगितलें तें हेंच की, ' ॥ सकल जगतमें खालसा पंथ गाजे ॥ जगें धर्म ' हिंदु ' सकल भड भाजे ॥ ' अिकडे महाराष्ट्रीय समर्थांची तळमळ होती तीहि हीच की ' या भूमंडळाचे ठायी । ' हिंदु ' अैसा अुरला नाहीं ॥ ' तेजबहादुरासारख्या सहस्रावधि हुतात्म्यांनीं ' हिंदु ' शब्द सोड, नाहीं तर प्राण तरी सोड! अशी शत्रूची धमकी अैकतांच प्राण सोडले, पण हा हिंदु शब्द सोडला नाहीं ! लाखों वीरपुरुष अटक ते रामेश्वरापर्यंत या ' हिंदुत्वा ' च्या मानास्तव पिढयानुपिढ्या समरोसमरीं झुंजले, झगडले, रणीं राहिले. पण शेवटीं अहिंदूंची पादशाही न् पादशाही पायाखालीं तुडवून जेव्हां तें हिंदुपदपादशाही स्थापिते झाले तेव्हां साऱ्या राष्ट्रभर विजयदुंदुभीनीं जी द्वाही फिरविली तीहि हीच कीं, ' बुडाला औरंग्या पापी, ' हिंदुस्थान ' बळावलें ॥ अभक्तांचा क्षयो झाला आनंदवनभूवनीं ॥ '

(५) वर रेखाटलेल्या हिंदु शब्दाच्या अितिहासावरून हें स्पष्ट होतें कीं, हिंदु शब्द हा मूलतः नि मुख्यतः देशिक नि राष्ट्रीय आहे. कोणत्याहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विशिष्ट धर्ममताचाच काय तो निदर्शक नव्हे:– मूळ सप्तसिंधु हा वेदकालीन शब्दच त्या देशाचा नि त्यांत निवसणाऱ्या राष्ट्राचाच मुख्यतः द्योतक होता. सिंधु देश हें आपलें त्या बाजूच्या अेका प्रांताचें नांवहि मुख्यतः दैशिक नि राष्ट्रीयच आहे. परकीयांनीं आपलें तेंच नांव त्याच अर्थी आपणांस लावलें.

हिंदुत्व म्हणजे अेक धर्ममत नव्हे

वेद ह्या धर्म–ग्रंथापासून त्याच्या अनुयायांचें नांव वैदिक हें जसें पडलें, बुद्ध ह्या नांवावरून त्या धार्मिक अनुयायांचें नांव जसें बौद्ध; जिनमताच्या अनुयायांचें जैन; नानकाच्या धर्मशिष्यांचें नांव जसें शिख, विष्णुदेवतेचे अुपासक वैष्णव; लिंगपूजक ते जसे लिंगायत; तसें हिंदु हें नांव कोणत्याहि धर्मग्रंथावरून, धर्मसंस्थापकावरून वा धर्ममतावरून मुख्यतः वा मूलतः निघालेलें नसून आसिंधुसिंधु विस्तारलेल्या देशास नि त्यांत निवसणाऱ्या राष्ट्रासच मुख्यतः निर्देशणारें आहे. आणि **अनुषंगाने** त्याच्या धर्मसंस्कृतींनाहि

यासाठींच हिंदु शब्दाची व्याख्या कोणत्याहि धर्मग्रंथाशीं वा धर्ममताशींच तेवढी बांधून टाकण्याचे यत्न दिशाभूल करणारे ठरतात. हिंदु शब्दाच्या व्याख्येचा मूळ अैतिहासिक पाया आसिंधुसिंधु भारतभूमिका हीच असली पाहिजे. तो देश नि **त्यांत निपजलेल्या** धर्मांच्या नि संस्कृतींच्या बंधनांनी अनुप्राणित झालेलें राष्ट्र हेच हिंदुत्वाचे दोन प्रमुख घटक होत. म्हणूनच हिंदुत्वाची अितिहासाला शक्य तों धरून असलेली व्याख्या अशीच केली पाहिजे की,

आसिंधुसिंधु भारतभूमिका ही ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो हिंदु.

यांतील पितृभू नि पुण्यभू ह्या शब्दांचा, कोणत्याहि व्याख्येंत योजलेल्या शब्दांना असतो तसा, थोडासा पारिभाषिक अर्थ आहे.

'पितृभू' म्हणजे जींत आपले आअीबाप तेवढेच निपजले ती, असा अर्थ नव्हे; तर प्राचीन कालापासून ज्या भूमींत परंपरेनें आपले जातीय नि राष्ट्रीय पूर्वज निवसत आले ती, असा अर्थ आहे. कांहीं जण फटकन शंका घेतात कीं, आम्हीं दोन पिढ्या आफ्रिकेंत आहोंत, मग आम्हीं हिंदु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं कीं काय ? ती शंका यामुळेंच अगदीं अुथळ ठरते. आमच्या हिंदूंनीं साऱ्या पृथ्वीवर जरी अुद्या वसाहती स्थापल्या तरी त्यांच्या प्राचीन, परंपरागत जातीय नि राष्ट्रीय पूर्वजांची पितृभू अशी ही भारभूमीच असणार!

'पुण्यभू 'चा अर्थ अिंग्लिश 'Holy Land' ह्या शब्दांतील अर्थ होय. ज्या भूमींत अेखाद्या धर्माचा संस्थापक ऋषि, अवतार वा प्रेषित (पैगंबर) प्रकटला, त्या धर्मास अुपदेशिता झाला, त्याच्या निवासानें त्या भूमिस धर्मक्षेत्राचें पुण्यत्व आलें, ती धर्माची पुण्यभू. अशी ज्यूंची वा ख्रिश्चनांची पालेस्टाअिन, मुसलमानांची अरेबिया. अशा अर्थींच हा पुण्यभू शब्द वापरलेला आहे, नुसत्या पवित्रभूमि या अर्थी नव्हे.

पितृभू नि पुण्यभू शब्दांच्या ह्या पारिभाषिक अर्थी, ही आसिंधुसिंधु भारतभूमिका ज्याची ज्याची पितृभूमि आणि पुण्यभूमि आहे तो तो हिंदु !

हिंदुत्वाची ही व्याख्या जितकी अैतिहासिक तितकीच आजच्या वस्तुस्थितीला अगदीं धरून आहे. ती जितकी सत्य तितकीच अिष्ट आहे, तितकीच व्यापक तितकीच व्यावर्तकहि आहे.

अपसमजाचें मूळ

हिंदुत्वाची ही व्याख्या जर अगदीं आरंभींच सांपडली असती तर शीख, जैन, फार काय आर्यसमाजीसुद्धां, जे स्वतःला हिंदु म्हणवून घेण्यास मधूनमधून बिचकत आले ते कधींहि मुळांतच बिचकते ना. अिंग्लिशांच्या राजवटीपूर्वी आपल्या साऱ्या पंथोपपंथांना व धर्मसंघाला हिंदुत्वाच्या कक्षेंतच अेकवटावें लागलें होतें – आणि बहुधा तेंच अभिधान आपलें अत्यंत गौरवास्पद कुलभूषण म्हणून आणलें सारें राष्ट्र मिरवीत आलें. किरकोळ अपवाद सोडले असतां मुसलमानांच्या परधर्मद्वेषानें, त्यांना नकळत, आपलें सारें हिंदुराष्ट्र अेकजीव करण्यांत, हिंदुत्वाची जाणीव यच्चयावत् हिंदूंत रसरसवून त्यांना अेकवटण्यांत फारच मोठें साह्य केलेलें आहे. हिंदुस्थानांतील कोटि कोटि लोकांचें त्या मुसलमान राजवटीनें स्वतःच्याच सोयीसाठीं धर्मवेडाच्या निशेंत दोनच तुकडे काय ते पाडले, हिंदु आणि मुसलमान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जो जो मुसलमान नाहीं तो तो हिंदु ! ही त्यांची आडदांड व्याख्या !— पण योगायोगानें तीच अचूक ठरत गेली, आम्हांस हितकारक झाली. कारण त्या योगें (अपवाद वजा जातां) जो जो मुसलमान नव्हता तो तो हिंदुत्वाच्या ध्वजाखालीं येऊन अेकवटला. परंतु अिंग्रजी राजवटीपासून ह्या बहुसंख्यत्वानें डोअीजड झालेल्या हिंदुराष्ट्राच्या अेकवटलेल्या गटांत फाटाफूट ज्यायोगें होअील असे बुद्धिपुरस्सर यत्न विपक्षाकडून होअूं लागले. आणि तेव्हांपासून हिंदु कोण ही व्याख्या करण्याचेहि यत्न बुद्धिपुरस्सर आमच्याहि लोकनायकांना करावे लागले. त्या वेळीं दुर्दैवानें आरंभापासून अेक मोठी दिशाभूल झाली ती ही कीं, हिंदु शब्दाचा संबंध हिंदुधर्माशींच काय तो जोडला जाअून **हिंदुत्वाची व्याख्या न करतां हिंदुधर्माची व्याख्या करूं लागलों**; हिंदुत्वाची सर्वांगीण व्याख्या राष्ट्रीय नि सांस्कृतिक न करतां त्याच्या त्या मुख्य अंगाकडे दुर्लक्ष होअून, त्याची धार्मिक व्याख्याच जो तो करूं लागला. आणि हिंदुसमाजांतील बहुसंख्य लोक अद्यापदेखील वेदानुयायीच असल्यामुळेंच ती व्याख्या सहाजिकपणेंच, वेदानुयायी तो हिंदु अशी करण्यांत आली; अितकेंच नव्हे तर, बहुजन समाजांत मूर्तिपूजा, शेंडी राखणें, गोपूजन प्रभृति, हिंदूंचे जे अनेक आचार आहेत त्यांतून त्याला जें पटेल तेंच हिंदु धर्माचें वैशिष्टच असें समजून, तें मानील तो हिंदु अशा अनेकांच्या अनेक व्याख्या पुढें आल्या. पण तो धर्मग्रंथ, धर्मपंथ, धर्ममत न मानणारे पण हिंदु राष्ट्राचे पूर्वापार अंगभूत असणारे अेकेक भाग त्या व्याख्येमुळेंच हिंदुत्वाबाहेर पडूं लागले ! हिंदुत्व हें मुळांत हिंदूंमध्यें प्रचलित असलेल्या कोणत्याहि धर्ममताहून व्यापकतर असल्यामुळें त्याला बहुसंख्यांकाच्या धर्ममताशीं समानार्थक समजतांच अल्पसंख्यांकांना तो हिंदु शब्द अप्रिय आणि अनिष्टहि वाटूं लागला.

विपक्षाचा डाव कसा सफल झाला ?

'हिंदु' शब्दाची व्याख्या कोणी 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त सनातन धर्म' मानणारा तो 'हिंदु' अशी केली कीं स्मृतिपुराणादिकांना सर्वस्वीं न मानणारे किंवा मुळींच न मानणारे आर्यसमाजीयप्रभृति निव्वळ वैदिक, त्या 'हिंदु'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शब्दास त्यागूं पाहात. बरें, हिंदु म्हणजे जो वेदान्तच तेवढें प्रमाण मानतो तो, अशी व्याख्या केली तर आर्यसमाजीय प्रभृति वैदिक तितका त्यायोगें हिंदु ठरे, पण म्हणूनच जैन, शीख, बौद्ध प्रभृति वेदप्रामाण्य न मानणारे पण हिंदु राष्ट्राचे रक्ताबीजाचे सख्खे भाअू भाअू 'तर मग आम्हीं मुळी हिंदु नाहींच' म्हणून निषेधून अुठत ! शीख, जैन, बौद्ध, आर्यसमाज, ब्रह्मोसमाज, देव-समाज प्रभृति अनेकानेक धर्म वा पंथ मधूनमधून हिंदु शब्दास जे नाकारून अुठले त्याचें मुख्य कारण हेंच होतें कीं, हिंदुत्वाची व्याख्या धार्मिक दृष्टि-कोनांतूनच काय ती घडविण्याची दिशाभूल झाली. हिंदुत्व आणि हिंदुधर्म हे दोन्ही शब्द अेकच असें समजलें गेलें. या फाटाफुटीच्या मुख्य कारणांत विपक्षीयांच्या राजकीय कारस्थानांचीहि भर पडली. परिणाम असा होत चालला कीं हिंदु शब्दाची बुद्धिपुरस्सर व्याख्या जोंवर घडविण्याचा यत्न होत नव्हता, तोंवर जे केवळ परंपरागत भावनेनेंच हिंदुराष्ट्रांत प्राचीन काला-पासून सर्वस्वीं सामावलेले होते ते हिंदुत्वाची धर्मनिष्ठ व्याख्या करूं जातांच अेकेक बुद्धिपुरस्सर रागानें फुटूं लागले—त्यांना फोडण्याचा विपक्षाचा डाव सफलूं लागला.

बहुसंख्यांक अशा वैदिक धर्मासच हिंदुधर्म समजणाऱ्यांनीं हिंदु शब्दाची व्याख्या कोणत्याहि कुटिल हेतूनें केली नव्हती. संघांतील बहुसंख्यांकांच्या लक्षणासच त्या संघाचें लक्षण स्वाभाविकपणेंच बहुधा सर्वत्र समजलें जातें. अितकेंच नव्हे तर हिंदुराष्ट्रांतून अेकहि हिंदु फुटूं नये, अुलट तें राष्ट्र अधिक अधिक संघटित व्हावें असाच त्या पूर्वाचार्यांचा, हिंदु शब्दाच्या धर्मनिष्ठ व्याख्या करण्यांत सदहेतु होता. पण **दिशाभूल न कळत झाली. अिच्छेविरुद्ध दुष्परिणाम झाला.**

परंतु हिंदुत्वाच्या लेखाच्या या मथळचावर दिलेल्या व्याख्येमुळें आतां त्या गैरसमजाच्या मुळावरच कुऱ्हाड घातल्यासारखी होते. व्याख्या म्हटली कीं अखंडांत खंड पाडणें. अगदीं भौगोलिक प्रदेशाच्या सीमादेखील अुभयपक्षीं सामान्यच राहतात. मुसलमानी धर्मांतहि असे अनेक पंथ आहेत कीं जे मुस्लिम की गैरमुस्लिम हा वाद व्याख्येनें मिटत नाहीं. अुदाहरणार्थ सध्याच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंजाबमध्यें फणफणलेला कादियानी पंथाचा वाद पाहा! मुस्लिमपणाच्या व्याख्येंत ते सामावत नाहींत म्हणून अेक पक्ष म्हणतो. सामावतात म्हणून दुसरा म्हणतो. मारहाण होण्यापर्यंत पाळी आली आहे. ख्रिस्त्यांतहि तीच स्थिति. मार्मोन पंथियांचें अुदाहरण पाहा. त्याप्रमाणें प्रत्येक व्याख्येचा सीमान्त हा विवादास्पद असतो तसा ह्या व्याख्येचाहि असला तथापि **अधिकांत अधिक सत्य, हित नि सुलभ अशी आज तरी हिंदुत्वाची तीच अेक व्याख्या अुपलब्ध आहे.** तिच्यायोगें धर्मविषयक प्रश्नांच्या दुर्लंघ्य दलदलीला साफ बगल देअून हिंदुमात्र तितुका अेकाच हिंदुध्वजाखालीं अेकवटण्याचा राजमार्ग मोकळा करून दिला गेला.

हिंदु कोण नि अहिंदु कोण ?

श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रमाण मानतात ते 'सनातनी', केवळ श्रुति प्रमाण मानतात ते 'वैदिक.' स्वतःच्या धर्मास वैदिक धर्माची शाखा वा विकासहि न मानतां अगदीं स्वतंत्र धर्म मानणारे जैन, शीख, वौद्ध (भारतीय बौद्ध) प्रभृतींपैकीं कोणालाहि त्याची धर्मनिष्ठा लवलेशहि न सोडतां हिंदुत्वाच्या व्याख्येप्रमाणें आपण हिंदु आहोंत हें सुखासमाधानाने मानतां येते, किंबहुना नाकारतांच येत नाहीं. त्याचप्रमाणें मुसलमान, ख्रिस्ती ज्यू, प्रभृति जे अहिंदु आहेत ते तसे कां हेंहि निर्विवादपणें सांगतां येतें- कसें तें पाहाः--

जैन हिंदु कां ?--तर अगदीं वैदिक कालापासून त्यांच्या पितरांची परंपरागत पितृभू ही भारतभूमिका आहे आणि त्यांच्या तीर्थंकरादिक धर्मगुरूंनीं त्यांचा धर्म ह्याच भारतभूमींत प्रकटविल्यामुळें ती त्यांची पुण्यभू-Holy Land-ही आहेच आहे. **ह्या अर्थी नि ह्या अर्थींच काय ते** आपण हिंदु आहोंत हें आमचे बहुसंख्य जैन बांधव समाधानपूर्वक मानतील कारण तें अैतिहासिक सत्य आहे, आणि त्यांच्यापैकीं ज्यांचा असा विश्वास आहे कीं त्यांचा धर्म हा वैदिक धर्माची शाखा नसून अगदीं स्वतंत्र वा अवैदिक आहे त्यांच्या त्या निष्ठेला ह्या व्याख्येमुळें मुळीच धक्का लागत नाहीं. हिंदु म्हणजेच वैदिक असा त्या शब्दाचा चुकीचा अर्थ सहजीं होत होता तेव्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मात्र तशा स्वतंत्र धर्ममतवादी जैनांना त्या अर्थी स्वतःस हिंदु म्हणवणें हें विषम वाटणें अपरिहार्य होतें.

शीख हिंदु का ?——कारण अगदीं वैदिक सप्तसिन्धूपैकींच सिंधु तें सरस्वतीपर्यंतच्या आर्यांच्या मूलस्थानांत त्यांचा परंपरागत निवास आजहि असल्यामुळें त्यांची पितृभूहि भारतभूमि आहे आणि त्यांच्या नानकादिक धर्मगुरूंनीं तो शीखधर्म प्रथम ह्याच भूमींत प्रकटल्यामुळें, त्यांच्या धर्माचें मूळच ह्या भूमींत धरलेलें असल्यामुळे, ही भारतभूमि त्यांची पुण्यभू आहे, Holy Land आहे ! म्हणून शीख हिंदु आहेतच आहेत; मग ते वेद मानोत वा न मानोत. मूर्तिपूजा करोत वा न करोत.

आर्यसमाजीय हिंदु कां ?——ते तर कोणासहि ह्या पितृभूमीच्या अभिमानांत ममत्वांत हार जाणारे नाहींत आणि ह्या भारतभूमीला पुण्यभूमित्वाचा मान सर्वांआधीं देतात. ते हिंदु आहेतच आहेत; मग ते पुराणें नि स्मृत्या मानोत वा न मानोत !

तीच गोष्ट लिंगायत, राधास्वामीय प्रभृति आमच्या यच्चयावत् धर्मांची वा धर्मपंथांची होय. फार काय **भिल्ल, संताळ, कोलेरियन** प्रभृतींपैकीं जे कोणी भूत, प्रेत वा पदार्थपूजक (Abimists) असतील त्यांचीदेखील परंपरागत पितृभू भारतच; आणि त्यांचे पूजापंथहि मुळापासून माहिती मिळते त्या अवधींत तरी याच भारत–भूमीस पुण्यभूहि मानीत आलेले; यास्तव तेहि हिंदुच होत. अशा प्रकारें हिंदु तितका या व्याख्येंत सहजीं सामावला जातो.

पण मुसलमान–ख्रिस्ती–ज्यू हे हिंदु कां नाहींत ?–तर यद्यपि त्यांपैकीं कित्येक बाटलेल्यांची परंपरागत पितृभूमि ही भारतभूमिच असली तथापि त्यांचे धर्म अरबस्थान, पालेस्टाअिन प्रभृति भारतबाह्य देशांत अुपजल्यामुळें, ते त्या भारतबाह्य देशांनाच आपली Holy Land पुण्यभू मानणार. ही भूमि त्यांची पुण्यभू नाहीं म्हणून ते हिंदु नाहींत.

तसेंच चिनी–जपानी–सयामी प्रभृतिहि पूर्णपणें हिंदु कां नाहींत ?–तर ते धर्माचे जरी हिंदु (बौद्ध) असले, म्हणजे भारतभूमि ही जरी त्यांची पुण्यभू असली तरी भारतभूमि ही त्यांची पितृभू नाहीं. त्यांचें आमचें धर्माचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नातें. **पण राष्ट्रभाषा, वंश, अितिहासप्रभृति सर्वथा भिन्न; त्यांचें आमचें राष्ट्राचें नातें मुळापासूनच नाहीं म्हणूनच तें हिंदुधर्माचे अंतर्गत असले तरी संपूर्ण हिंदुत्वाचे अधिकारी होअूं शकत नाहींत.** वस्तुस्थितिहि अगदीं तशीच आहे. जपानी, चिनी हे स्वतःस हिंदुधर्माचे अनुयायी बौद्ध या नात्यानें म्हणवतील. पण हिंदुराष्ट्राचे अंगभूत राहणार नाहींत, अंकित तर म्हणवणार नाहींतच नाहींत. **हिंदुधर्मपरिषदेंत** ते समानतेनें सामावले जाअूं शकतील—पण **हिंदुमहासभेंत**, म्हणजेच आमच्या **हिंदुराष्ट्रसभेंत** ते सामावूं शकणार नाहींत. त्यांच्या राष्ट्रसभेंत आम्हीं सामावूं शकणार नाहीं. पण वैदिक, शीख, भारतीय बौद्ध, जैन, सनातनी प्रभृति आम्हीं हिंदुत्वाचे पूर्णपणें अधिकारी असलेले आम्हीं अेकराष्ट्रीयहि आहोंतच आहोंत, कारण भारतभूमि आमची नुसती पुण्यभूच नसून पितृभूहि आहे.

शुद्धीकृतांचा प्रश्नहि ह्या व्याख्येनें तसाच सोडवला जातो; जे पूर्वी हिंदुच होते ते शुद्ध होतांच पूर्णपणें हिंदुत्वाचे अधिकारी होतात. कारण त्यांची पितृभू नी पुण्यभू भारतभूमिच होते. परंतु जे अमेरिकन, अिंग्लिश प्रभृति परराष्ट्रीय, ज्यांची पितृभू भारतभूमि नाहीं, ते हिंदुधर्म स्वीकारतांच **धर्मानें हिंदु होतील, पण राष्ट्रीय दृष्टचा निराळेच राहाणारे असल्यामुळें संपूर्ण हिंदुत्वाचे अधिकारी होणार नाहींत,** कारण त्यांची पुण्यभू भारतभूमि झाली तरी पितृभू दुसरी असणार. त्यांच्यांतील **जे कोणी शरीरसंबंधानें आमच्याशीं विवाहबद्ध होतील—म्हणजेच वंश, जाति, राष्ट्र ह्या दृष्टीनें आमच्यांत रक्त-बीजांनीं अेकवटून जातील किंवा हिंदुस्थानचें नागरिकत्व संपादून त्याला पितृभू मानतील ते मात्र पूर्णपणें हिंदुत्वाचे अधिकारी होतील. साऱ्या जगभर** हिंदुधर्माचा प्रचार करण्यास ही व्याख्या कोणतीहि आडकाठी घालीत नाहीं.

अुपसंहार

अेका लेखाच्या मर्यादेंत शक्य तितक्या विस्तारानें हिंदु शब्दाची फोड करून त्याच्या प्रस्तुतच्या व्याख्येनें हिंदु कोण नि अहिंदु कोण हा प्रश्न बहुतांशीं निर्विवादपणें कसा सोडवितां येतो हें दाखविलें. अर्थातच आतां तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदु शब्द त्या सुनिश्चितार्थींच आपण वापरण्याची अतोनात काळजी घेतली पाहिजे. त्याचा प्रयोग योग्य अर्थी कसा नि कां करावा हें वर विशदिल्यामुळें त्याचे अपप्रयोग कसें टाळावें तेंहि अनायासेंच त्यांत दिग्दर्शिलें जात आहे. परंतु तथापिहि त्याचा अेक **अत्यंत आत्मघातक अपप्रयोग** जो आपणांस अगदीं कसोशीनें टाळला पाहिजे तो तेवढा स्वतंत्रपणें अुल्लेखिणें भाग आहे. ज्यांना हिंदुसंघटनेची अत्यंत तळमळ आहे अशा पुढाऱ्यांच्या तोंडीं, वृत्तपत्रांतून, अितकेंच नव्हे तर प्रत्यक्ष हिंदुमहासभेंतील वाक्पीठावरूनहि ' हिंदु आणि जैन, ' ' हिंदु आणि शीख, ' ' हिंदूंची अस्पृश्यांना सहानुभूति ' असे शब्दप्रयोग केवळ पूर्वापार संवयीमुळें झटकन् योजलेले आढळतात. वाक्यें अशीं असावयास पाहिजेत की ' स्पृश्यांनी अस्पृश्यांना देवळें अुघडावीं. ' हिंदूंनी अस्पृश्यांना देवळें अुघडावीं हा अपप्रयोग होय; कारण दोघेहि हिंदूच ! ' शिखांना शिखेतर हिंदूंची सहानुभूति आहे; पंजाबांत वैदिक नी शीख ह्यांना अेकजुटीनें मुसलमानी आक्रमणास प्रतिकारावें ' अशीं वाक्यें पाहिजेत. शिखांना हिंदूंची सहानुभूति आहे; शिखांनी आणि हिंदूंनीं मुसलमानांस प्रतिकारावें हें **घातक अपप्रयोग होत कारण त्यांत जें सिद्ध करावयाचें तेंच असिद्ध होतें**; शीख नी हिंदु हे पृथक् होत, शीख हिंदु नाहींत, हें नको तेंच सूचित होतें. फार काय, वृत्तपत्रांतून अशीं वाक्यें देखील येतात कीं, ' जैनांना आम्हा हिंदूंची अशी विनंती आहे कीं, त्यांनी आपण हिंदु नाहीं असा दुराग्रह धरूं नये ! ' ह्या वाक्याहून वदतोव्याघाताचें अुदाहरण तें दुसरें काय द्यावें! जुन्या सवयीनें गंजलेल्या लेखण्या आतां आम्ही फेंकून दिल्या पाहिजेत. हिंदु हा शब्द वैदिक वा सनातनी अशा कोणत्याहि पाक्षिक अर्थी न वापरतां तो त्याच्या स्वतंत्र, व्यापक नि निश्चितार्थींच वापरावा. कालच्याच दैनिकांत पाहा ' हिंदु व शीख हे दोनहि समाज जिन्हांशीं चर्चा करीत आहेत, ' अशीं वाक्यें किती घातक आहेत बरें? पण तीं प्रत्यहीं वापरण्यांत येतात ! धार्मिक दृष्टीच्या पोटभेदांस व्यक्तपणें तर जैन, शीख, वैदिक, आर्य, सनातनी हें तदर्थक विशिष्ट शब्द योजावेत. हिंदु नि आर्यसमाजी असें न म्हणतां सनातनी नी आर्यसमाजी म्हणावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुत्वाची व्याख्या सरकारांतहि नोंदवून घ्यावी

त्याचप्रमाणें आपल्या लहरीसरशी शिरगणतिमध्यें वाटेल त्यास 'हिंदु विभागांतून' फोडून वाटेल त्यास निराळें नोंदण्याचा सरकारी प्रघात हिंदुत्वाची आपली कोणतीहि निश्चित व्याख्या नव्हती म्हणून जो अितका बळावला त्याला आळा घालण्यासाठीं ही सत्य, सोपी आणि आतां पुष्कळ संस्थांनीं मानलेली हिंदुत्वाची व्याख्याच आम्ही अेकमुखानें पुढें करावी आणि येत्या शिरगणतीच्या आधीं ती नोंदवून घ्यावी, म्हणजे तुमची व्याख्याच नाहीं हें निमित्त तरी कोणास सांगतां येणार नाहीं.

प्रत्येक हिंदूला हें तोंडपाठ झालें पाहिजे कीं, आसिंधुसिंधु भारतभूमिका ही ज्याची ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो तो हिंदु ! !- संध्येसारखा हा मंत्र आमच्या मुलांकडून प्रातःस्मरणांत जपवला पाहिजे कीं:

।। आसिंधु–सिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ।।
पितृभुः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ।।१।।

✠ ✠ ✠

हिंदुत्व : (अिंग्रजी, गुजराथी, अिंग्रजी) मूल्य रु. २–८ आ.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रहस्यकार आणि अुपयुक्ततावाद :: १०

✠ ✠ ✠

[श्रीमद्भगवद्गीतेचा अर्थ विशद करणारे ग्रंथ बहुतेक हिंदु विद्वानांनीं लिहिले आहेत. लोकमान्य टिळकांनीं त्यासंबंधीं 'गीता-रहस्य' हा ग्रंथ लिहून गीतेचा कर्मयोगपर असा नवीन अर्थ लावला. त्या गीतारहस्याचें परीक्षण करणारा हा लेख ख्रिस्ताब्द ४ ऑगस्ट १९२५ मध्ये केसरींत प्रसिद्धिला गेला. अजूनपर्यंत तो दुसऱ्या कोणत्याहि पुस्तकांत संग्रहित केला गेला नाही. त्यामुळें सावरकर वाङ्मयाच्या तज्ज्ञ वाचकांनाहि तो नवीन वाटल्यावांचून राहणार नाहीं.]

✠ ✠ ✠

सूक्ष्मो हि भगवन्धर्मः परोक्षो दुर्विचारणः।
अतः प्रत्यक्षमार्गेण व्यवहारविधिं नयेत् ॥

युरोपमध्यें भौतिक शास्त्रांची दिवसेंदिवस अेकसारखी वाढ होत राहिल्यानें आणि नवीन नवीन शास्त्रीय शोधास व प्रगतीस धनाची, सवडीची व सत्तेची जी जोड मिळणें अवश्य असते ती जोड आणि तो पाठिंबा तिकडे मिळत असल्यानें व आपल्या अिकडे मिळणें दुर्घट झाल्यानें भौतिक शास्त्रांत युरोपीय वाङ्मयांत जसे ग्रंथ निर्माण होत आहेत तसे आपल्या हिंदी भारतीय वाङ्मयांत अजून निर्माण होत नाहींत. हें जरी खरें आहे तथापि बौद्धिक शास्त्रांत प्रस्तुत आपल्या मराठी, हिंदी, बंगाली, तामील, तेलगू अित्यादि भारतीय भाषांतून किंवा अिंग्रजीमधूनहि भारतीय विद्वानांनीं कांहीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं असे अुत्कृष्ट प्रतीचे ग्रंथ प्रसिद्ध केलेले आहेत कीं, युरोपमध्यें त्या विषयावर त्या तोडीचे ग्रंथ क्वचितच आढळतात. युरोपीय वाङ्मय व परिस्थिति यांचा अभ्यास करून युरोपीय विद्वान् त्यांचे ग्रंथ लिहितात. अर्थातच युरोपव्यतिरिक्त पौर्वात्य जगाच्या ज्ञानाची व परिस्थितिची जोड त्यास न मिळाल्यानें ते थोडेबहुत व कधीं कधीं तर बव्हंशीं अेकदेशीय असतात. पौर्वात्य वाङ्मय व त्यांतहि 'जुनें तितकें सोनें' या मंत्राचा अखंड पाठ करीत, पौराणिक परिस्थितीच्या मर्यादेंतच स्वतःला कोंडुन घेणारे आमचे जे जुने पंडित ग्रंथ लिहितात तेहि भारताबाहेरील जगाच्या ज्ञानास आणि अनुभवास आंचवले असल्यानें तेहि केवळ युरोपीय विद्येचेंच अध्ययन केलेल्या विद्वानांच्या ग्रंथाप्रमाणेंच, आणि केव्हां केव्हां तर त्यांच्या अेकदेशीपणावरहि ताण करतील असे, आकुंचित आणि अप्रगामी असतात.

पाश्चात्त्य व पौर्वात्त्य पंडित

अेक पक्ष युरोपीय व पाश्चात्त्य भ्रमानें दूषित तर दुसरा भारतीय व पौर्वात्त्य प्रौढीनें अंध. आजपर्यंतच्या युरोपीय वा भारतीय पंडितांच्या ग्रंथांत हा अेकदेशीपणा आढळणें हेंच वरील कारणानें अपरिहार्य होतें. परंतु आतां युरोपीय विद्वानांच्या अुच्च व अुदात्त विचाराचें ज्यांनीं परिशीलन केलेलें असूनहि अेखाद्या सव्यसाचीप्रमाणें जें आपल्या भारतीय शास्त्रींतहि निष्णात आहेत अशा विद्वानांचा प्रादुर्भाव आपल्या हिंदुस्थानांत होअूं लागल्यानें त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांतून युरोपीय व भारतीय या अुभय विचारपद्धतीचें केवळ खुद्द मिश्रणच नव्हे तर समन्वयहि दिसूत येत आहे. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वशास्त्र, नीतिशास्त्र, अित्यादि शास्त्रांवर गेल्या वीस-तीस वर्षांत मराठी, बंगाली व अितर भारतीय विद्वानांनीं लिहिलेल्या ग्रंथांत कांहीं ग्रंथ असे आहेत कीं, त्या विषयावरील युरोपीय ग्रंथांत त्यांस तोड मिळत नाहीं. कारण युरोपीय विद्वान् पौर्वात्य ज्ञानास, अनुभवास व परिस्थितींस अपरिचित असल्याने व पौर्वात्य पंडित पाश्चिमात्य ज्ञानाशीं परिचित नसल्यानें या दोहोंच्या ग्रंथांतून आढळणारा संकुचितपणा या आजकालच्या आपल्या जाडच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय विद्वानांच्या ग्रंथांत त्यांनीं अुभयविध ज्ञानांचा, परिस्थितींचा व अनुभवांचा व्यासंग केला असल्यानें आढळून येत नाहीं. संस्कृतादिक पौर्वात्य ज्ञानाची गंगा पाश्चिमात्य ज्ञानाच्या यमुनेशीं आणि शोणाशीं संगम पावून अशा ज्या ग्रंथतीर्थांतून आपल्या संपूर्ण वैभवानें अवतीर्ण झालेली आहे त्या भारतीय विद्वानांनीं लिहिलेल्या अर्वाचीन ग्रंथांत लोकमान्य टिळकांचा श्रीमदभ्गवद्गीतारहस्य ग्रथ केवळ सरस्वतीच्या मुकुटमण्याप्रमाणें शोभत आहे.

अपयुक्ततावादाचा विचार

गीतेंतील कर्मयोगाच्या विवेचनांत भारतीय नीतिशास्त्र अथवा कार्याकार्यव्यवस्थितिविषयक तत्त्वांची पाश्चात्त्य मताशीं तुलना करीत असतांना रहस्यकारांनीं युरोपीय नीतिशास्त्रांनीं अुपयुक्ततावादाविषयीं जीं मतें अवलंबिलीं आहेत त्यांचेंहि समालोचन क्रमप्राप्त म्हणूनच केलेलें आहे. तें करतांना अुपयुक्ततावादांतच जे अनेक पोटभेद आहेत त्यांच्यातील दोषाविष्करण करून गीतेमध्यें प्रतिपादित असलेल्या कर्मयोगाच्या तत्त्वाचा, अुपपत्तीचा व व्यवस्थितीचा अूहापोहहि त्यांस करणें अवश्य झालें. परंतु केवळ तुलनेचें कार्यच त्यांस करावयाचें असल्यानें अुपयुक्ततावादांतील दोषच तेवढे निवडून ते गीतेंतील तत्त्वज्ञानांत निरस्त केलेले आहेत. हें दाखविण्याचें त्यांचें कार्य रहस्यकार करीत असतां सामान्य वाचकांचा असा समज होण्याचा संभव आहे कीं, रहस्यकारांनीं संक्षेपानें अुल्लेखिलेले दोष हें अुपयुक्ततावादांतील कांहीं पक्षांच्या विचारपद्धतीचे दोष नसून तें त्या अुपयुक्तता तत्त्वाचेंच अपरिहार्य व्यंग आहे. परंतु वास्तविक स्थिति तशी नाहीं आणि अुपयुक्ततावादाचें सर्वसामान्य महत्त्व हें विवेचनात्मक परीक्षण चाललें असताना आणि त्यांतील स्फुट दोषाविष्करण करीत असतांहि रहस्यकार जाणून होतें. परंतु त्यांचें मुख्य कार्य अपयुक्ततावादाची सर्वतोपरीं छाननी करण्याचें नसून त्यांतील कांहीं व्यंगें प्रामुख्यानें अुल्लेखून त्यांच्या कर्मयोगाच्या ब्रह्मात्म्यैक्य अुपपत्तीनें निरास कसा करता येतो तें दाखविण्याचा असल्यानें त्यांनीं साहजिकच अुपयुक्ततावादाच्या सर्व-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामान्य थोरवीची चर्चा प्रामुख्यानें केलेली नाहीं. तथापि तदर्थक अुल्लेख हे त्यांच्या लेखणींतून बऱ्याच ठिकाणीं प्रत्यक्षपणें व अनेक ठिकाणीं अप्रत्यक्ष-पणें अुतरलेले आहेत. अुदाहरणार्थ, रहस्याच्या ८८ व्या पानांत (प्रथमावृत्ति) ते म्हणतात : " पुष्कळांचें पुष्कळ हित " हें तत्त्व अगदींच निरुपयोगी आहे असें आमचें म्हणणें नाहीं. " **केवळ बाह्य गोष्टीचा विचार कर्तव्य असतां यापेक्षां दुसरें अुत्कृष्ट तत्त्वच मिळावयाचें नाहीं...**परंतु केवळ याच तत्त्वावर अवलंबून राहतां येत नाहीं. "

अुपयुक्ततावाद म्हणजे तें वर्तन नैतिक होय कीं ज्यायोगें शक्य तितक्या अधिक मनुष्यांचें शक्य तितकें अधिक हित साधलें जातें. या मताचा वास्तविक पाहतां रहस्यकारांनीं प्रतिपादिलल्या गीतेंतील आत्म्यैक्यप्रतीतीनें अंगीं बाण-लेल्या आणि सर्वभूतहितरत असणाऱ्या साम्यबुद्धीच्या किंवा शुद्ध बुद्धीच्या नीति तत्त्वाशीं कांहींच विरोध नाहीं.हें अुपयुक्ततावादाचें किंवा थोडक्यांत हितवादाचें तत्त्व पाश्चात्त्यांनी प्रथमच शोधलें आहे असें नसून तें महाभारताच्या अनेक श्लोकांतून ग्रथिलेलें वा सूचित केलेलें आहे. आम्हांस तर असें वाटतें कीं, अगदीं पहिला व प्रख्यात अुपयुक्ततावादी जर कोणी असेल तर तो पार्थसारथी भगवान् श्रीकृष्ण होय. रहस्यकारांनी अुपसंहारांत गीतेमध्यें प्रतिपादित अस-लेल्या आत्मौपम्यभावानें सर्वभूतहिततत्पर असणाऱ्या शुद्धबुद्धि स्थित-प्रज्ञाच्या ज्या वर्तनास नीतीचा पाया म्हणून, नीतीचें मापन म्हणून, नीति-शास्त्राचा आधार म्हणून निर्दिष्ट केलेलें आहे. त्या वर्तनाचा अुपयुक्तता-वादाशीं कसा विरोध येत नाहीं अितकेंच नव्हे तर ते अेकमेकांचे कसे पूरकच आहेत हें खालील अत्यंत संक्षिप्तपणें केवळ सूचित केलेल्या प्रमेयांवरूनहि स्पष्ट होअील.

सुखवाद म्हणजे काय ?

प्रथमतः सुखवाद किंवा हितवाद म्हणजे पुष्कळ वैषयिक सुखच होय असें नाही. अुलट या जगामध्यें वा परलोकावर विश्वास असणाऱ्याच्या विश्वासाप्रमाणें परलोकांतहि शक्य तितकें असणारें, लभ्य तितकें होणारें

(सा...९)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुख म्हणजे आत्यंतिक सुख होय. वैषयिक सुखाहून अध्यात्मिक सुख पुष्कळ अंशी चिरकालीन, अपरतंत्र आणि अुत्कृष्ट असल्यानें अुपयुक्ततावादाप्रमाणेंहि तेंच अुपार्जनीय आणि नैतिक ठरतें. सुख शब्दाचा अध्यात्मिक सुख या अर्थी प्रत्यक्ष गीतेंतहि अुल्लेख केलेला आहे. "सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियं", "सुखमत्यंतमश्नुते" सुख शब्दाच्या ठिकाणीं हित शब्द घातला म्हणजे वादच अुरत नाहीं. नीतीची पराकाष्ठा सर्वभूतहितरतत्त्व आहे हेंच गीतेचें रहस्यकारांनीं नीतिसर्वस्व ठरविलेलें आहे. आणि अुपयुक्ततावादाचा हाच सिद्धान्त आहे कीं, ज्यायोगें फार अधिकांत अधिकांचे सुख वा हित साधलें जाअील तें कर्म विहित होय.

त्यांतहि सर्वभूतहितरतत्व या शब्दांतील सर्वभूत या पदाचा अर्थ आपण करूं लागलों तर आपणांस अंतीं अुपयुक्ततावाद्यांच्या परिभाषेचाच आश्रय करावा लागतो. कारण सर्वत्र अेकच अविच्छिन्न आणि अविच्छेद्य असें सघन ब्रह्मच भरलेलें आहे हें जरी सत्य असलें आणि हीं अुपयुक्ततावादाशीं, साम्यबुद्धीच्या मताशीं, ती आहे त्याहून अधिक विरोधी होअूंच शकत नाहीं–तथापि अेकदां ब्रह्मसृष्टींतून मायासृष्टींत पाय टाकला कीं तेथें भेदाभेद अुत्पन्न होतो आणि म्हणूनच नीतिअनीतीचा प्रश्न अुद्भवतो. ब्रह्मसृष्टींत माझा आत्मा तोच दुसऱ्याचा हें वाक्यदेखील अर्थपूर्ण ठरणारें आहे– ". तेथें हें कांहींच न लगे !" पण आत्मैक्यबुद्धीनें कां होअीना पण अेकदां साम्याच्या आकाशांतून आपण वैषम्याच्या स्थिर पण जड भूमीवर अुतरलों म्हणजे तेथें सर्वभूतहितरतत्व याचा अर्थ अक्षरशः सर्व भूताचें हित असा घेणें अशक्य होतें.

नैतिक घोटाळे

माझ्या आत्म्यास जें अनुकूल तेंच मी दुसऱ्याच्या आत्म्यास अनुकूल आहे असें समजून चालूं लागलों तर चालणें हें जितकें अशक्य तितकेंच न चालणेंहि अशक्यच होअून जातें. जगणें हें जितकें अनीतीचें तितकेंच मरणें हेंहि अनीतीचें होतें. कारण चालावें जगावें तर "पक्ष्मणोऽपि निपातेन येषां स्यात् स्कंधपर्ययः" असें सूक्ष्म हजारो जीव माझ्याच आत्म्याप्रमाणें ज्यांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जगावेसें वाटतें ते मारले जातात. न जगावें तर, न चाललें तर, माझा आत्मा दुःख पावतो. आत्महत्या घडते आणि पुनः चालतां चालतां मारलें जातात त्याहून बसल्या बसल्या कांहीं कमी जीव मारले जातात असेंहि नाहीं ! बरें, सर्वभूत ह्या शब्दाचा अर्थ सूक्ष्म भूतें सोडून दृश्य भूतें असा घेतला तरी निर्वाह होत नाहीं. कारण व्याघ्र अेकाद्या आश्रमांतील सवत्स गाअीवर तुटून पडतांच स्थितप्रज्ञ ऋषिदेखील व्याघ्रापासून गाय सोडविण्या-साठीं व्याघ्रास ठार मारविणें नीति समजत. आतां आत्मौपम्य दृष्टीनें गाय न मरूं देणें हें नीतियुक्त आहेच आहे. पण व्याघ्राचें भक्ष्य हिसडून त्याची क्षुधापीडिता वाढविणें किंबहुना त्याचा प्राणहि घेणें हें केवळ आत्मौपम्य दृष्टीनें अनीतीचेंच ठरणार.

महाभारतांत आलेल्या दरवडेखोरांच्या दृष्टान्तांतहि केवळ आत्मौ-पम्यबुद्धि वा सर्वभूतहित या तत्त्वानें निभाव लागला नाहीं. दरवडेखोरास मारलें काय किंवा वाघास मारलें काय, तें सर्वभूतहिताच्या विरुद्ध आहे. कारण वाघ व दरवडेखोर हे मेल्यानें आणि तीं तरी भूतेंच असल्यानें तें कर्म अनीतीचें होअील. बरें, वाघ आणि दरवडेखोर हे न मारल्यानें गाय व साव हे मारले जाअून पुनः सर्व भूतांचें हित साधत नाहीं तें नाहींच. तथापि सावा-साठीं दरवडेखोरास व गाअीसाठीं व्याघ्रास मारा म्हणून स्थितप्रज्ञ सांगतांच तें त्यानें सांगणें सर्वभूतहित या भाषेपेक्षां अुपयुक्ततावाद्यांच्या परिभाषेचा आश्रय केल्यानेंच समर्थनीय ठरतें. दरवडेखोर मारिला पाहिजे, कारण त्या अेकाच्या शासनानें समाजाचें म्हणजे अधिकतम जनांचें हित साधतें. व्याघ्र मारून गाय सोडविली पाहिजे, कारण मनुष्यांस व्याघ्राहून गाय अुपयोगी असते. तेव्हां सर्व भूतांचें हित साधणें सर्वस्वी अशक्य असून मनुष्यास व्याव-हारिक शक्यतेचा अेकच मार्ग मोकळा आहे आणि तो म्हणजे मनुष्यजातीस अधिकांचें अधिक कल्याण, शक्य तितक्या पुष्कळांचें शक्य तितकें पुष्कळ सुख, साधणें हाच होय. 'सर्वभूतहिते रतः' हीं पदें अर्थवादात्मक असून त्याचा मुख्यार्थ बहुमनुष्यहिते रतः असाच होतो. म्हणूनच कृष्णानें कंस मारिला. आणि रहस्यकारांनीं, भगवंतांनीं अर्जुनास रणांत तूं कां लढ म्हणून जो अुपदेश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला म्हणून ग्रथिला आहे त्यांतहि दुर्योधनाला तो अन्यायी आहे म्हणून तूं मार असेंच म्हणजे मनुष्यजातीच्या हितास अडथळा होत आहे तर, अेकाच्या असुखानें, वधानें जर सहस्रावधि लोकांचें कल्याण होत आहे तर तूं त्याला मारणेंच युक्त आहे असें म्हटलें आहे. परंतु हें तारतम्य आत्मौपम्यबुद्धीहून वा सर्वभूतहितेच्छूहून अुपयुक्ततावाद्यांच्या परिभाषेनेंच अधिक सुस्पष्ट आणि सुव्याख्यात केलें जातें

अुपयुक्तवादाची अुपयुक्तता

अितकेंच नव्हे तर शुद्धबुद्धि वा साम्यबुद्धि संपादन करणें हें जरी रहस्य-कारांनीं मनुष्याचें प्रथम कर्तव्य आणि नीतीचें मूल म्हणून सांगितलें आहे तरी वारंवार हें मान्य केलें आहे कीं, कोणाच्याहि शुद्धबुद्धीची परीक्षा त्याच्या बाह्य आचरणावरूनच केली पाहिजे. परंतु बाह्य आचरणावरून म्हणजेच त्याचें आचरण सात्त्विक, राजस, तामस, अित्यादि कर्म-दान-तप-क्रियेचें जें वर्गीकरण पुढें गीतेंत केलेलें आहे त्याच्या अनुरोधानें सत्त्वगुणविशिष्ट आहे कीं नाहीं, हें पाहूनच करावयाचेंना ? आतां हेंहि रहस्यकारांनीं स्पष्टच सांगितलें आहे कीं जगताचें धारण-पोषण ज्या गुणांनीं होतें ते ते गुण अुत्कर्षापकर्षप्रमाणानें सात्त्विकादि वर्गांत ग्रथित केले आहेत. आतां जगताचें धारण ह्याचा अर्थ सर्वभूतहिताच्या अर्थाप्रमाणेंच आणि मागें सांगितलेल्या तद्विषयक कारणासाठींच मनुष्यांचें धारण असा करावा लागतो, अितकेंच नव्हे, तर अंतीं अधिकांत अधिक मनुष्यांचें साध्य तितकें अधिक धारण पोषण व कल्याण असाच करावा लागतो. तेव्हां अर्थातच कोणाची बुद्धि शुद्ध झाली आहे हें ठरविण्यास अुपयुक्ततावादाविणें दुसरा मार्गच नसल्यानें नीतिनिर्णयांत या हितवादाच्या, पुष्कळांचें पुष्कळ सुख, या निकषाची कसोटीच निर्णायक ठरते. नीतिनियमाची व पुष्कळांचें पुष्कळ हित साधण्याची ही जी प्रवृत्ति मनुष्याच्या स्वभावांत अुत्पन्न झाली आहे तिची अुपपत्ति भौतिकवाद्याप्रमाणें मानली किंवा अध्यात्मिक पंथाच्या ब्रह्मात्मैक्य बुद्धीनें लावली तरी दोन कर्मांत अेक कर्म ग्राह्य कां हें ठरविण्याला नीतिशास्त्रास अुपयुक्ततावादाचाच आश्रय करावा लागतो. प्रत्यक्ष श्रीकृष्णाप्रमाणें जे शुद्धबुद्धि व स्थित-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रज्ञ आहेत त्यांनीं देखील जेव्हां जेव्हां दोन धर्मांतून अेक कर्म न्यायतर कां याचें विवेचन केलें तेव्हां तेव्हां स्पष्टपणें "लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि" किंवा कर्णपर्वात म्हटल्याप्रमाणें "धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयति प्रजाः" असेंच प्रतिपादन केलें आहे.

शुद्धबुद्धीची कसोटी

कोणतें कर्म पुष्कळांचें पुष्कळ हित साधील हें ठरविणें जरी समयविशेषीं कठिण जातें आणि तसें तें हित मोजण्यास जरी तपमापनाप्रमाणें अेकादें यंत्र निघालें नसलें तथापि कोणाची शुद्धबुद्धि आहे हें ठरविण्यासहि तसें यंत्र निघालेलें नाहीं. श्रीकृष्णाला स्वार्थी व अशुद्धबुद्धि म्हणणारे शिशुपाल आणि बुद्धाला दांभिक सुखलोलुप म्हणणारे देवदत्त जर निघूं शकतात तर तेथें अितरांचा काय पाड ! अितकेंच नव्हे तर कोणाची शुद्धबुद्धि आहे हें मापन करण्यास कमीअधिक प्रमाणानें समर्थ असें कोणतें साधन असेल तर तें त्याचें बाह्य वर्तन, त्याचा व्यवहार जगहितार्थ, भूतहितार्थ म्हणजेच शक्य तितक्या मनुष्यांच्या वा मनुष्यजातीच्या शक्य तितक्या हितास अनुकूल आहे कीं नाहीं हीं अुपयुक्ततावादाची कसोटी लावून पाहणें हेंच होय. रहस्यकारांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे बाह्य व्यवहाराचा विचार नैतिक दृष्टीनें जर कर्तव्य झाला तर या अुपयुक्ततावादाहून दुसरें अुत्कृष्ट तत्त्वच मिळावयाचें नाहीं.

आणि बाह्य व्यवहाराशींच आमचा संबंध असून आम्हांस कर्माच्या मागें असणाऱ्या वासनेशीं वा बुद्धीशीं कांहींच कर्तव्य नाहीं असें सर्वच अुपयुक्ततावादी म्हणत नाहींत. अितकेंच नव्हे, पण कर्माच्या मागें असणारी बुद्धि – मी हें कर्म मनुष्यजातीचें शक्य तितकेंच अधिक हित संपादनार्थ करीन-करावें–करीत आहें – अशी असणें हेंच कर्माच्या नीतिमत्तेचें अत्यंत प्रबल दर्शक आहे हेंहि मानण्यास त्यांचा कांहीं प्रत्यवाय असण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें ही परार्थसाधक प्रवृत्ति 'ब्रह्म सत्य जगन्मिथ्या' या अद्वैत सिद्धांतानें प्रतिपन्न होणाऱ्या आत्म्यैक्यबुद्धीनें अुपपन्न झालेली आहे असेंहि मान-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्यास त्यांची कांहीं हरकत नाहीं. किंवा ओश्वरानेंच बुद्धि अशीच अुत्पन्न केली आहे यापलीकडे कांहीं सांगतां येत नाहीं. अद्वैत सिद्धान्तांत अनुमित होण्याच्या अुपपत्तीसहि त्यांची आडकाठी नाहीं. ब्रह्मसृष्टीचा विचार करून जगदुत्पत्ति, जगद्धेतु व मानुषकर्तव्य यांविषयीं सात्त्विक सूक्ष्म व शुद्ध बुद्धीनें शक्य तितका विचार करून कोणताहि सिद्धान्त केला तरी अेकदां व्यवहारांत अुतरलें कीं कर्माकर्मांतील तारतम्य ओळखण्यासाठीं नातिशास्त्रविशारदांचीं जीं सूत्रात्मक नांवें सांगितलीं आहेत तींत सर्वांत पुष्कळांचें पुष्कळ हित हें सुखवादाचें वा हितवादाचें तत्त्व अनुस्यूत झालेलें असल्यानें शुद्धबुद्धि आणि स्थितप्रज्ञता प्राप्त झालेल्या महापुरुषांसहि ‘ किं कर्म किमकर्मेति ’ असा प्रश्न येतांच केवळ आत्मैक्याच्या किंवा साम्यबुद्धीच्या कसोटीचा आश्रय पुरेसा न पडून त्यास हेंच लोकहित लोकसंग्रह, दुष्टबुद्धिविनाश म्हणजे पुष्कळांचें पुष्कळ सुख या तत्त्वाचीच कसोटी लावावी लागली. दुर्योधनाचा पक्ष सोडून श्रीकृष्णानें अर्जुनाचा पक्ष कां घेतला या लोकसंग्रहाच्या म्हणजेच अुपयुक्तता-वादाच्या तत्त्वाविना दुसऱ्या कोणालाहि त्या तत्त्वाचा अुलगडा आणि समर्थन होअू शकत नाहीं.

* * *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शस्त्रसंन्यास–शस्त्रस्वीकार–बुद्धरक्षण : : ११

✠ ✠ ✠

[रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळांत अप्रत्यक्षरीतीनें शस्त्राचाराचा प्रचार करण्यासाठीं 'संन्यस्त खड्ग' हें नाटक जेव्हां वीर वि.दा. सावरकरांनीं लिहिलें तेव्हां महाराष्ट्रांतील बहुसंख्य सुशिक्षितांत गांधीवाद आदर्श मानला जात होता. त्या वादांतील चुकीच्या तत्त्वांचें वैयर्थ्य हें नाटक वाचणाराच्या किंवा पहाणाराच्या तत्काळ ध्यानांत येतें. ह्या नाटकांत गोवलेल्या दोन कथानकांतील अेका कथानकांचे, विक्रमाचें पूर्णचित्र दर्शविणारे तीन प्रवेश येथें दिले आहेत.]

✠ ✠ ✠

अंक १ ला, प्रवेश ७ वा

(बुद्ध, शिष्य आणि सेनापति विक्रम बसले आहेत.)

बुद्ध––सेनापति विक्रमदेव, आपण या शाक्य राष्ट्राचे सेनानी आहां. आपण या शाक्य राष्ट्रांतील अेक महान् ज्ञानीहि आहांत, आपण पूर्ववयांत यज्ञ-दान-तपांची साधना आचरीत तत्त्वज्ञानाची गूढ तत्त्वें योगायुक्त चित्तानें चिंतून सिद्धत्व पावलेले आहांत हेंहि मी जाणून आहें. म्हणूनच या अुभ्या शाक्य जातींत विशेषतः आपल्यालाच मला सांपडलेल्या आर्य-सत्यांचा ठेवा दाखवावा आणि मी जें हें महान् धर्मचक्रप्रवर्तन केलेलें आहे त्याची गति आध्रुवध्रुवापर्यंत पोंचवून सकल लोकांस दुःखमुक्त करण्याच्या कार्यीं आपलें सहकार्य संपादन करावें हा माझा या कपिलवस्तूस परत येण्यामध्यें अेक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुख्य अुद्देश आहे. तेव्हां आपण संन्याशाची दीक्षा घेअून या भिक्षु-संघांत समाविष्ट व्हावें अशी माझी अिच्छा आहे. अहो, हा संसार स्वर्गासुद्धां तृष्णेच्या आगींत जळत आहे. ज्ञान्यानें त्याचा वमनवत् त्यागच केला पाहिजे. वणव्यांतून सुटलेला प्राणी जसा पुन्हां वणव्यांत शिरत नाहीं, रोग बरा झाला असता कोणीहि ती पीडा पुन्हां व्हावी असें अिच्छित नाहीं त्याप्रमाणेंच ज्ञानी या संसारांत पुन्हां रमत नाहीं. असें असतां आपणासारखे सिद्धहि या संसारांत, त्यांतहि घातपातानें दूषित अशा या सैनिकव्यवसायांत कसे राहूं शकतात हें मला समजत नाहीं.

विक्रम–कसे ? भगवन्, जसे जन्म, व्याधि, जरा व मृत्यु या दुःखांनीं पीडिलेल्या या देहांत आपण, त्या दुःखांचा अंत करणारे, निर्वाण प्राप्त झाल्यावरहि राहूं शकतां तसे ! मी तथागतांस विचारतों कीं, निर्वाणप्राप्तीनंतर, त्या ज्ञानासहच, तृष्णेच्या निवृत्तिसहच, हा भौतिक देह तात्काळ विरून बिलगून वितळून मृगजळासारखा नाहींसा होतो काय ? नसेल तर त्याचा बळानें नाश करून, आत्महत्या करून, देहाची बेडी तत्काळ तोडून टाकणें अिष्ट आहे काय ? नसेल तर देहधारण मुक्तांनाहि–बुद्धांनाहि केलेंच पाहिजे नाहीं का ? विदेहमुक्ति म्हटली तरी भौतिकतः ती मरणापर्यंत सदेहच जर असणारी आहे तर मग देहधारणाचीं संसारिक कर्मे करावींच लागणार ना ? त्यांतहि आपणांसारखे महात्मे तर मुक्तानंद भोगीत अेखाद्या गेंड्यासारखे रानांत अेकटेच भटकत न फिरतां दुःखितांच्या दुःखानें द्रवून लोकांस चिरंतन सुखाचा लाभ करून देण्यासाठीं हा अुपदेशाचा, प्रचाराचा, शिष्यसंघाचा, वादविवादाचा, मठांचा आणि मठपतित्वाचा मोठा प्रपंच मांडीत असतात ? तो कां ?

बुद्ध–सेनापते, निर्वाणप्राप्तीनंतर देह तत्काल नाहींसा होत नाहीं हें खरें. तर मग आपण विचारतां कीं 'निर्वाणप्राप्तीनंतर बळानें देहत्याग करणें अिष्ट आहे काय ?' त्यास तथागताचें स्पष्ट अुत्तर आहे कीं बळानें देहत्याग करणें हें अेक नवीनच कर्म असल्यानें तें पुनर्जन्मास कारणीभूत होणारें आहे. आणि जन्ममृत्यूच्या पार होणें हें तर तथागतांचें ध्येय आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून तथागतानें देहत्याग केला नाहीं. मागील कर्मांची ती देहगति आपण होऊन थांबेल तेव्हां थांबेल ! देहनाश तर दूरच, पण देहच्छलहि तथागतास संमत नाहीं. मध्यम पंथ हाच सुवर्ण पंथ आहे. देहाला निरोग आणि कार्यक्षम राखून लोककल्याणार्थ सदोदीत त्यास परोपकारी झिजविणें हेंच खरें दैहिक तप. दया हीच मुक्ताची दयिता आणि दुःखतप्तजनांवर त्या दयेनें प्रेरित होऊन निर्वाणामृताचें शीतल सिंचन सदोदीत करीत राहणें हाच संन्याशाचा संसार !

विक्रम–तर मग संन्याशांनाहि संसार असतोच ! मुक्त होतांच देहनाश न करण्याचें कारण म्हणून जो आपण पुनर्जन्म, कर्म, कर्मफल आदिक पारलौकिक सिद्धान्तांचा अुल्लेख केलांत त्याविषयींची चर्चा मी माझ्या प्रस्तुत अुद्देशास अप्रस्तुत म्हणून सोडून देतों. आणि ज्यास स्वतः निर्वाणपद प्राप्त झालें आहे, आत्मप्रतीति आणि आत्मप्रसाद लाभतो त्यांसहि तत्काल देहनाश करणें अनिष्ट वाटत असल्यामुळें देहयात्रा करितांना देहधारणाचा किंवा आपल्यासारखे महात्मे मांडतात तशा परोपकारप्रेरित संन्याशाच्या संसाराचा या जगांतील जो व्यवहार करावा लागतो त्याच्या अैहिक हेतूची आणि स्वरूपाची आणि परिणामाची तेवढीच चर्चा मी करूं अिच्छितों. मी तथागतांना विचारतों कीं, मठामध्यें राहून मुक्त जे अशन–वसन–शयनादिक व्यवहार करतो त्यांत आणि गृहामध्यें राहून बद्ध जे व्यवहार करितात त्यांत पहिला मठस्थ अनासक्तपणें, प्राप्तनिर्वाहार्थ किंवा निरहंकारी परपकारार्थ ते व्यवहार करतो आणि दुसरा गृहस्थ तसें करीत नाहीं हाच ना आपल्या मतें मुख्य भेद ?

बुद्ध––होय.

विक्रम––तर मग तशा अनासक्त बुद्धीनें परोपकारार्थ गृहामध्येंहि जर कोणी ज्ञानी, सिद्ध, ते व्यवहार, ही अैहिक यात्रा पार पाडूं लागला तर मग अशा मठस्थांत आणि तशा गृहस्थांत विदेह स्थितीच्या दृष्टीनें कांहीं आक्षेपार्ह भेद असूं शकणार नाहीं, नाहीं का ?

बुद्ध––गृहामध्येंहि मठाप्रमाणेंच विदेहमुक्ताचा व्यवहार चालूं शकेल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें मला मान्य आहे. मठामध्येहि प्रलोभनें असतातच ! परंतु तरीहि गृहामध्यें तीं अधिक असणार हें अुघड आहे.

विक्रम––पण ती भीति साधकांना लागू आहे. मुक्ताना-सिद्धांना नाहीं. कारण प्रलोभनाचें ज्यास अजून भय आहे त्यास आपण साधकच म्हणतों, सिद्ध नव्हे. आतां ज्या अर्थी मुक्त हा परोपकारासाठींच. दु:खितांच्या दयेसाठींच हा धर्मप्रसाराचा आणि लोकसेवेचा व्याप अुभारतो त्या अर्थी तो अैहिक परोपकार सर्वांस सरसहा संन्यासदीक्षाच देअून साधतां कीं, मठस्थ होअून कीं गृहस्थच राहून हा मुख्य प्रश्न मला आपणांपासून सोडवून घ्यावयाचा आहे. विदेहचाच्या संन्यासाश्रमांत आणि विदेहचाच्या गृहस्थाश्रमांत, किंवा थोडक्यांत म्हणजे गार्हस्थांत आणि संन्याशांत मुख्य भेद म्हणजे हाच ना कीं, संन्यासाश्रमांत कामिनी, कृषि आणि कृपाण यांचा बहुधा आत्यंतिक त्याग करावा लागतो आणि गृहस्थाश्रमांत तो लागत नाहीं ? कृषीनें भरणपोषणाचे धंदे, कामिनीनें संतानोत्पत्ति आणि कृपाणानें प्रसंगीं शस्त्रयुद्धांत भाग घेणें हींच अुल्लेखित आहेत.

बुद्ध––अेकंदरींत आपण म्हणतां त्या अर्थी संन्याशाला कामिनी–कृषि-कृपाण हयांचा आत्यंतिक त्याग करण्याची प्रतिज्ञा करावी लागते, तोच दोन्ही आश्रमांतील मुख्य व्यावहारिक भेद आहे खरा.

विक्रम––तर मग हे तथागत, मी असें स्पष्टपणें म्हणतों कीं, परोपकाराचें कार्य मुक्तासहि संन्यासाश्रमाहून गृहस्थाश्रमाचाच अवलंब केल्यानें अधिक प्रमाणांत करतां येतील. अितकेंच नव्हे तर जो जो भिक्षु होअूं अिच्छील त्याची त्याची पात्रापात्रतेचा लवलेश विचार न करतां आपल्या संन्यस्त भिक्षुसंघात आपण जी भरती करीत आहां तीमुळें अुपकाराच्या परिवर्तनांत मोठाच अपकार होणार आहे ! काल आपण प्रत्यक्ष राहूलास आपल्या आठ नअू वर्षाच्या मुलासहि भिक्षुसंघांत समाविष्ट करून घेतलेत ! आतां ज्या कोवळ्या मुलास संसार काय आणि संन्यास काय याची कल्पनाही नाहीं अशा मुलासुद्धां सरसहा सर्वांस संन्यस्त भिक्षुसंघांत ओढल्यानें केवढा अनर्थ ओढवणार आहे पाहा! या शाक्य राष्ट्राचेंच प्रकरण अुदाहरण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून मी घेतों. आपण संन्यस्त झालांत, आपण राजपुत्र आनंद आणि देवदत्तालाहि संन्यासदीक्षा दिलीत, शेवटीं राजतनय राहूल, तें आठ वर्षांचें मूलहि भिक्षुसंघांत घेऊन शाक्यांच्या आसन्नमरण राजवंशाच्या लतेची ही शेवटची कलिकाहि खुडून टाकलीत. सामंत कुळासुद्धा सर्व अुत्तम पुरुष संन्यस्त झाल्यानें या राष्ट्रांत सद्‌गुणी आणि अभिजात बीजापासूनच होणारी अुत्तम संतति खुंटली. दुर्गुणी आणि अपकृष्ट लोकांची संतति तेवढी वाढत राहिली. अशा स्थितींत अुत्तम बीज तेवढें निवडून फेकून देअून किडकीं सडकीं निकृष्ट बीजेंच तेवढीं पेरणाऱ्या शेतकऱ्याच्या पिकाची जी दुर्दशा होणार तीच या शाक्य जातीची होणार ! संन्यासधर्माच्या, कामिनी त्यागाच्या—निस्संतानतेच्या पहिल्या प्रतिज्ञेनें असा लोकक्षय आणि सुप्रजननक्षय होत असतांच आपला प्रचार जर असाच चालला तर हे शेकडों लोक आपापले नांगर तोडून, माग मोडून, दुकानें सोडून दुसऱ्यांच्या मेहनतीवर जगणाऱ्या भिक्षुसंघांतील भिकाऱ्यांची संख्या फुगवीत राहणार !—कारण कृषित्याग ही संन्यासधर्माची दुसरी प्रतिज्ञा पडली ! दुसऱ्यानें मरे मरेतों शेती करावी—तें अन्न आयतें भक्षिणें हें संन्यासधर्मांत पाप नाही—पण शेती करणें हें मात्र पाप—कारण नांगरानें अनेक जीव मरतात—म्हणून शेती हिंसाप्रधान ! संन्यासी स्वतः अशी पापमय शेती करणार नाहीं—पण दुसऱ्याकडून तें पाप आचरवून तें पापाचें अन्न मात्र खाण्यास सोडणार नाहीं ! यापेक्षां संन्यासी स्वतः शेती करून तें अन्न खाते तर तें पाप या ढोंगीपणाहून खचित कमी होतें.

बुद्ध——सेनानी विक्रम, पण माझ्यासारखे संन्यासी हे अेक प्रकारचे शेतकरीच आहेत. नाहींत काय ? हें पाहा, या भवभ्रमाचें रान साफ करून चित्ताचें शेत मी ज्ञानाच्या नांगरानें नांगरून काढतों. नीतिनियम हा माझ्या नांगराचा दांडा होय. अुद्यमशीलता हा त्याचा बैल आहे. सद्धर्म मतांच्या बीजास मी पेरतों. सत्कर्मरूपी दृष्टीनें तें सिंचिलें जातें आणि नंतर त्यास सर्व दुःखांचा अंत करणारे शाश्वत जीवनाचें पीक लढतें !

विक्रम——परंतु महाराज, आपल्यासारखे असे, सामाजिक सदाचाराच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परम शुभास्पद अुपदेशाच्या अमृतफलाची लागवड करणारे लाक्षणिक शेतकरी तरी या आपल्या संन्यासी-संघांत कितीसे आहेत? या अुभ्या जगतांत किती आहेत? अेक, दोन, फार तर तीन. परंतु या अेकटचा-दुकटचा खऱ्या शेतकऱ्याच्या पीतपटाच्या ध्वजाखाली हे जे शेकडों निरुद्योगी संन्यासी, भिक्षु, वैरागी अित्यादि लोकांचे बाजारबुणगे जमलेले असतात त्यांच्या श्रमास आंचवल्यानें राष्ट्राची आर्थिक शक्ति किती हीन होअून जाते ती पाहा ! जो जो अेकेक मनुष्य संसार सोडून संन्यासी किंवा श्रमण होतो त्याच्या मागें दोघाजणांच्या अुपार्जनास समाज अंतरतो. अेक त्या संन्यस्त श्रमणाच्या आणि दुसऱ्या त्या श्रमणास पोसणाऱ्या श्रमिकाच्या. प्रत्येक श्रमण म्हणजे समाजांतील प्रत्येक अुपयुक्त धंद्यावर बसलेला अेक मूर्तिमंत करच ! हा आपला संघच घ्या ! आठ वर्षांच्या अवधींतच त्यांत सहस्रावधि माणसें शिरलीं सहस्र वर्षें हें गाडें जर असेंच चाललें तर ती संख्या लाखांनीं मोजावी लागेल! बरं, या संन्याशांच्या संसारास लागत नाहीं काय ? गृहस्था-प्रमाणें दुकुल वसनें नसलीं तरी वस्त्रें हवींत, विलासभवनें नसलीं तरी विहारभवनें हवींत, मंदिरें नसलीं तरी मठ हवेत, मोदक नसले तरी मीठ-भाकर हवीच, त्यांस पादुका हव्यात, पांघरूणें हवींत, वैद्य हवेत, औषधें हवींत, भांडीं हवींत, भांडणें देखील हवींत ! आपल्या संघांतीलच पक्ष-विपक्षांच्या भांडणावरून स्वत: तथागतासहि नाहीं का अनेक वेळां संघ मोडून टाकण्याचा धाक या अुद्दंड भिक्षूंस घालावा लागला ? भगवन्, ज्या घरांत अेक भाअू मिळविता असून चार भाअू नुसते खावू बनून भटकत फिरतात तें घर जसें डबघाअीस आल्यावांचून राहाणार नाहीं तसाच लाखो लोकांच्या धनोत्पादनास अंतरलेला आणि त्यांच्या भरणाच्या भाराखालीं पिढचान् पिढचा त्रासून गेलेला समाजहि डबघाअीस आल्यावांचून राहणार नाहीं. कृषीच्या अर्थोत्पादक व्यवसायाच्या त्यागाची संन्यासाश्रमाची जी दुसरी प्रतिज्ञा असते तिचा असा भयंकर परिणाम होअून लोकांच्या कल्याणापेक्षां लोकांचें अकल्याणच होत राहील.

बुद्ध---परंतु सेनानी, भौतिक धन हेंच कांहीं खरें धन नाहीं. अैहिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुन्नति हाच कांहीं मनुष्याचा पुरुषार्थ नाहीं. पारलौकिक धन, पारलौकिक अुन्नति हाच खरा पुरुषार्थ आहे, हें मूळ विधेयच आपण विसरतां !

विक्रम--छे, छे, तें आपण प्रथमच मान्य केलें आहांत कीं, निर्वाणप्राप्तीनंतर किंवा निर्वाणप्राप्त्यर्थ जें धर्माचरण अत्यावश्य आहे हें गृहस्थाश्रमांतहि साधतां येअील. यास्तव पारलौकिक हित हा अुभयपक्षीं समान असणारा घटक सोडून अुरलेल्या अैहिक लाभालाभाचीच तुलना कर्तव्य आहे. किंबहुना संन्याशाच्या संसारासाठीं देखील गृहस्थाचा संसार अवश्य आहे. हा भात पिकवील तरच तो अल्लक म्हणून भिक्षा मागून खाअील! अनासक्त बुद्धि असेल तर भीक मागण्यांत वेळ घालविणें काय किंवा शेती करण्यांत वेळ घालविणें काय, सारखेंच बंधनकारक आहे अथवा नाहीं ! म्हणून मी म्हणतों कीं, आपणासारखें मुक्त देखील संन्यासाश्रमीं विकृत प्रतिज्ञांच्या वेडचा अडकावून न घेतां जर गार्हस्थ्याच्या प्रकृत परंपरेनेंच लोकोपकारार्थ जीवन यापन करतील तर अधिक लोककल्याण साधूं शकतील. परंतु भगवंतासारख्या लोकोत्तर विभूतीचा प्रश्न जरी सोडून दिला तरी तदितर सर्व जनांना तरी संन्यासाश्रमाचा प्रवेश सर्वथैव निषिद्धच असला पाहिजे. कारण कामिनी आणि कृषि ह्यांच्या आत्यंतिक त्यागाच्या ज्या दोन प्रतिज्ञा संन्याशास द्याव्या लागतात त्यामुळे राष्ट्राचा प्रजाक्षय आणि धनक्षय होअून त्या राष्ट्रास अुलट कसा अपकार होतो हें मीं जें आतां दाखविलें त्याहूनहि भयंकर हानि या समाजाची, ह्या राष्ट्रांची, संन्यासाच्या या तिसऱ्या प्रतिज्ञेनें--कृपाणाच्या त्यागानें--त्या आत्यंतिक अहिंसेच्या बुद्धिभ्रष्ट ब्रीदानें होत आहे--होणारी आहे ! भगवन्, ही आत्यंतिक अहिंसा नसून हा आत्यंतिक आत्मनाश होय ! आणि आत्म्याचा नाश हीहि पुन्हां हिंसाच होत असल्यानें आत्यंतिक अहिंसा म्हणजे आत्यंतिक हिंसा !--असें अहिंसेच्या या अनाडी व्याख्येचें विलक्षण तात्पर्य निघतें.

बुद्ध--परंतु आम्ही आत्यंतिक अहिंसेचें मूळीच पक्षपाती नाहीं. अितकेंच नव्हे तर साधुरक्षणाकरितां आणि आत्मरक्षणाकरितां आततायांचा प्रतिबळानें आणि प्रत्याघातानें प्रतिकार करणें ही हिंसा होत नसून अुलट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंसेचा डाव हाणून पाडणारें पुण्यकर्मच होय असें तथागतांचें मत आहे. पण हें गृहस्थाश्रमाचें कर्तव्य होय. संन्यासाश्रमाचें नव्हे !

विक्रम--आणि म्हणूनच मी म्हणतों कीं, ज्या संन्याशांत अशा न्यायसंरक्षक कृपाणाचा आत्यंतिक संन्यास करावा लागतो तो विमुक्तद्वार संन्यासाश्रम ही कोणच्याहि राष्ट्रावर ओढवणारी मोठ्यांतली मोठी आपत्ति आहे ! नांगर धरावयाचा नाहीं, शस्त्रास शिवावयाचें नाहीं, अशा शपथा घेऊन ज्या राष्ट्रांतील लाखो लोक मठामठांतून पडून राहूं लागतात तें संन्यासप्रवण राष्ट्र आज ना उद्यां अन्न अन्न करून तडफडूं लागलेंच पाहिजे, दुबळें झालेंच पाहिजे, कोण्या संसार-प्रवण आक्रमक राष्ट्राच्या व्याघ्राची झेप पडतांच त्याच्या तीक्ष्ण पंजास बळीं पडलेंच पाहिजे ! अशा संन्यासप्रवणतेचा पुरस्कार केल्यानें ज्या लोककल्याणासाठीं आपण मुक्तावस्थेंतहि ह्या धर्मचक्रप्रवर्तनाचा, ह्या संघाचा खटाटोप करीत आहांत तें संसारी जगत् तर अुच्छिन्न होओीलच होओील पण शेवटीं हीं आपली महान धर्मसंस्था, हे संघ, हे लाखो भिक्षुगण, ह्या साधना, ह्या समाधि, हीं तपोवनें, हें अुभें संन्यासीजगतहि क्रूर रानटी श्वापदांच्या आणि त्याहूनहि क्रूरतर अशा राक्षसांच्या रक्तबंबाळ नखरांनीं शतधा विदीर्ण होअून नाश पावेल !

बुद्ध--पण सेनापते, संन्याशाच्या हातींहि अेक कृपाण असतें. अेक शस्त्र असतें. तें लोहाचें नसलें तरी आणि म्हणूनच तें लोहाहूनहि अधिक परिणामकारी असतें. त्या संन्याशाच्या शस्त्राचें नांव क्षमा आहे ! विक्रम, 'क्षमा शस्त्रं करे यस्य शत्रुस्तस्य करोति किं ?'–

विक्रम--किम् ? वधः ! प्राणनाशः ! दंड करण्याची ज्यास शक्ति आहे, तोच क्षमा करूं शकतो. दंड करण्याची ज्यांस शक्ति नाहीं त्या दुबळ्याच्या क्षमेस शरणागति म्हणतात–शस्त्र नव्हे ! भुकेल्या रक्तलिप्सु वाघापुढें गाय मटकन् बसते. तिनें क्षमाशस्त्र हातीं धरलें तरीं क्षमाशस्त्रास भिअून तो वाघ तिला सोडणार कीं काय ! ती गाय मी तुला क्षमा करतें म्हणून म्हणाली तरी तो वाघ तिला खाणारच, शरण आलें म्हणून म्हणाली तरी खाणारच ! दुष्ट शत्रूंसहि क्षमा करीत राहिलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे ते आगळीक करणें सोडतील अशा वेडगळ आशेवर जें राष्ट्र अवलंबून राहातें तें राष्ट्र त्याच क्षमेला मानभंग समजून अधिकच क्रुद्ध झालेल्या त्याच दुष्ट शत्रूकडून संधि साधतांच नायनाट करून टाकलें जातें ! अशी अुदाहरणें अितिहासांत घडलीं आहेत आणि हायहाय, अजून घडावयाचीं आहेत ! हें आपलें शाक्य राष्ट्र प्रजासत्ताक राष्ट्र आहे. ह्याच्या अेका बाजूस कोसलांचें प्रबळ राजसत्ताक राष्ट्र आहे, दुसऱ्या बाजूस मगधांचें राजसत्ताक राज्य आहे. या दोन्हीं प्रबळ राजकांच्या, राजसत्ताक राष्ट्रांच्या, मध्यें हें शाक्यांचें प्राजक सांपडलेलें आहे. तें ज्या क्षणीं लवलेंशहि दुर्बल होअील त्या क्षणीं तें या दोन्ही गिधाडांपैकीं कोणाच्या तरी धाडीस बळीं पडल्यावांचून राहाणार नाहीं. अशा स्थितीत या राष्ट्रांतील लोकांपुढें शस्त्रांस न शिवणें हें अुत्कृष्ट जीवन होय, नीतीची पराकाष्ठा होय, बुद्धाच्या कृपेस संपादण्याचा पवित्र मार्ग होय असें विकृत ध्येय धरणें मला अत्यंत आत्मघातकपणाचें वाटत आहे !

बुद्ध--आपली भीति, जर अेकटचा शाक्य राष्ट्रासच मी संन्यासप्रवण आणि बुद्धविन्मुख करीत असतों तर, खरी ठरती. पण ज्यां दोन आक्रमक राजकांचीं अुदाहरणें आपण दिलींत त्यांसहि मी युद्धविन्मुख करीत आहे; नव्हे जवळ जवळ केलें आहे. हें पाहा, मनुष्यांनीं मनुष्यांना केवळ पाशवी शक्तीच्या चढाओढींत श्रेष्ठत्व स्थापण्याकरितां तलवारींनीं भाजीसारखे सपासप कापीत सुटणें हें आपणांस लज्जास्पद वाटत नाहीं का? तसेंच मानव जातींतील सगळ्या राष्ट्रांनीं जर ह्या लज्जास्पद युद्धपिपासेपासून परावृत्त होण्याचा निश्चय केला, जर माझ्या धर्माचीं प्रेम-दया--क्षमा--शांति-अहिंसा हीं अत्युदार तत्त्वें सर्वांनींच आचरलीं तर मग तरी अेकटच्या व्यक्तीस किंवा अेकटच्या राष्ट्रास भिण्याचें कारण नाहीं ना? हें पाहा, तथागतानें हा संघ स्थापन करून पुरतीं दहा वर्षेंहि झालीं नाहींत तोंच आपल्या शाक्य जातीपर ज्यांचें आक्रमण होण्याची आपणांस अुत्कट भीति वाटत आहे ते कोसलचे महाराज प्रद्योतन आणि मगधांचे राणे बिंबिसार हे दोघेहि यथागत बुद्धाच्या धर्माची दीक्षा घेअून आमचे शिष्य झालेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत ! जर शाक्य राष्ट्रांतील कर्त्यांतील कर्ते पुरुष जे सेनापति विक्रम, ते आपणहि माझें नुसतें शिष्यत्व न पत्करितां प्रत्यक्ष भिक्षुत्व स्वीकारून मजसहच या दयामूलक धर्माचा प्रसार करण्यास बाहेर पडाल तर या सर्व राष्ट्रांचा आमच्या अुपदेशावर विश्वास बसेल, युद्धाची मनापासूनच आवश्यकता वाटणार नाहीं, किळस येअील, आणि मानव लोकांतून युद्धाचें आमूलात् अुच्चाटन करण्याच्या महत्पुण्याचे आपण वांटेकरी व्हाल ! विक्रम, जगांतून युद्धाचें, कलहाचें, रक्तपाताचें अुच्चाटन करणें हें ध्येय–त्याच्यासाठीं आपण प्रयत्नांची आणि त्यागाची पराकाष्ठा करून पाहाण्याअितकें थोर नाहीं का ?

विक्रम––भगवन्, तें तितकें थोर आहेच आहे–पण तें शक्य आहे कीं नाहीं आणि त्यांतहि ह्या साधनांनीं शक्य आहे कीं नाहीं याची मला प्रबळ शंका वाटते.

बुद्ध––सेनापति, त्या शंकेविषयीं मी अितकेंच म्हणतों कीं, थोडीशी श्रद्धा ठेवा ! मला जर तुम्ही साह्य व्हाल तर सरासरी वीसपंचवीस वर्षांच्या आंत ह्या भारतांत तरी शस्त्रयुद्धाची समाप्ति झालेली आपण पहाल ! शस्त्रांचें युग जाअून शांतीचें युग स्थापित झालेलें पहाल !

विक्रम––अीश्वर करो आणि असेंच होवो ! मनुष्यसंहार करणारा मनुष्यजातीचा अत्यंत भयंकर शत्रू मनुष्यच होय. हा मनुष्यजातीवरील कलंक शक्य तितका लवकर धुवून निघो आणि शांतीचें साम्राज्य स्थापण्याचा मान आमच्या या शाक्यसिंह तथागत बुद्धांनाच मिळो ! परंतु सज्जनहो, मोठ्या दुःखानें पण निर्भीडपणें मीं माझी भीति अुल्लेखित करून ठेवतों कीं, पंचवीस वर्षांनंतरच काय पण आजपासून पंचवीसशें वर्षांनंतरहि या जगावर या जगाच्या दुर्दैवानें शस्त्रयुगाचेंच प्राबल्य दिसून येअील; बळी तोच कान पिळीत राहील; रक्तरंजित साम्राज्यांचाच विजयाश्व भूवर थैमान घालीत असेल आणि त्याच्या टापाखालीं तेच अधिक आणि प्रथम चिरडले जातील कीं, जे या शांतियुगाच्या स्वप्नवाणीला भविष्यवाणी समजून––तीवर विसंबून सर्वांआधीं शस्त्रसंन्यास करतील – दुसऱ्याच्या दयेवर अवलंबून राहण्याअितके दुबळे होअून बसतील ! अहिंसेच्या अमिषा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पायीं हिंसेचा गळ गिळतील ! वाटेल त्याला संन्यासाश्रमांत घेणाऱ्या आणि अशा रीतीनें लाखों लोकांस शस्त्रसंन्यासाच्या प्रतिज्ञेनें हतवीर्य करून ठेवणाऱ्या या भयंकर भुलीचे भीषण परिणाम पंचवीसाव्या पिढीपर्यंत या भारतास भोगावे लागतील ! तथापि भगवान् बुद्धासारख्या अलौकिक पुरुषांस या पुण्यकार्यीं साहाय्य मिळालें नाहीं म्हणून हा प्रयोग फसला असें पुढील पिढ्यांस चुकूनहि वाटूं नये म्हणून मी तथागतांच्या अिच्छेस अनुसरतों. आणि आजपासून या भिक्षुसंघांत समाविष्ट होतों. (कटीचें कृपाण काढून) शाक्यांच्या सेवेस वाहिलेलें हें माझें कृपाण आणि माझा अेकुलता अेक पुत्र वल्लभ ह्यास मी माझ्या या शाक्य जातीच्या पदरांत टाकून परिव्राजकांचा आश्रम स्वीकारीत आहे !

बुद्ध—सेनापते, देवांनींहि धन्य धन्य म्हणून मान डोलवावी असा हा तुमचा लोककल्याणार्थ केलेला त्याग स्तुत्य आहे. हें पाहा, कांहीं झालें तरी शांतीचें, दयेचें, प्रेमाचें साम्राज्य या जगतावर स्थापन करण्याचा आपण पराकाष्ठेचा प्रयत्न केला अितका अुल्लेख जरी मनुष्यजातीच्या अितिहासांत झाला, अशा प्रयोगाचें फल काय होतें हा अनुभव जरी आपल्या सफलतेनें वा निष्फलतेनें मानवांस मिळाला तरीदेखील ती निष्फलताहि आंशिकतः तरी सफलच झाली असें म्हणावें लागेल ! चला, शारिपुत्र संघागारांत या माननीय नवागतास नेअून संघदीक्षा द्याच !

(चाल——रूप जोबन गुन धरो रहत है.)

आज शस्त्रयुग जगीं सरतसे । शांतियुग अहा आलें
।। ध्रु० ।। दंड हिंसकि त्या । दया परतवी । त्याग न
वांछी । कलह विझाले ।। १ ।।

(सर्वजण ‘ बुद्धं शरणं गच्छामि, धर्म शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि ’ असें म्हणत जातात.)

* * *

(सा...१०)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंक २ रा, प्रवेश ६ वा

(बुद्धदेव, सेनापति विक्रमसिंह (भिक्षु विक्रम) आणि अितर भिक्षु बसले आहेत.)

विक्रम--शेवटीं चाळीस वर्षांपूर्वी मला वाटलेली भीति अशी खरी ठरली ! केवळ दयेनें दुष्टता, केवळ कारुण्यानें क्रोध, केवळ अहिंसेनें हत्या, केवळ शास्त्रानें शस्त्र सदोदित आणि सर्वत्र वशीभूत होत नाहींत, जिंकलीं जात नाहींत, नष्ट करतां येत नाहींत ! हेंच कठोर सत्य शेवटीं आपल्या डोळ्यादेखत प्रत्ययास आलें ना ! भगवन्, जन्म, व्याधि, जरा आणि मृत्यूपासून मनुष्यमात्रास विनिर्मुक्त करण्यासाठीं मनुष्यांत जर कोणी अधिकांत अधिक त्याग केला असेल, तप केलें असेल, चिंता वाहिली असेल तर ती तथागत, भगवान् बुद्धदेव, आपण होय. त्रिविध तापांचा अशेष नाश करण्याचा ज्या आर्यपंथाचा आपण आविष्कार केलांत, तृष्णानाश केला असतां मनुष्य जन्मपरंपरेच्या कैचींतून सुटून मुक्त होतो हें जें आपण तात्त्विक निदान ठरविलेंत त्यावर आणि आपल्या पारलौकिक स्वरूपाच्या मुक्तीवर ज्यांचा विश्वास बसत नाहीं ते अैहिकवादी लोकहि आपलें अेवढ्यासाठीं स्वभावकौतुकच करितील, सादर कृतज्ञच राहतील कीं निदान या जन्मीं, या आयुष्यांत तरी जन्मव्याधिजरामृत्यु या चारी संकटापासून दैहिकतःहि मुक्त–अक्षरशः पूर्ण मुक्त करणें मनुष्याच्या हातांत नाहीं–अेवढं तरी आपण सिद्ध केलेंतच ! कितीहि दुःखमय असलं तरी बद्धास वा बुद्धास याच जगांत देह आहे तोंवर राहिलेंच पाहिजे आणि जगांत आहों तों भौतिक अर्थी तरी ह्या चारी आधींव्याधींना मनुष्यमात्रास–मग तो पारलौकिकअर्थीं बुद्ध असो, मुक्त असो–तोंड दिलंच पाहिजे हें कठोर सत्य आतां संशयास्पद आहे असें म्हणण्याची मानवी आशेची हिंमत पुन्हा होणार नाहीं. मनुष्यप्रयत्नांची आपण शेवटची पराकाष्ठा केलीत आणि निसर्गशक्तीपुढें मनुष्याच्या यत्नानं हात टेकले. हाहि कांहीं थोडा लाभ झाला नाहीं. असला पराजयहि आंशिक जयच होय. जें जें अपरिहार्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून ठरेल त्यास तोंड देण्यास जो शूर आहे तो आपल्या अल्लड अिच्छांच्या अश्रूंतच गटांगळचा खात न बसता दंड थोपटून सज्ज असतो. आतां जर ह्या भौतिक अस्तित्वांत तरी जन्म, व्याधि, जरा, मृत्यु ह्या चार शत्रूंस तोंड दिलंच पाहिजे, तर मग त्या भौतिक शक्तीशीं द्याव्या लागणाऱ्या झुंजींत स्वपक्षास कमींत कमी हानि होअून अधिकांत अधिक लाभ ज्या प्रकारें होअील अशीच युद्धनीति मनुष्यानें अवलंबन केली पाहिजे. माझ्या मतें ती युद्धनीति म्हणजे मनुष्य जातीचं अधिकांत अधिक सुख साधण्यास्तव किंवा पाहिजे तर असं म्हणा कीं, तिचं दुःख कमींत कमी करण्यास्तव सांसारिक सर्व कामें यथावत् करणारा कर्मयोग हीच होय. आपल्या मतें संसारांतील कामिनी, कृषि, कृपाण ह्यां तिन्ही वस्तूंचा आत्यंतिक त्याग करणारा कर्मसंन्यास हाच मरेतों जगण्याचा अुत्तम मार्ग होय. परंतु आतां अनुभवानेंच सिद्ध झालं नाहीं कां कीं, त्या तिन्ही त्यागांतहि आत्यंतिक शस्त्रत्यागाची प्रतिज्ञा तरी लोकहितास अत्यंत बाधक होते. कारण आपल्यासारख्यांचा शस्त्रत्यागाचा हा अुदात्त अुपदेश सत्प्रवृत्त लोकच पाळणार. तदनुसार ते केवळ दया, अहिंसा, क्षमा ह्या भावनांच्या आधारावर जगूं पाहणार. आणि मख्यतः दुष्ट, दुर्जनच आपल्या अुपदेशास लाथाडून शस्त्रानें, शक्तीनें, बळानें कुरघोडी करूं पाहणार. अशा सामन्यांत पोथीच्या पानांची पोचट ढाल पक्कचा पोलादाच्या आघाताखालीं पिचून पिचून जाअून पुण्यशीलांचा विनाश आणि पापशीलांचा विजय होणारच होणार--हें भाकीत जें मीं चाळीस वर्षांपूर्वीं केलें तें आज सत्य होत आहे कीं नाहीं, पाहा. हें मी आनंदानं म्हणत नाहीं; अत्यंत दुःखानं म्हणत आहे. माझें हें अनिष्ट भविष्य खोटं ठरावं म्हणून तर मी माझ्या अिच्छेविरुद्ध आपल्या म्हणण्याप्रमाणें शस्त्रसंन्यास करून भिक्षुधर्माचं आपल्या आज्ञेनुसार तंतोतंत पालन करीत आलों. पण शेवटीं शस्त्रयुद्धें शांतिमय जगांतून नाहींशीं होण्याच्या स्थलीं त्या शस्त्रयुद्धाच्या रक्तधुमाळींत त्या जगांतून ती शांतीच नामशेष होण्याची पाळी आली. अेका बाजूस मगधचा राजा बिंबिसार आपला शिष्य झाला, क्षमेचा आणि अहिंसेचा भोक्ता झाला;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण त्याचा पोटचा पुत्र अजातशत्रु आपला द्वेष्टा झाला; बापाविरुद्ध त्यानें केलें, आणि बापास ठार मारून तो सिंहासनावर--आमच्या सर्वांच्या छातीवर विराजमान झालेला आहे. ही मगधाची बातमी जुनी होते न होते तोंही कोसलची बातमी येऊन धडकली कीं, विद्युद्‌गर्भानेंहि आपल्या पित्यास मरणाच्या दारीं ढकलून राज्यश्रीस दडपलें. तो पिताहि, कोसलचा तो प्रसनेजित महाराजहि आपला शिष्य, आपल्या दया, शांति, अहिंसेचा भोक्ता! पण त्या आपल्या अुपदेशाचा परिणाम त्याच्याच पुत्रावर – ह्या विद्युद्‌गर्भावर लवलेशहि न होअून तो झाला आपला कट्टर द्वेष्टा! त्यानें--त्या दुष्ट पुत्रानें शस्त्रशक्तीच्या आधारावर बंड केलें आणि तो--तो सुष्ट पिता शस्त्रसंन्यासाचा अभिमानी, त्या बंडांत जीव घेअून पळत असतां मृत्युमुखीं पडला. ज्यांनीं ज्यांनीं आपला अुपदेश अैकिला ते ते सुष्ट, राजा बिंबिसार, राजा प्रसेनजित् आणि हे शाक्य मारले गेले--जाण्याच्या पंथास लागले- आणि जे जे तो अुपदेश न अैकतां शस्त्रालाच शास्त्रासमान पूजित राहिले ते ते दुष्ट भरभराटले. शेवटीं निर्बल कारुण्याला क्रोधानें मारिलें; दुबळ्या दयेचा प्राण दुष्टतेनें घेतला.

बुद्ध—भिक्षु विक्रमसिंह! या माझ्या संन्यस्तसंघाच्यामुळें आजवर लोककल्याण असं कांहींच साधलं नाहीं असं का आपलं म्हणणें आहे?

विक्रम—भगवन् या संन्यस्तसंघानेंच नव्हे, तर संन्यास आश्रमानेंहि जीवमात्रावर जे अुपकार केले आहेत त्याला पारावर नाहीं. अहो, सर्वसंगपरित्याग करून वनामध्यें संन्यासी जो शब्द बोलें ते अुभ्या मानवाचें शास्त्र होत आलेलें आहे. 'धर्मोहि विश्वस्य प्रतिष्ठा' हें वाक्य तथ्य आहे. पण हें वाक्यहि अगदीच अतथ्य होणार नाहीं कीं, 'संन्यासोहि धर्मस्य प्रतिष्ठा'-अितक्या थोर थोर विभूतींच्या पदस्पर्शानें हा संन्यासाश्रम स्वर्गासमान पूज्य झाला आहे. आपल्या या संघाचीच गोष्ट घेतली तरी म्हणजेच आपली गोष्ट घेतली तरी, आज चाळीस वर्षे भगवान्, आपल्या ह्या अत्यंत सरळ, सोप्या आणि करुणामय शीतळ धर्मोपदेशामृतामुळें सहस्रावधि जीवांची तळमळ शांत झाली आहे. यज्ञांचं वैयर्थ्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण सिद्ध करून शेकडों अुपयुक्त जीवांस जीवदान दिलंत; देवदेवतांचं काल्पनिक बंड मोडून टाकून सदाचरण आणि लोकप्रेम हेंच खरं धर्म-साधन म्हणून स्थापित केलंत. आपले भिक्षु गांवोंगांव जाअून रोग्यांचीं सेवा करितात, अडल्यांची सुटका करितात, परस्परांचा मत्सर करूं नका अन्योन्यीं दया करा, अपराध क्षमा करा, अित्यादि अुदात्त अुपदेश करीत घरोघर समाधानाचा शीतल संदेश पोचवितात, हे आपले अुपकार, हे दयामय देवा, जगत् कधींहि फेडूं शकणार नाहीं. परंतु आपल्यासारख्या महान् विभूतींच्या चाळीस वर्षांच्या अत्यंत अुत्कट विरुद्ध प्रयत्नांनींहि शस्त्रबळाची अुपेक्षा हानिकारक आहे हें सत्य असिद्ध झालं नाहीं. पण हें सकृद्दर्शनीं भासणारं अपयशच त्या त्या प्रयत्नांचा यशस्वी परिणाम होय.

आनंद--(प्रवेशून) बुद्धं शरणं गच्छामि, धर्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि. भगवन् ! शाक्य गणतंत्राच्या वतीनें त्यांचा प्रत्यक्ष राजप्रतिनिधि तथागत बुद्धांची आणि भिक्षुवर विक्रमाची भेट घेण्यास आला असून त्यानं अशी अत्यंत दुःखकारक बातमी आणली आहे कीं, कोसलचा राजा विद्युद्गर्भ यानें असावध अशा शाक्य प्राजकावर अेकाअेकीं स्वारी करून त्याची अगदीं धूळधाण अुडविली आहे.

विक्रम--काय शेवटीं या थरावर गोष्ट आलीच ना ! आनंद ! जा जा, त्या शाक्यीय राजदूताला बुद्ध भगवानांच्या समीप घेअून या जा. (आनंद जातो.) भगवन्, पाहिलेंत ना ! आपल्या आत्यंतिक अहिंसामय अुपदेशानं कांहीं व्यक्ति करुणामय बनतील. पण सर्व व्यक्ति तशा बनूं शकणार नाहींत. प्रत्यक्ष आपल्या दैदीप्यमान अुपस्थितींत जर जगाची ही स्थिति तर आपला अवतार अस्तंगत झाल्यावरची कथाच काढावयास नको. क्रूर प्रवृत्तीचे असुर ह्या जगांत व्यक्तिरूपें आणि राष्ट्रारूपें राहणारच, हें व्यवहारतः तर प्रत्ययास येतच आहे. तत्त्वतःहि ही अुभी पिढीच्या पिढी जरी आपण संन्यस्त करून सोडूं शकूं असें आपण गृहीत धरलें तरी जे कोटिकोटि जीव पुढील पिढींत जन्म घेणार त्यांचीं पूर्वसंचित कर्में भिन्न असल्यामुळें त्यांची अुपजत प्रवृत्तीहि परस्पर विभिन्नच असणार आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून अेकच अुपदेशापायीं कोणीं दयाशील होअूं शकेल तर कोणी होअूं शकणार नाहीं. कारण त्या कोटचवधि जीवांच्या मनोविकासाच्या कोटचवधि परंपरा असणारच. अेतदर्थ दयेनें द्रवतील तर ठीकच पण जे दुष्ट तसे वळणारच नाहींत त्यांस दंडानें, बळानें त्या परोपद्रवी दुष्टतेपासून परावृत्त केलं पाहिजे. जसे पिसाळलेल्या कुत्र्यास आपण दंडानें परावृत्त करणें हीच खरी भूतदया समजतों. अधिकांत अधिक सुष्ट प्राण्यांच्या हितार्थ अेका दुष्ट प्राण्यास दंडिणें हाच खरा धर्म समजतों. हिंसेचीं दंत नखें शस्त्रानं छाटून टाकते तीच खरी अहिंसा होय !

शाक्य राजदूत-- (प्रवेशून) बुद्धं शरणं गच्छामि, धर्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि, भगवान्, शाक्य राष्ट्राच्या जिवावरचं जें संकट आलं आहे तें अितकें असह आहे आणि जो संदेश मी आपणाकडे आणीत आहे तो अितका त्वर्य आहे कीं, आपल्या प्रश्नांचीहि अपेक्षा न करितां तें सर्व आपण होअूनच मला सांगून टाकावं लागत आहे. सेनापति विक्रमसिंह, शाक्यांवर कोसलचा क्रूर राजा विद्युद्गर्भ विजेसारखा कोसळून पडला आहे. स्वसैन्य वाताहत झालं आहे. अेकच वीर तेवढा अजूनहि न डगमगतां रणांत विद्युद्गर्भास अडवून अुभा आहे--तो म्हणजे, विक्रमसिंह आपला पुत्र वल्लभसिंह, आणि मरणासन्न शाक्य राष्ट्राच्या हृदयांत जीवनदायी अशी अजून अेकच आशा, अेकच धुगधुगी अुरलेली आहे-ती म्हणजे हे शाक्यांच्या धुरंधर सेनापति, हे वीरवर, हें शाक्य राष्ट्र-पितामह-तुमचं साहाय्य आणि भगवान् बुद्धदेवांचे आशीर्वाद ! आमची अशी प्रार्थना आहे कीं, आमच्या विक्रमसिंहांनीं जो संन्यासाश्रम स्वीकारला आहे त्यास आमची ही विनंति विसंगत असतांहि, शाक्य राष्ट्राच्या प्राणांतिक संकटीं त्याची मुक्तता करण्यासाठीं विक्रमसिंह, आपण गजेंद्रासारखें धावून यावें, श्रीकृष्णासारखा प्रतिज्ञाभंगहि अुचितकालीं आर्तपरित्राणार्थ तरी अुचितच समजावा. विद्युद्गर्भाला जिंकलं नाहीं तर हें शाक्य राष्ट्र नष्ट झाल्यावांचून रहात नाहीं. आणि विद्युद्गर्भाला जिंकण्याला आपणच अेक वीर समर्थ आहां.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुद्ध–राजदूत ! तूं शाक्य राष्ट्राला आमचा निरोप कळीव कीं, तुमच्या दुःखानं तथागतास फार दुःख होत आहे. परंतु तितकेंच दुःख विद्युद्‌गर्भ आणि त्याचें कोसलीय सैन्य यांच्या दुःखाविषयींहि होत आहे. कारण तुम्ही त्यांच्या छळाच्या आणि अत्याचाराच्या आगीनें पोळत आहां तर ते छळक संतापाच्या आणि अतितृष्ण मत्सराच्या आगीनें भाजत आहेत. आम्हांस दोघेंहि सारखेच. वैर सोडा हेंच आमचें अनुशासन !

विक्रम–अहो, पण ज्या दुष्टानें वैर धरलें, साधलें, त्यानं तें सोडलें पाहिजे ना ! अुद्यां या पीठाच्या वतीनें जगांतील वाघ जातीलाहि आदेश धाडावा कीं, परवांपासून गायगुरांचं वैर सोडा ! तो आदेश वाघाकडून जेव्हां पाळला जाअील तेव्हांदेखील आपणांस असं आढळून येअील कीं, वैर सोडण्याचा आदेश मनुष्यांतील दुष्ट, दुर्जन पाळण्यास सिद्ध नाहीत ! म्हणून अशा दुष्टांचं दमन दंडानेंच केलं पाहिजे.

बुद्ध–पण जें दमन दंडानं होतं तें स्थायीं नसतं. मनच दुष्टतेपासून परावृत्त करणं हा दुष्टांस सुष्ट करण्याचा अुत्तम मार्ग नव्हे काय ?

विक्रम–तो अेक कल्पनेच्या पोकळींतील अुत्तम मार्ग असेल ! जसं मेल्यावर मिळणारं स्वर्गांतील अमृत तृष्णाशमनास अगदीं अुत्तम; पण या सतृष्ण जगाच्या तान्हेल्या जीवांस गांवच्या टेकडीवरील अुडचा टाकीत येणाऱ्या लहान ओढ्याचं ओंजळभर गोड पाणीच अधिक शीतलता देतं. काव्यांत कल्पवृक्ष मोठा अुत्तम; पण प्रत्यक्ष अुन्हांत अगदीं साध्या बिचाऱ्या वडपिंपळाचाच अुपयोग त्यापेक्षां शतपट अधिक होतो ! आणि दुसरं असं कीं दुष्टांचं मन सदुपदेश अैकण्याच्या सत्प्रवृत्त स्थितींत आणण्यासच दंडशक्तीची मात्रा बहुधा पहिला रामबाण अुपाय असतो. आपला चाळीस वर्षांचा अनुभव हेंच सांगतो कीं, दुष्टतेची अेक स्थिति अशी आहे कीं, ती प्रत्यक्ष बुद्धाच्याहि साधुवादानें असाधुत्व सोडीत नाहीं. विद्युद्‌गर्भ हा तसाच अेक दुष्ट आहे. म्हणून त्याचं मन दंडानं वळविता जरी आलं नाहीं तरीहि तें पंगु तरी करून टाकितां येतंच येतं. पण नुसत्या अुपदेशानें तो तात्कालीक लाभहि होत नाहीं; स्थायी तर होत नाहींच नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या क्रोधाचीं नखं छाटलीं, दंत अुपटले मग तो नुसताच स्वतः जळफळत पडला, शांत झाला नाहीं तरीहि हा लोक तरी त्याप्रमाणें त्यांच्या प्राणघातक रक्तपी हांवेपासून मुक्त होअून निर्णय शांति भोगूं शकेल.

बुद्ध--भिक्षुप्रवर विक्रम, आपल्या या भाषणांतील मर्म मी ओळखून आहें. पण आम्ही संन्यस्तकाम संन्यासी. संन्यास धर्म अहिंसेचा पुरस्कर्ता, तथापि आपण म्हणतां त्याप्रमाणें ज्या अर्थीं आत्यंतिक अहिंसा ही आचरणें मनुष्यास केवळ अशक्य आहे आणि ज्या अर्थीं प्रबळ अशा दुष्ट दुर्जनांनीं तिचा अवलंब करण्याच्या आधींच केवळ सुष्ट सुजनांनींच काय तो तिचा आत्यंतिक अवलंब केला असतां अशी असमय अहिंसा केव्हां केव्हां हिंसेअितकीच लोकघातक होअूं शकते हें आपलं विधेय अखंडनीय आहे, नाकारतांच येणारं नाहीं, त्या अर्थीं आम्ही यापुढें असं अनुशासन देतों कीं न्याय्य युद्धांत आततायी शत्रूंशीं लढण्यासाठीं शस्त्रधारण करण्यास माझ्या गृहस्थाश्रमीय अनुयायांस माझी अनुज्ञा आहे. अेतदर्थ शाक्य राष्ट्रानें ह्या असुधारणीय विद्युद्गर्भाच्या या अत्याचारी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठीं शस्त्रधारण अवश्यमेव करावें. त्या हिंसेचें पाप त्या सदाचारी प्रतिकाऱ्यांवर नसून त्या अत्याचारी अनुयायांवर आहे. मन्युस्तन् मन्युमृच्छति. हे राजदूता जा आणि ही माझी अनुज्ञा शाक्यांस कळव–या धर्मयुद्धांत तुमच्या असिलतेला माझे आशीर्वाद सहायक होवोत !

राजदूत--भगवन् ! आपल्या आशीर्वादाविषयीं अुभं शाक्य आपले अत्यंत आभारी आहे. आतां ज्या शाक्य असिलतेला सहायक व्हावयासाठीं आपण हे दैवी आशीर्वाद मला दिलेत ती शाक्यांची असिलताहि तेवढी मला भगवानांनीं अर्पण करावी कीं हा राजदूत मागल्या पायीं शाक्यांकडे परतलाच ! होय, ती शाक्यांची असिलता आपल्याच चरणापाशीं आज चाळीस वर्षे कोशबद्ध होअून पडलेली आहे.

बुद्ध--शाक्यांची कोशबद्ध असिलता ? कुठं आहे ? अिथं ?

राजदूत--होय भगवन् ! ही पाहा अिथं ! ह्या शाक्यसेनापतीच्या देहकोशांत गुप्तीसारखी गुप्तपणें निवसत असलेली वीरता–हीच आमच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाक्यांची राष्ट्रीय असिलता आहे ! भगवन्, तिला तेवढी आतां आमच्या हातीं द्या. हचा खड्‌गहस्त सेनापति विक्रमसिंहाचें समरशृंग रणांगणांत फुंकलं जातांच शाक्यांच्या रानांतील कोल्हेहि सिंह होतील !

बुद्ध--म्हणजे, भिक्षूवर विक्रमांनी तलवार अुपसावी ? संन्याशान आपल्या वस्त्रास रक्तांत भिजवून तीं भगवीं करावीं ? अशक्य ! राजदूत, आम्हीं संन्यासी, विरक्त, समदर्शी, आम्हांस तुमच्या सांसारिक वादविवादांत पडावयाचं नाहीं. आम्हांस तुम्हीं सर्वच सारखे. संन्याशानं शस्त्र अुपसून माणसाच्या शाका करीत सुटावं आणि आम्हीं त्यास अनुमोदन द्यावं हें तुम्हांस विचारवलं तरी कसं ? आत्यंतिक ब्रह्मचर्य आणि आत्यंतिक शस्त्रत्याग ह्या तर संन्यस्त भिक्षुधर्माच्या दोन मूलभूत प्रतिज्ञा आहेत. त्या कशा तोडल्या जाणार ?

विक्रम--क्षमा करा ! किंवा करूं नका. पण भगवन्, मला हें तुम्हांस सांगितलंच पाहिजे कीं, सांसारिक वादांत जर संन्याशानं विरक्तानं पडावयाचं नसेल, जर आम्हीं न्यायी व अन्यायी दोघांनाहि सारखंच मानावयाचं असेल तर तथागत बुद्धांच्या या अनुशासनाचा अधिकांत अधिक भंग करणारा अपराधी म्हणजे तथागत बुद्धच ठरतील. भगवन् आपण पूर्वी लाजगृहीं असतांना तेथें अेक शेकडों जीवास मारणारा यज्ञ होणार होता. तो बळीदानाचा कळप वाटेनं चालत असतां त्यांतील अेक लहानसें कोंकरू लंगडत चाललेलें आपणांस दिसलें. आपणांस तें पाहतांच अितकी दया आली कीं त्या कोंकरास आपण स्वतः कडेवर घेअून त्या कळपा-मागोमाग राजयज्ञागारीं गेलांत, विप्राशीं वादविवाद करून यज्ञांत जीव-हिंसा करणें पाप आहे असं आपण त्यास पटविलंत आणि कोंकरासुद्धां सर्वांची मुक्तता केलीत. अेका कोंकराच्या, शंभर पशूंच्या हिंसेस वांच-विण्यासाठीं आपण संन्यस्त कर्माचे मुकुटमणीहि सांसारिक वादविवादांत भाग घेते झालेत. आणि येथें शेकडों अर्भक मुलांच्या, शेकडों अनाथ कन्यांच्या, हजारों निरपराध माणसांच्या प्राणाशीं बेतली असतां आपण म्हणतां सांसारिक वादांत संन्याशास पडतां येत नाहीं ! म्हणे संन्याशास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाक्य आणि विद्युद्गर्भ दोघेहि सारखेच. समबुद्धि हा संन्यासाचा धर्म! परंतु संन्यासी भिक्षु चुलटचा सोलून अूंस खातात. भूस फुंकून तांदूळ खातात, गढूळ डबकें सोडून चांगल्या वाहत्या नदीचं पाणी पितात. दुभत्या गाअीच्या कासेंत हात घालतात, सापाच्या बिळांत हात घालीत नाहींत. मध जरी खातात तरी विषारी मधमाशांची पोळी आपल्या काखेंत लागूं देत नाहींत. तेव्हां चांगले आणि वाअीट आम्हीं ओळखतों.

बुद्ध---मग अशा समयीं संन्याशानं काय करावं असं आपलं मत आहे?

विक्रम--काय करावं? गायीची मान जबडयांत धरणाऱ्या वाघापुढं धर्मपदाचं अेकहि अनुष्टुप न गातां–कारण तें अनुष्टुप पुरं होण्याच्या आधीच त्या गायीचा कंठनाल चिरून तो व्याघ्र तिचं रक्त घटघटा पिअूनहि गेलेला असेल!– अेका झडपेसरशीं खड्गानें त्या वाघाचं मस्तक छाटून टाकलं पाहिजे! तसेंच या दुष्ट विद्युद्गर्भाच्या सैन्यावर तात्काळ कोणाहि अितर संसारी सैनिकापेक्षां अधिक निकराची चाल करून जाअून त्यास खऱ्या संन्याशानं अवश्यतर ठार केलं पाहिजे, आणि निरपराध सहस्रावधि शाक्यांच्या बायकामुलांस जीवदान दिलं पाहिजे. स्वर्गप्राप्तीच्या वेडापायीं पशुहत्या चालूं देणें हें जर संन्यस्त भिक्षूस निर्दयपणाचं आहे तर अहिंसेच्या खूळापायीं ही नरहिंसा चालूं देणें त्याहूनहि शतपट निर्दयपणाचं संन्यासित्वास कलंक लावणारं नाहीं काय? भगवन्, मला समरांत अुतरूं द्या; माझ्यांत अजूनहि दुष्टांचं शासन करण्याची शक्ति आहे निदान त्याचें या पुढील क्रौर्य तरी पंगु करीनच करीन. निरपराधांची पुढील घोर हिंसा तरी टाळीनच टाळीन. नव्हे, क्वचित् अजूनहि त्या अत्याचारावर शाक्य राष्ट्र विजयहि मिळवूं शकेल!

बुद्ध--तरी काय! आज शाक्यांवर विद्युद्गर्भ जय मिळवीत आहे. अुद्यां शाक्य त्यांच्यावर जय मिळवितील. तरी काय; जयानं तें वैर तसंच पुढं चालणार! जो पराजित होअील तो दुःखीच राहणार. म्हणूनच जो खरा संन्यस्तकाम आहे, खरा अुपसन्त, शांत आहे तो या जयापजयाच्या दोन्ही गोष्टी सोडून स्वस्थ झोंप घेतो—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

**" जयो वैरं प्रसवति दुःख शेते पराजितः ।
अुपसन्तः सुखं शेते हित्वा जयपराजयम् ॥"**

विक्रम— हाय, हाय ! हें मी काय अैकत आहे ! भगवन्, आपल्या स्वतःला जेव्हां वाटलं कीं आपण निर्वाणपदीं पोचलांत त्यानंतरहि केवळ ह्या दुःखतप्त जगास पाहून आपणांस आलेल्या कळवळ्यामुळें लोककल्याणार्थ आपण हा देह चालविला तो काय ह्या वचनाच्या आधारें ? केवळ सुखं शेते–सुखानं झोपतो अितकाच संन्यासाचा मुख्य गुण ? तर मग आपण निर्वाणपदीं केव्हांच झोपा काढावयाच्या होत्यात, देहत्याग करावयाचा होता. सुखं शेते याचा लाक्षणिक अर्थ आपणास अभिप्रेत असेल तर मग ती स्थितप्रज्ञता, कर्मफलाचा अंतस्त्याग, शस्त्रसंन्यासाप्रमाणें शस्त्रधारणांतहि शक्य आहे. काटा काढावयास संन्यासी सुअी घेतोच कीं नाहीं ? मट खंलकंटक काढावयास खड्ग कां घेअूं नये ? दहा कोसांवर कोणास कांटा मोडला तर तुमचं अंतःसरण कळवळतं आणि त्यास औषध देण्यास जातां तेव्हां आमर्ली झोपमोड लाक्षणिक वा तात्त्विक अर्थी नसली तरी अक्षरशः होत नाहीं काय ? आपण म्हणतां जय वैरास प्रसवतो आणि पराजित अन्याय दुःखी होतो; तें कांहीं अंशीं खरं आहे. पण अन्यायी मनुष्यास पराजयाचं जें दुःख होतं तें टाळण्यासाठीं न्यायाचा पराजय करून घ्यावयाचा काय? चोरास चोरी फसल्याचं दुःख होअूं नये म्हणून सावांनां घराचीं दारं अुघडीं टाकणं भाग पाडावयाचं? कां तें पराजयाचं दुःख अन्याय कर्मांची शिक्षा म्हणून त्या दुष्टास भोगणं प्राप्त होणेंच श्रेयस्कर मानावयाचं ? अन्यायी आततायास पराजयाचं दुःख होतं तें वाअीटच; पण जर दुर्जनांचा अुद्दंड अन्याय तसाच चालूं दिला तर निरपराध सुजनांच्या छळानं अवधीं मनुष्यजाति संत्रस्त आणि दुःखी होते त्याची वाट काय ? तें त्याहून सहस्रपट वाअीट आहे ! त्यांतहि दुष्टांस जें दंडाचं प्रायश्चित मिळतं तेंच त्यांच्यातील दुष्टाअी करण्याच्या प्रवृत्तीस प्रथम भयाचा आळा घालतें. आणि ती अशी पंगु झाली म्हणजे सदुपदेशानं वा संवयीनें ती नष्ट होअूं शकते..

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परदुःख हें केव्हां केव्हां परकल्याणाचं अपरिहार्य मूल्य असतं. आपण संसार सोडलात तेव्हां यशोधरेला केवढं दुःख झालं; पण पिता वा पत्नी यांच्या दुःखासाठीं आपण परत घरीं गेला नाहींत. जो तरुण वा तरुणी संन्यस्त दीक्षा देऊन आपण संघांत घेतलात त्यांच्या त्यांच्या घरीं रडारड चालू होते. यास्तव कित्येक नगरांनीं आपल्यावर बहिष्कार घालून आपणास काढून लावलें. देवदत्तानं नवीन पंथ काढला; आपण विरोध केलांत. त्यामुळें तो दुःखी झाला, क्रुद्ध झाला. वैर अितकं वाढलं कीं आपल्यावर मारेकरी घातले, पण आपण त्याचा पंथ स्वीकारून आपला बुद्धसंघ देवदत्ताच्या दुःखास्तव वा तें वैर तेंथेंच थांबविण्यासाठीं विसर्जन केला नाहींत. कारण हेंच ना कीं लोककल्याणार्थ देवदत्ताचं दुःख आणि वाढतं वैर हें अपरिहार्य मूल्य होतं. अपराध्याचं दुःख टाळणं म्हणजे लाखों निरपराधी लोकांस दुःखी ठेवणं होतं. तर मग तोच न्याय संन्याशाच्या शस्त्रधारणासहि कां लागू नये? ज्या राष्ट्राचं अन्न खाऊन हा संन्यासाचा पिंड प्रतिदिन पोसला जात आहे त्या राष्ट्रावर अेक अत्यंत अुद्दंड, प्रत्यक्ष आपल्या बापासहि राज्यासाठीं मारूं मागें न घेणारा हा राक्षस सहस्त्रावधि सैनिकांनिशी चालून आला आहे, अशा वेळीं अेक तलवारीच्या झटक्यासरशी तो राक्षस मारणं शक्य आहे असं वाटत असतांहि जो संन्यास आपली झोप बिघडूं नये म्हणून तो खड्ग सांवरण्याचं सोडून आपलं पांघरूण सांवरूं पाहतो. आपल्या राष्ट्रांतील लाखो स्त्रीबालवृद्ध भोसकले जात असतां त्यांच्या कर्कश किंकाळ्यानीं झोप मोडूं नये म्हणून कानांस निरर्थक आणि अनर्थक प्रतिज्ञांचे बोळे घालून 'सुखं शेते' स्वस्थ घोरत पडतो, त्या संन्यासास शतवार धिक्कार असो, सहस्रवार धिक्कार असो! सुखं शेते! केवळ स्वस्थ घोरत पडणं हें कां अुपसंतांचं, संन्यासाचं ध्येय आहे? तें अजगराचं ध्येय असं शकेल, आळशाचं असूं शकेल, आप्पलपोटयाचं असूं शकेल!—संन्याशाचं नव्हे! तेव्हां भगवन्, मला आज्ञा द्यावी. म्हणा – आधींच शाक्यांच्या आशेची आणि आयुष्याची घटिका मोजावयास घातली आहे—तेव्हां विलंब न करतां म्हणा, 'जा' आणि मी गरुडासारखी झेप घेऊन कोसलच्या त्या अत्युग्र भुजंगाचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाक्यांच्या प्राणास पडलेले भयंकर विळखे तोडून फोडून विच्छिन्न करून टाकतों पाहा–पण दंश होण्याच्या आधीं मला तेथें पोचूं द्या म्हणा, ' जा ' !

बुद्ध––भिक्षुवर विक्रम आपल्यासारख्या तत्त्वज्ञांनीं संन्यस्त भिक्षूनं असें अेकाअेकी अुत्तेजित होअून अुठावें हें आश्चर्य आहे. कांहीं झालें तरी मला तुम्हांला आमच्या संघाच्या प्रमुखतम भिक्षूला शस्त्रयुद्धांत शस्त्र घेअून जा लढा–असं सांगणं शक्य नाहीं. संघाची आणि संन्यासाची मूल भित्तीच ज्या कांहीं प्रतिज्ञांवर अवलंबून आहे त्यांतील आत्यंतिक शस्त्रसंन्यासाची ही शपथ कोणाहि भिक्षूला मी मोडूं देणार नाहीं.

विक्रम––दुर्दैव राष्ट्राचें कीं ज्यांत हा दुबळा संन्यासधर्मच सर्वोच्च धर्म समजला जाअील ! दुसरे काय ! शाक्यदूत हो जा आणि राजसभेस सांगा कीं, अदूरदर्शीपणानें आत्यंतिक शस्त्रन्यासाची प्रतिज्ञा करणं ही चूक झाली म्हणून तीमुळें लोककल्याणास अत्यंत हानि पोंचत आहे असे स्पष्ट झालें असतांहि ती चूक–स्वत:च्या दृढनिश्चयाचें स्तोम माजविण्यासाठीं–सुधारण्यास नाकारणें म्हणजे दृढनिश्चय नसून केवळ दुराग्रह आहे, असें विक्रमसिंहास वाटत असतांहि बुद्ध भगवानांची अनुज्ञा नसल्यामुळें त्यांची स्थिति अेकाद्या मंत्रबद्ध नागासारखी झाली आहे. त्यास तसें मर्यादेबाहेर हलतां येत नाहीं. शाक्यांच्या रक्षणार्थ खड्‌गनिष्कोषित करून समरांत शिरण्यास अुद्युक्त असतांहि तुमच्या साहाय्यार्थ मला येता येत––

राजदूत–– हां, हां ! तें अशुभ वाक्य, तो निर्दय निर्णय. ती राष्ट्रघातक अर्थव्यक्ति पुरी करण्याच्या आधीं अेक पळभर तरी थांबा ! बुद्धदेवांच्या अिच्छेचा शेवटचा शब्द आपण अेका श्रवणानं अैकलांत, पण त्याच्या बरोबरच या आर्त, त्रस्त, मरणोन्मुख शाक्य राष्ट्राचाहि शेवटचा शब्द दुसऱ्या श्रवणानं अैका आणि मग तुमच्या त्या निर्णायक वाक्यांचा शेवटचा शब्द बोला ! शाक्य राष्ट्राच्या आत्म्याची ह्या भयानक संकटांतील तळमळ, जिवाची तगमग, त्याच्या शेवटच्या आशेचा तो शेवटचा शब्द व्यक्तविण्याचें सामर्थ्य कोणाहि अेका व्यक्तीच्या जिव्हेंत असणें शक्य नसल्यानें शाक्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जातीची ही जातीय जिव्हाच आपल्यापुढे ती राष्ट्रीय करुणा भाकील! (विक्रमसिंहाचा खड्ग काढून त्याजपुढे ठेवतो.)

विक्रम--(दचकून) काय ? हा माझा खड्ग ! हें माझं कृपाण ! चाळीस वर्षे होतील मीं संन्यास घेतला तेव्हां हा मीं खालीं ठेवला ! ह्या खड्गानें मी बारा वेळा शाक्यांच्या शत्रूंस धूळ चारली आहे.

राजदूत--सेनापति, त्याच्या मुठीवर त्या बारा विजयांचें स्मारक म्हणून बारा रत्नांचा जडाव चढवून हा आपला खड्ग आमची राष्ट्रीय मत्ता म्हणून आमच्या राजसभेत आम्हीं शाक्य सदा लटकत ठेवीत असतों. प्रत्येक नवा सेनापति ज्याला वंदन करून आपलें पद स्वीकारतों, तो हा खड्ग ! शाक्यांनीं या खड्गास आमचा प्रतिनिधि म्हणून आपणांस आमचा संदेश देण्यास, आमची प्रार्थना अैकविण्यासाठीं आणि मन बळविण्यास धाडलेला आहे. शाक्य राष्ट्र जर आतां मरणेंच असेल तर निदान वीरोचित प्रतिकार करीत तरी मरावें-पण तेंहि आतां आपण हा खड्ग अुचलून रणांत अगदीं त्वरीत अुतराल तरच शक्य ! महाराज, क्षणभर मी जो प्रकार पाहत आलों तो डोळ्यासमोर आणा. तीं आमापल्ली, केदनावती, लींबणीय-कोसलच्या सैन्यांनीं लावलेल्या आगींत गांवेंचीं गांवें भडकत आहेत पाहा ! कडाकड मोडून पडणाऱ्या पेटलेल्या बहालांच्या आणि छप्परांच्या खालीं म्हातारे आणि मुलें जिवंत दबून जळून जात आहेत, तें पाहा ! त्यांच्या मांसाचा तो अुग्र वास कोस कोस पसरत आहे ! मारा, हाणा करीत कोस-लचे शेकडों सैनिक नागवी तलवार घेअून भेटेल त्या शाक्यास सपासप कापीत, लुटीत, ठेचीत धांवत आहेत पाहा ! त्या स्त्रियांच्या थव्यांवर घोडे घातले पाहा, तीं मुलें ठिचून गेलीं पाहा ! त्या रक्ताच्या चिळकांड्यां, तीं मुंडकीं, त्या किंकाळ्या, तो पळ, तो कण्ह !–महाराज, शाक्य राष्ट्र आपलें मूल आहे. हा कसाअी विद्युद्गर्भ आणि त्याचा दुष्ट सेनानी चंड सुरा घेअून त्याच्या पाठीवर येत आहे ! तें रडतं भ्यालेलं लेकरूं आपल्या कमरेंस बिल-गत आहे, आपण दया करा, वांचवा !

विक्रम–वांचवतों ! ज्या शाक्य संन्याशाला राष्ट्राची अितकी दुर्दशा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालली असतां दुखानं झोप लागते त्याला लागो ! मला तरी ती लागत नाहीं. भगवन्, अैकलंत ना सारं ! मग अुचलूं ना हा खड्ग ?

बुद्ध–संन्यासधर्माच्या, भिक्षुधर्माच्या हें सर्वस्वी विरुद्ध आहे ! ह्याहून मी कांहींच सांगूं अिच्छीत नाहीं.

विक्रम–तर मग तुम्ही न सांगतां मी अशा त्या दुबळ्या जातिघातक, मनुष्यहितविरोधक सन्यासधर्माचाच हा संन्यास केला पाहा ! हें कर्तव्याचें कृपाण अुचललें पाहा. माझ्या शाक्य राष्ट्रा, हे संत्रस्त मनुष्यमात्रहो, राष्ट्रधर्मास्तव, मनुष्यधर्मास्तव, भूतदयेस्तव अपरिहार्य साधन म्हणून हा संन्यासी हें शस्त्र अुचलीत आहे पाहा ! हें शस्त्र मी अशा परिस्थितींत अुचलीत आहे कीं त्यायोगें विद्युद्गर्भाच्या क्रौर्यास पराजित नसले तरी पंगु करून टाकून सहस्त्रावधि जिवांस मी वांचवूं शकणार आहें. गेल्या चाळीस वर्षांतील शस्त्रन्यासानें मी जितक्या साधूंचें परित्राण आणि जिवांची दुःखापासून सुटका करूं शकलों नाहीं तितकं लोककल्याण ह्या शस्त्रधारणानें मी येत्या चाळीस दिवसांत करूं शकेन ! जातों मी. क्षणक्षणाचा अुशीर शाक्यांचा गळा मरणाच्या फांसांत अधिकाधिक गुंतवीत आहे. तरीहि हे चराचरहो, तुम्हीच साक्ष आहांत कीं मी लोकहितास प्रसंगीं प्रतिकूल जाणाऱ्या प्रतिज्ञांनीं पंगु असलेल्या या संन्यासाश्रमास सोडून जात आहे; ज्या आत्यंतिक अहिंसेमुळें दुष्टांचें परित्राण आणि साधूंचा विनाश होतो ती अहिंसा धर्म नसून प्रत्यक्ष अधर्मच असल्यामुळे मी तिला सोडून जात आहे; भगवान् बुद्धदेवास नव्हे !

(जातो.)

✣ ✣ ✣

अंक ३ रा, प्रवेश ६ वा

विक्रम–अिथूनच कुठूनसा शब्द आला. हं. अिकडे या पाहूं ! अहो; हाच तो माझा वीरपुत्र, शाक्यांचा वीर सेनानी वल्लभ–आणि हाय हाय ! नव्हे धन्य धन्य ! हीच ती माझी सून, वल्लभाची वल्लभा, शाक्यांची रणदेवता सुलोचना ! वा वा मुली, या रात्रींच्या रणघाअींत मला जेव्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समजलं कीं या शाक्यसेनेतील तो तरुण वीर सुलोचना म्हणजेच माझी सून सुलोचना तेव्हां तुला दूर कोसळत्या विजेसारखी झुंजतांना पाहून मला जें सानंद आश्चर्य वाटलं त्याहून द्विगुणित आनंद आणि आश्चर्य तुला अिथं अशी अेखाद्या जादूनं धरून ठेवलेल्या विजेसारखी मरणशेजेवरहि आपल्या जिवलगाला आलिंगित गतप्राण निजतांना पाहून वाटत आहे! अहो, या वीरात्म्या प्रणयी प्रणयिनीचें हें नैष्ठिक कामचर्य संन्याशाच्या नैष्ठिक ब्रह्मचर्याहून पवित्रतेंत लेशमात्र अुणें नाहीं. परोपकारितेंत तर लवलेश तरी अधिकच असेल! शाक्यांत देवी यशोधरा संन्यस्त अग्रश्राविका महाभिक्षुणी म्हणवीत आहे तें योग्यच आहे. पण या तरुण कन्यकेचा, सुलोचनेचा, या कामदेवाच्या पूजिकेचा त्याग, अिंद्रियनिग्रह, कर्तव्यतत्परता त्या महान् देवी यशोधरेअितकीच अुत्कट असून हुतात्मता केवळ अलौकिक आहे! कामदेवाच्या पूजकानों, तुमच्या या अशा शुभकामीं संगलोलुप अनुरक्तीहून अधिक निष्काम, विरक्त व निःसंग असें काय असूं शकणार आहे! माझ्या शूर, सुशील, सुंदर सुने, बाळे सुलोचने, या तुझ्या वीरवर वल्लभाला मरणमंचकावर दिलेलें हें शेवटचें आलिंगन–हा तुम्हां दोघांचा कामदेवाच्या पूजेचा शेवटचा काम्य संस्कार अेखाद्या–देवपूजेच्या धर्मसंस्कारासारखाच मंगल आहे, पवित्र आहे, यच्चावत् तरुण कन्यकांना व कुमारांना कल्याणप्रद आहे.

चंड–(आपल्या सैनिकांसह पुढें डोकावत दबकत येअून) नाअीक, तुम्हीं म्हणालांत तितकीं माणसं ह्या विक्रमाजवळ मुळींच नाहींत. आपल्या-अितकींच आहेत. त्यांत हा घायाळ. तेव्हां चला बघतां काय? बुद्धाच्या आधीं ह्या तोंडांत चालून घुसलेल्या मृगयेचा कंठ झेपेसारखा दांतांनीं कडाकड फोडा. (कोसलेश्वर महाराज की जय असें गर्जत ते तुटून पडतात.) व्रतभ्रष्टा विक्रमा, मी तुलाच शोधीत होतों. घे घे! (वार करतो.)

विक्रम–दुष्टा चंडा, मीहि तुलाच शोधीत होतों. घे घे! (वार करतो.)

बुद्धशिष्य–(बुद्धासह प्रवेशून) हां! हां! तथागत भगवान् बुद्ध आपणा अुभयतांसहि शान्त व्हा म्हणून अुपदेशीत आहेत. कारण ते शांतता स्थापण्यासाठींच आलेले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चंड–हट ! सिंहाच्या तोंडचें हरिण हिसकतोस ? (विक्रमावर धांवतो.)

बुद्ध–(विक्रमास सावरून) विक्रमा, सेनापति चंड रणोन्मत्त झाले आहेत. क्रोध हा खवळलेल्या सापासारखा कोणासहि अनावर होतो. पण तुम्ही सुज्ञ आहांत. तुम्हांस आमचें धर्मसूत्र माहीतच आहे कीं 'अक्रोधेन जियेत क्रोधं । असाधु साधुना जियेत् !'

चंड–काय नीचा बुद्धा, असाधु म्हणतोस ? कोसल सेनापतीस असाधु म्हणतोस ? तुझी जीभच छाटून टाकतों घे. (बुद्धावर चालून जातो.)

विक्रम–(चंडास वार करून घायाळ करतो आणि खालीं पाडून त्याच्या छातींत पाय रोवून) भगवन्, तुमच्या स्वतःच्या अक्रोध.नें तरी याचा क्रोध शांत झाला कां ? कां तो उलट अधिकच पिसाळला ? जर हा साधुपरित्राण करणारा खड्ग मध्यें पडला नसता तर आतां सुष्ट बुद्धाचा वध दुष्ट चंडानं केला होता.

बुद्ध–पण कांहीं झालं तरी तुम्हांस अशी हत्या शोभत नाहीं; तुम्हीं संन्याशी आहांत !

विक्रम–आणि म्हणूनच या असुधारणीय लोककंटक दुष्टाचा शिरच्छेद करणारा पहिला आणि अत्यंत प्राणघातक वार ह्या माझ्या संन्यस्त खड्गानंच केला पाहिजे ! केला; या चांडाळास शेवटीं स्वतः ठार केला. रणांतील धांवांनीं विकल झालेला हा माझा देह आतां अर्ध घडींत पडणारच. पण तो आतां अधिकच कृतार्थ होऊन पडेल ! वा ! या याच्या असळःया रक्ताच्या चिळकांड्यांनीं माझा संन्यासी वेष आणि हा माझा संन्यस्त खड्ग–

बुद्ध–कधींहि न धुतल्या जाणाऱ्या पापी काळिमेनें कलंकित झाला आहे.

विक्रम–भगवन्, जरा या प्रत्यक्षाच्या प्रकाशांत येऊन नीट पाहा तर खरे. हा लालभडक रंग आहे, काळा नव्हे हें डोळे असणारा कोणीहि सांगू शकेल. त्या दुष्टाच्या लाल रक्तांत रंगल्यानें या संन्याशी बाण्याचा मुळचा रोगट, फिकट पिवळेपणा जाऊन तो उगवत्या सूर्यासारखा उठा-

(सा...११)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चदार आरक्त आणि तेजस्वी दिसत आहे ! चाळीस वर्षांच्या निःशस्त्र संन्यासांत जितका परोपकार व पुण्य मी जोडूं शकलों नाहीं तितकें या अेका क्षणांत असंख्य निरपराध जीवांना जीवदान देणारे हें संन्याशाचें सस्त्र चालवून मीं जोडलें आहे. लोककल्याणार्थ तत्परता हें संन्याशाचें अैहिक कर्तव्य असलें तर तें मीं कधीहि केलें नव्हतें. अितक्या अुत्कटतेनें आज केलें आहे. म्हणून आजच मी खरा संन्यासी आणि भिक्षु शोभत आहें

बुद्ध––हे महामना विक्रमा, अैहिक लाभालाभाच्या दृष्टीनें तुझा कोटिक्रम जरी अखंडनीय भासला तरी पारलौकिक दृटचा तूं जें संन्यासधर्मानुरूप अहिंसेचें महाव्रत घेतलेंस त्यापासून तूं आजच्या हिंसेनें च्युत झाला आहेस. त्यायोगें तुझ्यासारख्या वितृष्ण, परम ज्ञानी आणि त्यागी भिक्षुप्रवर अगदीं निर्वाणनिकट असूनहि आज निर्वाणच्युत झाला.

विक्रम––या चंडाच्या अत्याचारापासून यापुढें होणाऱ्या असंख्य निरपराध स्त्री–पुरुषांच्या हिंसेस टाळण्यासाठीं मीं या दुष्टास मारलें. या दोषास्तव मला निर्वाणपद मिळत नसेल तर अशा निर्वाणाचा मी धिक्कार करतों. जो लाखों लोकांच्या छळास अुपेक्षेचें साहाय्य करूनच मिळतो तो निर्वाण नसून नरक होय.

धर्म––(प्रकट होअून) परंतु हे महाकर्मयोगिन् वीरवरा, तूं निर्वाणच्युत झालाच नाहींस. अुलट ह्या हौतात्म्यानेंच निर्वाणपद प्राप्त झालास ! कारण––

द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमंडलभेदिनौ ।
परिव्राट् योगयुक्तःच रणे चाभिमुखे हतः ।।

विक्रम––हे दिव्य पुरुषा तूं कोण आहेस ? देव कीं देवदूत ?

धर्म––सर्व मानव धर्माचें अधिष्ठान असणारा मी धर्म आहें. हें बुद्धदेव, तुम्हीं परिव्राटांत श्रेष्ठ आहांत ! मानुषकावर तुमचे अनंत अुपकार आहेत. हें शाक्य राष्ट्र आणि ही शाक्य जाति आज गतप्राण झाली पण तिचें मुख्य जीवनकार्य पूर्ण करून मग ती लयाला गेली. कारण तिनं तथागत बुद्धाला जन्म दिला ! आणि म्हणूनच अेकाअर्थी ती चिरंजीव होणारी आहे. तुझ्या शीतल आणि सरल धर्मोपदेशानें मोहित झालेले देव, दानव, यक्ष आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तक्षक, आर्य आणि अनार्य अखिल मानव द्वीपद्वीपांत राहून तुझ्या या जन्मभूमीचा पुण्यतम भूमि म्हणून शोध करीत आपल्या भक्तिभावाच्या पुष्पांजलि अर्पण करण्यासाठीं येथें येतील. या शाक्य जातीचे अितिहास, धर्मपुराणासारखे अभ्यासिले जातील, राजे आणि महाराजे त्यांचे मुकुट आणि साती सागर त्यांचे माणिकमोती तुझ्या मूर्तिवरून ओवाळून टाकतील. कोणाहि मनुष्याच्या चरणावर विनत झालीं नसतील अितकीं कोटि कोटि मानव मस्तकें तुझ्या ध्यानस्थ मूर्तींच्या चरणीं युगोयुग विनम्र होतील. हे परिव्राट् महाकर्मसंन्यासिन् बुद्ध, तूं निर्वाणपदाचा अधिकारी आहेसच; परंतु हे वीरवर महाकर्मयोगिन् विक्रम, तूंहि त्याच निर्वाणपदाचा अधिकारी आहेस; कारण धर्माचें मुख्य मर्म जें मानुषकांचें अत्यंत हित तें साधण्यासाठीं सर्वस्व त्याग करून अभिमुख समरांत लोककल्याणार्थ झुंजत लोकहिंसकाचा वध केलास–स्वतःचा प्राणत्यागहि करण्यास कचरला नाहींत. दुर्दैवानें तुझी स्मृति व्यक्तिरूपानें बुद्धासारखीं मागें अुरणार नाहीं. पण लौकिक हा बहुधा योगायोग असतो. योग्यतेचें अनन्य गमक नसतो. आणि तुझ्या कर्मयोगाच्या महत्तेच्या ह्या विस्मृतीचा ह्या तुझ्या शाक्य जातीस जसा भयंकर दंड द्यावा लागला, शस्त्रबळाच्या अुपेक्षेनें आणि कृषि, कामिनी, कृपाण याच्या आत्यंतिक संन्यासाच्या अतिरेकामुळें जसें हें दुर्बळ शाक्य राष्ट्र प्रबळ दुष्टांच्या हिंसेस बळीं पडलें त्याचप्रमाणें आणि जवळ जवळ त्याच कारणासाठीं हें अुभें आर्यावर्तहि यवन-हूण-शकांच्या राक्षसी आक्रमणास बळी पडेल. शाक्य राष्ट्राचा हा आजचा विनाश हा असल्या भावी अुभ्या आर्यावर्तावर येणाऱ्या घोर संकटांची केवळ पूर्वसूचना आहे. काळानें लहान प्रमाणावर करून पाहिलेला तो केवळ पूर्वप्रयोग आहे. वीरवर विक्रम, ज्यांत निष्क्रीय संन्यासाचे सर्व अैहिक आणि पारलौकिक लाभ असूनहि जो अत्यधिक लोकहित साधक आहे अशा तूं अुपदेशिलेल्या आणि आचरिलेल्या शुभ कामीं शक्तिपूजक कर्मयोगाचा अवलंब करणें हेंच त्या संकटाच्या कचाटयांतून मुक्त होण्याचें साधन आहे. धर्माचें मुख्य स्वरूप आणि अुद्दिष्ट जें मानुषकांचें अैहिक आणि पारलौकिक धारण, अुद्धारण तें अशा कर्मयोगानेंच अधिक प्रमाणांत साधत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यानें, मानवहो, माझें निश्चित आणि अुत्तम मत हेंच आहे कीं—

यद्यपि—संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ

तथापि—तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते ।

✠ ✠ ✠

संन्यस्त खड्ग–(मराठी नाटक) भगवान् बुद्धीच्या जीवन-चरित्रावर व त्याच्या आत्मघातकी राजकीय तत्त्वज्ञानावर आधारलेलें नाटक. मूल्य रु. १.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैनायकवृत्ताचा विशेष : : १२

✠ ✠ ✠

[काव्यवृत्तासंबंधीं चर्चा करणारा हा निबंध ' रानफुलें ' ह्या पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्ट म्हणून जोडलेला आहे. मुक्तछंद मराठींत आज कांहींना फार प्रिय आहे तर कांहींना तो तितकाच अप्रिय आहे. परंतु कवि विनायकराव सावरकर यांनीं स्वतः निर्मिलेल्या आणि प्रतिभेच्या वैनायकाप्रमाणें भराऱ्या मारण्याची शक्ति असलेल्या वैनायकवृत्तांतील कविता दोन्ही पक्षांचा समन्वय घडविणारी आहे. अशा ह्या वैनायकवृत्ताचा विशेष त्याच्या निर्मात्यानेंच येथें सांगितला आहे.]

✠ ✠ ✠

साधारणतः असें म्हणूं या कीं तालसूरांचे संस्कार नसलेलें जें लिखाण वा भाषण तें गद्य. वरील संस्काराचा, निदान तालाचा संस्कार, ज्यावर झालेला आहे तें पद्य.

आपले विचार अगदीं मनांत अुठतात त्या शब्दांतच स्पष्ट आणि विस्तारशः व्यक्तविण्याचें साधन म्हटलें म्हणजे गद्यच होय. परंतु तेच विचार ताल-सुरावर, म्हणजेच पद्यांत, व्यक्तविले गेल्यास आपणांस दुहेरी समाधान होतें; त्या विचारास शब्दांत व्यक्तविण्यानें मनाचें आणि शब्दास तालसुराच्या मंजुलतेची जोड लाभल्यानें श्रुतीचें. या श्रुतिमंजुलतेची जोड आपणाला अितकी हवीशी असते कीं अगदीं नीरस वाक्येंहि तालसुरांत म्हटलीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जातांच वाटतीं त्याहून सरस वाटूं लागतात. तिशीपाढे म्हणजे कोण रुक्ष प्रकरण; पण मुलामुलींच्या शाळेंतील वर्गचावर्ग जोडी जोडीनें जेव्हां तेच पाढे तालसुरांत म्हणूं लागतो तेव्हां तो 'परवाचा' अगदीं अैकावासा वाटूं लागतो. त्यांच्यांत मिसळून त्या चालीवर म्हणावासा देखील वाटूं लागतो ! यामुळेंच अगदीं निर्भेळ गद्य बोलता बोलता हरदास पुराणिक मध्येंच रंगांत आले कीं तेंच गद्य कसल्यातरी गळ्यावर बोलूं लागतात. कांहीं वक्तेहि अेक प्रकारच्या सुरांत आणि ठेक्यांत आपल्या भाषणांतील भावनोद्दीपक गद्य वाक्यें अुच्चारीत जातात. गद्यालाहि गळा लावतात.

पण गळा म्हटला कीं कसल्यातरी सुराचें, तालाचें, चालीचें बंधन आलेंच. नुसत्या शब्दापेक्षां तालसुराच्या श्रुतिसुखदतेची गोडी असणाऱ्या शब्दांची मनुष्याला ही जी स्वाभाविकत:च अधिक आवड असतें तींतच पद्याचें मूळ आहे. त्या आवडीसाठीं मनुष्य गद्यांत असणारी वाटेल तसें बोलत जाण्याची सोय आपण होअून सोडून देतो आणि तालसुराचीं बंधनें हौसेनें स्वीकारतो. पद्याचा आश्रय करतो.

ही गोष्ट झाली साध्या विचारांची, भावभावनांची. पण जेव्हां त्या भावभावना अगदीं अुत्कट होतात, अितक्या अधीर होतात कीं मुळीं शब्दांच्या आटोक्यांत राहूंच शकत नाहींत, तिथें गद्य कीं पद्य ही निवड करणेंच अशक्य होतें. हृदयाला दुर्धर वा दुस्सह झालेल्या भावभावनांचा आवेग स्पष्ट शब्दांच्या बिंदुबिंदूंनीं व्यक्त होण्याअितका जेव्हां असा संयतच राहूं शकत नाहीं तेव्हां तो स्वयमेवच सुराच्या धाराप्रवाहांत वाहूं लागतो. गद्याच्या तर नव्हेच नव्हे, पण शब्दमय पद्याच्या आटोक्यांत न राहून गीत-पद्याच्या, गाण्याच्या, तानेच्या, ओघांत सहसाच सांपडतो. सहज शब्दांत दुःख सांगणें हें गद्य. पण शब्दांत व्यक्त होअीतों तें दुःख न आवरतां येअून अकस्मात् क्षनावर रडूं कोसळतें. पद्य, सहज गाणें. अनावर रोदन, अनावर हसूं, दबतें अुसळणारें स्फुंदन, अकस्मात् वाजून जाणारी शीळ हीं सारीं सहज पद्येंच होत. आपण 'गळा काढून' रडतो, 'ताला' वर हंसतो, 'राहून राहून' हुंदके देतो. भावभावना आपली शब्दांत न सामावणारी अुत्कटता व्यक्तविण्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असा 'गळ्या' चा 'ताला' चा, पद्याचा, स्वभावत:च आश्रय घेतात. किंबहुना शोकाचें आणि आनंदाचें हें रडगाणें आणि धिंगाणें हेंच मनुष्याचें पहिलें अुपजत गाणें पद्याचें मूळ! आणि त्याचे ते अुसासे नी अुद्गार, हुंदके नी हसूं, हींच आद्यवृत्तें, अुपजत छंद! आद्य कवीचें अनुष्टुपदेखील त्यानंतरचें!

पद्याचा सूर, गीतांची 'तान,' हा मनोवृत्तींच्या अशा आवेगाला संतत वेगानें वाहण्याचा पाट आहे. त्यांचा ओघ शब्दबंधाऱ्यास फोडून, ओसरतो ताणून ज्यांत वाहविला जातो तो सूर, ती तान. यासाठींच भावनेचा अुत्कट अुद्रेक स्वभावत:च पद्याचें रूप घेतो, गद्याचें नव्हे. म्हणूनच तान, ताल सुरेलपणा हे पद्याचे स्वाभाविक विशेष होत. आपण त्यास पुढें जरी पद्यांची 'बंधनें' म्हणतों तरी मुळाशीं पद्याचीं तीं अंगेंअुपांगेंच असतात. ज्यास अल्पस्वल्प तरी गळा वा चाल, सुरेलपणा वा ताल नाहीं तें पद्यच नव्हे. ज्या पद्याचा ताल सुटला त्याचा ताळच सुटला. जें गीत बेसूर, तेंच भेसूर! तें केवळ गद्य.

ज्यास असें कोणचेंहि बंधन न पाळल्यानेंच आपल्या भावभावना व्यक्तविण्याची अिच्छा होतें, त्यांतच त्या व्यक्तविल्याचें समाधान वाटतें, त्यानें तशा तालतानेच्या, सूर बेसुराच्या, 'बंधनांचा' आश्रय न घेतां सुचतील त्या शब्दांत त्यांत सुखेनैव; व्यक्तवाण्यापण त्यास गद्य म्हणावें. पद्याचा ज्यांत कोणताहि विशेष नाहीं त्यास पद्य असें नुसतें म्हटल्यानें कोणती विशेष शोभा येणार आहे!

काव्याचा आत्मा रस, तो गद्यांतहि प्रतिभावान् लेखकांस पुष्कळ प्रमाणांत साधता येतो. कांहीं छंद:शास्त्रज्ञ गद्यालाहि अेक वृत्तच समजतात. कांहीं गद्य काव्यें कितीतरी रसाळ असतात! आणि रस नसल्यामुळें नुसतीं "पद्य" म्हणून म्हणवून घेणाऱ्या कांहीं कविता कितीतरी नीरस असतात! तेव्हां पूर्ण 'बंधन' विरहित अशी काव्यरचना ज्यास करावयाची त्यानें गद्याचा आश्रय करावा. फारतर ठरीव साच्याची वैय्याकरणी वाक्यरचनाहि सोडून लिहिलेल्या या अशा गद्यास "स्वैरगद्य" म्हणावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण हीं बंधनें नसलेलें असें स्वैर पद्य मात्र होऊंच शकत नाहीं. किंबहुना पद्यांत हीं 'बंधनें' बंधनें म्हणून वाटतच नाहींत. वर दर्शविलेल्या भावभावनांच्या अुद्रेकाची स्वाभाविक प्रवृत्तिच तालांत, सुरांत; गळयावर व चालीवर, व्यक्त होण्याची असल्यामुळें त्यांचें जेव्हां पद्यावांचून समाधानच होत नाहीं तेव्हां त्यांना तीं बंधनेंच, आलिंगनाच्या बंधनासारखीं, गोड गोड वाटतात. हें बंधनच त्यांचा स्वैराचार असतो.

त्याच कारणासाठीं यमक, अनुप्रास, ध्वनि प्रभृति शब्दालंकारांची आणि अर्थालंकारांचीं 'बंधनेंहि' कविता तशीच हौशीनें धारण करते कीं जशी कामिनी सोन्याचा कंबर पट्टा, मोत्यांचा हार, रत्नाच्या आंगठ्या, अंगावर घालते. हीं बंधनें मन मोडणारीं बंधनें नव्हेत तर मनास येणारीं बंधनें असतात. तीं असणेंच अिष्ट वाटतें. नसलीं तर चुकलेसें वाटतें. कवितेचें लावण्य त्यांनीं अधिकच खुलून दिसतें. कवितेवर कवि तीं बळानें लादीत नाहीं तर कविताच कवीपाशीं तें सुवर्ण अनुप्रासयमकादिक अलंकार मला घाला म्हणून लडिवाळ छंद धरीत सारखी विनवीत असते कीं "हौशीनें करा मशि गेंद छंद ! चढवा हो, बाजुबंद ! सख्या, घडवा हो बाजुबंद ! !"

काव्याचा आत्मा जसा रस तसा पद्याचा आत्मा ताल, चाल. पुढें तालाचीं शास्त्रोक्त मीमांसा होऊन मात्रांची श्रुतिशुद्ध मांडणी झाली.तिचाच पुढें निर्दोष प्रपंच वाढून आपली अनुष्ठुप, अुपजाति, स्रग्धरा, भुजंगप्रयात आर्या, गीति प्रभृति अनेक मंजुळ बांधेसूत, आणि सुरेख वृत्तें घडलीं गेलीं.

ह्या वृत्तांना यमकहि किती तरी खुलून दिसतो. संस्कृतांतील पूर्वीच्या वृत्तांस अनुप्रासादिकांचीं लेणीं असत. त्यांत पुढें यमकाचें लेणेंहि जें लाभलें तें कलाविकासाचें चिन्ह होय. कलाऱ्हासाचें नव्हें. ओढून ताणून यमक साधणें हा कवीचा दोष, यमकाचा नव्हे. सुरेख यमक साधण्याची हातोटी नसल्यामुळेंच निर्यमक कविता करणारांनीं आपल्या भाषादारिद्र्याच्या नांवानें बोटें मोडावीं, यमकाच्या नांवानें नव्हे !

आपलीं हीं अनुष्टुप, आर्यागीति, श्लोक, प्रभृति दोन चरणी चारचरणी वृत्तें सुटसुटीत, वेंचक, आणि चिमुकल्या भावभावनांस व्यक्तविण्यास अतिशय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसानुकूल आहेत. अेखादें सुभाषित, अेखादा अर्थान्तरन्यास, अेखादी अुपमा, किंवा अेखादें काव्यचित्र या रेखीव वृत्तांच्या चारचरणीं चौकटींत किती किती खुलून दिसतें म्हणून सांगावें ! अगदीं आद्य कवींचें हें सुप्रसन्न अनुष्टुप पाहा.

> अिदं तीर्थं समं सौम्यं सुजलं सूक्ष्म वालुकम्
> रमणीयं प्रसन्नंच सज्जनानां मनोयथा ! !

किंवा कालिदासीय कल्पनांच्या सोनेरी सांखळींत रत्नाच्या अेकाच लोलकासारखा लटकणारा हा अर्थान्तरन्यास पाहा.

> सरसिजमनुविद्धं शैवलेनापिरम्यं
> मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति
> अियमधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी
> किमिवहि मधुराणाम् मंडनं नाकृतीनाम्

किंवा भवभूतीचें हें चिमुकलें काव्यचित्र पाहा–

> दृष्टि स्तृणीकृत जगत्रय सत्त्वसारा
> धीरोन्नता नमयतीव गतिर्धरित्रीम्
> कौमारकेऽपि गिरीवद् गुरुताम् दधानो
> वीरोरसो किमयमेत्युत दर्प अेव !

ह्यांतील मनोज्ञ प्रतिमा नुसत्या गद्याच्या ‘ वल्कलेनापि ’ रम्य भासली असती. पण ह्या सुललित, श्रुतिशुद्ध नी सुमंजुल वृत्ताच्या अंगास ठीकठाक होणारें हें जरीचें गुलाबी पातळ नेसल्यानें त्यांत तेंच तीचें लावण्य किती खुलून दिसत आहे ! कल्पनेचें तें सौंदर्य, वृत्ताचें तें रेखीव सुरेलपण, ताल-मात्रांची ती सुपरिष्कृत श्रुतिमंजुलता ! खरोखर, कविता असावी तर अशी असावी !

अशी कविता अितक्या सुबकपणें ज्या आपल्या ह्या संस्कृत वृत्तांत विलसू शकते त्या वृत्तांची गोडी ज्यास लागत नाहीं तो कसला रसिक ! ज्यास तीं साधत नाहींत तो कसला कवि !

दोन किंवा चार चरणांतच संपणारी अेकादी सुटसुटीत कल्पना व्यक्त-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विण्यास हीं वृत्तें आणि हें यमक हींच अशीं अगदीं अनुरूप आणि समुचित साधनें आहेत अितकेंच नव्हे, तर दीर्घकाव्यासहि ती अगदींच वावडी आहेत असेंहि म्हणतां येणार नाहीं. ज्या अनुष्टुपांत जगांतील आद्यकाव्य–तें रामायण–गायलें गेलें आणि जगांतील महाकाव्य–तें महाभारत रचलें गेलें, तें अनुष्टुप दीर्घ काव्यप्रबंधास जुळतच नाहीं, शोभतच नाहीं, असें कोणी कोणच्या तोंडानें म्हणावें ! त्या वाल्मीकीच्या पवित्र आश्रमांत ज्या कोण्या प्राचीन अुषःकालीं " ततः प्राचेतसप्रज्ञौ रामायणमितस्ततः । मैथिलेयौ कुशलवौ जगतुर्गुरु-चौदितौ " त्या प्राचीन अुषःकालापासून आज युगानुयुगें ते त्या रामायणीय अनुष्टुपांचे मंजुल छंद काळाच्या वोलघुमटांतून निनादत येत आज जे या दोन्ही गोलार्धांवरील अवघ्या मनुजजातींस मोहून टाकीत आहेत ते कांहीं अुगीच नव्हेत !

मराठी ओवी किंवा बंगाली पायर हींही त्या अनुष्टुप छंदाचीच अेक सयमक नी शिथिल अशी प्राकृत आवृत्ति आहे. ज्ञानेशाच्या ओवीची रसानु-कूलता काय सांगावयास हवी !

हें सर्व विवेचन आरंभींच करण्याचा मुख्य हेतु अितकाच कीं यमक,ठरीव चरणांचे पद्यबंध,गेय चाली, प्रभृति जे विशेष आपल्या ह्या सुपरिचित जुन्या वृत्तांत आहेत त्यांपैकीं कांहीं आम्हीं योजलेल्या या नव्या वैनायक वृत्तांत जरी गाळले असले आणि ते गाळल्यामुळें हें वृत्त सुदीर्घकाव्यरचनेस कांहीं प्रमाणांत अधिक सोयीचें होतें असें आम्हांस जरी वाटत असलें तरी त्यावरून वरील यमका-दिक विशेष आणि त्यांनीं युक्त असणारीं तीं द्विचरणीं वा चारचरणीं जुनीं वृत्तें मुळीं रसानुकूल नाहींतच किंवा त्यांत दीर्घकाव्यें मुळींच खुलून दिसत नाहींत किंवा हें नवीन वृत्त त्या वृत्तांहून सर्व प्रकरणीं वा सर्वतोपरीं अधिक सरस आहेच आहे, असें कांहींतरी आम्हीं समजत आहों असें कोणास वाटू नये. वरील वृत्तांच्या लहान घडीव फुलपात्राहून या वैनायक वृत्ताचें विस्तृत आणि वाहत्या महान् ओघांचें हें वृत्तपात्र दीर्घकाव्यबंधाच्या प्रवाहास अधिक 'अनु-कूल ' झाल्यास होअील अशा अपेक्षेनें केलेला तो अेक प्रयोग आहे जुन्या. वृत्तांतहि, नव्हे निर्भेळ गद्यांतहि, त्यांच्या विविध आकाराप्रकारांप्रमाणें ज्यांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचे निराळे सौंदर्यविशेष प्रत्येकीं आहेतच. त्या वृत्तांमध्यें स्वतःचेंहि कांहीं सौंदर्यविशेष असणाऱ्या ह्या अेका नव्या वृत्ताची वांच्छनीय भर पडली असतां आपल्या वृत्तसंपत्तीची विविधता थोडी फार वाढणारीच आहे, अितकेंच या वृत्ताच्या वतीचें म्हणणें.

गद्यपद्यकाव्यांच्या रचनेसंबंधीं प्रस्तुत विषयास लागू असलेलें तेवढें सामान्य विवेचन व केल्यानंतर आतां या वृत्ताचे ते विशेष गुण वा अुपयोग काय आहेत तें थोडक्यांत पाहूं.

(१) गद्याला तालयतियमकचरणसंख्या प्रभृति बंधनें नसतात, परंतु त्यामुळें त्यांत सुरेलपणा येत नाहीं. तालयति अित्यादि संस्कारांनीं वाणीस सुरेलपणाची, मनोहर मंजुलपणाची जोड ज्यांत देण्यांत येतें तें पद्य. वैनायक वृत्तावर तालयति प्रभृति संस्कार होत असल्यानें त्यास मंजुळ सुरेलपणाची जोड मिळूं शकते. यास्तव तें गद्य नसून पद्य होय.

(२) गद्याची पुढील आणि पद्याची पहिली पायरी म्हणजे अक्षर-संख्याक वृत्त. वृत्तकलाविकासाची त्याच्याहि पुढील पायरी मात्रासंख्याकवृत्त. कारण तालाच्या मात्रा ठराविक पडल्या तरच तो चांगला साधतो. पण ऱ्हस्व-दीर्घाचा भेद न करतां त्या तालांत नुसती संख्या मोजून अक्षरें भरलीं तर त्यांचा अुच्चार अशुद्धपणें केल्यावांचून त्या तालाच्या ठराविक मात्रांत ती सामावता येत नाहींत. अभंगादि अक्षर वृत्तांत या अडचणीमुळेंच पांडुरंग शब्द अनेक वेळां " पांडूऽऽरंग " असा लांबवावा लागतो किंवा ' बैलाचें फूल माझ्या महादेवाला ' यासारख्या ठिकाणीं दीर्घअक्षरें झपकन अुच्चारून आग-गाडीच्या डब्यांत दडपून प्रवासी कोंबावे तशीं त्या तालांत तीं कोंबावीं लागतात. बंगाल्यांत अक्षरवृत्तेंच बहुत. परंतु त्यांतीलहि अव्यवस्था रवीन्द्रबाबूंसारख्या संस्कृतश्रुतिसंपन्न कवीला पुढें पुढें अितकी कर्कश भासूं लागली कीं, त्यांनीं आपली कांहीं कांहीं जुनी अक्षरसंख्यांक कविता शास्त्रशुद्ध अशा मात्रां-संख्यांक स्वरूपांत वृत्तांतरीतहि केली आहे. हिंदींतहि आतांशी मात्रासंख्यांक वृत्तेंच शिष्टतर समजतात. जो ताल असेल त्याच्या मोजून ठरविलेल्या मात्रा अितक्याच शास्त्रशुद्ध ऱ्हस्व दीर्घ अुच्चार केले असतां ज्यांच्या मात्रा भरतात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तितकींच अक्षरें योजणें हेंच प्रशस्त. यासाठींच मात्रासंख्याक वृत्तें हीं अक्षरसंख्याकांपेक्षा कलाविकासाची पुढची पायरी होय. वैनायक वृत्तें हीं अक्षरसंख्याक नसून मात्रासंख्याक असल्यामुळें तें केवळ गद्याहूनच नव्हे तर अक्षरसंख्याक पद्यांहूनहि श्रुतिशुद्ध, सुरेल आणि मंजूळ होअू शकतें. बंगालींतील 'अमित्राक्षर छंद' अक्षरसंख्याक असतांहि याच कारणामुळें त्याचें त्या प्रकरणीं अनुकरण न करतां मराठी कवितेचा शास्त्रशुद्ध असा मात्रासंख्याक संस्कारच आम्ही वैनायक वृत्तावर केला.

(३) जुन्या वृत्तांत बहुधा चार चरणांचा वा दोन चरणांचा पद्यबंध असतो आणि त्यांच्या शेवटीं विचार आणि वाक्य पूर्ण करून विसावा घ्यावा लागतो. यामुळें जो विचार त्यांच्या त्या लहान संपुष्टांत सामावणारा नसतो किंवा ज्या वाक्याची झेप त्यांच्या आटोक्याबाहेर जाण्याअितकी विस्तृत असते ते विचार नी वाक्यें त्यांत मावत नाहींत, त्यांची शोभा त्या वृत्तांतील काव्यास लाभत नाहीं. या अडचणीसाठीं अशीं विस्तृत वाक्यें आणि विचार व्यक्तविण्याचें कार्य त्याच त्या वृत्ताची पुनरावृत्ति करून संस्कृतमध्यें कुठें कुठें साधलें जाअी. अशा अेकाधिक श्लोकबंधास संस्कृतमध्यें "कुलक" असें म्हणतात. कुमारसंभवांत दहा पंधरा श्लोक मिळून झालेल्या अशा अेका कुलकांत कालिदासानें असें अेक विस्तृत वाक्य आणि अनेक कल्पनांची गोड गुंफण असलेला विचार व्यक्तविला आहे हें प्रसिद्धच आहे. परंतु ठराविक चालीचें तेंच तें वृत्त सारखें म्हणावें लागल्यानें अशा प्रबंधांत लवकरच अेकसुरीपणा (Monotony) येअून लागून श्रुतिला शीण वाटूं लागतो. विस्तृत काव्यें अेकाच अनुष्टुप, ओवी, प्रभृति अशा लहान वृत्तांची सहस्र सहस्र वार पुनरुक्ति करून लिहावीं लागतात तेव्हां तर हा अेकसुरीपणा फारच नडतो. ही अडचण टाळण्याची दुसरी युक्ति म्हणजे चंदभाटाच्या प्रख्यात "पृथ्वीराजरासो" सारख्या किंवा रघुनाथ पंडितांच्या नलदमयंति काव्याप्रमाणें विविधवृत्तें अेकापाठीमागून अेक योजणें. यामुळें ही अडचण पुष्कळ अंशीं दूर होते आणि अेकसुरीपणाला चांगलाच आळा घालतां येतो. परंतु त्या प्रत्येक वृत्ताचें पहिलें चरण ज्या चालींत त्याच चालींत शेवटच्या चरणापर्यंत तरी गळा तोच धरावा लागत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यानें भावभावनांच्या अनुरोधें वाक्यांचा स्वर झटपट यावा तसा बदलता येत नाहीं हें अेक, आणि दुसरें वैगुण्य असें कीं त्या साऱ्या वृत्तांत प्रत्येकीं दोन वा चार चरणान्तीं विचारांचा आणि वाक्यांचा अंत करून विराम देणें भाग पडत असल्यामुळें विस्तृत वाक्यांची वा विचारांची अशा काव्यांस शोभा येत नाहीं ती नाहींच. अशा रीतीनें कुलक किंवा वृत्तविविधता या अुपायांनीं अेक-सुरीपणा शक्य तों टाळून, विचार वाक्यांची सुविशाल झेप सामाविण्याची सोय या प्रत्येकीं अेक चाली, लहान चरणी, शीघ्रविरामी असलेल्या गेय वृत्तांत व्हावी तशी होत नाहीं. यावर अुपाय म्हणूनच अिंग्लिशमध्यें Blank Verse ची योजना करण्यांत आली. त्यामुळें ती सोय पुष्कळ अंशीं अधिक चांगल्या प्रकारें करतां येअूं लागली. त्याचसाठीं वैनायक वृत्तासहि दोन वा चार वा दहा चरणान्तींच विराम असावा असें कांहीं बंधन नाहीं. त्यामुळें विशाल विचार संपेतों विराम लांबविता येतो. अनेक लहान अुपवाक्यांनीं गुंफलेलीं वक्तृत्वपूर्ण दीर्घवाक्यें, त्यांची गोड गुंफण वा गंभीर प्रवाह फारसा खंडू न देतां, त्यांत सांधतां येतात. Paradise Lost या मिल्टनच्या महाकाव्यांतील या Blank Verse च्या वृत्तांत गुंफलेलीं सैतानाच्या राजसभेंतील किंवा अीश्वराच्या देव-सभेंतील वक्तृत्वशाली भाषणें वाचलीं असतां हा लाभ अशा वृत्तानें कसा साधला जातो तें चटकन ध्यानांत येअील. तीच सोय वैनायक वृत्तांत तशीच साधतां येते.

(४) सयमकता हा जो बहुतेक मराठी वृत्तांचा निरपवाद नियम तो या वृत्तास केवळ विकल्पानें लागू आहे. यमकालंकार लहान चरणी वृत्तास खुलतो. मागच्या चरणाच्या शेवटच्या अक्षराची आठवण श्रुतींत गुंगत आहे तोंवर जर पुढच्या चरणान्तीं तत्सदृश ध्वनि आला तर, अपेक्षित स्थलीं प्रिय मित्र अचूक-पणें भेटावा तसा श्रुतीला व मनाला आनंद होतो, म्हणूनच यमकाला मित्राक्षर असेंहि नांव आहे. आणि Blank Verse प्रमाणें मधुसूदन दत्तांनीं केलेलें वृत्त निर्यमक असल्यामुळेंच त्यांनीं त्यास ' अमित्राक्षर छंद ' हें नांव दिलें. पण मागच्या चरणाचा तो शब्द स्मृतींतून निघून जाअील अितक्या लांब अवधीं-नंतर पुढच्या कुठल्या तरी चरणांत यमक आला तर त्या योगें श्रुतिमंजुलतेचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आनंद सहसा अुत्पन्न होत नाहीं. असा दीर्घावधिनंतरचा यमक केवळ दृष्टीला दिसण्यानें कशी मंजुलता येणार! कारण मंजुलता ही श्रुतिगम्य गुण; दृष्टिगम्य नव्हे! यास्तव या वृत्तांत दोनतीन चरणांतच संपेल असा विचार जर आला नी त्यायोगें अशा सन्निधच्या अंतरावरच विराम पडला तर यमक घालावयासहि हरकत नाहीं. तो या वृत्तालाहि अशा स्थळीं शोभतो. जसें:

शंभरदा प्रश्न अुठें रानटी स्वरीं
'होशी कां मुसलमान ? वांचशी तरी!'
शंभरदां अुत्तर दे कंप अंबरीं
'हिंदु मी! शीख अम्ही! मरण मी वरी!'

परंतु मागच्या छेदकांत सांगितल्याप्रमाणें या वृत्तांत अनेक वेळां अनेक लहान वाक्यें गुंफलेलें अेखादें मोठें वाक्य दहा पांच चरणांत प्रवाहत अर्थानुरोधें मध्येंच कुठेंतरी संपते. त्या योगें तो विसावा लांब अंतरावर अेखाद्या सुदूर चरणामध्यें वा चरणान्तीं पडल्या कारणानें सन्निध यमकानें साधणारी श्रुतिमंजुलता, तिथें मागच्या विसाव्याची अक्षरांचीं मित्राक्षरें घातलीं तरी, अुत्पन्न होत नाहीं. अशा स्थलीं त्या दीर्घ वाक्याची आणि वक्तृत्वपूर्ण. प्रवाही विचाराची शोभाच यमकाच्या दुय्यम शोभेहून अधिक रसानुकूल असल्यास यमक सोडून तीच साधणें अर्थसौंदर्यास अुपकारक होतें. अेतदर्थ हें वृत्त सयमक असलेंच पाहिजे असें बंधन त्यास घातलेलें नाही. पण म्हणून तो निर्यमकच असावें असेंहि नाहीं. यमकाची श्रुतिमंजुलता अर्थसौंदर्यास साधक वाटेल तिथें यमक साधतां येतो. नाहीं तेथें यमकास गाळूनहि श्रुतिमंजुलता केवळ कुशल अनुप्रासाच्या योजनेनें साधून अर्थसौंदर्यहि अबाधित राखतां येतें. याच कारणासाठीं अिंग्रजींतील Blank Verse आणि त्याचें बंगालींतील अनुकरण 'अमित्राक्षर छंद' ह्यांत यमक अपरिहार्य मानलेला. त्याचेंच अनुरोधें वैनायक वृत्तांतहि ती सोय केली आहे.

(५) पण ह्या वर दिलेल्या कांहीं सोयीसाठीं त्या जुन्या वृत्तांत असणारी 'गेय' ती गोडी या वृत्तास सोडावी लागते. हें वृत्त गेय नसून पाठच, वाच्य, आहे. यास्तव ज्या कल्पना चिमुकल्या नी चटकदार किंवा जे विचार सुटसुटीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नी अेकेरी असतील ते ते यथारुचि त्या त्या जुन्या गेय आणि प्रासादिक वृत्तांत वर्णावे. प्रवाही, भरदार, वक्तृत्वशील अशा भावभावनांच्या गुंफणीचा काव्यबंध अेकसूत्रीपणा आणि त्रुटितपणा टाळून रचावयाची सोय या वैनायक वृत्तांत त्यांतल्या त्यांत अधिक होत असल्यामुळें अशा वेळीं यथारुचि या वृत्तास अवलंबावें.

(६) दीर्घवाक्याप्रमाणेंच लघुतम वाक्येंहि या वृत्तांतील यति संभाळन कुशलपणें योजिलीं असतां योजतां येतात. अितकेंच नव्हे तर दुःखशोकाचे अुद्गारहि जसेच्यातसे आवेशानें वा अुद्वेगानें अुच्चारतां येतात. हें वृत्त पाठ्य असल्यामुळें गद्याप्रमाणें आवेश, अुद्वेग प्रभृतीचे रसानुसारी ध्वनि अितर गेय वृत्तापेक्षां अधिक सहज त्वरेनें बदलून या वृत्तांत ताल संभाळूनहि व्यक्तवितां येतात आतां लहान तर लगेच विस्तृत अशा वाक्यरचनेंतून, आतां झुळझुळ तर आतां वेगवान, आतां करुण तर आतां संकुल, अशा या वृत्ताच्या अखंडित प्रवाहांत काव्यांतील रसौघास यथारुचि विविध वळणें घेत अितर वृत्तांच्या प्रवाहापेक्षां अधिक सलीलतेने वाहत जाता येतें.

(७) हेंहि येथेंच सांगून टाकलें पाहिजे कीं यद्यपि या वृत्तास अपरिहार्यपणें यमक, चरणसंख्या, गेयता अित्यादि बंधनें नसल्यामुळें त्यांत अेकसुरीपणा आणि त्रुटितपणा सापेक्षतः पुष्कळ प्रमाणांत टाळतां येतो तरीहि तेंहि अेक वृत्त, अेक पद्यप्रबंधच, असल्यानें त्यास अवश्य असणाऱ्या तालयति प्रभृति बंधनच्या योगानें ह्या वृत्तास वाचण्याची, गेय नसली तरी पाठ्य अशी अेक पद्धत क्वचिक आणि लांब झेपेची कां होअीना पण अेक सुरेल चाल, ही आहेच. पण चाल, ताल, पद्धत, वा सुरेलपणा म्हणजेच अेकसुरीपणा असें नव्हे; तर अेकाच सुराची प्रमाणाबाहेर कंटाळवाणी पुनरुक्ति, आवर्तन, म्हणजे अेकसुरीपणा, आणि तो टाळणें ह्या वृत्तांत असणाऱ्या वाक्यांची विविध वळण, ध्वनिपालट, चरणांची मोड, प्रभृति,वर दिलेल्या विशेष सोयींमुळें, अितर लहान, गेय आणि तुटक वृत्तांहून पुष्कळच अधिक प्रमाणांत शक्य होतें. अितकेंच काय तें म्हणणें. Blank Verse वा अमित्राक्षर छंद ह्यांचीहि हीच गोष्ट. ताल वा सूर असा यावलाहि नको असेल तर सुरेलपणाचा मोह आमुलात्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोडून देअून पद्याचा प्रश्नच न काढतां, निर्भेळ गद्याकडेच वळलें पाहिजे.

अर्थातच हें वृत्त वाचण्याची ही विशेष पद्धत, कोणत्याहि पद्याच्या चाली-प्रमाणें तिच्या नुसत्या वर्णनापेक्षां ती कशी तें म्हणून दाखवूनच सांगतां येणार आहे. तोंवर तें वृत्त कसेसें वाटणारच. त्यांतहि नेहमींच्या परिचयाचा यमकाचा मनमिळाअू दाखलाहि त्यापाशी नसल्यानें त्याची ओळख करून घेणेंहि अुद्वेजकच भासेल. अिंग्लिशमध्यें Blank Verse हें निर्यमक वृत्त जेव्हां प्रथम रचलें गेलें तेव्हां त्याचाहि ह्याच कारणांसाठीं जिकडे तिकडे अव्हेर झाला. ‘ओळी तोडून छापलेलें गद्य’ असें त्यास हिणवलें गेलें. पण पुढें त्यांत रचलेलें तें मिल्टनचें Paradise Lost हेंच अिंग्रजींतील अुत्कृष्ट महाकाव्य ठरलें; आणि शेक्सपीअरला देखील नाटकें त्यांतच लिहावींशीं वाटलीं ! बंगालमध्यें तसें वृत्त योजून मधुसूदन दत्तांनीं जेव्हां ‘मेघनादवध’ प्रथम लिहिला तेव्हां तर अशा वृत्ताची, त्यांच्या त्या ‘अमित्राक्षर छंदाची,’ त्या काळच्या वाचकांनीं नुसती रेवडी अुडविली. त्याच्यावर कित्येक विडंबनेंहि लिहिलीं गेलीं : पण त्याची म्हणण्याची बिनचुक धाटणी लोकांच्या तोंडीं बसत गेली तशी त्याची चव लागत गेली आणि आज तें वृत्त अर्वाचीन बंगाली कवितेच्या गळयांतील ताअीत होअून बसला आहे. रवीन्द्र बाबूनींसुद्धां आपलीं नाटयकाव्येंच नव्हेत तर आपलीं कित्येक भावगीतेंहि त्यांतच रचिलीं आहेत. हें वैनायकवृत्त हाहि त्याच दिशेचा अेक प्रयोग आहे. तो प्रथम मराठींत असला तरी हिंदी बंगालींतहि अशा वृत्ताची वाण असल्यानें त्यांसहि त्याचें काय होतें तें लागू पडणारें आहे. प्रयोगच तो ! झाला यशस्वी तर ठीकच. न झाला तरीहि ठीकच. कारण हा अमका प्रयोग अमक्या कारणासाठीं जमत नाहीं हें सिद्ध होणें हेंहि त्या प्रयोगाचीच अेक सिद्धि आहे, अुपयुक्तता आहे !

✠ ✠ ✠

रानफुलें:— ‘रानफुलें’ या काव्याच्या पुस्तकांच्या परिशिष्टांत हा लेख आहे. मूल्य.

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मरणोन्मुख शय्येवर : : १३

✠ ✠ ✠

[अंदमानच्या नृशंस कारागारांतून वीर सावरकरांसारख्या देशभक्त विद्वानालाहि केवळ आपल्या घरीं वर्षांतून अेक पत्र अधिकृतपणें पाठवितां येअी. त्याप्रमाणें गद्यपद्यमय पत्रें दोन जन्मठेपेंची शिक्षा झालेल्या सावरकरांनीं त्यांचे बंधु डॉ. नारायणराव सावरकर यांस अंदमानांतून पाठविलीं, तीं 'अंदमानच्या अंधेरींतून' ह्या पत्रसंग्रहांत प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत.

१९२०–२१ मध्यें बंदिवान वि. दा. सावरकर जेव्हां फार आजारी होतें त्या वेळीं मृत्यूला अुद्देशून लिहिलेलें 'मरणोन्मुख शय्येवर' * हें 'वैनायक' वृत्तांतील पद्यपत्र आहे.]

✠ ✠ ✠

ये मृत्यो ये ! तूं ये ! यावयाप्रति
निघालाचि असशिल जरी रे तरी सुखें !

* हें वृत्त महाराष्ट्र वाचकांस अद्याप अपरिचित असल्यामुळें अितकें सुचविणें आवश्यक आहे कीं, यास दिंडी, श्लोक वा आर्या अशी कोणतीच चाल न लावतां केवळ ऱ्हस्व, दीर्घ व विरामचिन्हें यांच्या अनुरोधानें साहजिकपणें वाचीत जावें. जर मुळांतच कांही श्रुतिमंजुलता असेल तर ती आपोआपच प्रकट होअील. विरामचिन्हांशींच विराम घ्यावा व अर्थानुरोधानें वाचावें अितकें सांगणें पुरें आहे.

सा....१२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोमेजुनि जावया भिवोत हीं फुलें;
हीं द्राक्षें रसरशीत सुकुनि जावया:
भ्यावें तें कां म्हणुनी तुजसि परी मी?
माझ्या पेल्यांत किती पीत राहिलों
तरी न संपतीच अशा असति अजि या
अश्रूंच्या मदिराची मात्र राहिल्या!
ये! नैवेद्या त्या जरि अससि भुकेला!
आणि जरी दिवस असे अजुनि तरुण हा
तरि लहान थोर अशीं असतिं संपलीं
दिवसांचीं कार्येंही बहुत करुनिया.
तोडजोड करुनि परि फेडलीं ऋणें
जन्मार्जित जीं जीं तीं : ऋपिऋणाप्रती-
श्रुतिजननीचरणतीर्थ सेवुनि कधीं,
धरुनि कधीं ध्रुवपदांसि संततीच्या,
आणी ही आचरुनी अेक तप अशी
आशेच्या या स्मशानभूत तपस्या:
देवऋणा–फुंकुनि रणशृंग, दुंदुभी
घडड घडड पिटुनि, आणि तो अघाडिचा
चढवुनि तैं हल्ला सहसाचि म्या पळीं
सुटली रघुवीराची प्रथम रणाज्ञा!
आणि त्याचि रणयज्ञाग्नींत पेटल्या
अस्थि अस्थि, मांस मांस, अिंधनें तशीं
जळत जळत आज असे शेष राहिली
राख यौवनाची मम! आणि म्हणुनिची
पितृ–ऋणा फेडाया आजि अहो मी
शास्त्रातें अनुसरोनि, दत्तविधानें,
निपुत्रिकत्व वारियलें; पुत्र अखिल हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभिनवभारतची मम ! जेथ जेथ कीं
पाळण्यांत विलसतसें नयनकमल तें
तेथ तेथ मीच बघें सृष्टिकुतुहला,
ज्या ज्या स्मितमधुरमुखीं मधुर विलसतें
कैशोरी कोमलता, प्रेमपूर्ण कीं
तें तें मुख बघतांची हृदयिं माझिया
वत्सलता ये अुचंबळोनि; आणखीं
नव अुन्नतिशील भालपटलिं दिसत जें
अुदयोन्मुख तेज तरुण, तैं पुन: पुन्हां
माझ्याही अुदयोन्मुख होति हृदीं या
आशा नव, आकांक्षा अुच्च, भावि त्या
आमुचिया वंशाच्या गौरवाचिया:
भारतीय केवल ना, मानवीय कीं
वंशाच्या गौरवार्थ ! तरुण कोंवळीं
सर्व मुलें माझीचीं ! अखिल मानवी
यौवनांत अनुभवीन यौवनास मी;
आणि पितर माझे ते प्रेमतर्पणा:
येंअि सुखें मृत्यो तरि—असति हीं अशीं,
तोड जोड करुनि परी फेडिलीं ऋणें

आणि बहुत करूनिया असति संपलीं
दिवसाचीं कार्येंही : यद्यपि कधीं
अुगवे हा दिवस, कधीं मावळेहि वा.
कर्मे वा कवण, कशीं कार्य या दिनीं,
याविषयीं पंचांगें भिन्न, भिन्नची
भट्ट आणि पंडित हे कथिति मज कथा;
तरिहि लोकसंग्रहार्थ, धारणाप्रति
मानवीय आत्यंतिक आत्महिताच्या,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सज्जनासि गमलीं अनुकूल तींच कीं,
कार्यें म्यां धर्म अशीं मानिलीं; अणी
तदनुरूप अेकाचा म्हणुनि जो ठरे
म्यां माझा भार असें अुचलिला मुदें,
यथाशक्ति, यथापरिस्थिति, न भंगितां
धरिलें तें व्रत; कदापि किमपि ना भयें.

सत्कुल; अव्यंगदेह; परम दयालु
जनक आणि जननी ती; त्याहुनीहि कीं
वात्सल्यें–पुण्यें-प्रतिपाळिता तसा
अग्रज, जो अग्रगण्य तापसांमध्यें;
मूर्त विनय अनुज तसा; अद्वितीयसें
प्रेयांचें प्रेमपुण्य; धन्य आणि तें
ध्येय महत्, देअी जें जीवनाप्रती
सार्थकत्व मनुजांच्या, काव्यमय करी
जें आयु:कालातें, पूत चरित्रा;
तप कांहीं; जप कांहीं; यश कांहीं तें;
कांहींशी मान्यताहि शारदेचिया
राजसभेमाजी कविरत्नभूषिता :
चाखियले रस नाना; हुंगियले तें
शतभूजलवायुललित शतसुगंध कीं;
पंचाग्नीमधिल तया प्रखर भाजल्या
अुत्तापापासुनि तों प्रीतिच्या मअू
स्निग्ध परिष्वंगापर्यंत सर्वही
शीतल, शीतोष्ण, अुष्ण, अनुभवीयले
कटिबंध, स्पर्श तसें; परिसिलें किती
स्वरशत, शतभाषा, शतगीति नवनवा
शतमंजुल कंठांतील–आणि मृत्युच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शतकठोर कंठांतील घोर लागल्या;
नानाजन, जानपदें, जाति विभिन्ना,
देश किती, दृश्यें तीं भूमिच्या महा-
संग्रहालयांत परिभ्रमत पाहिलीं;
सुरूप तें, सुरेख तें, सुललित तें असें
पाहियलें डोळयांनीं किमपि तरि जया
मृत्यो ! ते डोळे हे झांक तूं सुखें;
  झांकणेंचि आवश्यक जरि गमे तरी :
कीं सुरेख पाहियलें–किमपि परी तें !
प्रीति विपल : विरह चिरंतन ! नवीं वयीं,
प्रौढ धुरंधरहि न जी शकति तोलण्या
तीच धूरा भर अुन्हांत तोलणें घडे !
म्हणुनि असें अजुनी अपुरीच राहिली
खेळाची हौस हंसत चांदण्यामध्यें
या आयुष्याच्या मम ! तरिहि जाणुनी
कीं न ययातीची ही हौस पुरेशी
झाली जरि आयुष्याचाचि सर्व तो
नृपति करी खेळ अेक, आणि पाहुनी
अिच्छेच्या बीजा फल भोग लागतां
अिच्छेचीं बीजेंची त्यांत फिरोनी;
आणी अनुभवुनी कीं अेक भुकेची
अेक जेवणानें जी तृप्ति जाहली
तृप्ति सहस्राव्याही भोजनामुळें
असते कीं तितुकीचीं आणि तशीचीं;
मी दे तुज अनुमोदन संपवूं असा
हा जीवन लेख अिथें; पृष्ठ या, जरी
पृष्ठें जीं पुढलीं तीं मागल्या तया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पृष्ठांची असली पुनरुक्तिची तरी !
म्यां असतां दिवस नसे व्यर्थ गमविला
दिवसास्ताचेंहि म्हणुनि दुःख ना मला
भीति अुद्याचीही वा ! मृत्युच्या मृता
जरि असेल त्या अंधकारलतेला
फुलत दुज्या दिवसाचें फूल तरीही
भीति न मज; कीं येथें पेरिलें अम्हीं
फुलत आणि फलत तेंच, कथिति तें, तिथें;
आणि मी पेराया कष्टलों असें
बीजें कीं तीं तीं जीं निवडुनी दिलीं
त्यांनींची अत्युत्तम म्हणुनिया मला
पेरूं फलाशाविरहित. 'तूं तसें जरी
वर्ततील समपरिस्थितींत अन्यही;
तरि लोकोन्नतिविनाश होय ना असें
वर्तः' तसेंची वर्तु यत्न म्यां सदा
केला आबाल्य. ' तसें अन्य तुझ्याशीं
वागावें म्हणुनि तुला वाटतें तसें
तूंहि वाग अन्यांशीं ' संतवचन हें
मी अनुपलि पाळाया कष्टलों. अणी
जरि आपद्धर्म सेव्य मानिले तरी
ते अितुक्यास्तवर्चा कीं धर्मची स्वयें
ओपुनि दे आपत्तीच्याचि मज करीं !
जैं हिरव्या गवतांच्या गार गालिच्या–
वरूनि दहापावलींच अंगणांमधें
कारागारांत कवीं मी फिरें. तधीं
आत्मौपम्यांत मुरत चित्त थिजोनी
कितिदां तरि चरण अकस्मात् चालतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्तंभित होऊनि रहावेत घटि घटि
कांहीं केल्याहि तया तरुण कोवळचा
गवताचे अंकुर दुखतील या भयें
पाय त्यावरी नये पडूंचि कीं पुढें.
हातीचा घास कधीं हटुनि रहावा
हातीचीं, कीं जितुकीं त्यांत शितें तीं
बीजेंचीं नव्हत काय ? खातसों अम्ही
फल तें तें भ्रूणघात ? आणि कधि कधीं
मज पडलें भय कीं मज वेड लागलें ! —
आत्मौपम्यास जसीं वर्तण्यांत हें
मन माझें अनुसरतां मज पदोपदीं
मरणासम दुःख होय पाहुनी जगीं
पूर्ण असंभवचि तया आचरूं पुरें.
तरिहि यत्न म्यां केला : अज्ञतेमुळें
वा अशक्यतेमुळेंच पद कधीं जरी
स्खलित जाहलें असेल तरि असेल तें.
म्हणुनि भय अुद्यांहि ना; स्मशानभूमिचा
परतटप्रदेश जो अनोळखी तिथें
सुखकर प्रवास करवि जें असें असे
ओळखिचें पत्र अम्हांजवळ त्या स्वयें
भगवान् श्रीकृष्णाचें-'श्रीमताम् गृहे,
शुचीनांच, वा गेहे योगिनामपि ! !'
' कश्चित् कल्याणकृच्च तात दुर्गतिम्
नहि गच्छति ! ' नहि गच्छति सांगती अणी
ते निरीश्वर स्वभाववादिही मला;
म्हणुनि जरी सत्यचि जें वदति ते; जरी
स्वर्ग, नरक, जन्मांतर, बंध, मुक्ति वा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निजकर्माचाची परिपाकः कीं तरी
मरणाची वेस जयामाजि अुघडते
त्या अदृश्य नगरांतील अति सुरम्य तें
राखवूनि ठेवियले असति बंगले
आधींची आम्हांस्तव भरुनिया अम्हीं
कर्माच्या, धर्माच्या, नियत विसारा !
परि जरि कीं स्वर्ग, जीव, बंध, कर्म वा
अैहिक तें अिंद्रजाल मात्र; कीं जरी
संघातोत्पन्नभाव मात्र जीव हा
मृत्युपृथक्करणिं अभावांत वोसरे ऽ--
तरि सर्वोत्तमचि ! मरण अेक सुषुप्ति
अथवा प्रत्यक्ष मुक्ति ! पंचही असे
मिश्रित भूतांश पृथक् मुक्ति होअुनी
विहरोत स्वेच्छ नव्या मिश्रणांतुनी,
वा स्वयेंचि, वा शून्यीं ! अिंद्रधनु तसें
संज्ञेच्या आकाशीं विपल शोभुनी
विपलांतचि हा माझा 'मी' हि कीं जरी
विश्वाच्या अंतर्हित 'मीं' त मावळे.
तरि मरणा ! मरण न तूं ! मरण मुक्तिची.
–विपलांतचि परि ! विनंति अितुकिची असे
येणें तरि येअुनि जा झटकनी. तुझा
द्वेष करिति, तो नचि कीं अससि तूं स्वतः
निर्दय वा निंद्य म्हणुनि--पाहुनी तुला
आलाची कोणीही परत कीं न तो
सांगूं तूं केंवी तें ! --परि विशेषतः
मृत्यो ! तूं अप्रियसा जगतिं जें तुझें
सैन्य, पुरस्सर पीडक हें हिडिस्ससें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोगांचें क्रूर कसें त्यामुळेंच कीं.
मीच न कीं परि अजातशत्रु जो जगीं,
तुल्य ज्या प्रियाप्रियादि, हानिलाभ, त्या
भगवान् श्रीगौतमाप्रतीहि भासला
रोग जरा अप्रियची : "लाभ ना दुजा
आरोग्यासम जगतीं" धर्मपद वदे.
तरिही जे कोणीं नुघडतीलची
स्वेच्छेनें दरवाजे, दुर्ग ते हठी
जिंकूं जीवनाचे तूं धाड धाड ही
रोगांच्या फौजांची गांजत्या तिथें
मी तों जीं नुघडतील फोडिलीं तरी
जाणारचि, तीं दारें अुघडुनि स्वयें
या माझ्या गेहाचीं, स्वागता असें
अनिवार्या सिद्ध तुझ्या ! म्हणुनि शक्य कीं
ये तरि, हे अखिल-वीर-विजेत्या !
अेकलाचि, अपुरस्सर, आणि अकस्मात्
परि अशक्य जरि तें तुज अेकटें तसें
येणेंची, तरि त्याहि क्रूर पीडका
रोगांच्या सैन्याचा क्षोभ सोसण्या
मी असेंचि सिद्ध. आजि दोन वत्सरें
पाहतची अससी तूं मजसि हा असा
शरपंजरिं खिळला ! ज्या मधुर लागलें
जीवनांतलें मधु, प्रकाश चक्षुतें,
प्रीति हृदा, तो मी त्या सर्व सुखांचें
मूल्य म्हणुनि मृत्यूच्या यातनाहि कीं
समजुनि कर्तव्य सहूं सिद्ध असेची.

* * *

Gurukula Kangri Library

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुध्वज : : १४

✠ ✠ ✠

[हिंदुमहासभेचें तत्त्वज्ञान सांगतांना हिंदूची व्याख्या ज्याप्रमाणें वीर सावरकरांनीं दिली त्याचप्रमाणें कुण्डलिनी कृपाणांकित ध्वज हीहि वीर सावरकरांचीच देणगी आहे. ह्या लेखांत त्यांनीं कुण्डलिनी कृपाणांकित भगवा ध्वज काय दर्शवितो हें सांगितलें आहे.]

✠ ✠ ✠

" स भूमिम् विश्वतोवृत्वा अत्यतिष्ठत् दशांगुलम् ! "

प्रत्येक ध्येयास, प्रत्येक समष्टीस, प्रत्येक नवीन महत्कार्यास त्याचें रहस्य व्यक्त करणारे आणि त्याच्या स्फूर्तीनें अंत:करणास अुद्दीप्त करणारे असे जे त्यांचे विशिष्ट संस्कार आणि जीं स्वतंत्र प्रतीकें असावीं लागतात, त्या सर्वांमध्यें त्या ध्येयाचा, समष्टीचा किंवा महान् विचाराचा द्योतक आणि प्रवर्तक असा जो त्याचा ध्वज तोच त्याचें प्रबलतम प्रतीक असतो.

अेक वेष, अेक राष्ट्र व अेक संस्कृति, अेक रक्त, भूतकाळ आणि अेक भवितव्य या अखंडनीय संबंधांनीं संबंध झालेल्या ह्या अेक गटी बत्तीस कोटि हिंदु जातीच्या महान् समष्टीचा आणि तिच्या संघटनाच्या महत्कार्यांचा हेतु आणि संदेश, बळ आणि तेज. अखिल मनुष्य जातीस व्यक्त करणारें प्रतीक म्हणजेच हा आमच्या हिंदु जातीचा अभिनव हिंदुध्वज होय.

स्पृश्य वा अस्पृश्य ब्राह्मण वा अब्राह्मण, मराठी वा बंगाली, वैदिक वा अवैदिक ज्यांचे ज्यांचे पितर या आसिंधुसिंधुपर्यंत पावन भूमींत पूर्वापार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवसत आले आणि म्हणूनच ही ज्यांची पुण्यभूमि-धर्मभूमि Holy Land आहे-त्या त्या हिंदु मात्रांची महान् समष्टी पितृभू आहे आणि त्याच पितरांच्याच अुदरीं जन्मास येअून आपला धर्मपंथ स्थापते झाले, आणि म्हणून ही ज्यांची असणारी जी ही आमची हिंदु जाति तिच्या जागतिक संदेशाचा, अंतर्हित मर्माचा आणि व्यावहारिक प्रवृत्तीचा जो द्योतक आणि प्रवर्तक आहे, तो ध्वज म्हणजे हिंदुध्वज होय. ज्या भगव्यावर कुंडलिनी आणि कृपाण अंकित आहे तो हा अभिनव हिंदुध्वज होय !

या हिंदु ध्वजाचा भारतीय राज्याचा, हिंदुध्वजांशीं कोणाचाहि विरोध नाहीं. तीं दोन्ही प्रतीकें विभिन्न आणि तरीहि संबद्ध अशीं दोन स्वतंत्र प्रतीकें आहेत. आणि आपापल्या कक्षेंत आपापलीं कर्तव्यें करीत असतांहि अेकमेकांस पूरकच होणारीं आहेत. प्रत्येक हिंदु हिंदी म्हणून राज्य ध्वजास वंदन देईल. हिंदु म्हणून हिंदुध्वजास आपली प्राणपूजा अर्पण करील,

अेक वेळ हिंदीध्वज हा अितर कोणत्याहि राष्ट्राच्या ध्वजाप्रमाणें आकुंचितत्वाच्या आक्षेपास पात्र होअू शकेल; कारण तो बोलून चालूनच राष्ट्रीय ध्वज, त्याला भौगोलिक मर्यादा आहे, पण हिंदु ध्वज हा हिंदु जातीचेंच तेवढें प्रतीक नसून हिंदु धर्माचेंहि प्रतीक असल्यानें तो त्या धर्माच्या सर्वांगीण अुदारतेअितकाच विस्तृत आहे. हिंदु धर्माच्या ध्येयाप्रमाणेंच तोहि " स भूमि विश्वतो वृत्वा अत्यतिष्ठत् दशांगुलम ! " हिंदूच नव्हे तर अुभी मानवजाति नास्तिकापासून आस्तिकापर्यंत, हॉटेंटाटपासून हिंदूपर्यंत वर्ण-जाति-पंथ-निर्विशेष त्याच्या अमृतोपम शीतल छायेखाली समाविष्ट होअून 'श्रेय: परम,' प्राप्त करूं शकेल अितका तो विस्तृत आणि भव्य, अुदात्त, अुच्च आणि दिव्य आहे.

कारण लोकांचें धारण करतो तो धर्म. 'धारणात् धर्ममित्याहु: धर्मो धारयति प्रजा: ।' त्या धर्माचीं साध्यें दोन, अभ्युदय आणि निश्रेयस ! पारलौकिक निश्रेयसाचें अतींद्रिय आनंदाचें, पारमार्थिक परम गंतव्याचें जें द्योतक या ध्वजावर अंकित केलेलें आहे. तें-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुण्डलिनी

हें होय. ती कोण्या वर्णाची वा जातीची मत्ता नसून मनुष्यमात्रांत अंतर्हित आहे. आपल्या पाठीच्या कण्यास मेरुदंड म्हणतात. त्याच्या दोन्ही बाजूंस ज्ञानतंतूच्या बनलेल्या दोन नाड्या आहेत. त्याच अिडा आणि पिंगळा (The affarent and the efferent) होत. मेरुदंडांत अिंग्रजी 8 च्या आकारासारख्या कण्यांची जी माळ आहे, तिच्यामधून तिसरी नाडी सुषुम्ना म्हणून जाते तिला (cerabrospinal axis) असें कांहीं अिंग्रजी तज्ज्ञ संबोधितात. अिडा आणि पिंगला ह्या नाड्यांस संलग्न झालेलीं आपल्या ठिकठिकाणच्या ज्ञानतंतूंचीं जीं अुपकेंद्रें आहेत (Nerve plexuses) त्यांनाच यौगिक भाषेंत कमलें म्हटलें असावें. ह्यांची संख्या शाक्तांच्या कुण्ड-लिनीयोगांत बरीच दिलेली असली, तरी तीं मुख्यत्वें सात आहेत. मुलाधार (Sacral Plexus). स्वाधिष्ठान, मणिपूर (Naval), अनाहत, विशुध्द, आज्ञा, सहस्रार (Pineal gland where the spinal cord ends in a sort of ball floating in a fluid in the brain.) मुलाधारांत सुप्त असणारी शक्ति, ती कुण्डलिनी, योगध्यानानें जागृत होतांच प्रत्येक केंद्रांतून वर चढत, अलौकिक सिद्धि आणि अनुभव अुपभोगित सहस्रा-च्या अंतिम केंद्रास पोंचतें आणि तिथें ती पोंचतांच साधकास अेक अलौकिक अतींद्रिय अगाध आनंद प्राप्त होतो. ह्याला योगी कैवल्यानंद म्हणतील, वज्रयानी परासुख म्हणतील, अद्वैती ब्रह्मनंद म्हणतील, भक्त प्रेमानंद म्हण-तील, नास्तिक किंवा भौतिभौतिक परिभाषा केवळ परमानंद- An extacy-म्हणेल, पण हा अनुभव प्रत्येकास आलाच पाहिजे. मग त्याचा विश्वास अेकाद्या विशिष्ट पैगंबरावर, अवतारावर, ग्रंथावर, पांथिक मतमतांतरावर असो वा नसो. यास्तव आपल्या हिंदु धर्मांतील चार्वाकपंथी लोकायतिकांसुद्धां यच्चयावत् पंथाचा कुंडलिनी योगाविषयीं मतभेद नाहीं. वैदिक सनातनी जैन शीख, ब्राह्मी आर्य अित्यादि झाडून साऱ्या धर्मपंथास कुंडलिनीयोग मान्य आहे. कारण तें प्रत्यक्ष आणि प्रयोगात्मक शास्त्र आहे. केवळ शाब्दिक वा तार्किक असा अेखादा मतवाद नाहीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्यास्तव हिंदु धर्माचें जें पहिलें महान् पारलौकिक ध्येय आहे, त्यांचें द्योतक असें अत्युत्तम चिन्ह कुण्डलिनी हेंच होऊं शकतें, कारण तें हिंदुमात्रासच नव्हे तर मनुष्यमात्रास बुद्धिगम्य आहे. आनुभाव्य आहे. हिंदु धर्माचें महत् ध्येय व्यक्त करण्यास कोणत्याहि केवळ सांकेतिक किंवा मतभेद-क्लिष्ट किंवा मर्यादित चिन्हांपेक्षां ही कुण्डलिनी—परमेश्वराच्या स्वरूपाशीं या प्रत्येक मनुष्यास लाभलेलें निसर्गसिद्ध अतींद्रिय अिंद्रय, ही शक्ति, हें साधन हेंच अुत्कृष्ट द्योतक होय.

हिंदु धर्माची मुख्य प्रतिज्ञा, मुख्य वैशिष्टच, मुख्य ब्रीद, परमेश्वराचा साक्षात्कार, देवाशीं प्रत्यक्ष परिचय, परमात्म्याशीं आत्म्याची भेट किंवा आत्माच परमात्मपदास पोंचणें हें होय. शक्तीचा शिवाशीं जो संयोग तोच योग. म्हणूनच हिंदू धर्माचें आणि जातीचें पारलौकिक मंतव्य आणि जगतास पोंचविण्याचा दैवी संदेश जर कोणच्या अेका शब्दांत स्पष्टतमपणें व्यक्त करतां येणारा असेल, तर तो शब्द योग हाच होय. त्या योगाचें मुख्य प्रतीक कुण्डलिनी. अेतदर्थच आपल्या हिंदु धर्माचें आणि जातीचें प्रथम ध्येय जें निश्रेयस तें सुव्यक्त करण्याचें सामर्थ्य हिंदु ध्वजावर अंकीत झालेल्या या कुण्डलिनींतच अुत्कटपणें बसणारें आहे.

पारलौकिक दृष्टि क्षणभर कोणी बाजूस ठेवूं अिच्छील, तरीहि आपल्या हिंदु जातीनें जगास जीं अमूल्य अैहिक दानें दिलीं आहेत, त्यांत सर्वोत्कृष्ट दान जें आहे तें हें योगशास्त्र. अेक वेळ तात्त्विक मतवादांस मतमतांचा गलबला म्हणतां येअील; पण योगास म्हणतां येणार नाहीं. कारण योग हें भौतिक पारिभाषेंत आणि परिमाणांत व्यक्त करतां येणारें अेक प्रयोगात्मक प्रत्यक्ष आणि आनुभाव्य शास्त्र आहे. भौतिक दृष्टीनेंदेखील मनुष्याच्या आत्मिक आणि मानसिकच नव्हे तर दैहिक शक्तीहि किती आश्चर्यकारक अुन्नति करूं शकतात, किती अद्भूत सिद्धि मिळवूं शकतात, आणि मन अेक अनिर्वाच्य ' यं लब्धा चापरं लाभं मन्यत न ततोधिक: 'असा आनंद—Extacy—अुपभोगूं शकतें, हें सहस्रावधि वर्षांच्या अनवरत प्रयोगांनीं शक्य आणि सिद्ध करून दाखविणारें हें योगयास्त्र आम्हीं हिंदूंनीं परिणाम केलें आणि त्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जागतिक संस्कृतींत अमूल्य भर टाकिली ही गोष्ट केवढी गौरवाची आहे ! तोच आमचा जातीय गौरव आमच्या जातीय नि राष्ट्रीय ध्वजावर ही कुण्डलिनी व्यक्त करीत राहील.

आपल्या हिंदु धर्माचें आणि जातीचें जें पारलौकिक ध्येय निश्रेयस तें कुण्डलिनीनें अशा प्रकारें व्यक्त केल्यानंतर त्या धर्माचें जें अैहिक साध्य अभ्युदय तें आपल्या ध्वजावर व्यक्त करण्यास अत्युत्कृष्ट चिन्ह म्हणजे– **कृपाण** हें असूं शकणार. प्रत्यक्ष धर्म हाहि कृपाणाची दंडशक्ति आहे म्हणून सुरक्षित आहे. विशेषत: आपल्या हिंदु जातीच्या अवनतीस ह्या कृपाणाचें, ह्या शक्तीचें–ह्या अैहिक अभ्युदयाचें जें विस्मरण झालें, त्याकडे जें आम्हीं अपराधी दुर्लक्ष केलें तेंच मुख्य कारण झालेलें असल्यानें ह्यापुढें असें दुर्लक्ष न करण्याचा आम्हीं हिंदूंनीं निरधार केलेला आहे हें सर्व शत्रूंस आणि मित्रांस बजावून सांगण्यासाठीं आमच्या हिंदुसंघटनाच्या ह्या महान् ध्वजावर कृपाण अंकित झालेंच पाहिजे. कोण्या खादी प्रचारिणी सभेच्या ध्वजावर कृपाणच चमकलें पाहिजे. आमच्या धर्माच्या व्याख्येप्रमाणेंच निश्रेयस आणि अभ्युदय, मुक्ति आणि भुक्ति हीं त्याचीं दोन कारणें आहेंत. परंतु दुर्दैवानें त्यापैकीं अभ्युदयाकडे, भुक्तिकडे आणि ज्या साधनानें तीं साध्य होणारीं आहेत त्या शक्तीकडे आम्हीं दुर्लक्ष केल्यामुळें आमचा धर्म अेकपायीं झाला, पंगू झाला. त्यायोगें समाजाचें अैहिक आणि पारलौलिक धारण करण्याचें त्याचें कर्तव्य करण्यास तो त्या प्रमाणांत असमर्थ झाला. ती चूक आतां यापुढें होअूं द्यावयाची नाहीं. यापुढें ज्या शक्तीनें 'मिळतीं राज्यें' ती शक्ति, ती राष्ट्रशक्ति, ती शास्त्र शक्ति. ती अैहिक भुक्तीची तलवार आम्हीं आपल्या हातांतून कोण्या निष्क्रीय भंगड गुंगीलाच समाधि समजून तिच्या बेशुद्धीच्या निशेंत गळूं देणार नाहीं. ती कुण्डलिनी, हें कृपाण ! ती मुक्ति, ही भुक्ति ! ती शांति, ही शक्ति ! तो योग, हा भोग ! तें निश्रेयस, हा अभ्युदय ! ती शांति, ही शांति ! ती निवृत्ति, ही प्रवृत्ति ! तें ध्येय, ही धारणा ! तो औपनिषदिक विद्या, ही औपनिषदिक अविद्या ! तो योगेश्वर कृष्ण, हा धनुर्धारीपार्थ ! ! ती ज्ञानयोग, ची कुण्डलिनी, हें कर्मयोगाचें कृपाण ! परित्राणाय साधुनां, विनाशायच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुष्कृताम् ! अीशा वास्यं अिदं सर्व यत्किच जगत्या जगत् , तेन त्यक्तेन भुंजीथाः हाच आमच्या हिंदुध्वजाचा जागतिक संदेश आणि जातीय घोषणा, ही कुण्डलिनी आणि हें कृपाण करीत आहे.

ह्या कृपाणानें ह्या शक्तींनें प्राप्त होणारें राज्य, सामर्थ्य, धन आततायी लोकांच्या कलंकानें दूषित होअू नये म्हणून, 'तेन त्यक्तेन भुंजीथाः मागृधः कस्याजिध्दनं' हें नीतिमत्तेचें सारसूत्र सदोदित सन्मुख असावें यास्तव या कृपाणाचा, ह्या हिंदुध्वजाच्या पृष्ठभूमीचा रंग--

गौरिक अर्थात् भगवा

आहे. हा रंग त्यागाचा आहे. साधुत्वाचा आहे, योगच नसेल, क्षेमच नसेल, तर त्याग तरी कशाला ? म्हणून हें योगक्षेमाचें कृपाण हिंदु जातीनें अुपसलें आहे. पण तें " आदानंहि विसर्गायास तो वारि मुच्चरिव !" आम्हीं स्वतंत्र होणार, शक्तिशाली होणार मुक्त होणार; पण ते आम्हांसह अितरांसहि स्वतंत्र करण्यासाठीं यास्तव आमच्या संपन्नतेचा ध्वंज त्यागी आहे, भगवा आहे, गौरिक आहे.

ज्या भगव्यावर ॐकारयुक्त कुण्डलिनी आणि कृपाण अंकित आहे, त्या ह्या हिंदुजातीच्या हिंदुध्वजाच्या संकेताचा हा गूढार्थ आहे. हें तात्त्विक रहस्य आहे.

* * *

ध्वजगित

['अखिल हिंदु विजय ध्वज ' हें गीत स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं रचलेलें असून हिंदुस्थानावर ब्रिटिशांचें राज्य असतां त्यांतील शेवटचें आठवें कडवें--

पुढति नेम कांहीं ढळला । ध्वज जरि करांतुनी गळला ॥
अुचलुं या पुनरपि प्राणां लाअुनि पणा ॥

ह्या प्रमाणें होतें. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हें कडवें पालटून त्या ठिकाणीं अिग्रजांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्य बुडविल्याचें जें कडवें वीर सावरकरांनीं रचलें आहें तें ह्या गीतांत आलेलें आहे. हें नवें कडवें अ. भा. हिंदुमहासभेच्या भाग्यनगर येथें भरलेल्या ३१ व्या अधिवेशानाच्या वेळीं–दि. ५ मे १९५४–रचण्यांत आलें आहे.]

अखिल–हिंदु–विजय–ध्वज हा । उभवुं या पुन्हां ॥
ध्वज हा । लढवुं या पुन्हां ॥ धृ० ॥
ह्या ध्वजासची त्या कालीं । रोविती पराक्रमशाली
रामचंद्र लंकेवरती, वधुनि रावणा ॥ १ ॥
करित जैं शिकंदर स्वारी । चंद्रगुप्त ग्रीकां मारी ।
हिंदुकुश शिखरीं चढला, जिंकुनि रणा ॥ २ ॥
रक्षणीं ध्वजाच्या ह्याची । शालिवाहनानें साची ।
अुडविलीं शकांचीं शकलें, समरिं त्या क्षणा ॥ ३ ॥
ह्याणिलें हुसकितां जेथें । हूणांसि विक्रमादित्यें ।
हाचि घुमवी मंदोसरच्या त्या रणांगणा ॥ ४ ॥
जअिं-जअिं हिंदुसम्राटें । अश्वमेध केले मोठे ।
करित पुढति हाची गेला, विजयघोषणा ॥ ५ ॥
अुगवुनि सूड हिंदूंचा । मद मर्दुनि मुस्लीमांचा ।
शिवराय रायगडिं करिती, वीरपूजना ॥ ६ ॥
ध्वज हाचि धरूनि दिल्लीला । वीरबाहु भाऊ गेला ।
मुसलमीन तख्ता फोडी, हाणुनी घणा ॥ ७ ॥
आंग्ल दैत्य तोंचि आला । सिंधुतूनि घाली घाला ।
बडविला सिंधुतचि त्याही, करूनि कंदना ॥ ८ ॥

* * *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुत्तरक्रिया : : १५

✠ ✠ ✠

[१७६१ मधील पानपतच्या लढाअींत मराठ्यांचा जो पराभव झाला त्याचा जो पुढें सूड मराठ्यांनीं श्रीमंत माधवराव पेशवे यांच्या नेतृत्वाखालीं घेतला त्या कथानकाच्या आधारें हें नाटक रत्नागिरी येथें असतांना श्री. वि. दा. सावरकर यांनीं लिहिलें. त्यांतील तीन प्रवेश येथें देण्यांत येत आहेत. त्यांतील अेक प्रवेश विनोदी असून त्या विनोदांतूनहि वीर सावरकरांनीं आपल्या तत्त्वांचाच प्रचार कसा केला आहे तें स्पष्ट दिसतें.

शेवटच्या प्रवेशांत गंभीर आणि अुदात्त विचार व्यक्तविण्यासाठीं सावरकरांनीं, आजकाल ज्याची नवीन म्हणून चर्चा चालूं आहे त्या गीत नाट्याचा अुपयोग या नाटकांत १९३३ मध्येंच केला आहे.]

✠ ✠ ✠

अंक १ ला, प्रवेश १ ला

(पहिले माधवराव पेशवे वाड्याच्या अंगणांत अुभे आहेत. अितक्यांत बाहेरच्या बाजूस गलका अैकूं येतो.)

माधवराव:– पहारेकरी, दरवाजाबाहेर गलका कसला होत आहे ?

पहारेकरी:–कांहीं विशेष नाहीं, सरकार ! अेक वेडी आज चार पांच

(सा...१३)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिवस येऊन, भिक्षा घातली तरी न घेतां आंत घुसण्यासाठीं त्रागा करीत असते. येतींजातीं पोरेंटोरें तिची गंमत करून हंसत खिदळत असतात, अितकेंच कायतें.

माधवराव:–भिक्षा घातली तरी न घेतां वाड्यांतच घुसूं पाहते काय, ती म्हणते तरी काय ?

पहारेकरी:–खुळीच ती, सरकार ! तिचें बरळणें ते बरळणेंच, व ती म्हणजे, 'या शनिवार वाड्याचा धनी कोण, तो मला हवा आहे ! देवानें स्वप्नांत येऊन मला सांगितलें कीं, त्याची अेकदा चांगली कानअुवाडणी कर म्हणून !' असें विचारीत हंसते, रडते, किंचाळते, ती कुठून आली, कुठें जाणार आहे, कोणाची, याची तिला स्वतःला तरी शुद्ध आहे कीं नाहीं, देव जाणें ! पण रूप रंग, भाषा, यावरून दिसते आहे कोण्या चांगल्या घराण्यांतील बाअी !

माधवराव:–बोलवा तिला आंत, ती तिची वेडी गंमत पाहण्याची आम्हांलाहि अेक वेडी लहर आली आहे.

(पहारेकरी वेडीला जाणतात)

माधवराव:–बाअी, तुम्हांला काय हवं आहे ?

वेडी:–(मोठ्यानें हंसून) तुं ! अरे मला तूंच हवा आहेस ! जसा मला स्वप्नांत दिसलाच तसाच, अगदीं तसाच ! शनिवार वाड्याचा धनि तो तूंच ! पण तुझें नांव काय ?

पहारेकरी:-हा ! मर्यादा सोडून जर अरे करशील तर–

माधवराव:–अं हं ! दाबूं नका तिला असे. सांगा आमचें नांव तिला. आम्ही थांबवूं तोंपर्यंत ती जें जें विचारील ते तें सांगा.

पहारेकरी:–बाअी, श्रीमंत माधवराव पेशवे पंतप्रधान, ते हेच !

वेडी:–पेशवे ? माधवराव ? बरं यांच्या वडिलांचं नांव ?

पहारेकरी:–श्रीमंत बाळाजीपंत अर्थात् नानासाहेब पेशवे !

वेडी:–त्यांच्या वडिलांचं ?

पहारेकरी:–बाजीराव बल्लाळ पेशवे !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेडी:–त्यांच्या वडिलांचं ?

पहारेकरी:–बाळाजी विश्वनाथपंत भट हेच पुढं पाहिले पेशवे झाले.

वेडी:–(हर्षभरानें टाळचा वाजवीत) भट ? भट ? तर मग तूं मूळचा भटच आहेस ? पुरें, झालं माझं काम ! भटजीबुवा, मला सध्यां पेशव्यांबिशव्यांशीं कांहीं काम नसून अेक तुझ्यासारखा भटजीच हवा होता! कारण मला अेक अुत्तरक्रिया करायची आहे. होय अुत्तरक्रिया ! त्यासाठीं भट हवा होता भट !

माधवराव:–कोणाची अुत्तरक्रिया करावयाची आहे तुम्हांस ? नीट शांत होअून बोला.

वेडी:–कोणाची, कोणाची अुत्तरक्रिया म्हणून सांगू तुला ? अरे, 'शनिवार वाड्याचा जो धनि आहे. तोच भट बोलाव आणि आमची अुत्तरक्रिया कर! तरच आमच्या अंतराळांत तळमळणाऱ्या अतृप्त जीवांना अुत्तम गति मिळेल ' असें पानपतीं पडलेले सहस्रावधि अतृप्त वीरात्मे माझ्या स्वप्नांत येअून ओरडत असतात. ते बघ माझे पतिराज, तो बघ माझा तनय ! झुंजत पडले बघ रणांत ! ती बघ माझी मुलगी. अग बाअीग, घायाळ केली-रक्तबंबाळ केली ना रे त्या राक्षसांनीं ! त्या माझ्या पतीची, मुलाची, मुलीची (पहारेकऱ्याकडे बोट दाखवून) तुझ्या बापाची, तुझ्या काकाची, (माधवरावांकडे बोट दाखवून) नि तुझ्या काकांची !

माधवराव–(दचकून) काय ? आमच्या काकांची ? भाअूसाहेबांची अुतरक्रिया ?

वेडी–होय त्याच तुझ्या चुलत्याची नि तुझ्या बापाची नि तुझ्या भावाची–विश्वासरावाची ! अितक्यांतच दचकतोस काय असा ? आणखी अैक. अग बाअी ? पण माझ्या पायांत बोचलं काय पुन्हां ? कांचा ? कांचा ? ज्या वाटेनं पाअूल टाकावं त्या वाटेंत पिचलेल्या बांगड्यांच्या काचांचा ढीग ! घरोघर बांगडी फुटली. ते तुकडे पायांत बोचून बोचून रक्तबंबाळ झालं नारे हें माझं हृदय ! भटा, मला त्या फुटलेल्या लाखो बांगड्यांची अुत्तरक्रिया करायची आहे ! त्या लाखांचीं नांवं अेका नांवांत सांगूं तुला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या लाखांचं अेक नांव–पानिपत ! मला पानिपतची अुत्तरक्रिया करायची आहे ! आणि त्या पानिपतच्या अुत्तरक्रियेचा भट तूं !

माधवराव–बाअी, तूं कोण, कुठली, वेडी आहेस कीं शहाणी आहेस तें कांहींच कळत नाहीं. पण जर तूं खरोखरच वेडी असशील तर तुझें हें वेड या आमच्या पेशवाअीतील सगळ्या शहाण्यांच्या शहाणपणाहून अधिक शहाणं आहे यांत शंका नाहीं. निदान ज्या राज्यबुडाअू वेडानें आमच्या दादासाहेबांना नि सखारामबापूंना आजकाल पछाडलें आहे, त्या वेडापेक्षां जर हें तुझें पानिपतच्या अुत्तरक्रियेचें वेड त्यांना पछाडील ना, तर किती बरें होअील. पण त्यांनीं आज पुण्यांतच पानिपत माजविलें आहे. बाअी, पानिपत झालें त्याच दिवसापासून मलाहि तुझ्या याच वेडानें पछाडलेलें आहे. पण काय करूं; या शहाण्यांच्या वेडांची बेडी माझ्या पायास ठोकली गेल्यानें मी आजवर पंगु होअून पडलों ! पण आतां ती बेडी मीं तोडली आहे. आतां माझें मी सर्व पाहून घेतों. तूं निश्चिंत रहा. ती पानिपतची अुत्तरक्रिया मीं करतों–तूं जा नि आपल्या नातेवाअिकांची अुत्तरक्रिया तेवढी यथास्थित कर जा. तुला काय हवें तें साहित्य, दर्भासुद्धां हे आमचे कोठीवाले पुरवितील.

वेडी–दर्भ ? वेड्या, मला दर्भ नकोत, दळभार हवेत ! अेकेका व्यक्तीच्या अुत्तरक्रियेस दर्भ पुरतात, पण अेकाद्या पानिपतच्या अुत्तरक्रियेस दळभार लागतात दळभार–दर्भ नव्हेत ! ह्यः ह्यः ह्यः, आमच्या भटजीबुवांना अजून अुत्तरक्रियेचा अर्थच कळला नाही ! अरे पहारेकरी, दिल्ली, पानपत पुण्याच्या कोणत्या दिशेस आहे ?

पहारेकरी–अुत्तरेस.

वेडी–हां हां. तर मग त्या अुत्तर दिशेस जिंकण्याची जी क्रिया ती अुत्तरक्रिया ! आणि राक्षसांच्या हातून अुत्तर जिंकून घेतांना जे जे पानपति रणीं झुंजले, जे जे रणीं पडले, त्यांचं अपुरं राहिलेलें तें कार्य, ती क्रिया, पुरी करणं म्हणजे पानपतची अुत्तरक्रिया करणं; आतां आलं कां ध्यानांत ?

माधवराव–बाअी, तुम्हीं स्वतः पानिपतास होतां कीं काय त्या झुंजींत ?

वेडी–तें मला काय विचारतोस ? हे माझे केंस तुला दिसत नाहींत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(किंचाळून) पिशाच्च ! पिशाच्च ! अरे हे राक्षस मला नि माझ्या मुलीला केस धरून गरगर फिरवीत फरफटत ओढूं लागले ना ! हें रक्ताळ डाग, हा ठणका, हे तुटलेले—तुडविलेले, राकटलेले-विस्कटलेले केस—यांना विचार मी कुठें होतें तें ! अुत्तरक्रियेस तूं भटजी मिळालास. पण थांब भटा, थांब – आधीं अुत्तरक्रियेचें साहित्य जुळलं पाहिजे ना ? यास्तव, वाजवा! आधीं रणढोल वाजवा, फुंका ! आधीं रणशिंगें फुंका, चेंदा ! आधीं त्या पिशाच्चाना चेंदा ! हा नजीब, हा सादुल्ला, हाफीज हां बंगष-आधी त्यांचीं हाडकें न् हाडकें मला द्या : आधीं त्या समिधा, मी आग तूं भट—नि मग कर ती अुत्तरक्रीया ! वा, शेवटीं बेत तर ठीक जमला ! (मोठ्यानें हंसत व टाळ्या वाजवीत) वेडाचा आनंद किती अपरंपार असतो ! सहन होत नाहीं तो मला – साऱ्या पुण्यांत, साऱ्या महाराष्ट्रांत अशी नाचत फिरल्या-वांचून या वेडगळ आनंदाच्या कळा कसल्या थांबायला !

(डमरू वाजवीत गाणें गात नाचते.)

(गाणें)

सोनपत पानपत । तुमची आमची गेली पत ॥
पादशाह हिंदुपत । घ्या घ्या सूड ! ॥
साप विंचू मुंगुस पाल ॥
मराठ्यांनों करा वार ॥
मोंगलांची तोडा ढाल ॥
दिल्लीच्या बादशाहीचं पाडा रणांत धूड ॥
मग अुत्तरक्रिया—आधीं भाअूंचा सूड ।।
विश्वासाचा सूड ! पानपतचा सूड !

माधवराव-हें आतां कोण मला भेटलें ? ही वेडी-कीं पानपतच्या शल्यानें विद्ध झालेल्या महाराष्ट्राच्या हृदयांतील—मूर्तिमंत वेदना ? मी कोणाच्या किंकाळ्या अैकल्या ?—या वेडीच्या का पानपतच्या सूडासाठीं तळ-मळणाऱ्या माझ्या स्वतःच्याच अुत्सुकतेच्या ! भाअूसाहेबांची अुत्तरक्रिया ! भाअूंची वैयक्तिक अुत्तरक्रिया, पार्वती काकूंच्या प्रेमवेडचा हट्टानं आजवर जी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अपुरीच राहिली, ती आतां काकूबाअी करूं देवोत वा न देवोत! अुत्तर-हिंदुस्थानांत हिंदूंची सत्तास्थापना करण्याच्या, भाअूंच्या अपुऱ्या अिच्छेचा अश्मा, महाराष्ट्राच्या पराक्रमाच्या जरीपटक्याच्या पदरांत, असा पक्का बांधून, अबदल्लीच्या नाकावर टिचून, पानपतचें अुट्टें काढून, अुत्तर हिंद जिकण्याचें तें भाअूंचें कार्य, ती भाअूंची महाराष्ट्रीय अुत्तरक्रिया तरी, मीं यथाविधि संपादन करणार! भित्र्या शहाणपणानें बोथट झालेल्या, महाराष्ट्राच्या तरवारीची धार, पानपतच्या सूडाच्या सहाणेवर घासून, मी तिला ह्या वेडी-सारखेंच वेड लावणार! कारण, कीं;

॥ पद १ ॥

अतिघोर संकट बिकट झंजावादळीं सहसा हता ॥
निबिड पंथीं पंथि जातां बुद्धिची तमसावृता ॥
धर्मरक्षणि देव दावी मतिमतांहि मतिहता ॥
वीज वेडाचीच अैशा पेटवुनि पुढल्या पथा ॥

✣ ✣ ✣

अंक १ ला, प्रवेश ४ था

(सरदार विसाजीपंत बिनीवाले, शास्त्रीबुवा, धोंडण्णाशास्त्री व कोंडण्णा-शास्त्री बसले आहेत.)

शास्त्रीबुवा—आम्हीं आपणांस स्पष्टच विचारतों कीं, पुण्यांत श्रीमंतांचं ब्राह्मणीराज्य आहे कीं कोण्या औरंगजेबाचें मुसलमानी राज्य आहे! अहो हा यशवंतराव धादांत समुद्रगमन करून ख्रिश्चन मुसलमानांच्या देशांत राहून, त्यांच्याबरोबर जेअून आलेला बाटगा--त्यास श्रीमंतांनीं सरदारीचीं वस्त्रें द्यावीं काय!

कोंडण्णा—बरं, म्लेंच्छदेशीं जेवला तर स्वदेशीं येतांच गुपचुप हात धुवायचे नि मोकळं व्हायचं! गुपचुप काय वाटेल तें करा. पण केलेलं सांगत फिरायचं! अब्रह्मण्यम्! अब्रह्मण्यम्! अहो, तो फिरंग्यांची टोपीदेखील घाली म्हणतात!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बिनीवाले--पण समुद्रगमन केलं तरी त्यांस सरदारी देण्यास हरकत काय ! हिंदुपदपादशाहीचा तो हिंदुवीर अेक अेकनिष्ठ सेवक आहे !

शास्त्रीबुवा—आपणहि, सरदार बिसाजीपंत बिनीवाल्यांनीहि, असं म्हणावं ना ? अहो ज्यानं समुद्रगमन केलं तो हिंदुच राहूं शकत नाहीं !

धोंडण्णा–हो तो मुसलमानच झाला !

कोंडण्णा–तो ख्रिश्चन झाला !

बिनीवाले–तरी काय, आपण जर जन्मजात मुसलमानास किंवा टोपी-वाल्यासहि मराठी राज्यांत सरदारक्या देतों, तर यशवंतरावासारख्या जन्म-जात हिंदूस ती देण्यांत काय बिघडलें ! जातीचें जें काय ग्रामण्य असेल त्याचा प्रश्न निराळा–हा निराळा. ते पाहा तें स्वत: येतातच आहेत आमच्या-कडे ! त्यांचें तरीं काय म्हणणें आहे तें आपण सर्वजण अैकून तर घेअूं या प्रथम. (यशवंतराव येतात) यावं, रावराजे यशवंतराव, यावं. फराशि-सांचे गव्हरनर जनरल बहाद्दूर यांनीं, तुम्हीं युरोपमध्यें गाजविलेल्या काम-गिरीची प्रशंसा करणारें आणि तुमचा परिचय करून देणारें जें पत्र धाडलें, तें पाहून श्रीमंतांस परम संतोष झाला–आणि आपण समुद्रपार होअून, जी अपूर्व पृथ्वीप्रदक्षिणा केलीत नि युरोपांतील अनेक देशांत जें पाहिलें, अनुभवलें, कमावलें, त्याची आश्चर्यकारक माहिती आपल्या तोंडूनच थोडीबहुत अैकावी म्हणून त्यांनीं आम्हांस सांगितलें. तरी आमची ती जिज्ञासा आपण आतां किंचिन्मात्र तरी पुरवावी-

यशवंतराव–सरदार महाशय ! मी मूळचा शिंद्यांच्या पदरचा अेक राअूत. पानपतीं शिंद्यांच्या सेनेंत मी होतों नि माझ्या तरुण पत्नीसह तिची आअी मराठ्यांच्या स्वारींतील अंत:पुरांत राजस्त्रियांची परिचारिका म्हणून असे. शेवटच्या रणघुमाळींत मराठ्यांची सेना अुधळल्यावर, स्त्रियांच्या रक्ष-णार्थ मोठी मारहाण झाली, तींतच आम्हीं घायाळ होअून पडलों. माझी तरुण पत्नी आणि तिची आअी ह्याहि कटयारी अुपसून झुंजतांना घायाळ झाल्या–त्यांचा पत्ताच नाहीं–बहुधा ठारच झाल्या असाव्या. मी दैवयोगानें दुसऱ्या दिवशीं शुद्धीवर येअून पळांतील कांहीं मराठ्यांसह अेका गांवीं आलों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो तेथें अेका गिलच्यानें मला पकडून, माझें तरुण वय नी रूप पाहून मला गुलाम करून काबुलास नेलें. तेथून अेका अरब व्यापाऱ्यानें मला नेअून, अेका फ्रेंच सरदारास विकलें. तो फ्रेंच सरदार ममताळू आणि गुणांचा मोठा चाहता निघाला. त्याच्याच आश्रयानें फ्रेंच सैन्यांत माझा प्रवेश होअून मी लढचांतून नांवलौकिकास चढलों, अिंग्लंड प्रभृति अनेक युरोपीय देशांत फिरलों, अमेरिकेंतहि गेलों. तेथें त्या माझ्या अुदार फराशिस धन्यानें, मला गुलामगिरींतून मुक्त केलें. मी तसाच चीन जपान पहात देशी फ्रेंचांच्या पांदेचरीस परत आलों. त्यांनीं " रावराजे " ही पदवी देअून माझ्याअिच्छे-साठीं श्रीमंतांकडे पाठविलें. तो हा सेवेस येअून सादर झालों.

बिनीवाले–आपण अमेरिकेंत गेलां म्हणालांत, तो देश कोणीकडे आहे? या लोकांचें नांव आपल्या अिकडे फारसें अैकिवांत नाहीं. काय शास्त्रीबुवा पुराणांत याचें कांहीं नांवबीव आहे का ?

शास्त्रीबुवा–सगळं कांहीं आहे. 'व्यासोच्छिष्टम् जगत् सर्वम् !' हिमालयाच्या पलिकडे अुत्तरकुरू. त्यासच अमरकुरू म्हणत.गांवढळ लोकांनी त्या अमरकुरुचेंच अमेरिका असं अडाणीरूप बनविलं, दुसरं काय ?

यशवंतराव–ही अमेरिका हिमालयाच्या अुतरेस नसून पृथ्वीच्या ज्या भागावर आपण राहतों त्याच्या अगदीं अुलट बाजूस म्हणजे अेका अर्थी आपल्या पायाच्याबरोबर खालीं आहे. क्वचित् पुराणांत पाताल म्हणून ज्याचा अुल्लेख आहे तो या लोकासंबंधी असू शकेल. काय शास्त्रीबुवा ?

शास्त्री- असूं शकेल काय ? आहेच ! तें तुम्हीं नको नव्यानं सांगायला ! पाताल आहे ! तेथें नागराज राज्य करतात ! तिथं मोठमोठे सर्प--फण्यार, मण्यार, फुरशीं, घोणस, नानेटी, अजगर राजवाड्याअेवढालीं विस्तीर्ण भुयारें बांधून त्यांत नांदतात. कोणीं आपलीं पुच्छें तोंडांत धरून चक्रासारखे फिरतात. कोणी प्रचंड पक्षासारखे अुडत राहतात. पिवळे धमक मोठमोठे नाग आपल्या देहाचीं वेटाळीं घालून, फणा काढून, डुलत असतात. पाताळ कुहरांत सूर्यप्रकाश नाहीं. पण या नागांच्या डोक्यावरील तेजःपुंज मण्यांच्या प्रकाशांत तिथं सर्वत्र दिव्य लखलखाट पडलेला असतो. त्यांचीं वारुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अितकीं लांब नि खोल असतात कीं, त्यांचं अेक तोंड पाताळांत तर दुसरं तोंड पुण्यांत ! त्यांतून ते पाताळींचे नाग पृथ्वीवर येअून अून खात पडलेले अनेक पुण्यवंत साधूंच्या दृष्टीस पडतात. पण या पाताळखंडांत हे गृहस्थ जाअून आले ही मात्र निव्वळ थाप आहे, थोतांड आहे ! नागलोकीं-आणि मनुष्य ! – अहो पाताळांत द्वापारीं अेक भीम गेला कीं अेक अर्जुन ! कलि-युगांत-आणि पाताळीं ! जाणंच शक्य नाहीं.

कोंडण्णा, धोंडण्णा:--हो, जाणंच शक्य नाहीं !

यशवंतराव:--तुम्हीं म्हणतां तशा पाताळांत तें शक्य नसेल. पण मी पुराणांतील पाताळाची कथा सांगत नसून मीं पाहिलेल्या प्रत्यक्षांतील पाताळाची माहिती सांगत आहे. तिथें आपल्यासारखींच मनुष्यं राहतात, तिथें हाच सूर्य असाच प्रकाशतो--नागांचे मणि नव्हत ! फरक अेवढाच कीं अिकडे दिवस असला की, त्या पृथ्वीच्या अुलटचा बाजूस सूर्य न दिसल्यानें रात्र होते. सूर्य तिकडे दिसूं लागला कीं, अिकडे मावळतो नि आपली रात्र होते.

बिनीवाले:--म्हणजे ? आतां हा आपला भर दिवस; त्या अर्थीं तिकडे भर रात्र असून लोक गाढ झोपेंत असतील म्हणतां ! केवढं आश्चर्य !

शास्त्री:--आश्चर्य ! कसलं--पाखंड, निव्वळ थापेबाजी ! म्हणे आकाशांतले सूर्यनारायण पाताळांत ! पाताळ कुहरांत सूर्य प्रकाशतो ! वर्णाश्रम धर्माच्या हें साफ विरुद्ध आहे !

धोंडण्णा, कोंडण्णा:--साफ विरुद्ध आहे ! सूर्यप्रकाश वर्णाश्रम धर्माच्या साफ विरुद्ध आहे !

बिनीवाले:--बरं पण तिकडे राज्य तरी कुणाचं आहे ?

यशवंतराव:--युरोपियन--हे हे अिंग्रज, हे गोवेंकर, पोर्तुगीज, स्पॅनिश या लोकांचं !

बिनीवाले:--काय ? तिकडेहि अिंग्रजांचेंच राज्य ? म्हणजे हे अिंग्रज असे आहेत तरी किती आणि गेले आहेत तरी कुठें कुठें ? महा अुपद्व्यापी आहे हा अिंग्रज ! मोठा विस्मय वाटतो.

यशवंतराव--सरदार ! अिंग्रज अमेरिकेंत राज्य करतात याचा आप-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णांस अितका विस्मय वाटतो--पण मी जर आपणांस प्रत्यक्ष पुरावा दाखवून असें सिद्ध करून दिलें कीं, या अमेरिकेंतच काय, पण चीन, जावा, सयामांत-सुद्धां अस्सल आर्यवंशी आणि आर्यधर्मी हिंदु राजांचीं राज्यें होतीं, तर आपणांस काय वाटेल ?

शास्त्री:--कांहीं अेक विशेष वाटणार नाही. रघु दिलीपापासून युधिष्ठिरा-पर्यंत आमच्या सर्व आर्य राजांनीं साऱ्या पृथ्वीचे दिग्विजय केलेलेच होते.

यशवंतराव:- मग जर समुद्रगमन पाप आहे तर हे सारे आपले पूर्वज पापीच होते, असें ठरतें नव्हे का.

शास्त्रीबुवा:--मुळींच नाहीं. त्यांनीं पृथ्वी जिंकली पण समुद्रगमन केलं नाहीं. कारण तेव्हां पृथ्वीवर समुद्र म्हणून नव्हतेच. सारी पृथ्वी सलग होती. तो प्रत्येक दिग्विजयी "प्रतस्ये स्थलत्वमना ! प्रतस्थे स्थलवर्त्मना ! "

कोंडण्ण --धोंडण्णा--जितम् ! जितम् ! !

यशवंतराव--अहाहा ! शास्त्रीबुवा, पृथ्वी जोंवर सलग आहे तोंवर तरी वाटेल त्या देशांत गेल्याने पाप लागत नाहीं, जात जात नाहीं, अितकें तरी तुम्ही मानलेंत, हे तुमचे आभार आहेत. तर मग आतां सिंधुनदीच्या अटकेची अटक तरी तुटली ना ? 'स्थलवर्त्मना' कां होअीना पण अरब-स्थानापर्यंत--थेट फ्रान्सपर्यंत जाण्यांत पाप नाहीं ना ?

शास्त्रीबुवा--आम्हीं तसं मुळीं म्हटलंच नाहीं! असत्यम् ! अनृतम्! !

कोंडण्णा, धोंडण्णा- मनृतम् ! मनृतम् ! !

यशवंतराव:--तुम्हीं तसेंच म्हटलें होतेंत ! ही सलग पृथ्वीची अटक तुटली तशीच समद्राच्या अटकेचीहि स्थिति. कारण निदान श्रीराम तरी दशयोजन आयत, शतयोजन विस्तीर्ण असा समुद्र ओलांडून लंकेंत जाअून रावणाशीं लढले, हे तर कांहीं तुम्हांस नाकारतां येणार नाहींना ?

शास्त्रीबुवा--तुमच्यासारख्या वानरांनीं देवाची गोष्ट कशास बोलावी! न देव चरितं चरेत् ! न देव चरितं चरेत् ! !

यशवंतराव--असो, पण आमच्यासारख्या वानरांनीं वानरांचीं चरितें तरी अनुसरण्यास हरकत नाहीं ! लक्षावधि वानरहि समुद्र लंघून लंकेंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेले, पण त्यास कोणी पंचगव्य पाजलें नाहीं, कोणी दूषिलें नाहीं !

बिनीवाले–काय शास्त्रीबुवा, तुमचा बुद्धिवाद नि युक्तिवाद तुमच्याच अंगाशीं आला !

शास्त्री–चुलींत गेला तो बुद्धिवाद नी युक्तिवाद ! वचनात् प्रवृत्तिर्वचनान्निवृत्तिः ! परदेशगमन 'समुद्रयातु स्वीकारः' कलिवर्ज आहे, हा धर्म–बाकी हम कुछ नहीं जानते !

कोंडण्णा–हम कुछ नहीं जाणते !

धोंडण्णा–हम कुछ नहीं जाणते !

यशवंतराव–हें मात्र अगदीं खरे बोललांत–तुम कुछ नहीं जानते ! प्रथम जमतो तों युक्तिवादच करतां पण युक्तिवादांत चीत होऊं लागलेत कीं, म्हणतां आम्ही युक्तिवाद करीतच नाहीं.

बिनीवाले–शास्त्रीबुवा, कांहीं झालें तरी यशवंतरावांस म्लेंच्छांनीं बळें बळें परदेशीं नेलें, समुद्रगमन पाप असलें तरी त्यांच्या हस्तें तें गुलाम म्हणून म्लेच्छांनीं धरून करविलें ना ?

शास्त्री–पण ते परत येतांना तरी स्वतंत्र होते ना ? मग हे समुद्रमार्गे परत कां आले ? दुसरा मार्ग नव्हता तर तिकडे म्लेंच्छांतच कां राहिले नाहींत ? मग आमचं कांहीं म्हणणं नव्हतं.

कोंडण्णा–हो, हे तिकडे मुसलमानच कां झाले नाहींत ? मग समुद्रानं परत येते तरीं तें कृत्य वर्णाश्रमधर्माच्या विरुद्ध होतं ना !

धोंडण्णा–हो, ते तिकडे किरिस्तांवच कां झाले नाहींत ? हिंदु कां राहिले ? सनातन धर्माचा हा अुपमर्द कां केला ?

बिनीवाले–छे ! छे ! असा युरोपांतहि गाजलेला हिंदुवीर आपल्या हिंदुपद पाच्छाअीच्या सेवेस नित्याचा अंतरला नाहीं, पुनः परत लाभला, हें आपल्या हिंदु राष्ट्राचें सुदैवच समजलें पाहिजे. मला वाटतें, जातिदोषाच्या निर्वाहार्थ रावराजे यशवंतराव यांस कांहीं अल्पस्वल्प प्रायश्चित्त देऊन हें प्रकरण मिटवणें राज्याच्या हिताचें आहे.

यशवंतराव–प्रायश्चित्त ! सरदार, पाप असेल तिथें प्रायश्चित्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संभवतें ! आपल्या सदिच्छेविषयीं मीं आभारी आहें. पण माझ्या हिंदु-राष्ट्राच्या कल्याणार्थ मी त्या सदिच्छेच्या लाभासहि बळी देणार ! परदेश-गमन हें पाप नाहीं, अितकेंच नव्हे तर तें हिंदुराष्ट्रास अत्यंत अपरिहार्य झालेलें अेक पुण्यप्रद कर्तव्य आहे, असें मी समजतों. यास्तव मी समुद्रगमन-नार्थ म्हणून तरी, अितर कोणचें राहोंच, पण नुसतें तुळशीपत्राचेंहि प्राय-श्चित्त घेणार नाहीं !

॥ पद ॥

जी कामना । मना पापची ना । गमे जी परी ।
पुण्या सुजाणा ॥ धृ०॥
पडता हि काया । ती आचराया । कचरेन ना । जनधारणा ।
भिअुनी जनांच्याहि मी दूषणांना ॥

सरदार, आज अिंग्लंडची आहेत तशींच मिसरपासून मेक्सिकोपर्यंत आपल्या भारतीय आर्यांचीं हिंदुराज्यें आणि हिंदुधर्म, फैलावलीं होतीं – त्यांचे अवशेष मीं प्रत्यक्ष पाहून आलेलें आहें. तीं कोणीं बुडविलीं ? मुख्यत: ही परदेशगमनबंदीची बेडी आपण होअून आपल्या पायांत ठोकून घेतल्यानें ! अिकडून सैन्य, राजे, प्रचारक, नातेवाअीकदेखील तिकडे समुद्रावर कोणी जाअीनासा झाला त्यामुळें, गंगेच्या प्रवाहाचा संबंध सुटतांच कालवे सुकून निर्जीवन व्हावे, तशीं तीं हिंदुराज्यें आणि हिंदूजनता तिकडे निर्जीवन होअून अहिंदूनीं खाअून टाकली. महाराज, युरोपपर्यंत आपलीं सिंधुयानें-हिंदु आरमारें, जाअून जगताचा व्यापार आपल्या खिशांत ठेवीत होतीं, प्रत्येक सागरा महासागरावर हिंदुध्वज फडकावीत हिंदुवणिक निर्भयपणें प्रवासत असे--तो सारा जागतिक हिंदु व्यापार नि तीं हजारों सिंधुयानें कशांत बुडालीं ? कोण्या महासागराच्या प्रचंड वादळांत ? नव्हे, तर अेका संध्येच्या पळींतील वादळांत ! परदेशांतील पाण्यानें संध्या विटाळते, मुकटा विटाळतो, विजातीयांसह खाण्यानें जातच जाते, धर्मच बुडतो, या खुळापायीं जेव्हां रोटीबंदी नि तिच्यामुळेंच पुढें समुद्रबंदीची बेडी आम्हींच आमच्या प्रगतीच्या पायांत ठोकली–तेव्हां तीमुळें ती आमचीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यें नी तो सामुद्रिक व्यापार ठार बुडविला ! या मुकटचापायीं मुकुट दवडले !

शास्त्रीबुवा:—पण धर्म राखला ! संस्कृति राखली ! हिंदूंना, हिंदुस्था-नला, अरबस्थानच्या वा पोर्तुगालच्या म्लेंच्छांचा विटाळ होऊं दिला नाहीं !

यशवंतराव:—हाय हाय, तेवढेंदेखील साधलें नाहीं. हीच तर अत्यंत भयंकर हानि या समुद्रबंदीनें झाली. अहो, जर मुसलमानांची अत्याचारी आकांक्षा अरबस्तानांतच मूळ अुगवली, तेव्हांच आपले दहापांच राजकीय हेर जरी तिकडे असते, तरी आपणांस ती बातमी तात्काळ कळून त्या वेळीं अत्यंत प्रबळ असलेल्या हिंदु राष्ट्रानें, अरबस्थानावर स्वारी करून, त्या मूठभर मुसलमानांस कळींतच चिरडून टाकलें असतें ! अरबचा महंमद कासम सिंधु देशांवर आला—तसा सिंधचा हिंदु दाहिर अरब देशावर चालून कां गेला नाहीं ? महंमद गझनीनें सोमनाथ लुटला--तुम्हीं मक्केला जाअून मक्का कां घेअूं शकला नाहीं ? मुख्यतः या परदेशगमन-बंदीनें. या समुद्र-बंदीनें या रोटीबंदीनें ! हिंदुस्थानास विटाळ होअूं नये म्हणून आम्हीं अरब पर्तुगालला गेलों नाहीं. पण त्यायोगें हिंदुस्थानचाच अरबस्थान करून घेतलांत, परशुराम क्षेत्राचेंच पर्तुगाल करून घेतलेंत, याची वाट काय ? मथुरेंत मशिदी, दिल्लींत औरंगजेब, वाशींत गोकुशीं गोहत्या ! मुख्यत्वें या रोटीबंदी-समुद्रबंदीपायीं बाहेरचीं राज्यें गेलीं, बाहेरचा व्यापार बुडाला. आंतलीं राज्यें बुडालीं, आंतला व्यापार बुडाला, आणि शेवटीं ज्या मुकटचा-पायीं हे मुकुट दवडले, तो मुकटांहि विटाळला—नव्हे, तो मुकटा म्लेंच्छांनीं साफ फेडून नेला ! कारण खाण्यानें जात जाते या खुळचट भावनेपायीच लाखों हिंदु बाटून मुसलमान—ख्रिश्चन झाले ? यास्तव ज्या घणानें भाअूनीं दिल्लीचें मोंगल तख्त फोडलें, तशाच कोण्या युगप्रवर्तक घणानें ही रोटीबंदीची—ही समुद्रबंदीची--बेडी तोडून टाकणें आमचें पुण्य-कर्तव्य आहे. तें पुण्य मी पुनः पुनः आचरणार, मी संधि येतांच पुन्हा पुन्हा सिंधुगमन करणार ! महाराज, अेवढी अुत्तर हिंदची स्वारी यशस्वी होअून, मुसलमानांची राजवट धुळीस मिळविली, कीं पेशव्यांची गांठ अिंग्रजांशीं

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडणार. तेव्हां जर आजपासूनच पेशव्यांनीं हजारों व्यापारी, विद्यार्थी, भूसेना, जलसेना युरोपांत घाडल्या नाहींत, आपले वडील पारिस, लिस्बन, लंडन, रोम अिकडे धाडून त्या युरोपच्या राजकारणाशीं संधान बांधून, अिंग्रजांविरुद्ध फ्रेंच, फ्रेंचांविरुद्ध पोर्तुगाल, असें अुठतांच त्यांच्या यादवीचा लाभ अेकास अुठवून अेकास बसवून घेतला नाहीं, त्यांची मुद्रणकला, युद्ध-कला, देशभक्ति, संघटना, पेंचापेंची शिकून त्यांच्याच दारीं ठोठावलं नाहीं, तर अिंग्रज पेशव्यांस पुरून अुरेल, आहारीं येणार नाहीं, हें निश्चित हें मी श्रीमंतांस अत्याग्रहानें पटवून ही रोटीबंदीची, समुद्रबंदीची बेडी तोड-विण्याची, जगलों वाचलों तर मरेतों पराकाष्ठा करणार! सरदार, अिंग्रज अमेरिकेचें राज्य करतो, याचा आपणांस विस्मय कशास वाटायला हवा! आज तरी मराठे अिंग्रजांहून राज्यशक्तींत दुर्बल नाहीत. अजूनहि अमेरिका ओसाड आहे. तेथील बिनवारशी सोन्याच्या खाणींच्या रांगा आणि प्रदेशांचीं राज्यें अजूनहि नुसत्या जाण्यावारीं जिंकतां येतील. फार नको, वीस हजार मराठी सैन्य नि शंभर झुंजार तारवे मजबरोबर द्यावीं–मी अमेरिकेंत हिंदु राज्य स्थापून, नि सोन्यानें वांकेतों भरून तीं तारवें घेअून येतों! पण प्रथम ही रोटीबंदीची–ही समुद्रबंदीची बेडी तेवढी तोडा!

बिनीवाले:––रावराजे यशवंतराव, आपल्या या भाषणानें आम्हांला अेक अद्‌भूत दृष्टि लाभल्यासारखें होत आहे! लवकरच श्रीमंतांची आपल्यांशीं प्रत्यक्ष भेट घडेल, तेव्हां त्यांसहि आपण हें सर्व निवेदावें. अुत्तर हिंदच्या या स्वारीवर अेक प्रमुख सरदार म्हणून आपली नेमणूक झालीच आहे. आज आपल्याविषयींच्या आमच्या आदराचें चिन्ह म्हणून ही तलवार आप-णास आम्ही भेट देत आहोंत! स्वीकारावी ती! आणि निरोप घ्यावा!

(यशवंतराव तलवार घेतात. सर्व अुठतात. पडदा पडतो.)

✠ ✠ ✠

अंक ४ था, प्रवेश ६ वा (स्थळ–शनवार वाडा, पुणें.)

माधवराव:–फडणीस, ज्या मराठी स्त्रिया रोहिल्यांच्या बंदींतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठ्यांनीं आज मुक्त केल्या, त्या साऱ्यांना परत हिंदुधर्मीं स्थापून चोळी बांगडी म्हणून सरकारांतून नेमणुका करून द्याव्या. बरें, सेनापतींच्या पत्रांतील पुढील आशय कोणता ?

फडणीस:--दिल्लीच्या बादशहानें दक्षिण अुत्तर सुभ्यासुद्धां झाडून साऱ्या मोंगल बादशाहीची व्यवस्था श्रीमंतांच्या नांवें लिहून दिली. अेक वजीर तेवढा सोडून बादशाहींतील यच्चयावत् अधिकाऱ्याच्या नेमणुकासुद्धां मराठ्यांनीं कराव्या हा करार झाला. अिराण, तुराण, बदकशानपर्यंत लौकिक गेला कीं, दिल्लीस वस्तुतः हिंदुपदपादशाहीच झाली !

माधवराव:- हें वृत्त सरदारांनींहि काबूलच्या शहास-अहमदशाह अबदल्लीस लखोटे धाडून कळविलें कीं नाहीं !

फडणीस:--नुसते लखोटेच नव्हेत तर पेढे धाडून ! असा निरोप कळविला कीं "ज्या हिंदुस्थानच्या मोंगल बादशाहीची व्यवस्था लावण्यासाठीं आपण स्वतःच हिंदुस्थानचे बादशाह होण्यास पानपतीं आलेत, तिची व्यवस्था शेवटीं मराठ्यांनीं लावली आहे. बादशहा हें नांव तेवढें शाहअलमचें-बादशाही तेवढी श्रीमंतांची अशी वांटणी झाली ! त्या आनंदाचे पेढे पाठविले आहेत ते स्वीकारावे आणि ही व्यवस्था पाहण्याचें समाधान अुपभोगण्यासाठीं सिंधु नदी अुतरून पुन्हां अेकदां मराठ्यांची गांठ वाटल्यास घ्यावी !

माधवराव:--आतां बादशहांस आमचा असा निरोप कळवा कीं, जर बादशाह मराठ्यांशीं यापुढें तरी वैर करणार नाहींत तर, न जाणों, हिंदु-मुसलमान हे दोघेहि ज्यांत बंधू बंधूप्रमाणें समानतेनें नांदू शकतील असें अेखादें खरेंखुरें समाअिक हिंदी साम्राज्य अशा बनावांतूनच आविर्भुत होअू शकेल ! जर मुसलमान यापुढें तरी भारतमातेस माता नि हिंदूंस बंधू मानतील तर-आम्ही हिंदूहि त्यांस बंधू मानू. त्यांस अेकी हवी तर अशी होअील-नाहींतर बेकीसहि आम्ही भीक घालीत नाहीं ! फडणीस, आतां माझे शूर सरदार जेव्हां पुण्यास परततील तेव्हां त्यांस विजयप्रवेशाच्या मिरवणुकीचा मान द्यावा नि सरसेनापति बिनीवाल्यांवर तर सोन्यारूप्याचीं फुलें अुधळावीं! यावें आपण. आम्हांस थोडा अेकान्त हवा आहे. (फडणीस जातात.) शेवटीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमच्या पिढीच्या वांट्यास आलेलें कर्तृत्व आम्हीं पार पाडिलें. आम्हीं पानिपतचा सूड अुगवला ! या जगांत चिरस्थायी असें कांहींच नाहीं. अर्थात् हें स्वधर्मराज्य ह्यापुढेंहि वाढविणें वा बुडविणें पुढील पिढ्यांचें दायित्व. पण आज तरी मोजली जावी अशी मुसलमानी सत्ता हिंदुस्थानांत अुरली नाहीं ! माझें हिंदुराज्य वृद्धीस लागलें. आतां क्षया, तूं माझ्या या जर्जर देहाचा बळी आजच्या आज घेतलास तरी चिंता नाहीं.

॥ पद १७ वें ॥

अ.तमा अजि धाला ॥ आमुचा ॥
पानपतःचा सूड मराठी अुगवि पुरा झाला ॥
वृद्धिगत कीं महाराष्ट्र हा महा-राष्ट्र झाला ॥
क्षया ग्रास तूं सुखें शेष मम जीवन या काला ॥ १ ॥

अरे, पण हें काय ? समोरचें सारें दृष्य पुसटून चाललें ! नवीन ! हें कोणचें नवीन दिव्य जगत् मला भासमान होत आहे ! (मंजुळ संगीताच्या साथीसह दिव्य राजपुरुष अुतरत येतात. माधवराव गुडघे टेकून त्यांतील प्रमुखास म्हणतात) :--

(वैनायक वृत्त)

माधवराव:--

कवण दिव्य पुरुष तुम्ही ? अिंद्र जसा कीं
शोभावा देव पुरोभागिं तेवि जो
शोभसि तूं देवांच्या ह्या थव्यापुढें
अभिधा तव धन्य काय ?

दाहिर:--

हिंदुभूषण !
सिंधु देशचा दाहिर नृपति तोचि मी !
यवनांहीं ओलांडुनि सिंधुनदातें
भरतभूमिवरि पहिला वार घोर जो
हाणियला, त्या वारा वक्षि विशाला
ज्याची झेलिला माझ्या ! समरिं मी अणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुश्री यवनकरीं पतित जाहली
दुर्दिनि रे प्रथम त्याचि ! तेथपासुनी
अपमृत्यूहूनि असह्‌ अपजयांसहि
सहत हिंदुवीरनृपति जे शतावधि
म्लेच्छकरांतुनि मागुति जिकण्याप्रती
ती हिंदुश्री, आले लढत संगरीं
आज सात शतकांवरि धर्मशत्रूसी :
धर्मवीर ते ते हे ! ––पंचनदाचा
हा नृप जयपाल : नृप अनंगपाल हा :
हे पृथ्वीराज : संग हे: प्रताप हे :
हरपाल; श्रीगुरु गोविंद; वीर्यवान्
श्रीवंदा: शतशत हे हिंदु हुतात्मे
स्वप्राणा देति बळी ! ––परि न पडुं बळी
देति हिंदु राष्ट्राचा प्राण : अपेक्षा :
क्षमता प्रतिशोधाची ! ! ! सकल वीर हे---

सर्व राजपुरुष---

पूर्वज तव तुज अम्हि--अभिनंदितसों, हे
हिंदु--वंश--भूषण नरवीर माधवा !
धर्मशत्रु विजयांचें, स्वापजयांचें
शल्य सात शतकें जें सलत राहिलें
हृदयिं आमुच्या सतत स्वर्गिही, अहा
तें नूं अुपटूनि अजी काढिसी पहा !
मुसलमीन सत्तेच्या छाटूनी शिरा
करिशी आसिंधुसिंधु हिंदुमय धरा !
अभिनंदन ! अभिनंदन ! तव धुरंदर ! !

(तोंच राजपुरुषांच्या मधोमध वर सदाशिवराव भाअू प्रकटून--)
(सा....१४)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाअू:--- प्रेमाशीर्वाद आणि आमुचे तुला !
पानपताचा अुगवुनि सूड, तर्पूनी
रिपुरुधिरें हिंदु हुतात्म्यांसि, करिसि गा
अुचित तीच पितरांची अुत्तरक्रिया ! !

माधवः--- कोण ? अहा भाअू हे ! प्रबळ विक्रम
अपर कार्तिकेयासम समरिं तळपता
हिंदु राष्ट्रसेनानी पानपतीचा !
(सर्व अदृश्य होअूं लागतात)
जाअूं नका ! काका ! क्षण मारुनीं मिठी
भेट आपुली----

भाअू:-- घडेल स्वर्गि ! शीघ्रची ! !

(राजपुरुष अंतर्धानतात.)

पडदा पडतो

✠ ✠ ✠

[अुत्तरक्रिया : (मराठी) नाटक. मराठ्यांनीं दिल्लीवर पुन्हां वर्चस्व स्थापून पानिपतचा सूड कसा अुगविला याविषयीं. १९३४ प्रकाशित. मूल्य १ रुपया.]

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आत्मवृत्त : : १६

✠ ✠ ✠

[स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं 'आत्मवृत्त' लिहावें अशी अनेकांची अिच्छा आहे. स्वतः वीर सावरकरहि वयोवृद्ध नेत्यांना आत्मचरित्र लिहिण्याची विनंति करतात हें आम्हांस ठाअूक आहे.

वीर सावरकरांच्या चरित्राचे (१) पूर्वपिठीका, (२) नाशिक, (३) पुणें, (४) लंडन, (५) अंदमान, (६) रत्नागिरी, (७) हिंदुमहासभा कार्य आणि (८) नंतर असे साधारणतः आठ खंड कल्पिले तर त्यांपैकीं पूर्वपिठीका, नाशिक आणि अंदमान हे तीन आत्मवृत्तांचे खंड प्रसिद्ध झालेले आहेत. त्याची ही प्रस्तावना आहे. परमेश्वर वीर सावरकरांना त्यांचें आत्मचरित्र लिहून पुरें करण्याचें सामर्थ्य देवो हीच प्रार्थना.]

✠ ✠ ✠

लिहूं कां ?

लिहूं का ? हे जे सगळे अिष्टमित्र आणि देशबंधू सांगताहेत आणि माझें मनहि मधूनमधून जें लिहिण्याचा लकडा माझ्यामागें लावीत असतें, त्या माझ्या आठवणी, ती माझी जीवनस्मृति लिहून टाकूं का अेकदांची ?

मनुष्यास किंवा समाजास स्मृति ही अुपयुक्त असतेच असते. पण वास्तविक पाहतां स्मृतीप्रमाणें विस्मृति हीहि देवाची अेक देणगीच आहे. मनुष्यास किंवा समाजास कांहीं आठवणी स्मरत राहण्यापेक्षां विसरणेंच हितावह असतें. कित्येकांना या जन्माच्या आठवणी स्मरून पुरेसें न वाटल्यामुळें ते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर्वजन्माच्या आठवणीहि स्मराव्या म्हणून योगसिद्धि साधण्यांत गर्क झालेले असतात. परंतु खरें पाहतां नुसत्या ह्या जन्मांतील झाडून साऱ्या आठवणी जरी आपल्याला सारख्या आठवत राहिल्या, तरी देखील तो बोजा झेपणें संज्ञ मनास (conscious mind) दुःसह झाल्याविना राहणार नाहीं. मग असंज्ञ मनाच्या (subconscious mind) सात वा सत्तर पूर्वजन्मांच्या स्मृति जर सतत दाटी करीत राहिल्या तर प्राणांचा कोण कोंडमारा होईल! त्या सत्तर जन्मांतील सत्तर सख्या आयांचे लाड, सावत्र आयांचे चोर-चिमटे, खेळांतील वा संसारांतील भंगलेल्या भातुकली वा हरवलेल्या बाहुल्या, पंतोजीच्या छड्या, डसलेले विंचू, फसलेल्या आशा, ते रोग, ते भोग, ते अपमान, ते मनोभंग, ती चिडचीड, त्या आठवणी पुनः पुन्हां आठवणें, विगत दुःखांचा कोळसा सारखा अुगाळीत बसणें!! अुपलब्ध साहित्यांत आपल्या पूर्वजन्माच्या थोड्याबहुत जीवनस्मृति बुद्ध भगवानानें सांगितल्या तशा टिपून ठेवल्या आहेत. तेवढ्या त्या त्रोटक जातकांचाच केवढा विस्तार झाला आहे! मग जर बुद्ध भगवानांकरवीं आपल्या यच्चयावत् पूर्वजन्माच्या आठवणी तशाच सांगण्याची नि लिहून ठेवविण्याची कृपा करण्यांत आली असती, तर त्या ग्रंथास या अुभ्या पृथ्वीचेंच अेक ग्रंथालय केलें असतें तरीहि तें सामावण्यास समर्थ होतें ना! कारण कोणाच्याहि पूर्वजन्मांची संख्या अगण्य असल्यामुळें त्याच्या आठवणीचे खंडहि असंख्यच असणार!!

ही गोष्ट झाली अेका बुद्ध भगवानाची. पण जर का जन्मास आलेल्या प्रत्येक मनुष्यास, आमच्या कांहीं थिऑसॉफिस्ट मित्रांना आठवल्याशा वाटतात, तशा जन्मजन्मांतरींच्या झाडून सगळ्या स्मृति आठवूं लागल्या आणि दुर्दवानें तो प्रत्येकजण त्या लिहून प्रसिद्ध करण्याच्या मोहासहि बळी पडत गेला, तर मनुष्यजातीच्या नुसत्या या पिढीच्या सरासरी १५० कोटि लोकांचीं तीं प्रत्येकीं असंख्य जातकें!—त्यांच्या वाचनाची तर गोष्टच दूर, पण त्यांच्या नुसत्या संख्येच्या कल्पनेनेंसुद्धां कोणासहि घेरी आल्यावांचून राहणार नाहीं. पौराणिक परंपरेनें बोलायचें तर, रक्तबीज राक्षसाप्रमाणें कालाच्या शरिरांतून जो जो क्षणाचा रक्तबिंदु गळतो, त्यांतून त्यांतून आठवणींचा अेक नवा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवा राक्षस अुत्पन्न होतो. पौराणिक परिभाषेंत बोलायचें तर, स्मृतीच्या याच अत्याचारापासून ह्या लोकांचें परित्राण करण्यासाठीं तो क्षणाचा रक्तबिंदु पडतांपडतांच गिळून नाहींसा करणाऱ्या देवी विस्मृतीचा अवतार झाला म्हणून बरें ! खरोखर स्मृतीप्रमाणें विस्मृति हीहि देवाची देणगीच आहे.

प्राचीन अितिहास म्हणजेच समाजाच्या ज्या जन्मार्जित आठवणी, त्यांची गोष्ट अशीच आहे. प्राचीन अितिहास सांपडत नाहीं, म्हणून आपणास केव्हां केव्हां फार तळमळ लागते. अितिहास कसा वाचावा ह्याचा विवेक जोंवर कळला नाहीं तोंवर, अेका अर्थी आपणांस त्यांतील कांहीं भागांचें साफ विस्मरण पडलें आहे हेंहि बरेंच नाहीं का? कारण आज रावणाची लंका कोणची हें जर अैतिहासिक निश्चिततेनें सांगतां आलें, तर त्या देशांतील लोकांच्या मनांत आम्हां आर्यांविषयीं थोडाफार सरी द्वेष अुत्पन्न होअून नव्या भांडणास जुन्या भांडणाच्या सहाणेवर घासून धार लावली जाणारच नाहीं, असें कोण सांगू शकेल? ही अगदीं कल्पनाच नाहीं. त्याच रामायण कथेच्या स्मृतीमुळें आम्हीं आर्य अजूनपर्यंत माकडांचे लाड करतों; त्यांस प्रसंगीं माणसांनाहि सुखैनेव त्रास देअूं देतों; आतांच अेके ठिकाणीं घडलें, तसें माकडाला सोडविण्यासाठीं दंगा करून माणसांना देखील ठार मारतों; आणि अशा प्रकारें अेका अर्थी सुग्रीवहनुमतादिकांनीं रामचंद्राशीं केलेल्या पौराणिक संधीस अजूनपर्यंत पाळू पाहतों. अुत्तर ध्रुवावरून आर्य हिंदुस्थानांत आले ही अुपपत्ति अैकतांच स्वतःस अनार्य कल्पिणाऱ्यांनीं आजच्या तथाकथित आर्य मानल्या जाणाऱ्या जातींना 'पश्चात् हिंदु' लेखलें आणि आपणांस 'आदि द्रविड' 'आदी हिंदु' म्हणविण्यास आरंभ केलाच कीं नाहीं ! मग जर त्या प्राचीन काळाची माहिती पौराणिक सावळागोंधळाचें सोंग अुतरून आपल्या अगदीं खऱ्या अैतिहासिक स्वरूपांत प्रकट झाली आणि कोण मूळचा अनार्य, कोण आर्य, कोण असुर, कोण दनुज, कोण हूण, कोण शक, कोण द्रविड याची निर्भेळ वंशावळ घरोघर अकस्मात् प्रकट झाली, तर आज केवढा गोंधळ माजेल ! कित्येक ब्राह्मण जातीहि शुद्धीकृत 'शक' वा मघ ठरतील, क्षत्रिय हूण ठरतील ! सासरचे लोक आर्य तर माहेरचे नागवंशी वा पैशाच्च !

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'जें झालें तें झालें ! तें विसरून जाअूं या ! ! !' हें वाक्य मनापासून अुच्चारतांच आजवर किती तुटलेले स्नेह पुन्हां जुळले आहेत. किती अनुतप्त प्रणय पुन्हां अनुरक्त झालेले आहेत ! खरोखरच स्मृतीप्रमाणेंच विस्मृति हीहि देवाची अेक देणगीच आहे.

देवानें दिलेल्या या परस्पराविरुद्ध दोन्ही देणग्यांचा मनुष्यानें तारतम्यानें अुपयोग केला तर त्या दोन्हीहि त्याच्या जीवनास अुपयुक्त झाल्यावांचून राहत नाहींत. पण जर आपण सगळेचजण सर्वच काळ मागच्या गोष्टी आठवीत राहिलों, किंवा विसरत राहिलों, तर आपलें जीवन अधिक दुःसह किंबहुना असह्य होअून जाअील.

या तारतम्यानें पाहिलें असतां माझ्या आठवणी सार्वजनिक रीत्या ग्रथन करून ठेवणें सार्वजनिक हिताचें आहे का ? हा प्रश्न व्यक्तीपुरता नाहीं. कारण व्यक्तीला ज्या आठवणी सुखावह किंवा हितावह वाटतात, त्या ती व्यक्ति स्वतः-पुरती आठवीत राहण्यास, जोंवर त्यांचा दुसऱ्यांना कांहीं अुपसर्ग पोंचत नाहीं तोंवर तरी स्वतंत्र आहेच; तिनें आपल्यापुरत्या त्या आठविल्या काय नी न आठविल्या काय, त्याचा जनिक साहित्याशीं संबंध नाहीं. व्यक्तीपुरत्या ज्या आठवल्या जातात, त्या आठवणी सोडल्या तर कुटुंब, कुल वा वंश यांचा संबंध पोंचतो अशा आठवणींचा प्रश्न अुद्भवतो. चीन देशांत अशी रीत असल्याचें सांगतात कीं, प्रत्येक कुटुंबांत श्राद्धदिनासारख्या अेका संस्कारप्रसंगीं त्या कुळांतील अेका मृत व्यक्तीचा, आपल्या श्राद्धपद्धतीसारखा नुसता नामोच्चार करून न थांबतां तिच्या चरित्राची त्रोटक कथा वाचण्यांत येते आणि सर्व कुटुंब ती अैकतें. हें लिखाण म्हणजे कौटुंबिक अितिहास होत. परंतु त्यांतील बहुतेक भाग कुटुंबापुरताच महत्त्वाचा असल्यामुळें त्यांच्या छपाअीचा आणि वाचनाचा भाग जनिक साहित्याच्या वा वाचकवर्गाच्या बोकांडीं बसविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण अगदीं सर्वसाधारण जीवनक्रमांतील सहस्रावधि माणसांचीं चरित्रें बहुधा अेकठशीच असतात. जन्म, रोग, लग्न, मुलें, मृत्यु, त्यांविषयींच्या क्षुधा, शांति, भावभावना, सगळ्या ठराविकच. अशा अेकाच्या चरित्राची पोथी, म्हणजे विशेष नांवें तेवढीं बदललीं, तर तशा दुसऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणाच्याहि चरित्राची बहुतांशींची यथावत् प्रतच. अशीं चरित्रें कौटुंबिक हितार्थ कुटुंबापुरतीं राहोत, त्यांतील कांहींचा क्वचित् प्रसंगीं अनुवंशविज्ञानाच्या अभ्यासकांना कांहीं अुपयोग झाला तर होतो. अेवढाच त्यांचा जनिक अुपयोग.

वैयक्तिक व कौटुंबिक क्षेत्रापुरताच ज्यांचा असा व्याप असतो, त्यांची गोष्ट सोडली असतां ज्यांच्या जीवनाशीं अेखाद्या राष्ट्राचे, किंवा मनुष्यजातीच्याच जीवनाचे धागेदोरे निगडित झालेले असतात अशा सार्वजनिक व्यक्तींच्या चरित्राचा आणि आठवणींचा प्रश्न येतो. अशांचें जीवन म्हणजे लाखों व्यक्तींच्या जीवनाचें संकलित सारच असतें. केव्हां केव्हां तसें अेक जीवन म्हणजेच त्या अुभ्या पिढीचा अितिहास होतो. अशोक किंवा आल्फ्रेड दी ग्रेटचें चरित्र वगळलें तर त्या पिढीच्या अितिहासाचें तें पानचें पानच फाडून टाकवें लागेल. सर्वसाधारणत: असें म्हणतां येअील कीं ज्यांच्या जीवनाचा लोकजीवनावर कोणचा तरी परिणामकारक प्रभाव पडलेला आहे, अशांच्या स्मृति आणि अशांच्या आठवणी मात्र जनिक प्रसिद्धीस पात्र आणि जनिक हितार्थच चिरस्मरणीय ठरतात. यास्तव राष्ट्रांच्या आणि मानुषकांच्या सामाजिक साहित्यांत यथाप्रमाण स्थान प्राप्त होण्याचा त्यांना अधिकार आहे. अशा व्यक्तींपैकीं कांहींनीं जीवनस्मृति किंवा आत्मचरित्रें सार्वजनिक हितार्थ ग्रथित करून प्रसिद्ध केलीं तर लोकजिज्ञासेच्या आणि वाङ्मयाच्या सहनशीलतेचा अनुचित लाभ घेतल्याच्या दोषाचे ते भागी होणारे नसून अुलट आपल्या आकांक्षा आणि ध्येय, प्रयत्न आणि पराक्रम, न्यूनता आणि सांगता, यांच्या माहितीची ठेव पुढील पिढीच्या हितार्थ त्यांच्या हातीं सोंपवून देण्यांत ते त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचें शेवटचें श्रेयस्कर कर्तव्यच करीत असतात.

माझ्या आठवणी, जीवनस्मृति, या वरील तीन वर्गांपैकीं ह्या शेवटच्या वर्गांत पडत असतील तरच त्यांना वैयक्तिक मरणाबरोबर विस्मृतीच्या राखेंत नाहींशा न करतां जनिक स्मृतीच्या संग्रहालयांत राखून ठेवण्याचा यत्न करणें अुचित होणार आहे. मग त्या तशा ह्या वर्गांत पडताहेत का ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सासरचे लोक आर्य तर माहेरचे नागवंशी !

मनुष्यमात्राच्या मनास आपली कर्मकथा विशेषत: स्वत:च्या प्रौढीला अनुकूल असेल तेवढी तरी, भेटेल त्याला सांगत सुटण्याचा मोह सहसा आवरत नसतो. तो मोह शक्य तितक्या विवेकानें दाबून ठेवून, ममत्वशून्य दृष्टीनें मी माझ्या आत्मचरित्राचें तटस्थपणें जों जों समालोचन करतों, तों तों मला असें वाटतें कीं माझें जीवन त्याच्या अगदीं जाणत्या आरंभापासून भारतीय राष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाशीं संबद्ध झालेलें आहे. अितकेंच नव्हे, तर पुढेंपुढें त्या राष्ट्रीय जीवनाचा, तें माझें व्यक्तिजीवन अेक प्रमुख आणि परिणामकारक घटक होत आलें आहे. माझ्या गुरुस्थानीं असलेल्या वयस्क पिढींतील अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांचा माझ्याशीं संबंध आलेला असल्यानें, माझ्या समकालीन पिढींतील लक्षावधि तरुणांच्या आयुष्याची दिशा पालटून जावी, अितका त्यांच्यावर माझ्या मतांचा, प्रयत्नांचा आणि सहवासाचा अप्रत्यक्ष वा प्रत्यक्षपणें परिणाम झालेला असल्यानें आणि माझ्या आयुष्यांतील अनेक मोठमोठ्या राष्ट्रीय अुलाढालींत प्रमुख भाग घेण्याचा प्रसंग मजवर वारंवार येत गेल्यानें, माझ्या चरित्राचा बनाव आणि घडाव कसाकसा होत गेला याचा माझ्या तोंडचा वृत्तान्त हा त्या काळाच्या राष्ट्रीय अितिहासाच्या रचनेस अुपयुक्त झाल्यावांचून राहणार नाहीं. माझ्या आठवणी केवळ माझ्या अेकटयाचेंच चरित्र सांगणाऱ्या नसून अुभ्या दोनतीन पिढ्यांचें जीवन त्यांत प्रतिबिंबित होणारें आहे. आणखी असें कीं मीं सांगितली नाहीं तर बहुधा ज्यांच्या गुप्त पण अुत्कट राष्ट्रसेवेची आणि महनीय त्यागाची माहिती लोकांस कळणारी नाहीं, अशा अनेक लोकसेवक, त्यागी, शूर नि साधुपुरुषांच्या स्मृति प्रकटपणें सन्मानून त्यांच्याविषयींच्या कृतज्ञतेचें ऋण अंशत: तरी फेडण्यासहि या माझ्या आठवणी कारणीभूत होणाऱ्या आहेत. अितकेंच नव्हे, तर ज्या सशस्त्र क्रांतीच्या अत्यंत जाज्वल्य आणि भव्य अशा राष्ट्रीय भवितव्यतेच्या आंदोलनांतून माझा विशेषत्वेंकरून संबंध आलेला आहे त्या अुत्थानाच्या अितिहासाचाहि बराच अंश लोकांना अज्ञात आहे. बंगालच्या बऱ्याच देशभक्तांनीं त्यांचा त्यांच्यापुरता भाग जरी सांगून टाकला आहे, तरी बाकीचा कितीतरी भाग तज्ज्ञ असे कांहींजण सांगावयास अुरले नाहींत, कांहीं सांगूं शकले नाहींत. विपक्षीय शक्तीनें तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या सशस्त्र क्रांतिकारक अुत्थानाची आठवणदेखील मुळासकट नाहींशी व्हावी म्हणून तोंडदाबीचा विडाच अुचललेला ! अशा वेळीं त्या अितिहासावर माझ्या आठवणींनीं पाडवेल तितका प्रकाश पाडणें हें अेक राष्ट्रीय कर्तव्यदेखील अितकें अत्यजनीय आहे कीं केवळ तदर्थहि ह्या माझ्या आठवणी माझ्यासमवेत नष्ट होअूं देणें अनुचित होअील.

त्यांतहि माझें चरित्र मूलतःच अशा कांहीं आकस्मिक, कांहीं अद्भूत, कांहीं अुत्क्षोभक विद्युत् तंतूंनीं विणलेलें आहे आणि प्रकंपक सुखदुःखाच्या रंगावेरंगांनीं त्याची अशी सजावट झाली आहे कीं त्याच्या नुसत्या अुद्दीपक मनोवेधकपणासाठीं सुद्धां साहित्यांत त्याची भर टाकण्यास प्रत्यवाय नाहीं.

अशा रीतीनें ज्या अर्थीं माझ्या आठवणी या अेकदोन पिढ्यांना तरी अुद्बोधक आणि मनोवेधक वाटल्यावांचून राहाणार नाहींत त्या अर्थीं मी त्या लिहून काढण्याचें ठरवीत आहें. ह्या अेकदोन पिढ्यांनंतर जर जनिक साहित्यांत त्यांची अडगळ होअूं लागलीच, तर ती काढून टाकण्याचा प्रश्न काळ आपण होअूनच सोडवील. कारण व्यक्तीच्या आयुष्याला जशी काळाची मर्यादा असते, तशीच ती त्या व्यक्तीच्या मागें अुरणाऱ्या तिच्या जीवनस्मृतीच्या आयुष्यालाहि असतेच. व्यक्ति काय, व्यक्तिस्मृति काय, निर्जीव आणि निरुपयोगी जुन्याला नाहींसें करून पृथ्वीचा अवकाश नवीनाला नांदावयास काळ हा मोकळा करून देतच असतो !

सार्वजनिक अुपयुक्ततेस्तव आठवणी प्रसिद्ध करावयाच्या, तर त्या मनुष्याच्या जीवनांत जशा घडल्या आणि ज्या ज्या घडल्या त्या समग्र प्रसिद्ध करणें हेंच प्रामाणिक लेखकाचें कर्तव्य होय. केवळ लोकांत प्रौढी वाढेल तितकाच भाग प्रसिद्ध करणें हा मिथ्याचार; तें लोकप्रियतेचें दास्य, लोकहित-तत्परतेचे खरें गमक नव्हे. कारण मनुष्याचें अेकंदर शरीर हें त्याच्या सहज किंवा प्राप्त अशा सर्व रोगाभोगांच्या संक्लिष्ट संघर्षाचा ज्याप्रमाणें अुर्वरित परिणाम असतो त्याचप्रमाणें त्याचें प्रत्येक कृत्य हें त्याच्या तथाकथित गुणावगुणांच्या संक्लिष्ट संघर्षाचें, त्याच्या झाडून साऱ्या भावभावनांचें संमिश्र फलित असतें. कोणास वाटणाऱ्या त्याच्या गुणांच्या अुत्कर्षासच अितरांना

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटणाऱ्या त्याच्या अवगुणांचें सान्निध्य किंवा सहकार्यहि कारणीभूत झालेलें असतें. आणि त्याचे अवगुण त्याच्या गुणांच्या बीजांचीच क्वचित् अपरिहार्य अशीं आनुषंगिक रूपांतरें असतात. आपण ज्यास भूस म्हणून पाखडून टाकूं पाहातों, त्याच्या संरक्षणामुळेंच आपण ज्यास दाणे म्हणून टिपूं पाहातों त्यांची वाढ झालेली असते. टाकावू मळामातीचें खतहि गुलाबाच्या फुलांतील लोभनीय सौंदर्याचें आणि सुवासाचें अेक अपरिहार्य घटक असतें. जर आपणांस गुलाबाच्या फुलाच्या विकासाचें समग्र रहस्य समजून घ्यायचें असेल, तर त्यांत मुळापासून कळीपर्यंत खतमाती, पालापाचोळा, कुसळकांटे त्याचें अंगप्रत्यंग असलेलीं हीं सर्व आनुषंगिक अुत्पादितेंहि विचारांत घेतलीं पाहिजेत. त्याची माहिती आणि महत्त्वहि जाणलें पाहिजे. त्याप्रमाणें मनुष्याच्या घडावाचीहि गोष्ट आहे.त्या घडावाची घडण कशी होत गेली हें जर खरोखर समजून घ्यायचें असेल,तर त्यांच्या लोकांस थोर वाटणाऱ्या किंवा अुचित भासणाऱ्या जीवनस्मृतीच प्रसिद्ध करून भागावयाचें नाहीं, तर तो जसा होता तशाचा तसाच नखशिखान्त आपल्यापुढें अुभा केला पाहिजे. छायाचित्रकारांत अुत्तम तोच कीं जो, मनुष्य असेल तशीच त्याची छाया घेतो, न अधिक सरस न अधिक नीरस. म्हणूनच क्रॉम्वेलनें आपल्या चित्रकारास निक्षून सांगितलें कीं 'मी आहें तसा काढ, अेक सुरकुती देखील सोडूं नकोस!' कारण सूक्ष्मतः पाहिलें असतां क्रॉम्वेलच्या घडणींत नी करणींत त्याच्या तजेल्याप्रमाणेंच त्याच्या सुरकुत्यांचेंहि अंग होतें.

आत्मवृत्त सांगणारास त्याचें समग्र चरित्र, आपणास वा लोकांस आवडतो तो तोच भाग नव्हे तर साऱ्या सांगण्यासारख्या बऱ्यावाअीट आठवणी यथावत् सांगणें हेंच जरी वरील कारणासाठीं शास्त्रतः आणि तत्त्वतः अुचित असलें, तरी आजवर ज्या ज्या थोर पुरुषांनीं आपलीं चरित्रें सांगितलीं, त्यांना हा नियम यथावत् पाळणें केव्हां शक्य झालें नाहीं, केव्हां अिष्टहि वाटलें नाहीं. कारण सत्य हें परिस्थितीनें असेंच सापेक्षत्व पावतें, मर्यादित होतें. आमची आवड आमच्या लोकजीवनाशीं संबद्ध असलेल्या आणि म्हणूनच सांगण्यासारख्या बऱ्यावाअीट आठवणी निःसंकोचपणें आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्भयपणें जशाच्या तशा सांगून टाकण्याची असतांहि, ज्या समाजस्थितींत आणि विशेषत: राजकीय परिस्थितींत आम्हांस हें आत्मचरित्र लिहावें लागत आहे, त्यामुळें आम्हांसहि ती आमची आवड अंशत: तरी बाजूस ठेवावी लागणार आहे. त्याचें अेक कारण अुघडच आहे कीं आमच्याशीं ज्या व्यक्तींचा संबंध आला आहे, त्यांच्या अनुमतिवांचून त्यांच्या त्या त्या संबंधांची परिस्फुटता करणें हा त्यांच्याशीं केव्हां केव्हां अगदीं विश्वासघात केल्यासारखें होणारें आहे. दुष्ट दुर्जन सज्जनांच्या प्रामाणिक सत्याचाहि दुरुपयोग करण्यास जोंवर कचरत नाहींत, तोंवर सत्याला व्यवहाराची बेडी तोडून स्वतंत्रपणें नांदतां येणें असेंच दुर्घट होणार. अशा पेंचांत आम्ही ह्या आमच्या आठवणी लिहिण्याच्या आधीं अितकीच प्रतिज्ञा करूं शकतों कीं आम्ही ज्या सांगूं त्या आठवणी तरी जशा आठवतात तशाच सांगूं; केवळ लोकच्छंदानुवर्तित्वास्तव त्यांत नसती रंगरंगोटी करणार नाहीं. स्पष्ट आठवत असलेल्या आठवणींतून कधीं कधीं अस्पष्टस्मृत किंवा अगदीं अस्मृत आठवणीहि सर्वांनाच जशा गृहीत धराव्या लागतात त्या आम्हींहि गृहित धरूं, आणि ज्या आज सांगतां येत नाहींत, त्या सांगण्यासारख्या महत्त्वाच्या किंवा मनोवेधक आठवणींवरील गुप्ततेचा पडदाहि शक्य झालें तर पुढें मागें दुसऱ्या अेखाद्या प्रसंगीं दूर सारूं.

✠ ✠ ✠

अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना (सन १८८५)

✠ ✠ ✠

[हे अुतारे 'आत्मवृत्त पुर्वपीठिका' ह्या पुस्तकांतून घेतले आहेत. आज आपल्या हिंदुस्थानांत जो पक्ष सत्ताधारी आहे त्याच्या जन्माची कथा वीर सावरकरांच्या दृष्टिकोनांतून येथें आपणांस वाचतां येअील.]

✠ ✠ ✠

अिंग्रजी कूटनीतिज्ञांच्या योजनेनुरूप रंगभूमीची सारी सजावट पूर्ण होतांच सन १८८५ मध्यें 'अिंडियन नॅशनल कॉंग्रेस' चें पहिलें अधिवेशन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबअी येथें भरलें. अध्यक्षस्थानीं बंगालचे व्योमेशचंद्रन बानर्जी यांची योजना झाली होती. प्रारंभींच भारताची सम्राज्ञी राणी व्हिक्टोरिया यांच्याविषयींची असीम नि अव्यभिचारी राजनिष्ठा प्रतिज्ञापूर्वक प्रदर्शविण्यांत आली. We pledge our unstinted and unswerving Loyalty to Her Majesty the Queen Victoria, The Empress of India ह्या पहिल्या अधिवेशनापासून तों पुढें अनेक वर्षेपर्यंत हा राजनिष्ठेचा श्रीगणेशायनम: म्हटल्यावांचून कॉंग्रेसची पोथी पुढें वाचतांच येत नसे. जसा आरंभ तसाच ह्या पहिल्या अधिवेशनाचा अंतहि राजनिष्ठेच्याच नव्हे तर ह्यूमसाहेबांच्याहि जयजयकारांत झाला. “अशा अखिल भारतीय महासभेला जन्म देण्यांत नि त्यांतहि पूर्वी सरकारचा अेक अुच्चपदस्थ अधिकारी असतांहि तिचें पुढारीपण स्वत: स्वीकारण्यांत ह्यूमसाहेबांनीं जें धाडस नी न्यायप्रियता दाखविली आणि हिंदी लोकांवर जे अुपकार केले त्या विषयींची कृतज्ञता व्यक्तविण्यासाठीं” त्या मंडपांत जमलेल्या हिंदी प्रतिनिधींनीं नी प्रेक्षकांनीं ह्यूमच्या जयजयकारांनीं (Three cheers for Hume नीं) तेथील टीचभर आकाश दुमदुमवून सोडलें. पण ह्यूमसाहेब लगोलग अुभे राहून आज्ञापिते झाले, 'हं, आतां शेवटीं तीनदांच नव्हे तर तीनदांच्या तिप्पटदां नी शक्य तर त्याच्याहि तिप्पटदां (Three times three and if possible three times that) होअूं द्यात हिंदसम्राज्ञी व्हिक्टोरियांचे जयजयकार!!' तसे ते झालेहि. पुढें कित्येक वर्षेपर्यंत प्रत्येक कॉंग्रेस अधिवेशनाच्या शेवटीं हा हिंदसम्राज्ञीचा वा सम्राटाचा जयजयकार प्रतिनिधि प्रेक्षकांचा कंठ कोरडा पडेतों तसाच दुमदुमत राही !

केव्हां केव्हां अशा जयजयकारांनीं कॉंग्रेसमधील ह्या राजनिष्ठ देशभक्तांना होणाऱ्या कंठशोषाच्या अुपशमार्थ कोणी कनवाळू व्हॉअिसरॉय वा गव्हर्नर त्यांना थंडगार पेयेंहि पाजी. कॉंग्रेसचें दुसरें अधिवेशन कलकत्त्यास भरलें असतां स्वत: व्हॉअिसरायनें, लॉर्ड डफरिननें, कॉंग्रेसच्या सर्व प्रतिनिधींना सन्मान्य पाहुणे म्हणून आमंत्रून अेक थाटाचा अुद्यानोपहार दिला होता. त्यानंतर भरलेल्या मद्रास येथील अधिवेशनाच्या प्रसंगीं मद्रासच्या अिंग्रजी गव्हर्नरनेंहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काँग्रेस प्रतिनिधींना असाच अेक अुद्यानोपहार देअून स्वागतिलें होतें.

ह्यूमसाहेब काँग्रेसचे अधिकार्यवाह (जनरल सेक्रेटरी) नेमले गेले. हिंदुस्थानवर मोठमोठ्या अधिकारपदांवरून ज्यांनीं ब्रिटिशसत्ता गाजविली होती नि नंतर जे सेवानिवृत्त झाले होते त्या ह्यूम, वेडर्बर्न साहेबांसारख्या अँग्लोअिंडियनांना शक्य तेव्हां तेव्हां काँग्रेसचें अध्यक्षपदहि देण्यांत येअी. हिंदुस्थानच्या तिजोरींतून नुसते लक्षावधि रुपये नुसत्या भृतिवारी (पेन्शनवारी) गिळंकृत करणाऱ्या ह्या अँग्लो-अिंडियन वर्गांतील हे वरील अध्यक्ष काँग्रेसच्या वाक्पीठावरून भाषणें देतां देतां जेव्हां हिंदुस्थानांतील दीन, दरिद्री नि दुष्काळग्रस्त जनतेच्या करुणेनें कासावीस होत तेव्हां अभिनय करावा तर असा असें म्हणत कसलेल्या नटांनीं सुद्धां तोंडांत बोटें घातलीं असतीं.

हळूहळू काँग्रेसहि कांहीं मागण्या करूं लागली. हिंदी लोकांना सरकारी सेवा-विभागांतील अुच्च अधिकारीपदांवर अधिक प्रमाणांत नेमलें जावें, कांहीं कर अुणे करावे, सरकारी समादेशक मंडळांत (सल्लागार कमिट्यांत) थोड्या प्रमाणांत कां होअीना पण हिंदी गृहस्थ नेमले जावे, हळूहळू विधिमंडळांचा अगदी मर्यादित प्रमाणांत कां होअीना पण अुपक्रम व्हावा, त्यामध्यें दोनचार प्रतिनिधि कां होअीनात पण निवडून धाडण्याचा अधिकार जनतेंतील अुच्च थरांना तरी मिळावा अशा अगदीं सेवाभावाच्या त्या मागण्या असत. अशा मागण्या काँग्रेसनें मागाव्या नि त्यांतीलहि अगदीं निरुपद्रवी त्या मोठ्या गाजावाजानें ब्रिटिश शासनानें पुरवाव्या हेंच ब्रिटिश कूटनीतिज्ञांचें धोरण होतें हें वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें ह्या मागण्यांस पाठिंबा देतांना हिंदी पुढारी सरकारवर जी थोडीफार टीका करीत तिच्यापेक्षांहि कडक भाषेंत ह्या ह्यूम, वेडर्बर्न प्रभृति ‘ हिंदुस्थानच्या हितचिंतकांनी ’ हिंदुस्थान सरकारवर टीका करावी. ती अैकून त्या आमच्या भोळ्याभाबड्या ब्रिटिशनिष्ठ पिढीला वाटावें कीं ह्या आमच्या अुदारधी अँग्लो-अिंडियन पुढाऱ्यांनीं केवळ हिंदुस्थानच्या हितार्थच ही काँग्रेस काढली ह्यांत कांहींच शंका नाहीं. बिचारे आमच्यासाठीं त्यांच्या स्वतःच्या अिंग्रजी देशबांधवांशीं नि त्यांच्याच अिंग्रजी शासनाशींहि किती कडकपणें भांडताहेत!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण काँग्रेस कां काढली त्याचें गुपितहि सांगण्याचे अनिवार्य प्रसंग ह्या अिंग्रज कूटनीतिज्ञ पक्षीयांवर केंव्हां केंव्हां येतच होते. अेकदोन अुदाहरणेंच देअूं. काँग्रेसमधून भीत भीत होणारी सरकारवरची हिंदी पुढाऱ्यांची टीका नि त्यांच्या अगदी क्षुल्लक मागण्याहि ज्यांना अिंग्रजी सत्तेची अप्रतिष्ठा करणाऱ्या वाटत असाहि अेक अिंग्रजी तिस्मारखांचा सोटेशाही पक्ष असे. त्याचे अेक पुढारी सर आक्लंड ह्यांनीं, काँग्रेससारखी खोडसाळ संस्था काढून ब्रिटिश सरकारचा हिंदी लोकांवरील दबदबा नाहींसा करण्याचें नी हिंदी लोकांत असंतोषाचें वीं रुजविण्याचें ब्रिटिशहितघातक कृत्य केल्याविषयीं ह्यूमप्रभृतींवर सडकून टीका केली तेव्हां ह्यूमसाहेबांनीं खालील अुत्तर दिलें असें वेडर्बर्न ह्यूमच्या चरित्रांत लिहितात :

" There was no cause for fearing political danger from the Congress. . . . It is the British Government which has let loose forces which unless wisely guided and controlled must sooner or later involve consequences which are too dangerous to contemplate. And it is to limit and control them and direct them when there is yet time to do so . . . that this Congress movement designed. "

या छद्मी वाक्यांचा सरळ अर्थ अेवढाच कीं हिंदुस्थानांत जी सशस्त्र क्रांतीची प्रवृत्ति वाढूं लागली होती तिला जर हा कांग्रेसचा, ब्रिटिशनिष्ठेचा, पायबंद वेळींच घातला नसता तर सत्तावनच्या सशस्त्र युद्धासारखें अेखादें भयकर संकट अिंग्रजी राज्यावर पुन्हां कोसळतें. तशा सशस्त्र क्रांतिवादापासून हिंदी लोकांना परावृत्त करावें म्हणून तर हें कांग्रेसचें मायाजाल पसरावें लागलें. त्या काँग्रेसपासून ब्रिटिश सांम्राज्याला कसली भीति असणार ! अुलट ह्यूम म्हणतात कीं ' It is necessary for the safety of the State.' ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांत सुरक्षित राखण्यासाठींच तिची आवश्यकता आहे !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंग्लिशांना खरी भीति सशस्त्र क्रांतिकारकांची वाटे !
काँग्रेसची नव्हे !

हेंच विधेय ब्रिटिश लोकांच्या मनावर ठसविण्यासाठी ह्या ' हिंदुस्थानच्या हितचिंतकांच्या ' कोटिक्रमांत त्या काळीं अेक अर्थपूर्ण अुपमाहि रुळलेली असे. सारा आडपडदा दूर करून जेव्हां त्यांच्या हेतूचें खरें स्वरूप त्यांना अुघडें करून सांगावेंच लागे तेव्हां ते चक्क म्हणत, ' अहो बाष्पयंत्रांत वाफ जर सारखी कोंडीतच राहिलांत तर केव्हां ना केव्हां तरी तिचा स्फोट होअून त्या यंत्राचे तुकडे अुडल्यावांचून राहतील का ? तसें होअू नये म्हणून आपण अतिरेकी वाफेला बेताबातानें बाहेर सोडण्यासाठीं बाष्पयंत्राला अेक सुरक्षाछिद्र, अेक safety valve ठेवित असतों नाहीं का ? ब्रिटिश राज्य-यंत्रांची गोष्ट तशीच आहे. परकीय राज्यकर्त्याविरुद्ध वाढणाऱ्या असंतोषाचा जर दडपशाहीनें सारखा कोंडमारा करीत राहिलांत तर त्याच्या क्रांतिकारक स्फोटासरशीं त्या राज्ययंत्राचे तुकडे केव्हां अुडतील याचा नेम नसतो. तसें न व्हावें म्हणून त्या असंतोषाला वाचा फोडली पाहिजे. बेताबेतानें, बोलून बोलून, त्या असंतोषाला ओसरून जाण्यासाठीं अेक सांडवाट, अेक बाष्पछिद्र ठेवलें पाहिजे. तें सुरक्षाछिद्र, तें safety valve म्हणजेच आम्हीं काढलेली ही ' अिंडियन नॅशनल काँग्रेस ' होय !'

अेकीकडे हिंदी लोकांना सांगायचें कीं हिंदी लोकांच्या हितास्तवच काय ती आम्हीं काँग्रेस काढली आहे. आणि दुसरीकडे ब्रिटिश लोकांना सांगायचें कीं हिंदुस्थानविषयीं ब्रिटिशांची राजसत्ता अबाधितपणें चिरकाल टिकावी याच मुख्य हेतूनें आम्हीं काँग्रेस काढली आहे. असा हा ह्यूमप्रभृति लोकांचा दुतोंडीपणा पाहतांच काँग्रेसमधील हिंदी देशभक्त चिडून गेले कीं काय ? छे छे ! त्या विसंगतींत त्यांना झोंबण्यासारखें नव्हतेंच मुळीं कांहीं. ब्रिटिशांचें राज्य हिंदुस्थानावर अकुंठपणें चिरकाल नांदावें कारण त्यांतच हिंदुस्थानचें कोटकल्याण झालें आहे, होत आहे, होणार आहे ही त्या कांग्रेसी हिंदी देशभक्तांची स्वतःचीच निष्ठा होती. अर्थात् ब्रिटिशसत्ता बळकट करणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नि हिंदुस्थानचें कल्याण करणें ह्या अेकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या, अेकाच अर्थाचीं दोन वाक्ये होतीं. तेव्हां ह्यूमनें ब्रिटिश सत्तेच्या बळकटीसाठीं काँग्रेस काढली असें म्हटलें तरी ती हिंदी लोकांच्या हितार्थ काढली असेंच म्हटल्यासारखें होतें, आणि हिंदी लोकांच्या हितार्थ काढली असें म्हटलें तरी ब्रिटिश सत्तेच्या बळकटीसाठीं काढली असेंच म्हणण्यासारखें होतें. अशा भोंगळसुती वृत्तीच्या त्या काँग्रेसमधील ब्रिटिशनिष्ठ हिंदी देशभक्तांना ह्यूम प्रभृति ब्रिटिश पुढाऱ्यांच्या दुतोंडी वक्तव्यांतील हा परस्पर विरोध झोंबत तर नसेल पण अुलट तो विरोध हा विरोधाभास अलंकाराचें अेक अुदाहरणच आहेसें वाटे.

पण ह्यूम मात्र आपल्या ह्या अंध भक्तांच्यासुद्धां कधीं आहारीं जात नसे. काँग्रेसमधल्या ठरावांतून ब्रिटिश हिताविरुद्ध चुकूनसुद्धां त्यांच्यापैकीं कोणी ब्र जरी काढला तरी ह्यूमप्रभृतींनीं त्याला पायबंद घातलाच म्हणून समजावें. काँग्रेसच्या तिसऱ्या-चवथ्या अधिवेशनांतच—बहुधा मद्रासच्या हिंदी प्रतिनिधींनीं आग्रह धरला कीं हिंदुस्थानला ज्या निर्बंधान्वयें निःशस्त्र करण्यांत आलें होतें तो शस्त्रनिर्बंध (Arms Act) रहित करावा आणि अँग्लो-अिंडियनांप्रमाणेंच हिंदी लोकांनाहि शस्त्रें बाळगण्याची अनुज्ञा असावी. पण हा बेत पाहतांच ह्यूमसाहेबांचें पित्त खवळून गेलें. त्या भरांत आपली नेहमींची "हिंदुस्थानच्या हितचिंतकांची" नाटकी भूमिका विसरून त्यानी काँग्रेसला खडखडीतपणें बजावलें कीं, "सत्तावनच्या काळचाकुट्ट संकटाचा अनुभव ज्यांनी घेतलेला आहे असा कोणताहि ब्रिटिश मनुष्य हिंदी लोकांच्या हातीं पुन्हां शस्त्रें देण्यास धजणार नाहीं, मान्य होणार नाहीं ! कांग्रेसनें आपली मर्यादा संभाळून बोलावें. असले दायित्वशून्य ठराव आणण्याचा धोका पत्करूं नये !" ह्यूमनें मनांतून सत्तावनचा केवढा धसका खाल्ला होता तें तो रागाच्या भरांत असें चारजणांत बोलून गेला ! त्याचे अितर सागेलागे अँग्लो-अिंडियन फणकारून म्हणाले, "ब्रिटनसारख्या परमशक्तिशाली राष्ट्रानें तुमच्या हिंदुस्थानचें सर्व शत्रूंपासून संरक्षण करण्याचें कंकण बांधलें असतां आणि अंतर्गत शांतता नि सुव्यवस्था

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राखण्याचें अभिवचन प्रत्यक्ष महाराणीच्या घोषणेंत, त्या हिंदी 'माग्ना-चार्टांत' दिलें असतां तुम्हांला शस्त्रें मुळीं हवींतच कशाला ! " त्यांच्या या रागीट प्रश्नास समुचित अुत्तर देणारा अेखादा वासुदेव बळवंत हवा होता. पण ह्यूमच्या कॉंग्रेसमध्यें तसला असभ्य मनुष्य कुठला असणार. जो सभ्य तोच काय तो तिचा सभासद होणार. त्या सभ्य सभासदांतील बहुतेकांनीं 'हिंदुस्थानची हितचिंतक' अशी ही अँग्लोअिंडियन मंडळी रागावलेली पाहातांच त्यांच्या त्या 'तुम्हांला शस्त्रें मुळांत हवींतच कशाला ?' या आरोपगर्भ प्रश्नासरशीं जीं गांगरलेलीं अुत्तरें दिलीं त्यांचा सारांश अेवढाच. 'शस्त्रें कशाला हवींत? अहो नुसतीं आपलीं वाघरूंपासून गुरेंढोरें, रानडुकरांपासून शेतीभाती, चोरदरोडेखोरांपासून घरदार रक्षण्यासाठींच काय तीं ! नाहींतर आम्हांला हो काय करायचीं तीं शस्त्रें न् विस्त्रें ! ' दोघातिघांनीं जीं टणक म्हणून अुत्तरें दिलीं तीं तरी किती लिबलिबीत ! म्हणे 'महाराणीच्या घोषणेप्रमाणें ब्रिटिश साम्राज्याचे आम्होहि निष्ठावंत नागरिक आहोंत आणि शस्त्र बाळगणें हा निष्ठावंत नागरिकांचा अेक प्राथमिक अधिकार आहे ! '

हिंदी माग्नाचार्टावरील भरमसाट भाष्यें

सत्तावनच्या क्रांतियुद्धांनंतर काढलेल्या राणीच्या घोषणापत्रकांत अशी कांहीं दोनचार आश्वासक वाक्यें होतीं कीं व्हिक्टोरिया महाराणीनें आतां हिंदुस्थानचा सारा राज्यकारभार अीस्ट अिंडिया कंपनीचें विसर्जन करून ज्या अर्थीं आपल्या हातीं घेतला आहे त्या अर्थीं ह्यापुढें तिच्या सर्व प्रजेला समसमानतेनें वागविलें जाअील, संरक्षिलें जाअील

या वाक्यावर कॉंग्रेसमधील अिंग्रजी कूटनीतिज्ञांनीं आणि आमच्या ब्रिटिशनिष्ठ हिंदी देशभक्तांनीं केलेल्या अेकाहून अेक वरचढ भाष्यांनीं त्या काळचीं वृत्तपत्रें नि लिखाणें भरलेलीं आहेत. त्यांची तर्कप्रणाली संक्षेपतः अशी असे: ज्या अर्थीं ब्रिटन आणि हिंदुस्थान यांची महाराणी अेकच आहे त्या अर्थीं तिचें साम्राज्य हें आम्हां दोघांचें समायिक साम्राज्य आहे. तें समा-

(सा...१५)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यिक साम्राज्य असल्यामुळें हिंदुस्थानवर परराज्य आहे असें मानणें वा समजणें हा मुळांतच अपसमज आहे. त्यांतहि महाराणीनें सत्तावननंतर काढलेल्या घोषणापत्रकांत हिंदुस्थानला दिलेल्या त्या ताम्रपटांत, तिच्या सर्व प्रजाजनांना समानतेनें वागविलें जाअील असें स्पष्ट अभिवचन दिलेलें आहे. अर्थात् नैर्बंधिक दृष्टीनें हिंदी प्रजाजनाला ब्रिटनचा मुख्य प्रधानसुद्धा होतां येअील—जसा ब्रिटीश प्रजाजन आमचा गव्हर्नर किंवा गव्हर्नर जनरल होअू शकतो. अतअेव आमचा प्रश्न हिंदुस्थानचें स्वराज्य किंवा स्वातंत्र्य मिळविण्याचा नाहीं—तें नैर्बंधिक दृष्टचा आम्हांस मिळालेलेंच आहे! -तर सोडवावयाचा प्रश्न आहे तो येवढाच कीं त्या निर्बंधान्वयें प्रत्यक्ष कार्यवाही व्हावी. महाराणीचे हिंदुस्थानांत येणारे कांहीं अधिकारी खाष्ट असतात. जो अुपद्रव होतो तो त्यांच्यामुळें. त्यांचें कपटी वर्तन महाराणीच्या आणि तिच्या मंत्रिमंडळाच्या कानावर घालण्यासाठीं विलायतेंत शिष्टमंडळें धाडणें, हिंदी लोक स्वतःचें राज्य चालविण्यास अजून योग्य नसल्यामुळें त्यांची योग्यता वाढविणें, आपली राजनिष्ठा अुत्कट नि अढळ ठेवणें आणि तिला कलंक लागेल असा सशस्त्र बंडाळीसारखा जघन्य राजद्रोही नि देशद्रोही अपराध देशांत कोणाकडूनहि घडल्यास त्याचें अधिकाऱ्यांकडून तत्काळ पारिपत्य करविणें हा नी अेवढाच आमचा मुख्य कार्यक्रम आहे. अेका वाक्यांत सांगायचें तर आमचा वाद हिंदुस्थानच्या आजच्या सेवकशाहीशीं—ब्युरॉक्रसीशीं-आहे; ब्रिटिश राजमुकुटाशीं नव्हे. सम्राज्ञीचे वा सम्राटाचे आम्हीं हिंदुस्थानवासी लोक अत्यंत राजनिष्ठ प्रजाजन आहों !

काँग्रेसच्या त्या काळच्या अधिवेशनांतून अेकाहून अेक वक्ता त्या राणीच्या घोषणापत्रकाचें तें चिटोरें घेअून, हात अुंच अुभारून गरजूं लागे हा पाहा आमचा माग्नाचार्टा ! तो देणारा कोणी गलबत्या नव्हे तर 'देवी श्री व्हिक्टोरिया सार्वभौमिनी' ! !

पण तें 'माग्नाचार्टाचें' चिठोरें लिहून देण्यास त्या ब्रिटिशांच्या महाराणीस कोणी भाग पाडलें ! काँग्रेसच्या या लाळघोटू लोचटपणानें? का त्या सत्तावनच्या सशस्त्र क्रांतियुद्धाच्या बिकट रणानें ? पण ह्या कार्यकारणाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुच्चारसुद्धां कोणी वक्ता करीना. बहुतेक हिंदी पुढाऱ्यांना त्यांतलें मर्मच कळत नसे, क्वचित् ती माहितीहि नसे. ज्यांना तें मर्म माहीत होतें ते काँग्रेस-मधील ह्यूमप्रभृति अँग्लो-अिंडियन पुढारी त्या प्रकरणीं मेणधुणेपणानें मूग गिळून बसत.

देशभक्त दादाभाअी नवरोजी यांची साक्ष

काँग्रेसमधल्या त्या वेळच्या प्रामाणिक देशभक्तांचे दादाभाअी नवरोजी हे मुकुटमणि होते. आपल्या पार्शी देशबंधूंना ही गोष्ट निःसंशयपणें भूषणावह आहे कीं त्यांच्या समाजांत त्या दोन पिढ्यांत हिंदुस्थानच्या हितासाठीं जन्मभर झटत राहणारे दादाभाअी नवरोजी, फेरोजशहा मेथा, वाच्छा यांच्या-सारखे प्रामाणिक, कर्तृत्वशाली नि थोर थोर देशभक्त होअून गेले. आम्हीं वर जी हिंदुस्थानांतील त्या वेळच्या वातावरणाची नि विशेषतः काँग्रेसच्या ब्रिटिशनिष्ठ मनोवृत्तीची रूपरेखा अंकिली आहे तिची वास्तवता पटविण्या-साठीं ह्या दादाभाअी नवरोजींसारख्या थोर देशभक्ताचीच साक्ष काढली कीं पुरे. दादाभाअी त्यावेळीं ' राष्ट्रपितामह ' ही त्यांना पुढें मिळणारी यथो-चित पदवी पावलेले नव्हते. त्यांना ब्रिटिशनिष्ठेचीं कटुफळें चाखण्याअितकें वयोवृद्ध नि ज्ञानवृद्धहि अजून व्हावयाचें होतें; तथापि काँग्रेस निघाली तेव्हां-पासूनच अेक लोकप्रिय पुढारी म्हणून ते हिंदुस्थानभर मान्यता पावले होते. पुढें सन १८९३ मध्यें लाहोर येथील काँग्रेसच्या अध्यक्षत्वाचा मानहि त्यांना मिळाला. त्या अध्यक्षपदावरून दिलेल्या वक्तृत्वपूर्ण भाषणांत देशभक्त दादा-भाअी नवरोजी म्हणाले :—

"Our faith in the instinctive love of justice and fairplay of the people of the United Kingdom is not misplaced. ...I for one have not the shadow of doubt in dealing with such justice-loving and fair-minded people as the British. We may rest fully assured that we shall not work in vain. It is this conviction which has supported me against the difficulties. I have never faltered

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

in my faith in the British character and have always believed that the time will come when the sentiments of the British nation our Glorious Sovereign proclaimed to us in our Great Charter of the Proclamation of 1858 will be realized."

याचा भावार्थ असा कीं "ब्रिटिश लोकांच्या अुपजत न्यायबुद्धीवर नि सद्वर्तनावर आम्हीं जी निष्ठा ठेवीत आहों ती अस्थानीं नाहीं. माझ्या पुरतें तरी मी सांगूं शकतों कीं ब्रिटिशांसारख्या न्यायप्रिय नि सच्छील लोकांशीं वागण्यांत मला कसलीहि शंका वाटत नाहीं. अशा निष्ठेनें आपण जें कार्य करीत आहोंत तें कार्य विफल होणार नाहीं अशी निश्चिति बाळगा. ह्या निश्चितीनेंच सर्व अडचणींमध्यें मला आधार दिलेला आहे. ब्रिटिशांच्या शीलावरील माझा विश्वास कधींहि ढळला नाहीं. मला असा विश्वास सदोदित वाटत आला आहे कीं असा अेक दिवस अुजाडेल कीं ज्या दिवशीं १८५८ च्या घोषणापत्रांत, त्या आम्हांस दिल्या गेलेल्या महान् ताम्रपटांत, त्या आमच्या माग्नाचार्टांत, ब्रिटिश राष्ट्रानें आणि आमच्या कृपावंत सार्वभौमिनीनें अुद्घोषिलेल्या सद्भावना नि शुभेच्छा सफल झालेल्या आढळतील !" दादाभाअींसारख्या प्रौढप्रज्ञ नी प्रमुख पुढाऱ्यांच्या ह्या ब्रिटिशनिष्ठेची छाप त्या काळीं हिंदुस्थानांतील विशीतिशी अुलटत असलेल्या सहस्रावधि होतकरू देशसेवकांच्या मनावर अितकी बळकटपणें पडली कीं पुढें कांहीं वर्षांनीं स्वत: दादाभाअी त्या आशावादाला विटले पण त्या त्यांच्या शिष्यांच्या मनावरील ब्रिटिशनिष्ठेचे तें भ्रांतिपटल कांहीं केल्या नष्ट होअूं शकलें नाहीं. रानडे नि दादाभाअी यांचे पट्टशिष्य देशभक्त गोपाळराव गोखले यांचेंच अुदाहरण पाहा. वरील काळानंतर दहाबारा वर्षें अुलटल्यावर जेव्हां त्यांच्या प्रौढ वयांत काँग्रेसचें नेतृपद पावले तेव्हां त्यांनीं काढलेल्या Servants of India Society ची, भारत सेवक समाजाची, जी घटनात्मक गूळ प्रतिज्ञा त्यांनीं प्रसिद्धिपत्रकांत ग्रंथिली ती होती ती अशी :

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"The members of this new society frankly accept the British connection as ordained in the inscrutable dispensation of Providence for India's Good."

भावार्थ हाच कीं, " ह्या संस्थेचे सभासद, अीश्वरकृपेनें हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या ब्रिटिश प्रभुत्वास निष्कपटपणें स्वीकारीत आहेत. कारण त्यांतच हिंदुस्थानचें कल्याण आहे."

अशा ब्रिटिशनिष्ठ देशभक्तांच्या नेतृत्वाखालीं नि ब्रिटिश सरकारच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष अुत्तेजनानें कॉंग्रेसच्या शाखाप्रशाखांचा विस्तार पहिल्या दहा वर्षांतच साऱ्या हिंदुस्थानभर वाढत गेला. 'ब्रिटिशांचे अुपकार', 'आमचा माग्नाचार्टा', 'आमची सम्राज्ञी व्हिक्टोरिया', 'मायबाप सरकार', 'ब्रिटिश राज्य म्हणजे देवाचें वरदान', 'आम्हीं त्यांचे केवळ राजनिष्ठ प्रजाजन', 'ब्रिटिश साम्राज्य चिरायु होवो' अित्यादि प्रकारची त्या अँग्लो-अिंडियन पुढाऱ्यांनीं पढविलेली आणि त्या वेळच्या कॉंग्रेसच्या हिंदी पुढाऱ्यांना नि अनुयायांना मनःपूर्वक पटलेली ती कॉंग्रेसी परिभाषा नि त्या कॉंग्रेसी घोषणा हिंदुस्थानांतील दैनिकादैनिकांतून दुमदुमत राहिल्या. देशांतील सारें मुद्रणपीठ नि वाक्पीठ कॉंग्रेसनें हस्तगत केलें. ब्रिटिशनिष्ठेचा महापूर देशभर घोंघावत वाहूं लागला. हिंदुस्थान देशाची प्रातिनिधिक आणि मुखर अशी संस्था कॉंग्रेस हीच काय ती होय असें ह्यूमप्रमृति अँग्लोअिंडियन कूटनितिज्ञांना गर्जून गर्जून यथार्थपणें सांगतां यावें अशी परिस्थिति वस्तुतःच अुत्पन्न झाली. कॉंग्रेस स्वतःला नुसती मी लोकमान्य आहें अितकेंच सांगून संतुष्ट होत नव्हती. पण लोकमान्य म्हणवून घेण्यांत तिला जें भूषण वाटे त्याहून दसपट भूषण 'मी राजमान्यहि आहें' हें सिद्ध करण्यांत तिला वाटत असें. कॉंग्रेसमध्यें जो कोणी हिंदी देशभक्त आज पुढारी होअी तो बहुधा परवा वा तेरवा कोणत्या तरी ब्रिटिशशासनीय सेनाविभागांतील अुच्च अधिकारपदीं अिंग्रजाकडून नेमला जाअी. सर, सी. आय. अी., रावबहादुर अशी कोणती ना कोणती तरी मानाची पदवी सरकारकडून त्याला दिली जाअी. कोणत्या तरी शासनीय समितींत वा समादेशक मंडळांत (सल्लागार मंडळांत) कॉंग्रेस-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधल्या ह्या ब्रिटिशनिष्ठ हिंदी पुढाऱ्यांना घेण्यांत येअी. आणि आपणांस ब्रिटिशांकडून मिळणाऱ्या या ' राजमान्यते ' च्या प्रसादचिन्हाविषयीं काँग्रेसला अितका आत्मगौरव वाटे कीं कांहीं विचारूं नये.

अशा ह्या हुरळून गेलेल्या काँग्रेसच्या त्या वेळच्या प्रमुखतम पुढाऱ्यांच्या भाषणांची नि प्रतिज्ञांची वानगी म्हणून आम्हीं वर जे कांहीं मूळ अुतारे दिले आहेत तशा अनेक भावड्या भाषणांचा आणि राजनिष्ठेच्या काँग्रेसी ठरावांचा युरोप-अमेरिकेशीं सबद्ध असलेल्या ब्रिटिशांच्या परराष्ट्रीय राजकारणांतसुद्धां ह्यूमप्रभृति अँग्लो-अिंडियन कूटनीतिज्ञ कसा कपटी अुपयोग करून घेत हेंहि पाहण्यासारखें आहे.

अितरांचे देश जिंकून अिंग्रजांनीं आपलें साम्राज्य जसें वाढविलें तशींच युरोपमधील फ्रान्स, ऑस्ट्रिया, रशिया प्रभृति देशांनींहि आपआपलीं साम्राज्यें वाढविलीं होतीं. पण त्यांचा नायनाट करून आपलें साम्राज्य तेवढें अकुतोभय करावें ही अिंग्रजांची महत्त्वाकांक्षा असल्यानें अितर साम्राज्यांतल्या पददलित लोकांनीं किंवा राष्ट्रांनीं स्वातंत्र्यास्तव कुठेंहि अुठावणी केली कीं त्या क्रांतिकारक पक्षाला अिंग्लंड हटकून पाठिंबा देअी. आस्ट्रियनांचें प्रभुत्व झुगारून देअून स्वदेश स्वतंत्र करण्यासाठीं अिटालियन क्रांतिकारक अुठले तेव्हां अिंग्लंडनें त्यांचा स्वातंत्र्यप्रेमी म्हणून गौरव केला. परपीडक नि छलक म्हणून ऑस्ट्रियन साम्राज्य नाहींसें झालेंच पाहिजे अशी हाकाटी केली. फ्रेंच साम्राज्याविरुद्धहि त्याच्या अंकित देशांनीं सशस्त्र अुठावण्या कराव्या म्हणून चिथविलें. माझिनी, कोसूथ, रशियन क्रांतिकारक यांना अिंग्लंडमध्यें आश्रय देअून सर्व परतंत्र राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा कैवारी म्हणून आपली आपणच दवंडी पिटविली. पण अिकडे हिंदुस्थानच्या पायांतील अिंग्लंडच्या दास्याची बेडी मात्र अिंग्लंड लवलेशहि ढिली करूं अिच्छीत नसे. अिंग्लंडच्या या कपटपटुत्वाविषयीं युरोप नि अमेरिकेंतील लोक टीकेची झोड अुठवीत. ' जर अिंग्लंडला जगांतील सर्व साम्राज्यांतील सर्व परतंत्र नि पीडित राष्ट्रांविषयीं अितकी मनस्वी तळमळ खरोखरीच लागली असेल तर तें स्वतः त्यांच्या ब्रिटिश साम्राज्याच्या निर्घृण दास्यांतून प्रथमतः हिंदु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थान देशाला कां मुक्त करीत करीत नाहींत ?' असा मर्मभेदक टोमणा अिंग्रजांचे प्रतिस्पर्धी अिंग्लंडला मारीत. परंतु 'नॅशनल अिंडियन कांग्रेस' स्थापन झाल्यापासून त्या प्रतिस्पर्ध्यांचीं तोंडें बंद करण्याचें फक्कड साधन अिंग्लंडला मिळालें. किंबहुना काँग्रेस काढण्यांत अँग्लोअिंडियनांचा हाहि अेक हेतु होता. आणि लॉर्ड डफरिननें काँग्रेसचें अध्यक्षत्व अित्यादि पदें कोणाहि गव्हर्नरादिक सरकारी अधिकाऱ्याला न देतां दिखाअूपणापुरती तरी काँग्रेस ही केवळ हिंदी लोकांची बिनसरकारी स्वतंत्र संस्था आहे असें भासवावें हें जें धोरण आंखलें, तें काँग्रेसचा परराष्ट्रीय राजकारणांतहि पुढें असा अुपयोग करून घेतां यावा म्हणूनच होय, हें पूर्वी सांगितलेंच आहे. ब्रिटिश वृत्तपत्रें, वक्ते, परदेशीय प्रतिनिधि, पार्लमेंटचे सभासद नि ब्रिटिश मंत्रीहि त्याच्या युरोप अमेरिकादिक प्रतिस्पर्ध्यांच्या वरील टोमण्याना आतां सरळ तोंड देअून अुत्तरूं लागले, " हे पाहा कांग्रेसचे ठराव. हिंदुस्थान आमच्या साम्राज्यांतून फुटूं अिच्छित नाहीं. म्हणून आम्हीं तिथें राज्य करतों. आणि हिंदुस्थानच्या संमतीनें हिंदुस्थानच्या हितार्थ तसें राज्य करणें आम्हां ब्रिटिशांचें नैतिक कर्तव्यच आहे."

ब्रिटिशांच्या अशा अुत्तराची अेक वानगी म्हणून वेडर्बर्न ह्यांच्या भाषणांतील अेक अुतारा अिथें देअूं. कालानुक्रमें तें भाषण थोडें पुढचें असलें तरी विषयानुरोधें अिथेंच अुल्लेखिणें अिष्ट. सन १९०५ मध्यें 'ग्रीनिच अेथिकल सोसायटी' मध्यें दिलेल्या ह्या भाषणांत हिंदुस्थानच्या तिजोरींतून लठ्ठ भृति (Pension) खाणारे हे साहेब म्हणाले,

" While the Italians had always refused to accept the Austrian rule (during the period of their forced subjection) as the national rule and had boycotted the Austrians so as to made the administration impossible the Indians on the other hand so far from boycotting the British had offered from their co-operation and accepted British Rule as their national rule, while the resolutions

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

of the Indian National Congress showed how grievances might be redressed and the people made prosperous and contended, thus making British Rule popular, stable and strong. "

भावार्थ असा कीं 'ऑस्ट्रियनांच्या आपल्यावरील राज्यास अिटालियनांनीं स्वराज्य म्हणून केव्हांच संमति दिलेली नव्हती. त्याला अिटली नेहमींच परराज्य परदास्य, असेंच लेखीत आली. तिनें त्या ऑस्ट्रियाच्या परराज्यावर बहिष्कार टाकलेला होता. परंतु हिंदी लोकांनीं आमच्या ब्रिटिश सत्तेवर बहिष्कार टाकलेला नाहीं. अितकेंच नव्हे तर ब्रिटिशाच्या राजसत्तेलाच त्यांनी स्वराज्य म्हणून स्वत: अंगिकारलें आहे. आमच्या ब्रिटिश सरकारशीं ते आपण होअून सहकार्य करीत आहेत. हिंदी लोकांची अेकमेव प्रतिनिधि असलेली जी अिंडियन नॅशनल काँग्रेस तिचे ठराव पाहा ! तेच तुम्हां (युरोपियनादिक लोकांना) हिंदुस्थानच्या ब्रिटिश राज्यनिष्ठेची साक्ष परस्पर देअू शकतील. प्रजेचीं दु:खें नाहींशीं करण्याचें आणि लोकांना संपन्न नि संतोषी ठेवण्याच्या कार्यीं ती काँग्रेस अशा प्रकारचें सहकार्य करीत आहे कीं ज्यायोगें हिंदुस्थानांत ब्रिटिश सत्ता लोकप्रिय, प्रबळ नि अढळ बनूं शकेल !"

म्हणजे मुख्य साध्य ब्रिटिशसत्ता हिंदुस्थानांत अढळ नि प्रबळ राखणें हें. त्यासाठीं अपरिहार्य तेवढींच काय ती लोकांच्या सुखाची नी संतोषाची अुठाठेव. अितकें निगरगट्ट स्पष्टपणें आपलें मनोगत ब्रिटिश साम्राज्यवादी वारंवार सांगत आले असतांहि काँग्रेसचे भाबडे हिंदी पुढारी त्यांना 'हिंदुस्थानचें हितचिंतक' म्हणून गौरवीतच होते. अशा स्थितींत मेकॉलेपासून ह्यूमपर्यंत 'पराजित हिंदुस्थानचें मनसुद्धां जिंकून टाकण्यासाठीं, मनसुद्धां मारून टाकण्यासाठीं' आपण ज्या ज्या युक्त्याप्रयुक्त्या योजल्या त्या बहुतांशीं सफल होत चालल्या आहेत, असें समाधान ब्रिटिश कूटनीतीला वाटूं लागलें ह्यांत कांहींच आश्चर्य नव्हतें. जी स्वत:ला हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा, अिंडियन नॅशनल कांग्रेस, म्हणविते तिनें स्वसंतोषानें, हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नि राज्यपद हिरावून घेणाऱ्या ब्रिटिश सत्तेच्या मस्तकावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

' आमची सम्राज्ञी ' म्हणून चवऱ्या मोर्चले ढाळीत बसण्यांत बहुमान मानावा याची युरोप-अमेरिकेंतील स्वतंत्र जगताला लाज वाटे --पण त्या हिंदुस्थानी राष्ट्राच्या प्रातिनिधिकरणाचा टेंभा मिरवणाऱ्या काँग्रेसला त्या दास्याची कांहीं खंत वाटत नसे. अुलट तें दास्य देवाचें वरदान वाटे.

तथापि ' विषमप्यमृतम् क्वचिद् भवेत् '

यद्यपि आमच्या लोकांतील राजकीय स्वातंत्र्याची महत्त्वाकांक्षा आणि तिच्या सफलतेसाठीं आवश्यक असलेली सशस्त्र क्रांतीची प्रवृत्ति मारून टाकण्यासाठींच अिंग्रजांनीं ही ब्रिटिशनिष्ठ काँग्रेस काढविली नि वाढविली होती तथापि ' विषमप्यमृतम् क्वचिद् भवेत ' या न्यायानें तिचा आमच्या देशाला अुपकारक असा अेक अवांतर परिणाम मात्र अपरिहार्यपणें होत चालला.

काँग्रेसचें नांवच मुळीं ' अिंडियन नॅशनल काँग्रेस ' भारतीय राष्ट्रसभा, असें ठेवण्यांत आलें होतें. म्हणजे अिंडिया, भारत, हिंदुस्थान हें आसेतुहिमाचल अेक, अेकजीव, अखंड राष्ट्र आहे ही भावना त्या लोकांतच अनुस्यूत होती. निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या भाषांचे नि वेषांचे सहस्रावधि देशभक्त नि विचारवंत लोक काँग्रेसच्या वार्षिक आणि प्रांतिक अधिवेशनांतून जसजसे वारंवार अेकाच राष्ट्रभावनेनें अेकत्र येवूं लागले तसतशी सामान्य जनतेंतहि देशभक्तीची भावना खोलवर रूजत चालली. आपण कोटिकोटि लोक त्या अेकाच भारतमातेचें संतान आहोंत; आपले भिन्न भिन्न प्रांत हे त्या भारतभूमीची, आपल्या ह्या अखंड हिंदुस्थान देशाची केवळ अंगोपांगें आहेत ? आपलीं राष्ट्रीय नि राजकीय सुखदुःखें अेकच आहेत आणि आपणा सर्वांनीं ह्या जगांतील अितर राष्ट्रांप्रमाणें अेक बलाढय नि मानाढ्य राष्ट्रांत म्हणून नांदावयाचें असेल तर आपण सर्वांनीं अेककेंद्र, अेकात्म, अखिल भारतीय नि अखंड भारतीय असें राज्यैक्यहि संपादिलें पाहिजे अशा, हिंदु जगतांत आधींच अंतर्हित असलेल्या भावनांची अेक नवी लाट देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत प्रकटपणें हेलावत चालली.

परंतु काँग्रेसमधील अिंग्रजीशिक्षित पुढाऱ्यांना वाटूं लागलें कीं ही जी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अखंड हिंदुस्थानच्या अेकात्मत्वाची प्रबुद्ध जाणीव आणि राष्ट्रैक्याची भावना देशभर अकस्मात् संचरत चालली आहे ती अिंग्रजी शिक्षणाचें फळ आहे. अर्थात ब्रिटिशांचें अेकछत्री राज्य ह्या देशावर नांदत आहे म्हणूनच काय ती पंजाब, बंगाल, मद्रास प्रभृति भिन्नप्रांतीय लोकांमध्यें आपण अेका राष्ट्राचे लोक आहोंत अशी पूर्वी कधींहि नसलेली आत्मीयता आज प्रथमच अुत्पन्न झालेली आहे. निःसंशय भारतीय राष्ट्रैक्याची नि राज्यैकाची कल्पना-सुद्धां ब्रिटिश अिकडे येण्यापूर्वी आम्हांस नव्हती, ती ब्रिटिशांच्या अेकछत्री राज्यसत्तेचीच देणगी आहे. काँग्रेसमधील हिंदु पुढाऱ्यांच्या या श्रद्धेला अिंग्रजी पुढारी अर्थातच अुचलून धरीत होते हें सांगणें नकोच. अिंग्रजी पुढारी अुघड अुघड धमकावून सांगत, हिंदी लोकांमध्यें ही राष्ट्रैक्याची भावना जर तुम्हांला बळकट करावयाची असेल तर तुम्हीं प्रथमतः ब्रिटिशांच्या अेकछत्राशीं सदोदित राजनिष्ठ राहिलें पाहिजे. जर ब्रिटिश छत्र भंगलें तर तुमच्या अेकसंध होत चाललेल्या या अखंड हिंदुस्थानच्या राष्ट्रैक्याचेंहि तुकडे तुकडे अुडून जातील. तुम्हा कोटिकोटि हिंदी लोकांना देशभक्तीच्या सूत्रानें अेकत्र बांधूं शकेल असें अेकच अुपकारक बंधन आहे-ब्रिटिशांचें अेकछत्र !

तथापि वतुस्थिति काय होती ?–

हिंदी राष्ट्रसभेच्या पायाभरणींतच

मुस्लिम पायधरणीचा कालध्वम् (Time Bomb)

ह्या काँग्रेसी पुढाऱ्यांनीं आणि त्यांच्या प्रचारकांनीं स्वतःलाच जर असा आत्मनिरीक्षक प्रश्न केला असता कीं आपण ह्या आपल्या काँग्रेसला 'अिंडियन नॅशनल काँग्रेस' म्हणजेच 'भारतीय राष्ट्रसभा' म्हणून जें म्हणवून घेत आहों तें कोणाच्या जिवावर ? राष्ट्राच्या, 'नेशन'च्या, नांवें काँग्रेसनें आव्हान देतांच अवघ्या दोन तीन वर्षांत आसाम ते सिंध नि काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतचे हे जे सहस्रावधि देशभक्त लोक तिला साद देते झाले आहेत. नी तिच्या राष्ट्रीय पीठाभोंवतीं अेकवटले आहेत ते कोण आहेत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फार काय, हे काँग्रेसचे सभासमारंभांतून स्वतःला 'हिंदी' म्हणवून घेत असणारे पुढारीहि मुळांत घरचे कोण आहेत? माननीय पण तुरळक अपवाद सोडतां ते काँग्रेसचे स्वदेशभक्त पुढारी नी ते स्वदेशभक्त सहस्रावधि अनुयायी होते सारे हिंदु. त्यांच्याच जिवावर काँग्रेस आपल्याला 'भारतीय राष्ट्रसभा', अिंडियन नॅशनल काँग्रेस, म्हणवूं शकत होती. केवळ अिंग्रजी शिक्षणानें जर ही राष्ट्रैक्य भावना येअूं शकती तर त्या काळींहि हिंदुस्थानांत जे सहस्रावधि अिंग्रजीशिक्षित मुसलमान आणि सरकारांत अुच्च अधिकारपदांवर असलेले मुसलमान विद्यमान होते त्यांच्यांतहि तिच्या भारतीय राष्ट्रैअक्याची भावना अुसळावयास पाहिजे होती! मग ते सहस्रावधि मुसलमान त्या 'अिंडियन नॅशनल काँग्रेस'मध्यें आले का? सर बद्रुद्दीन तय्यबजीसारखीं दोनतीन नांवें सोडलीं असतां अिंग्रजीशिक्षित वा अशिक्षित मुसलमान समाज असा काँग्रेसला कां मिळाला नाहीं? मिळाला नाहीं अितकेंच नव्हे तर मुसलमानी अिंग्रजीशिक्षित वर्गानेंच, त्यांच्यांतील जे अग्रणी पुढें सर सय्यद अहंमद या नांवें प्रख्यातीस पावले त्यांच्या नेतृत्वाखालीं, काँग्रेस स्थापन झाली न झाली तोंच तिला विरोधिण्यासाठीं दुसरी मुस्लीम पक्षीय संस्था 'The Patriotic Association' ह्या नावाची काढली नाहीं का? आणि या अिंग्रजीशिक्षित मुस्लिमांनींच साऱ्या मुसलमान समाजाला अुद्देशून घोषणांचा डांगोरा पिटविला नाहीं का कीं 'काँग्रेस?' ही हिंदु काँग्रेस आहे! मुस्लिमांनो, बहिष्कार घाला! काँग्रेसवर बहिष्कार!!

भारतीय राष्ट्रैक्याची भावना शतकोशतकें हिंदूंच्या रक्तांत मुरलेली होती.

अिंग्रजीमध्यें Nation and State हे दोन शब्द आहेत. ते दोन शब्द राजकारणांतील दोन भिन्न भावांचे वाचक आहेत. आपल्या राष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति गौण ठरून त्याला आतां जो रूढार्थ प्राप्त झाला आहे त्या अर्थी तो शब्द अिंग्रजी Nation शब्दाचा अर्थ व्यक्तवूं शकतो. तसेंच State म्हणजे राज्य. या संकेतान्वयें पाहतां राष्ट्रसंस्था नी राज्यसंस्था ह्या दोन अंशतः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिन्नार्थक संस्था आहेत. युगोयुगांच्या भौगोलिक, अैतिहासिक, धार्मिक नि सांस्कृतिक अशा प्रिय नि पूज्य बंधनांनीं निगडित झालेल्या आणि भारतांत निवसत असलेल्या ह्या आमच्या कोटिकोटि देशबांधवांच्या हिंदु जगतांत राष्ट्रैक्याची नि देशैक्याची भावना सहस्रावधि वर्षांपासून रक्तांत मुरत आलेली आहे. हें हिंदुजगत् ह्या आसेतु हिमाचल भारतभूमीला आपली पितृभू नि आपली पुण्यभू म्हणून पूजित आलें आहे. 'अुत्तरस्याम् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् । तद्वर्षं भारतम् नाम भारती यत्र संततिः ॥' ही आमच्या राष्ट्रैक्याची व्याख्या आर्ष आहे : अिंग्रजी नव्हे. आपल्या ह्या राष्ट्रैक्याची परिणति राज्यैक्यांतहि व्हावी, हें आपलें भारतीय राष्ट्र अेकछत्री व्हावें, अशी महत्त्वाकांक्षाहि प्राचीन कालापासून आमच्या राष्ट्रीय हृदयांत सळसळत आली आहे. तिच्या प्रेरणेनें अखिल भरतखंडावर अेकछत्री राज्यसत्ता प्रस्थापून त्याचें राज्यैकहि साधण्याचे भगीरथ यत्न प्राचीन कालापासून आमचीं दिग्विजयी सैन्यें नि राज्यमंडलें करीत आलीं. साम्राज्यसंस्था, चक्रवर्तित्व संस्था, राजसूयाश्वमेधादिक यज्ञप्रथा, ह्या त्या प्रयत्नांच्याच द्योतक होत. आमच्या अितिहासाचीं अगदीं अलीकडचीं पानें चाळलीं तरी सुद्धां हेंच आढळेल कीं मुसलमानी पादशाहीस अुलथून पाडून आसिंधुसिंधु हिंदुस्थानांत हिंदुपदपादशाही स्थापण्याची प्रबुद्ध महत्त्वाकांक्षा धरून महाराष्ट्रीय पराक्रमानें ध्येय गांठीतहि आणलें होतें. ह्या विषयाचा सविस्तर प्रपंच आम्हीं आमच्या (Hindutwa) (हिंदुत्व) या पुस्तकांत केलेला आहे. जिज्ञासा असेल त्यांनी तो पहावा.

महाराष्ट्र साम्राज्याच्या त्या काळीं विजयोत्फुल्ल हिंदु हृदयांत अुसळणाऱ्या राष्ट्रैक्याच्या प्रबळ भावनांचा प्रतिध्वनि त्या काळच्या भाषेंत जर अैकावयाचा असला तर गोविंदराव काळे यांनीं नाना फडणिसांना सन १७९३ च्या जवळपास, म्हणजे महाराष्ट्र राज्यांत अिंग्रजांचें बोटहि शिरकलें नव्हतें त्या वेळीं, लिहिलेल्या सुप्रसिद्ध पत्रांतील वाक्यें वाचावीं :

"......अटक नदीचे अलीकडे (सिंधु नदीचे अलीकडे) दक्षिण समुद्रपावेतों हिंदूंचें स्थान : तुर्कस्थान नव्हे ! ही आपली सीमा पांडवांपासून विक्र-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माजितापावेतों त्यांनीं राखून अुपभोग घेतला. पुढें राज्यकर्ते नादान निघाले. यवनांचें प्राबल्य झालें......पुढें शिवाजीमहाराज शककर्ते व धर्मरक्षिते निघाले. त्यांनीं किंचित् कोन्यांत धर्मरक्षण केलें. पुढें नानासाहेब व भाअूसाहेब प्रचंड प्रतापसूर्य असे झाले कीं असें कधीं झालें नाहीं. हल्लीं श्रीमंतांच्या पुण्यप्रतापें करून व राजेश्री पाटीलबावांच्या (महादजी शिंदे यांच्या) बुद्धि व तरवारीच्या पराक्रमें करून सर्व (पुनरपि) घरांस आले......ज्यांनीं ज्यांनीं हिंदुस्थानांत शिरें अुचललीं त्यांचीं पाटीलबाबांनीं फोडलीं. न लाभाव्या त्या गोष्टी लाभल्या. त्यांचा बंदोबस्त शककर्त्यांप्रमाणें होअून अुपभोग घ्यावा हें पुढेंच आहे. कोठें पुण्याअींत अुणें पडेल आणि काय दृष्ट लागेल न कळे, झाल्या गोष्टी यांत केवळ मुलुख, राज्य प्राप्त अितकेंच नाहीं तरी वेदशास्त्ररक्षण, गोब्राह्मणप्रतिपालन, सार्वभौमत्व हातीं लागणें, कीर्ति यश यांचें नगारे वाजणें अितक्या गोष्टी आहेत. हे किमया संभाळणें ! . ."

हिंदु जगताच्या पिंडांत अखिल भारतीय राष्ट्रैक्याची भावना अशी अंतर्हित होती यास्तवच 'अिंडियन नॅशनल कॉंग्रेसचें,' अखिल भारतीय राष्ट्रसभेचें', नाव अैकतांच तिचें हिंदूंना ममत्व वाटूं लागलें.ती आपल्याच राष्ट्राची संघटना आहे अशी आपुलकी त्यांच्या हृदयांत आपोआप स्फुरली. आपल्या मातृभूमीची सेवा करणें हें आपलें कर्तव्यच आहे अशा निष्ठेनें, भाडोत्री प्रतिमूल्याचा कोणताहि सौदा न करतां तें सहस्रावधि हिंदु देशभक्त नी देशसेवक त्या राष्ट्रसंस्थेच्या पीठाभोंवतीं अेकवटून अुभे ठाकले.

पण मुसलमान ?

अुलटपक्षीं 'या, या' म्हणून कॉंग्रेसीय हिंदु पुढारी विनवणी करीत असतांहि त्या अखिल भारतीय राष्ट्रसभेमध्यें मुसलमान कां आले नाहींत ? अितकेंच नव्हे तर अगदीं तिच्या जन्मापासूनच मुसलमानांनीं जातिधर्मनिरपेक्षपणें अेकराष्ट्रांत विलीन होणाऱ्या कॉंग्रेसच्या मूळ सिद्धान्ताचाच मुसलमान अितका तिटकारा कां करीत गेले आणि तत्काळ कॉंग्रेसविरुद्ध आपली स्वतंत्र मुस्लिम संघटना कां अुभारते झाले ? भावडे विचारे कॉंग्रेसीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदु देशभक्त ! मुसलमानांची मूळची धर्मप्रवृत्ति नि तदधिष्ठित अैतिहासिक परंपरा कोणती यांचा त्या अिंग्रजीशिक्षित काँग्रेसीय हिंदु पुढाऱ्यांपैकीं बहुतेकांना ओनामासुद्धा माहीत नव्हता. हिंदुमुसलमानादिकांचें सामाजिक 'हिंदी' 'अिंडियन' राष्ट्र असें त्यांचें जे काँग्रेसीय ध्येय त्यांना प्रामाणिकपणें अगदीं निर्भेळ देशभक्तीचें प्रतीक वाटे–तेंच मुळी मुस्लिमांच्या धर्मनिष्ठेचा नी अैतिहासिक परंपरेचा अुपमर्द करणारें होतें. मुसलमानांच्या धर्मशासनाप्रमाणें हिंदुमुसलमानांचें 'समाअिक' राज्य हें वाक्यच मुळांत होतें अधर्म्य, पापी.

जें निर्भेळ मुस्लिम राज्य तेंच काय तें धर्म्य, त्यांच्या 'शरियत' ला (शास्त्राला) धरून. काँग्रेस मुसलमानांना जों जों आंजारून गोंजारून भावपूर्ण भाषेंत सांगत सुटली कीं "आपण हिंदु मुसलमान अेकाच देशमातेचीं लेकरें म्हणून आपण देशबंधु आणि अेका हिंदी राष्ट्राचे नागरिक आहों !" तों तों मुसलमान मनांतल्या मनांत अधिकच चिडूं लागत. कारण मुसलमानांच्या धर्मशास्त्राप्रमाणें जींत निर्भेळ मुस्लिम राज्य नाहीं, ती भूमि त्यांचा देशच होअू शकत नव्हती. तिला म्हणें 'देशमाता' म्हणा ! तोबा, तोबा ! ! त्यांतहि ज्या देशांत मुस्लिम राज्य तर नाहींच पण मुस्लिम बहुसंख्यहि नाहीं, अुलट केवळ मुस्लिमेतरांचीच नव्हे तर त्यांतहि हिंदूंसारख्या मूर्तिपूजकांची प्रचंड बहुसंख्या आहे तो देश तर प्रत्यक्ष काफरस्थान, नापाक. अशा देशांत बलवत्तराशीं गांठ पडली तर मुसलमान गोगलगाअीसारखे नरम येअून राहत खरे पण ते भीतीनें, निष्ठेनें नव्हे. फार काय, अशा 'नापाक' देशांत ते तसे जोंपर्यंत राहतील तोंपर्यंत त्यांना अेक धार्मिक प्रायश्चितहि घ्यावें लागतें. अक्षरशः 'तोबा' करावा लागतो. मुसलमानांच्या या मनःप्रवृत्तीची निंदा करण्यासाठीं वा स्तुति करण्यासाठीं आम्ही हीं विधानें करीत नसून वस्तुस्थिति जशी आहे तशी सांगत आहों. स्वतः कोणताहि मुस्लिम शास्त्रज्ञ मुसलमान हें नाकारणार नाहीं आणि तसें त्यांच्यांतील कोणीं नाकारलें तरी मुस्लिमांचें धर्मशास्त्र नि अितिहास तर कुठें गेला नाहीं ना ? हवें त्यानें त्याच्याशीं हीं विधानें पडताळून पाहावीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुंना भाडोत्री प्रतिमूल्याच्या सौदा न करता काँग्रेस आपली मानली.

काँग्रेसच्या विरुद्ध मुसलमानांच्या अराष्ट्रीय मागण्यांचा आरंभ

वर दिलेल्या मुस्लिम धर्मनीतीच्या नि राजनीतीच्या प्रचारार्थ सर सय्यद अहमद यांच्या प्रयत्नामुळें मुसलमानांसाठींच स्वतंत्र अशी अेक शिक्षण-संस्था अलिगड येथें काढण्यांत आली. अिंग्रजी शिक्षणामुळें होणारे लाभ पदरीं पाडून घेअूनहि, तें शिक्षण घेतलेल्या हिंदूमध्यें हिंदुत्वाच्या जातिवन्त स्वाभिमानाला मारक होणाऱ्या ज्या ब्रिटिशछाप 'हिंदीत्वा'ची रोगट सांथ बळावतच चालली होती, तशी मुस्लिम तरुणांचीहि स्थिति होअूं नये आणि अिंग्रजीशिक्षित मुस्लिम अशिक्षित मुस्लिमांहूनहि कट्टर मुस्लिम बनलेला असावा अशा अीर्षेनें अलिगडची शिक्षणसंस्था भारावलेली होती, हीच संस्था पुढें कांहीं कालानें हिंदुद्वेष्टचा मुस्लिम राजनीतीचें केंद्र म्हणून गाजलेल्या अलिगड विद्यापीठांत परिणत झाली.

नवीन काळास अवश्य अशा मुस्लीम संस्था, वृत्तपत्रें, अधिवेशनें प्रभृति साधनांनीं युक्त अशी मुस्लिम संघटना अुभारून मुस्लिम पुढाऱ्यांनीं सामुदायिकरीत्या काँग्रेसविरुद्ध अिंग्रजसरकाराकडे तीव्र प्रतिवाद करण्यासहि आरंभिलें. त्यांच्या त्या वेळच्या लिखाणांचा नि बकाणांचा अढळ बिंदु म्हटला म्हणजे हा : काँग्रेस ही हिंदुसंस्था आहे. ब्रिटिश सरकार जर तिचें सामर्थ्य वाढूं देअील आणि हिंदूना मोठमोठे अधिकार देअील तर वस्तुतः अिथें हिंदुराज्य होअील. पण मुसलमान अशा हिंदूंच्या राज्यांत राहण्यास कधींहि मान्य होणार नाहीत. ब्रिटिशांच्या राज्यांत आम्हांला धोका वाटत नाहीं. ह्यासाठीं काँग्रेसच्या कोणत्याहि मागण्या, तिच्यांतील हिंदु पुढाऱ्यांना देण्यांत येणाऱ्या अुच्चपदस्थ चाकऱ्या, सरकारी समित्यावरील नेमणुका, कोणतेहि राजकीय वा नागरिक अधिकार अित्यादि प्रकरणीं प्रथमतः आम्हां मुस्लिमाच्या प्रतिनिधींची स्वतंत्रपणें संमति घेअूनच सरकारनें काय तें केलें पाहिजे. अितकेंच नव्हे तर आम्हां मुसलमानांचे ह्या देशाचे भूतपूर्व राज्य-कर्ते म्हणून जे विशेष महत्त्व आहे तें लक्षांत ठेवून आणि त्यांतहि आम्ही अल्पसंख्य असल्यामुळें आमच्या संरक्षणाचें जें विशेष दायित्व सरकारवर आहे तेंहि ध्यानीं घेअून राजसेवा विभागांतील अुच्चपदें. चाकऱ्या, प्रतिनिधित्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अित्यादि अधिकार वा सुविधा देण्याच्या प्रत्येक प्रश्नीं सरकारशीं भांडणाऱ्या ह्या हिंदूंहून आम्हां राजनिष्ठ मुसलमानांना अधिक प्रमाणानें नी जातवार वांटा मिळाला पाहिजे !

हें सांगावयास नकोच कीं ह्यूमप्रभृति कांहीं ब्रिटिश कूटनैतिकांनीं जसें कॉंग्रेसला तिच्या ब्रिटिशनिष्ठ श्रद्धेमुळें अेकीकडे अुचलून धरलें होतें तसेंच दुसरीकडे दुसऱ्या कांहीं ब्रिटिश राजकारण्यांनीं मुस्लिम संघटनेच्या कॉंग्रेस-विरोध्यालाहि अुचलून घेतलें होतें. ब्रिटिश राजनीतिज्ञांचे हे दोन पक्ष दिखाअू होते. आंतून त्यांचा अुद्देश होता अेकच. ब्रिटिश राज्याच्या स्थैर्यासाठीं ब्रिटिशांना ह्या दोन्ही परस्परविरोधी हिंदी संस्थांचीं आवश्यकता होती. त्यांच्या फुटींतच होती ब्रिटिश साम्राज्याची बळकटी.

ह्या वेळीं कॉंग्रेसचें कर्तव्य काय होतें ?

हेंहि अगदीं स्पष्टच आहे कीं हिंदुमुसलमानांत ही फूट पाडण्याचा दोष कॉंग्रेसच्या माथीं केव्हांहि मारतां येणार नव्हता. भारतीय राष्ट्रसभेनें आपल्या पुढें जें ध्येय ठेवलें होतें तें भौगोलिक राष्ट्रवादाचें, Geographical Nationalityचें होतें. अेका देशांत जें राहतात ते लोक धर्मजातिपेक्षां अेकराष्ट्रीय असतात किंवा असले पाहिजेत. युरोपांतील फ्रान्सप्रभृति कांहीं देशांच्या आणि विशेषतः ब्रिटनच्या त्या वेळच्या अेकराष्ट्रीय स्वरूपावरून देखोदेखीं त्यांनीं राष्ट्राची ही भौगोलिक व्याख्या अुचलली होती. वास्तविक पाहतां स्वतः त्या टीचभर ब्रिटनमध्यें तशी देशीय राष्ट्रैक्याची भावना अंगीं मुरण्यापूर्वी स्कॉटलंड, अिंग्लंड, वेल्स प्रभृति घटकांतील आणि रोमन कॅथोलिक, प्रॉटेस्टंट प्रभृति धर्मपंथांतील कितीतरी यादवी युद्धांच्या स्थित्यंतरांतून त्यांना शतकोंशतकें रखडत यावें लागलें होतें. परंतु अितका कोणताहि खोल विचार न करतां अेक देश अेवढाच काय तो राष्ट्रैक्याचा घटक असतो अशा अेकांगी श्रद्धेनें तीच व्याख्या कॉंग्रेसनें हिंदुस्थानास लावली होती. तीहि अेका अर्थी अयोग्यच नव्हती. तोहि प्रयोग करून पाहण्यासारखा होता. येथपर्यंत या दिशेनें अेका अर्थी कॉंग्रेसची वाट चुकली नव्हती. यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुसलमानांनीं "काँग्रेस हिंदूंची आहे. आम्ही तींत येत नाहीं. आम्हांला मुसलमान म्हणून विशेष अधिकार मिळतील तरच आम्हीं तिच्यांत येऊं" असा अधिक्षेप करतांच काँग्रेसच्या 'भारतीय राष्ट्रवादा'ची प्रतिज्ञा पाळण्यासाठींच काँग्रेसनें ठाशीव अुत्तर द्यावयास हवें होतें कीं :

"अखंड भारत हा आमचा देव. तेंच आमचें राष्ट्र. त्यांतील सर्व नागरिकांना जाति-धर्म-प्रांत-निर्विशेषपणें ह्या भारतीय राष्ट्रसभेंत, ह्या 'अिंडियन नॅशनल काँग्रेस' मध्यें येण्याचा अधिकार आहे. मग तो धर्मानें हिंदु आहे कीं मुसलमान कीं पारशी कीं ख्रिश्चन अशी विचारणा करणेंसुद्धां ह्या आमच्या काँग्रेसच्या मूलभूत प्रतिज्ञेच्याच विरुद्ध आहें. काँग्रेसमध्यें हिंदुच हिंदु आहेत हें जें तुम्हीं म्हणतां तेंसुद्धां आमच्या दृष्टीनें 'वदतो व्याघात' आहे. कारण कांहीं ब्रिटिश नागरिक सोडतां काँग्रेसमध्यें जे जे हिंदी लोक आहेत ते ते हिंदी आहेत, अिंडियन आहेत,--अितकेंच आम्ही जाणतों आणि जे तुम्ही स्वत:ला मुसलमान म्हणून घेत आहां, ते तुम्ही जरी अुद्या काँग्रेसमध्यें आलांत तरी आम्हीं तुम्हांला केवळ हिंदी, केवळ अिंडियन, म्हणूनच ओळखूं--मुसलमान म्हणून नाहीं! यच्चयावत् हिंदी देशबांधवांच्या हितासाठीं ही हिंदी राष्ट्रसभा जे जे अधिकार मागते ते ते सारख्याच प्रमाणांत सारख्याच नियमनाखालीं सर्व नागरिकांना अुपभोगितां येतील. ज्याला त्याला न्याय्य धर्मस्वातंत्र्य देण्यापलीकडे ह्या भारतीय राष्ट्र-सभेचा धर्माशीं कांहीहि संबंध नाहीं. या प्रतिज्ञेवर ज्या हिंदी नागरिकाला काँग्रेसमध्यें यायचें असेल त्यानें यावें, अन्यथा येअूं नये."

परंतु असें रोखठोकपणें अुत्तर न देतां काँग्रेसमधील हिंदी पुढाऱ्यांनीं मुसलमानांना मुसलमान म्हणून ओळखण्यास आणि त्यांना आंजारण्यागोंजारण्यास आरंभिलें. काँग्रेसमध्यें आपण बहुतेक हिंदुच आहोंत याविषयीं त्यांचेंच मन त्यांना खाअूं लागलें, काँग्रेसचे अनेक प्रमुख हिंदु पुढारी ओशाळल्यासारखे होअून म्हणूं लागले, लिहूं लागले, "आम्ही प्रथम हिंदी आहोंत, मग हिंदु आहोंत!" आणि रावबहादुर रानडे याच्यासारखे ज्येष्ठ नि श्रेष्ठ देश-

(सा...१६)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भक्त तर त्याच्याहि पुढें जाऊन प्रकट घोषणा करूं लागले : 'मी हिंदु नाहीं नी मुसलमानहि नाही. मी केवळ हिंदी आहें!" परंतु जों जों ते स्वत:ला हिंदु म्हणून घ्यावयास लाजूं लागले तों तों मुसलमान पुढारी आपल्या संस्थांतून प्रकटपणें गर्जूं लागले, "पण आम्ही प्रथम मुसलमान आहोंत नी मग हिंदी !" ते मुस्लिम संघटना वेगानें करीत चालले आणि त्याला जें तोंड देऊं शकतें तें हिंदुसंघटन करण्याचें मनांत आणणेंहि हें काँग्रेसी हिंदु अराष्ट्रीय पाप समजूं लागले. ज्या संस्थेचें वा सभेचें अुद्दिष्ट हिंदी राष्ट्राच्या पायावर आधारलेली आहे ती संस्था वा सभा हिंदी राष्ट्रवादी आहे, मग त्यांत कोणी मुसलमान असो वा नसो, अशी कणखर वा तर्कशुद्ध व्याख्या करण्याचें सोडून हे काँग्रेसचे प्रामाणिक पण राजकीय प्रज्ञाशून्य देशभक्त ज्या संस्थेंत वा सभेंत कोणीतरी मुसलमान आलेला नाहीं ती 'हिंदी' म्हणावी तरी कोणत्या तोंडानें असें आपणच म्हणूं लागले. परिणामत: त्यांचा निश्चय झाला कीं कसेंहि करून कांहीं मुसलमान तरी काँग्रेसमध्यें आणलेच पाहिजेत. आपला काँग्रेसमध्यें येण्याचा भाव वाढता आहे ही गुरुकिल्ली मुसलमानांच्या हातीं लागतांच त्यांनीं अमुक विशेष अधिकार द्याल तर येतों--आणखी द्याल तर येतों--अशा लुटालुटीस प्रारंभिलें यांत आश्चर्य तें काय! मुस्लिम दृष्टीनें पाहिलें तर त्यांचें आत्मनिष्ठ राजकारणच खरें राजकारण होतें. आणि काँग्रेसी हिंदूंचें? छट् ! तें राजकारण नव्हतें ! त्यापायीं हिंदुत्वहि बुडालें आणि हिंदीत्वहि बुडालें !

सर्वसामान्यत: आपल्या जनतेची अशी समजूत आहे कीं लखनौ-करारानंतर किंवा खिलाफती चळवळीनंतर काँग्रेस मुसलमानांच्या आहारीं गेली, आणि तिच्या हिंदी राष्ट्रवादाच्या ध्येयापासून ढळत चालली. पण मुसलमानांशीं मुसलमान म्हणून करार करण्याअितका तरी तिला मुसलमानांना जातीय वचक कांहीं अेका दिवसांत किंवा अेका वर्षांत वाटणें संभवनीय नव्हतें. त्यांचीं पाळेंमुळें त्या पूर्वीच्या काळांतहि घुसलेलीं असलीं पाहिजेत. अशा अटकळीनें त्यांचा सुगावा काढण्यासाठीं मी काँग्रेसच्या आरंभापर्यंत तिच्या पुढाऱ्यांचीं भाषणें, लेख, तिचे ठराव प्रभृति तद्विषयक लिखाण वाचीत जो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मागें मागें जात चाललों तों मला आढळून आलें कीं अखंड हिंदुस्थानच्या दैशिक पायावर धर्म-जाति-प्रांत-निर्विशेष असें हिंदी राष्ट्र अुभारण्यासाठीं 'अिंडियन नॅशनल काँग्रेसचा' जिथें प्रारंभ झाला तिथें त्या काँग्रेसच्या प्रारंभांतच काँग्रेसकडून होणाऱ्या मुसलमानांच्या धर्मीय नि जातीय मनधरणीच्या आरंभाचीं पाळेंमुळें घुसलेलीं आहेत. त्यांतहि सुरेंद्रनाथ बानर्जी महाशयांसारख्या त्या काळच्या धुरंधर कांग्रेसनेत्याचें आत्मवृत्त ह्या दृष्टीनें मी लक्षपूर्वक वाचीत असतां अेका च्छेदकाच्या (पॅरिग्राफच्या) कोपऱ्यांत चार पांच ओळीं आढळल्या. त्यांच्यावर न टीप न टाप न टीका. त्यांत काय आहे लक्ष देण्यासारखें. अशा वृत्तींत लेखकानें त्या अगदीं सहजासहजीं लिहिलेल्या दिसल्या. पण मला त्या लाखमोलाच्या वाटल्या. राजकीय साहित्याच्या सांदीकोपऱ्यांतून त्या ओळी वेंचून काढून त्यांतील अैतिहासिक मर्मावर शोधज्योत (searchlight) पाडण्याचा अग्राधिकार मला वाटतें माझ्याकडे आहे. त्या ओळी अशा:

मद्रासला सन १८८७ मध्यें काँग्रेसचें तिसरें अधिवेशन झालें त्यासंबंधीं लिहितांना देशभक्त सुरेंद्रनाथ बानर्जी आपल्या आत्मचरित्राच्या १०८ व्या पृष्ठावर लिहितात:

"....The Mahomedan community under the leadership of Sir Sayyad Ahmed had held aloof from the Congress. They were working under the auspices of the 'Patriotic Association' in direct opposition to the national movement. Our critics regarded the National Congress as a Hindu Congress and the opposition papers described it as such.

"We were straining every nerve to secure the cooperation of our Mohamedan fellow countrymen in this great national work. We sometimes paid the fares of Mahomedan delegates and offered them other facilities."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भावार्थ कीं " सर सय्यद अहमद यांच्या पुढारीपणाखालीं मुसलमान समाज हा कॉंग्रेसपासून फटकून पाहिला होता. कॉंग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीचा अुघड अुघड विरोध करण्यासाठीं (सर सय्यद अहमद यांनीं काढलेल्या) ' पेट्रीऑटिक ॲसोसिअेशन ' या संस्थेच्या नेतृत्वाखालीं मुस्लिम समाज काम करीत होता. आमचे टीकाकार नॅशनल कॉंग्रेसला हिंदु कॉंग्रेस म्हणत आणि विरोधी वृत्तपत्रेंहि कॉंग्रेसला हिंदु कॉंग्रेस असेंच संबोधीत. (नॅशनल कॉंग्रेसच्या) महान् राष्ट्रकार्यांत आमच्या मुस्लिम बांधवांचें सहकार्य मिळविण्यासाठीं आम्ही आमच्याकडून प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होतों. केव्हां केव्हां मुसलमान प्रतिनिधींनीं कॉंग्रेस अधिवेशनांत यावें म्हणून आम्ही त्यांचें भाडेंसुद्धां भरीत होतों, आणि त्यांना अितर सुखसोयीहि पुरवीत होतों. '

या अुताऱ्यावरून हें स्पष्ट होत आहे कीं असल्या भाडोत्री मुस्लिमांना केवळ ते मुसलमान म्हणून डोक्यावर नाचवीत आपल्या हिंदुमुसलमानी अेकीचा नि हिंदी राष्ट्रैक्याचा तमाशा सार्थ करण्याच्या वेडानें कॉंग्रेसला सन १८८७ च्या आधींपासून, म्हणजे पहिल्या दोन वर्षांच्या आंतच झपाटले होतें. कॉंग्रेसी हिंदु पुढाऱ्यांच्या या मनोवृत्तीमुळें मुसलमानांना भाड्याचे नि सुखसोयींचे लहान चेक देतां देतांच पुढें ' कोरे चेक '–गांधीजींचे ' ब्लॅंक चेक्स '–– देण्याचा प्रसंग येणार होता ! या बुद्धिभ्रंशापायींच अगदीं आरंभापासून कॉंग्रेसी हिंदु पुढाऱ्यांनीं त्या 'अिंडियन नॅशनल कॉंग्रेस'च्या हिंदी राष्ट्रैक्याच्या पायाभरणींतच मुस्लिम पायधरणीचा कालध्वम् (Time–Bomb) अजाणपणें ठेवून दिला ! त्याच कालध्वम्चा यथाकालीं स्फोट होअून त्या सरशीं अखंड हिंदुस्थानच्या, त्या त्यांच्या हिंदी राष्ट्रैक्याच्या, ' अिंडियन नेशन 'च्या ठिकऱ्या ठिकऱ्या अुडून जाणाऱ्या होत्या हें त्यांच्या ध्यानींमनींहि आलें नाहीं !

कालानुक्रमें पुढचा असतांहि आमच्या वरील विधानांना प्रांजलपणें समर्थिणारा देशभक्त सुरेंद्रबाबूंच्या आत्मवृत्तांतील हा आणखी अेक अुतारा पाहा. कॉंग्रेसविरोधी अशी स्वतंत्र मुस्लिम संघटना अुभारणारे नी हिंदुद्वेषी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अलिगड विद्यापीठाचे सुत्रधार सर सय्यद अहमद जेव्हां कांहीं वर्षांनीं वारले तेव्हां त्यांच्या मृत्यूविषयीं लिहितांना सुरेंद्रनाथ महाशय आपल्या आत्मचरित्राच्या ४९ व्या पृष्ठांत म्हणतात :

"....Sir Sayyad's Patriotic Association was started in opposition to the Congress...But let bygones be bygones. Let us not forget the debt of gratitude that Hindus and Mohamedans alike owe to the honoured memory of Sir Sayyad Ahmed. For, the seeds that he sowed are bearing fruit; and today the Aligarh College, now raised to the status of a University, is the centre of that culture and enlightenment which had made Islam in India instinct with the moderm spirit and along with that patriotic enthusiasm which argues well for the future solidarity of Hindus and Mohamedans !"

भावार्थ कीं, 'सर सय्यदांनीं कॉंग्रेसला विरोधण्यासाठीं 'पेट्रिऑटिक अॅसोसिअेशन' काढली खरी...पण जाअू द्या, झालें तें झालें, आम्हीं हें विसरतां कामा नये कीं हिंदु नी मुसलमान हे अुभयतांहि सय्यद अहमदांचे ऋणी आहेत. आणि त्यासाठीं आम्हीं सर्वांनीं त्यांच्या स्मृतीला कृतज्ञपणें गौरविलें पाहिजे. कारण त्यांनीं पेरलेलीं बीजें सफल होत आहेत. ती अलिगडची महाशाळा (College) आतां अेका स्वतंत्र विद्यापीठाचें अुच्चपद पावली आहे. आज अलिगड हें त्या संस्कृतीचें नि ज्ञानप्रकाशाचें केंद्र झालेलें आहे : कीं ज्याच्यायोगें हिंदुस्थानांतील मुसलमान समाजांत आज आधुनिक चैतन्य संचरत आहे आणि हिंदुमुस्लिमांच्या भावी राष्ट्रैक्याची शुभ सूचनाच देणाऱ्या अशा अुत्कट देशाभिमानाची ज्योति पेटत आहे."

सर सय्यद वारले तेव्हां त्यांच्या या अलिगड संस्थेंतून तेथील शिक्षणामुळें कॉंग्रेसी राष्ट्रैक्यास नाकारणारी नि हिंदुवेषानें तडफडणारी मुस्लिम तरुणांची अेक पिढीची पिढी 'पटायित' होअून बाहेर पडलेली होती ! पण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरीहि त्या संस्थेच्या अंतरंगाविषयीं मोठेमोठे हिंदु पुढारी किती अज्ञ, अंध नि असावध होते पाहा ! सुरेंद्रबाबू वरील अुताऱ्यांत मुस्लिमांतल्या ज्या ' आधुनिक चैतन्या 'ला आणि देशाभिमानाला भोळेपणानें हिंदुमुस्लिम राष्ट्रैक्याची ' शुभ सूचना ' म्हणून समजले ती वस्तुतः होती मुस्लिम–राज्याकांक्षेनें हिंदुस्थानला दिलेली अेक राष्ट्रभंगाची धर्मांध धमकी !

या ग्रंथाच्या दृष्टिकोनांतून सांगण्यासारखा कॉंग्रेसच्या अुत्पत्तीचा आणि तिच्या ब्रिटिशनिष्ठ कालखंडाचा म्हणजे, साधारणतः सन १८८५ ते १८९५ पर्यंतचा त्रोटक पण साधार अितिहास हा असा आहे.

या अितिहासावरून हें दिसून येअील कीं सन १८९५ च्या आधीं पांच अेक वर्षांपासून हिंदुस्थानांत जी कांहीं राजकीय चळवळ प्रकटपणें चालली होती तिचीं मुख्य सूत्रें कॉंग्रेसच्या हातीं आलेलीं होतीं. आणि त्या कॉंग्रेसला ब्रिटिशनिष्ठतेच्या नी मुस्लिम प्रस्थीच्या भूतबाधांनीं अगदीं आरंभापासूनच पछाडलेलें होतें.

पैकीं तिच्या मुस्लिम प्रस्थीला अुघड अुघड विरोध करून तिला पायबंद घालूं शकेल असा त्या काळीं कोणताहि हिंदुसंघटक पक्ष अस्तित्वांत नसल्यामुळें कॉंग्रेसच्या अंगांत त्या रोगाचें विष अधिकाधिक भिनतच गेलें.

परंतु ब्रिटिशनिष्ठेच्या भूतबाधेंतून तरी त्या राष्ट्रीय संस्थेला सोडविण्याचा चंग बांधलेला अेक बलवत्तर मांत्रिक मात्र याच संधीस भारतीय राजकारणाच्या रंगणांत अुतरला होता. त्याचें नांव होतें महाराष्ट्रकेसरी, ' केसरी ' कार, बाळ गंगाधर टिळक !

✠ ✠ ✠

माझ्या आठवणी

✠ ✠ ✠

[स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं आपलें जें आत्मवृत्त लिहावयास घेतलें आहे त्याचा प्रथम खंड प्रसिद्ध झाला असून त्यांत त्यांच्या नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येथील वास्तव्यापर्यंतचें वृत्त आलेलें आहे. त्या पुस्तकांतील प्रारंभींचीं कांहीं पृष्ठें येथें दिलीं जात आहेत.]

* * *

"माझ्या आठवणी" लिहितांना प्रथमच हें सांगणें अवश्य आहे कीं मला माझा जन्म झाल्याची मुळींच आठवण नाहीं. आणि तरीहि केवळ आप्तवाक्यावर विश्वास ठेवून ती गोष्ट गृहीत धरल्याविना आत्मचरित्राचें अेक पाऊलदेखील पुढें पडणें अशक्य असतें. केवळ प्रत्यक्ष हेंच प्रमाण मानणें जें अगदीं दुर्घट होतें आणि आप्तवाक्य हें केव्हांकेव्हां प्रत्यक्षाहूनहि, निदान प्रत्यक्षाअितकें तरी, बलवत्तर प्रमाण जें मानावें लागतें तें असें! तीच स्थिति आआीबापांची. माझी ही जननी आणि हे जनक या भावनेस प्रमाण केवळ आप्तवाक्य. खरोखर आपल्या जीवनांत प्रत्यक्षावरच आपण अवलंबूं लागलों, तर जीवन जवळजवळ असंभव होआील. दांत नव्हते तेव्हां आआीच्या दुधाची धार ही जितकी जीवनास आत्यंतिक आधार होती तितकाच प्रत्यक्षाचा जाणता प्रादुर्भाव होण्याच्या आधीं तरी आप्तवाक्य हाच जीवनाचा अपरिहार्य आधार होता. पालापाणी आंगनाग, अित्यादी सर्व वस्तूंचे हिताहितप्रभृति गुणधर्म आप्तवाक्य जर शिकवणार नाहीं, तर परिस्थिति ही त्या प्रत्यक्षाच्या पांगुळगाड्यासच धरून चालणाऱ्यांस आपल्या बाष्परुळाखालीं तत्काळ चिरडून टाकती.

असें सांगतात कीं माझा जन्म मे २८ सन १८८३ सोमवार ह्या दिवशीं नाशिक तालुक्यांतील भगूर ह्या गांवीं आमच्या कुटुंबाच्या 'जुन्या घरांत' झाला. पुढें आमच्या चुलत्यांनीं आणि वडिलांनीं अेक नवें टुमदार घर बांधलें. तेव्हांपासून या वडिलोपार्जित घरास जुनें घर म्हणूं लागले. माझ्या जन्माचें टिपण, पुढें जेव्हां प्रथम प्लेगाच्या आणि नंतर राज्यकर्त्यांच्या कहरांत आमच्या कुटुंबाच्या घरदाराची आणि कागदपत्रांची वाताहात झाली, तेव्हां बहुधा नाहींसेंच झालें होतें. पहिल्यापासूनच ग्रहावग्रहांच्या स्तोमाची मला फारशी भीडभाड वाटत नसल्यामुळें मीं माझ्या जन्मकुंडलीची वास्तपुस्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आजपर्यंतहि केलेली नव्हती. पण माझे ज्येष्ठ बंधु बाबाराव यांना फलज्योतिषाचा छंद पूर्वीपासूनच असल्यामुळें त्यांनीं माझें जन्मटिपण आणि जन्मकुंडली कुठूनशी पुन्हां हुडकून काढली आहे. त्यांच्याकडून तो आणून अिथें दिली पाहिजे. माझ्या आओीचें नांव राधाबाओी आणि वडिलांचें नांव दामोदरपंत अर्थात् अण्णाराव हें होतें. आमच्या तिघां बंधूंच्या जन्मकुंडली अुपलब्ध आहेत तशा खालीं दिल्या आहेत.

आम्हां तिघां बन्धूंची जन्मतिथि व तारीख खालीलप्रमाणें आहे. गणेश दामोदर सावरकर शके १८०१ ज्येष्ठ कृष्ण ९, सूर्योदयात् घटि ४७ पळें ३६, जून १३ सन १८७९. विनायक दामोदर सावरकर शके १८०५, वैशाख



गणेश दामोदर सावरकर



विनायक दामोदर सावरकर



नारायण दामोदर सावरकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कृष्ण ६, सूर्योदयात् घटी ३९ पळे ५५, मे २८ सन १८८३. नारायण दामोदर सावरकर, वैशाख शुद्ध १५ शके १८१०, सूर्योदयात् घटि २५ पळें ३५, सन १८८८. पूर्वी पेशवाईच्या काळांत धोपावकर आणि सावरकर अशीं दोन कुटुंबें आपला भाग्योदय करण्यासाठी कोंकणांतील चिपळूण तालुक्यांतून गुहागर पेटयांतून देशावर गेलीं आणि भगूरजवळील राहुरी हें गांव पेशव्यांकडून त्यांस अिनाम मिळालें अशी आख्यायिका आहे. तें गांव आणि भगूरचीं कांहीं अिनामें आमच्या काळापर्यंत आमच्या घराण्यांत अव्याहत चालत असत. मी लहान असतां त्या राहुरी गांवांत कित्येक वेळां आमच्या जहागिरदारांचा मुलगा म्हणून तेथील भाविक स्त्रीपुरुषांकडून कुरवाळला गेल्याचें समजतें. अितकेंच नव्हे, तर तेथील आमच्या आमराअींत अुभें असतां माझ्याभोवतीं प्रेमानें आणि आदरानें गोळा झालेल्या गांवकऱ्यांत जहागिरदारांच्या मुलास साजेल अशा चिमुकल्या अैटीनें आणि ममताळू अैश्वर्यानें अुभें राहण्याचा आणि वागण्याचा जाणीव यत्न केल्याचीहि लहानपणाची पुसट आठवण मला होते. असेंहि पुसट आठवतें कीं आमच्या आमराअींतील आंब्याच्या गाडया घेऊन कुणबी लोक अुन्हांत घरीं आले असतां त्यांच्या श्रमाची मला दया यावी आणि मीं त्यांस ममतेनें ओसरीवर बैठकीवर बसावयाचा आग्रह करावा, त्यांस थंड पाणी द्यावें आणि विसावा घ्या म्हणावें. ते म्हणाले कीं, "अहो, छोटे जहागिरदार, पण आम्हांस बापूसाहेब (आमचे काका) रागावतील ते !" म्हणजे मी पोरसवदा गांभीर्यानें त्यांना आश्वासावें "माझें नांव सांगा मीं तुम्हास बैठकीवर बसविलें. मग बापू कसे रागावतील !" थोडया वेळानें बापू आले म्हणजें ते म्हणत, "बापुसाहेब, आमच्या छोटया जहागिरदारांच्या वशिल्यानें बसलों आहोंत अिथें आम्हीं. किती ममताळू आहे हो तुमचें मूल !" ते अैकून बापूहि हंसत आणि म्हणत, "आमच्या बाळयाचा वशिला का ? मग काय आमची माय व्याली आहे तुम्हांस अुठा म्हणायची बसा, बसा."

आमच्या कुळाला सावरकर हें नांव कसें पडलें याविषयीं कांहीं निश्चयानें सांगतां येत नाहीं. ज्या गुहागराकडून हें कुटुंब आलें, तिकडेहि सावरकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें अुपनांवच चालू आहे. अर्थात् कोंकणांत असतानांहि हेंच अुपनांव होतें. त्या बाजूस गुहागरपासून सहा मैलांवर पालशेत नांवाचा अेक पाट नि बंधारा आहे, त्यास सासरवाडी म्हणून नांव असल्याचें समजतें. तेव्हां बहुधा या सावरवाडीहून सावरकर हें नांव पडलें असावें. याशिवाय सध्या कांहीं जास्त माहिती मिळत नाही.

आमच्या कोणा अेका पूर्वजांना त्यांच्या संस्कृत विद्येच्या सन्मानार्थ पालखीचा मानहि पेशव्यांकडून मिळाला होता, अशी आमच्या कुळांत आख्यायिका सांगत.

माझे वडील व काका लहानपणीं मला घराच्या माळयावरचें अेक भलें भक्कम लांकूड दाखवून सांगत कीं हें लांकूड त्या पूर्वार्जित पालखीचाच अवशेष आहे. मला अगदीं स्पष्ट आठवतें कीं मी वारंवार त्या लांकडाकडे विषण्ण कौतुकानें बघावें. माझ्या बालसुलभ कल्पनेपुढें त्या लांकडाची जुळवाजुळव होत होत, तेथील खंडोबाच्या देवळांतील पालखीप्रमाणें अेक सजलेली पालखी अुभी राहावी व त्यांत अेक कोणी भव्य पुरुष माझ्या काकांच्या भल्या थोरल्या पागोटयासारखें पागोटें घालून बसलेला दिसावा. आणि मी अिजिप्तच्या खोदकामांत अकस्मात् अुपस्थित झालेल्या समाधिकलपांतील अेखाद्या राजश्रीच्या अवशेषाकडे अेखादा संशोधक बघतो तसें साभिमान आश्चर्यानें त्याकडे बघत विमुग्ध होअून जावें !

आमच्या कुळांतील अनेक पुरुष वेदशास्त्रसंपन्न असून आमच्या कुळांत पूर्वी केव्हां तरी यज्ञदीक्षा घेणारा पुरुष झाला असल्यानें, ' दीक्षित ' म्हणून पदवी असे. आमच्या वडिलांच्या मातुःश्रींचे वडील नांवाजलेले पटाअीत वीर असत. ' मकराणी ' स्वारांचें पथक त्यांच्या पदरीं होतें. ह्याच पथकाच्या साहाय्यानें त्यांनीं अेकदां लुटारूंचें बंड मोडून त्यांच्या मुख्य देवतेची अेक मूर्ति आणली; ती आमची आजी भगूरला घेअून आली. ती अष्टभुजा भवानीची मूर्ति फारच सुंदर असून आमच्या कुलाची कुलदेवी म्हणून गणली गेली. तिच्या जाज्वल्यपणाच्या अनेक दंतकथा आमच्या घरीं आणि गांवांत प्रचलित होत्या. तिला तेथील खंडोबाच्या देवळांत बळी द्यावयाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोय व्हावी म्हणून ठेवली. तिची पालखी समारंभानें निघत असे. आमच्या दाराशीं ती आली म्हणजे आमच्या घरचे कर्ते पुरुष दर्शनास येअीतों ती पालखी अगदीं जड होअी. ती कांहीं केल्या हलत नसे असें भोअी म्हणत. पुढें ही मूर्ति आमच्या वडीलांनीं नवें घर बांधल्यावर घरींच आणिली. तेव्हांपासून तिच्या पूजाअर्चेची मला अत्यंत आवड लागली. माझे वडील नवरात्रींत व्रतस्थ होअूनच तुपाचे दिवे लावून, अुदबत्त्यांनीं घमघमाटलेल्या देवघरांत अेका बैठकीस सप्तशतीचा पाठ करीत तेव्हां ते " या देवी सर्व भूतेषु बुद्धिरूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमोनम :। या देवी सर्व भूतेषु शक्तिरूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमोनम : " अित्यादि त्याच त्या नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमोनमः या धृवपदाचे श्लोक म्हणत असतां मीं अगदीं मंत्रमुग्ध होत्साता जवळजवळ अेखाद्या समाधिस्थासारखा भान हरपून बसलेला असें. माझ्या वयाच्या बाराव्यातेराव्या वर्षांचा तो संस्कार जागृत झाला म्हणजे मला अजूनहि ती रोमहर्षण भावना मोहित करते. किती तरी तें भावसुंदर श्लोक ! मला लहानपणीं वाटे; किती तरी तत्त्वसुंदर श्लोक ! मला आतां वाटतें.

मला माझी स्वतःची अशी जी पहिली सांगण्यासारखी आठवण आठवते ती माझ्या वयाच्या सातव्याआठव्या वर्षाची होय. माझ्या वडिलांचा परिपाठ असे कीं, रात्रीं जेवणें झाल्यावर आमच्या वडील बंधूकडून, रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत, जैमिनी अश्वमेध, असे ओवीबद्ध ग्रंथ वाचवावे आणि आअीशीं त्याच्याविषयीं चर्चा करावी. त्या चर्चेत प्रत्येक कल्प हा अगदीं मागच्या कल्पासारखाच असतो, आणि या कल्पाची अगदीं यथावत् आवृत्ति त्या कल्पामध्ये होते, असा विषय अेका रात्रीं निघाला होता. माझ्या ध्यानांत ती गोष्ट राहिली होती. दुसऱ्या दिवशीं शाळेच्या दुपारच्या सुटींत कारण काय कीं, बहुधा दुपारच्या फराळावरून, मी घरीं येतांच रुसलों. त्या रुसव्यांतच सुटीचा वेळ जाअून आअीशीं प्रत्यहींचें गोड बोलणें झालें नाहीं. शाळेंत जायची वेळ होतांच मला रुसून बसून आअीशीं हंसण्याखेळण्याचें अंतरलें म्हणून कार हळहळ वाटली. मनांत आलें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुन्हां आतां हा गेला क्षण कसचा येणार ? तें सुख आतां नित्याचें अंतरलों. अितक्यांत कालच्या कथेची आठवण होअून समाधान वाटलें कीं कां ? पुढील कल्पांत हा दिवस पुन्हां उजाडणार, हीच आअी, हीच शाळेची आजची सुटी, हाच क्षण पुन्हां येणार. तेव्हां मग आपण रुसलों नाहीं, कीं आजच्या गेल्या क्षणानें हरवलेलें सुख मिळवूं आणि आअीशीं गोड बोलून घेअूं. पण हाय हाय ! लगेच दुसरा विचार आला. पुढील कल्पामध्यें या सगळ्या गोष्टीं जशा जशाच्या जशा घडणार त्याप्रमाणें रुसण्याचीहि चूक घडणारच ! अगदीं आपण आज न घडण्याचा निश्चय केला तरी घडणारच ! कारण प्रत्येक कल्प हा मागच्या कल्पाची अगदीं यथावत् प्रत असतो. तेव्हां गेला क्षण गेला तो गेला. आअीचे गोड शब्द अंतरले ते अंतरलेच. हे अुलटसुलट विचार अेकदम चमकेसारखे येअून गेले. त्या कल्पनेसरसा अुदासीनतेचा संस्कार माझ्या मनास अजूनहि केव्हां केव्हां अुदास करतो.

अेकदां अेक संस्कृत हस्तलिखित पोथी लाल हिरव्या शाअीच्या शब्दांनीं मध्यें मध्यें शोभविलेली अशी अुघडून मीं वाचीत बसलों. कांहीं कळेना तरी नुसत्या वाचण्यानें त्याची गोडी वाटे. तोंच अेकादां अपशकून अकस्मात घडावा तसे दचकून माझे वडील वर आले आणि ती पोथी हिसकीत म्हणाले, 'वेड्या! हें काय करतोस ! तें अरण्यक आहे. तें घरांत वाचूं नये नाहीं तर घराचें अरण्य होतें !' असें बजावत ती पोथी गुंडाळून ठेव झाले. त्या काळीं त्या अर्थवादाचा एका अस्पष्ट भयावांचून मजवर काय परिणाम होणार होता ! पण आज त्या फलश्रुतीची दंतकथा किती कौतुकास्पद वाटत आहे ! त्या अरण्यकांतील आणि त्यांच्या अंतांशीं आरंभ होणाऱ्या अुपनिषदांतील विचार ज्याला या संस्कृतीच्या मायेच्या घरांत राहावयाचें आहे त्यानें खरोखरच वाचूं नयेत. निदान निष्ठापूर्वक तरी वाचूं नयेत. नाहीं तर त्याच मायेच्या घरास जनाकीर्णं मन्ये हुतवह परीतं गृहमिव असेंच तृष्णा वन्हीनें पेटलेलें मानीत तो त्याचा त्याग करण्यास कसा सोडील ? आणि सर्वास्ते फासुका भग्ना गृहकूटंच नश्यति म्हणून अुर्ध्वबाहु विरोदन करीत अेकाद्या बुद्धासारखा तो बाहेर पडल्यावांचून कसा स्वस्थ बसेल ! त्या मायेच्या घराचें रान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्यावांचून कसें राहील ! कारण त्याच्या गृहाच्या ‘ त्यागेनैकेन अमृतत्व मानश: ! ’ या गर्भितार्थास व्यक्तविणारी ही दंतकथा किती कौतुकास्पद आहे ! आणि तिच्या त्या गर्भितार्थाची जी जाणीव पार पुसटून जाऊन तिच्या शब्दासच अक्षरश: सत्य मानणारा विश्वासहि किती आंधळा आहे ! पाण्यांत पाहशील तर दांत पडतील या फलश्रुतीप्रमाणेंच ही फलश्रुति ही अुत्तानार्थी अेक बुजगावणें आहे. आणि माझ्या बंडखोर तात्त्विक मतीला तें अुत्तान अर्थाचें बुजगावणेंच तेवढें दाखविण्यांत मी त्यास न बुजतां जसा ‘ कुठें दांत पडतात.’ म्हणून दांत काढीत पुन: पुन्हां पाण्यांत पाहीं तसाच वडिलास टाळून तीं अरण्यकाचीं रंगीत शाअीचीं शोभिवंत पानें पुन: पुन्हां वाची नी पाहीं. तीं नुसतीं वाचून घराचें रान कसें होणार म्हणून मनामनाशींच पाखंड अुपहास करीं.

✠ ✠ ✠

कोठडींतील पहिला आठवडा

✠ ✠ ✠

[‘ राजा विरुद्ध बंड ’ आणि अितर कांहीं आरोपांवरून परक्या अिंग्रज राज्यकर्त्यांनीं वीर सावरकरांना दोन जन्मठेपेची, ५० वर्षांची सक्त कारावासाची शिक्षा दिली. ती शिक्षा स्वातंत्र्यवीर सावरकर यांस अंदमानांत भोगावी लागली. तेथें ते १४ वर्षें जो खडतर कारावास भोगीत होते त्याची वृत्त आपल्या बांधवांना कळावें यासाठीं त्यांनीं ‘ जन्मठेप ’ या नांवाचें अेक पुस्तक लिहिलें. परंतु तें पुस्तकहि अिंग्रजांनी राजहृत (जप्त) केलें. त्यावरील बंदी अिसवी सन १९४६ मध्यें अुठली. त्या पुस्तकांतील कांही भाग पुढें दिला आहे. ह्या पुस्तकाचें अिंग्रजी आणि गुजराथी भाषांतहि प्रसिद्ध झालेलें आहे.]

✠ ✠ ✠

जमादार मला घेअून सात क्रमांकाच्या चाळींत बंद करण्यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालला. वाटेंत अेक हौद लागला. जमादार म्हणाला, 'यांत स्नान करा.' मी चार-पांच दिवसांत स्नान करूं शकलों नव्हतों. समुद्रप्रवासानें अंग अगदीं मलिन आणि घामोळें झालेलें होतें. म्हणून स्नान करण्याची परवानगी मिळाल्यानें आनंद झाला. पण भिजवायाचें काय ?

जमादार म्हणाला, "ही घ्या लंगोटी ! आतां काम करतांना आणि स्नानाच्या वेळीं नेहमीं ही लंगोटीच नेसली पाहिजे !" मन किंचित् कचरलें पुनः म्हणालें, ' हा रे वेडचा ! अरे, रामदास देखील लंगोटीच नेसत असत. झटपट मीं कपडे काढून लंगोटी नेसूनहि टाकली होती. जमादारास अितर राजकीय बंदीवानांची प्रथमच लंगोटी नेसतांना जी लज्जेनें त्रेधा अुडे ती गंमत पाहावयास न मिळाल्यानें मी बराच निगरगट्ट मनुष्य आहें अशी समजुत त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होती.

कसाबसा लंगोटी नेसून स्नानास आनंदानें गेलों नि लागलों पाणी कटोरा (बंदिवानानें दिलेली थाळी) भर भरून घ्यावयास. तों जमादार ओरडला, " असें नाहीं करावयाचें. हें काळेपाणी आहे. प्रथम अुभें राहावयाचें. मग मी म्हणेन ' लेव पाणी ! ' म्हणजे लवावयाचें आणि पाणी घ्यावयाचें अेक कटोरा. मग मी म्हणेन, ' अंग मळा ' म्हणजे अंग घासायचें हातानें. आणि पुनः मीं म्हटले, ' और लेव पाणी ' कीं पुनः दोन कटोरे पाणी घ्यावयाचें आणि परत फिरावयाचें. तीन कटोऱ्यांत, तीन थाळी पाण्यांत स्नान करावयाचें !'

राष्ट्रीय पापांचें क्षालन

त्या मुसलमान पठाण जमादाराची ही आज्ञा होतांच मी चमकलों. मी क्षेत्राचाच राहणारा असल्यानें नाशिक–त्र्यंबकास संकलपाच्या शिस्तीनें स्नानें करण्याची संवय मला होतीच. मनांत हंसून म्हटलें, तसाच हाहि अेक संकल्पच म्हणावा. तो गोऱ्यापाण्यावरचा संकल्प असे. हा काळेपाण्यावरचा स्नानसंकल्प म्हणावा म्हणजे झालें.

त्या दाढीदीक्षितानें तो संकल्प सांगण्यास आरंभ केला. मी स्नान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करूं लागलों. तों डोळे अेकदम गच्च मिटून जाअून कांहीं दिसेनासें झालें आणि आग होअूं लागली. झालें तरी काय ? संकल्पांत कोठें चूक तर झाली नाहीं ? अितक्यांत कोठेंशी चूळहि भरली गेली ! तों तोंड अेकदम थू थू थू करीत बंड करून अुठलें. जीभ अगदीं खारट झाली.

तेव्हां साहस करून जमादारास विचारलें, " हें पाणी खारट कसें झालें?" तो म्हणाला, " म्हणजे, समुद्राचें पाणी कधीं गोडें असतें कीं काय ?" तेव्हां ध्यानांत आलें कीं, आम्हांला हें समुद्रस्नान होत होतें. पिण्याच्या पाण्याची टंचाअी असल्यानें अंदमानांत स्नानास, कपडे धुण्यास, वापरण्यास सर्व समुद्राचें पाणी वापरावें लागतें. तेंहि नळानें आणून कोंडींत सांठविलेलें.

अंग सगळें चिगचिगीत झालें. केस राठ झाले. स्नान केलें नसतें तरी बरें असें वाटूं लागलें. पण पुन: वाटलें, आतां ही संवय झालीच पाहिजे. लंडन वा पारिसमधले ' टर्किशबाथ ' अुपभोगिलेत-आतां थोडी ' अंदमानिश बाथांची ' ही गंमत नको का अनुभवायला ! राष्ट्रीय पापांचें क्षालन अुंची साबण आणि सुगंधी तेलें लावून अून पाण्याच्या फवाऱ्याखालीं केलेल्या स्नानांनीं आणि संस्कृत संकल्पांनीं होणारें नसून खारट पाण्याच्या ' लेव पाणी ' म्हणून ओरडणाऱ्या कठोर संकल्पाच्या आज्ञेप्रमाणें घेतलेल्या ह्या तीनकटोरी स्नानानेंच होणार आहे !

विनभाड्याचें फक्कड घर

कपडे घालून पुढें चाललों तों अेका विटांनीं आणि दगडांनीं पक्केपणीं बांधलेल्या भिंतींत अुंच लोखंडी गज अेकसारखे मारून खण भिन्न केलेल्या व लाकडाचा स्पर्शहि जिला आगीच्या भयानें झालेला नाहीं, आणि जीमध्यें अेकसारख्या खोल्या सप्रमाण मांडलेल्या आहेत, अशी त्रिताल–तीनमजली–चाळ मला दिसली. त्या रुंद पायऱ्या, तो पांढरा सफेत रंग, ते जिने आणि ती सप्रमाण बांधणी पाहून अेकादा वाडाच पाहावा तसा मनास थोडा आल्हादच वाटला.

मनांत म्हणालों, हीच ती सातव्या क्रमांकाची चाळ. हिच्या या तिसऱ्या मजल्यावर मला राहावयाचें. वा, अुत्तम मोकळा वायु येअील. प्रकाश येअील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वतःचें घर असें असतें तर आपण श्रीमंत ठरलों असतों आणि क्वचित् चार चार महिने या विस्तृत भवनांत आणि या हिरव्या अंगणांत आपण होअून सुखानें राहिलों असतों. मग ही बंदिशाळा ही भावना तेवढी सोडून दिली तर ह्या वाड्यांतहि राहणें अगदींच दुस्सह नाहीं.

राहण्यापुरताच विचार केला तर 'मम' आणि 'न मम' ह्यांतच सुखदुःखाचीं बीजें आहेत असें वेदान्तीहि म्हणतात तें कांहीं व्यर्थ नाहीं. बरें तर, शक्य तो तशीच वृत्ति ठेवावयाची. अेवढें फक्कड घर आणि बिनभाड्यानें मिळालें असतां त्यास बंदिशाळा म्हणून नांव ठेवून अुगीच कां भ्या? कांहीं दिवस येथें गमतीनें कां न राहा?

पण कांहीं म्हणजे किती दिवस? शंकेनें विचारलें आणि कुजबुजला कीं, तेथेंच तर गोम आहे! अंदमानाच्या नियमाप्रमाणें सहा महिन्यांनीं बंदीना गृहांतून बाहेर सोडण्यांत येतें. अितरांपेक्षां आपणावर राग, तर फार तर अेक वर्ष आंत ठेवतील. शिपायांनीं आम्हांस सांगितलें होतें कीं, तीन वर्षांवर कोणीच मनुष्य आजपर्यंत या सिल्व्हर जेलमध्यें अेकसारखा आल्यापासून बंद करून ठेवलेला नव्हता.

तेव्हां फार फार तर तीन वर्षे मला आंत बंद करतील. परंतु कठिणतम तेंच गृहीत धरून त्याच्या प्रतिकाराची मानसिक सिद्धता आधींच करून ठेवावयाची, ह्या माझ्या संकटांत अत्यंत अुपयोगीं पडलेल्या नियमास अनुसरून मी म्हणालों, तेंहि सोडून फार फार तर पांच वर्षे आपणास ह्या खोलींत कोंडून ठेवतील असें गृहीत धरूं या म्हणजे झालें.

ठीक तर. या वाअीट नसणाऱ्या बंदिगृहास आपला वाडा असें समजून पांच वर्षेपर्यंत येथेंच राहावयाचें आणि काव्य रचावयाचें असा, सरकारी आज्ञा म्हणून नव्हे तर आपलाच स्वेच्छ निश्चय म्हणून, नियम करूं या.

या मानसिक खेळण्याशीं खेळतां खेळतां मी तिसऱ्या तळावर (मजल्यावर) पोचून त्या खोलीच्या दारापाशीं येअून अुभाहि राहिलेला होतों. मी तेथें येणार म्हणून ती सर्व चाळ, जींत जवळजवळ दीडशें माणसें असत, रिकामी केलेली होती. केवळ सरकारी दृष्टीनें अुत्तम परंतु बंदिवानांच्या दृष्टीनें चहाड-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खोर, पापी, कुकर्मी आणि अुलटया काळजाचे म्हणून ठरलेले असे तीन 'वॉर्डर' तेवढ ठेवले होते. ते तीनहि बलुची आणि पठाणी मुसलमान होते. त्या तिघा वॉर्डरांच्या हातीं मला सोंपवून, खोलींत बंद करून आणि कुलूप लावून तो जमादार निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजण्याच्या सुमारास ते पठाणी वॉर्डर घाअीघाअीनें माझ्या कोठडीसमोर येअून "साहेब आता है, खडे रहो" म्हणून म्हणाले. मी दारापाशीं आलों. दार म्हणजे कोठडीचें गजांचें नेहमीं बंद ठेवलेलें फाटक. बारीसाहेब आपल्याबरोबर आणखी कांहीं गोऱ्या लोकांना घेअून आले.

"सरकार" म्हणून वॉर्डर ओरडतांच मी तेथील नियमाप्रमाणें सरळ अुभा राहिलों. बारीसाहेब कोठडीच्या गजाच्या लहानशा फाटकांतून दिसूं लागण्यापूर्वीच त्यांचें पोट दिसूं लागलें. कारण त्यांच्या सर्व शरीरास मागें टाकीत आणि अुभ्या जगतास तुच्छपणें आव्हान करीत बारीसाहेबांचें, पृथ्वीचा आकार दाखविण्यासाठीं शाळेंत ठेवलेल्या फुग्यासारखें, तें पोट दोन पावलें त्यांच्यापुढें धांवत असे. आणि त्यांच्या त्या पोटावर मध्यापर्यंत चढलेल्या तुमानीचा तो कातडीपट्टा भूमध्यरेषेसारखा शोभत असे.

सत्तावनच्या युद्धाची चर्चा

बारीसाहेबांनीं सुरुवात केली, "मी तुमचा बंदिपाल आहें म्हणून लोक तुम्हांस सांगत असतील नाहीं ?" मीं नुसतें स्मित करीत पाहिलें. "पण मी तुम्हांस सांगतों कीं मी तुमचा अेक मित्र आहें. मला तुमच्यासारख्या सुशिक्षित मनुष्याबरोबर संभाषण करण्याची फार हौस असते म्हणून मी सहजींच केव्हां केव्हां केवळ मोकळेपणीं बोलण्याकरितां असा येतों. तुम्हीं काय अठराशें सत्तावनच्या त्या दुष्ट बंडाचा अितिहास लिहिला आहे नाहीं ?"

मीं ओळखलें कीं,ही स्वारी शीत चाचपून पाहण्यास आली आहे, आणि माझी अेकंदर प्रवृत्ति बघण्याचा यांचा हेतु दिसतो. मीहि ते काय म्हणतात

(सा....१७)

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें अैकून घेण्यांत आपलाहि अेकलकोंडींत जड झालेला वेळेचा भार थोडा हलका होअील तर पाहावें या बेतांत होतों. मीं म्हटलें, " त्या विषयावर मीं बरींच पुस्तकें वाचलीं आहेत हें खरें. "

ते म्हणाले, "मग अशा दुष्ट लोकांविषयीं तुम्हांस किळस नाहीं आली? काय हो त्यांचें तें पैशाचिक क्रौर्य ! माझे वडील स्वतः त्या बंडांत सांपडलेले होते. ते आम्हांस सांगत, त्या अधम नानासाहेबानें कानपुरास स्वतः अिंग्रजी सभ्य स्त्रियांचे हाल हाल करून त्यांच्या तोंडांत......! असे ते नरराक्षस ! "

मीं विचारलें, "तुमच्या वडिलांनीं हें कृत्य स्वतः पाहिलें ?" ते चटकन म्हणाले, " लखनौला हें कृत्य प्रत्यक्ष पाहिलेल्या अेका कर्नलनें तें त्यांस सांगितलें. " मीं म्हटलें, " तर मग तें खोटें असलेंच पाहिजे. कारण नाना अिंग्रजी स्त्रियांना आणि पुरुषांना बंदींत टाकलें त्या वेळेस लखनौला नसून कानपुरास होते. "

आतां त्या पाहुण्यांतील अगदीं सभ्य दिसणारा अेक गृहस्थ म्हणाला, " परंतु अेकंदरींत नानासाहेब, तात्या टोपी अित्यादि बंडखोरांसारख्या स्वार्थी लोकांचा तुम्हांस तिटकारा नाहीं वाटत काय ? "

मीं त्यांस म्हटलें, "या विषयावर बंदिगृहांत चर्चा करणें तुम्हांस योग्य वाटत असेल तर मी करतों; परंतु येथें मी अेक बंदिवान असून हे बंदिपाल धरले पाहिजेत. नाहीं तर माझ्या तोंडास बंदिवान म्हणून कुलूप ठोकून माझ्या राष्ट्राच्या अितिहाससंबंधीं अेकपक्षीय आणि अपमानकारक अुल्लेख करणें हें निंद्य आणि भ्याडपणाचें वर्तन होय हें तुम्हांस मान्य केलें पाहिजे."

बारीसाहेब म्हणाले, " छे हो, मीं तुम्हांस मघांच सांगितलें कीं, मी येथें मित्र म्हणून सध्यां अुभा आहें. काय पाहिजे ती चर्चा करा. "

" तर मग, " मी अुत्तरलों, " मी मोकळेपणें माझें मत सांगतों. हा अैतिहासिक प्रश्न आहे. आपण नानासाहेबांसंबंधीं आतां ज्या दंतकथा सांगितल्यात त्यांच्या खरेखोटेपणाविषयीं निर्णय करण्यासाठीं अिंग्रजांनींच अेक सरकारी कमिशन नेमलें होतें. आणि त्याचा निर्णय असा ठरला कीं, ह्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अिंग्रजी स्त्रियांवर केलेल्या नैतिक अत्याचारांचीं वर्णनें खोटीं आणि अतिरंजित असून त्यांचा अुगम अिंग्रजी छावणींतील गोऱ्या सोजिरांच्या कुत्सित मेंदूंत आहे. "

ते पाहुणे सत्तावनच्या राष्ट्रीय बंडाच्या अितिहासावरील अेकदोन पुस्तकें वाचलेले असावेत असें दिसलें. ते म्हणाले, "तर मग तुमचें म्हणणें असें आहे काय कीं, अिंग्रजी स्त्रियांची कत्तल बंडखोरांनीं केली ही गोष्टच मुळीं खोटी आहे ? "

मी म्हणालों, "तसें कोण म्हणतों ? ती गोष्ट अगदीं खरी आहे. आणि ती करुणास्पदहि आहे. परंतु त्याचें कारण काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्या स्त्रियांस प्रथम युद्धाच्या बंदिवानांना वागवितात तसेंच वागविण्यांत येअी; हें त्यांच्यांतील अुरलेल्या स्त्रियांच्या आणि अितरांच्या साक्षीवरून अुघड होत आहे. त्या कमिशनच्या पुढील साक्षी मीं प्रसिद्ध केल्या आहेत. परंतु जेव्हां अिंग्रजी सेना कानपूर घ्यावयास वर येअूं लागली तेव्हां अलाहाबादच्या आजूबाजूस असलेलीं खेडींच्या खेडीं आग लावून देअून जिवंत जाळण्यांत येअूं लागलीं आणि त्यांतल्या राष्ट्रीय बंडांत लढत असणाऱ्यांच्या शेकडों बायकामुलांची सरसहा होळी करण्यांत आली !

" तेव्हां त्या बातम्यांनीं कानपूरच्या क्रांतिकारकांच्या सैन्यांत भयंकर क्षोभ अुत्पन्न झाला. अितक्यांत ज्या अिंग्रजी स्त्रिया युद्धबंदिवान म्हणून कारागारांत होत्या त्यांचीं त्या चालून येणाऱ्या अिंग्रजी सेनेस गेलेलीं गुप्त पत्रें आणि त्यांनीं क्रांतिकारांच्या सैन्याच्या धाडलेल्या बातम्या नेणारीं माणसें पकडण्यांत आल्यामुळें चिडून जाअून त्या स्त्रियांचा वध करण्यांत आला.

दोघेहि सारखेच दोषी किंवा निर्दोषी

"या क्रूर कृत्यास जितका दोष द्यावयाचा तितकाच अिंग्रजी सेनेनें केलेल्या अत्याचारांस, ज्यांची ती आंशिक आणि अल्पप्रमाणाची प्रतिक्रिया होती, त्यांसहि दिला पाहिजे, नव्हे काय? आयर्लंडांतील ड्रॉघेडाच्या कत्तलीनें

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कॉम्वेल नरपशु ठरून त्याची अिंग्लंडास लाज वाटली पाहिजे असें तुम्हीं समजतां का ? असल्या भयंकर आणि राष्ट्रीय क्रांतीच्या प्रसंगीं असलीं कृत्यें घडतात ही कितीहि अुद्वेगजनक गोष्ट असली तरी त्यामुळें त्या त्या क्रांतीच्या मूळ अुद्देशांचाच विपर्यास करण्याचें कांहीं कारण नाहीं.

" नानांच्या आज्ञेविना त्यांच्या सैन्यांतील क्रांतिकारक सैनिकांच्या त्वेषास बळीं पडलेल्या प्रत्येक अिंग्रजी स्त्रीच्या वधाच्या आधींच केवळ बंडवाल्यास सळो का पळो करण्यासाठीं हिंदी लोकांच्या दहा दहा स्त्रिया ज्या अिंग्रजी सेनानीच्या जाळपोळीस बळी पडल्या त्या अिंग्रजी सेनानीचे पुतळे अिंग्लंडामध्यें अुभारलेले आहेत. नील आपल्या आन्हिकींत (डायरींत) म्हणतो, ' अिंग्रज राष्ट्राच्या कल्याणार्थ ही निर्दयता अवलंबिणें माझें कर्तव्य होतें. ' सत्तावनच्या क्रांतिकारकासहि तेंच समर्थन अुपयोगी पडणार नाहीं काय ? दोषी असूं तर आपण दोघेहि कमीजास्ती दोषीच आहोंत. नाहीं तर कोणीच नाहीं. "

ते पाहुणे म्हणाले, " मी असें मानतों कीं, तें बंड राजकीय स्वातंत्र्यासाठींच होतें. परंतु आज त्यापासून काय धडा घ्यावयाचा ? "

" तो माझा प्रश्न नाहीं. केवळ अैतिहाअिक म्हणून मीं अितकी चर्चा केली. "

" बरें, आज नाहीं तर नाहीं. पुढें आपण केव्हां तरी तें बोलूं, " असें अगदीं सहजपणें बोललेंसें बोलून आणि माझ्या प्रकृतीविषयीं सहानुभूतिपर विचारपूस करून बारीसाहेब निघून गेले.

कारागारांतील पहिली गुप्त चिठी

आज मला त्या खोलींत बंद होअून चार-पांच दिवस झाले असतील. दुपारच्या वेळीं मी खोलींत बसलों असतां खालून अेक लहानसा दगड गजां-वर येअून आपटला. तो खालीं पडला. पुनः कोणी तो खालून फेकला. तो गजांमधून निघून माझ्या कोठडीच्या दाराशीं येअून पडला. मी अुभाच होतों. समोर खालीं पाहिलें तो अेक वॉर्डर ' तो दगड अुचला ' असें हातानें खुणावून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निघून गेला. मीं तो दगड अुचलला, तो त्याला बांधलेली अेक कागदाची चिठी सांपडली. मी ती अुघडून वाचतों तों खालीं आरडाओरड झालेली अैकली.

दचकलों व दाराशीं येअून हाक मारून पाहिलें तों खालीं अंगणांत पेटी ऑफिसरला माझ्या पाहऱ्यावर असलेला वॉर्डर मोठ्यानें हाका मारून बोलावीत आहेसें दिसलें. मीं तेव्हांच ताडलें कीं, चिठी फेकतांना त्या वॉर्डरला ह्या पाहऱ्यावरच्या पठाण वॉर्डरनें पाहिलें असावें आणि त्याला धरण्यास वा माझी कोठडी अुघडून झडती घेण्यास हा पेटी ऑफिसरला बोलावीत आहे. अितक्यांत तो खोलीपुढें येअून अुभाच राहिला.

मला ती चिठी फाडून टाकावीसें वाटेना, कारण अेवढ्या धाडसानें ज्यानें ती मला पोंचविली त्यानें तींत कांहीं महत्त्वाचें असेल म्हणूनच ती पोचवली असावी. पण ती लपविणें कुठेंहि शक्य दिसेना. मिनिटा-मिनिटांनीं कुलूप अुघडतील. चिठी सांपडली तर आणणारा वॉर्डर, धाडणारे लोक आणि चिठींत कोणाचीं नांवें असतील तर ते या सर्वांनाच संकटांत पडावें लागेल. तेव्हां खोलीच्या कोपऱ्यांत त्या वॉर्डरच्या दृष्टीआड अुभें राहून झटकन शरीरावरच ठेवूं नये तशाहि ठिकाणीं ती चिठी लपवून ठेविल्याविना गत्यंतर अुरलें नाहीं.

तोंच पेटी ऑफिसर आला. अुद्धटपणानें विचारूं लागला. चिठी कोठें आहे ? खडा कोणी अुचलला ? मीं सांगितलें, 'मला कांहीं माहीत नाहीं.' अखेर माझें कोठडीचें दार अुघडून त्या पेटी ऑफिसरानें माझ्या अंगाची झडती घेतली. चड्डी-बंडीची शिवण देखील चाचपून पाहिली, पण चिठी सांपडली नाहीं. अर्थातच हिंदु वॉर्डराची झडती झाली. त्याजपाशींहि कांहीं सांपडलें नाहीं, अर्थातच ते प्रकरण तितक्यावरच मिटलें.

सावधगिरीची सूचना

अिकडे मीं ते सर्व गेल्यावर शरिरांतून चिठी काढून वाचली. तींत तुरुंगांतील स्थितीचें वर्णन दिलेलें होतें कीं त्यायोगें मला तेथें कोणाशीं कसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वागावें तें कळावें. तुरुंगांत त्या वेळेस राजकीय बंदी, बंगालची माणिक-तोळ्यांतील मंडळी आणि अलाहाबादच्या 'स्वराज्य' पत्राचे तीनचार संपादक, अितकेच होते. मला ज्यांनीं चिठी धाडविली ते माझ्या पूर्वपरिचित बंगाली मित्रांपैकीं अेक होते. त्यांनीं असा निरोप धाडला होता कीं, राजकीय बंदिवान म्हणून सर्वांवर सरसहा विश्वास टाकूं नये.

बंगाली मंडळींत धरपकड झाल्यानंतर कांहींजण गुप्त बातम्या सरकारांत देअूं लागले आहेत. त्यामुळें तेथें आमच्यांत दोन पक्ष झाले असून अमक्या अमक्या मनुष्याचें सध्यां अितकेंच काम ठरलेले दिसतें, कीं अधिकाऱ्यास प्रसन्न करून तेलाच्या घाण्यासारख्या भयंकर जाचाच्या कामांतून आपला जीव वांचवावा. त्यासाठीं मागील चळवळींतील न धरलेल्यांचीं नांवें तर त्यांनी दिलींच पण येथेंहि आम्हीं काय बोलतों, करतों तें तो अधिकाऱ्यास कळवितो. तेव्हां अमक्या अमक्यावर विश्वास ठेवूं नका.

बंगालच्या गुप्त कटांतील मंडळींतील ही फाटाफूट वाचून मला कांहीं विशेष धक्का बसला नाहीं. कारण त्यांच्या प्रमुखांना धरलें जातांच कांहींचें धैर्य सुटलें होतें, आणि कलकत्त्याच्या कारागारांतच परस्परांचा विश्वासघात करण्याची अहमहमिका चाललेली होती हें मला बाहेर असतांनाच कळलेलें होतें. कांहींचें जरी असें अध:पतन झालें होतें तरी पण सर्वच विश्वासघातकी झालेले किंवा धैर्यभंग झालेले होते असें मुळींच नाहीं. अितकेंच नव्हे तर, त्यांच्यांत ज्याचे असे कष्ट सहन न झाल्यानें अध:पतन झालें त्यांचीहि मागची सेवा, देशभक्ति आणि स्वार्थत्याग या सद्‌गुणांचा विसर पडूं देणें हें मला अन्याय्य वाटे.

हेरांचें काम

बंगाली राज्यक्रांतिकारकांतील कांहीं प्रमुख व्यक्तींस कष्ट सहन न होअून कसें तरी करून आलेल्या संकटांतून निभावून जावें ही बुद्धि अुत्पन्न झाली आणि त्यापायीं त्यांच्या साथीदारांच्या, अनुयायांच्या अितकेंच नव्हे तर माझ्यासारख्या त्यांच्यांत मागाहून केवळ कारावासांतच प्रत्यक्ष परिचित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालेल्या व्यक्तींच्याहि हालचाली व बोलणीं चालणीं काय काय होतात तें गुप्तपणें अिंग्रजी अधिकाऱ्यांस कळविण्याचें काम करण्यासहि त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं.

ही गोष्ट जरी खरी असली तरी तिचा विचार करतांना हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, त्या मनःस्थितीप्रत त्यांस पोंचविण्यास तसेंच भयंकर हाल आणि अवहेलना आणि शरीरकष्ट कारण झाले होते. तसले शरीरकष्ट आणि अवहेलना सोसूनहि ज्यांचें मनोधैर्य वळलें नाहीं त्यांनाच काय तो त्यांस दोष देण्याचा अधिकार पोंचतो. अुगीच जन्मभर आरामखुर्चीवर लोळत पडलेल्या वाटेल त्या गोमागणेशास तो अधिकार पोंचत नाहीं.

आणि क्रांतिकारकांतील प्रमुखांच्या हातून विश्वासघाताचीं कृत्यें कांहीं बंगल्यांतच किंवा हिंदुस्थानांतच झालेलीं नसून शारीरिक हालअपेष्टांनीं मनोधैर्य खचलेल्या या हिंदी अुदाहरणांहूनहि अधिक किळसवाण्या विश्वास-घाताचीं अुदाहरणें आयर्लंड, रशिया, अिटली अित्यादि प्रदेशांतील राज्यक्रांतीच्या वा धर्मक्रांतीच्या कोणत्याहि भयंकर संग्रामांत आढळून येतात. यामुळें विशेष डगमगून जाणें वा अेकाद्या प्रांतास वा जातीस दोष देत सुटणें मूर्खपणाचें होअील.

भाअी, काम करो !

त्या चिठीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं माझ्या क्रमांकांतील अंगणांत राजकीय बंदिवान वगळून अितर बंदिवान कामासाठीं सोडण्यांत आले. जवळजवळ दोनशे बंदिवान नारळांचें सोलणें, फोडणें, तुकडे करणें अित्यादि कामांवर असत. शेकडों, हजारो नारळ गाड्यांत भरून आणून त्यांचा ढीग घातला जाअी. त्यांत बंद्यांची अेक तुकडी ते सोलून त्या पत्र्यांच्या पडवींतून नारळामागून नारळ फेकीत राही. पत्र्यांस लागून धाड धाड आवाज सारखा चालत राही. तिकडे नारळ फोडणारी तुकडी खटाखट घाव घालून घावागणिक नारळ तोडून फेकून देअी. तें पाणी पिपांनीं भरून भरून वाहून नेण्यांत आणखी अेक तुकडी गुंग होअी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाकी तीस–चाळीस बंदिवान त्या कापलेल्या वाटचांस खुरपणीनें भोसकून खोबरें तुकडचा–तुकडचांनीं कापून भिरभिर नरोटचा भिरकावीत. नारळाचा तुकडा खाणें तर काय पण अगदीं वाहून व्यर्थ जाणाऱ्या नारळाच्या पाण्याच्या पाटांतील अेक थेंब पाणी पिणें हाहि नियमांच्या भाषेंत अपराध होता आणि प्रत्यहीं दोन–तीन बदिवानास त्यासाठीं शिक्षा मिळे. तरीहि अेकदां कामास आरंभ झाला कीं ज्याचें त्याचें तोंड नारळानें भरलेलें, मान खालीं घातलेली आणि डोळे कोपऱ्यांतून कोणी आपल्या भरलेल्या तोंडाकडे पाहात तर नाहींना म्हणून कावरेबावरे होअून गरगर फिरत असलेले !

त्या बाजाराची ती गंमत, ती दाटी, तो गलका, त्या ऑफिसर लोकांच्या " चलो भाअी, काम करो ! अे साला, क्या खाता ? " ह्या आरोळचा, या सगळचा धांदलींत क्षणभर आपण बंदिवान आहोंत याची विस्मृतीच पडे. पण ती कोठपर्यंत ? तर तोंडांतल्या तुकडचास पेटी ऑफिसरनें पाहिल्यामुळें कंबरेवर दाणकन येअून त्याचा सोटा बसला नाहीं तोंपर्यंत !

दहीनारळ

माझ्या पठाण वॉर्डरास त्या दिवशीं तो बाजार पाहतांच खालीं जाअून थोडें नारळाचें पाणी पिअून कांहीं दोन–तीन नारळ मुखशुद्धि म्हणून तोंडांत टाकावेत असें न वाटणें अगदीं अस्वाभाविक होतें. दुपारीं ते राजश्री चाळीचें फाटक अुघडून खालीं अंगणांत गेले, पाण्याचीं–नारळाच्या पाण्याचीं–दोन–तीन शहाळीं कोवळीं कोवळीं निवडून घेअून गटागट पोटांत ओतून दिलीं. आतां मुखशुद्धि तेवढी अुरली. नेहमीप्रमाणें नरोटचांतून नारळ 'खरपून' काढणाऱ्या बंदिवानाची जी लांब ओळ बसली होती तेथें जाअून अेकास 'हात चलाव' म्हणून धमकी दिली.

वॉर्डरला पाहून घाबरून तो बंदी चालवितो म्हणजे काम लवकर करूं लागतो न लागतो तोंच वॉर्डर महाराजांनीं स्वतःच हात चालविण्यास आरंभ केला. आणि शेजारच्या अेका बंदीच्या अुगीच तोंडांत अेक अेक चपराक ठेवून दिली कीं " नारळ खाता है नहीं ? देखो, मुह देखो ! " त्या बंदिवा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाच्या तोंडांत दिल्यानंतर सर्वत्र अनुकूल वातावरण अुत्पन्न झालेसें त्यास वाटलें. आतां आपण कोणासहि नारळांत अुत्तम म्हणून जो 'दहीनारळ' म्हणून तिकडे प्रख्यात आहे तो देण्याविषयीं सांगितल्यास भीतीनें ना म्हणण्याची त्याची प्राज्ञा होणार नाही, असें नेहमींच्या अनुभवानें त्यास पक्कें कळून चुकलें.

तोंच अेका मद्राश्याच्या आणि त्यांतहि नवख्या आलेल्या बंद्याच्या हाताशीं लपवून ठेवलेला दहीनारळ ह्या वॉर्डरसाहेबांच्या दृष्टीस पडला. त्वरित स्वारी तेथें पोंचली. "लाव साला तो नारळ अीदर" म्हणून आज्ञा झाली. पण तो मद्रासी जरा अैटींतच दिसूं लागला. तो मद्रास अिलाख्यांतील अेक नांवाजलेला दरोडेखोर होता. तामिळ तुरुंग अनेकवार पाहून निढावून आतां प्रथमच आलेला, तोहि दहाच वर्षे शिक्षेसाठीं, म्हणून काळ्यापाण्यावर फारसा भ्यालेलाहि नव्हता. त्यांतहि त्यास हिंदुस्थानी खरोखरच फार थोडें येत असल्यानें वॉर्डराच्या अुर्मट आज्ञेस त्यानें जरा अैटीनेंच "अिल्ले" म्हणून ठराविक अुत्तर दिलें.

त्या मद्राश्यास त्या वॉर्डरानें शिवी देअून पुनः तो नारळ मागितला. मद्रासी सामोपचारच बरा असें समजून कळवळून "अिल्ले स्वामी अिल्ले" म्हणून वेड पांघरूं लागला. पठाणानें आणखी शिव्या हासडून "अे काफर है साला, अिसकी चोटी अुखाडना चाहिये" असें गर्जून त्या मद्राश्याच्या शेंडीस हात घातला. आणि शेंडी अशी हिसकली कीं ती अर्धी अुखडून निघाली. शेवटीं अेकदम काय झालें कीं, तो मद्रासी जो अुसळला तो अेक ना दोन शब्दहि न बोलतां त्या वॉर्डरमहाशयाच्या दाढीचा हातास पीळ मारून आणि त्यास अुचलून धाडकन् भूमीवर पाडता झाला, आणि त्याच्या छातीवर गुडघा रोवून ताड ताड तोंडांत भडकावीत चालला.

त्या वॉर्डराच्या पीडेस कंटाळलेले बंदी कुणी आरडाओरड फारशी न करतां जागा धरून गंमत पाहत राहिले. वरतून गजाशीं अुभें राहून हें पाहतांच मला हंसूं कोसळलें. अुभ्या तुरुंगास वॉर्डरमहाशयाची भिवविणारी ती पठाणी टोपी, तो फेटा कुणीकडें गेलेला. आणि ओठांत कांहीं तामिळ शब्द

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुटपुटत तो मद्रासी त्याच्या दाढीस पिळून धरून ठोशामागें ठोसा चढवीत अुरावर बसलेला. अखेर अेकदोन मिनिटांनीं पठाण वॉर्डरानें तोंडांत खातां-खातांच म्हटलें "अब बस हुआ ! माफ करो !"

'माफ करों 'तील 'मा'

पण हिंदुस्थानी जवळजवळ येतच नसल्यानें त्या मद्राश्यास 'माफ करो' ह्यांतील 'मा' तेवढी कळली, आणि त्याला वाटलें कीं वॉर्डर मला अजून मायबहिणीवरून शिव्या हासडतो आहे. जों जों पठाण म्हणे, "अबब ! माफ करो ! माफ करो !!" तों तों "मा" म्हणून दरडावीत तामिळ भाषेंत शिव्या हासडीत तो मद्रासी डोक्यावर ठोसे चढवीत राहिला.

शेवटीं पेटी ऑफिसर व बंदीवान सर्व धांवत आले. ती झुंज सुटली. तीन–चार दहीनारळ खाअून मुखशुद्धि करावी म्हणून वॉर्डरमहाशयास जी अिच्छा अुत्पन्न झाली होती, ती मुखावर खाल्लेल्या मद्रासी ठोशांच्या मुख-शुद्धीवरच तृप्त करून आपले विखुरलेले कल्ले सावरीत सावरीत आणि साफा बांधीत बांधीत स्वारी पुन: त्या चाळीच्या तिसऱ्या तळावर येअून आमच्या पाहऱ्यावर अुभी राहिली !

जणुं सहजगत्या मीं त्यास विचारलें कीं, "काय झालें ?" पठाण वॉर्डर, मीं पाहिलें नसावें असें समजून, अैटीनें म्हणाला, "तो अेक चोर साला, दहीनारळ चोरी करना मंगता था ! वो खूप पीटा गया !" मीं सस्मित अुत्तर केलें, "ठीक ! अेक चोर साला दहीनारळ चोरी करना मंगता था वो साला खूप पीटा गया नहीं !"

'तो साला चोर जो पीटा गया' तो कोण हें त्या पठाणाचें पठाणास माहीत कीं माझें मला !

क्रूर देवतेला नैवेद्य

मी अंदमानास जाण्याच्या पूर्वी जे राजबंदी तेथें गेले त्यांस प्रथम अेकाच चाळींत अेकत्र ठेवण्यांत आलें होतें. त्यांच्यावर अेक पठाण बंदिवान अधिकारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. नारळाचीं सोलून काढलेलीं जाड सालें--ज्यांत नारळाचें फळ सांपडतें तीं, ज्यांस तिकडे 'छिलका' म्हणतात आणि कोंकणांत 'सोडणें' म्हणतात तीं—वाळवून कुटावयाचीं आणि त्यांच्यांतील काथ्या नीट काढून साफ करून द्यावयाचा हें काम त्यांस दिलेलें होतें. हें कामहि कठिणांतलेंच होतें तरी तेलाच्या घाण्याअितकें कठिण नव्हतें.

तथापि काम जरी काबाडकष्टाचेंच होतें तरी सर्वांना अेकत्र राहतां येअी हाच लाभ त्या समाजप्रिय सुशिक्षित मनुष्यांस सुखद होअी. त्यांतील अेक दोघांस कांहीं रोग असल्यानें दूधमिळे तें दूध त्यांच्यावरील पठाण अधिकाऱ्यांस नैवेद्यार्थ गुप्तपणें सर्मपित केलें जात असल्यानें ती क्रूर देवताहि थोडीबहुत कमी अुग्र झालेली असे. या दोन गोष्टींमुळें अेकंदरींत त्या वेळेस राजकीय बंद्यांची अवस्था तुरुंगांतल्या मानानें अगदींच दुःसह नव्हती. माझे ज्येष्ठ बंधूहि त्याच चाळींत असत.

परंतु कांहीं महिने असे जातांच कलकत्त्याहून पाहणीसाठीं अेक पोलीस अधिकारी अंदमानास आले. त्यांनीं येअून राजकीय बंदी 'छिलका' कुटीत आहेत आणि अेकत्रच--जरा अंतराअंतरावरच--ठेवलेले आहेत हें पाहिलें तेव्हां बंदिगृहांतहि माणसांस अितक्या तरी माणुसकीनें वागविण्यांत यावें याचा त्यांना साहजिकच विषाद वाटला. त्यांनीं अंदमानाच्या अधिकाऱ्यांची कानअुघाडणी केली.

तोंडाचा घाणा

तेव्हांपासून मनु बदलला. त्या राजबंदिवानांस निरनिराळ्या चाळींत अेकअेकटें कोंडण्यांत आलें. त्यांनीं आसपास अवाक्षर बोलतांच बेड्य, हातकड्या अित्यादि शिक्षा देण्याचा सपाटा चालला. स्नानाच्या हौदावर किंवा जेवावयास दूरच्या टोकांस बसलें असतां नुसतें 'बरें आहे ना ?' म्हणून खुणा करण्यासाठीं शिक्षा सात दिवस हातकडी ठोकून अुभें राहणें अशा शिक्षा होअूं लागल्या. आणि अंतीं तें छिलका कुटण्याचें काबाडकष्टाचें कामहि माणसांस देणें अन्याय्य वाटून बैलाकडून करवून घेण्याच्या योग्यतेचें तेलाचा घाणा ओढण्याचें तुरुंगांतील कठिणतम काम त्यांस देण्यांत आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खोड मोडली पाहिजे ना! दोन दोन महिने हें काम केल्यानंतर अेक महिना पुन: छिलका देण्यांत येअी कीं पुन: तेलाच्या घाण्यास त्यांना जुंपून देण्यांत येअी. सकाळीं अुठतांच लंगोटी नेसून खोलींत बंद व्हावयाचें. आंत घाण्याची दांडी हातांनीं चाक फिरवतात तशी फिरावयाची. खोबरें त्या अुखळींत पडलें कीं ती अितकी जड जाअी कीं कसलेले हमालदेखील तिच्या वीस फेऱ्या फिरवतांच रडकुंडीस येत.

विशीच्या आंत तें काम चोरदरवडेखोरांसहि सहसा देत नसत. पण राजकीय बंदिवानांनीं मात्र ती दांडी वाटेल त्या वयांत फिरविण्यास हरकत नाहीं असे अंदमानी वैद्यकशास्त्राचें मत असे. त्यामुळें त्या दांडीस हातांनीं अुचलून अर्धा गरका देअून वर केल्यावर बाकीचा अर्धा गरका देण्यांस लागणारा जोर हातांत नसल्यानें तिला लोंबकळून तो पुरा करावा लागें. अितका त्या घाण्यांतील खोबरें पिसण्यांस जोर लागे. कोमल वयाचें ते विशीच्या आंतबाहेरील सुशिक्षित राजबंदी अितक्या कावाडकष्टांस अगदीं अनोळखी असत.

सराशरी सकाळीं दहा वाजेपर्यंत अेकसारखे असे गरके फिरवतां फिरवतां श्वास जड होअी. कोणाकोणांस—नव्हे बहुतेकांस—खरोखरच चक्कर येअून वारंवार खालीं बसावें लागें. दहा वाजतां नियमाप्रमाणें दोन तास कामें बंद असावयाचीं. पण 'कोलूचें' म्हणजे या घाण्याचें काम बंद ठेवलें जाणारें नसे. जेवण येतांच खोली अुघडण्यांत येअी. बंदिवान बाहेर येअून थाळींत भात वरण, पोळी घेअून आंत फिरला कीं दार पुन: बंद. जरी कोणी हात धुवून घामानें भरलेलें अंग साफ करूं लागला तरीदेखील तितका अुशीर सहन न होअून जमादार——म्हणजे बंदिवानांतील बदमाष जो कोणी अधिकारी केलेला असे तो——आअीमाअीवरून शिव्या हांसडूं लागलाच म्हणून समजावें.

हात धुण्यास पाणीच मुळीं कोठून मिळणार ? पिण्यास पाणी मिळण्यासाठीं जमादाराचें आर्जव करावें लागे. कारण कोलूंत काम करतांना तहान मनस्वी लागे. पाणीवाला पाणी देत नसे. चोरून कोणास तंबाखूची चिमूट दिली तरच देअी. जमादारास सांगावें तर तो ओरडे "कैदीको दो·

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कटोरा पानी देनेका हुकूम है, तुम तो तीन पी गया. और पानी तुमारे बापके घरसे लाव ! " जमादाराच्या वास्तविक भाषेचें हें अगदीं सभ्य शब्दांत आम्हीं भाषांतर केलें आहे. हात धुण्याच्या आणि पिण्याच्या पाण्याची जेथें ही स्थिति तेथें स्नानाचें नांव कशास ?

' तेल पूरा करना पडेगा '

स्नानाचेंच कशाला, जेवणाचीहि तीच स्थिति. जेवण वाढून दार बंद करतांच जमादाराला ही चिंता नसे कीं बंदिवान जेवतात कीं नाहींत. त्यास ही चिंता असें कीं, ते पुनः तो कोलू फिरवूं लागले कीं नाहीं. तो सारखा त्या चाळींतील कोठड्यांपुढून ओरडत चाले, " बैठो मत; शाममें तेल पूरा करना पडेगा ! नहीं तो पाटे जावोगे और सजावी मिलेगी वो बात अलग ही ! " हें त्याचें ओरडणें अैकतांच कित्येकांस पुढें घास गिळणेंहि अशक्य होओी.

कारण संध्याकाळीं तेल कमीं भरतांच प्रत्यहीं लाथाबुक्यांखालीं आणि सोट्याखालीं बंदिवान तुडविले आणि पिटले जातांना प्रत्येकजण पहात असे. या धाकानें पोटांत त्या कष्टांनीं भयंकर भूक लागली असतानांहि कोलू फिरवितां फिरवितांच अुभ्या अुभ्या घामाच्या धारा ज्यांत पडतातच आहेत त्या थाळींतील घास तोंडांत भरीत आणि गिळीत आणि कोलू फिरवीत असेंच जेवण आटोपीत असतांना कित्येक बंदिवानांस मीं अनेक समयीं प्रत्यक्ष पाहिलें आहे.

असें तें जेवण जेवून पुनः पांच वाजेपर्यंत तो कोलू फिरवींत राहावें लागे. संवयीनंतर कोणाचा चार वाजतां होओी. अगदीं निढावलेला शंभरांत अेकाद-दुसराच मनुष्य सदोदित पुरें काम म्हणजे तीस पौंड तेल क़ाढूं शके. बाकीचे आज ना अुद्यां अितके काबाडकष्ट करूनहि काम पुरे करण्यास असमर्थ होत. त्यांत जे नवशिके, साधे आणि सापेक्षतः प्रामाणिक असत, हाह हाय ! त्यांच्यावरच जमादार-वॉर्डरांचा मार पडे. पुरें न जेवतांहि काम केलें तरी तेल पुरें न होअून थपडा, लाथा, काठ्या खात थकलेले ते बंदिवान तेल ओतून रडत रडत चाललेले मला अजून दिसत आहेत !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नरमस्वभावी बंदिवानांची ही दशा ! जरा निर्ढावलेला असेल अगर तापट असेल त्यास हातकडी, दंडाबेडी अित्यादि या मारपिटीपेक्षां सुसह्य अशा शिक्षा. या व्यवस्थेनें बंदिगृहांत पाय टाकल्यानंतर असलेला सच्छीलपणा, अुरलेला प्रामाणिकपणा आणि अवशिष्ट असलेली लज्जा देखील माणसांतून निघून जाते. ज्यांची लज्जा निघून जाते तींच माणसे शेवटपर्यंत बंदिगृहांत जगतात. निदान जे कांहीं जगतात ते बहुधा त्यांच्यांतीलच असतात.

रात्रींचें कोलूवरील काम

कारण निर्ढावलेल्या, तापट आणि अट्टल बदमाषांसहि बारीसाहेब अगदींच ढिले सोडीत असें नाहीं. सरळ साध्यांना मारपीट प्रथम प्रथम आणि येतां-जातां होअी. कारण गोगलगायींना तुडविण्याचा पराक्रम करणें वीर पुरुषांस केव्हांहि सोपेंच जातें. त्यांतहि त्या साध्या दुबळ्या कोडग्यांस मारपीट चाललेली पाहून ज्या बदमाषांचें तेल पुरें झालें नसे त्यांसहि अधिक त्रास दिला तर आपणासहि असेंच प्रायश्चित्त मिळेल ही भीति सहाजिकच पडे आणि त्यांतील कांहीं काम पुरें करण्यास धडपडत.

अितक्यावर अेकाद्या दिवशीं खोबरें ओलें असलें आणि कोणाचेंच तेल संध्याकाळपर्यंत पुरें झालें नाहीं, तर बारीसाहेबापाशीं दुसरी अेक तोड होती तिचा अुपयोग होअी. हे बंदिवान लोक कट करून काम कोणीच पुरें करीत नाहींत असें मोठमोठ्यानें गर्जत सुमारें पांच वाजतां संध्याकाळीं जेव्हां सायंकाळचें भोजन वाढण्यास येअी तेव्हां ज्यांचें तेल पुरें तीस पौंड होणार नाहीं त्यांस तें पुरें होअीतों जेवण मिळणार नाहीं म्हणून आज्ञा सुटे. सकाळीं सहापासून अविश्रांत अुभ्या अुभ्या जेवत दुपारचे अकरा वाजतां जेवून संध्याकाळपर्यंत सारखा कोलू फिरवीत जे श्रांत झालेले त्यांत तेल पुरें केलेले दहापांच बंदिवान जरी असत तरी बाकी चाळीस-पन्नास कोलूवरील लोक खरोखरच अशक्य म्हणूनच तेल पुरें करूं शकलेले नसत. पण बारीसाहेब खुर्ची मागवून घेअून, त्या चाळीस कुलूप ठोकून, सर्व बंदिगृहांतील कामें बरोबर पांच-सहा वाजतां आटोपून, नियमाप्रमाणें सर्व तुरुंग बंद झाल्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतिवृत्त (रिपोर्ट) कळवून, केवळ तेवढ्या चाळींतील काम ठासून चालवीत बसे. त्या नियमास पायाखालीं तुडवून चाललेल्या रात्रींतील कामाची बातमी बाहेर फोडण्याची कोणा शिपायाची वा नोकराची काय माय व्याली होती? बारीसाहेब आठवड्याच्या आंत त्याच्यावर कोणतें कुभांड वा खटला रचून त्यास खड्डयांत पाडील याचा कांहीं नियम थोडाच होता!

तेव्हां सात-आठ-नअू, रात्रीं नअू वाजेतो कोलू फिरवीत असत! येतां जातां शिपाअी जमादार मारहाण करीतच आहेत, रात्रीं तासामागें तास वाजत आहेत, सर्व बंदिगृह निजून आहे, तेवढी कोलूची चाळ कर्ररं करीत काम करीत आहे, बारी चाळीच्यापुढें खुर्चीवर डुलक्या घेत आणि मधूनच आअीमाअीवरून शिव्या हासडीत "अवतक तेल नहीं हुआ तो मारो सालेको बेत, कल मारना तो आज मारो" असें ओरडत पडलेले असत.

रोगाचें ढोंग

ज्यांच्या हातास कावाडकष्ट शिवले नाहींत, ज्यांच्यांत कॉलेजांतील अध्ययन अध्यापन केलेले लोक होते, अशा राजकीय बंदिवानांस—त्यांच्यांतील सतरा वर्षांच्या मुलांसहि—याच कोलूचें काम महिनोगणती देण्यांत आलें. त्यांच्या कष्टास पारावर अुरला नाहीं. त्यांतहि कांहीं आजारी पडले तेव्हां तर मरण बरें असें त्यांस वाटूं लागलें. कारण आजार भयंकर स्वरूपाला पोचेतों ढोंग या कोष्टकांत मोडे.

त्यांतहि ताप असला——१०१ च्या वर तो ताप समजला जाअी—तर राजबंदी रुग्णालयांत नव्हे तर कोठडींत कामाविना बंद केला जाअी. साधारण चोरी, आगलावी, दरवडे, गळेकापी अित्यादि पोर्ट ब्लेअरच्या नीतिशास्त्रांतील क्षमार्ह अपराध करणारांस मात्र रुग्णालयांत आजारी म्हणून अेक बाज निजावयास देअून ठेवण्यांत येअी. पण ताप किंवा रेच किंवा अुलटचा असे प्रत्यक्ष रोग नसून डोकें दुखणें, हृदयविकृति, जीव घाबरणें अित्यादि अप्रत्यक्ष रोगांनीं ज्यास जर्जर केलें त्यांची दशा पुसावयास नको. त्यांच्या रोगाचें निदान ढोंग वा कामचुकारपणा या दोन दुखण्यांनीं पछाडलेल्यांतच करण्यांत येअी. वेळीं शिक्षाहि देण्यात येअी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं कीं बंदिवानांतील अट्टल सोद्यांपाशीं वाटेल तेव्हां भयंकर ताप वा रेच वा रक्ताच्या अुलटचा व्हाव्या अशीं औषधें आणि युक्त्या असत. पण हीहि गोष्ट खोटी नाहीं कीं, असल्या औषधांनीं १०३-४ पर्यंत तापानें फणफणत पडलेलें पुरवलें वा तीव्र पोटदुखी होअून रक्ताचे दहा दहा रेच झाले तरी बरें, पण ही कोलूची यातना कांहीं दिवस तरी चुको असें सळो का पळो होण्याअितके ज्या कोलूचे कष्ट असह्य होत-वदमाषांसहि असह्य होत-त्याच कोलूस बंदीगृहाचें तोंड प्रथम पाहणाऱ्या राजबंदीसहि जुंपण्यांत येअी.

अशा कष्टभोगी पुरुषांत माझ्या ज्येष्ठ बंधूंची गणना प्रामुख्यानें झालेली असे. कारण त्यांस घरापासून अर्धशिशीची व्यथा असे. त्या अर्धशिशीचें दुखणें आणि ठसके सोशीत दिवसभर कोलू फिरवीत माझे ज्येष्ठ बंधु संध्याकाळीं तेल मोजून देअून हुश्श करून जों त्या निजावयाच्या कोठडींतल्या लाकडी ओंडक्यावर-फळ्यावर-अंग टाकीत तों सारें अंग ठणकावयास आरंभ होअी. कोठें झोप लागली न लागली तों दुसरी सकाळ. कीं, पुनः अर्धशिशी, तो जमादार, तो जाच आणि तो कोलू दत्त म्हणून अुभा राही. असे आठवडे, महिने कष्टांच्या पराकाष्ठेंत काढले आणि असा जन्म काढावयाचा !

नको हें जीवन !

ते हाल किती सांगावेत ! अंदमानांत बंदिवानांस कामाचे, अन्नाचे, वस्त्राचे, मारहाणीचे अित्यादि अनेक प्रकारांविषयीं जे त्रास देण्यांत येत असत त्यांत अेक दिसण्यांत अगदीं किरकोळ, सांगण्यास अगदीं संकोचास्पद परंतु सहन करण्यास अगदीं स्वतःचा स्वतःसच तिटकारा आणून नको हें जीवन असें वाटविणारा त्रास म्हटला म्हणजे बंदिवानांस मलमूत्राचा अवरोध करण्यास भाग पाडणें हा होय.

सकाळीं, दुपारीं आणि संध्याकाळीं या वेळांव्यतिरिक्त सौचास जाणें म्हणजे जवळजवळ अपराध मानला जाअी. रात्रीं बंदिवानांस सहा-साताला जें कोंडून टाकण्यांत येअी तें सकाळीं सहाला अुघडण्यांत येअी. त्या अवधींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लघ्वीला केवळ अेक मडकें आंत ठेवीत. अुभ्या रात्रीच्या या बारा तासांत बंदिवानांस शौचास न लागली पाहिजे असा बारीचा नीतिनियम असे.

अशा त्रस्त स्थितींत कांहीं बंदिवान मलावरोध करणें अशक्य होअून त्या कोठडींत भुअीवरच परसाकडे बसत. रात्रभर त्या आठदहा फुटांच्या खोलींत त्या मळाशींच अुसें ठेवून निजल्यावर सकाळीं कुलूप अुघडतांच भंग्याची मनधरणी करीत कीं, तुला चोरून तंबाखूची चिमटी देअीन, तूं गुपचूप तो मळ काढून टाक.

गाअीबैलांसहि मलमूत्रोत्सर्ग यथाप्राप्त करण्यास ते कामास जुंपलेले असतांहि वा रात्रीं-बेरात्रींहि अडथळा करणें क्रूरपणाचें समजलें जातें. पण राजकारणांत वा राज्यक्रांतींत भाग घेणारा मनुष्य त्या पशूंसहि मिळणाऱ्या स्वातंत्र्यास अपात्र ठरून यथाप्राप्त मलमूत्रोत्सर्ग दुपारीं बारा ते सहा आणि रात्रीं सर्व रात्रभर करण्याचें सौख्य भोगण्याचें धाडस करील तर शिक्षेश पात्र होय असें अंदमानीय नीतिशास्त्र समजे.

अंदमानाच्या बंदिगृहीं दंडविज्ञानाचें हें नीतिशास्त्र बदलण्यासाठीं कमिशनरपर्यंत अर्ज गेले, पण बारीसाहेब म्हणावयाचे, 'हें सर्व खोटें आहे महाराज ! या जमादारास विचारा मी कधीं अशी पीडा देतों का तें. हें लोक मजविरुद्ध कट करतात आणि असे खोटे आरोप आणतात !' कमिशनर आणि अितर अधिकाऱ्यांनीं म्हणावें, 'पुन: खोटें आरोप कराल तर शिक्षा होअील.'

अखेर परसाकडे आणि लघ्वी लागणें किंवा लागून तिचा अवरोध करणें अशक्य झाल्यावर तरी ती करूं देणें, हा शिस्तीचा भंग वा अपराध नव्हे असें ठरवून घेण्याचा महत्त्वाचा राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यासाठीं हिंदुस्थान सरकारच्या गृहमंत्र्यांपर्यंत चळवळ करावी लागली.

पहिला संप

हा सर्व छळ पुढें अितका असह्य झाला कीं त्या छळाचा प्रतिकार नसला

(सा...१८)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरी प्रतिषेध म्हणून सक्त कष्टाचें काम करावयाचें नाहीं म्हणून राजबंदींनीं निश्चय केला. तो प्रथमतः घाण्याचें काम नाकारण्याच्या संपांत व्यक्त झाला. हाच सेल्युलर बंदिगृहांतील राजकीय बंदिवानांचा पहिला संप होय. हा फार लहान होता. परंतु बंदिगृहांत आणि बारीसाहेबांच्या छातीवर कटानें संप होणें ही गोष्ट अितकी धाडसाची मानली जात असें कीं, त्या थोड्याशा लोकांनीं पण जुटीनें कामाचा अिन्कार करतांच शेकडों बंदिवानांत मानसिक खळबळ अुडून गेली.

जे राजबंदी संपांत समाविष्ट झाले त्याजवर शिक्षांचा भडिमार सुरू करण्यांत आला. आठ दिवस हातकडी, बेडी, कोठडीबंदी अित्यादि नैयमिक शिक्षा तर देण्यांत आल्याच. परंतु नियमाविरुद्ध शिक्षाहि ठोठावण्यांत येअून जे अगदीं निधड्या छातीनें वागत त्यांची गुर्मी जिरविण्यासाठीं दहा–दहा बारा–बारा दिवस त्यांनीं कांजीविना दुसरें खाण्यासहि देण्यांत आलें नाहीं. पण त्यांस असे नुसत्या दोनदां तीनदां दिलेल्या पेजेवर ठेवून त्यांची शक्ति कमी झाली असतां तें मनानेंहि दुर्बळ होतील, अशा आशेनें त्यांस छळण्यांत येअुं लागलें.

मला या सहबंदिवानांनीं शपथेवर असें सांगितलें आहे कीं, अेका बाजूला त्यांस पेजेवर ठेवून दुसरीकडे, ते विरुद्ध जात असतां, कोयनेलचे घोटचे घोट त्यांच्या घशांत ओतले जात. त्यायोगें चक्कर येअून पोटांत आग होअून त्यांस फारच त्रास होअी. पण ह्या सर्व त्रासानें संपवाले हरत नाहींत अितकेंच नव्हें तर त्यांचा हा अेकोपा आणि धैर्य पाहून अितर बंदिवानांवरील बारीचा अमानुष धाक अुडत चालला आहे, हें ओळखून, अखेर, आता आम्हीं तुम्हांस कोलूवर वारंवार धाडणार नाही अितकेंच नव्हे पण अितर बंदिवानांप्रमाणें तुम्हांसहि तुरुंगाच्या बाहेर प्रदेशांत काम करण्यास सोडण्यांत येअील, असेंहि आश्वासन देण्यांत आलें.

तुम्ही राजबंदी नाहीं ?

मी तुरुंगांत प्रथम आलों त्या वेळचा हा वृत्तान्त आहे. सरासरी आठ-पंधरा दिवस मला वरच बंद ठेवल्यानंतर खालच्या चाळींत दिवसा काम कर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्यास आणलें आणि प्रथम मागें वर्णिलेलें छिलका कुटण्याचें काम दिले. वास्तविक छिलका दोन वा दीड पौन्ड देण्यांत आला. ही मजवर विशेष कृपा होय असें बारीनें मला माझ्या योग्यतेवर अेक गोडसें व्याख्यान देअून सांगितलें. तें जरी दयाळूपण असलें तरी माझ्या हातांत तीं नारळाचीं सुकलेलीं कवचीं मअू लागावींत अितकें मार्दव कांहीं त्या दयेंत असणें शक्यच नव्हतें. तेव्हां कुटून कुटून माझे हात सोलून निघाले. स्नायू सुजून दुखूं लागले. तळहातास मोठेमोठे फोड येअून आणि तसेंच कुटावें लागून रक्त वाहूं लागलें होतें.

मी सुपरिंटेंडेंटास तो हात दाखवून म्हटलें, "काम बदलतां येणार नाहीं का ! निदान कांहीं दिवस बंद ठेवलें जावें काम !" त्यांनीं अेका वाक्यांत " तसें सगळ्यांचेंच होतें. तुम्हांस अेक पौन्ड छिलका दिला. दोन दिले नाहींत हीच सरकारी कृपा समजा !" असें अुत्तर दिलें आणि ते चालते झाले. अर्थात व छिलका तसाच कुटावा लागला. मी तशा कुटून काढलेल्या आणि बांधून दिलेल्या काथ्याच्या जुडीवर कित्येक वेळां ते रक्ताचे थेंब पडलेले असत.

पण तो पौंडभर आहे कीं नाहीं हें पाहण्याच्या धांदलींत तो कुटणाऱ्या हाताच्या रक्तानें माखलेला आहे कीं नाहीं हें पाहण्यास बारीसाहेबांस वेळ मिळत नसे. तथापि प्रत्यहीं संध्याकाळीं येअून बारीसाहेब मजशीं इंग्रजीमध्यें दहा–पांच मिनिटें बोलविल्याविना जात नसत. त्यांच्या बोलण्यांत लवकरच तेथील राजबंदिवानांच्या संपाचा अुल्लेख येअूं लागला.

' हें पाहा, सावरकर, ह्या लोकांच्या तुम्ही नादीं लागूं नका. हीं भिकारडीं माणसें. तुम्ही शिकलेले आहांत. यांचें काय ? आठ–दहा वर्षें भरून हे आतां घरीं जातील, तुमचें तसें नाहीं. तुम्हांस पन्नास वर्षें शिक्षा आहे, आणि तुम्ही राजकीय बंदी नाहींत. तेव्हां यांच्याशीं सहानुभूति, यांच्या संपांत भाग घेणें किंवा यांच्याशीं नुसतें बोलणें–चालणें ठेवल्यासहि तुमची हानि होअील.

मी राजकीय बंदिवान नाहीं हें त्या दिवशीं मला प्रथम कळलें. तें मला पटावें म्हणून किती वेळां बारीनें, सुपरिंटेंडेंटानें आणि अितर वरिष्ठ अधि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांनीं प्रतिकाराचा नी प्रती छपविण्याचा चंग बांधला.

काऱ्यांनीं घोकलें असेल त्याची गणति नाहीं ! बारीसाहेब गेले. माझ्यासमोर राजबंदिवानांस ती धमकी दिल्यानें आपणासहि अशा शिव्या आणि धमक्या आणि हाणमार सोसावी लागेल असें वाटून मीं दबून जावें म्हणून बारीनें हें प्रत्यक्ष वस्तुपाठीय अुदाहरण मला दाखविलें होतें. तें पाहून मला त्या राजबंद्यांची दया आली. त्यांचीं म्लानवदनें पाहून मीं म्हटलें, 'माझ्यासमोर तुम्हांस तो बंदिपाल अश्लील भाषा बोलला म्हणून तुम्ही मनांत संकोच करूं नका आणि धीर खचूं देअूं नका. आज ते तुम्हांस भिकारडे म्हणत आहेत, अुद्यां मला म्हणतील. हा अपमान तुमचा नसून तुम्हांस असले दुःशब्द जो बोलतो तो स्वतःचाच अपमान करून घेतों. आज आपण अवश आहों. आज आपला या जगतांत अपमान होअील पण असाहि अेक दिवस क्वचित येअील कीं अंदमानाच्या

याच कारागारात पुतळे अुभारले जातील

आणि येथें हिंदुस्थानाचे राजबंदिवान राहात असत म्हणून हजारों लोक यात्रेस लोटतील !"

✠ ✠ ✠

'मॅझिनी'ची राजहती आणि मुक्ति

✠ ✠ ✠

[स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आत्मचरित्राच्या अप्रसिद्धभागांतील लंडनमधील क्रान्तिकाऱ्यास अनुलक्षून असलेल्या मजकुरांपैकीं हा अखेरचा लेख आहे.]

✠ ✠ ✠

हें पुस्तक म्हणजे कांही अेखादी कादंबरी नव्हतें. तरीहि, सर्वसामान्य महाराष्ट्रीय जनतेनें त्याला ज्या अपूर्व अुत्कंठेने स्वागतिलें त्यावरून अप्रत्यक्षतः राष्ट्रीय पक्षाच्या आणि प्रत्यक्षतः वर अुल्लेखिलेल्या गुप्त संस्थांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चळवळींनीं महाराष्ट्रीय जनतेची मनोभूमिका किती क्रान्तिप्रवण करून सोडलेली होती याची कल्पना येते. ज्या क्रान्तिमार्गदर्शनाची अुत्कट जिज्ञासा लागली होती तेंच तिला अैकावयास मिळालें. अुन्हाळचाच्या शेवटीं तृषाक्रान्त झालेली भूमि जशी पावसाच्या पहिल्या सरी घटघट पिअून टाकते तद्वतच स्वातंत्र्योत्सुक परंतु त्या वेळच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत किंकर्तव्यमूढ झालेल्या महाराष्ट्रीय देशभक्तांच्या मनोभूमीने ह्या पुस्तकांतून मॅझिनीच्या क्रान्तिकारक अुपदेशामृताचें आकंठ पान केलें. अेकेक प्रत वीस पंचवीसजण वाचीत असें शासनीय गुप्तहेरांचींच प्रतिवृत्तें म्हणतात. हरिविजय, नामविजय प्रभृति धर्मग्रंथांना जसें पालखींतून मिरवीत नेतात तसें कांहीं ठिकाणीं या ग्रंथाला लोकांनीं पालखींतून मिरवीत नेलें. अनेक तेजस्वी पालकांनीं आपल्या मुलांमुलींकडून या ग्रंथाच्या प्रस्तावनेंतील भाग कसे तोंडपाठ करून घेतले तें श्री. केळकरप्रभृति क्रान्तिकारकांनीं त्यांच्या आठवणींतून सांगितलेलेंच आहे.

राजहृतीची राजाज्ञा

अर्थातच मॅझिनींच्या शब्दांतून का होअीना पण राज्यक्रान्तीची अशी अुघड अुघड शिकवण देणारा ग्रंथ ब्रिटिश शासनीस (सरकारी) अधिकाऱ्यांच्या वक्रदृष्टींतून सुटणें शक्यच नव्हतें. तथापि, सावध होअून प्रतिकार करणारी योजना आखीत आहेत तोंच दोन अेक महिन्यांच्या आंत त्याची पहिली आवृत्ति तर हातोहात अुडाली होती, पण दुसरी आवृत्ति लगेच छापण्याचें प्रासिद्धक बाबाराव सावरकरांनीं वृत्तपत्रांत दिलेलें पाहून राज्याधिकाऱ्यांनीं तो मार्ग अवलंबिला नाहीं. त्या प्रचाराला तत्काल प्रतिबंध करण्याचें ठरविलें. हा प्रतिबंध त्या वेळच्या निर्बंधाप्रयाणें (कायद्याप्रमाणें) दोन रीतींनीं करतां येत होता. अेकतर राजद्रोहाच्या आरोपाखालीं मॅझिनी पुस्तकाचे लेखक, प्रकाशक, मुद्रक यांच्यावर खटला भरून त्यांत तें पुस्तक न्यायालयांत राजद्रोही ठरतांच त्या त्रिवर्गांना शिक्षाहि देतां येते आणि तें पुस्तकहि राजहृत (जप्त) करतां येतें; परंतु अधिकाऱ्यांना हा मार्ग संशयास्पद वाटला. कारण वर सांगितल्याप्रमाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझ्या प्रस्तावनेंत किंवा मॅझिनीच्या लेखांच्या भाषांतरांत हिंदुस्थाननें ब्रिटिशांविरुद्ध ह्या मार्गांनीं सशस्त्र क्रान्ति करावी असें स्पष्टपणें मीं कुठेंच सांगितलेलें नव्हतें. ब्रिटिशांचें नांवसुद्धां त्यांत आढळणें कठीण होतें. मी प्रस्तावना नी पुस्तक लिहितांना ही जी सावधगिरी शक्यतों घेतली होती तिचा असा कांही तरी अुपयोग झाला खरा. कारण न्यायालयांत तें पुस्तक नी त्याचे लेखक, प्रकाशक राजद्रोही ठरतीलच अशी नैर्बंधिक निश्चिति राज्याधिकाऱ्यांना वाटली नसावी. आणि जर तें पुस्तक न्यायालयांत राजद्रोही ठरलें नाहीं तर तें राजहृतहि करतां येतें ना ! ह्या अडचणींमुळेंच लेखक-प्रकाशकांना कडक शिक्षा देअून त्यांची खोड मोडण्याची अुत्कट खुमखुमी मनांत असतांहि, हें अुघड आहे. पण वहुधा प्रस्तावना लिहिण्यांतल्या माझ्या सावधगिरीमुळे आम्ही लेखक, प्रकाशक, मुद्रक जरी खटल्याच्या संकटांतून सुटलों तरी आम्ही पुस्तकाला कांही वांचवूं शकलों नाही. कारण त्या वेळच्या निर्बंधाप्रमाणें न्यायालयांत न जातांहि वाटेल तें पुस्तक राजहृत करण्याचा अधिकार राज्याधिकाऱ्यांना दिलेला होता. यास्तव शासनानें (सरकारनें) अधिक निश्चितीचा नी परिणामकारकतेचा तो दुसरा मार्गच अवलंबिला आणि खटला-बिटला कांही न भरतां तें मॅझिनीचें पुस्तक पहिल्या आवृत्ति-सुद्धां अेकदम राजहृत (जप्त) केल्याचें राजपत्रकांत (गॅझेटमध्यें) प्रसिद्धिलें.

प्रती जतन केल्या

राजहृतीची (जप्तीची) ही राजाज्ञा सुटतांच महाराष्ट्रभर त्या पुस्तकाच्या प्रती पकडण्यासाठीं शेंकडो ठिकाणीं घरांच्या, दुकानांच्या नि व्यक्तींच्या झडत्या चालूं झाल्या. लोकांनींहि प्रतिकाराचा नी प्रती छपविण्याचा चंग बांधला. झडत्यांत पक्का सुगावा लागल्यामुळें आरक्षकांनीं ज्या प्रती यत्रयत्र पकडल्या त्यांचीं गमतीचीं वर्णनें वृत्तपत्रें शासनाची कुचाळकी करण्याकरिता हेतुतः छापीत. कांहीं ठिकाणीं कोनाड्यांत दहा-पांच प्रती घालून ते कोनाडे सलग भिंत दिसेल असे बुजवून वर गिलावा करून टाकलेले आढळले. कांहीं ठिकाणीं जुन्या काळच्या आडांतून आणि विहिरींतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीं गुप्त गव्हरें असत त्यांत प्रती लपविलेल्या सांपडल्या. अशा कांहीं चारशें-पांचशें प्रती पकडल्या गेल्या. त्या सोडल्या तर अुर्वरित सर्व प्रती लोकांनीं अुणींपुरीं चाळीस वर्षें जुनाट निधीप्रमाणें संकटांना भीक न घालतां महाराष्ट्रभर जतन करून ठेवल्या. पुढें जेव्हां ‘ अभिनव भारता’च्या अनेक शाखांवर निरनिराळ्या ठिकाणीं गुप्त कटांचे खटले चालू झाले तेव्हां अशी अेखादी प्रत अेखाद्याच्या घरांत सांपडणें हा तो मनुष्य क्रान्तिकारक असल्याचा अेक स्वत:सिद्ध पुरावाच धरण्यांत येअू लागला ! तरीहि लोकांनीं त्या प्रती जतन केल्या आणि लपून छपून निदान दोन पिढ्यांच्या तरुण वर्गांतून त्या पुस्तकाचें पारायण अखंडपणें चालूं होतें.

१९४६ मध्यें बंदी अुठली

ह्या पुस्तकावरील राजहृति (सरकारी जप्ती) अुठविण्याचे प्रकट प्रयत्नहि जनतेनें अनेकवेळां केले. सभांतून त्यांतील अुतारे अुघडपणें वाचून दाखवून निर्बंधभंगहि केला आणि त्यासाठीं बंदिवासहि भोगला. तथापि, अिंग्रजी शासनानें ती बंदी अुठविली नाहीं.

कालक्रमानें फार पुढची असतांहि ह्या पुस्तकासंबंधीं जी काय माहिती सांगावयाची ती अिथें अेकत्र सांगून टाकावी हें अिष्ट असल्यानें विषयानुबंधाचाच अवलंब करून तीहि सांगून टाकतों कीं, हें पुस्तक राजहृत झाल्यानंतर पुरेपूर तीसअेक वर्षांनीं जेव्हां प्रांतिक स्वायत्ता हिंदुस्थानला मिळाली तेव्हां जनतेचें म्हणविणारें काँग्रेसचें मंत्रिमंडळ मुंबअी प्रांतांत अधिकारावर आलें होतें. परंतु, त्या काँग्रेसच्या मंडळाचीहि ह्या पुस्तकावरील बंदी अुठविण्याची छाती झाली नाही, त्याला तशी अिच्छाहि नव्हती. कारण ह्या पुस्तकांतील क्रान्तिकारक कार्यक्रमाचा प्रचार जनतेंत होअू नये अशी त्या वेळच्या त्या ‘ अहिंसक ’ काँग्रेसी गोटाची अिंग्रजाअितकीच धडपड चालू होती. वास्तविक पाहतां त्या वेळेस जे काँग्रेस, हिंदुमहासभा, रॉयिस्ट, सोशालिस्टप्रभृति पक्ष होते त्यांपैकीं अनेक जणांना देशभक्तीची, देशस्वातंत्र्याची आणि क्रान्तिप्रवणतेची पहिली प्रेरणा त्यांच्या तरुणवयीं ‘ अभिनव भारत ’—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

च्या ह्या पुस्तकासारख्या प्रकट वाङ्मयानेंच मिळालेली होती. त्यांच्यापैकीं कित्येक पुढाऱ्यांनीं तरुणपणांत 'अभिनव भारत' या संस्थेचें सदस्यत्वहि स्वीकारलेलें असून आमचे पोवाडे आणि ह्या पुस्तकांतील निवडक भाग तोंडपाठ केलेले होते ! तथापि, हिंदुमहासभावादी हिंदुत्वनिष्ठांचा तेवढा अपवाद सोडल्यास त्यांच्यापैकीं कोणताहि पक्ष हें सर्व अिंग्रजांनीं राजहृत केलेलें क्रान्तिकारक वाङ्मय मुक्त करण्याची मागणी करण्यास पुढें आला नाहीं.

तथापि, काळ आणि राजकारण अितकें झपाट्यानें पुढें जात होतें कीं 'मॅझिनी' चें पुस्तक सन १९०७ मध्यें प्रसिद्ध होअून जवळ जवळ चाळीस वर्षें गेल्यानंतर मुंबअी प्रांतांत जेव्हां कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ पुन्हा अधिकारारूढ झालें त्या वेळेस त्याचे मुख्य प्रधान श्री. बाळाराव खेर–जे त्यांच्या तरुणपणीं महाशाळेंत (कॉलेजांत) असतां 'अभिनव भारता' चे प्रतिज्ञाबद्ध सदस्य झालेले होते – त्यांच्या त्या मंत्रिमंडळानें लोकांची सतत चालत आलेली मागणी पुरविली आणि ह्या पुस्तकावरील आणि अेकंदर 'सावरकर वाङ्मया'वरील बंदी शेवटीं सन १९४६ मध्यें अुठविली !

तेव्हा कुठें ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढणें शक्य झालें. पण जर जनतेनें चाळीस वर्षें ह्या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रतीचें गुप्तपणें जतन करून ठेवलें नसतें तर दुसरी आवृत्ति छापण्यास मूळ प्रतहि मिळतीना; पण जनतेनें तसें जतन केलें होतें त्यामुळें बंदी अुठतांच त्या जुनाट, वाचून वाचून किंवा कुजत पडून जीर्णशीर्ण झालेल्या, अनेक प्रती पुरातन क्रान्ति-कारकांनीं माझ्याकडे धाडून दिल्या. त्यावरून अुतरलेली आणि नवें लहानसें निवेदन जोडलेली ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति पहिल्या आवृत्तिनंतर अुण्या-पुऱ्या चाळीस वर्षांनीं सन १९४६ मध्यें माझ्याच हातानें प्रसिद्धिण्याचा आश्चर्यकारक योग जुळून आला !

तीन अितर थोर पुरुष

ह्या लेखांत 'मॅझिनीचें आत्मवृत्त' ह्या पुस्तकाचेंच हें छोटेसें आत्मवृत्त देण्याचा प्रतिपाद्य विषय असल्यानें मॅझिनीविषयींचा अुल्लेखच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुख्यत्वेंकरून आलेला आहे. तथापि, ज्या अर्थी अिटलीच्या स्वातंत्र्ययुद्धाचे तुरळक संदर्भ वर आलेले आहेत त्या अर्थी मॅझिनीप्रमाणेंच ज्या तीन अितर थोर पुरुषांच्या कर्तृत्वामुळें अिटली स्वतंत्र नि अेकराष्ट्र होअूं शकली त्यांचाहि नामनिर्देश तरी अिथें केलाच पाहिजे. तसें न करणें हें क्वचित् बहेतुक पक्षपाताचें नी कृतघ्नपणाचें दिसूं शकेल. माझ्या क्रान्तिकारक योजनांवर नी यत्नांवर त्यांच्या अितिहासाचाहि पुष्कळ परिणाम झालेला होता. सेनापति ग्यारिबाल्डी यांच्या खड्गानें अर्धी-अधिक अिटली दास्यमुक्त होअूं शकली, तसेंच केवळ क्रान्तिकारकांच्या मधून मधून होणाऱ्या पराक्रमी अुठावण्यामुळें ऑस्ट्रिया व फरान्स यांच्या संघटित सैन्यांच्या हातून अिटली नित्याची स्वतंत्र होअूं शकली नाहीं. अिटलींतील सारीं अितर संस्थानें नि प्रदेश परतंत्र झालीं असतांहि सुदैवाने अेक पिडमांटचें संस्थान तेवढें नाममात्र का होअीना पण स्वतंत्र राहिले होतें. आपल्या अिकडच्या नेपाळप्रमाणेंच त्याची स्थिति होती. त्यामुळें अेक संघटित, रणदक्ष, शस्त्रसज्ज नी प्रस्थापित सैन्य त्या संस्थानाच्या आज्ञेखालीं सदा सिद्ध असूं शके. त्या संस्थानचा स्वदेशाभिमानी राजा व्हिक्टर अिमॅनुअल ह्यानें अिटलींतील क्रान्तिकारकांच्या साहसी अुठावण्यांचें पुढारीपण शेवटीं अुघडपणें स्वीकारलें. आणि क्रान्तिकारकांनीं जो जो प्रांत तात्पुरता मुक्त करावा तो तो अुघडपणें आपल्या राज्यास जोडून घेण्याचें साहस केलें. आस्ट्रियाशीं त्यामुळें त्याचें अुघड युद्धहि जुंपलें. जर त्याचा शेवटीं पराभव होता तर त्याचें स्वतंत्र होतें तें पिडमांटचें छोटेसें संस्थानहि बुडालें असतें. पण न भितां त्यानें तें क्षुद्र संस्थान स्वतंत्र नि अखंड अिटलीचा प्रोज्ज्वल राजमुकुट मिळविण्याच्या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेपायीं पणास लावलें. साऱ्या अिटलीचा त्याला सक्रिय पाठिंबा मिळत चालला. शेवटीं समरदेवतेचा फासा त्याला अनुकूल पडला, फरान्स नि ऑस्ट्रिया या दोहोंचींहि सैन्यें अिटलींतून हुसकून दिलीं गेलीं आणि रोममध्यें त्या पिडमांटच्या संस्थानिकाला स्वतंत्र नी अखंड अिटालियन राष्ट्राचा राजा म्हणून– King of Italy म्हणून – राष्ट्रसंमतीनें राज्याभिषेक करण्यांत आला ! तथापि, राजाच्या ह्या राष्ट्रीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धाष्टर्याचें श्रेय जितकें त्याचें, त्याहूनहि अधिक त्याच्या राष्ट्रभक्त, कारस्थानी नी निर्धारी प्रधानाचें होतें. त्यांचें नांव काअुंट काव्हूर! अिटलीच्या बाजूला अिंग्लंडप्रभृति युरोपियन राष्ट्रांची अुत्कट सहानुभूति नी गुप्त सहकार्यहि संपादून ऑस्ट्रिया नि फरान्स ह्यांना अेकटें पाडण्याचें नी परस्पर युद्धांत गुंतविण्याचें कार्य साधण्यांत काव्हूरची राजनीतिपटुता, अिटलीचें स्वातंत्र्ययुद्ध यशस्वी करण्यांत मॅझिनी गारिबाल्डीच्या क्रान्तिकार्याच्या खालोखाल सहायभूत झाली होती. यास्तव अिटलीचे राष्ट्रनिर्माते म्हणून मॅझिनी, गारिबाल्डी, काअुंट काव्हूर नी राजा व्हिक्टर अिमॅनुअल ह्या चारीं महापुरुषाना अितिहासांत मान आहे.

सर्व स्वातंत्र्यवीरांना वंदना

यास्तवच, मॅझिनीचें वाङ्मय अभ्यासितांना मी अिटलीच्या राज्यक्रान्तींतील ह्या वरील चारी महापुरुषांच्या चरित्रांचें नी त्या अिटालियन स्वातंत्र्ययुद्धाच्या संकलित अितिहासाचेंहि यथेच्छ वाचन केले. ट्राव्हेलियनने लिहिलेलें ग्यारिबाल्डीचें विस्तृत नि वीररसशाली चरित्र, काव्हूरचें चरित्र, अेका प्रतिभाशाली महिलेनें (जिचें नांव मला नक्की आठवत नाही) अिंग्लिशमध्यें लिहिलेलें 'Liberation of Italy' हें सुंदर पुस्तक, 'युनियन ऑफ अिटली' हें पुस्तक, हीं पुस्तकें तर मला अजून स्पष्टपणें आठवतात. अिटलीच्या त्या रोमहर्षक नि यशस्वी स्वातंत्र्ययुद्धकालाविषयीं त्या वेळीं अिंग्लिश भाषेंत प्रकाशिलेलीं बहुतेक पुस्तकें मीं त्या सन १९०६–७ मध्यें वाचून काढलेलीं होतीं, अितकी मला त्या विषयाची गोडी लागलेली होती. ज्या अर्थीं त्या सर्व अितिहासाच्या नी विशेषतः वरील अिटालियन तीन-चार राष्ट्रपुरुषांच्या चरित्राच्या अध्ययनामुळें आमच्या भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत तसेच भगीरथ प्रयत्न नी तशींच महत्कर्में करण्यास आम्हां सहस्रावधि क्रान्तिकारकांना नि सुरेंद्रनाथांच्या पिढीपासूनच्या माननीय सुशिक्षित वर्गाला कांहीं अंशीं तरी अुत्साह, क्षमता आणि मार्गदर्शन मिळालें होतें त्या अर्थीं त्यांचें त्या प्रमाणांत अुतराअी होण्यास्तव त्या मॅझिनी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्यारिबाल्डी, काव्हूर, व्हिक्टर अिमॅनुअल ह्यांना आणि सामूहिक रीत्या अिटलीच्या त्या लढ्यांतील सर्व स्वातंत्र्यवीरांना मी येथें माझी मानवंदना देत आहें ! आणि अेका प्रसिद्ध अिंग्लिश कवीनें (याचें नांव नक्की आठवत नाही पण ' मेरिडिथ ' असावें) अिटलीच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लिहिलेल्या लहानशा कवितेंतील जो अेक मर्मज्ञ श्लोक चुकतमाकत आठवत आहे त्याच्याच काव्यमय भाषेंत स्वातंत्र अिटलीस संबोधीत आहे कीः–

Italia, to vindicate thy name
Mazzini, Cavour, Garribaldi three
Thy Soul, thy Brain, thy Sword,
they set thee free
From ruinons discord with one
lustrous aim ! !
–May He bless thee and Them ! !

✠ ✠ ✠

(पूर्वपिठिका : मूल्य रु. २–५०, आत्मवृत्त खण्ड १ : रु. ६ जन्मठेप मूल्य रु. ८)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जातिभेदाचें अिष्टानिष्टत्व : : १८

✠ ✠ ✠

[राजकीय चळवळींत न पडण्याचें बंधन जेव्हां स्वातंत्र्यवीर श्री. वि. दा. सावरकरांवर होतें तेव्हां त्यांनीं हिंदुसमाजांत ज्या जातिभेदाच्या अनिष्ट रुढी आहेत त्यांवर शस्त्रवैद्याच्या भूमिकेवरून कठोर वैचारिक आघात केले आणि त्या घातक रूढी मोडण्यासाठीं स्वजातीयांकडून पडणाऱ्या बहिष्कारालाहि न डगमगतां प्रत्यक्ष कार्यक्रम घडवून, आपले विचार लोकांत रुजविले. त्यांचे विचार 'जात्युच्छेदक निबंध' ह्या साधारणत: ४०० पृष्ठांच्या पुस्तकांत संग्रहीत करण्यांत आले असून त्यांपैकीं लेखाचा सारांश सांगणारा हा छोटासा अुतारा येथें दिला जात आहे.

वीर सावरकरांचें हें जातिभेदअुच्छेदाचें कार्य किती प्रभावी होतें ह्याची कल्पना येण्यासाठीं तें कार्य प्रत्यक्ष पाहिलेले, बहुजन समाजाचें अेक मान्यवर धुरीण आणि समाजसुधारक कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी काढलेले खालील अुद्‌गार पाहा. श्री. शिंदे म्हणतात:

'रत्नागिरींतील समाजिक मतपरिवर्तनाची बारीक रीतीनें जी पहाणी केली तीवरून मी नि:शंकपणें असें सांगतों कीं येथें घडत आलेली सामाजिक क्रांति खरोखर अपूर्व आहे. सामाजिक सुधारणेचें कार्य मी जन्मभर करीत आलों. तें किती कठीण, किती किचकट, मी-देखील मधून मधून निरुत्साह व्हावें असें चेंगट. असें हें कार्य अवघ्या सात वर्षांत रत्नागिरीसारख्या अगदीं रेल्वे-टेलिफोनचें तोंड न पाहि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेल्या सोवळ्याच्या बालेकिल्ल्यांत तुम्ही हजारो लोक जन्मजात अस्पृश्यतेचें अुच्चाटन करून आज जन्मजात जातिभेदाचेंच अुच्चाटन करण्यास सजलां आहांत आणि भंगीप्रभृति धर्मबंधूबरोबर बेखटक, सहासन, सहपूजन, सहभोजन सारे सामाजिक व्यवहार प्रकटपणें करीत असतांना मी पहात आहे. याचा मला अितका आनंद झाला होता कीं, हें दिवस पहाण्यास मी जगलों हें ठीक झालें असें मला वाटतें. मी कुणाचा भाट होअू अिच्छित नाहीं. पण ज्या स्वातंत्र्यवीरानें आपल्या अज्ञातवासाच्या अवघ्या सात वर्षांत ही अपूर्व सामाजिक क्रांति घडवून आणली त्या बॅ. सावरकरांचा किती गौरव करूं, असें मला झालें आहे. कालपासून तुम्हीं हजारों नागरिक विशेषतः ही तरुण पिढी त्यांच्यावर जो निःसीम विश्वास ठेवीत आहां तो मी पाहत आहे. पण त्या तुम्हां साऱ्या तरुणामध्यें खरा तरुण जर कोण मला दिसत असेल तर तो निधडचा छातीचा वीर सावरकरच होय ! मला असें म्हटल्यावांचून रहावंत नाहीं की, बरें झालें हा अज्ञातवास आला ! नाहीं तर ही सामाजिक सेवा करण्यास ही स्वारी अुरली असती कीं नाहीं हीच शंका आहे. सावरकरबंधूविषयीं आम्हांस प्रथमपासुनच फार आदर वाटे. म्हणून त्यांना भेटण्यासाठींच मुख्यतेंकरून अिथें आलों. आणि त्यांनीं चालविलेली ही सामाजिक क्रांतीची यशस्वीं चळवळ पाहून अितका प्रसन्न झालों आहे की, देवानें माझें अुरलेलें आयुष्य त्यासच द्यावें ! कारण, माझे अपुरे राहिलेले हेतु पुरवील तर हा वीरच पुरवील असें मला वाटत आहे. सरकारनें त्यांस ह्या सामाजिक कार्यापुरतें तरी मोकळें सोडावें अशी खटपट सर्व स्पृश्यास्पृश्यांच्या नि सुधारकांच्या वतीनें करवावी असें आमचें ठरलेंच आहे.']

✠ ✠ ✠

या लेखमालेचा प्रस्तुततचा लेखांक हा शेवटचा आहे. वर्तमानपत्रीय कक्षेंत जितकी आणवेल तितकी या विषयाची सांगोपांग चर्चा मागील लेखां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांत झाल्यानंतर आतां या लेखांकांत तिचा अुपसंहार करून आणि या लेखनमालेंतल्या आरंभीं सांगितलेल्या मूळ हेतूप्रमाणें जन्मजात जातिभेदाच्या अुच्चाटनाची अेक योजना थोडक्यांत आंखून ही लेखमाला आम्हीं आज पुरी करणार आहोंत.

आजच्या जातिभेदाचें अत्यंत प्रमुख जन्मजातपणा आणि जन्मजातपणाचें समर्थन करूं शकणारे अत्यंत प्रमुख तत्त्व नि हेतु म्हणजे आनुवंशिक गुणविकासाचा नैसर्गिक नियम. यास्तव आम्ही यासंबंधीच्या लेखांकांत त्या आनुवंशाचें (Heredity) यथास्थल सांगोपांग विश्लेषण केलें आणि त्यांच्या खालील मर्यादा दिग्दर्शिल्या:–

(१) आनुवंश हा गुणविकासाचा अेक घटक असतो म्हणून जे गुण आपल्याला समाजहितकारक वाटतात ते ज्यांत प्रकट होतील अशा वधूवरांचे विवाह केले असतां ते गुण विकसित वा दृढ होण्याचा, अितर परिस्थिति समान असतां संभव अधिक हें खरें आहे.

(२) पण गुणविकासाचा आनुवंश हा अनन्य घटक नसतो. तर गर्भकालांतींल मातेची परिस्थिति आणि संतान जन्मल्यानंतरची शिक्षणसंस्कारादिक परिस्थिति ही त्या संतानांत तो बीजांतील गुण विकसित होण्यास किंवा नष्ट होण्यास फार मोठ्या प्रमाणांत कारणीभूत होते.

(३) आनुवंशानें सद्‌गुणविकास होतो तसाच दुर्गुणविकासहि होतो यास्तव जातीय बीजशुद्धतेच्या जोडीस त्या दुर्गुणांचें अुच्चाटन करण्यास समर्थ अशा संकराची जोडहि केव्हां केव्हां हितावहच ठरते.

(४) अेक गुण कितीहि अुत्कट असला तरीहि प्रत्येक व्यक्तींत वा जातींत त्याला अुपकारक अशा अितर गुणांचें पाठबळ नसलें तर तो गुण लुळा बनतो नुसतें डोकें कितीहि अुत्तम असलें पण हातपाय समर्थ नसले तर तें डोकें पंगूच ! यास्तव अुत्कट बुद्धीला शक्तिची आणि अुत्कट शक्तीला बुद्धीची जोड हवीच ! म्हणून बुद्धिप्रधान, शक्तीप्रधान, अित्यादि कुलांत वा जातींत तदितर अनुकूल–गुणप्रधान कुलांचा किंवा जातींचा संकरहि केव्हां केव्हां हितावहच ठरतो. म्हणून सर्व जातींचा यथाप्रमाण यथावश्यक संमिश्र बेटी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवहार चालू राहाणें हें त्याच्या विशिष्ट गुणांच्याहि अुत्कर्षास आणि कार्यक्षमतेस हितावहच होअील.

(५) आमच्या आजच्या जाती ह्या नैसर्गिकतःच भिन्न नसल्यामुळें त्या केवळ मानीव, केवळ पोथीजात असल्यामुळें, त्यांचा आनुवंश, त्यांची जातीय बीजशुद्धि, निर्भेळ राखणें दुर्घट असणारच.

(६) व्यावहारिक अनुभवहि हेंच सिद्ध करतो. ब्राह्मणांतहि परशुराम द्रोणाचार्य–दुर्वासापासून तो थेट मराठी साम्राज्यांतील पटवर्धनापर्यंत किंवा चाफेकर, राजगुरुपर्यंत क्षत्रियाहूनहि पराक्रमी, कोपिष्ट आणि शूर अनेक पुरुष निर्माण झाले. अुलट क्षत्रिय–वैश्यांदिकांतहि जनक–बुद्धापासून तों तुकारामापर्यंत अनेक सत्त्वशील, शांतिप्रधान, तपस्वी निर्माण झाले. या व्यावहारिक अनुभवावरूनहि आमच्या ह्या मानवी जातींत अमका गुण अमक्या जातींत असतोच आणि अितरांत नसतोच असें गृहींत धरून त्या जातींना त्या गुणावर आणि मानांवर जन्मजात स्वत्व सांगण्याचा अधिकार देणारी जातिभेदाची प्रथा अतथ्य नि अन्याय्य आहे.

(७) आपल्या अितिहासाकडे पाहिलें तरी आज ज्या जाती रक्तबीजानें विभिन्न आहेत म्हणून आपण समजतों त्या मूलतःच संमिश्र होत्या हें स्पष्ट दिसतें. पूर्वी निदान चार वर्णांच्या चार हजार अुपजाति नव्हत्या. म्हणजे त्यांचें प्रत्येकीं अंतर्गत विवाह होत होते. आणि त्या चारांत परस्पर बेटी–व्यवहारहि निषिद्ध नव्हता. पितृसावर्ण्य, मातृसावर्ण्य अनुलोम आणि प्रतिलोम ह्या चार स्मृति–प्रदिपादित प्रथांचीं हीं चार नावेंच हें निर्विवाद सिद्ध करतात कीं चारी वर्णांत रक्तबीज परस्पर संमिश्र आहे. म्हणूनच अमूक जातींत अमूक गुण जन्मतः असतोच असें आपल्या अनुभवास येत नाहीं.

आनुवंशाच्या नैसर्गिक नियमांच्या या सर्व मर्यादा आणि व्यंगें लक्षांत घेतलीं असतां जन्मजातपणा राखला किंवा राखलासें मानीत गेले कीं त्या त्या जातींत तो तो गुणविकास झालाच पाहिजे हें समजण्यांत आपली केवढी चूक होत आहे हें ध्यानांत येअील. यास्तव जातीवरून गुण न ओळखतां गुणा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरून जात ओळखणें अधिक युक्त आहे. अमका क्षत्रियाचा मुलगा म्हणून तो शूर आंहेच असें न समजतां आणि शूरपणाचीं पदकें त्याचा जन्मजात अधिकार म्हणून त्याच्या बारशासच त्याच्या छातीवर न लटकवतां, अमका शूर आहे आहे असें प्रत्यक्ष दिसून आल्यावर, मग त्यास क्षत्रिय समजून शूरपणाचें पदक देणेंच युक्त, मग तो शूरपणा त्यांत बीजशुद्धीनें आलेला असो वा संकरानें आलेला असो.

त्याचप्रमाणें अेकाद्या गुणाचें विकसन वा दृढीकरण करण्यासाठीहि ज्या व्यक्तींत तो गुण प्रकटपणें व्यक्त असेल त्यांचा शरीरसंबंध जुळविण्याचा अधिक अुपयोग होण्यासारखा आहे. गोरा मुलगा हवा असेल तर वधूवरांचा रंग गोरा आहे कीं नाहीं हें पाहूनच निवड केली असतां मुलगा गोरा होण्याचा बराच संभव आहे. पण ब्राह्मण जातीचीं म्हणून धडधडीत काळीकुट्ट दिसणारीं वधूवरेंहि गोरी समजून त्यांचें लग्न लावणें हा कांहीं गोरे सन्तान अुत्पन्न करण्याचा बिनधोक मार्ग नव्हे. तीच स्थिति अितर गुणांची अेकवेळ प्रत्यक्ष गुणावरून आनुवंश अनुमानितां येअिल, पण केवळ मानीव आनुवंशावरून गुण निश्चितपणें, अनुमानितां येणार नाहीं.

जन्मजात जातींचा अुच्छेद आणि गुणजात जातींचा अुद्धार

या आणि येथें अनुल्लेखित अशा अितर अनेक कारणांचा विचार करून जातिभेदाचें प्रस्तुत विकृत स्वरूप टाळणारीं अेक स्थूल योजना आम्ही खालीं देत आहों. आमची अशी निष्ठा आहे कीं, या योजनें अितकें जरी कार्य झालें तरी प्रस्तुतच्या जातिभेदाच्या विषारी किडीपासून आपणास आपला समाज मुक्त करतां येअील. जन्मजात जातीचा अुच्छेद आणि गुणजात जातीचा अुद्धार हें सूत्र कार्यपरिणत करणें दुर्घट नाहीं. जातिभेदाचा मुख्य आधार केवळ भावना आहे.

आज तरी त्याच्या मागें दुसरी कोणचीहि शक्ति अुभी नाहीं. आपल्या मानण्यांत त्याचें खरें जीवन आहें. आणि त्याचें खरें मरण आपल्या न मानण्यांत आहें. यास्तव ती जात्यहंकारी भावना आपण प्रत्येकानें सोडलीं कीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचें मरण ओढवलेंच. यास्तव ज्यास आजच्या या विकृत जातिभेदाची अनिष्ट व्याद नको असेल त्यानें निदान खालील योजनेप्रमाणे तरी स्वतःचें आचरण ठेवलें कीं पुरें आहे. म्हणजे तो जन्मजात जातिभेद वाटतो त्याहून किती तरी सहज अुच्छेदितां येअील. ज्या जातिभेदाची आपण चर्चा करीत आहोंत तो हिंदुसमाजांतील जातिभेद असल्यानें खालील चर्चेचा संबंध हिंदूंशींच काय तो पोचतो हें अुघड आहे.

प्रत्येक मुलाची जन्मजात जात अेकच–हिंदु !

(१) प्रत्येकानें अमकी हिंदु जात जन्मतः अुच्च आणि अमका जन्मतः नीच ही भावना मनास केव्हांहि शिवूं देतां कामा नये. अुच्चनीचता ही व्यक्तींत प्रकट झालेल्या प्रत्यक्ष गुणांवरून ठरेल. जर त्या व्यक्तीचा आनुवंश अुच्च असेल तर अुच्च गुण तींत प्रकट होतीलच. जर गुण प्रकट नसतील तर त्या आनुवंशांत वा परिस्थितींत कांहींतरी दोष असला पाहिजे.

(२) प्रत्येक हिंदु मुलाची जन्मजात जात अशी अेकच–हिंदु ! त्यावांचून दुसरी कोणतीहि पोटजात मानूं नये. "जन्मना जायते हिंदुः" (वास्तविक पाहतां मनुष्याची खरी जन्मजात जात मनुष्य हीच तेवढी ! पण जोंवर मुसलमान–ख्रिश्चनादिक विधर्मीय लोक त्या अुच्च ध्येयास सोडून आपणांस जन्मजात मुसलमान वा ख्रिश्चन मानतात, आणि हिंदूस गिळूं पाहतात तोंवर तरी स्वरसंरक्षणार्थ अितका जात्यहंकार सापेक्षतया आपणहि धरलाच पाहिजे. प्रत्येक वेळीं आणि विशेषतः शिरगणतींत हिंदु हीच अेक जात लिहावी, अितर सर्व धंदे व्यवसाय समजावे.)

(३) प्रत्येक हिंदुमात्रांस वेदासुद्धां सर्व हिंदु धर्मग्रंथ वाचण्याचा आणि शिकण्याचा आणि अिच्छा असल्यास आपले संस्कारहि वेदोक्त करण्याचा आणि करविण्याचा समान अधिकार असावा. पुरोहितत्व हें कोण-त्याहि जातीचा जन्मजात ठेवा नसून जो हिंदु पुरोहितत्वाची योग्यता संपादन

(सा...१९)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करील किंवा ती परीक्षा अुतरेल तो पुरोहित होअू शकेल. जातीनें नव्हे, तर "तस्माच्छीलगुणैर्द्विज :".

(४) हिंदूंचीं विशिष्ट महत्त्वाचीं तीर्थक्षेत्रें, देवालयें आणि पवित्र अैतिहासिक स्थलें (जसा पंचवटीचा राम, सेतुबंध रामेश्वर अित्यादि) जातिवर्ण– निर्विशेषपणें पूर्वास्पृश्यासुद्धां सर्व हिंदुमात्रास समान नियमांनीं अुघडीं असावींत.

(५) प्रत्यक्षावलंबी अशा सुजननशास्त्राच्या (Eugenics च्या) दृष्टीनें योग्य असेल तर कोणाहि हिंदु वधू–वरांचा विवाह, तो केवळ जन्म-जात भिन्न मानलेल्या जातिजातींत झाला म्हणूनच, निषिद्ध आणि बहिष्कार्य समजला जाअू नये. (हा नियम निषेधात्मकच काय तो आहे. म्हणजे ब्राह्मण व्यक्तीनें महाराशीं किंवा महार व्यक्तीनें ब्राह्मणाशीं विवाह केलाच पाहिजे असें नव्हें. तर गुण, शील, प्रीति अित्यादि दृष्टीनें परस्पर–अनुकूल असलेल्या त्या हिंदू वधूवरांनीं विवाह केला तर केवळ त्यांच्या जाती भिन्न आहेत अेवढ्याच कारणासाठीं तो विवाह निषिद्ध मानूं नये.)

(६) वैद्यशास्त्रदृष्ट्या जें शुद्ध आणि आरोग्यप्रद तें, वैद्यशास्त्रदृष्टचा योग्य अशा कोणत्याहि माणसाबरोबर, म्हणजे अेका ताटांत नव्हे तर अेका पंगतीस, खाण्यास हरकत नसावी, शेजारी जेवल्यानें जातची जात पिढ्यान्-पिढ्या बदलते ही समजत वेडगळ आहे. मांसाहाऱ्यांची मांसाहाऱ्यांशीं पंगत होण्यास हरकत नाहीं. ज्या दिवशीं शाकाहार असेल त्या दिवशीं सर्वच अेका पंगतींत बसू शकतील. **जें रुचेल आणि पचेल तें अन्न सहभोजनांत खाण्यास हरकत नाहीं.** पूर्वीं महाभारत कालापर्यंत तरी चारहि वर्गांत सहभोजनें होतच. "शूद्राः पाककर्तारः स्यूः (आपस्तंब)" किंवा "दासनापितगोपालाः कुलमित्रार्धसीरिण :।। अेते शूद्रेषु भोज्यान्नाः।।" अशीं शेंकडों वचनें आहेतच.

शाकांतहि अत्यंत तामसी गुण असणाऱ्या शाका आहेतच. स्वतः मांसाहार करणाऱ्यानें, जर सर्व पंगत केवळ शाकाहारांचीच असेल तर त्या वेळीं अितरत्र, मांस न खाणाऱ्याबरोबरहि त्या पंगतींत बसण्यास कांहीं अेक हरकत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(७) प्रत्येक हिंदु मुलास प्राथमिक शिक्षण व्यावहारिक आणि धार्मिक समानतेनें दिल्यावर पुढें त्यांत जो गुण वा प्रवृत्ति प्रकट होईल त्याप्रमाणें तो आपला व्यवसाय करील. आज सर्वांस व्यवसायस्वांतंत्र्य आहेच. ब्राह्मण पुणेरी जोडे विकतात. चांभार अुत्तम शिक्षक होतात. आतां सुधारावयाचें तें अितकेंच की, प्रत्यक्ष व्यवसाय दुसरा असतांहि मूळच्या व्यवसायाची जी अेक मानीव रोटीबेटीबंद जात त्याच्या मागें हात धुवून लागतें तिची ब्याद मात्र टाळावयाची. म्हणजे जात शिंपी–धंदा सोनार; जात ब्राह्मण–धंदा दुकानदारी; हा जो आज ब्रह्मघोटाळा झाला आहे तो मोडेल. सर्वांची जात हिंदु, धंदा कोणता असेल तो.

बॅरिस्टर नि मोटारहाक्या

आतां या सर्व चर्चेचा मतितार्थ थोडक्यांत चटकन घ्यानांत यावा म्हणून अेक दोन अुदाहरणें देअून ही लेखमाला संपवूं. ज्या गोष्टी लहानपणापासून चांगल्या म्हणून आपणांस सांगण्यांत येतात त्यांचा हास्यास्पदपणा चटकन घ्यानांत येत नाहीं. म्हणून ह्या अुदाहरणांत जुनी जात न घेतां त्या जुन्या तत्त्वास कांहीं अर्वाचीन बिनजात व्यवसायांना लावून दाखविलें असतां ती हास्यास्पदता चट्कन दिसूं लागेल. म्हणून नवीन अशा बॅरिस्टरीचे वा मोटार हाकण्याच्या व्यवसायाचें अुदाहरण घेअूं. समजा, अेक मनुष्य बॅरिस्टर झाला किंवा दुसरा मोटारहाक्या झाला. आतां नुसत्या रोटीबेटीबंदीनें त्यांच्या वंशांत तो गुण विकसतो या जुन्या कल्पनेप्रमाणें त्याचीं लगेच व्यवसायनिष्ठ अशी अेक स्वतंत्र जात केली पाहिजे. त्या बॅरिस्टराच्या मुलाला जन्मतःच बॅरिस्टर मानलें पाहिजे. जसें ब्राह्मणाच्या मुलास ब्राह्मण! मग त्या बॅरिस्टराच्या मुलानातवांत कोणीहि बॅरिस्टरीचा अभ्यास न केला तरी त्यांना बॅरिस्टरचे झगे, जागा, मान दिले पाहिजेत. त्या "बॅरिस्टर" ब्राह्मणांचीं वा "मोटारवाले" ब्राह्मणांचीं लग्नें अितर "बॅरिस्टरे" वा "मोटारे" ब्राह्मणांशींच लावलीं पाहिजेत. नव्हे त्यांनीं जेवणखाण देखील त्यांच्या "मोटारे" जातीशींच केलें पाहिजे. मग पुढें त्यांच्या वंशांत कोणी दुकान-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दारी वा कारकुनी केली तरी त्यांची रोटीबंद बेटीबंद जात " बॅरिस्टरे " वा " मोटारे " ब्राह्मण हीच ! !

डॉक्टराच्या मुलानातवांची जन्मजात जात डॉक्टर मरणासन्न मनुष्याची नाडी पाहण्याचा पहिला जन्मजात अधिकार त्या जातीच्या डॉक्टरचा; मग त्यास डॉक्टरी विद्येचा ओनामा का माहीत नसेना ! आज जे नवीन व्यवसाय प्रचारांत येत आहेत त्यांच्या जर रोटीबंद बेटीबंद जन्मजाती पाडल्या तर अगदीं " वचनात्पवृत्तिर्वचनान्निवृत्तिः " म्हणून गर्जणारे वर्णाश्रमसंघवाले पंडितदेखील त्यास हास्यास्पद पाखंड म्हणून म्हणतील ! मग आज ज्या लोकांच्या जुन्या शिंपी, सोनार, तांबट, सुतार, लोहार अित्यादि जन्मजात जाती आहेत, आणि जे व्यवसाय मात्र हवे ते करतात त्यांची ती अनवस्थाहि तसेंच अेक हास्यास्पद पाखंड नव्हे काय ? पण आम्हीं म्हणतों. त्या नव्या व्यवस्थेंन जर कोणी बॅरिस्टरीची परीक्षा अुतरला तर तो बॅरिस्टर ठरेल, त्या वर्गाच्या संघांत–बाररुममध्यें–तो सभासद होअील. आनुवंशिक गुणविकासानें जर त्याच्या मुलांत तो गुण अुतरेल आणि तोहि बॅरिस्टर झाला तरच त्या संघांत तोहि जाअिल. पण जर तो अेखादा झाडूवाला झाला तर त्याचा पणजा बॅरिस्टर वा लढवय्या क्षत्रिय म्हणून बॅरिस्टर वा क्षत्रिय मानला जाणार नाहीं. किंवा व्यवसाय अमका म्हणून अितर व्यवसायवाल्यांशीं त्याचा रोटिबेटीव्यवहार केवळ मानीव जातिभिन्नतेमुळे बंद पडण्याचेंहि कारण अुरणार नाहीं. ह्या प्रत्यक्ष गुणनिष्ठ वर्गीकरणांमुळें आजच्या जन्मजात वर्गीकरणानें केलेला सबगोलंकार मोडतो असें होत नाहीं. पण आश्चर्य हें कीं ज्यांनी आज त्या पोथीजात जातींचा सबगोलंकार केला आहे तेच तो सबगोलंकार मोडणारास सबगोलंकार करणारे म्हणून म्हणण्यास धजतात ! !

यावरहि कोणास अशी भीति वाटलीच कीं हा पोथीजात जातिभेद सोडला तर समाजाची भयंकर अवनति तर होणार नाहीना ! त्यांनीं मनांत अितकाच विवेक करावा कीं ही पोथीजात जातिभेदाची व्याद पृथ्वीवरील अितर कोणत्याहि धुरंधर राष्ट्रांत रुढ नाहीं. जपान, रशिया, अिराण, तुर्कस्थान, अिंग्लंड, अमेरिका, जर्मनी या सर्वांचें या जातिभेदावांचून कांहीं अडलें आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कां ? त्यांचे धंदे ते जन्मजात नाहींत म्हणून किंवा त्याचें ज्ञान, बळ, संघटना त्यांच्यांत जन्मजात जातिभेद नाहीं म्हणून रोडावले आहेत का ? अुलट ते आज ह्या सर्व गुणांत आमच्यापेक्षां हजारों पटींनीं श्रेष्ठ, अुन्नत, संपन्न, प्रबळ आहेत. आणि समाजोन्नतीचा सनातन मंत्र म्हणून ह्या जातिवेडास कवटाळून बसलेल्या आम्हांसच चारीमुंड्या चीत करून आमच्या छातीवर चढलेले आहेत ! तेव्हां या अेका सकृद्दर्शनीं (prima facie) गमकानें देखील समाजाच्या अभ्रतीचा जातिभेद हा अेवढाच बीजमंत्र नव्हे हें स्पष्ट होअूं शकतें. अवनतीच्या मंत्रापैकीं मात्र तो अेक बीजमंत्र असावा अशी साधार शंका येअूं शकतें. कारण आजच्या ज्ञात राष्ट्रांत आम्हींच तेवढें सगळ्यांच्या खालीं आणि सगळ्यांच्या पदतलीं कुबलले जात आहोंत.

✠ ✠ ✠

[जात्युच्छेदक निबंध : (मराठी) जातिभेदाविरुद्ध निबंधांचा संग्रह मूल्य रुपये ६.]

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सागरास : : १९

✠ ✠ ✠

[अभिनवभारत या संस्थेवर वक्रदृष्टि झाल्यामुळें अतःपर आपल्याला हिंदुस्थानला परततां येणार नाहीं व आपण लवकरच धरले जाऊं असें विनायकरावांस निश्चितपणें वाटलें. त्या वेळीं समुद्रकांठीं ते गेले असतां स्वजनांची आठवण होऊन त्यांनी ही कविता लिहिली.]

✠ ✠ ✠

चाल–अजि अक्रुर हा

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला
भूमातेच्या चरणतला तुज धूतां । मीं नित्य पाहिला होता
मज वदलासी अन्य देशिं चल जाऊं । सृष्टिची विविधता पाहूं
तईं जननी–हृद् विरहशंकितहि झालें । परि तुवां वचन तिज दिधलें
मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठि वाहीन । त्वरित या परत आणीन
विश्वसलों या तव वचनीं । मी
जगदनुभव–योगें बनुनी । मी
तव अधिक शक्त उद्धरणीं । मी
येईन त्वरे कथुन सोडिलें तिजला । सागरा, प्राण तळमळला १

शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं । ही फसगत झाली तैशी
भूविरह कसा सतत साहुं या पुढती । दशदिशा तमोमय होती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुण–सुमनें मी वेचियलीं या भावे । कीं तिनें सुगंधा घ्यावें
जरि अुद्धरणीं व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा
ती आम्रवृक्षवत्सलता । रे
नवकुसुमयुता त्या सुलता । रे
तो बाल गुलाबहि आतां । रे
फुलबाग मला हाय पारखा झाला । सागरा, प्राण तळमळला २

नभि नक्षत्रें बहुत अेक परि प्यारा । मज भरतभूमिचा तारा
प्रासाद अिथें भव्य परी मज भारी । आअिची झोपडी प्यारी
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा । वनवास तिच्या जरि वनिंचा
भुलविणें व्यर्थ हें आतां । रे
बहु जिवलग गमतें चित्ता । रें
तुज सरित्पते ! जी सरिता । रे
तद्विरहाची शपथ घालितों तुजला । सागरा, प्राण तळमळला ३

या फेन–मिषें हंससि निर्दया कैसा । कां वचन भंगिसी अैसा ?
त्वत्स्वामित्वा सांप्रत जी मिरवीते । भिअुनि का आंग्लभूमीतें ?
मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी । मज विवासनातें देशीं
तरि आंग्लभूमि–भयभीता । रे
अबला न माझिही माता । रे
कथिल हें अगस्तिस आतां । रे
जो आचमनीं अेक क्षणिं तुज प्याला । सागरा, प्राण तळमळला ४

* * *

[सावरकरांची कविता : संपादक श्री. वासुदेव गोविंद मायदेव, मूल्य २ रुपये.]

* * *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोपालन—गोपूजन नव्हे ! : : २०

✠ ✠ ✠

[आजच्या निधर्मी राज्यांत कांहीं लोक वीर सावरकर हे हिंदुमहासभेचे म्हणजे कांहीं लोकांच्या म्हणण्याप्रमाणें अेका जातीयवादी संस्थेचे नेते असल्यानें प्रतिक्रियावादी किंवा अबुद्धिवादी समजले जातात. वीर सावरकरांचे दोन खंडांत प्रसिद्ध झालेले ‘ विज्ञाननिष्ठ निबंध ’ ज्यांतून ह्या निबंध संग्रहित करण्यांत आला आहे तो जो वाचील त्याला कळून येअील कीं त्याचें वीर सावरकर प्रतिगामी असल्याविषयींचें मत हें अेक अज्ञान आहे. ती अेक चूक आहे.]

✠ ✠ ✠

गाय हा पशु हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशाला अत्यंत अुपयुक्त असल्यामुळें अगदीं वैदिक काळापासून आपणां हिंदु लोकांस तो आवडता असावा हें साहजिकच आहे. गाअीसारखा वत्सल, माणसाळू, बापडा, सुरेख, दुधाळ पशु कोणास आवडणार नाहीं ? आअीच्या दुधाखालोखाल जिचें दूध आपल्या देशांत तरी मुलांस मानवतें, मृगयाशील युग ओलांडण्याअितका सुधारतांच त्या प्राचीन काळापासून मनुष्याची जी गाय आज युगानुयुगें अत्यंत प्रामाणिक सोबतीण झालेली आहे आणि शेतीच्या खालोखाल जिच्या दूधदहीलोणीतुपावर मनुष्याचा पिंड आजहि पोसला जात आहे, त्या अत्युपयुक्त पशूचें आम्हां मनुष्यांस अेखाद्या कुटुंबियाअितकें ममत्व वाटावें हें अगदीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माणुसकीस धरूनच आहे. अशा त्या गाअीचें रक्षण करणें, पालन करणें, हें आपलें वैयक्तिक नी कौटुंबिकच नव्हे तर आपल्या हिंदुस्थानपुरतें तरी अेक राष्ट्रीय कर्तव्यच आहे.

अितकेंच नव्हे, तर जो प्राणी आपणांस अितका अुपयुक्त आहे त्याविषयीं मनांत अेक प्रकारची कृतज्ञ भावनाहि अुपजणें, विशेषत: आपणां हिंदूच्या भूतदयाशील स्वभावास, अगदीं साजेसें आहे.

आपणांस गाय ही अुपयुक्त आहे म्हणून प्रिय वाटते ही गोष्ट अितकी निर्विवाद आहे कीं, जे गोभक्त तिला कृतज्ञतेच्या भरांत देवी मानून तिला पूजितात, त्यास देखील ती पूजा योग्य आहे का, असें विचारतांच, ते त्या पूजेच्या समर्थनार्थ गाय ही देवता आहे, अितकेंच कारण सांगण्याच्या आधीं चटकन् ती गाय आपणांस किती अुपयुक्त आहे, हेंच सांगूं लागतात. तिच्या दुधापासून तों शेणापर्यंतच्या सर्व पदार्थांचे मनुष्यास किती भिन्न भिन्न प्रकारचे अैहिक अुपयोग होतात ह्याचाच यथाप्रमाण वा अतिप्रमाण पाढा वाचूं लागतात. अर्थातच, जे त्या गाअीला देवता मानतात, तेदेखील ती गाय मनुष्यास अिहलोकींसुद्धां अुपयुक्त आहे म्हणूनच देवता होय. मनुष्यास ती गाय सिंहासारखी जर ह्या जगांत खाअूं लागती, दूध देअून पोषण्याच्या ठायीं सापासारखेंच विष दंशून ठार मारती, तर ती गाय आम्हीं अशी देवता म्हणून मानली नसती, पूजलीच असती तरी कृतज्ञतेनें नव्हे, तर मरीआअीस पूजतों तशा त्रासिक, भीतीनें, हें सत्य ते गोपूजक गोभक्तदेखील कळत वा नकळत पण अपरिहार्यपणें मानून जातात.

तेव्हां, गाय हा पशु मनुष्यास ह्या जगीं अुपयुक्त आहे म्हणून पालनीय आहे असें म्हणणारे आणि गाय ही मनुष्यास अिहलोकींसुद्धां अितकी अुपयुक्त आहे कीं, ती अेक पूजनीय देवता आहे असें म्हणणारे या दोन्ही पक्षांत मनुष्यास गाअीपासून ह्या जगांत पुष्कळ अुपयोग होतात, म्हणून ती पाळावी व पूजावी हें विधेयच काय तें निर्विवाद मान्यता पावलेलें असतें.

मग अुभयपक्षांस अगदीं निर्विवादपणें मान्य असलेल्या या विधेयास (पॉअिटला) अनुसरून जर तेंच सत्य व्यवहारिलें जातांना त्यांतील त्या मुख्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुद्दिष्टाची अधिकांत अधिक पूर्तता व्हावी, या हेतूनें अशा सूत्रांत सांगितलें कीं, मनुष्यास तिचा ज्या योगें अधिकांत अधिक अैहिक अुपयोग होअील; अशा रीतीनेंच गाअीचें पालन व पूजन केलें जावें, ज्यायोगें त्या गाअीपासून मनुष्याच्या हितास अुपयोग तर नाहींच पण अुलट हानि होते, माणुसकीसच कमीपणा येतो, अशा गोरक्षणांतील मुख्य हेतूसच विफलविणारा गोरक्षणांतील अतिरेक त्याज्य होय; तर तें सूत्र यच्चयावत् गोरक्षण कार्यकर्त्यास मान्य व्हावयास काय बरें हरकत आहे? निदान अितकें तरी निर्विवादच आहे कीं, मनुष्यास गायीचा ज्यायोगें अधिक अुपयोग अैहिक दृष्टचा देखील होअील, असेंच आपल्या राष्ट्राचें गोविषयक धोरण नी व्यवहार असला पाहिजे, हें सूत्र कोणास आवडलें नाहीं तरी नाकारतां यणें शक्य नाहीं. कारण, गोपालनाचेंच नव्हे, तर गोपूजनाचेंहि समर्थन गोभक्तहि गाय ही मनुष्यास ह्या जगांत सुद्धां अत्यंत अुपयुक्त आहे. ह्याच कोटिक्रमावर मुख्य भर देअून करतात.

आतां ह्या कसोटीनें गाअीविषयींचे आपले सारे व्यवहार नी भावना परीक्षू जातांच पहिल्या धडाक्यासच आपल्या ध्यानांत येतें कीं, मनुष्याला गाअीचा अधिकाधिक प्रत्यक्ष अुपयोग जर करून घ्यायचा असेल तर, देवता समजून गोपूजनाची भावना सर्वस्वीं त्याज्य आहे हें आपणांस मानावें लागेल. त्यांचीं कांहीं कारणें अशीं– (१) देवकोटि ही मनुष्यकोटीहून अुच्चतर अशा वास्तव वा कल्पित भावजातांची असते; मनुष्यांहून सद्‌गुणांचा, सच्छक्तींचा, सद्‌भावांचा विकास ज्यांत अेकंदरींत प्रकर्षलेला असतो तो देव वा देवता, परंतु पशु ही मनुष्याहून हीनतर कोटी. अतिमानुष ती देवता, देव. अपमानुष तो पशु, कीट. गाय ही धादान्त अेक पशु. मनुष्यांतील अगदीं निर्बुद्ध माणसाअितकी बुद्धि देखील ज्यांत नाहीं अशा कोणच्याहि पशूला देवता मानणें म्हणजे माणुसकीचाच अपमान करणें आहे. मनुष्याहून सद्‌गुणांत वा सद्‌भावांत अुच्चतर अशा प्रतिकास अेक वेळ देव मानतां येअील, पण अणकुचीदार शिंगें नी गोंडेदार शेंपूट ह्यांवांचून ज्या पशूंत मनुष्याहून अधिक निराळें असें सांगण्यासारखें कोणचेंहि आधिक्य नाहीं, मनुष्याला उपयुक्त म्हणून काय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो ज्याचा थोडाफार गौरव नी ममत्व मनुष्यांस वाटावें अशा गायीस काय नी कोणत्याहि पशूस काय माणसानें देवता म्हणून मानणें म्हणजे माणुसकी-सच नव्हे तर देवत्वासहि पशूहून कमी लेखणें होय !

गोठ्यांत अुभ्या अुभ्या गवतकडबा खात असलेल्या अेकीकडे खातांखातांच अुभ्या अुभ्या दुसरीकडे मलमूत्रोत्सर्ग निःसंकोचपणें करणाऱ्या, थकवा येतांच रवंथ करीत त्याच मलमूत्रोत्सर्गांत स्वेच्छया बैठक मारून बसणाऱ्या, शेप-टीच्या फटकाऱ्यानें स्वतःच्या शेणमूत्राचा तो चिखल अंगभर अुडवून घेणाऱ्या, दावें सुटून थोडा फेरफटका करण्याची संधि मिळतांच अनेक समयीं कोठेंतरी जाअून घाणींत तोंड घालणाऱ्या नी तसेंच ओठ चाटीत गोठ्यांत आणून बांधल्या जाणाऱ्या त्या गायीस, शुद्ध नी निर्मळ वसनें नेसलेल्या सोज्वल ब्राह्मणानें वा महिलेनें हातीं पूजापात्र घेअून गोठ्यांत पूजावयास जावें नी तिच्या शेपटीस स्पर्शून आपलें सोवळें न विटाळतां अुलट अधिक सोज्वळलें आणि तिचें तें शेण नी तें मूत्र चांदीच्या पेल्यांत घोळून पितांना आपलें जीवन अधिक निर्मळलें असें मानावें ! तें सोवळें कीं जें आंबेडकर महाशयां-सारख्या महनीय स्वधर्मबंधूच्या श्रेष्ठ मनुष्याची सावली पडतांच विटाळावें तें ब्राह्मक्षात्र जीवन कीं जें तुकारामासारख्या संताच्या नुसत्या पंक्तीस बसून सत्त्वस्थ दहीभात खाल्ला असतांहि भ्रष्टावें ! तें सोवळें नी तें ब्राह्मक्षात्र जीवन त्या गोठ्यांतल्या अमंगळखावू गायीच्या मलमूत्रांत लडबडलेल्या शेप-टीस शिवतां सोज्वळावें, गोमयगोमूत्र पितां निर्मळावें, पवित्रावें ! ! पशु तो देव, देवासारखा माणूस तो पशु ! ह्या दोन्ही रूढि धर्म नी सदाचार म्हणून अेकसमयींच अेकत्र गौरविणाऱ्या वस्तुस्थितीहून, धर्माचा छाप पडतांच केवळ विसंगत मूर्खपणा, सुसंगत शहाणपणा, सच्छील पवित्रपणा वाटूं लागतो, मनु-ष्याची कशी बुद्धिहत्या होते, याचें आणखी दुसरें समर्पक अुदाहरण तें कोणतें द्यावें ?

(२) परंतु पशूला देवता मानल्यानें माणुसकीसच हा जो असा कमी-पणा येतो, तो नुसता तात्त्विक किंवा लाक्षणिकच असता तरीहि ह्या अति-रेकाचा अितका तिटकारा आला नसता, पण ' गाय ही देवता आहे. गाय ही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोमाता आहे' या वाक्यांस केवळ अलंकारिक भाषा न मानतां अक्षरशः सत्य मानून तोच धर्म समजून मनुष्याच्या हितास प्रत्यक्ष व्यवहारांतहि त्या गोपूजेच्या वेदीवर बळी देण्यास जेव्हां ही गोभक्ति चुकत नाहीं. तेव्हां तर तीस निषेधिणें हें अेक राष्ट्रीय कर्तव्य होअून बसतें. गाय देवता म्हटली, गोपूजन हें कर्तव्य म्हटलें कीं मनुष्य हा गायीसाठीं आहें अशी श्रद्धा अुत्पन्न होणारच होणार; पण मनुष्यास गायीचा उपयोग आहे म्हणून तिचें पालन करणें अुचित अितकाच गोपालनाचा अर्थ स्पष्टपणें मर्यादिलेला असला कीं मनुष्यास अुपयुक्त होण्याच्या ठायीं गाय ही राष्ट्रहानीस कारणीभूत होत आहे असें पाहातांच अशा परिस्थितींत गोरक्षण हेंच त्याज्य, निंद्य, पाप होणारें आहे हें न शिकवितांहि आपोआप समाजास समजतच असतें. गाय 'ही मनुष्यासाठीं असून मनुष्य हा गाअीसाठीं नाहीं' या सूत्राप्रमाणें मनुष्याचें राष्ट्राचें अेकंदर हित साधत असेल तर गोहत्याहि करण्यास कोणीहि कचरणार नाहीं.

समजा, अुद्यां आपल्या हिंदु राष्ट्राचें कोण्या अहिंदु राष्ट्राशीं निकराचें युद्ध जुंपलें. पुण्यासारख्या वा दिल्लीसारख्या हिंदुराष्ट्राच्या राजधानीस वा सैनिककिल्लीच असलेल्या अेकाद्या महत्त्वाच्या किल्ल्यास शत्रूचा वेढा पडला अन्न संपून गेलें. परंतु आणखी कांहीं दिवस जर तें स्थान हिंदु सैन्य लढवूं शकलें तर बाहेरून नव्या हिंदु सैन्यांचें साहाय्य येअून तें बाणीचें ठिकाण शत्रूच्या हातून सोडविणें शक्य आहे; तसा टिकाव न धरतां तें ठिकाण शत्रूच्या हातीं पडूं देणें अेकंदर हिंदुराष्ट्राच्या अपजयास कारण होणारें आहे. अशा स्थितींत त्या शत्रूच्या वेढचांत गवसलेल्या हिंदु सैन्यास अन्नाचा पुरवठा करण्यासाठीं जे पशु लढाअीस गुंतलेले नाहींत ते मारून खाणेंच राष्ट्रीय दृष्टचा अत्यंत पवित्र गोष्ट होय. अशा आणीबाणीच्या वेळीं अितिहासांत प्रत्येक राष्ट्रास आलेल्या आहेत. अशा वेळीं गाय हा ुपयुक्त पशु आहे, मनुष्यास अधिकांत अधिक अुपयोग करून घेण्यासाठींच गोपालन कर्तव्य असतें, आज त्या वेढचांत सांपडलेल्या हिंदंच्या राजधानीच्या वा दुर्गाच्या संरक्षणासाठीं तेथील बाठ्या नी युद्धार्थ अनवश्यक अशा गायीहि मारून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचें मांस खाणें हाच त्यांस हिंदुराष्ट्रास अुपयुक्त करून घेण्याचा खरा मार्ग आहे असें आढळतांच हिंदु सैन्यानें त्या गायी मारून खाणें नी त्या बळावर हिंदुराष्ट्राच्या शत्रूंशीं झुंजत राहणें हाच हिंदूंचा खरा धर्म ठरणार! गोपालन नव्हे, तर गोहत्या हीच पुण्यप्रद होणार !

परंतु जर गाय ही देवता, तिचें पूजन हाच धर्म अशा भावनेस अक्षरशः सत्य मानणारे गोभक्त हिंदु त्या सैन्यांत असतील तर ते तशा गोहत्येच्या बातमीसरशीं 'धर्म बुडाला' म्हणून खवळून त्या हिंदु सेनापतीच्याच विरुद्ध बंड अुभारतील,नव्हें तें राष्ट्रीय शक्तीचें केंद्र हिंदु शत्रूंच्या हातीं पडूं देतील! राष्ट्रहत्या करतील पण गोहत्या करणार नाहींत ! कारण गाअीला माता नी बैलाला पिता मानणाऱ्या ह्या आजकालच्या भाकड पोथ्या गोहत्या हें महापाप आहे हें शतावधि अनुष्टुप ओव्यांतून सांगत असतांना स्वराष्ट्रहत्या हें त्याहूनहि सहस्रपटीनें महत्तर पाप आहे, प्रत्यक्ष या लोकींच त्या पापी मनुष्यास पचवीत राहाणारा महानरक आहे, हें विधान मात्र चुकूनहि फारसें करीत नाहींत !

गाअीला देवता मानण्याच्या यःकश्चित् अेका देवलसी प्रवृत्तीचे परिणाम अितके भेसूर नि राष्ट्रहितघातक होतात हें केवळ अतिशयोक्त वर्णन आहे असें सहजगत्या वाटणाऱ्या वाचकांनों, तुम्हांला हें ऐकून आश्चर्य वाटेल कीं, गाय ही मनुष्यासाठीं नसून मनुष्य हा गाअीसाठीं आहे ही भाबडी भावना गोपूजनाचा, गाअीचें देवीकरण करून सोडण्याचा, अवश्यभावी परिणाम आहे. हे नुसतें तर्कट नसून आपल्या अितिहासात अनेक समयीं तसे परिणाम प्रत्यक्ष-पणें घडलेले आहेत. गाअीपायीं हिंदु राष्ट्राच्याच पायांत पारतंत्राची बेडी ठोकण्यासहि हातभार लावण्यास ही भाबडी भावना नकळत मूर्खपणानें कच-रली नाहीं. मुसलमानांच्या अितिहासांतहि हिंदूच्या ह्या भाबडेपणाचा अुल्लेख आहे. आपल्याहि अितिहासकारांनी त्या घटना अुल्लेखिलेल्या आहेत. मुसल-मानांचीं आक्रमणें प्रबळ वेगानें जेव्हां हिंदुस्थानावर चालू झालीं, तेव्हांच्या त्या हिंदूंच्या अत्यंत भाबडचा काळांत प्राण गेला तरी हिंदु लोक गाअीवर हात अुगारणार नाहींत ही गोष्ट ठाअूक होतांच कांहीं प्रसंगीं मुसलमान सैन्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोहत्येचें पाप टाळावें म्हणून राष्ट्रहत्या घडूं दिली !

स्वतःच्या व्यूहापुढें गाअींच्या कळपांचे गोल बांधून त्यांस पुढें रेटीत हिंदूंच्या सैन्यावर चालून यावें, तें पाहतांच शस्त्रास्त्रसज्ज हिंदु सैन्यानें अकस्मात अेकहि बाण सोडण्याचें वा अेकहि हत्यार चालविण्याचें नाकारावें ! कारण मुसलमानावर तसा बाण सोडतांच वा हत्यार चालवूं जातांच प्रथमतः शत्रू-पुढच्या गाअीवरच त्याचा मारा होणारा असल्यामुळें गोहत्येचें महापाप घड-णारच घडणार ! कोणताहि हिंदु गोहत्येच्या पापाचा अधिकारी होऊं धजेना ! रणांगणावर मुसलमानांशीं झुंजण्यासाठीं दळवळासहित चालून आलेलें तें हिंदु सैन्य सिंहाचा पंजा अकस्मात लुला होतांच सिंह जसा गाय बनतो तसें गाय बनून रणांगणांतून मागें मागें हटूं लागावें ! लढाअी न लढ-तांच मुसलमानांनी जिंकावी आणि त्या विजयाचा अुत्सव त्याच गायी कापून त्यांच्या मांसांवर ताव मारीत साजरा करावा ! जी गायींची गोष्ट तीच देवळांची. मुलतानावर प्रबळ हिंदु सैन्य चालून येतांच मुसलमानांनीं धाक घातला कीं, 'तेथील विख्यात नी पवित्र सूर्यमंदिर पाडून टाकूं अेक पाअूल पुढें याल तर !' ह्या पापास भिअून मुलतान मुसलमानांच्या हातांतून सोड-विण्याचें अत्यंत महत्त्वाचें नी त्या प्रसंगीं त्या प्रबळ हिंदु सैन्यास दुर्घट नस-लेलें राष्ट्रकार्य तसेंच टाकून हिंदु माघारे फिरले ! "श्री" सोडवावी (काशी स्वतंत्र करावी) हें वाक्य, ही तळमळ पहिल्या बाजीरावापासून तों नानामहादजीपर्यंत सर्वांना सारखी लागलेली पत्रोपत्रीं अुल्लेखित आहे. पण मल्हारराव होळकरांनीं काशीवर अचानक छापा घालून हिंदुपदपादशाहीचा तो मुकुटमणि हस्तगत करायाचा यत्न करतांच मुसलमानांनीं धाक घातला, 'देवळें पाडूं, ब्राह्मण मारून टाकूं, तीर्थें बाटवूं !' त्यासरशीं काशीच्या हिंदु नागरिकांनीं त्या मुसलमानांचेच दांत तिथल्या तिथें पाडण्याचें सोडून अुलट मल्हाररावांपुढें दांत विचकले, धरणें धरलें, शपथा घातल्या कीं काशी मुसल-मानांकडेच राहूं द्यावी नाहींतर तीर्थक्षेत्र ते बाटवितील; हिंदु धर्मास कलंक लावणाऱ्या महापापाचें खापर मल्हाररावांच्या माथीं फुटेल ! शेवटीं काशी-चेच नागरिक मुसलमानांच्या पक्षास मिळालेलें पाहून छाप्याचा बेत दुर्घट म्हणून मराठ्यास सोडून द्यावा लागला !!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दहा देवळें, मूठभर ब्राह्मण, दहापांच गायी मारण्याचें पाप टाळावें यास्तव राष्ट्र मरूं दिलें ! गोहत्येचें पाप टाळावें म्हणून राष्ट्रहत्या घडूं दिली ! राष्ट्राहून राष्ट्रांतील अेक पशु श्रेष्ठ मानला ! राष्ट्रस्वातंत्र्य पडलें तरी चिंता नाहीं, अेक देअूळ पडण्याची चिंता ! असा अेकदां जरी प्रसंग अितिहासांत घडता, तरीहि 'धर्माच्या' भावडेपणास अधर्माहूनहि नरकगामीं ठरविता. मग जिथें असे प्रसंग महंमद गजनवीच्या काळापासून तों दुसऱ्या बाजीरावाच्या काळापर्यंत ह्या वा त्या रूपानें वारंवार घडलेले आढळतात, तिथें या पोथीनिष्ठ, विवेकशून्य, राष्ट्रघातक 'धर्मभोळे' पणाचा आम्हांस अत्यंत तिटकारा यावा ह्यांत कोणाचा दोष बरें ! आम्हां अुपयुक्ततावाद्यांचा का त्या राष्ट्रबुडाअू धर्मभोळेपणास अजूनहि चिकटून राहूं पाहणाऱ्या आमच्या भाबड्या पोथीवाद्यांचा !

हें पाप ! हें पुण्य ! बस्स, अितकीच अरेरावी आज्ञा पोथी सोडते ! तें पाप कां, पुण्य कां, त्यांचा हेतु काय, कोणत्या परिस्थितींत किती कालावधि; तो प्रश्न देखील ती विचारूं देत नाहीं, विशदीत नाहीं ! गोहत्या पाप, गोपूजन पुण्य बस्स ! गोहत्याच पाप कां, म्हैसहत्या वा गाढवहत्या कां नाहीं. राष्ट्रहत्या नी गोहत्या असा विकल्प अुपजतां त्यांच्या तरतमभावाची कसोटी काय तें पोथी सांगणार नाहीं, विचारूं देतच नाहीं. त्यामुळें ज्या मूळ अुपयोगासाठीं गोहत्या पाप ठरली त्या हेतूचीच हत्या ती गोहत्या टाळण्यासाठीं वारंवार अशी घडावी हें पोथीनिष्ठांच्या प्रकरणीं अपरिहार्य होअून बसतें. परंतु विज्ञान नुसतें हें 'पाप' हें 'पुण्य' अशी अरेरावी आज्ञा न देतां तसें कां, त्याचा हेतु काय, तरतमभाव कोणता, कसोटी कोणती तें प्रत्येक प्रकरणीं स्पष्टपणें अैहिक प्रत्यक्षाचे पुरावे देअून विशदितें. मनुषास गाय हा अेक अुपयुक्त पशु आहे, यास्तव तो मनुष्यास तसा अुपयुक्त असेतों मारूं नये. अुपयुक्त न होतां हानिकारकच ज्या परिस्थितींत होअील, त्या प्रसंगीं गोहत्याहि अवश्य, असें विज्ञान रोखठोक अुत्तरतें. त्यामुळें कोणत्याहि प्रसंगीं विज्ञाननिष्ठ मनुष्यास आपलें कर्तव्य पोथीनिष्ठ मनुष्यापेक्षां त्यांतल्या त्यांत अधिक अचूकपणें ठरवितां येतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर अुल्लेखिलेल्या अैतिहासिक प्रसंगीं जर ह्या वैज्ञानिक अुपयुक्ततेची कसोटी लावतां आली असती तर त्या त्या हिंदु सैनिकास नी सेनापतीस आपलें कर्तव्य दिवसासारखें ढळढळीतपणें दिसूं लागतें. जे हिंदु धर्मच अुच्छेदूं आले, हिंदूंचें राज्यच बुडवूं निघाले, त्या दैत्यांच्या पुढें असलेल्या त्या गायींच्या कळपास त्या हिंदु सैन्यानें चराचर कापून त्या प्रत्येक गायीच्या हत्येचें प्रायश्चित्त म्हणून त्यांच्यामागें दडलेल्या त्या शतशत म्लेंच्छांच्या रक्तांत आपले हात धुवून टाकले असते. कारण त्या रणप्रसंगीं त्या मूठभर गायी वांचविण्यासाठीं मुसलमानांच्या मुठींत आपल्या हिंदु स्वातंत्र्याचेंच नरडें करकचूं दिल्यानें, अशी अेक गाय, अेक देअूळ, अेक तीर्थ वांचविण्यासाठीं अेकेक लढाअी मुसलमानास जिंकूं दिल्यानें, अेकेक हिंदु राज्य बुडवूं दिल्यानें, अेकेक मुसलमानी बादशाहीच अुरावर चढवून घेतल्यानें, शेवटीं अुभ्या हिंदुस्थानांतील साऱ्याच देवळांच्या मशिदी होतील, सारींच तीर्थें भ्रष्टतील, प्रत्येक दहादहा हजार गायींची कत्तल करणारे कसाअीखाने शतकोंशतकें ह्याच हिंदुस्थानांत कीं ज्यांत अेकहि गाय अन्नासाठीं अशी कापली जाणें दुर्घट होतें, त्याच हिंदुस्थानांत नित्याचे अुघडले जातील आणि शेवटीं 'देवमात्र अुच्छेदिला। जित्यापरीस मृत्यु भला।' अशी सगळी हिंदु पृथ्वी आंदोळून अुठेल हा आपला भीषण परिणाम त्या कालच्या हिंदु सेनानींस नी हिंदु जनतेस ढळढळीतपणें दिसण्यास अेक क्षणाचाहि विलंब लागताना! मुलतानचें अेक सूर्यमंदिर पाडण्याचा धाक मुसलमानांनीं घालतांच पोथीनें आंधळलेला हिंदु नसता तर त्यानें तात्काळ अुलट प्रत्युत्तरिलें असतें कीं 'पाड तें सूर्यमंदिर; पण म्लेंच्छा, समजून अैस कीं ही हिंदु सेना आतां परती न जातां ते लहान तुझ्या हातून सोडवून काबूलपर्यंत जितकी म्हणून मशीद दिसेल तिच्यावर गाढवाचा नांगर फिरवून देण्यास सोडणार नाहीं! आणि त्यां काबूलच्या शाही मशिदीच्या शिळांच्याच पायावर मुलतानचें सूर्यमंदिर पुन्हां अुभारलें जाअील!' मल्हारराव होळकर पुढें आलें तर काशीचें अेकहि तीर्थ, देवालय, ब्राह्मण अुरूं देणार नाहीं म्हणून अयोध्येच्या नबाबानें काशीच्या ब्राह्मणादिक हिंदूंस धरणीं धरून धांकवितांच ते अुत्तरले असते, 'हाड तें देअूळ! औरंगजेबानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या विश्वेश्वराचें देअूळ अर्धे पाडून पूर्वीं मशीद बनविलींच आहे–तूं बाकीचें पाड ! नी काप हीं आमचीं मूठभर ब्राह्मणांचीं शिरें ! पण ध्यानांत धर की आज तुझी गांठ दिल्ली गद्‌गद् हालवून सोडणाऱ्या मराठ्यांशीं आहे नी तिकडे पुण्यास आज आहे 'ब्राह्मणी राज्य जोरावर. घोड्यावर स्वार लाखो शिपाअी !' ते या अेका काशीच्या देवळाचा सूड घेण्यासाठीं महाराष्ट्रांत तरी मशीद म्हणून अुरूं देणार नाहींत, रस्ते साफ करून मशिदी नी वाद्यें हा प्रश्नच आमच्या पुढच्या पिढ्यांना त्रास देण्यास मागे ठेवणार नाहींत ! राजकीय लढ्यांत धर्मस्थानें न अवमानण्याची आम्हां हिंदूंची वहिवाट; शनिवारवाड्यांतदेखील अेक पीर सुरक्षित ठेवला; पण जर तुम्ही म्लेंच्छ ती वहिवाट पुन्हां तोडाल तर हिंदूहि तिला ठोकरून देतील; कारण आज तरी सिंधूपासून सेतुबंधापर्यंत मराठ्यांचें शस्त्र हेंच शास्त्र आहे. महाराष्ट्रांत तुमच्या मशिदी त्यांच्या पायांवर अुभ्या नाहींत तर आमच्या दयेवर !' पोथीनें आंधळलेलें नसते तर ते हिंदु त्या नबाबास असे धमकावते नी धमकावणी खरी करून दाखविण्याचें सामर्थ्यहि हिंदु खड्‌गांत् त्यावेळीं होतें. पण त्यांनीं आंधळ्या पोथीनिष्ठतेसाठीं मूठभर गाअी मारण्याचें 'पाप' घडूं नये म्हणून राष्ट्र बुडवून लक्षावधि गाअी शतक्रोशतकें मारणाऱ्या कसाअीखान्यांचीं ताम्रपत्रें म्लेंच्छांस दिलीं. देवाचें अेक देअूळ अुच्छेदूं नये म्हणून देवाचें राज्यच अुच्छेदूं दिलें ! म्हैस, घोडा, कुत्रें; फार काय, गाढवदेखील आपापल्यापरी गाअीसारखेंच मनुष्यास अुपयुक्त आहे.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होअील कीं, मनुष्याला अधिकाधिक अुपयोग ज्यायोगें होअील अशा प्रकारेंच गाअीची जोपासना करावयाची असेल तर तो हेतु साधण्यास गोपालन हें राष्ट्राचें कर्तव्य होय असे असेल तर तो हेतु साधण्यास गोपालन हें राष्ट्राचें कर्तव्य होय असें सूक्त राष्ट्रापुढें ठेवलें पाहिजे. गोरक्षण हा धर्म आहे, तें अैहिक नी पारलौकीक पुण्य आहे, गाय ही देवता आहे, अितकेंच नव्हे, तर तिच्यांत अेक सोडून तीस कोटि देवता राहतात, प्रभृति बाष्कळ कल्पनांवर अनुष्टुपें रचून गोपूजन हाच हिंदु धर्म आहे हें

(सा....२०)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्र राष्ट्रापुढें ठेवल्यानें गाअीचें रक्षण तर हवें तसें होत नाहींच, पण भावडे-पणाची प्रवृत्ति राष्ट्रांत वाढून गोभक्तीपायीं राष्ट्रभक्तींचेंच खोबरें होतें, मनुष्याच्या हिताचाच बळी गाअीपुढें देण्यांत येअून गोरक्षणांतील मूळ हेतूलाच ठक्का पोंचतो. कितींहि अुपयुक्त असला तरी तो अेक पशु त्या गाअीला देवता मानल्यानें सामान्य लोक तिची जोपासना अुत्कटपणें करतील म्हणून तिला देवता मानावी, गोपूजन हा धर्म मानावा, ही समजूत अशी खुळचट ठरते, समाजाच्या बुद्धिहत्येस कारणीभूत होते.

कारण अुपयुक्ततेच्या दृष्टीनेंदेखील गाअीचे अितकें स्तोम माजविणें चुकीचें आहे. घोडा आणि कुत्रें हे दोन पशु तरी गाअीहून आधीं, निदान गाअी बरोबरच मनुष्याचें अत्यंत प्राचीन काळापासून अत्यंत अेकनिष्ठ सेवक झालेले आढळतात. कृषियुगाच्या नी गोपालनयुगाच्या आधींच्या मृगयायुगांत मनुष्य भटकत होता तेव्हांदेखील गाअीपेक्षां कुत्रें नी घोडा हेच त्याच्या जिवास जीव देणारे सवंगडी असत. मृगयेंत सावज पकडतांना आपल्या धन्याच्या जिवासाठीं हिंस्र पशूंवरहि चाल करून जाणारा, घरादाराचें चोरांचिलटा-पासून रात्रंदिवस रक्षण करणारा, धनी निजला तरी आपण जागे राहून मध्यरात्रीहि आलोचन पहारा देत रहाणारा, ज्या गाअीस आम्ही देवता म्हणून गौरवतों तिच्या खिल्लारांसहि अनेक प्रसंगीं ज्याच्या तिखटपणामुळेंच निर्भय-पणें रानावनांत चरतां येतें, आजवर जो प्राणी पोलिसांचीं सुबुद्ध कर्तव्येंहि युरोपसारख्या देशांत करूं लागून मनुष्यसमाजाची जवळ जवळ माणसा-सारखी सेवा करीत आहे त्या कुत्र्याचा अुपयोग मनुष्यजातीस काय थोडा-थोडका झालेला आहे ? गाअीनें दूध दिलें तर कुत्र्यानें अनेक प्रसंगीं मनुष्यास जीवदान दिलेलें आहे. मुलांचा मित्र, मृगयेची बंदूक, घराचें कुलूप, पडतो दाराशीं, खातो भाकरीचे तुकडे, करून घेतो साऱ्यांची हड हड, नुसतें यू म्हटलें कीं चटकन् त्यानें पाय चाटूं लागावें अितका विनम्र, संकटांत जिवास जीव देण्याअितका कृतज्ञ, शिवाय शेतकऱ्यांपासून शाहू सम्राटांपर्यंत ज्याचा त्याचा अेकनिष्ठ चाकर ! त्या कुत्र्यास सन्मान कोणता, वेतन काय ? तर त्याचें नांव ही अेक शिवी; जात अस्पृश्य. अुपयुक्ततेंत घोड्याची योग्यताहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तशीच निस्सीम. अुभ्या राष्ट्राचें जीवन वा मरण अनेक समयीं त्याच्या घोडदळाच्या शक्तीवर नी सज्जतेवर अवलंबून होतें. मराठ्यापाशीं भीम-थडीचीं तट्टें होतीं म्हणून हिंदुपदपादशाहीस केवढें साहाय्य झालें, हिंदुधर्मांच्या रक्षणाचें तें केवढें अमोघ साधन ठरलें ! गायीच्या खिल्लारांच्या बळें अटके-पर्यंत हिंदु धर्मांच्या शत्रूंस मराठ्यांनीं 'दे माय धरणी ठाय' केलें नाहीं तर घोडदळाच्या बळेंच होय. गाय तर अुपयुक्त आहेच आहे, पण प्रसंगीं गायीच्या दुधाचा तुटवडा तितकासा भासण्याचें कारण नाहीं; म्हैस ती अुणीव पुष्कळ प्रमाणांत भरून काढते. पण रणांगणासारख्या प्राणसंकटांतहि राष्ट्राचें रक्षण करणारा, प्रतापसिंहासारख्या राष्ट्रवीराचें प्राण हळदीघाटाच्या संग्रामांतून वांचविणारा, झांशीच्या राणीस अिंग्रजासारख्या अहिंदूच्या कडोनिकड पाठलागांतील बंदुकांच्या सारख्या भडकणाऱ्या आगींतून काल्पी-पर्यंत अेका दमांत पोंचवून स्वातंत्र्यसमराच्या देवतेचें प्राण वांचविण्याचें महत्कार्य सरतांच आपण त्या श्रमें गतप्राण होअून पडणारा तो घोडा, त्याची अुणीव, दुसरा कोणांचा पशु भरून काढील ? घोडाच काय, कांहीं देशांत गाढवहि मनुष्याला आपल्या अिकडे गाय आहे तितकेंच अुपयुक्त ठरलेलें आहे. ज्या लोकांत गाढवाला मनुष्या अितका अेकनिष्ठ सेवक समजत कीं, त्याचें नांव अुपयुक्ततेचें अुपमान होअून बसावें. येशू ख्रिस्त जेव्हां अीशप्रेषिताच्या अधिकारानें जेरूसलेममधील आपला पहिला विजयप्रवेश करते झाले, तेव्हां त्यांनीं तशा धर्म नी दैवी कार्यास साजेलसें वाहन म्हणून गाढवाची योजना केली. 'अशा विजययात्रेस पवित्र वाहन गाढव! 'तर जा नी अेक पांढरे स्वच्छ गाढव घेअून या !' म्हणून त्यानें शिष्यास आज्ञापिलें आणि त्या शुभ्र गर्दभावर बसून तो देवदूत ख्रिस्त जेरुसलेममध्यें आपला विजयप्रवेश करतां झाला! अनेक देशांत गाढव हें प्रत्यहींचें आबालवृद्धांच्या स्वारीचें वाहन आजहि आहे. सिंध देशांत आपले हिंदुहि बसावयास गाढव अितकें निःसंकोचपणें वापरतात कीं, ब्राह्मणांच्या मुली सासरींमाहेरीं जातां येतां गाढवावर बसून तशाच हौशीनें डुलतांना आढळतात कीं, जशा बैल-गाडीछकड्यांतून जातांना. आमच्याअिकडे कित्येक जातींची सारी अुपजीविका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालतें गाढवावर. त्याचें मुख्य धन गोधन नसून गाढवें. घरांतल्या अेखाद्या माणसासारखें तें बिचारें घरधन्यासाठीं राबतें, ओझीं वाहतें, आणि असतें किती स्वस्त ! त्याचा पगार म्हणजे गावचा अुकीरडा फुंकून जें काय पोट भरतां येअील तें **गायीच्या दूधानेंहि बरे होत नाहींत, पवित्र पंचगव्यानेंहि क्षालन होत नाहींत अशा कांहीं रोगांच्या वेळीं ब्राह्मणांच्या मुलासहि गाढवीचें दूध अुपयोगी पडतें.** पण गाढव अितकें अुपयुक्त नी अितकें प्रामाणिक, अितके सोसाळू असतें, म्हणून त्यास पशु न मानतां आजवर कोणीं त्याची देवता बनविली; किंवा अेखादी गाढव-गीता रचून गाढवपूजनाचा संप्रदाय काढला आहे काय ? कुंभारदेखील गाढव पाळणें अितकेंच आपलें कर्तव्य समजतो. गाढवपूजन नव्हे ! घोडा अत्यंत अुपयुक्त राष्ट्रीय पशु म्हणून त्याचाहि अेक घोडदेव कल्पून त्याच्याविषयींची कृतज्ञता व्यक्तविण्यास वर्षांकांठीं चातुर्मास्यभर तरी मनुष्यानें घोड्यावर स्वारी न भरतां घोड्यासच मनुष्यावर समारंभपूर्वक स्वारी करूं द्यावी असें अेकादें व्रत कोणीं प्रचलविलें आहे ? कुत्रा अति अुपयुक्त, प्रत्यक्ष दत्तात्रेयाचा आवडता; म्हणून कुत्र्यासच देवता कल्पिली, श्वानहत्या हें 'पाप ठरविलें आणीं अुद्यां अेखाद्या म्लेच्छ शत्रूंच्या रणतरी (Battle ships) भारतावर चढाअी करून आल्या असतां त्यावर असणारीं कुत्रीं मरतील, श्वानहत्या घडेल, या पापभीरू शंकेनें हिंदु सैनिकांनीं त्या शत्रूंच्या रणतरीवर गोळामार करण्याचें नाकारलें आणि त्यास हिंदुस्थानांत सुरक्षितपणें अुतरूं देअून लाखों हिंदु स्त्रीपुरुषांची कत्तल अुडवूं दिली तर तें कृत्य कृतज्ञतेचें स्तुत्य प्रदर्शन समजलें जाअील का बाष्कळपणाचा वेडाचार ?

मग गाय हा अुपयुक्त पशु आहे, यास्तवच त्याची देवता कल्पून आपण हे सारे वेडेचार जे गायीच्या प्रकरणीं करतों तेंहि निव्वळ बाष्कळपणाच मूर्खपणाच म्हणावयास नको काय ? घोडा, कुत्रा, गाढव या अुपयुक्त पशूंत, गाअींत आहेत ते वांच्छनीय गुण नसले तर त्यांच्यांत जे मनुष्यांस अत्यंत आवश्यक गुण आहेत ते गाअींत नाहींत. देवता कल्पून त्यांस पूजले नाहीं म्हणून काय त्यांची जोपासना कमी होतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते अुपयुक्त पशू आहेत, ह्यामुळेंच म्हैस, घोडा, कुत्रा, यांची योग्य ती जोपासना जशी होतेंच आहे, तशीच गाअीचीहि, तिला देवता न मानलें तरीहि, तिच्या अुपयुक्ततेच्या बळावरच होअुन हें नक्की. अितकेंच नव्हे, तर तिला देवता केल्यापेक्षां अधिक अुपयुक्त प्रकारें आणि पशूस आवडेल अशा पशूच्या प्रमाणांतच होअून गोपूजनामुळें होणाऱ्या राष्ट्राच्या बुद्धिहत्येचें पापहि टळेल. परंतु, गोपालन अितकें कर्तव्य नसून गोपूजन हा हिंदूंचा 'धर्म' आहे, तें अैहिकच नसून पारलौलिक 'पुण्य' आहे, तें अशा भावड्या भावनेपायीं आम्हीं गाअीसदेखील नकोसें व्हावें असें तिचें कोण स्तोम माजवून ठेविलें आहे पाहा !

गोग्रास

बोलूनचालून गाय बिचारी पशु; तिला हिरवेंचार गवत खाण्यांतच खरा आनंद. आणि मनुष्याच्या पक्वान्नांपैकीं तिला जर कोणचें पक्वान्न त्यांतल्या त्यांत आवडत असेल तर अेका भक्कम घमेल्यांत पंगतींतलें सारें अुष्टेंखरकटें अेकत्र करून घातलेलें मसालेदार ओखटवाणी! तो तिचा आवशता गोग्रास. पण तिला देवता करण्याच्या खुळापायीं तिला नको तेंच तिच्या दैवीं आम्हीं बळें बळें बांधणार. शुचिर्भूत ब्राह्मणाच्यापुढें ठेवावें तसेंच अेक केळीचें पान कापून त्यावर वड्या कोशिंबिरी अेका बाजूस, भाज्या दुसऱ्या बाजूस, लिंबू-मीठ-खीर, भाताची मूद, वरण, लाडू सुव्यवस्थितपणें वाढून, घरचीं मुलेंमाणसें जेवण्याच्या आधीं तें पान गोमातेच्या पुढें ठेवायचें ! अितकें बरें झालें कीं, नुसतें देवापुढच्यासारखें वाढलेलें पानच तेवढें तिच्यापुढें ठेवायचें म्हणून पोथी सांगते. कोण्या गोभक्तानें दहापांच संस्कृत अनुष्टुपें तींत घुसडून जर का असें सांगितलें असतें कीं गाअीस नैवेद्याच्या वेळीं गोठ्यांत न बांधतां देवघरांत बांधवें, अेक चंदनी पाट मांडून तीवर तीस दहापांच माणसांनीं धरून साडीचोळी चढवून मागच्या पायांची मांडी घालवून बसवावें नी पुढच्या पायांनीं तिला जेवतां नच आलें तर आपल्या हातांनीं रीतसर भरवावें ' तर पोथींत आहे म्हणून आम्ही तोहि बाष्कळपणा करावयास सोडतों ना ! गंगेस महापुरांत साड्याचोळ्या आम्ही वाहतोंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कीं नाहीं ! पण पोथींत तेवढें गळल्यामुळें देवब्राह्मणांसारखें तें वाढलेलें केळीचें पान आम्ही गोमातेस पण गोठ्यांतच नेऊन नैवेद्य अर्पितों ! पण म्हणून तिला कांहीं त्याची जाणीव ? छट्, तिच्या पशूधर्माचा तो अेक अपमानच वाटून कीं काय न जाणो-ती गाय प्रथम खीर, मग हळूच तूप ओतून वरणभात कालवून पान हालूं न देतां देवतेसारखी अनुक्रमें जेवायच्या ठायीं, जिकडून लग्गा लागेल तिकडून जी जिभेचा लपका मारते. ती मीठ, खीर, भेंड्याची भाजी, वडा, कोशिंबीर, लाडू, वरण सारे लपालप सांपडेल तसें मचमचीत त्या साऱ्या सोज्वळ पदार्थांचें तिला हवें तें ओखटवाणी करून सोडते–केव्हां केव्हां तर भाताची मूद फोडून कालविण्याच्या आधींच तें हिरवेंगार केळीचें पान पाहूनच तिच्या तोंडास अधिक लाळ सुटल्यामुळें पानच जिभेनें अुलटन ओरबाडून खाअूं लागतें पक्वान्न, आमटी, तूप सारें भुअीवर तिच्यापुढच्या शेणसड्यांत सांडतें.

यांपेक्षां सुग्रास मनुष्ययोग्य अन्न मनुष्यास तेवढें देअून पशूस प्रिय नी पशुयोग्य तें पंगतींतील अुष्टें खरकटें, शिळेंपाकें तेवढेंच ओखटवाणी घमेल्यांत गाअीपुढें ठेवून तिला जिभेचें लपके यथेच्छ मारूं देण्यांत तिलाहि बरें, नी व्यर्थ जाणारें अुष्टें कारणीं लागल्यानें मनुष्यासहि बरें होअील, नव्हे काय ? पशूअितकीच नी पशूसारखीच जोपासना केल्यानें गोपालन अधिक चांगलें कसें होतें त्याचें हें अेक उदाहहण पुरे आहे:

पण दुसरें हवेंच असेल तर गाअीची स्थिति नी प्रगति अमेरिकेंत किती अुत्कृष्ट रीतीनें होते ती पाहा. हिंदुस्थानाअितकीच अमेरिकेंतील कांहीं कृषि-प्रधान भागांत गोधनाची आवश्यकता आहे. पण मनुष्यास अुपयुक्त असा अेक पशु अितक्याच दृष्टीनें ते तिकडे पहात असल्यामुळें, गोपालन अितकेंच कर्तव्य मानलें जात असल्यानें, गोपूजनाचा भाबडेपणा हा माणुसकीस हीनता आणणारा आहे ही जाणीव त्यांस असल्यामुळें तो पशु ज्यायोगें मनुष्यास अधिकाधिक अुपयुक्त करतां येअील त्या त्याच अुपायांनीं नी प्रमाणांत तिची जोपासना करण्यांत येते. तिच्या दुधांत जे विशेष गुण तें कसे वाढतात याचे वैज्ञानिक प्रयोग करून, तिची वीण,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुधाळपणा ज्या चारावैरणीनें वाढतें त्यांचे सप्रयोग कोष्टक करून ती ती चारावैरण तिला देण्यांत येते. तिचे गोठे पशूंच्या आरोग्यास अवश्य त्या प्रकाश, स्वच्छता, कीटध्न औषधप्रभृति साधनांनीं त्या पशूस हितकारक असें बांधण्यांत येतात. तिच्या जाति कोणत्या, अुत्कट पैदाशीसाठीं निवडक वळू कोणते, ऋतु कोणते, ते वैज्ञानिक प्रयोगांनीं ठरवून गाअीची निपज प्रत्येक पिढीस अधिक सुरेख, दयाळू, धष्टपुष्ट अशी करविली जात आहे. भागवतांतील गोकुळांमधल्या गोधनाचें जें काव्य ती आज अमेरिकेंतील वस्तुस्थिति आहे ! तीं त्यांचीं हिरवींचार विस्तृत चराअू रानें, तीं अेकाहून अेक सुंदर, अुंच, सुश्लिष्ट, अेकहि गोचीड अंगावर नसलेल्या, विशाल नेत्राच्या, हंडचा-अेवढया कांसेच्या, दुधाळ, सवत्स नी निरोगी गाअींचीं शेकडों खिल्लारें, अुत्तम गाअींचीं प्रदर्शनांतून लागलेली चढाओढ आणि त्या मदोत्कट डरकाळचा फोडीत चाललेल्या, बळकट वृषभांच्या झुंजी, ते दहीदूध-लोण्याचे विशुद्ध नि सत्वस्थ क्षीरसागरोपम हौदचे हौद ! खरोखर आजवर कुठें भागवतांतील गोकुळ पृथ्वीवर नांदत असेल तर ते गोमांसभक्षक असतांहि गाअीस अेक अुपयुक्त पशु मानूनच काय ती तिची जोपासना करणाऱ्या गोपालक अमेरिकेंत होय. आणि गाअीस देवता म्हणून पोसणाऱ्या, तिचें शेणमूत्रहि पिण्यांत पुण्य मानणाऱ्या भारतांत कोणत्या गोसंस्था नांदत आहेत ? मुख्यतः पांजरपोळ आणि कसाअीखाने !

तेव्हां आमची साऱ्या गोरक्षक संस्थांस अशी विनंति आहें कीं, त्यांनी गोपालक बनावें, वैज्ञानिक साधनांनीं मनुष्यास त्या पशूचा अधिकाधिक अुपयोग कसा करतां येईल ह्याच काय त्या दृष्टीनें तिची अमेरिकेसारखी सकस नि सुरेख वीण वाढवून, दूध वाढवून, आरोग्य वाढवून जोपासना करावी, गोरक्षण करावें, राष्ट्राचें गोधन वाढवावें. परंतु त्या नादांत भाबडेपणाची भेसळ होअू देअून पशूलाच देव करून पूजण्याचा मूर्खपणा करूं नये. गाअीचें कौतुक करायचें तर तिच्या गळयांत घंटा बांधा पण कुत्र्याच्या गळयांत आपण पट्टा घालतों त्या भावनेनें. देवाच्या गळयांत आपण हार घालतों त्या भावनानें नव्हे ! हा प्रश्न अेका फुटकळ धर्मसमजुतीचा नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा धार्मिक छापाच्या ज्या शेकडों खुळचा समजुती आपल्या लोकांची बुद्धिहत्या करता आहेत त्या भाकड प्रवृत्तींचा आहे. तिचें अेक अुपलक्षण म्हणून आम्हीं गाअीची गोष्ट तेवढी निवडली !

आमच्या 'गायी' वरील लेखाचा ज्या आमच्या गोभक्त बांधवांस राग आला असेल त्यांनी असा शांतपणें विचार करावा कीं, आम्हां हिंदूंच्या संस्कृतीचा अुपहास जर कोणचा कागद करीत असेल तर तो आमच्या लेखाचा नसून गायींत तेहतीस कोटि देवता कशा नांदतात हें दाखविणारा तो सर्वत्र आढळणाऱ्या चित्राचा कागद होय !

पंढरपूरच्या यात्रेच्या रामरगाड्यांच्या दिवसांत तिसऱ्या वर्गांतील आगगाडीच्या डब्यांत वारकरी जसा धर कीं कोंब चालू होते, तसें या गायीच्या शरिरांत देवांची रगडारगडी, कोंडमार झालेली आहे ! विष्णु, ब्रह्मा, चंद्र, सूर्य, यम, कोणी कंठांत कोणी दांतांवर, कोणी नाकांत ज्याला जिथें साधेल तिथें तो लगटला. पृष्ठवंशांत तर इतकी दाटी कीं, कुणी सनातनीहि रागानें जेव्हां अुनाड गाअीच्या पाठींत दोहतांना तिनें लाथ झाडतांच हटकून एक काठी घालतो तेव्हा दहापांच देव तरी लंबे झाल्यावांचून राहूंच नयेत ! नाकातोंडांतील आस्वाद्य रसांत लवडलेल्या देवांची तर करुणाजनक स्थिति आहेच; पण त्यांतल्या त्यांत शत्रूंवरहि येअू नये असा प्रसंग जर कोणावर आला असेल तर त्या बिचाऱ्या मरुत् नी वरुणावर ! जागा मिळण्याच्या रेटारेटींत शेवटीं 'अपाने तु मरुद्देव योनौ च वरुणः स्थितः॥' आणि मूत्रे गंगा !! हें काय चित्र कीं विचित्र !!! **आपल्या हिंदु संस्कृतीचें विडंबन आजच्या विज्ञानयुगांत जर कोणी करीत असेल तर तें आमचा लेख नसून** देवांनाच पशुहून पशु करून सोडणारीं हीं असलीं भाकड संस्कृत अनुष्टुपें होत; आणि आमच्या आचारांचें विडंबन तें पंचगव्य !!

गायीस अेक वेळ गोमाता म्हणा, लाक्षणिक अर्थी ते क्षणभर चालेल; पण तें अक्षरशः खरें मानणें नव्हे. त्याहिपुढें जाअून आअीचे देखील जे पदार्थ असेव्य मानायचे तें देखील गायीचे सेव्य मानून, पावन मानून, तिचें शेण नी गोमूत्र समारंभपूर्वक प्यायचें हा का आचार कीं अत्याचार ! काय म्हणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोमूत्रानें हे अमके तमके रोग बरे होतात आणि शेण हें अुत्तम खत आहे ! अितकेंच असेल तर त्या रोगांनीं पछाडलेल्या रोग्यास तें गोमूत्र पिअूं द्या. घोड्याचें मूत्र, गाढवीचें दूध कोंबडीची विष्ठा हीहि अुपयुक्त औषधें आहेत. मनुष्यमूत्रांतहि कांहीं गुण आहेत. त्या त्या रोगावर तीं घेतांत तसें गोमूत्र घ्या. पण कोंबडीची विष्ठा सर्पदंशावर अुतार मानतात म्हणून श्राद्धाच्या दिवशींहि चटणीसारखी थोडी थोडी सेवावी कीं काय ! शेण खत आहे तर शेतांत घाला. पोटांत कशाला ? शेण खत आहे तर विष्ठाहि खत आहे. मेलेले अुंदीर गुलाबास अुत्तम खत. पण म्हणून मेलेले अुंदीरच गुलाबासारखे नाकाशीं धरून हुंगायचे कीं काय ? तेव्हां गाअीचें शेण मी गोमूत्र ह्यांत अमुक गुण आहेत अशीं कितीहि लांब टाचणें गोभक्तांनीं प्रसिद्धिलीं तरी त्यायोगें त्या रोगापुरतें वा अुपयोगापुरतें तें अुपसविणें समर्थनीय ठरेल. पण गोमूत्र पिणें नी शेण खाणें हें पुण्य कसें ठरेल, आत्मशुद्धीचा संस्कार म्हणून, पवित्र म्हणून, जें पंचगव्य प्यायले जातें त्याचें समर्थन कसें होअिल ! खरी गोष्ट मुळांतच ही आहे कीं, ज्या भावड्या प्रवृत्तीमुळें गाअीसारख्या अेका धादांत पशूची अेक देवता बनविली त्याच धर्मभोळ्या भावडेपणानें तिचे गोखूर दाराशीं काढणें शुभ मानणें, तिची शेंपटी डोळ्यावरून फिरविणें कल्याणकारक मानणें, तिला पूजणें धर्म मानणें आणि शेवटीं वेडेचारांचा कळस होअून तिचें शेण नी गोमूत्रहि पवित्र ठरविणें, तें खाल्ल्यानें नी प्याल्यानें आत्मशुद्धि होते, पापक्षालन होतें, अिहपरलोकीं पुण्य लागतें, अितका भावडेपणा अतिरेकास गेला.

आपल्या थोर हिंदु संस्कृतीचें विडंबन जर कोणी करीत असेल तर ह्या आपल्या असल्या पुण्य म्हणून शेण खाणाऱ्या नी गोमूत्र पिणाऱ्या भावड्या चाली होत. ह्या पोथीनिष्ठ मूर्खपणाचा निषेध आमच्या सनातनी बंधूनीं तें विडंबन नको असल्यास करावा; तो मूर्खपणा आहे असें आपल्या लोकांस समजून सांगणाऱ्या आमच्या लेखाचा नव्हे !

जातां जातां पंचगव्याची अेक अुपपत्ति सांगाविशी वाटते. ती कुठेंहि आढळत नाहीं. आम्हीं सिद्धान्त म्हणून नव्हे तर सूचना म्हणूनच सांगतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आम्हांस असें वाटतें कीं, गाअीचें शेण खाणें नी मूत्र पिणें ही पूर्वी केव्हांतरी अेक अुपमर्दकारक निंदाव्यंजक शिक्षा दिली जात असावी. पाप्याची मिशी काढणें, गाढवावर बसविणें अित्यादि धिंडवड्यांप्रमाणें त्याला दंड म्हणून गाअीचें शेणमूत खाणें भाग पाडलें जात असावें. प्रायश्चित्तांतून गोमयगोमूत्राचें ठळकपण हेंच दाखवितें. पुढें त्या शिक्षेचाच संस्कार म्हणजेच धर्मीकरण झालें आणि ज्यायोगें पापनिवृत्ति होते तें पुण्यकारक ह्या सहज भावानुक्रमें गाअीचें शेण खाणें नी गोमूत्र पिणें हें स्वयमेवच पुण्यकारक होय, अशा धर्मभोळ्या मताला अगदीं सहज असलेली समजूत होअून बसली. कारण हा पंचगव्याचा, किंवा नुसतें गोमय, गोमूत्र पवित्र म्हणून आचमिण्याचा प्रश्न सोडला तर अजूनहि व्यवहारांत 'शेण खाणें, मूत्र पिणें' ही शिवी आहे. संस्कार नव्हे !

✠ ✠ ✠

[सावरकर साहित्य : विज्ञाननिष्ठ निबंध, खंड २ :
मूल्य २ रुपये]

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन शब्दांत दोन संस्कृति : : २१

✠ ✠ ✠

[पूर्व आणि पश्चिम यांची तुलना अनेक लोकांनीं केली आहे. पण त्या दोघांतील मूलभूत अंतर कोणतें हें या लेखांत विचारवंत बॅ. वि. दा. सावरकर यांनीं दाखविलें आहे.]

✠ ✠ ✠

युरोपमध्यें वा अमेरिकेंत आज आपण पाय टाकल्याबरोबर आपल्या कानांवर जर कोणचा सर्वकष शब्द पडत असेल तर तो 'अप-टु-डेट' 'अद्यावत' हा होय. अगदीं यःकश्चित् बूटपालीशची डबी घ्यावयास गेलों तरी दुकानदार चटकन् आपल्या सांगेल कीं, 'हीच डबी घ्या रावसाहेब!' 'कां हीच कां?' असें विचारतांच तो अुत्तरेल, 'ही अगदीं अप-टु-डेट आहे बघा!' जो मनुष्य अप्-टु-डेट् नाहीं तोच अजागळ. हा असला अद्यावत्पणा, अप्-टु-डेटपणा त्यांच्या बुटांच्या बंदापासून तो वीजदिव्याच्या बटनापर्यंत जिथें तिथें आढळून येतो. त्याच्या कालच्या बंदुकीपेक्षां आजची सरस, कालच्या विमानापेक्षां आजचें सरस, लंडनच्या या टोंकाच्या खोलींत बसून ते परवां लंडनच्या त्या टोंकाच्या घरांतील मनुष्याशीं दूरध्वनीनें बोलत. काल ते त्याच लंडनच्या खोलींतून स्कॉटलंडच्या घरांत बसलेल्या मनुष्याशीं बोलूं लागले. तर आज ते लंडनच्या त्याच खोलींत बसून अमेरिकेंत बसलेल्या मित्राकडे तोंड करून सकाळचा बाजारभाव विचारतात आणि लगेच तोंड वळवून मुंबअींत बसलेल्या अडत्यास सकाळच्या सकाळीं तें कळवितात! असा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचा 'आज' त्यांच्या 'काल' च्यापुढें सारखा धांवत आहे; 'काल' मागें पडत टाकाऊ बनत आहे. त्याचा प्रत्येक 'आज' 'काल'च्याहून अितका अधिक समंजस, सकस, सरस ठरत आहे कीं, त्यांचा 'काल'वरचा विश्वास ढळून 'आज' वरच अढळपणें बसलेला आहे; अितका अढळ कीं, प्रस्तुतच्या युरोपअमेरिकन जीवनाचें, संस्कृतीचें, प्रवृत्तीचें मुख्य लक्षण जर कोणच्या अेका शब्दांत अपवाद वजा घालून व्यक्तविलें जात असेल तर तें त्या अद्यावत्, अप्-टु-डेट् याच शब्दांत होय. प्रस्तुतच्या युरोप अमेरिकन संस्कृतीचें विशेषनाम आहे—अप्-टु-डेट्, अद्यावत् ! !

पण आपल्या हिंदुराष्ट्रांत आजहि आमच्या मनोभूमीत खोल खोल पाळेंमुळें खुपसून जी साऱ्या जीवनास व्यापीत फैलाविली आहे त्या संस्कृतीचें तसें मुख्य लक्षण जर कोणच्या अेका शब्दांत सांगावयाचें झालें तर तें ज्या शब्दांत सांगत येअील तो शब्द म्हणजे 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हाच होय ! अद्यावत्च्या, अप्-टु-डेट्च्या अगदीं अुलट ! कोणचीहि वस्तु, चाल, घाटणी, टूम, ग्रंथ, ज्ञान, सर्वोत्कृष्ट कां आहे म्हणून युरोपियनास विचारतांच तो झटकन् अेका शब्दांत सांगेल कीं ती अद्ययावत् आहे म्हणून, तसेच कोणतेहि ज्ञान, ग्रंथ, टूम, घाटणी, चाल सुधारणा ग्राह्य कीं अग्राह्य, योग्य कीं अयोग्य कां आहे हें ठरवितांना तीं आज अुपयुक्त आहे, सोयीची आहे, प्रगतीकारक आहे कीं नाहीं, मागच्याहून सरस सकस आहे कीं नाहीं हें जवळजवळ मुळींच न पहातां पहिल्या धडाक्यालाच आम्हीं बहुधा जें पाहूं विचारूं, तें हें कीं, ती श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे कीं नाहीं ! आमच्या संस्कृतीला अत्यंत लाजिरवाणें भूषण म्हणून आम्ही जें ब्रीद मिरवितों तें हें कीं वेदांत सांगितलें आहे त्याच्यापुढें आम्ही गेल्या दहापांच हजार वर्षांत सामाजिक राजकीय वा धार्मिक विधिनिषेधांत वा कौशल्यांत रतिभरहि पुढें सरकलों नाहीं.

मनुराजर्षींचा तो 'अेषधर्मस्सनातनः' शाहूराजर्षींचा तो 'जुनें मोडूं नये, नवें करूं नये' आणि आजच्या ब्रह्मश्रींचा हा 'शास्त्राधार आहे कां !' हे तिन्ही गृहस्थ ज्या अेकाच मूळपुरुषाचे औरसपुत्र आहेत तो पुरुष म्हणजे 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हाच होय ! खरोखर आमच्या हिंदुसंस्कृतीची पूर्वा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार विशिष्ट प्रवृत्ति कोणती, लक्षण कोणतें, महासूत्र कोणचें तें अेका शब्दांत अपवादादि वजा जातां व्यक्तविणें असेल तर तो शब्द म्हणजे 'श्रुतिस्मृति-पुराणोक्त' हाच होय ! ! ! आजच्या युरोपियन संस्कृतीचें जें मुख्य लक्षण 'अद्यावत्' त्याच्या अगदीं अुलट ! ते पूजक 'आजचे' आम्ही 'कालचे !' ते नव्याचे, आम्ही जुन्याचे ! ते 'ताज्या' चे भोक्ते, आम्ही 'शिळचा' चे ! अेकंदरींत पाहतां त्यांची संस्कृति अद्यावती, आमची पुरातनी !

या अद्यावती नी पुरातनी संस्कृतीचीं आजचीं ठळक अुदाहरणें म्हणून जरी आम्ही युरोपियन आणि भारतीय जानदांचाच विशेष अुल्लेख केला असला तरी वास्तविक पाहतां हा अद्यावतपणा किंवा पुरातनपणा कोणत्याहि अेका जानपदाचा वा जातीचा अपरिहार्य गुणधर्म नसून तो मुख्यतः अेका तत्त्वाचा गुण आहे. अपरिवर्तनीय शब्दनिष्ठ धर्म आणि प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोग-क्षम नी प्रयोगसिद्ध विज्ञान यांच्या भिन्न प्रवृत्तींचीं तीं भिन्न नांवें आहेत. जे जे धर्मग्रंथ अपौरुषेय म्हणून समजले गेले त्यांच्या त्यांच्यांत सामावलेली संस्कृतीहि सहजच अपरिवर्तनीय समजली जाते आणि जे लोक त्या धर्मग्रंथांची सत्ता आपल्यावर चालूं देतात ते श्रुतिस्मृतिपुराणोक्ताचे, या पुरातनपणाचे, बंदे गुलाम होअून बसतात. त्या धर्मग्रंथाच्या चाकोरीबाहेर त्यांना पाअूलहि टाकतां येत नाहीं. हे धर्मग्रंथ जेव्हां प्रथम रचले जातात तेव्हां ते बहुधा कोणाची तरी अेक सुधारणा घडवून आणण्यांसाठींच रचलेले असले तरी आपल्या स्वतःभोवतीं अीश्वरी आज्ञेची प्रभावळ मिरवून आपल्या शब्दांस अपरिवर्तनीय, कधींहि न बदलणाऱ्या विधिनिषेधांचें स्वरूप ते देत असल्या-मुळें ते लवकरच भावी सुधारणेचे कट्टे शत्रु बनतात. त्यांच्या दोन पुठ्ठ्यांच्या आंत सारें विश्व नी सारा काल डांबून ठेवण्याचा वेडगळ अट्टाहास जरी ते करतात तरी सदा चंचल, सदा नवीन, अदम्य आणि अमोघ निसर्गशक्ति आणि कालगति त्या धर्मग्रंथाच्या दोन पुठ्ठ्यांत नित्याची थोडीच डांबून राहते ! अीशप्रेषितांचीं वा प्रत्यक्ष अीश्वराची मनगढंत सही ठोकून जरी हे धर्मग्रंथ प्रकाशिलेले असले तरी भूकंप, ज्वालामुखी, जलप्रलय नी वज्राघात यांना या पोथ्यांच्या ताडपत्री पुरचुंडींत गुंडाळून ठेवण्याचा त्यांचा सारा यत्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फोल ठरतो. ॲखादा भूकंप त्यांच्यांतील भूगोलास मडक्यांच्या अुतरंडीसारखा सहज कोलमडून देतो. त्यांच्या अत्यंत पवित्र नद्यांस ज्वालामुखी ॲका घोटासरशी गटकन् पिअून टाकतो. त्यांना ठाअूक नसलेल्या खंडांचा पत्ता लागतो आणि त्यांना ठाअूक असलेलीं खंडेच्याखंडें बेपत्ता होतात. अीश्वराच्या नांवानें जरी ते ग्रंथ अवतीर्ण झालेले असले तरी त्यांच्या शब्दांची पत राखण्याची अीश्वरास लवलेश आवश्यकता व आवड असल्याचें या अीश्वरी अुत्पातांवरून दिसत नाहीं.

जोंवर बायबलला अपरिवर्तनीय आणि अपौरुषेय धर्मग्रंथ मानीत होता तोंवर युरोपहि असाच आणि याच श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या, याच पुरातनी प्रवृत्तीच्या, आडांतील बेडूक होअून पडला होता. पृथ्वी वाटोळी आहे हें नवीन सत्य आविर्भूत होतांच ती तशीच आहे कीं नाहीं हें ठरविण्यासाठीं बुद्धिगम्य नी प्रयोगक्षम अशा कोणत्याहि कारणाविषयीं फारशी वास्तपुस्त न करतां याच युरोपनें ॲकदां अितकेंच काय तें विचारलें होतें कीं, 'पण बायबलांत तसें लिहिलें आहे का ? पृथ्वी वाटोळी आहे ही गोष्ट श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे का ?' जर बायबलांत ती सपाट आहे असें सांगितलेलें असेल–आणि तसेंच लिहिलेलें आहे ! – तर पृथ्वीनें सपाटच राहिलें पाहिजे ! कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावून, तिला प्रत्यक्ष पाहून परतल्यानंतरहि तसलें ॲखादें खंड, अिश्वरप्रदत्त, सर्वज्ञ, त्रिकालाबाधित, बायबलांत अुल्लेखिलेलें नसल्यामुळे तें नसलेंच पाहिजे म्हणून याच युरोपनें धर्माज्ञा सोडलेल्या होत्या ! अत्यंत दुधखुळा असला तरीहि पोप अस्खलनीयच (infallible) असला पाहिजे म्हणून याज युरोपची ॲकदां दृढ श्रद्धा होती. कितीहि पापी असला तरी पोपला पैसे भरून त्याची वशिल्याची चिठ्ठी आपल्या प्रेताच्या हातांत देअून तें पुरलें गेलें कीं, स्वर्गाचीं दारें त्यास अुघडलींच पाहिजेत ! या श्रुतिस्मृतिपुराणोक्त निष्ठेनें लक्षावधि प्रेतांच्या हातांत तशा लक्षावधि चिठ्ठ्या असलेल्या याच युरोपच्या कबरस्थानांत अुकरलें असतां अजूनहि आढळतील ! जी युरोपची गोष्ट ती मुसलमानी जगताची. युरोप या पुरातनी धर्मवृत्तीस लाथाडून तुमुल विरोधानंतर आजतरी त्या वैज्ञानिक अद्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वती प्रवृत्तीचा पुरस्कर्ता झालेला आहे. पण केमालपाशाचा तुर्कस्थान सोडला तर बाकीचें मुसलमानी जगत्, हिंदु जगताप्रमाणेंच, आजहि या ' बाबावाक्यं प्रमाणं ' चेंच बंदे गुलाम झालेलें आहे. यास्तव हिंदूप्रमाणेंच मुसलमानहि युरोपच्या त्या वैज्ञानिक, अद्यावती संस्कृतीपुढें अेकसारखे हतवीर्य नी हतप्रभ होत आले आहेत. तीच स्थिति यथाप्रमाण पारसिकांची, ज्यूंची !

या लेखांत आपल्या हिंदुराष्ट्रापुरतेंच मुख्यत्वेकरून बोलावयाचें असल्यानें वरील धार्मिक नी वैज्ञानिक अशा ज्या दोन प्रवृत्ति सांगितल्या, अेक पुरातनी नी अेक अद्यावती अशा ज्या दोन संस्कृति अुल्लेखिल्या, त्यांची सर्वसाधारण चर्चा येथेंच सोडून आमच्यापुरतें हें विशेषेंकरून सांगितलें पाहिजे, कीं त्यांपैकीं पहिल्या प्रकारच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या पिंजऱ्यांत आमच्या प्रमाणेंच तो चुकी करणारा प्रत्येकजण फसत आलेला आहे. हें जरी वर दाखविलें असलें तरीहि त्यायोगें आम्ही त्याच पिंजऱ्यांत यापुढेंहि राहणें क्षम्यच आहे, सहजच आहे असें मात्र समजतां कामा नये. आम्ही ज्यास अपौरुषेय नी त्रिकालाबाधित मानीत आलों, तो धर्मग्रंथ आजच्या साऱ्या अुपलब्ध धर्मग्रंथांत पुरातन–पांच हजार वर्षांपूर्वींचा धरला, तरीहि पांच हजार वर्षें मागासलेला. जग ! पांच हजार वर्षें पुढें गेलेलें ! ! परंतु अजूनहि आजच्या काळीं अुपयुक्त तें आजच्या काळचें वैज्ञानिक शहाणपण न शिकतां त्या पांच हजार वर्षांपूर्वींच्या शहाणपणाहून शहाणें व्हावयाचें नाहीं असा कृतसंकल्प आम्ही कसे करून बसलेलों आहोंत, त्यामुळें आम्ही पांच हजार वर्षांपूर्वींच्या अडाणीपणास आजहि जन्मतिथीपासून मृत्युतिथीपर्यंत कसे कवटाळून धरीत आहोंत तें स्पष्ट करण्यासाठीं या धार्मिक संस्कृतीच्या, पुरातन प्रवृत्तीच्या, अंध परंपरेचीं दोनचार अुदाहरणें दिग्दर्शनार्थ विचारांत घेअूं.

प्रथम ही आपली यज्ञसंस्थाच पाहा. अत्यंत थंड प्रदेशांत अग्नीचें सतत साहचर्य सुखावह असतें. अशा कोणत्यातरी शीत प्रदेशांत नी हिमसंकुल कालीं ही संस्था जन्मास आली असावी. त्या वेळीं प्रत्येक घरीं अखंड अग्निहोत्र आणि वेळोवेळीं मोठमोठे प्रज्वलित होणारे यज्ञ आरोग्यप्रद आणि सुखमय होत असतील, पण आजकालच्या हिंदुस्थानच्या असह्य अुष्णतेंत ह्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अग्निपूजेनें कोणतेंहि भौतिक हित साधत नाहीं. हे वणवे घरोघर आणि गांवोगांव भडकवून ठेवणें असुखोदकच होतें. पूर्वी अग्नि पेटविण्याचें साधनहि सुलभ नसें. रानावनांतून झाडांवर झाडें घासून अग्नि सहज पेटतांना पाहून प्राचीन मनुष्याला कृत्रिम अग्नि अुत्पन्न करण्याची विद्या त्या विशिष्ट लाकडावर लाकूड घासून सुचली नी साधली असावी. ती यज्ञसंस्थेंत त्या काळीं अुपयोजिली गेली तेंहि साहजिक होतें. पण त्यावर धार्मिक छाप पडल्यामुळें आतां अग्नि आगपेटींतील काडीच्या गुलांतील अगदीं माणसाळवून ठेवतां येअूं लागला असतांहि यज्ञांतील पवित्र अग्नि म्हटला म्हणजे तो त्या अत्यंत प्राचीन आणि म्हणूनच आज अत्यंत अडाणी ठरलेल्या पद्धतीनेंच मंत्रपूर्वक लाकडावर लाकूड घासून 'अग्ने प्रदीप्त हो' अशा हृदयद्रावक प्रार्थनांनीं पेटवावा लागतो ? लाकूड आणि गारगोटी या अडाणी साधनांपलीकडे अग्नि चेतविण्याचें साधन गेल्या पांच हजार वर्षांत आम्हांस शोधतां आलें नाहीं ! युरोपनें आगपेटचा काढल्या, वीज काढली, 'दीपोज्योति नमोस्तुते' अित्यादि करुणा न आळवितां बुटानें जरी बटन दावलें तरी पटकन् लखलखाट पाडण्यास विजेस दासीसारखें भाग पडूं लागलें; पण अजूनहि श्रुतिस्मृतिपुराणोक्त पवित्र अग्नि म्हटला, कीं तो लाकडावर लाकडें घांसूनच पेटविला असला पाहिजे ! मागासलेल्या धर्मग्रंथांस त्रिकालाबाधित मानल्यामुळें त्याच्याअितके सदोदित मागासलेले राहणें असें भाग पडतें ! अग्नि ही देवता आहे. 'यज्ञाद्भवति पर्जन्यो' अशी प्राचीनांची प्रामाणिक भावना होती आणि म्हणूनच ते त्यांत मणोगणती तूप ओतीत तें कां हें समजतें तरी. पण आतां हजारों वर्षांच्या अनुभवानें हें निश्चित झालें आहे कीं, अग्नीचे नैसर्गिक गुणधर्म त्यास रागविलें तरी जास्त होत नाहींत, प्रसादिलें तरी सौम्य होत नाहींत; घृताची सतत धार धरून 'अग्ने नय सुपथा राये अस्मान् देव वसुनानि विद्वान्' अशी प्रार्थना करीत राहणाऱ्या यजमानाच्याहि घरास तोच यज्ञीय अग्नि संधि साधली, कीं जाळून भस्म करण्यास सोडीत नाहीं ! आणि यज्ञाचे वणवे सारखे पेटलेल्या भारतवर्षामध्यें दहा वर्षांत जितके दुष्काळ पडतात तितके दमडीच्या आगपेटींत त्या अग्नीला कोंडून टाकणाऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युरोपमध्यें शंभर वर्षांत पडत नाहींत. यज्ञमंत्र आणि पर्जन्यसूक्तें म्हणून म्हणून भारतवर्षाचा कंठ कोरडा झाला तरी या धार्मिक मतांस पर्जन्य भीक घालीत नाहीं. पण तिकडे रशियांत पाहा. पर्जन्याचें वैज्ञानिक सूक्त शोधून काढलें जातांच आतां कोणीहि आणि पावसाळा नसला तरी केव्हांहि 'पर्जन्या पड!' म्हटलें, कीं पर्जन्य झकत पाया पडतो ! विमान दूरच्या नदीवर फिरवून आणलें जातांना तें त्या नदीचें पाणीं शोषून घेतें. आणि मग वाटेल त्या शेतावर अेखाद्या भरून आलेल्या ढगासारखें तें त्या पाण्याचा पाअूस पाडतें ! अशा अनुभवानंतरहि आतां त्या यज्ञसंस्थेचें आम्ही विसर्जन करावयास नको काय ? जर थोडें दूध अुतास गेलें किंवा तुपाची वाटी लवंडली तर सुनांस सासवा तिकडे टाकून बोलत असतांच अिकडे मणोगणती तूप समारंभपूर्वक आम्ही आगींत तासोन्तास ओतीत बसलेलों असतों ! कारण ? येवढेंच की तसें करणें श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे ! त्या यज्ञसंस्थेचें राष्ट्रीय केंद्र म्हणून या आर्यावर्तावर जे प्राचीन काळीं अनंत अुपकार झाले त्या विषयीं कृतज्ञता व्यक्तवूनहि आतां यापुढें मात्र त्या आगींत तुपाचा अेक थेंबहि व्यर्थ न ओततां बुद्धाप्रमाणें ती सारी यज्ञसामुग्री यज्ञकुंड गंगेंत विसर्जिणेंच अुचित आहे. 'यज्ञाद्भवति पर्जन्यः' हें सूत्र खोडून 'विज्ञानादेव पर्जन्यः' हें सूत्र आतां नव्या स्मृतींत घातलें पाहिजे !

तशीच ही शंकराचार्यांची पालखी. पालखी नी बैलगाडी या वैदिक कालच्या वाहनानंतर गेल्या पांच हजार वर्षांत नवीन वाहन असें कांहीं आम्हांस अुद्भवितां आलें नाहीं ! विज्ञाननिष्ठ युरोपनें तीन शतकांत आज तीनशें वाहनप्रकार अुद्भवून सोडले. दुचाकी, मोटार, आगगाडी, विमान आणि आतां पायविमान काढून सायकलीसारखें आपल्या पायानें विमान झडपीत जो तो आकाशांत अुडण्याच्या बेतांत आला आहे ! पण आमचे शंकराचार्य चार माणसांच्या खांद्यावर अजून मिरवतातच आहेत ! गांवापर्यंत प्रवास मोटारींतून होअील, पण गांवांत पाद्यपूजेला निघाले, कीं मोटार पाखंड ठरलीच ! त्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त पालखींत बसून भरदिवसां तीच श्रुतिस्मृति-

(सा...२१)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुराणोक्त मशाल पाजळीत जाणार ! प्राकृत जनांना रात्रीं तेवढें दिसत नाहीं, मशाल लागते. पण सकलशास्त्रपारावरपारीणांना दिवसांसुद्धां मशालीवांचून दिसत नाहीं ! आणि त्यांतहि ती धुरकट मशाल हवी ! तीहून अधिक तेजस्वी बिनधुरी वीजदीप चालणार नाहीं ! कारण तो श्रुतिस्मृतिपुराणोक्त मशालीहून अधिक चांगला आहे म्हणूनच त्याज्य आहे !

आम्ही जन्म घेतों तोच मुळीं या श्रुतिस्मृतिपुराणोक्तांत ! अुत्कृष्ट प्रकाश, वायु, शल्यौषधि यांनीं सुसज्जित अशा अगदीं अद्यावत् अप्-टु डेट् असणाऱ्या प्रसूति गृहांत प्रसूतिस्तव जाणें हें युरोपांत स्त्रियांचें कर्तव्यच समजतात–तोच शिष्टाचार ! आमच्या अिकडे तोच शिष्टाचाराचा भंग ठरतो ! तशी सोय नी सवड असूनहि अशा प्रसूतिगृहांत जाणें म्हणजे कोणतें तरी अनन्वित कृत्य करण्यासारखें स्त्रियांचें स्त्रियांनाच्र अजूनहि वाटतें. पण तो ओशाळेपणा त्यांना आपल्या घरच्या त्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त अंधारानें दाटलेल्या आणि शेणमातींत सारवलेल्या खोलींत बाळंत होण्यांत मुळींच वाटत नाहीं ! प्रकाश, वायू, शल्यौषधी यांच्या अद्यावत् सोयी आहेत का हें पाहण्यापेक्षां पांचवीला आणि षष्ठीला त्या सटवी जिवती यथाशास्त्र प्रसादिल्या जातात कीं नाहीं याचीच चिंता अधिक! पण सटवी–जिवतीची अिनकी पत्रास राखणाऱ्या हिंदुस्थानांतच बालमृत्यूची भयंकर साथ सारखी चालू आहे ! आणि त्या सटवीला कधींहि धूप न जाळणाऱ्या, पण प्रकाश, वायु, शल्यौषधींची काळजी घेणाऱ्या त्या युरोपांतील बाळंतिणीच्या वाटेस जाण्याची सटवीच्या बापाचीहि छाती होत नाहीं ! त्यांच्या बालमृत्यूंची संख्या सारखी घटत आहे. मुलगे अिकडे दक्षिण ध्रुवावर नी तिकडे अुत्तर ध्रुवावर चढाअी करणारे आणि मुली अिंग्लिश चॅनल अेका दमांत पोहणाऱ्या नी अटलांटिक महासागर विमानांच्या अेका झेपेंत अुडून जाणाऱ्या ! विज्ञानाची, अद्यावत् संस्कृतीची पूजा करणाऱ्या त्यांच्या आजच्या प्रसूतिगृहांतील ही संतति पाहा आणि कोयत्या–कातरीची नी सटवीची पूजा करणाऱ्या ह्या आमच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त बाळंतखोलींतील ही आमची संतति पाहा !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जी जन्मतिथीची गोष्ट तीच मृत्युतिथीची. पक्क्या बंद, स्वच्छ पेटींत प्रेत झांकून नेणें सोईस्कर असतें; तरीपण त्या ठराविक वेदकालीन बांबूच्या ठराविक चिपट्या, ठराविक गांठी मारून जी केली आहे, जी लचकत करकचत कधीं मध्येंच मोडते आहे, त्या पांच हजार वर्षांपूर्वीच्या तिरडीवर आपलें विद्रूप तोंड उघडें टाकून, नको नको हे हाल म्हणत ज्याची मान लुटलुटत सारखी नन्ना करीत आहे त्या प्रेतास; घरीं गवरीचें खांड पेटवून, तोच अग्नि त्या मडक्यांत घालून, तें शिंकें हातीं धरीत, उघडयाबोडक्यानें स्मशानापर्यंत जींत आप्तेष्ट नेत आहेत ती प्रेतयात्रा गैरसोयीची असली तरी पुण्य ! कारण? ती श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे ! सुदैवानें प्रेतें जाळण्याची आमची पद्धत चांगली आहे; पण ती चांगली म्हणून नव्हे तर सनातन म्हणून चालू आहे. कारण ज्या हिंदु जातींत प्रेतें पुरणें हेंच श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे, ते तीं पुरीतच आहेत ! जाळतात तेदेखील नवीन विद्युत्गृहांत प्रेत जाळण्यास मान्यता देणार नाहींत. जेव्हां वीज ठाऊक नव्हती, आगपेटी निघाली नव्हती, तेव्हांच्या अडाणी पद्धतीनें घरून विस्तवाचें मडकें नेऊन पावसांत मधून विझतेच आहे, मधून पुन्हां ढोसली जातेच आहे अशा त्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त चितेवर आम्हीं अजूनहि प्रेतें जाळणार ! जर कोणा भाविक मनुष्यास सांगितलें, कीं तुझें प्रेत आटोपसर पेटींतून नेऊन अद्यावत् विद्युत्गृहांत झटकन जाळलें जाईल, तर त्या बातमीच्या धक्क्यासरशी तो जिवंतपणींच मेल्याहून मेला होईल ! नी मृत्युपत्रांत लिहून ठेवील कीं, माझ्या प्रेताची अशी दुर्दशा होतां कामा नये. त्या करकरत्या तिरडीवर, ती लुटलुटती मान नन्ना करीत असतांच, तें विद्रूप तोंड उघडें ठेऊनच त्या लाकडी चितेवर तसेंच ढोसलें जात जात माझें प्रेत जाळलें जावें, कारण ? तेंच श्रुतिस्मृतिपुराणोक्त असून परलोकीं सद्गति देतें ! खरोखर या अपरिवर्तनीय शब्दनिष्ठ धर्मग्रंथांनीं हजारों वर्षांच्या अडाणीपणास अमर करून ठेवलें आहे !

या फुटकळ वैयक्तिक प्रकरणाप्रमाणें रोटीबंदी, सिंधुबंदी, स्पर्शबंदी, शुद्धीबंदीसारख्या आपल्या हिंदुराष्ट्राच्या अधोगतीस कारणीभूत होणाऱ्या दुष्ट राष्ट्रीय रूढीसहि हें श्रुतिस्मृतिपुराणोक्तच आज अमर करून ठेवीत आलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे–राष्ट्र मरणाच्या दारीं अुभें आहे !

यास्तव हिंदुराष्ट्रास ह्या काळाच्या तडाक्यांतून वांचायचें असेल, तर ज्या ह्या श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या बेडीनें कर्तृत्वाचे हातपाय जखडून टाकले आहेत ती तोडली पाहिजे. आणि ती सुदैवानें अगदीं आणि सर्वस्वी आपल्या अिच्छेवर अवलंबून आहे. कारण ती बेडी मानसिक आहे. युरोप चार शतकांपूर्वीपर्यंत धर्माच्या अपरिवर्तनीय सत्तेचा असाच दास झालेला होता आणि त्यापायीं आपल्यासारख्याच दुर्गतीस पोंचला होता. पण त्यानें बायबलास दूर सारून विज्ञानाची कांस धरतांच श्रुतिस्मृतिपुराणोक्ताचीं बेडी तोडून अद्यावत् बनतांच, अप्–टु–डेट बनतांच, युरोप गेल्या चारशें वर्षांत आमच्यापुढें चार हजार वर्षें निघून गेला ! त्रिखंडविजयी झाला ! तसें आमच्या भारतीय राष्ट्रासहि होणें असेल, तर 'पुरातनी' युगाचा ग्रंथ मिटून ही प्राचीन श्रुतिस्मृतिपुराणादि शासनें गुंडाळून आणि केवळ अैतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयांत सन्मानपूर्वक ठेवून, विज्ञानयुगाचें पान अुलटलें पाहिजे ! त्या ग्रंथांच 'काल काय झालें ?' अितकेंच सांगण्यापुरता अधिकार. आज काय योग्य तें सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम, विज्ञानाचा ! अद्यावत्पणांत मागच्या सर्व अनुभवाचें अुपयुक्त तें सारसर्वस्व सामावलेले असतेंच पण श्रुतिस्मृतिपुराणोक्तांत अद्यावत् ज्ञानाचा लेशहि नसतो. यास्तव अद्यावत् अप्-टू-डेट बनणेंच अिष्ट. **यापुढें कोणाचीहि गोष्ट चांगली, कीं वाअीट, सुधारणा अिष्ट, कीं अनिष्ट या प्रश्नाचें अुत्तर ती आज अुपयुक्त कीं अनुपयुक्त आहे या अेकाच प्रत्यक्ष कसोटीवर पारखून दिलें पाहिजें, तिला शास्त्राधार आहे का हा प्रश्न आतां केव्हांहि विचारला जाअू नये.** या विद्वत्परिषदांत, त्या शास्त्रार्थाच्या अेरंडाच्या गुऱ्हाळांत, अेकहि क्षण यापुढें व्यतीत होअू नये. अेकंदरींत आज अुपयोगी आहे ना ? मग तें केलेंच पाहिजे ! या अेका वाक्याच्या अेका घावासरशीं जे प्रश्न आम्हीं चार हजार वर्षें सोडवूं शकत नाहीं ते चार दिवसांत सुटतील, चार दिवसांत त्या बेड्याच तुटतील.

कोणती गोष्ट राष्ट्राच्या अुद्धारणार्थ आज अवश्य आहे–तें बहुधा चटकन सांगतां येतें; प्रयोगानें प्रत्यक्षपणें सिद्ध करून देतां येतें. पण कोणची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोष्ट शास्त्रसंमत आहे तें ब्रह्मदेवालादेखील निर्विवादपणें सांगतां येत नाहीं. आम्हीं कोणाचाहि ग्रंथ अपरिवर्तनीय आणि त्रिकालाबाधित मानीत नाहीं. श्रुतिस्मृतिप्रभृति सारे पुरातन ग्रंथ आम्हीं अत्यंत कृतज्ञ आदरानें आणि ममत्वानें सन्मानतों, पण अैतिहासिक ग्रंथ म्हणून अनुल्लंघ्य धर्मग्रंथ म्हणून नव्हे. यांतील सारें ज्ञान, अज्ञान आजच्या विज्ञानाच्या कसोटीस आम्हीं लावणार आणि त्यानंतर आज राष्ट्रधारणास, उद्धारणास जें अवश्य वाटेल तें बेधडक आचरणार. आम्हीं अद्ययावत् बनणार, अप्–टु–डेट बनणार ?

अितका निश्चय होतांच आपल्या प्रगतीला पांच हजार वर्षांपूर्वीच्या मागासलेल्या संस्कृतीस जखडून टाकणारी या श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची मानसिक बेडी तुटून आमच्या कर्तृत्वाचे हात मोकळे झालेच म्हणून समजा. मग त्या मुक्त हस्तांनीं ज्या बाह्योपाधि आमच्या अुन्नतीच्या मार्गांत आडव्या अेत आहेत वा येतील, त्यांचेंहि डोकें ठेंचून वाट मोकळी करणें आम्हांस आजच्याहून शतपटीनें सुलभ झाल्यावांचून कदापि राहणार नाहीं.

✠ ✠ ✠

(विज्ञाननिष्ठ निबंध, खंड २. मूल्य २ रुपये.)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यंत्र : : २२

✠ ✠ ✠

[भारतीय मनावर जेव्हां चरख्याची पकड घट्ट होत होती, आणि 'चरख्यानें स्वराज्य,' ह्या घोषणा जेव्हां दुमदुमत होत्या तेव्हां दूरदर्शी विज्ञाननिष्ठ सावरकरांनीं हा लेख लिहून अनेकांच्या विचारांत परिवर्तन घडवून आणल्याचें आम्हांस माहीत आहे.]

✠ ✠ ✠

आपला देश आज ज्या युगांत प्रवेशूं लागला आहे, तें युग युरोपमध्यें दोनशें वर्षांपूर्वी चालूं झालें. म्हणजे युरोपच्या दोनशें वर्षे आपण मागें पडलेलों. ह्या युगाचें अर्थशास्त्रीय नांव यंत्रयुग ! युरोपमध्यें हें यंत्रयुग दोनशें वर्षांपूर्वी जेव्हां बाष्पशक्तिप्रभृति शोधांमुळें आविर्भवलें, तेव्हां त्या यंत्र-प्रभावाच्या धक्क्यासरशी तिकडेहि त्या वेळच्या रूढ विचारांना नी आचारांना चक्कर आल्यासारखें होऊन गेलें. मनुष्यजातीवर भयंकर संकट आलें आहे. यामुळें मनुष्य माणुसकीसच मुकल्यावांचून राहणार नाहीं. धर्माचें वाटोळें होणार, मनुष्याचें जीवन यंत्रासारखेंच हृदयशून्य, कृत्रिम नी कलाहीन होऊन त्यांचें शरीरदेखील दुबळें नी परतंत्र बनणार, फार काय, ज्या आर्थिक संपन्नतेच्या नी सुखसोयीच्या लालसेनें मनुष्य यंत्राच्या मागें लागला, ती आर्थिक लालसाहि यंत्राच्या चाकांत सांपडून चूर होईल, या यंत्रामुळें मनुष्य पोटभर खाऊंपिऊं न लागतां उलटा भिकेस लागेल, अशी अेकच कोल्हेकुई त्या वेळच्या पुराणप्रिय स्थितींतील नी धर्मभोळ्या अशा वर्गानें साऱ्या युरोपांत चालूं केली होती. " Back to Nature " हें त्याचें सूत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें ' यंत्रामुळें बेकारी वाढते आणि मनुष्य भिकेस लागतो ' असें बुढ्ढे अर्थशास्त्री ओरडले. ' यंत्र ही सैतानाची युक्ति ! देवाच्या थोरवीस कमीपणा आणणारी ही रावणी हांव ! धर्मशास्त्री किंचाळले !

न्यूनाधिक दोनशें वर्षांपूर्वी यंत्रशक्तींचा प्रबळ आविर्भाव युरोपांत झाला तेव्हां त्याचा असा जो विरोधच विरोध त्या लोकांमध्यें जिकडेतिकडे झाला, त्याचीच पुनरावृत्ति आज आपल्या या दोनशें वर्षे मागाहून, प्रगतीच्या त्या बिंदूवर येऊन पोचलेल्या लोकांत चालू झाली आहे. तंत्र हें मनुष्यास मिळालेलें वरदान नसून शाप होय, अशी ही ओरड किती तथ्य वा अतथ्य आहे हें विवेचिण्याच्या कार्यी आपणास योजावे लागणारे कोटिक्रम आणि द्यावे लागणारे पुरावे युरोपच्या आजच्या जनतेला अगदीच शिळे नी बुरसलेले लागतील, कारण कीं, ते आक्षेप प्रत्याक्षेप, ते वादविवाद त्याच्याकडे नामशेष झाल्यासहि शेंदीडशें वर्षे अुलटून गेलीं आहेत. पण युरोपकडे आज अगदीं शिळचा, अडाणी, वेडगळ ठरलेल्या त्याच त्याच आक्षेपांना अगदीं नवीनांतील नवीन म्हणून ठिकठिकणचे अनेश गांवढळें संप्रदाय आपल्याकडे प्रचार करूं लागले असल्यामुळें यंत्रशक्तींवरील त्या आक्षेपांना खोडून काढण्यासाठीं यंत्रनिष्ठ प्रगतीलाहि युरोपमध्यें पूर्वी दिल्या गेलेल्या त्याच त्याच प्रत्युत्तरांची पुनरुक्ति करणें भाग आहे.

देवभोळेपणा घटतो त्या मानानें यंत्रशीलपणा वाढतो.

आपल्या लोकांत अजूनहि यंत्रशीलपणा जो अितका कमी आहे त्याचें मुख्य कारण म्हणजे आमच्या समाजांतील देवभोळेंपणा अजूनहि अुतास जात आहे हेंच होय. दोनशें वर्षांपूर्वी युरोपहि ख्रिश्चन धर्मानुसार असाच देवभोळा होता; तेव्हा त्यांतहि यंत्रशीलपणा नव्हता, लिस्बनला मोठा भूकंप अठराव्या शतकांत झाला, तेव्हां त्यांचें कारण, रोमन कॅथोलिक धर्ममताविरुद्ध अुभारलेलें प्रॉटेस्टंटांचें पाखंड हेंच होय, असें युरोपियन लोकांच्या मोठमोठ्या धर्मगुरूंनीं नी सामान्य जनतेनें ठरविलें. प्रॉटेस्टंट लोकांत भिक्षुणींनीं लग्नें लावलीं. पाद्री लोक बायका करतात, पोपचा शब्द अस्खलनीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(infallible) नी शिरसावंद्य मानीत नाहींत, या 'पापा' मुळें भूकंप झाला, असें निदान ठरवून त्या धर्मभोळ्या लोकांनीं भूकंप होअू नये म्हणून प्रॉटेस्टंटांचा नायनाट हा अुपाय शोधून काढला. अशा देवभोळ्या वृत्तीला भूकंपाचीं, खरीं भौतिक कारणें शोधण्याची बुद्धीच होणें दुर्घट; मग भूकंपाचे नियम समजावून घेअून त्याचे धक्के कधीं वा कुठें बसणार तें आगाअू सुचविणारें भूकंपसूचक यंत्र बनविण्याचें काम जन्मोजन्मींदेखील सुचणेंच शक्य नाहीं ! युरोपमध्यें ही देवलसी वृत्ति हाणून पाडणारी विज्ञानवृत्ति जेव्हां अुगवली तेव्हांच काय ती त्या विज्ञानाच्या नियमांवर अधिष्ठिलेली यंत्रशीलता युरोपमध्यें भरभराटू शकली. पण हिंदुस्थानांत आजहि अगदीं राष्ट्राचे 'सर्वाधिकारी' म्हणून गाजणारे गांधीजींसारखे अनेक पुढारीदेखील बिहारमधल्या भूकंपाचें कारण अस्पृश्यतेचें '**पाप**' म्हणून 'आंतल्या दैवी आवाजाच्या शपथेवर सांगत आहेत; आणि क्वेट्टाच्या भूकंपाचें कारण मनुष्य जातीचें कोणचें पाप असावें याविषयीं या 'आंतल्या आवाजा'स कौल लावीत आहेत! –तर तिकडे शंकराचार्यादि धर्माचे सर्वाधिकारी, ते भूकंप अस्पृश्यतानिवारणाच्या पापामुळें घडतात म्हणून शास्त्रांची शपथ घेअून सांगत आहेत! ज्या राष्ट्राचे सर्वाधिकारीच अितके धर्मभोळे त्या राष्ट्रांतील सामान्य जनतेच्या देवभोळ्या भाबडेपणाचें वर्णन काय करावें ? युरोपमध्यें आज १९३६ वा सन चालू आहे तर आमच्या अिकडे प्रगतीचा १७३६ वा !

देवभोळेपणा म्हणजे प्रत्येक घटनेचें कारण देवाची लहर, राग वा लोभ. आणि त्या घटनांपैकीं संकटघटना टाळण्याचा अुपाय म्हणजे देवाला प्रसादविणें! अर्थात् त्याचें यंत्र म्हणजे प्रार्थना, पूजा, सत्यनारायण, जयजाप्य, छा छू ! पाअूस पडत नाहीं ? ऋग्वेदांतील मंडूकसूत्र म्हणून बेडूक-देवतेस आराधा! नौका बुडते आहे ? वरुणसूक्त जपून समुद्रास नारळ वाहा ! प्लेग आला ? वहिरोबापुढें बोकड मारा ! नाहींतर 'अिदला' गाअीची कुरबानी करा; खुदा भला करेगा !

परंतु यंत्रशीलपणा हा, या सृष्टींतील भौतिक व्यापार ठराविक सृष्टिनियमांचें फलित होय, आणि जर त्या नियमाप्रमाणें आपण ते ते घटक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जुळवून आणूं शकलों तर तें तें कार्य घडलेंच पाहिजे, ह्या निष्ठेवरच काय तो अधिष्ठानिलेला असणार. अमूक अंशापर्यंत पाण्याचें अुष्णतामान वाढविलें कीं त्याची वाफ झालीच पाहिजे मग त्या वेळीं तो यांत्रिक निमाज पढण्याचें विसरल्यामुळें अल्ला रागावलेला असो, संध्या करण्याचें टाळल्यामुळें देव चवताळलेला असो. त्या ठराविक पाण्याची ठराविक अुष्णतेचा स्पर्श होतांच ठराविक प्रमाणाची वाफ झालीच पाहिजे. देवानें का म्हणाना, पण जे सृष्टिनियम अेकदां घालून दिलें त्यांत देवदेखील पुन्हां बदल करूं शकत नाहीं. आंब्याचे चार पेटारे भेटीस धाडले कीं आपल्या बतीचा निकाल देणाऱ्या अेखाद्या यःकश्चित् कलेक्टरालाहि आपण अन्यायी नी लांचखाअू मानतों, पण बोकड बळी न दिले की सगळ्या गावाला, त्यांतील मुलांलेंकरांसुद्धां प्लेगनें ठार मारण्याअितका भयंकर लांचखाअूपणा देवाच्या माथीं मारण्यास जो सोडीत नाहीं तो धर्मभोळेपणा देवाच्या देवपणास खरा काळिमा लावणारा असून ठराविक सृष्टिनियम लांचलुचपतीवारी देव कधींहि बदलीत नाहीं, ही यथार्थ निष्ठाच जितकी सत्य जितकी धर्म्यहि आहे. अशी विज्ञानजन्य निश्चिति हीच यंत्रशीलपणाची जननी असते. या मुळेंच लोकांतील देवभोळे-पणा ज्या मानानें घटतो त्या मानानें विज्ञाननिष्ठ यंत्रशीलपणा त्यांच्यांत वाढतो.

नाना फडणविसांची अेक गोष्ट

वर अुल्लेखिलेल्या तत्त्वाचें अुदाहरण म्हणून पेशवाअींतील अेक लहानशी गोष्ट अगदीं सांगण्यासारखी आहे. ज्याच्या अतुक बुद्धिबळानें हिंदुपदपादशाहीचीं सूत्रें त्यांच्या हातीं टिकलीं तोंवर तरी ' जलचर हैदर निजाम अिंग्रज रण करितां थकले ।। ज्यांनीं पुण्याकडे विलोकिलें ते संपत्तीला मुकले ।। " असा मराठ्यांच्या सामर्थ्याचा दरारा यच्चयावत् अहिंदूंवर बसविला होता, त्या नाना फडणविसांची अशी अेक गोष्ट अैतिहासिक कागदोपत्रीं सांपडली आहे कीं--नानांनीं अेकदां काशीस कांहीं पुण्यकृत्य करावें या हेतूनें कर्मनाशा नांवाच्या तेथील नदीवर पूल बांध-विण्याचें काम चालू केलें. पण आरंभींच वाळू नी पाणि यांच्या अडथळ्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाया कांहीं टिकेना. ज्यांच्याकडे तें बांधकाम सोंपविलें होतें, त्या काशीच्या हस्तकांनीं (गंगामाय प्रसादविण्याचा नी तिच्यावर पूल बांधून घेण्यास ती मान्य व्हावी म्हणून त्या रुसलेल्या गंगामाअीला चुचकारण्याचा त्यांच्या परिपाठांतला जो ठराविक अुपाय तो योजून) ब्राह्मणांकरवीं तारीख ६–९–१७९५ या दिवशीं अनुष्ठानास आरंभ केला ! अनुष्टुपांची भर टाकून टाकून ते ब्राह्मण थकले, पण पाया धर धरीना. बिचाऱ्या ब्राह्मणांच्या तोंडचें पाणी पळालें, पण पायाखालचें पाणी पळेना, आटेना! पायाखालीं वाळू नी पाणी यांची अडचण आली आहे आणि ती निवारण्यासाठीं अनुष्ठानाचा अुपाय योजिला आहे, ही बातमी अिकडे नानांना जेव्हां पुण्यास कळली तेव्हां त्यांनीं अनुष्ठान बंद करविलें आणि अिंग्रजांकडून बेकरनामक यंत्रज्ञ (अिंजिनियर) आणविला. त्यानें कळीचे बंब कलकत्त्याहून मागविले आणि ते लावून पाणी बोलतां बोलतां आटवून, वाळू आटवून, पक्का पाया टाकून पूल अुभारला ! जलदेवतेची कळ जिथें पाहिजे तिथें दाबली जातांच ती झटकन् शुद्धीवर आली ! धर्मभोळेपणाच्या अनुष्ठानानें जे भौतिक सृष्टिनियम असतात, त्यांच्या व्यापारांत लवलेश फरक होत नाहीं. पण त्या नियमांची जी 'कळ' त्यांना राबविणारें जें यंत्र, ती कळ दावतांच त्यांचे व्यापार हवे तसे चापून करून घेतां येतात. **देवाची अिच्छा ही संख्या यंत्रशास्त्राच्या कधींच खिसगणतींत नसते.**

वरील लहानशा गोष्टींत देवभोळेपणा जसजसा घटत जातो तसतसा यंत्रशीलपणा वाढत जातो हें तत्त्व किती चटकदारपणें विशद झालें आहे तें पाहा ! त्या जुन्या काळीं नानांना 'कळीचें' हें महत्त्व कळावें हें जितकें त्यांच्यासारख्या अेकटचादुकटचाच्या कुशाग्र नी प्रगतीपर बुद्धीचें द्योतक आहे, तितकेंच ती पाणी आटविण्याच्या बंबासारखी साधी कळ साऱ्या मराठी साम्राज्यांत न सांपडतां कलकत्त्याच्या अेका अिंग्रजाकडून आणवावी नी चालवावी लागली ही गोष्ट आपल्या राष्ट्राच्या त्या वेळच्या अेकंदरींतल्या सामुदायिक अडाणीपणाच्या नी भाबडया वृत्तीचेंच दर्शक नव्हे काय ?

वास्तविक पाहतां यंत्रशास्त्राचा मूळ सिद्धान्तच असा कीं, त्याच्या पाठांत (फॉर्म्युल्यांत) अीश्वराच्या अिच्छेचा वा धर्मशास्त्रीय पापपुण्याचा वा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्योतिषी शकुनाचा कोणचाहि घटक दमडीच्या अुधारीनेंहि गणलेला नसा-वयाचा. अितका ऑक्सिजन, अितका हायड्रोजन, अितका प्राणवायु, अितका अुज्ज, कीं पाणी झालेंच. मग तो संयोग शुभ मुहूर्तावर घडो वा न घडो; बोकड न मिळाल्यामुळें बहिरोबा, किंवा अीदला गाय न मारल्यामुळें खुदा, त्या वेळीं रागावलेला असो वा नसो; तें रसायन डुक्कर खाणारा खिश्चन करो कीं न खाणारा मुसलमान करो, तें रसायन सिद्ध झालेंच पाहिजे. यंत्रशास्त्राचा मूळ सिद्धान्तच असा देवभोळ्या धर्मशास्त्राच्या ताठ विरुद्ध ! पण आश्चर्य असें कीं आमच्यांत ज्या कांहीं जुन्यापुराण्या यंत्राची माहिती आहे, जें कांहीं जुनें-पुराणें यंत्रशास्त्र आहे त्यालाच आम्हीं देवभोळ्या लोकांनीं धर्मशास्त्राच्या मांडीवर दत्तक देअून टाकण्यास सोडलें नाहीं !

यंत्रशास्त्राचा अजस्र नी भक्कम पोलादी पुतळा धर्मशास्त्राच्या ठिसूळ लुकणाच्या पायावर अुभारण्याचा आमचा हा यत्न किती हास्यापद आहे म्हणून सांगावें ! घराचें आढें जर पक्केपणीं ठोकलें तर मग तें शकुनावर ठोकलेलें असो वा नसो, तें त्या आढ्याच्या शिल्प शास्त्रीय बळकटीपेक्षां अधिक वा अुणें ठरणें शक्य नाहीं. परंतु आढें ठोकतांना त्याला समंत्रक पूजल्यावांचून त्या घराची शकुनावर मुहूर्तमेढ रोवल्यावांचून, वास्तुशांति केल्यावांचून आमच्या मनाला तें घर भक्कम झाल्यासारखें केव्हांहि वाटणार नाहीं ! महिनो-गणती आम्हीं या घरांत राह्यला जाणार नाहीं. कारण वास्तुशांति झाली नाहीं ! आमचें मन आम्हांस सारखे खात राहणार, भीत राहणार ! पण आमच्या हें ध्यानांत येअीना की, मुहुर्ताला भीक न घालतां नी वास्तुशांत न करतां अुभारलेले हिंदुस्थानांतील अिंग्रजांचे राजवाडे, राज्यकार्यालयें, प्रवासी बंगले, गांवच्या चौक्यादेखील आमच्या तशा बांधकामांहून कधींतरी कमी बळकट ठरल्या आहेत काय ? किंबहुना अगदीं सुमुहूर्तावर बांधलेले आणि वास्तुशांत शास्त्रोक्तपणें केलेले आमचे शनिवारवाडे आज ढांसळून मातीस मिळाले असतां, बिनशकुनी, बिनवास्तुशांति, बिनधर्मी अशा या अिंग्रजांची ' गव्हर्नमेंट हाअुसें ' भक्कमचीं भक्कम ! त्यांचें ढिकुळदेखील त्या अुणिवेनें म्हणून, ढांसळत नाहीं ! अुलट त्या शास्त्रोक्त वास्तुशांत केलेल्या हिंदुपद-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पातशाहीच्या श्रीमंत पंतप्रधानांचे वा महाराजांचे वाडे, त्या वास्तु, 'अगदींच धूळधाण होअूं देअूं नका, त्यावर स्मृतिपट तरी अेखादा लावा ' अशी हृदय-द्रावक विनवणी करीत त्या अिंग्रजांच्या त्याच बिनवास्तुशांत, बिनमुहूर्ती, बिन-धर्मी, गव्हर्मेंट हाअूसच्या दारापुढें आम्हांस अुभें करावें लागत आहे !

आम्ही आमचे सिंहगड, सिंधुगड, रायगड असले शेकडों प्रचंड दुर्ग; आणि मुसलमानांनीं त्यांचे दिवाणी आम नी दिवाणी खास, आमच्या हिंदु वा मुस्लिम शास्त्रानुसार शकुनवंती नी रमल पाहून, वेदांतील सूक्तें नी कुराणांतील आयतें निर्विघ्नतेसाठीं भिंतीभिंतीवर कोरून चित्रून धर्मशास्त्र-दृष्टचा शक्य तितकें बळकट केलें—पण आज आढीं पुजून पुजून मुहूर्तावर बांधलेले प्रचंड दुर्ग नी दिवाणखाने धुळीस मिळालेले आहेत ! परंतु शकुन, रमल, वेद, कुराण तर काय, तर प्रत्यक्ष देवासहि न मानणाऱ्या Anti-god रशियाचे प्रचंड दुर्ग, तीं विमानें नी वियानें अक्षरशः वाऱ्यावरदेखील बळकट-पणें तरंगत आहेत ! खरोखर, **खडकावर बांधलेल्या आमच्या विशालगडां-पेक्षां त्यांचे वाऱ्यावर बांधलेले विशाळगड आज अधिक बळकट ठरत आहेत !**

यावरून या जगांतील भौतिक संपत्ति नी सामर्थ्य हे तरी भौतिक सृष्टीविज्ञानाच्याच अढळ पायावर अुभारलेले असल्यास टिकतें, धर्मशास्त्रीय देवभोळेपणाच्या डोलाऱ्याचें नी देव्हाऱ्याचें विज्ञान अेका ठोकरीसरशीं ठिकऱ्या ठिकऱ्या अुडविल्यावांचून राहत नाहीं, हें स्पष्ट होत नाहीं काय ?

आणि विज्ञानाची व्यष्टि, व्यक्ति म्हणजे यंत्र !

आगगाडीचें अिंजिन म्हणजे काय? त्या प्रकरणीं जें बाष्पगति-स्थिति-विज्ञानाचे ठाम सृष्टिनियम वैचारिक क्षेत्रांत होते त्यांची ती घनवटलेली मूर्तिच व्यवहारांत अवतरली ! जोंवर त्या ठाम नियमानुसार तें यंत्र घडलेलें नी चालविलेलें आहे, तोंवर आमच्या अिच्छेवाहेर त्या यंत्राला स्वतंत्र अशी अिच्छाच नाहीं. देवानें जर मनुष्य घडविला असेल तर त्या अर्थीं मनुष्य हाच यंत्राचा देव म्हणावयास हरकत नाहीं. परंतु आमच्या देवभोळेपणाचा वेडगळ अतिरेक अितक्या थराला गेलेला आहे कीं, ज्याचा मनुष्य हाच वरील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्थी देव आहे—त्या यंत्रालासुद्धां आम्हीं आमचाच अेक देव मानूं लागलों! आजदेखील आमच्या लाखों लोकांत यंत्राची नी हत्याराची पूजा होत आहे!

यंत्रें तितकीं दैवतें ! जितकीं हत्यारें तितके देव !!

सुतार रंध्याची, गवंडी करणीची, सैनिक भालाबरचीची, गवळण रवीची, घरधनीण अुखळ-मुसळाची घरोघर पूजा करीत आहे. बाळंतखोलींत केवळ सटवाअीचीच पूजा नसते, तर नाळ कापावयाच्या कातरीसदेखील दैवतासारखी मांडून पूजावी लागते ! जणूं काय त्या कातरीला स्वतःची अशी अिच्छा असते, राग-लोभ-मान-अपमान कळतात, आणि म्हणून त्या कातरीला न तुष्टविल्यास ती रागानें नाळ कापायचें सोडून पटकन् बाळाचा गळाच कापणार आहे ! आतां मात्र सटवाअीशीं अेक नवीनच तडजोड झाल्यासारखी दिसत आहे, ती ही कीं, घरच्या बाळंतखोलींत तेवढें सटवाअीचें राज्य. तिथे बाळंत झाल्यास कातर पूजिणें प्रभृति जुन्या मानापानपूजा पार पडल्या पाहिजेत; पण सार्वजनिक प्रसूतिगृहांत बाळंत झाल्यास तिथें सगळ्या गोष्टींची सटवाअीनें सूट द्यावी. प्रसूतिगृहांतील कातर न पूजिली तरी तिनें नी सटवाअीनें हूं कां चूं करतां कामा नये. प्रसूतिगृहांतील तीं चकचकणारी डॉक्टरी चाकु, सुऱ्या, आदि शस्त्रें पाहतांच सटवाअीच गर्भगळित होतेशी दिसते ! सारे मानापमान, प्रतिष्ठा ठोकरणाऱ्या प्रसूतिगृहांतील बाळंतपणाकडे ढुंकून बघायला देखील ती भिते. तेथील बाळबाळंतिणी सटवाअीचें कांहींअेक लागत नाहींत ! न सोवेर, न कातर पूजा, न शांतिपाठ; पण तिथें बाळबाळंतिणींना अुगीच सतावण्याची सटवाअीची काय छाती आहे ! तिची आठवणदेखील डॉक्टरी प्रसूतिगृहाचा अुंबरठा ओलांडून आंत येत नाहीं.

युरोप जें आज अजिंक्य झालें आहें, तें मुख्यतः यंत्रबळें !

जोंवर युरोप असें आमच्यासारखेंच देवभोळें होतें, तोंवर तेंहि आम्हीं आज आहों तसेंच दुबळें होतें. दोनशें वर्षांच्या आगेंमागें, त्याचा देवभोळेपणा हटत चालला, तसतसें त्याचें बळ, संपत्ति, साम्राज्य भरभराटत चाललीं. पण हिंदुस्थानच नव्हे, तर अवघा आशिया त्याच देवभोळेपणाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुंगींत खिचपत पडला, त्यामुळें विज्ञानाची वाट त्यास सांपडलीच नाहीं, युरोप सृष्टिशक्तींना आपल्या प्रगतीच्या रथास घोडयासारखें जुंपून भरधांव दिग्विजय करीत चालला असला असतां, आशिया त्या सृष्टिशक्तींना पूजीतच राहिल. त्यामुळें आशियांत यंत्रशीलपणा असा आलाच नाहीं. पाहा, गेल्या हजार वर्षांमध्यें हिंदूंत काय किंवा मुसलमानांत काय, अेकंदरींत वैज्ञानिक शोध असा अेकहि लागलेला नाहीं ! नवीन यंत्र असें, हत्यार असे, कळ अशी, गेल्या हजार वर्षांत आम्हीं जवळ जवळ अेकहि अुद्‌भवली नाहीं ! साधी आगपेटी, साधी चाकी (सायकल), साधें घडयाळ, साधा शिळाछाप, साधें छायाचित्र पण युरोपनें शोधलें तेव्हा सुचलें; आम्हांस कांहीं सुचलें नाहीं. हिंदु धर्मभोळेपणाची नी मुसलमान धर्मवेडेपणाची निशा पिअून झिंगून पडलेला. मुसलमानांच्या दिल्लीच्या बादशहाला शस्त्रवैद्य अिंग्रजाकडून मागवावा, लागला, तर अेका पुलाखालचें पाणी आटवावयासाठीं हिंदुपतींच्या फडणि-साला अेक यंत्रशिल्पी–अेक अिंजिनिअर–अिंग्रजाकडून मागवावा लागला ! मुसलमानांचे सारे देववेडे पीर, मुल्लाहकीम, गंडाताअीत जी व्याधि बरी करूं शकले नाहींत ती त्या अिंग्रज शस्त्रवैद्यानें बरी केली. अनुष्ठान जपतपांनीं जो पुलाचा पाया हिंदूना घालतां आला नाहीं, तो त्या अिंग्रज अिंजिनियरनें घालून टाकला ! पण तरीदेखील अिंग्रजांच्या यंत्रशीलपणानें त्याचें विज्ञान कसें वाढत चाललें आहे. त्याची अेकेक कळ त्यांचें बळ कसें दुर्जेय बनवितें आहे आपणांस दुबळावितें आहे हें त्या वेळीं आमच्याकडे कोणाच्या लक्षांत यावें तसें आलें नाहीं. यंत्रविद्येचा ओनामादेखील शिकावयास कुणी युरोप-मध्यें गेला नाहीं. जात जाते ना आमची समुद्र ओलांडण्यानें !

पण आमच्यांत पूर्वी सामर्थ्य असतांहि आम्हीं जगावर चालून गेलों नाहीं याचें प्रायश्चित्तच आम्हांस देण्यासाठीं जग आमच्यावर चालून आलें. युरोपच्या अवाढव्य यंत्रबळाच्या कैचींत आमच्या राष्ट्राचा, स्वत्वाचा, आमच्या अेका गोष्टीवांचून साऱ्या अितर गोष्टींचा चुराडा अुडाला ! अेक गोष्ट तेवढी जी आमची म्हणून अजूनहि टिकली आहे, तिला युरोपचें यंत्र-बळहि अजून चिरडूं शकलें नाहीं; ती म्हणजे आमचा धर्मभोळेपणा ! भौतिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संकटें निवारण्याचें, सृष्टिशक्तींना राबविण्याचें, भौतिक सामर्थ्य संपादिण्याचें विज्ञान आणि साधन म्हणजे यंत्र, हें अजूनहि आम्हांस कळत नाहीं. अजूनहि भूकंपावर अस्पृश्यतानिवारण हा अुपाय, सर्व राष्ट्रीय अरिष्टांवर अनुष्ठान हा अुपाय, कोणी कमला नेहरू आजारी पडल्या तर त्यांच्या क्षयावर प्रार्थना हा अुपाय, सांथ घालविण्याचा बोकड मारणें हा अुपाय, मशीनगन्सचा मारा थांबवावयाचा तर तिच्यापुढें तिच्या गोळ्यांच्या टप्प्यांत शांतपणें बसून मरून जाणें आणि त्या मरणानें त्या मशीनगनला दया आणणें हा अुपाय ! अजूनहि आमच्या राष्ट्राचें देवभोळेपण सुटलें नाहीं आणि म्हणूनच या नव्या यंत्रयुगाचें धीटपणें स्वागत करून युरोपच्या अजिंक्य सामर्थ्याची ती किल्ली युक्तिप्रयुक्तीनें हिरावून घेण्याच्या ठायीं हे लोक त्या यंत्रयुगासच अेखाद्या संकटासारखें भिवून भूतकाळाच्या भुयारींत अधिकच खोल खोल जाअून दडत आहेत ! यंत्रानें मनुष्य दुबळा होत आहे, यंत्रानें मनुष्य भुका मरत आहे, अशी या देवभोळ्या लोकांची कोल्हेकुअी सारखी चालली आहे ! जणूं काय ज्याच्या टाचेखालीं आम्हीं ठेचलें जात आहों तें युरोप, यंत्रबळाचें धुरीण तें युरोपच दुबळें आहे. भिकेस लागलें आहे ! आणि आमची पाप्याचीं पितरें सबळ आहेत ! हे अर्धपोटीं, अर्धनग्न, दुष्काळग्रस्त नी रोगग्रस्त आमचें राष्ट्र—यंत्रयुगाच्या शेंदोनशें वर्षें अजून मागें रेंगाळत आहे, म्हणूनच बलिष्ठ नी सुखी नी संतुष्ट आहे !

या लेखाच्या आरंभीच्या पहिल्याच छेदकांत यंत्राविरुद्ध आमच्या जुनाट भावडेपणानें घेतलेल्या या आक्षेपांना अुल्लेखिलें आहे त्यांना शक्य तितक्या लवकर प्रतिकारलें पाहिजे. समाजकारणांत विज्ञानाचें वर्चस्व स्थापिलें पाहिजे, तसेंच आपल्या राष्ट्राच्या अर्थकारणांतहि त्याच विज्ञानाची मूर्ति जें यंत्र त्या यंत्राचें वर्चस्व स्थापिलें पाहिजे.

कापडाच्या गिरण्या हें यंत्र; अर्थातच त्याच्यामुळें देशावर भयंकर संकट ओढवलें आहे; त्या गिरण्यांतील कापड वापरूं नका !— अशी आरडाओरड गल्लोगल्लीं चालली होती. चालली आहे. टकळी चालविण्यास आत्मबळाच्या सेना त्या 'टकळी'च्या प्रभावें जपानचें सारें यंत्रबळ तुच्छ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
Kangri Library

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विण्यास सजल्या आहेत. केवळ चरख्याच्या चढाओढीनें लँकेशायरच्या नी साऱ्या जगांतील गिरण्यांना कुलपें ठोकलीं जातील अशी प्रतिज्ञा करणाऱ्या सेनानींचा ताडांचा तांडा राष्ट्रीय सभेच्या अुच्चासनावर चरखे फिरवीत बसलेला आहे, आणि आतां त्याच्या जोडीला दळणकांडणांच्या यंत्रांच्या संकटापासून या देशास रक्षावयासाठीं कंबर कसून आलेल्या नव्या सेनानींचा तांडा त्या राष्ट्रीय सभेच्या अुच्चासनावर कुणी जात्यानें हातीं दळीत नी कुणी अुखळांत तांदूळ हातीं कांडीत व्यग्र झालेले आढळण्याचाहि संभव आहे. अर्थकारणांतील या मंडळाच्या पक्षाची मुख्य हाकाटी म्हणजे 'यंत्र नका !'

धर्मशास्त्रांतील भाबडेपणाप्रमाणेंच या अर्थशास्त्रांतील भाबडेपणासहि, आजच्या जगांत, ह्या यंत्रयुगांत जर जगावयाचें असेल तर, आपल्या राष्ट्रानें ठोकरून दिलेंच पाहिजे. राष्ट्रीय प्रचाराचीं सूत्रें या देवभोळेपणाच्या धार्मिक वा आर्थिक श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या, या पुरातनाच्या हातून छिनावून घेअून तीं विज्ञानाच्या, अद्यतनाच्या, हातीं दिलीं पाहिजेत. यंत्रयुगाविरुद्ध त्यांच्या चाललेल्या भाबडया हाकाटीचा छाप ज्यायोगें राष्ट्रावर पडणार नाही आणि यंत्रबळाची महती ज्यायोगें राष्ट्रास पटून तें विज्ञाननिष्ठ होअील, यंत्रशील होअील, असा प्रचार शक्य तितक्या नेटानें, निस्पृहतेनें आणि निकडीनें आतां आरंभिलाच पाहिजे.

यंत्र हें शाप कीं वरदान ?

यंत्राचें साधन मनुष्याच्या हातीं असल्यामुळें मनुष्याची हानीच हानि होत आहे, तो दूबळा बनत आहे, दुःखी बनत आहे, दरिद्री बनत आहे. यंत्र हा मनुष्यजातीला झालेला शाप होय, अशी यंत्राविरुद्ध जे ओरड करतात त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं,

यंत्र, हत्यार, कळ म्हणजे शतपटीने अधिक कार्यक्षम झालेलें मनुष्याचें अेकेक अिंद्रियच आहे !

कळ म्हणजेच अिंद्रियाची वाढलेली कार्यक्षमता. हत्यार म्हणजेच हाताहूनहि दसहत्यारी असा आपला अेक जोड हात. यंत्रें म्हणजे आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूळच्या शक्तीपेक्षां लक्षपटींनीं शक्तिमान झालेलीं आपलीं बहिश्चर अिंद्रियें ! जर हत्यार, कळ, यंत्र नसतें तर मनुष्य सृष्टिशक्तींवर आज चालवीत असलेली सत्ता चालवूं शकता ना. अितकें सांगणें म्हणजे यंत्रशक्तीच्या अुपयुक्ततेचें अगदीं त्रोटक वर्णन होय. यंत्रावांचून, कळीवांचून मनुष्य या जीवनकलहांत जगूंच शकता ना, कोल्हा कुत्रादेखील, त्याला भारी होता, फाड फाडून खाता ! मनुष्यास झालेल्या यंत्रबळाच्या साहाय्याविषयी असें म्हटलें तरीदेखील अतिशयोक्ति होणार नाहीं कीं–

शरिरानें पाहिलें तर मनुष्य हा अत्यंत दुबळा, कळीनेंच काय तो प्रबळतम ठरला !

मूळच्या पिसाळलेल्या श्वापदांहीं अरण्यांत मनुष्याला पुन्हां अुभा केला तर त्याच्या स्वतःच्या देहाच्या बळें त्याला किती श्वापदांपुढें टिकाव धरतां येअील तें अेकदां कल्पून पाहा ! सिंहासारखीं नखें नाहींत, दंष्ट्रा नाहींत, दांत नाहींत, नुसत्या गर्जनेनें सारें रान हादरून सोडील असा भीषण आवाजहि नाहीं, वाघाला तर म्हसरूं मारण्यास जितकीं दंतनखरें शिणवावीं लागतात, तितकीं देखील ह्या माणसाचा दुबळा कोळा कंठ फोडून टाकण्यास शिणवावीं लागणार नाहींत. आपणांपुढें जशी कोळी काकडी, तसा माणूस वाघापुढें ! मनांत येतांच कचकच चावूंन टाकावा. माणूस नुसत्या त्याच्या देहाअितका दुबळा, वाघास प्रतिकारील असा अेकहि अवयव माणसास नाहीं. हत्तीपुढें तर माणूस म्हणजे मुंगी ! नुसत्या पायाच्या प्रचंड दाबाखालीं चिरडावा किंवा त्या अजस्त्र शुंडेंत धरून दगडावर नारळासारखा आपटावा ! तरस, लांडगे, नी डुकरें यांच्यासुद्धां समोर अुभें राहण्याची त्याची छाती नाहीं. रानडुकराच्या दाताला प्रतिकारील असा त्याला अेकहि अवयव नाहीं. मोठ्या शिकारी कुत्र्याचीदेखील त्याला वाघासारखीच भीति ! माणूस चावला वा बोचकारूं लागला तरी शिकारी कुत्रा अेका झेपीसरशीं माणसास फाडून काढण्यास सोडणार नाहीं. फार काय, अगदीं दुबळी दीन, निरुपद्रवी जी गाय तिची

(सा....२२)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देखील जर मनुष्याशीं झुंज लागली तर तीच आपल्या शिंगांनीं त्याचें पोट बोलतां बोलतां फाडूं शकेल ! रानरेडे, रानबैल यांच्या त्या अुन्मत्त डुरकण्या-सरशींच माणसाला पळ काढण्यावांचून जगण्याचा दुसरा मार्गच नाहीं. लहान मधमाशी ! पण त्या माशा त्याला अेकदां का झोंबल्या कीं त्यांच्या विषारी दंशाच्या भयंकर वेदनांनीं तडफडत माणूस मरून जातो–पण त्यांना कांहीं माणूस अुलट डसूं वा गिळूं शकत नाहीं, त्यांच्या मागें अुडूं शकत नाहीं. कावळा-देखील माणसाच्या रक्ताळ घावावर वा डोक्यावर पशूवर मारतो तशी चोंची मारून अुडून जाअून कावकाव करीत माणसाला अुलट वेडावूं शकतो ! अजगर त्यास नुसत्या आपल्या अजस्र देहाचे वळसे घालून चरकासारखा पिळून काढवो. टीचभर फुरसें तें काय, पण त्याच्या पायाला कुठून कसें डसेल नी त्याला बोलतां बोलतां ठार मारील याचा नियम नाहीं ! समुद्रनदनद्यां-मध्यें तर माणसाची दुर्दशा विचारायलाच नको ! आंत पाय घसरला कीं माणूस सुसरींच्या नी मांसाहारी माशांच्या आहारीं गेलाच म्हणून समजावें ! माणसाला मूळचे असे तीक्ष्ण सुळे नाहींत, पोट चिरून फाडून टाकणारीं शिंगें नाहींत, कोंबडीची कोंबडी किंवा गवत, पाला, पाचोळा, रक्त, हाडें जें मिळेल तें पचवून टाकणारें पोट नाहीं, थंडी निवारील अशी लोकरीची शाल अंगीं नाहीं, किंवा राठ कातडें नाहीं. घारीसारखी दृष्टि नाहीं, मशकासारखे-सुद्धां पंख नाहींत, गरुडासारखी ककचतीक्ष्ण चोंच वा कंठच्छेदक नखरें वा रक्तलिप्सु पंजे नाहींत. विषारी दांत नाहीत, दंश नाहीं, नांगी नाही. हिंदी लोकांना अिंग्रजांनीं निःशस्त्र केलें होतें त्याच्या कितीतरी युगें आधीं माणसाला सृष्टीनें निःशस्त्र केलें होतें ! वरिष्ठ श्वापदांहूनच नव्हे तर पक्षीमत्स्यमक्षिका-हूनहि माणूस मुळांत पाहिला तर केवळ अंगानें असा अत्यंत दुबळा आहे ! अक्षरशः गायीहून गाय आहे !

पण तो आज ह्या पृथ्वीतलावर तरी साऱ्या प्राण्यांचा राजा, शास्ता, जेता होअून मिरवूं लागला; सृष्टिशक्तीशीच–मल्लयुद्ध करण्यास दंड थोपटून ठाकला; बाष्प, चुंबक, विद्युत्, रेडियम यांना कांहीं प्रमाणांत तरी माणसाळवून त्यांच्या अजस्र बळावर समुद्र, पृथ्वी नी आकाश या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानवी जगताच्या तिहीं खंडांत दिग्विजय करीत चालला आहे. कशाच्या बळावर हा अगदीं अत्यंत दुबळा माणूस अितका प्रबळ झाला ? कळीच्या, हत्याराच्या, यंत्राच्या ! !

त्याच्या अंगाच्या पिशपिशीत बुक्कीला कुत्रादेखील भीक घालीत नव्हता; पण ज्या दिवशीं माकड–माणसानें–पहिला दगड अुचलून फेकला त्या दिवशीं त्याला अेक नवी बुक्कीच फुटली. दगड दूरून फेंकायचा, ह्या हत्यारासरशी माणसाची पिशपिशीत बुक्की कृतांताच्या बुक्कीसारखी असह्य बनून निराळी होअून अुभी राहिली. हातानें अुचलून फेकलेली किंवा ढकललेली शिळा म्हणजे 'कृतान्तस्य मुष्टि: पृथगिवस्थिता !' माकडमाणूस झाडांच्या फांद्या घेअून पशूंचे कळप झोपडींत, साप, सापसुरळचा, विंचू ठेचीत चालला. त्याचे विष न बाधणारे नवे हात जे त्याला सांपडले त्याच त्या फांद्या, त्या काठचा, त्या लाठचा, ते सोटे होत. माणसाला रानडुकरासारखे सुळे नव्हते, त्याची अुणीव भाल्यानें भरून काढली. रेडचासारखे टक्करमारूं डोकें नव्हतें, त्यानें गदेचें डोकें टकरावून त्या साऱ्यांची खोड मोडून टाकली. सिंह, वाघ त्याला जेव्हां तेव्हां नखाग्रांनीं भेडसावीत; पण माणसास बरची, खंजरे, कटचार, खड्गकृपाण असलीं भयंकर नखें फुटतांच वाघसिंह चळवळ कापूं लागले ! कारण खड्ग म्हणजे आपलें अेक वाढलेलें नखच नव्हे काय ? अितक्यांत माणसाच्या पाठीशीं धनुष्य नी हातीं बाण प्रकटला. सिंहाची झेंप, वाघाची अुडी, हत्तीची सोंड, अुंटाची अुंची, नव्हे त्या घार–गिधाड–गरुडांच्या चोंचीदेखील आणि अुंच अुडणारे पंख–सारी प्राणीसृष्टि माणसाच्या त्या धनुष्याच्या टणत्कारासरशी कुणीं ची ची करीत तर कुणीं शेपटचा घालीत रानोपाळ पळून गेली ! कारण जवळ आल्यावर ते लढणार, पण हा धन्वी ते चालून येण्याच्या आधींच त्यांचा कंठच्छेद करणार. कवच हीं माणसांची दुर्भेद्य त्वचाच होय. दुर्बीण हा शतपटीनें दर्शनक्षम नी सूर्यासहि पाहतां न दिपणारा असा दुसरा डोळा. दूरध्वनियंत्र हा त्याचा शतपटीनें अधिक श्रवणक्षम झालेला नी मुंबअींच्या भिंतीशीं लावला असतां कलकत्याच्या वा लंडनच्या मित्राची हांक अैकणारा कान आणि ती दारू, ती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्फोटकें, त्या गोळचा, ती बंदूक, ती तोफ, ती विषारी धूर हाच पेटून बाहेर भडकलेला क्रोध ! ही चूल, ही वैद्याची भट्टी, हा स्टोव्ह म्हणजे मनुष्याच्या पोटांतील जठराग्नीची अेकेक शाखा, अेक आवेल, जें पोटाला पचेना तें पचवून देणारीं पोटें ! खल-अुखळ हीं त्याची खालची नवी बळकट दाढ; बत्ता-मुसळ त्याची वरची दाढ. त्या दोन्ही आतां प्रचंड आकार करून वाफेच्या शताश्वशक्तीनें पूर्वीं जसा अेक घास तो माणूस चावी तसें सहजीं धान्याचें पोतेंच्या पोतें अेका चर्वणासरशीं पिसून टाकतो. त्याचीं जुनीं अिंद्रियेंच काय तीं अशीं सहस्रपटींनीं कळहत्यार-यंत्रबळें अधिक कार्यक्षम झालीं नाहींत, तर माणसास अुपजता अंगीं जीं मुळींच नसतात तीं नवीं अद्भूत अिंद्रियेंहि यंत्रबळें त्याला लाभलीं आहेत !

लहानशा आडांत बेडूक राहतो तितकेदेखील त्याचें अंग मुळचें जल-स्थंबक नाहीं पण विज्ञानानें त्याला अकस्मात् अेक अद्भुत वरदान दिलें आणि कासवाहून कठीण, देवमाशाहून प्रचंड, सुसरींचीं सहस्रें ज्याच्या धक्कचा-सरशी स्वतःच चक्काचुर होतात असा अेक प्रचंड अद्भूत जलदेह माणसास दिला—तें बेडर, ती पानबुडी, त्या विनाशिका, त्या प्रचंड वणिक्नौका, बाष्पनौका, आगनावा, वीजनावा ! अेका मशकाअितकें माणसाला वर अुडूं म्हटलें तर वर अुडतां येत नसे, मुळचा तो मशकाहून धूलबंद; पण विज्ञानास आराधितांच वेदकुराणांतील मोठमोठचा ऋषिपीरपैगंबरानाहि मनुष्यास जें देववलें नाही असें वरदान माणसास मिळालें आणि प्रत्यक्ष गरुडाच्या बापजन्मीं त्यानें कधीं पाहिलें नसतील असे प्रबळ पंख मनुष्यास फुटले तें हें विमान, तें हें विमान !

ज्या ज्या सिद्धि, मोठमोठीं जपतपें करकरून देवभोळेपणास मिळाल्या नाहींत किंवा कोणास मिळाल्याशा वाटतांच ती अेक अत्यद्भुत, प्रत्यक्ष अीश्वरी नी विशेष कृपाप्रसादी मंत्रबळांची देणगी म्हणून वाटे, त्या त्याहून शतपटीनें अत्यद्भूत अशी सिद्धि आजच्या हाटांत पैसा पासरीच्या भावानें यंत्रबळ लुटवीत आहे ! अतिदर्शन, अतिश्रवण, ध्वनिलेख बोलपटांतहि (Telephone Talkies नी) मनुष्यास अर्पिलेलें अतिस्मरण, महा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समुद्राच्या तळाशीं खालीं अवगाहन, विरलस्तरांच्याहि वर आकाश अुड्डयन !
आणि हें सारें अद्‌भुत प्राबल्य खुदास वा जेहोव्हास वा देवास दमडीचाहि धूप लावण्याची लवलेश आवश्यकता त्या त्या प्रकरणीं तरी नसतां ! यंत्रानें मनुष्य दुबळा केला नाहीं; अुलट दुबळा प्राणी जो होता तो माणूस आज पृथ्वीवरील, अंतराळांतील महासागरांतींल प्राण्यांत प्रबळतम जो झाला तो, हत्यार–कळ–यंत्र यांच्याच योगें होय, मंत्रबळें नव्हे तर यंत्र–बळें ! शाप नव्हे ! तर यंत्र हें मनुष्याला अतिमानुष करणारे विज्ञानाचें वरदान होय !

✠ ✠ ✠

(विज्ञाननिष्ठ निबंध, खंड २, मूल्य २ रुपये.)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गांधीजी आणि हे दुधखुळे हिंदु लोक : : २३

✠ ✠ ✠

[शस्त्रवादी वीर सावरकरांचा अहिंसेची नसती वटवट करणाऱ्या गांधीवादाला मूलतःच विरोध आहे. रत्नागिरींत स्थानबद्ध असतांना वीर सावरकरांनीं त्या वेळीं मान्यता पावन चाललेल्या गांधीवादांतील विसंगति आणि घातक तत्त्वें ह्यावर 'श्रद्धानंद' ह्या वृत्तपत्रांतून टोपण नांवाखाली मर्मभेदक टीका केली. ते टीकालेख 'गांधीगोंधळ' ह्या पुस्तकांत संग्रहित करण्यांत आले आहेत. त्यांपैकीं हा लेख आहे.

अिंग्रजांचा वध करणाऱ्या गोपीनाथ सहाला हिंसक म्हणून गांधींनीं निषेधिलें तर स्वामी श्रद्धानंदांची हत्या करणाऱ्या अब्दुल रशीदला त्यांनी भाअी म्हणून गौरविलें. त्याला अुद्देशून हा लेख लिहिण्यांत आला आहे.]

✠ ✠ ✠

अबदुल रशीदला गांधीजींनीं "भाअी" म्हणून अुल्लेखिलें आणि त्याच्याविरुद्ध सर्व हिंदु जगत् संतप्त झालें असतां त्याचा पक्ष घेअून दोन शब्द बोलण्यास ते सिद्ध झाले ही गोष्ट किती स्वाभाविक आहे! प्रत्येक नटाला आपली भूमिका अधिकाधिक रंगेल असा अभिनय करावाच लागतो आणि संसार हें अेक नाटक असून मनुष्यमात्र हा नट आहे. गांधीजींनीं महात्म्याची भूमिका घेतलेली असल्यानें त्यांनीं तिला रंग भरेल अशीं वाक्यें अुच्चारूं नयेत तर काय अेखाद्या शिवाजी रामदासासारख्या सामान्य अल्पात्म्याप्रमाणें "न्यायाचा जो अभिमान, तोचि जाणावा निरभिमान॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्याय अन्याय समान, होणें नाहीं," म्हणून गर्जत ज्या जातींत आपण जन्मलों त्या हिंदु जातीचा पक्ष घ्यावा !

आपणा प्रत्येक हिंदूची अिच्छा अशीच आहे कीं, कितीहि घोर अपराधी असला तरीहि त्याला त्याचा पक्ष मांडणारा कोणीतरी पाठीराखा मिळावा. मग अबदुल रशीदला गांधीजी मिळाले यांत काय वावगें झालें? गांधीजींहून अबदुल रशीदला दुसरा कोणी मनुष्य पाठिंबा देण्यास निघता तर त्याला शोभला देखील नसता.

पण हे हिंदु लोक किती दुधखुळे आहेत ! "भाअी" अबदुल रशीदचा पक्ष मांडण्यास गांधींजी पुढें सरसावलेले पाहून विचारतात कीं, "जर अबदुल रशीद भाअी आहे" तर मग गोपीनाथ सहाला गांधीजींनीं अगदीं पटकन असें "भाअी" म्हणून कां म्हटलें नाहीं ? जर अबदुल रशीदचा पक्ष मांडणें हें न्यायाचें आणि महात्म्याच्या भूमिकेस अत्यंत सुसंगत होय तर गोपीनाथ सहाचा पक्ष मांडण्यास ते अितक्या तत्परतेनें अगदीं ती बातमी अैकतांच गहिवरून कां पुढें आले नाहींत ? अितकेंच नव्हे तर गोपीनाथ सहाचें नांव जरा ममत्वानें अुच्चारतांच देशबंधु दासांवर आग पाखडण्यास ते कां प्रवृत्त झाले ?

दुधखुळ्यांनों ! कां म्हणून म्हणजे काय ? गोपीनाथ सहा हिंदु होता म्हणून ! गोपीनाथ सहासारख्या हिंदूंचा पक्ष मांडण्यास किंवा त्यास "भाअी" म्हणून सद्गद अंतःकरणानें म्हणण्यांत कोणा महात्म्यास शोभेसें तें काय होतें ? त्याचप्रमाणें गोपीनाथ सहा हत्यारी (खुनी) होता आणि तो हिंदु होता, तरीहि त्याचा पक्ष मांडण्यास देशबंधू दासांनीं आणि अखिल बंगाल प्रांतिक परिषदेनें धजावें हें पाहून दासांवर गांधीजींनीं आग पाखडावी हेंहि क्रमप्राप्तच होतें. हत्यारी मनुष्याचा पक्ष आणि तो हिंदु असतांना, मांडण्यासाठीं पुढें येण्यास दासांस काय अधिकार होता ? दास केवळ 'देशबंधु ।' हत्यारी माणसाचा पक्ष घेण्याचा अधिकार कोणा महात्म्यांवांचून अितरांस पोंचतच नसतो !

आणि त्यांतहि अेक वेळ त्या गोपीनाथ सहाचा हिंदु होण्याचा अपराध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विसरून अेखादा दुसरा स्निग्ध शब्द त्याच्याविषयीं महात्माजी बोलतेहि अबदुल रशीदच्या आत्म्याविषयीं केली तशी गोपीनाथाच्या आत्म्याविषयींहि त्यांनीं देवाजवळ करुणाहि भाकिली असती; पण गोपीनाथ सहानें कोणा हिंदु संन्याशास थोडेंच मारिलें होतें ? त्यानें अेका निरपराध अिंग्रज गृहस्थास मारिलें होतें. अिंग्रज गृहस्थाची हत्या करणाराचा पक्ष घेण्याचा आणि त्यास कळवळून तत्काळ प्रकटपणें "भाअी" म्हणण्याचा अधिकार दासांसारख्या कोणा देशबंधूला तर काय पण प्रत्यक्ष महात्म्यांना देखील नाहीं. अिंडियन पीनल कोडापासून स्पेशल ऑर्डिनन्स ॲक्टापर्यंत सर्व धर्मग्रंथ याविषयीं अेकमत आहेत. पण दुधखुळ्या हिंदुलोकांस हें सूक्ष्म भेद काय कळणार !

महात्मा गांधीजींनीं याचविषयीं बोलतांना सांगितलें कीं, मी मुसलमानांचा मित्र आहे. ते मुसलमान माझे 'रक्ताचे भाअू' आहेत. आतां यांत ते चुकले कोठें ? खरोखरच मुसलमान आपले रक्ताचे भाअु आहेत. त्यांच्यांतील अर्धेअधिक लोक हिंदूतूनच मुसलमानांत ओढिले गेले आहेत. म्हणून त्यांच्यांत हिंदु रक्त अजून खेळत आहे. याहूनहि तात्त्विक विचार केला तर मुसलमानहि मनुष्य आहेत. तेव्हां मानवीय रक्ताच्या दृष्टीनेंहि आपलें आणि त्याचें रक्त अेकच आहे. मग त्यांस माझे रक्ताचे भाअू म्हणून म्हणण्यांत महात्माजींनीं अगदीं सत्य तेंच सांगितलें नाहीं का ?

पण हे दुधखुळे हिंदु लोक ! महात्माजींचें वरील विधान वाचून विचारतात कीं, 'काय हो, गेल्या वर्षी 'यंग अिंडियांत' अेका क्रांतिकारक हिंदूनें जेव्हां महात्माजींस म्हटलें होतें कीं, आम्हां हिंदूंच्या नसांत प्रतापाचें आणि शिवाजीचें रक्त खेळत आहे, तेव्हां गांधीजींनीं सात्त्विक संतापानें अुसळून अुत्तर दिलें होतें कीं, 'छट्, तुमच्या किंवा माझ्या अंगांत प्रतापाचें आणि शिवाजीचें रक्त नाहीं ! हिंदु लोकांत जाति जाति भिन्न असल्यानें रजपुताचें किंवा मराठ्याचें, ब्राह्मणाचें किंवा बनियाचें रक्त अेक कसें म्हणतां येअील !'

आणि पुनः हेंहि ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, माझ्यांत प्रतापाचें, शिवाजीचें, गोविंदसिंहाचें रक्त आहे–ते माझे रक्ताचे भाअू आहेत हें हिंदूनें म्हणण्यांत महात्मापण तें काय होतें ? अशीं वाक्यें सामान्य प्रामाणिकपण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देखील अुच्चारतें. पण मुसलमान माझे मित्र आहेत. ते माझे रक्ताचे भाअू आहेत हें सत्य–विशेषत: ज्या दिवशीं श्रद्धानंदांचें हिंदु रक्त मुसलमानी रक्तानें–सांडलें गेलें त्या दिवशीं म्हणणें हेंच महात्मापणास दिव्य शोभा आणणारें आहे.

आतां विसंगततेचा अेक आक्षेप आहे कीं, जातिभेदामुळें बेटीव्यवहार बंद असल्यानें जर हिंदु लोकांस माझ्यांत प्रतापाचें, शिवाजीचें, वसिष्ठाचें किंवा श्रद्धानंदांचें रक्त वाहत आाहे असें म्हणतां येत नाहीं तर मग त्याच जातींतून बाटून गेलेल्या मुसलमानांचें रक्त माझ्या अंगांत आहे; ते मुसलमान माझे रक्ताचे भाअू आहेत हें तरी कसें म्हणतां येअील ! ही विसंगतता ह्या दुधखुळ्या हिंदूंस वाटणें साहजिक आहे. पण त्यांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं, विसंगतपणा हा महात्म्यांच्या विधानांस बंधनकारक होअूं शकत नाहीं. नाहीं-तर प्रत्यक्ष बहिणीवरहि बलात्कार करावयास येणाऱ्या पाप्यावरहि निरुपा-यानें शस्त्र चालविणें हीहि हिंसा असल्यानें, ती करूं नये म्हणून म्हणणारे महात्माजी अिंग्लिशांचा पक्ष घेअून जर्मन लोकांची कत्तल अुडविण्यासाठीं अिंग्रजी सैन्यांत भरती व्हा म्हणून हिंदी तरुणांस अुपदेश करीत आजारी पडेतो अट्टाहासानें प्रयत्न करते का ?

✠ ✠ ✠

(गांधी गोंधळ (मराठी) : गांधी तत्त्वज्ञानाचें टीकात्मक परीक्षण. प्रकाशित १९३३. मूल्य १ रुपया.)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्रूर अत्याचार : : २४

✠ ✠ ✠

[' मला काय त्याचें ' हा मराठींत आज रूढ असलेला वाक्य-संप्रदाय ज्यावरून पडला त्या श्री. वि. दा. सावरकरलिखित ' मोपल्यांचें बंड ' किंवा ' मला काय त्याचें ' ह्या कादंबरींतील हे दोन तुटक अुतारे आहेत. ह्या कादंबरीची सध्या सहावी आवृत्ति विकली जात आहे.]

✠ ✠ ✠

हरिहरशास्त्र्यांच्या दाराशीं अेक त्यांची पंधरा वर्षांची मुलगी व अक सुमारें अठरा वर्षांचा मुलगा हीं नारळींच्या अेका आगरांत फुलांच्या लावलेल्या टुमदार बागेमध्यें फुलें तोडीत होतीं. मधून मधून ती मुलगी व तो मुलगा संस्कृत श्लोकांच्या भेंड्या लावीत व अेकमेकांवर भेंडी लागली म्हणजे हांसत व खिजवत रमलेलीं होतीं. हरिहरशास्त्री हे जरी नंबुद्री ब्राह्मण होते तरी हि अेकदां ते मद्रासपर्यंत जाअून आल्यानें आगगाडी व तारायंत्र म्हणून कांहीं पदार्थ या जगांत आहेत याविषयीं त्यांस कांहीं शंका अुरली नव्हती. अितकेंच नव्हे, पण जन्मच्या जन्म त्या नारळीपोकळींच्या वनांतच काढल्यानें, व यज्ञशाळेबाहेर अग्नि कोणतीं तदितर रूपें धारण करतो हें मुळींच माहित नसल्यानें ज्या ब्राह्मणांस आगगाडीच्या व तारायंत्राच्या हरिहरशास्त्री यांनीं सांगितलेल्या कथा पटत नव्हत्या त्यांस त्या पटविण्यासाठीं प्रयत्न करतांना सर्वज्ञ वेदामध्येंहि हरिहरशास्त्री यांस आगगाडीचा व तारायंत्राचा सनातन अुल्लेख आढळूं शकला. हरिहरशास्त्री यांची विद्वत्ता दांडगी होती. आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिला मद्रासपर्यंतच्या प्रवासाची धारहि लावली गेल्यानें सद्यःस्थितींतील सामाजिक व राष्ट्रीय कल्पनांचीं कांहीं कोडीं अुलगडण्यास नसलीं तरी कापून काढण्यांत ती समर्थ झालेली होती. त्यांच्या घरीं नोकरांपर्यंत संस्कृत भाषा थोडी बहुत समजत असे. ते आपल्या घराच्या ओसरीवरून बागेंत फुलें तोडीत असलेल्या आपल्या दोन मुलांच्या लीला पाहत अुभे होते. अितक्यांत तिकडे कुमारिकेवर भेंडी लागल्यानें ती आपल्या भावास खेळकर रागानें म्हणाली, ' भाअू ! अशानें मी खेळणार नाहीं अं ! हा श्लोक तूं आपल्या नियमाबाहेर म्हटलास. पंचमहाकाव्यांतील हा श्लोक नाहीं, व पंचमहाकाव्यांतीलच श्लोक म्हणावयाचे म्हणून आपली प्रतिज्ञा आहे. '

' पण सुमति ! हा श्लोक रघुवंशांतीलच आहे. '

' मुळींच नाहीं–'. ' आहे ग ! पैज तुझी माझी ! '. ' हो हो पैज. चल बाबांना विचारूं ! ' ' का हो बाबा ' तिचा भाऊ म्हणाला ' बाबा ! ' सीते दुस्सहनं वनं ! ' हा श्लोक कालिदासाचा नाहीं का हो ? ' ' नाहीं बाळ, ' शास्त्री म्हणाले. ' पण तो कुठला हें सुमतीनें स्वतः सांगितलें तर तिनें जिकलें असें मी समजेन ! ' ' हा हा रामायणांतील आहे. ' सुमति चटकन् म्हणाली. शास्त्री हंसून म्हणाले ' खरोखरच. ' तथापि रामायणांतील कांहीं अनुष्टुपें हीं कालिदासाच्या अनुष्टुपांशीं अितकीं तंतोतंत मिळतात कीं जितकीं गीतेंतील अुपनिषदांशीं; म्हणूनच बाळ चुकला. तो कांहीं सुमतीनें धरण्यासारखा दोष नाहीं. ' ' सोडण्याअितका कां होओीना ! ' सुमति खोचून म्हणाली. तोंच तिच्या पायांभोंवती वळसे काढीत पण किंचित् अंतरावरून अेक सतेज सर्प फिरतांना दिसूं लागला. शास्त्री लवमात्र न चमकतां म्हणाले, ' सुमते ! बघ तो माझा फणींद्र तुझ्या पायाशीं कांहीं विनंति करीत आहे. तूं आज सकाळचें फुलें तोडण्याचें तें गाणें म्हटलें नाहींस म्हणून तो आला असावा. अैकीव त्याला तें गाणें ! '

त्या सापाला पाहतांच ' फणींद्र, ' ' फणींद्र ' करून तीं दोघें त्याच्याशीं खेळूं लागलीं, केव्हां चुटक्या वाजवून तर केव्हां शीळ घालून ते त्यास पुढें मागें बोलावीत. त्याच्याशीं खेळतां खेळतां आणखी दोन तीन नाग बिळांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाहेर आले व त्या खेळांत भाग घेऊं लागले. आपल्या अिकडे जशीं मांजरें किंवा कुत्रीं आपण पाळतों त्याचप्रमाणें मलबारमध्यें सापांच्या सर्व जातींस लोक घरांत, अंगणांत बसूं देतात.

✠ ✠ ✠

थोडयाच वेळांत मोठमोठयानें 'दीन दीन' 'अल्ला हो अकबर' अशा क्रूर आरोळया मारीत मुसलमानांची दीडशें लोकांची टोळी अगदीं जवळ आली. त्या बंडांत आजूबाजूंच्या दहाबारा गांवांतील मोपले अेकत्र होअून अेक हिरव्या फडक्यांची ध्वजा तुर्कांचा ध्वज म्हणून अुभारीत व हिंदूची लूटमार करी आणि चालूं लागत. जो मुसलमान जितका निरुद्योगी वा बदमाष असेल तो तितका प्रखरतर धर्मवीर बने. कारण धर्मयुद्धासारखा धंदा दुसरा कोठेंहि मिळणें त्यास शक्य नव्हतें. ते राक्षस ओरडत ओरडत बाजूनें फिरत शोधीत जात. कारण हिंदूंच्या पळापळींत लोक जीव घेअून आजूबाजूंस लपलेले अधिक सांपडत ते आले. दुर्दैवानें त्या जाळीकडे त्यांच्यांतील कांहींचा रोख गेला. 'काफर' 'काफर' म्हणून अेकच ध्वनि झाला. जे पहिले दहापांच आले ते मोपले त्या तरुण थिय्याच्या व त्याच्या सहायकांच्या तरवारीनें ठार झाले. पण ती सगळया टोळीची धाड तिकडे वळली. दामूपाशी सुऱ्या देखील अधिक नव्हत्या, नाही तर तो त्या स्त्रियांनाहि प्रत्येकीस अेकेक देता. निराशा मूर्तिमंत त्याच्यापुढे अुभी होती. ती धाड त्यावर आली. बायकांत तरवारी पाहून अेकच किंकाळी अुठली. कचाकच तरवारी चालूं लागल्या. तीन–चार मुसलमान ठार होअून पडले. अितक्यांत हरिहराचा मुलगा जो शूरपणानें शत्रूंस आपल्या हिंदु स्त्रियांपासून दूर राखीत होता त्यावर तीन-चार तरवारी अेकदम पडून तुकडे तुकडे होअून त्याचा देह खचीं पडला. अेका काठीचा आघात बसून त्या म्हाताऱ्या मसकुनीचें डोकें नारळासारखें ताडकन् फुटून गेलें. आपल्या भावाचा वध झालेला पहात सुमति अेकाद्या वाघिणीसारखी त्या वध करणाऱ्या मुसलमानांवर तुटून पडली. दोघांचीं पोटें चिरून काढलीं होतीं. तोंच तिच्या हातून पाठीकडून मोपल्यांनीं कवळून तिच्या हातांतील सुरी हिसकून घेतली. तें तिच्याशीं लडिवाळपणा करूं लागतात अितक्यांत 'हां. दूर व्हा !' म्हणून अधिकारी आज्ञा झाल्या. तेव्हां ते मोपले हिरमुसल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारखे होअून मागें झाले व त्या टोळीचा मुख्य पुढारी म्हणाला, ‘ या छोकरीला अगदीं त्रास न देतां पण हिचे हात बांधून मजबरोबर घेअून चला. डोळे मिचकावीत ते मोपले सुमतीस बांधून पुढें घेअून चालले. मार्गाला लागेपर्यंत सुमति साधारणतः शुद्धीवरच नव्हती. तिथें तिच्यापासून पुढेंच तो थिय्या तरुण घावांनीं विव्हळ व विकल झालेला पहाऱ्यांत बांधून चालविलेला होता. ती मसकुनी मालती, लक्ष्मी, व स्थूलेश्वरशास्त्री यांच्या बायका कोणी मोपल्यांनीं अुडविल्या किंवा त्या गर्दीत ठार झाल्या हें तिला कांहींच कळेना. थोडें पुढें जातांच अेक गाडी दिसली. तो त्या टोळीचा मुख्य म्हणाला, ‘ ये छोकरीको या गाडींत बसवा, सुमति त्या गाडींत अुचलून ठेविली गेली. तो मुख्यहि त्या गाडींत बसला; आणि ती गाडी दामू थिय्यास नेलें जात होतें त्याच्या अुलट दिशेनें निघाली. आतां मात्र कठिणांत कठिण, भयंकरांत भयंकर म्हणून जें कोणतें संकट तिच्यावर गुजरण्यासारखें होतें तें सुमतीवर गुजरलें ! आता मात्र तो अंतरला ! आतां मात्र ती अेकटी अुरली.

सुमतीस त्या मुख्यानें जरा दटावून. जरा दया दाखवून, विचारलें, ‘ छोकरी ! रडशील ओरडशील तर आहेस त्याहूनहि अधिक कष्टांत पडशील. कोणा माझ्या हुजऱ्याच्या पदरांत टाकली जाशील. पण तूं अशी वेडी नाहींस, मला माहित आहे. हें बघ, मी या टोळीचा मुख्य आहे. या तालुक्याचा कलेक्टर आहे. माझें नांव तूं अैकलें असशील. या खिलाफती राज्यांत अलि मुसेलियरच्या जोडीनें माझा अधिकार चालतो. खलिफानें मला कलेक्टरी दिल्यानें कुट्टमचा मौलवीदेखील माझ्या हाताखालीं आला आहे, व तुझ्यावर माझें प्रेम व विश्वास बसला आहे म्हणून सांगतों माझें नांव खरंच का नाहीं माहीत तुला ? माझें नांव अैटखान आहे.’

आपणच प्रश्न विचारीत व आपणच अुत्तर देत तो मोपला अैटखान ज्यास आपण त्या सभेंत कालिकतला पाहिला होता, सुमतीचें मनोरंजन करीत होता ! पाण्यांतून काढलेल्या त्या जाळ्यांत तडफडणाऱ्या माशाचें. चांगला मासा हातीं लागला म्हणून आनंदानें गाअिलें जाणारें कोळ्याचें गाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जितकें मनोरंजन करतें तितकें त्या मोपल्याचें बोलणेंहि सुमतीचें मनोरंजन करीत होतें.

रात्रीं तो अैटखान पुन्हां वर आला, तिला गाढ झोप लागली हें पाहून त्याला अेक प्रकारचा आनंद झाला. कारण तिचें रडणें ओरडणें अैकून त्याचा रसभंग होत असे तो आतां होणार नव्हता. त्यानें तिला पोटभरून पाहून घेतलें. ' ती ब्राह्मण कुलांतील, शूचिर्भूत सुंदर—माझ्यासारख्या पिढ्यान्-पिढ्या पुण्य केलें तरी पदरीं न पडणारी कनकलतिका आज माझ्या अगदीं हातांत आहे ! कितीतरी तिचा ओठ गोड असेल ! ' असें भावीत तो लपला. त्यानें मनसोक्त तिचे मुके घेतले. ' बरें झालें अशी गाढ झोपेंत आहे तेंच ! नाहींतर कोण लाथाळी करती ! ' असें हंसून त्यानें तिच्या शेजारी आपला देह पसरला, तिला अुराशीं घट्ट घेतलें. ' या अल्ला ! तूं माझ्या धर्मवीरत्वाचें श्रेय दिलेंस ! अल्ला ही परी मला दिलीस. निःसंशय कुराण अीश्वरप्रणीत आहे. त्यांतील वचनें सत्य आहेत. अिमानदारास परी मिळेल हें वचन अल्ला तूं सत्य केलेस ! किती मृदुल देह ! ' असें तो अिमानदार मोपला भावीत भावीत कामोन्मत्त झाला. त्यानें सुमतीला पुन्हां अितकें छातीशीं लगटून धरलें कीं चिखलांत रुतलेल्या कमलिनीसारखी ती दिसेनाशी झाली. रात्रभर अशी राहा—गोड पोरी जागीं होअूंच नकोस ! असें म्हणून तो तिच्या पदरास सारूं लागला. सूर्याच्या किरणानेंहि न पाहिलेलीं तिचीं प्रत्यंगें त्याला दिसूं लागलीं. अुत्कट कामानें तो अधीर होअून त्यांस स्पर्श करूं लागला.

तोंच ' तोबा ! तोबा ! ' म्हणून त्यानें किंकाळी फोडली पण अेकांतांत ती कोणी अैकली नाहीं. तो दिवा अुचलूं लागला, तों कोलमडून खाली पडला.........

रात्र संपली. सकाळ झाली. गांवांत दुसरी अेक मोपल्यांची टोळी येअून दंगा करूं लागली. अैटखानाच्या लोकांनीं घाबरून अैटखानास ही चिंताकारक वार्ता कळविण्यासाठीं दार ठोठावलें—फोडलें—तों पहातात काय?

अैटखान मेलेला पडला आहे, व अेक भयंकर नाग आपली फणा सुमतीच्या डोक्यावर छत्राप्रमाणें धरून डुलत आहे. अैटखानाच्या अंगावर सर्पाचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भयंकर दंश अितकें झालेले आहेत कीं, त्याच्या रंध्रारंध्रांतून विषानें दूषित झालेलें रक्त स्रवत आहे.

'नाग, !' 'नाग'! म्हणून जिकडे तिकडे बोंब झाली. सुमति त्या दार ठोठावण्यापासून आपल्या कालनिद्रेंतून थोडी थोडी दचकत होती. ती आतां चांगली जागी झाली. पहाते तों नाग तिच्या पायाला चुटूचुटू चाटीत आहे. 'फणींद्र, माझा फणींद्र' म्हणून सुमतीनें त्याच्या अंगावरून हात फिरविला व तिचें तें गाणें, जें त्या नागास आवडत असें तें, अेकदम म्हणू लागली तिला प्रगाढ झोपेंतून अुठल्यानें वाटलें कीं आपण आपल्या फुलबागेंतच नेहमीं-प्रमाणें सकाळीं फणींद्राशीं खेळत आहोंत !

अितक्यांत अैटखानास आणि त्याच्यापाशीं पडलेल्या त्याच्या सुरीस पाहून आतां तिची परिस्थिति तिला पूर्ण आठवल्यामुळें सुमतीनें आपल्या रक्षणासाठीं हा फणींद्र—हा साप—प्यायलेल्या दुधाचे अुपकार स्मरून पाळत ठेवीत माझ्यामागें आला व अंतीं जेव्हां मी अगदीं निराधार स्थितींत होते तेव्हां या दुष्ट अैटखानाच्या स्पर्शानें माझें कौमार्य भंग होण्याच्या अाधींच सूड घेअून अैटखानास त्यानें दंश करून ठार मारलें; खरोखर सर्पाच्या रूपानें परमेश्वर माझा त्राता झाला; द्रौपदीची लाज ज्यानें राखली त्यानें माझीहि राखली, तो सर्वदा भक्ताची लाज अशीच राखतो;' असा विचार विजेसारखा अेकदम तिच्या मनांत चमकून गेला !

'पण वेडे पोरी जरा थांब !' आपल्या न्यायाच्या कल्पनेला जुळतील तेवढ्यांच घटना स्मरणांत ठेवून परमेश्वर हा नेहमीं न्यायाचा वाली असतो, अन्याय आणि अपाय यांचें रक्षण व लज्जागोपन तो सर्वदा करतोच करतो.या मानवी खुळचा पण सोयीस्कर समजुतीस अितक्यांतच बळी पडू नकोस. अंतीं परमेश्वर लज्जारक्षण करीलच करील, या समजुतीपेक्षां त्या तुझ्या कमरेला खोंचलेल्या सुरीवर तूं अधिक अवलंबून रहा. वेळेवर ती नुसत्या समजुतीपेक्षां क्वचित् अधिक अुपयोगी पडेल ! कारण अैटखान मेला—पण मोपले अजून जिवंत आहेत !

सुमतीच्या मनांत वरील विचार विजेसारखा येअून गेला नाहीं तोंच

 . In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोपले खोलींत घुसले होते. तों नाग अेखाद्या बेफाम वीरासारखा तुटून त्यांवर पडला. दोनतीन मिनिटांत दोन तीन मोपल्यांस कडकडून चावून दोन तीन तलवारीच्या आघातानें तो तुकडे तुकडे होअून पडला. मोपले सुमतीस बिलगले. तिनें सुरी अुपसली व अेका कोपऱ्याचा आश्रय घेअून तिनें या गडबडींत दोघां-तिघां मोपल्यांचीं पोटें चिरून त्यांस भूमीवर ठार करून पाडिलें. आणि स्वतःच्या पोटांत ती सुरी खुपसावी म्हणून तिनें हात पुढें केलाहि—तो धरला गेला. तिनें निराश धडपड केली—की कसें तरी स्वतःस मारून घ्यावें; पण तिला मरूं कोण देतो ? केवळ तेवढ्यांतल्या तेवढ्यांत तिनें अेका बिलग-लेल्या मोपल्याच्या तलवालीवर डोकें मारून घेतलें होतें तेव्हां कपाळावर घाव लागून तें थोडें चिरलें होतें. त्या रक्ताचे ओघळ तिच्या तोंडावर वाहत होते. त्या ठार झालेल्या मोपल्याच्या पोटांतील रक्ताचा चिखल त्या खोलींत झाला होता. त्यांतच त्या सर्पाचे तुकडे तळपत होते. किंचित् वळवळत होते. जे पांच सहा मोपले आंत घुसून सुमतीस धरून अुभे होते त्यांनीं फुलासारखी तिला अुचलून, कवळून, तिची सुरी हातांतून काढून घेअून तिला त्या तशा परिस्थितींत, त्या रक्ताच्या चिखलांतच खालीं निजवली !

'फजल ? देखता क्या !' अेक मोपला सुमतीचे हात ताणून धरून पायाशीं अुभे असणाऱ्या आपल्या जोडीदारास म्हणाला. 'अरे काल त्या झाडींतच हें पांखरूं आपल्या हातीं पडावयाचें; पण अैटखानानें मध्येंच घात केला. आतां पाहतोस काय ? नाहीं तर त्या मौलवीच्या टोळीचे लोक अेकदां कां अिथें आले कीं ह्या छबेलीचे हे पेढ्याहून गोड मुके मौलवीच्या ताटांत जाअून पडतील, व आपण पुन्हां मिटक्या मारीत बसूं !' असें म्हणत रक्ताचे ओघळ ज्यावरून वाहत आहेत अशा त्या सुमतीच्या गालाचे तो अुन्मत्त मुके घेअूं लागला. 'अरे यार मेरेवास्ते तो रख !' 'माझ्यासाठीं ठेव.' असा अुच्छृंखल विनोद करीत ते पांच सहा पशू अत्यंत कामोद्दीप्त होअून त्या घायाळ कन्येला बिलगले.

समाजाच्या सुव्यवस्थित अवस्थेंत त्यांचे मनोविकार मर्यादित दाबांत ठेवलेले असतात, म्हणूनच ते बहुधा असंतुष्ट असतात. ज्या राक्षसी प्रवृत्तीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माणसांत हे मनोविकार अत्यंत असतात त्यांची असंतुष्टताहि अुत्कटच असते. अशा पाशवी मनुष्यांस समाजावर जेव्हां अेकादा भयंकर विप्लव गुजरतो तेव्हां माजणाऱ्या अव्यवस्थेंत आपले ते दुष्ट तामसी मनोविकार तृप्त करणें सहज सुलभ होतें व म्हणूनच भयंकर बीभत्सता व अुच्छृंखल भीषणता हें यांच्या या कामी मनोविकारास शामक न होता अुलट अुत्तेजक पौष्टिकच होतें. रक्ताच्या चिखलांत पाडलेल्या, बळानें अवयव दाबून धरलेल्या धावांतून वाहणाऱ्या रक्तानें माखलेल्या त्या निरपराध कन्यकेस भयंकर हाणाहाणी व मारामारी चालली असतां बिलगण्यांत त्यांच्या अुग्र कामवासना व अिंद्रियोन्माद विरस होण्याच्या स्थळीं अत्युत्कटपणें प्रकट होअू लागला. 'अरे यार या या सालीनें दोन मुसलमान अिथें मारून पाडले आहेत. अिचा चांगलाच सूड अुगविला पाहिजे ! हं, अुगव सूड ? हं, अुगव सूड !' असे खो खो हंसत व बीभत्स विनोद करीत त्या नरपशूंनीं त्या कन्यकेशीं भयंकर बलात्कार करण्यास आरंभ केला. अेक–दोन–तीन–अेकामागून अेक ते नरराक्षस 'अुगव सूड !' 'अुगव सूड !' म्हणून खिदळत व ताल धरीत अघोर अुपभोग घेअू लागले. त्या अमानुष भीषणतेनें त्यांचे कामविकार अमानुष समाधान पावू लागले.

मनुष्य जातीस केव्हां केव्हां जीं बीभत्स कृत्यें करतांना लाज वाटत नाहीं त्यांचीं कहाणी मात्र अेकतांना मोठी लाज वाटते ! म्हणून अितकेंच सांगणें पुरें कीं नअू दहा नरपशूंनीं, पशूंना सुचतहि नसतील अशा बीभत्स प्रकारांनीं आपल्या अिंद्रियोन्मादास त्या कन्येच्या देहाचा व लज्जेचा बळीं घेत बलात्कारावर बलात्कार चालविला.

परंतु आता तो बलात्कार त्या निष्पाप व निरपराध कन्येवर नव्हता. तर तो त्या तिच्या प्रेतावर होता. कारण ती पोर त्या भयंकर व क्रूर यातनांनीं केव्हांच गतप्राण झालेली होती.

✠ ✠ ✠

(मला काय त्यांचें (मराठी) मोपल्यांच्या बंडाबरील कादंबरी. १९२६ मध्यें प्रकाशित. सध्या तिसरी आवृत्ति निघाली आहे. मूल्य रु. २–८ आणे.) ✠ ✠ ✠

(सा...२३)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

योगानंद कीं रफिअुद्दीन ? : २५

✠ ✠ ✠

[‘ काळें पाणी ’ ह्या साहित्यिक श्री. वि. दा. सावरकर यांच्या कादंबरींतील चार प्रकरणें संक्षेपानें येथें दिलीं आहेत. यांतील भाषा, ललित लिखाणाला साजेशी, साधी, वाक्यें सुटसुटीत आणि वर्णन चित्र रेखाटणारें आहे. हीं केवळ चारच प्रकरणें येथें दिल्यामुळें कांदबरी वाचण्याची वाचकाला अुत्कंठा लागली, आणि त्यानें आम्हांला थोडा दोष दिला, तरीहि आमच्या निवडीचें चीज झालें असें समजून आम्हीं त्या दिलेल्या दोषालाहि भूषणच मानूं !]

✠ ✠ ✠

“ आअी ! अेक ओवी म्हण न ! ”

“ आअी, म्हण ना, अेक ओवी तरी म्हण ना तूं. जा ! आम्हीं तेवढ्या तुला ओव्या म्हणाव्या गोड गोड, पण तूं तेवढी मला अेकदेखील ओवी म्हणूं नये अं ! ” मालतीनें झोपाळयावर आणखी अेक अुंच झोका घेत घेत लाडिकपणें रमाबाअींना म्हटलें.

“ अेक ग कां बाळ ? अेक लाख ओवी म्हणेन बरं बाळे तुला, पण आतां तुझ्या आअीचा स्वर तुझ्यासारखा मंजूळ राहिला नाहीं. केळीच्या सोपटाच्या धाग्यांत झेंडूचीं फुलं ओवतां आलीं, तरी जुअीच्या फुलांची माळ ओवायची तर मअू मअू रेशमाचं कोवळं सूतच हवं. नाहीं. तर माळेचीं फुलं मात्र नासून जायचीं. प्रेमळ ओव्या, तुझ्या गोड सुरांमधें, असतात त्याहून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लडिवाळ लागतात. म्हणून अशा लडिवाळ ओव्या तुम्हीं मुलींनीं म्हणायच्या नी आम्हीं आयांनीं अैकायच्या. मीं ओवी म्हटलीं तर चीर गेलेल्या सतारीसारखं गाण्यांतलं गोडपण गळून जाअून माझ्या चिरकत्या आवाजाचं मात्र तुला हसूं येअील."

"येअूं दे हसूं आल तर ! हसूं तरी गंमत वाटल्याचंच ना ? माझी गमतीची करमणूक करायला तरी म्हटल्याच पाहिजेत दोन–चार ओव्या तुला ! देवाच्या ओव्या नि स्तोत्रं ग कशीं तास तास म्हणतेस ? तेव्हां नाहीं वाटतं आवाज चिरकत ? पण माझ्यावरच्या चार–दोन ओव्या म्हणायच्या तर लगेच सतारी चिरकतात ! आयांनीं मुलींच्या ओव्या नुसत्या अैकायच्या असत्या तर आयांनीं म्हणायच्या ओव्या ग कशाला कुणी रचून ठेवल्या असत्या ?"

"मग तूं आअी झालीस ना म्हणजे म्हण बरं तुझ्या बाळाला !" रमाबाअी मनापासून हंसल्या.

लाजेनें ओशाळलेल्या स्वरांत मालती रुसून म्हणाली, "मी आपली म्हणेन नाहीं तर न म्हणेन जा ! तूं नाहीं ना म्हणत मला अेखादी गोड ओवी ? हें ग काय असं ? तूं माझी आअी ना ? मग तूं नाहीं तर कोण ग म्हणेल मला आअीच्या लाडांची ओवी ?"

"म्हणतें बरं बाळ तुला ओव्या ! दोन–तीनच अं पण !"

"हं, आतां खरी गंमत !" असें अुल्हासून मालतीनें झोपाळ्याला भुअीवर चवड्यांच्या नेटानें रेटून झोक्यामागून झोके दिले. "हें काय ! म्हण ना ! अेखाद्या अंगचुकार गवयासारखी तालसूर लावण्यांतच अर्धी रात्र काय घालवतेस ?" असें मालतीनें पुन्हां अेकदां कोपरानें डिवचतांच रमाबाअींच्या तोंडाशीं जी ओवी आली ती त्या म्हणूं लागल्या.

अगे रत्नांचिया खाणी । नको मिरवूं अैट मोठी ।।
बघ माझ्याहि ये पोटीं । रत्न 'माला' ।। १ ।।
जातां येतां राजकुंवरा । नको पाहूं लोभूनिया ।।
दृष्ट पडेल माझीया । मालतीला ।। २ ।।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देतें माझं पुण्य सारं । सात जन्मवेरी ।।
माझ्या रक्षावें श्रीहरी । लेकुरा या ।। ३ ।।
पुरोनि अुरूं द्यावी । जन्मभरी नारायणा ।
कन्या माझी सुलक्षणा । अेकूलती ।। ४ ।।

'अेकूलती' हा शब्द गाण्याच्या नादांत अुच्चारला जातांच अेकदम जसा विंचू डसावा तशी कोण्या तीव्र दुःखाची आठवण होअून रमाबाअींचें मन व्याकूळ झालें. मालतीला वाटलें कीं, ओव्या म्हणतांना आअीला दम लागला ह्यामुळें ती सहसा चूप बसली असावी. आअीला विसावा द्यावा आणि गाण्याची गोड लहर तिला आलेली होती तीहि खंडू नये म्हणून आपली पाळी आली असें समजत ती स्वतःच पुढच्या ओव्या म्हणूं लागली.

माअुलीची माया । न ये आणिकाला ।।
पोवळ्या माणिकाला । रंग चढे ।। १ ।।
नये आणिकाला । माया ही माअूलीची ।।
छाया देवाच्या दयेची । भूमीवरी ।। २ ।।
माअूलीची माया । कन्यापुत्रांत वांटली ।।
वांट्या प्रत्येकाच्या तरी । सारीची ये ।। ३ ।।
जीवाला देते जीव । जीव देअीन आपुला ।।
चांफा कशानें सूकला । भाअीराजा ।। ४ ।।
माझं ग आयुष्य । कमी करोनीं मारूती ।।
घाल शंभर पूरती । भाअीराजाला ।। ५ ।।

गाण्याच्या ओघांत मालती आतां जी ओवी तोंडीं येअील ती गात चालली होती. पहिल्या ओव्या तिच्या मनाच्या बोलींत रचलेल्या होत्या. तिच्या आअीवर जी तिची लडिवाळ ममता होती, तीच त्या ओव्या निवडून निवडून मालतीच्या कंठाच्या सनअींतून गात होती. परंतु पुढच्या ओव्या अर्थासाठीं निवडून म्हटल्या नव्हत्या, तर त्या मराठी गवअी हिंदी पदांचा अर्थ तितकासा न बघतां जसा त्या गाण्यांतील चालींच्याच हौसेसाठीं काय तो तीं पदें गातो, अशी ती गात गेली. पण तिच्या आअीचें लक्ष त्या ओव्यां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तील अर्थाकडेहि वेधलेलें असल्यामुळें मालती तिच्या भाअीराजाला लागू असलेल्या ओव्या गाण्याच्या भरांत जेव्हां गात चालली, तेव्हां तिच्या आअीचें अूर दुःखानें दाटत येअून आतां रडूंच कोसळतें कीं काय, अशी तिला भीति पडली. तिच्या त्या दुःखांची छाया मालतीच्या त्या हसत्याखेळत्या आनंदा-वर पडून तो काळवंडून जाअू नये म्हणून रमाबाअींनीं तिला असह्य होत चाललेल्या ह्या मालतीच्या ओव्या बंद पडाव्या ह्यासाठीं मालतीला मध्येंच हटकलें,

" माले, थांब. थांव गडे भोवळ येअू लागली बघ मला. किती मेले अुंच झोके घेतेस हे ! "

असें निमित्त काढून भुअीला आपल्या पायांचा दट्टचा देत आअीनें झोपाळा थांबवला. त्यासरशीं मालतीच काय ती त्या झोपाळ्यावरून खालीं अुतरली नाहीं, तर अुंच लकेऱ्यांच्या झोक्यांत बेभान झालेलें तिचें मनहि त्या गाण्याच्या खालीं झोपाळ्यावरून अुतरलें आणि भानावर आलें.

पाहते तों आअीचे डोळे पाण्यानें डवरलेले ! तोंड दुःखाच्या तीव्र स्मृतीनें गोरेमोरें झालेलें ! मालतीच्या तत्काळ ध्यानांत आलें कीं, होय ना होय, आपल्या वारलेल्या वडील भावाची आअीला आठवण झाली असावी आणि आपल्या तोंडांतून सहजीं बाहेर पडलेल्या भावावरील ओव्यांनींच तिचें मन भडभडून आलें असावें ! तिच्या आअीला तिच्या नाहींशा झालेल्या वडील पुत्राची आठवण—त्या प्रसंगाला अितकीं वर्षे अुलटलीं तरी—अधूनमधून असें कांहीं विशेष निमित्त घडलें कीं अगदीं अेखाद्या ताज्या दुःखासारखी असह्य होत असे आणि ती ममताळू आअी ढसढसा रडत असे.

तिनें पटकन् आअीच्या मांडीवर डोकें टेकलें, त्यासरशीं तिचें तोंड गोरेमोरें आपण होअूनच झालें; तिच्या डोळ्यांतहि पाणी आपणहोअूनच टचकन् आलें आणि मग तिच्या सवयीप्रमाणें तशा आपल्या मुखाला आअीच्या हनुवटीपर्यंत अुचलून मालती काकुळतीनें बोलली,

" असं काय बरं आअी ? मी तुझ्या मनाला आनंदविण्यासाठीं ओव्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणूं लागलें तों चुकून तुझ्या दुःखाची खपलीच अशी अुचटून बसलें ! कशा मेल्या मला सुचल्या त्या ओव्या काय कीं !"

मालतीच्या मनाला ती चुकी अितकी बोचलेली दिसली कीं, तिच्या आअीला स्वतःच्या मागच्या दुःखापेक्षां त्या स्फुंदूं लागलेल्या लेकीचें चालूं दुःखच सहावेनासें झालें आणि रमाबाअी झटकन् रडें गिळून मालतीचेंच समाधान करूं लागल्या:

"वेडी कुठली ! अग, तुझ्या ओव्यांनीं नव्हे वरं ! मीच ओवी म्हणतां म्हणतां तुला माझं अेकुलतं लेकरूं असं म्हणून गेलें ना, त्याचं मला वाअीट वाटलं बरं अेवढं ! देवानें मला दोन लेकरं दिलीं असतां माझ्या दैवानं अेक हिसडून नेअून अेकच तेवढं अुरूं दिलं तें शल्य मला सहसा बोचलं ! अुगी बाळ ! तूं नाहीं बरं माझ्या दुःखाची खपली अुचटलीस. अुलट त्या दुःखाला किंचित् तरी हलकं करणारं जर कांहीं रसायन असेल तर तें तुझ्या ह्या आनंदी मुखावरील सुखाचं हसूंच काय तें होय ! झालं तें कांहीं परत का येतं ? तुझ्या भावाची तुझ्यावर अितकी ममता असे कीं, तुला मीं त्याच्या वियोगाच्या दुःखानेंसुद्धां रडवलं तर तो माझ्यावर रागावेल; त्याचा आत्मा जिथें असेल तिथें तळमळेल! तूं त्याच्याच ठिकाणीं आहेस ना मला ! मग तुझ्यांतच माझीं दोन्ही लेकरं सामावलेलीं आहेत, नाहीं का ? अुगी ! अग हो, आज त्या नव्या आलेल्या साधूच्या भजनाला रात्रीं जायचं आहे ना ? चल तर अूठ. आतां पेटत घालतें मी, तूं झाडलोट-पाटपाणी कर. आपलीं जेवणं अुरकतात तों नायडूबाअी येतीलच बोलवायला !"

रमाबाअीचे भ्रतार, त्याना दोन मुलें झाल्यावर अेकाअेकीं वारले. रमाबाअींचा चरितार्थ सुखवस्तूपणें चालूं शकेल अितका पैसा आणि कांहीं दागिने त्यांच्या भ्रतारानें मागें ठेवले होते. त्यावर रमाबाअींनीं आपल्या दोन्ही मुलांची जोपासना कांहीं वर्षे नागपूरकडच्या त्यांच्या मूळच्या गांवींच केली. पुढें त्यांच्या पुत्राला सैन्यामध्यें नोकरी लागली. तो तिकडे गेला तेव्हां त्यांचीं कन्या मालतीच काय ती रमाबाअीपाशीं अुरली. दोनचार वर्षांतच हिंदुस्थान-बाहेरील अिंग्रजांशीं चाललेल्या कोण्या लढाअीवर हिंदी सैन्य धाडण्यांत आलें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत रमाबाअींच्या पुत्रालाहि जावें लागलें. परंतु तिकडे गेल्यावर तो जवळ-जवळ बेपत्ताच झाला. मोठ्या खटपटीनंतर रमाबाअींना अेकदाचें अधिकाऱ्यांकडून कळलें कीं, तो सैनिक कांहीं कारणानें अधिकाऱ्यांशीं भांडून फरारी झाला असून बहुधा शत्रुपक्षाकडून मारला गेला असावा.

पुत्राच्या मृत्यूचें वर्तमान कळल्यानंतर दुःखानें खचलेल्या त्या बाअीचा जीव तिच्या अुरलेल्या अेकुलत्या अेका मुलीच्या मायेवरच काय तो जगत होता. मालतीचें कोडकौतुक करण्यांत त्यांनीं कांहीं कमी करूं नये. ती जी वाढूं लागली तीहि चंद्रकलेसारखीच अधिकाधिक शोभिवंत दिसूं लागली. तिच्या त्या लडिवाळ, चपल पण सुशील चालण्याबोलण्यामध्यें असा कांहीं मोहकपणा असे कीं, तिच्या आअीच्याच नव्हे, तर जो जो तिला पाही त्याच्या त्याच्या नयनाला आणि मनाला ती चतुर्थीची चंद्रकला पाहिल्यासारखाच आनंद होअी. सुरेख मोती पाहीले कीं तें कोण्या तरी शोभिवंत अलंकाराचीच सामग्री आहे हें जसें सहजीं वाटतें, तसें कोण्यातरी मोहक, मंगल आणि सुखकारक जीवनासाठींच हिला निर्मिली असावी असें त्या किशोरीला पाहतांच वाटूं लागे. तिला आतां चौदावें वर्ष अुलटून गेलें होतें आणि तिच्या आअीच्या मनांत तिच्या भविष्याविषयीं सोनेरी आशांचें आणि आकांक्षांचें अेक अुद्यानचें अुद्यान बहरूं लागलें होतें.

रमाबाअींची फार दिवसांचीं मैत्रीण म्हणजे सूतिका अन्नपूर्णाबाअी नायडू ह्या होत. त्या आजकाल मथुरेला नोकरीवर होत्या. त्यांच्या आग्रहानें आणि तीर्थयात्रा करण्याची रमाबाअींच्या मनाला आवड असल्यामुळें, त्या मालतीसह महिनापंधरा दिवसांसाठीं मथुरेला आल्या होत्या.

त्यांच्या घराशेजारच्या घाटावरच गेल्या महिन्यांत जो अेक योगानंद नांवाचा साधु आपल्या शिष्यांसह येअून अुतरला होता, त्याच्याकडे सध्यां अन्नपूर्णाबाअी नायडू भजन-पूजन दर्शनार्थ जाअूं-येअूं लागल्या होत्या. त्या योगानंदस्वामीजींना भूतभविष्यवर्तमान जाणण्याची दैविक शक्ति आहे असा जिकडे तिकडे गाजावाजा होत चालला.

योगानंदांविषयीं गांवांतील कुटाळ टोळींतहि कांहीं टवाळकी होअूं नये

CC-0. Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अितकें त्यांचें वर्तन देवलसी, निर्लोभ, सरळ आणि साधें असें. भजनांत ते रंगले म्हणजे त्या सत्पुरुषाचें, जगाचें वा देहाचें भानच सुटे असें दिसे. त्याची मुख्य साधना भजन हीच असे. बाकी कोणताहि ढोंग-धत्तूरा त्याच्या मठांत दिसत नव्हता. शिष्यसंप्रदाय मात्र भरपूर, त्या साधूच्या मागेंमागें शिस्तीनें चालतांना, मठांत शिस्तीनें वागतांना, नेहमीं आढळे. मथुरेंतून त्यांचा तळ आतां लवकरच हलणार होता. त्यासाठीं ह्या शेवटच्या सप्ताहांत भजनाची धुमश्चक्री चालूं होती. शेकडों लोक रात्रीं तेथें दाटत असत.

रमाबाअी मालतीला घेअून आमच्या रात्रींच्या भजनमहोत्सवाला तेथेंच जाणार होत्या. त्या मायलेकींनीं रात्रीचें जेवण आटोपलें तोंच नायडूबाअींची थाप दारावर पडली. लगेच त्या तिघी जणी घाटावरील स्वामीजींच्या मठाकडे जाण्यासाठीं लगबगीनें निघाल्या.

" मालती कुठें आहे ? "

रमाबाअी मालतीसह जों भजनाच्या ठिकाणीं पोचतात तों भजन अगदीं भर रंगांत आलेलें दिसलें. त्या घाटावर जिकडे तिकडे दूरवर लोकांची दाटी झालेली ! हिंदी भजनाप्रमाणें मोठमोठ्या झांजा घेअून पन्नास-पाअुणशें गोसावी साधुसंत योगानंदांच्या भोवतीं घेर धरून नामसंकीर्तनाचा नजर चालू आहे; मुख्य दहा-वीस शिष्य ते पखवाज, मृदंग, वीणा, झांज, प्रभृति वाद्यें ताल-सूर-ठेका ठाकठीकपणें धरून योगानंदमहंतांच्या अगदीं सन्निध सज्ज आहेत आणि मध्यभागीं कधीं बसून तर कधीं भक्तीच्या आवेशांत अुठून योगानंदजी अुंच, खड्या आणि तन्मय स्वरांत भजनें म्हणत आहेत ! त्या दूरवर दाटींतून आंत जायची सोयच नव्हती. पण नायडूबाअींच्या वशिल्यानें आधींच त्यांना महंतांच्या मंदिरांतील राखीव जागीं नेअून बसविण्यासाठीं अेक शिष्य ठेवलेला होता. त्यानें त्या मंडळींना वाटेनें पाहतांच योगानंदजींच्या आज्ञेप्रमाणें त्या तिघींनाहि नेअून बसविलें.

अिकडे भजनाचा रंग भरांत आला होता. श्रीमत् साधु तुलसीदासजींच्या अेका पदाचें ते ते चरण त्या शंभर भजनिकांच्या शंभर कंठांनीं परिपुष्ट अशा स्वरांत अुंच अुंच चढून दुमदुमत राहिले--

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुलसी मगन भये । हरिगुण गानोंमें ।।
मगन भये । हरिगुण गानोंमें ।। धृ० ।।
कोअी चढे हाथी घोडा पालखी सजाके ।।
साधु चले पैया पैया चिटियां बचाके ।।
मगन भये । हरिगुण गानोंमें ।। तुलसी० ।।

झांजांचा झणझणाट रक्ताचा बिंदु न् बिंदु थरथरवूं लागला. भक्तिरसाच्या डोहांत सारा समाज जणूं डुंबत होता ! हरिनामावांचून अितर कोणत्याहि मनोवृत्तीचा ध्वनि अेकूं येअीनासा झाला; पण तो अेकाचा दुसऱ्याला तेवढीं अैकूं येअीनासा झाला की ज्याचा त्याला देखील अैकूं येत नव्हता, तें कोणीं सांगावें ?

अितक्यांत त्या अुंच चढलेल्या शतकंठ निनादी सुराला अुतरवीत पदाचीं चरणें योगानंदजी अेकटेच अितक्या तल्लीनपणें म्हणूं लागले कीं, शिष्यादिक भजनिकांनीं झांजांची गोंगाटी सांथ बंद करून चिपळ्यांची सांथ धरली. "तुलसी मगन भये । हरिगुण गानोंमें" हें चरण गोड अुलटापालटीनें हळुवार सुरांत गात गात योगानंद अुभे राहिले.

अशा भजनोत्सवांत मध्यरात्र अुलटून गेली. आरतीच्या वेळीं स्वामींचे चरण शिवण्यासाठीं लोकांची मोठी दाटी अुडाली आणि त्या गडबडींतच जेव्हां तो समुदाय परत घरीं जाण्यासाठीं बाहेर पडूं लागला, तेव्हां अेकच रेटारेटी चालूं झाली. अितक्यांत नायडूबाअी, रमाबाअी आणि मालती जेथून बाहेर पडत होत्या तेथें कोणा तरी दहा-पांच जणांची अकस्मात् भांडाभांडी जुंपून मोठा गोंधळ माजला. तो मोडण्यासाठीं म्हणून स्वामीजींचें दहा-पांच शिष्य छडया घेअून आंत घुसले. जो जिकडे फुटला तो माणूस तिकडेच रेटीत नेला गेला. मध्यें तुंबळ दाटी घुसत चालली. फाटाफुटींत रमाबाअी कोठें, नायडूबाअी कोठें, तर मालती कोठें पांगली त्याचा अेकमेकींना पत्ता नाहींसा झाला. पण अितक्यांत अगदीं गोंधळून चेंगरत आलेल्या रमाबांअीचा हात स्वामींच्या अेका शिष्यानें धरून त्यांना दाटीबाहेर काढले आणि सांगितलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कीं, 'स्वामीजींच्या आज्ञेनें स्त्रियांना विशेष तत्परतेनें पोचवायसाठीं आम्हांला धाडलं आहे. आपण आपल्या घरीं चला.'

'पण माझी मालती कुठें आहे ? मालती ?' गांगरून, घाबरून रमाबाअी विचारते तोंच त्यानें झटपट त्याना पुढें पुढें नेतच सांगितलें, 'सगळ्यांना घरोघर पोचवलं आहे, तुम्हीं चला पुढें. बस्स् !'

अर्धी वाट दाटीनें खेचाखेचलेली. तींतून शिष्यानें रमाबाअीना जवळ-जवळ ओढीतच आणलें. 'जा, आतां तडक घरीं जा. तिथें अुरलेल्या दोन्हीं माताजीना आधींच नेअून पोचवलं आहे.' असें आश्वासून अुत्तर अैकण्यांत वेळ न दवडतां तो शिष्य अितर कोणी स्त्रीमागून दाटींत सांपडलें असल्यास त्याला बचावून घरीं पोचविण्यासाठीं निघून गेला, दाटींत मिसळला.

रमाबाअी धडधडत्या हृदयानें आणि झपाझप पावलांनीं घरीं चालल्या. स्वामीजींनीं अेवढ्या दंगलींत आपणा सर्वांची अितकी विशेष काळजी घेअून घरोघर पोचवावे, हे अुपकार अेकीकडे आठवीत आणि दुसरीकडे मालती दाराशींच आपली वाट पाहत किती घाबरलेली असेल तें चिंतीत त्या घराशीं आल्या. अंधारांतून त्यांनीं ओटीकडे पाहिले, पण मालतीची वा कोणाचीच चाहूल लागेना. कंदील लावून पाहिलें, दाराला कुलूप जसेंच्या तसेंच ! मालती पुढें आल्याचा कांहींच सुगावा नाहीं. भजनाच्या शेवटीं जी रेटारेट झाली त्यांत चेंगरलेली मालती ओक्साबोक्शीं रडते आहे. असा भास त्यांना होअूं लागला.

'मालती, अे मालती !'

रमाबाअींनीं दोन हाका कशाबशा आणि कशासाठीं काय कीं त्या ओसाड अंधारालाच मारल्या आणि तिसरी हांक तशी अुगीचच्या अुगीच देअूं जातात तोंच त्यांचा कंठ भरून येअून, रडे कोसळून त्या मटकन् खालीं बसल्या. तेथे नसलेल्या कोणाला आपण विचारीत आहोंत हें ध्यानांत असतांहि त्या स्फुंदत स्फुंदत मोठ्यानें पुसून गेल्या, 'माझी मालती कुठें आहे हो ? माझी मालती आली का हो ?'

असा विचार करतां त्यांचा त्यांना न कळतांच जरा वेळ टाळा लागला..

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोड्या वेळानें रमाबाओी ज्या अुठल्या त्या तडक नायडूबाओींच्या घराकडे मालतीच्या शोधाला निघाल्या.

पण वाट चालून थोड्या पुढें जातात तोंच रमाबाओींना नायडूबाओीच आपल्याकडे येतांना दिसल्या आणि त्या अेकट्या !

घाबऱ्या घाबऱ्या रमाबाओींनीं विचारलें, 'म्हणजे ! मालती कुठें आहे ?'

आश्चर्यानें नायडूबाओी अुत्तरल्या, 'म्हणजे ! मालती तुमच्याबरोबर गेली म्हणून मला स्वामीजींच्या अेका शिष्यानंच सांगितलं !'

'अग बाओी ! माझी मालती ! कुठें हो असेल ती ?'

सद्‌गदित कंठांत अडखळलेले असे कांहीं शब्द अुद्‌गारीत रमाबाओी अेखाद्या मुलासारख्या हुंदके देत रडूं लागल्या.

नायडूबाओी त्यांच्याहून धीराच्या बाओी होत्या किंवा त्यांच्या पोटची अेकुलती अुपवर लेक कांहीं हरवलेली नव्हती म्हणूनहि त्यांचा धीर टिकून राहिला असावा. रमाबाओींना हात देत त्या म्हणाल्या,

'असं काय घाबरतां अगदीं ? तुम्हां आम्हां साऱ्याच स्त्रियांना स्वामीजींनी बुद्धचा माणसं धाडून दंगलींतून सोडवलं तसंच मालतीला पण बचावून संभाळून ठेवलं असलंच पाहिजे. चला, स्वामीजींकडे जाअूं या प्रथम. मालती होय न होय तिथेंच अगदीं सुरक्षित आहे. चला.'

रमाबाओींना असा धीर देअून नायडूबाओी स्वामीजींच्या मंदिराकडे चालल्या खऱ्या, पण त्यांच्याहि हृदयाला काय होओील काय नाहीं, अशी सारखी धुगधुग लागल्यावांचून राहिली नाहीं.

महंताचें कपट

योगानंद ज्या मंदिरांत अुतरले होते त्याच्या प्रांगणांत त्या सकाळीं कांही दर्शनेच्छु आणि प्रश्नेच्छु लोक त्या स्वामीजींचें बोलावणें येओीतों अिकडे तिकडे हिंडत होते. ओळखीचे दोन-दोन चार-चार लोक अेकत्र अुभे राहून योगानंदजी भूतभविष्यवर्तमान किती अचक सांगतात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें वाखाणणीत होते. केवळ ज्याची भूतभविष्यें पाहायचें त्यांच्या मनांत येअी त्यांनाच शिष्यांकरवीं त्यांच्या अेकान्त खोलींत बोलावलें जाअी. तेथें महंत अगदीं मोजके प्रश्न विचारून आणि अैकून घेत. मग 'जलादर्श' नांवाचें अेक तांत्रिक यंत्र पुढें घेत आणि प्रत्यक्षपणें त्या यंत्रांत जें त्यांच्या दैविक दृष्टीला दिसे तेवढें सांगत. कोणीं खरें–खोटें म्हटल्यास वाद असा घालीत नसत. 'प्रभूने बतलाया, मैंने कहा ! सच-झूट प्रभुका अधिकार ! मैं अेक अुसके शब्दका ध्वनि हूँ !' हें ठाम अुत्तर काय तें योगानंद देत आणि त्या शिष्याकडून त्या प्रश्नेच्छु माणसाला परत बाहेर पोचवण्यांत येअी.

रमाबाअींची स्वामींवरील निष्ठाच त्याना आज त्या वाटेनें जातांना चालण्याअितकी तरी शक्ति देत होती. 'मालती योगानंदांच्या मठांत जरी सुरक्षित नसली आणि कालच्या दंगलींत हरवली असली, तरी ती कुठें आणि कशी आहे हें तरी योगानंदजी आपल्या 'जलादर्श' यंत्रांत पाहून आपल्याला नक्की सांगतील' हा विचार त्या भाविक आअीच्या घाबरलेल्या मनाला थोडा तरी आधार देत होता.

मंदिराच्या त्या प्रांगणांत ह्या दोन्ही महिला पाय ठेवतात न ठेवतात तोंच महंतांच्या अेका शिष्यानें त्यांना सामोरें जाअून राखीव वाटेनें महंत रहात त्या मठापाशीं नेलें. अुभ्या राहतात न राहतात तोंच अितका वेळ कसा-बसा दाबलेला अुसासा टाकीत रमाबाअींनीं शिष्याला विचारलें,

"पण आमची मालती कुठें आहे ? मालती ?"

त्यांच्या त्या अुतावळ्या प्रश्नाची जणूं वाटच पाहत असलेल्या त्या शिष्यानें, त्याच्या मुखावरील आश्वासन स्मितानें आणि दोन्ही पंजे वरद-हस्तासारखे हालवीत होकारार्थी नमविलेल्या ग्रीवेनें 'सगळं कांहीं ठीक आहे!' असें सुचविलें. त्यायोगें रमाबाअींच्या जिवांत जीव आला. चिंता ज्या वेगानें झटपट अुणावली तितक्याच वेगानें अुत्सुकता दुणावून रमाबाअी "बोलवाना मग तिला ! अं ? अिथं कुठं दिसत नाहीं ती ? आणा ना माझ्यासमोर !"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें काकुळतीनें विनवूं लागल्या. तेव्हां आतां शब्द अुच्चारला पाहिजे म्हणून अुच्चारतों अशा निरुपायाच्या आविर्भावानें शिष्य अुत्तरला,

"माताजी, गुरुमहाज अभी बुलातें ही हैं आपको ! घबराअिये मत! गडबड भी मत मचाना ! "

अितक्यांत महंतांच्या खोलीचें दार अुघडलें. दोन-चार प्रश्नेछु गृहस्थ बाहेर पडले. दोघी जणींना शिष्यानें आंत नेलें, पण तेथेंहि मालती दिसली नाहीं. रमाबाअींना 'बोला' अशी खूण होतांच त्यांनीं हात जोडून विचारलें,

"माझी मुलगी मालती आपण कालच्या दंगलींतून सोडवून अिथें सुरक्षित ठेवलीत हे अुपकार मीं जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. मी तिला न्यायला आलें आहें. कुठें आहे माझी मालती ? "

महंतांच्या खुणेवरून शिष्य म्हणाला,

"माताजी, तुमच्या मुलीला दंगलींतून मीं सोडवली नि तुमच्या घरीं पोचवायसाठीं नेतहि होतों. पण तिच्या ओळखीच्या अेका गृहस्थाबरोबरच ती स्वसंतोषानें घरीं जातें म्हणून म्हणाली. ती म्हणाली, 'तो माझा जवळचा आप्त आहे. "

"म्हणजे ? कोण तो ? " विझतें घर पुन्हा भडकावें तसा विझलेल्या चितेचा डोंब त्यांच्या हृदयांत पुन्हा पेटून रमाबाअी कासावीसपणें विचारूं लागल्या, "महाराज, अिथें कुणी आमचा आप्तअिष्ट नाहीं. महाराज, कांहीं तरी घात झाला आहे ! महाराज..."

निश्चयी मुद्रेनें आपल्या हाताची तर्जनी अुचलून त्या ताअींना 'थांबा' असें महंतांनीं खुणावलें. रमाबाअींचा तो न आवरता आवेगहि त्या दटावणाऱ्या पण सहानुभूतींच्या खुणेनें खाडकन् दबला. वाक्यांमागून वाक्यें त्यांच्या तोंडांतून बाहेर घुसण्यासाठीं त्यांच्या ओठापाशीं दाटलीं होतीं तीं तेथेंच थबकलीं.

महंत डोळे किलकिले करून थोडे अंतर्मुख झाले. मग अत्यंत दयार्द्र स्वरानें म्हणाले,

"मय्या, तुझी मुलगी हरवली नाहीं, माझी हरवली ! देवाची अिच्छा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असेल तर मी हा पाहा तिला शोधून काढतों. पण विचारीन तेवढंच बोल. दिसेल तेवढंच पाहा. सांगेन तेंच अैक. मन माझ्या हातीं सोपीव पाहूं पहिल्यानं. तुझा असा अेकहि विचार मनांत येअू देअू नको. दिलंस मला तुझं मन रिकामं करून ?"

"दिलं महाराज." असें सांगतांच रमाबाअी खरोखरच मन सुन्न झाल्यासारख्या झाल्या आणि महंतांच्या हालचालीकडे नुसत्या टकमक बघत राहिल्या.

शिष्यानें गुरुजींच्या खुणेवरून अेक स्वच्छ परात त्यांच्यासमोर ठेवली. तींत स्वच्छ पाणी कांठोकाठ ओतलें. त्या परातीच्या किंचित् वर असा अेक स्वच्छ आरसा भिंतीला लावला. अेक समअी पेटवून जवळ ठेवली. महंत योगानंदजींनीं पळींतील जल मंत्रून आपल्या डोळ्यांवर शिंपडलें आणि अेकाग्रचित्ता मंत्र जपत ते त्या परातींतील पाण्यांत टक लावून पाहत बसले. श्वाससुद्धां भीत भीत सोडीत सारेजण निःस्तब्ध झाले.

थोड्याच वेळांत महंतांनीं मान वर अुचलून नायडूबाअींना विचारलें,

"ह्यांना अेक मोठा मुलगा आहे ना ?"

रमाबाअी चमकल्या ! 'ह्यांना कसं कळलं तें ? अंतर्ज्ञानी खराच बरं हा पुरुष !'

पण नायडूबाअी कांहीं विशेष चमकल्या नाहींत. त्या अुत्तरल्या.

"हो, मीं स्वतःच पूर्वीं तुम्हांला सांगितलं होतं कीं, रमाबाअींना अेक मोठा मुलगा होता. तो लढाअीवर गेला नि तिकडे मारला गेला. त्याला आतां पांच-सहा वर्षं अुलटून गेलीं."

"पण तो मारला गेलेला नाहीं. मी तेंच सांगत होतों कीं, ह्यांचा तो वडील मुलगा जिवंत आहे. चांगला धट्टाकट्टा आहे. हा पाहा, माझ्यासमोर जशा तुम्ही तसा प्रत्यक्षपणें बसलेला आहे, बोलतो आहे."

महंतांच्या प्रत्येक वाक्यागणिक रमाबाअींच्याच नव्हे तर नायडूबाअींच्या अंगांत देखील आश्चर्याच्या चमका सणसणत गेल्या. रमाबाअी थरथरत्या स्वरानें अुद्गारून गेल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" माझा पुत्र ! जिवंत ! देवा, तुमच्या तोंडांत साखर पडो ! "

नायडूबाअींनीं आश्चर्याच्या पेचांतून स्वतःला थोडेसें सोडवून विचारलें. ". पण तो ह्यांचाच पुत्र कशावरून ? क्षमा व्हावी, पण मिथ्याभास... "

" अुगीच तर्क नको. अेक ह्यांचाच पुत्र कशावरून तें. त्याच्या भालावर अेका घावाचं खोल चिन्ह आहे. काय ? होतं ना तसं ? "

नायडूबाअींना तें कांहींच ठाअूक नव्हतें म्हणून त्यांनीं रमाबाअींकडे पाहिलें. रमाबाअी चाचरल्या. कारण त्यांच्या पुत्राच्या कपाळावर कोणच्याहि घावाचें चिन्ह नव्हतें पण तें नव्हतें असें धरलें तर महंत खोटे ठरणार आणि महंतांचें अंतर्ज्ञान लटकें पडतांच मेलेला पुत्र पुन्हां जिवंत होण्याची आणि हरवलेली कन्या सांपडण्याची अगदीं हाताशीं आलेली सुखद शक्यताहि पुन्हां घोर संशयांत पडणार !

" नसेल तर साफ नाहीं म्हणून सांग. चाचरूं नकोस. " महंतांनीं हटकलें.

" तसा कोणचाहि वण त्याच्या डोक्यावर नव्हता. " रमाबाअी बोलूं कीं नको असें दबतां दबतां झटकन् बोलून गेल्या.

" नीट आठव. सैन्यांत गेल्यावर तुझा पुत्र लढाअीवर गेला होता ना? ठीक तर. तिथें हा घाव लागला,

" हो रे हो ! महाराज, आठवलं मला. अगदीं खरं. त्याच्या शेवटच्या पत्रांत डोक्यावर दुखापत झाल्याचं त्यानें लिहिलं होतं खरंच. आपलं अंतर्ज्ञान त्रिकाळसत्य आहे. "

स्वतः रमाबाअींनाहि जें आठवत नव्हतें तें आजवर त्यांच्यांत कोणालाहि माहीत नसलेलें असें वृत्त अितकें तंतोतंत महंतांना कळावें ! खरें ठरावें ! आणि असें अगदीं सहज ओघानें ! नायडूबाअी अगदीं चकित झाल्या. महंतांच्या शब्दावर रमाबाअीअितकाच भाविक विश्वास नायडूबाअींचा देखील न बसणें आतां केवळ अशक्य होतें. त्या अगदीं परस्थ आणि अनोळखी. महंतांनीं अितक्या पटापट त्या पुत्राच्या अितक्या खाणाखुणा आणि घरची माहिती सांगितली कीं, तो पुत्र त्यांच्या डोळ्यांसमोर तेथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्या अंतर्दृष्टीला दिसत होता हें पाखंडांतील पाखंडालाहि नाकारतां येणें दुरापास्त व्हावें.

रमाबाअींच्या आश्चर्याला तर पारावार अुरला नाहीं. 'तुमचा पुत्र जिवंत आहे, खुशाल आहे !' हीं त्या महंतांचीं वाक्यें अैकतांना त्यांचें हृदय आनंदाच्या लाटांनीं अितके हेलावलें कीं, त्यांत मालतीच्या हरवण्याची आठवणहि क्षणभर बुडून गेली. हरवलेली मुलगी शोधीत असणाऱ्या त्या आअीला तिचा मेलेला अेकुलता अेक पुत्र जिवंत सांपडला.

" पण सांगणं तें पुढेंच आहे. " महंत झटपट पुढें सांगूं लागले, " त्या तुमच्या पुत्राचा हा अेक स्नेही पाहा. तो नि...हं; ही पाहा मालती आली. ठीक. नागपूरकडे तुमचं घर ना ? हं, बघा तर, त्या स्थळीं मालती त्याच्याशीं प्रेमाचें संगनमत करीत आहे. हाच तो गृहस्थ. काल ह्याच्याबरोबर मालती गेली. हो, अगदीं संतोषानें चालली आहे पाहा. अगदीं तुम्हीं जशा मला दिसतां नि म्हणूनच अिथें आहां हें खरं. अगदीं तसंच हें मला दिसतं आहे नि म्हणून खरंहि तितकंच आहे. निघाले, आगगाडी सुटली ! काय ? अक्षरं पुसट ? पण नागपूरकडे. मालती तिच्या प्रियकराबरोबर नागपूरला निघून गेली आहे ! ऱ्होम् ऱ्हीम् ऱ्हम् वषट् ! नेत्रत्रयाय फट् ! "

अेकाग्र चित्ताच्यां अवधानानें परिशान्त झालेला तो महंत हा मंत्र अुच्चारतांच हलकेंच हरिणाजिनावर डोळे मिटून पडला. वारा घालीत गुरुजींपाशीं थोडा वेळ अेक शिष्य बसला आणि गुरुजींनीं किंचित् हात अुचलून खुणावतांच त्या बायांना तो अगदीं खोल आवाजांत बजावता झाला कीं, " आतां कांहीं अेक अधिक सांगतां येणार नाहीं. स्फूर्ति अुतरली. केवळ 'पुढे काय करायचं ?' अितका अेक प्रश्न हवा तर बिचारा. योगाची तंद्री अुतरण्याच्या आंत जर कांहीं गुरुजींनीं सांगितलं तर तितकंच काय तें अैकावं नि कोणतीहि अधिक चर्चा न करतां आज परतावं, अुद्याचं अुद्यां. "

शंभर अेक प्रश्न रमाबाअींना अेका श्वासांत विचारून टाकायचे होते, अितका त्यांच्या मनांत त्या महंतानें वर्तविलेल्या मालतीविषयींच्या वृत्तानें चिंताकुल विचारांना गोंधळ अुडवुन दिला होता. पण निरुपाय ! अेका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुत्तरानें त्यांचे ते शंभर प्रश्न ठिकच्या ठिकाणीं थिजून टाकले. तें अुत्तर म्हणजे त्या अुग्रट शिष्याचे 'चूप' म्हणून दटावणारें बोट. अर्थात् जो अेक प्रश्न विचारायची अनुज्ञा मिळाली होती तेवढाच रमाबाअींनीं व्याकूळपणें विचारला.

"आतां आम्हीं पुढे काय करावं म्हणजे हें संकट टळेल ? महाराज, कृपा करून..."

शिष्यानें 'हां !' म्हणून बोट पुन्हा दटावलें, रमाबाअींच्या वाक्याची लांबी ठरलेल्या मापाच्या बाहेर वाढलेली होती !

महंतांनीं गुंगींतल्या गुंगींत आळेपिळे दिले आणि तुटक, विसंगत शब्दांत ते पुटपुटूं लागले.

'हां ? आगे ! अच्छा ! किसको भी अिधर अुधर मत बोलो ! बोलाल लोकांत तर मालती अुरलेली लाज सोडून तुमची वैरीण बनेल ! अिथें कुणापाशीं चकार शब्द मालती हरवल्याचा काढणें नाहीं ! अबीके-अबी थेट–नागपूरला जाव. लडकी मैदानमें भेटेल ! पण अुशीर कराल, अिथें अेक रात्र काढाल–मिळणार नाहीं ! नागपूरहून–मुलगी–बस्स, चल देगी दूर दूर दूर ! जाव लवकर–नागपूर–मैदानमें ! देख, देख, देख ! ! ही पाहा मालती ! आ ऽ आ ऽ आ ऽ ! बेटा, बेटा, आः ! माके पास जा !'

महंत निश्चेष्ट पडले. शिष्य म्हणाला, 'माताजी, ढळलं तुमचं संकट ! अैकलांत आतां गुरूजींचा अभिप्राय ? साक्षात्काराचे ते शब्द ? ते शब्द पाळाल तर मुलगी परत येअील. चालत येअील. ह्या प्रांतीं, अिथें कुणाशीं कांहीं अेक न बोलतां, गाजावाजा न करतां, आजच्या आज निघा नी नागपूर गांठा. यावं आतां, छे ! छे ! छे ! हें काय ? फळं ? दक्षिणा ? छे ! छे माता, फूल सुद्धां दुसऱ्याचं ह्या दैवताला चालत नाहीं ! यह महंत अेक अलौकिक साधु है ! वैसे तो लाखों तुम देखते हो ! परंतु माताजी, यह तो साक्षात्कारी पुरुष ! अच्छा, चलिये ! अं हं, आतां अेक शब्द अधिक बोलणं नाहीं ! बाहेर !"

(सा...२४)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिष्याचा तो शेवटचा शब्द अितक्या निर्धाराचा होता कीं, आतां पाअूल बाहेर न टाकलें तर धक्का मारतो कीं काय असें वाटावें. त्या दोघी नमस्कार करून फळें, दक्षिणा, परत घेअून गुपचूप त्याच पावलीं बाहेर पडल्या. गुपचुप मंदिराबाहेर आल्या. वाटेला लागतांच रमाबाअी कांहीं बोलूं लागल्या तोंच नायडुबाअींनी चेतावणी दिली,

" अं हं ! वाटेनें नाहीं. जें काय बोलणं ते घरीं ! "

नायडूबाअींच्याच घरीं त्या प्रथम गेल्या. जातांच नायडूबाअीं म्हणाल्या,

" अं हं ! दैवाचे तर आज देवासारखे अुपकार झाले आहेत तुमच्या-वर. पुराणांतील कथा ह्या युगीं घडल्या ! तुमच्या मेलेल्या पुत्राचा आज पुनर्जन्मच झाला नाहीं का ? मग हरवलेली मुलगी भेटायची ती चिंता कशाला ? मी सांगतें, तुम्ही आतां सारे तर्क-वितर्क सोडा, त्या महंतांच्या अगदीं तंतोतंत सत्य ठरलेल्या अद्‌भुत अंतर्ज्ञानावर विश्वसून त्यांनीं सांगि-तलेल्या मार्गेंच जा.'

" छे ! तुम्हीं याल तरच नागपूरला मी जातें, " रमाबाअी हट्टून बसल्या. स्वतःच्या पायांवर त्यांना अुठवेंच ना.

मालती त्या कीर्तनाच्या दंगलींत हरवली ही बातमी त्या प्रांतीं कोणाच्याहि कानांवर न घालतां रमाबाअी आणि नायडूबाअी अशा दोघीहि शेवटीं नागपूरला त्या दिवशींच निघून गेल्या.

स्वामी योगानंद ?

रमाबाअी नायडूबाअींसह नागपूरला ताबडतोब निघून गेल्यामुळें आणि त्यांनीं मालती हरवल्याचा चकार शब्द कोठेंहि न काढल्यामुळें त्यांच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनासुद्धां त्याची वार्ता नव्हती, मग लोकांना वा पोलिसांना कोठली असणार ?

त्याच दिवशीं रात्रीं योगानंदस्वामींचें मथुरेच्या लोकांना शेवटचें दर्शन होणार होतें, शेवटचें भजन अैकायला मिळणार होतें. कारण कीं, स्वामींचा तळ भजन संपतांच मथुरेहून हालण्याचें नक्की झालें होतें. अर्थातच मंदिराच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रांगणांत लोकांची दाटी नेहमींपेक्षांसुद्धां जास्त झाली होती. त्यांच्या चार मुख्य शिष्यांच्या चौकडींत योगानंदमहाराज मध्यभागीं अुभे राहून वीणा घेअून भजन गाअू लागले. रंग चढत चालला. थोडचा वेळानें स्वामीजींच्या आज्ञेप्रमाणें ते हजारों लोकहि अुभे राहून अेकमुखानें जेव्हां नामघोष करूं लागले, मोठमोठे पखवाज, मृदंग, झांजा, सारंग्या, सहस्त्रावधि तालिका, अेक-सहा झंकारत त्या शतकंठ निनादी नामघोषाला जेव्हां साथ देअूं लागल्या आणि महंत भक्तीच्या आवेशांत येअून अुंच हातानें तालाची गति द्रुततर करण्या-साठीं सारखें खुणावीत जेव्हां त्या द्रुततर तालावर नामघोषाची नुसती रण-धाअी अुडवूं लागले, तेव्हां त्या ध्वनिसिंधूच्या लाटांसरशीं हृदयें थरथरून ज्याचें त्याचें देहभान क्षणभर सुटल्यासारखें झालें. भक्तीच्या आनंदांत तल्लीन होअून कित्येक नाचूं लागले. कित्येकांच्या डोळचांतून प्रेमाश्रु गळूं लागले, नामघोषाच्या गजरानें सारें वातावरण दुमदुमून गेलें.

गाढ झोपलेल्या पक्ष्याच्या घरटचांतून पहांटें जशी त्याची जागती पहिली लकेर अैकूं यावी आणि ती गोड लागावी तसाच त्या निःस्तब्ध सभेच्या त्या शांततेंतून कांहीं वेळानें हळूहळू अेका सारंगीचा मंजूळ सूर पुन्हा अुठूं लागला. स्वामींच्या भजनाला सांथ देणाऱ्या शिष्यानें त्यांच्या आवडीचें मीराबाअीचें खालील पद सारंगीवर धरलें--

बता दे सखि कौन गली गये शाम ? ।।
कौन गली गये शाम ? ।। ध्रु ।।

गोकुल धूंडी । वृंदावन धूंडी ।
धूंडि आयो व्रजधाम ।। बता दे सखि० ।। १ ।।

" कौन गली गये शाम? " हे रसाळ चरण तितक्या आर्ततेनें तो भक्त गाअूं लागला, शब्दाशब्दाला आळीपाळीनें अुंचवीत निचवीत मधुर आलापांत आळवूं लागला कीं, ज्याच्या त्याच्या हृदयांत ज्याच्या त्याच्या प्रियकराची मूर्ति दिसू लागली. आपणच आपल्या प्रियाला शोधीत आहोंत असा भास होअूं लागला. ' कौन गली गये शाम ? ' ' सांग ना सखे, कोणच्या आळींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझा प्रियकर लपला आहे? मी गोकुळ धुंडून आलें, वृंदावन धुंडून आलें, व्रजांत पाहून आलें, पण माझा प्रियकर सांपडत नाहीं. सांग ना सखे, तो मनमोहन कुठें आहें? कौन गली गये शाम?'

तें रसाळ पद चालूं असतांच मध्यंतरीं त्या सात्त्विक मंजुळतेंत रमलेल्या सभेच्या कानाला वाटेनें अेकामागून अेक येणाऱ्या दहा-बारा मोटारींच्या भोंग्यांची कर्कश फों फों अकस्मात् अैकूं आली. मंदिराच्या ज्या प्रांगणांत भजन थाटत असे त्यांच्या तीन दिशांना असणाऱ्या तिन्ही दारांशीं त्या मोटरींपैकीं दोन-दोन मोटरी फों फों करीत वळून थांबल्या. योगानंदस्वामींचा लौकिक मथुरेंत दूरवर फैलावला असल्यामुळें त्यांच्या भजनाला कित्येक मोठेमोठे लोक मोटरी घेअून नेहमींच येत, त्यांच्यापैकींच कोणाच्या तरी ह्या मोटरी असाव्यात. पण तरीदेखील भजनाच्या भर रंगांत हा असा रसभंग करणारा आडदांडपणा करायचा कांहीं तरी संकोच ह्या मोटर-वाल्यांना वाटायला नको होता का? लोक थोडेसे त्रासून आपसांत असें कुजबुजले, पण महंत योगानंदजी भजन जसे गात होते तसेंच तल्लीनपणें गात होते.

अितक्यांत अेक दांडगा, अुग्रट आणि अुंच गृहस्थ प्रांगणाच्या समोरच्या द्वारांतून आंत घुसून धिटाअीनें वाट काढीत वाक्पीठावर महंत आपल्या भजनी ताफ्यासह जेथें बसले होते तिकडे सरळ जाअूं लागला. आजूबाजूचे लोक त्याला ओरडून सांगूं लागले, ' खालीं बसा ', अहो शहाणे !', ' ओढा खालीं! हात धरून बसवा! ' पण ओरडण्याकडे वा अुपहासाकडे किंचित्‌हि लक्ष न देतां तो वाक्पीठावर गेला आणि न विचारतांच वर चढला. भज-नाच्या रंगांत मनःपूर्वक रंगलेल्या अेखाद्या भक्ताच्या अंगांत दैवी आवेश संचारतो किंवा अर्धवेडा अेखादा मनुष्य मोठमोठ्या सभांतील नुसत्या जनसंमर्दाच्या देखाव्यानेंच वारा प्यायल्यासारखा होतो, पण हा गृहस्थ अर्धवेडाहि दिसत नव्हता, भावडाहि दिसत नव्हता. नीटनेटका वेश, अैटबाज, समंजस मुद्रा होती त्याची. म्हणून तो वाक्पीठावर चढतांच महंतांच्या त्या चौकडींतील शिष्यानें त्याला नम्रपणें विचारलें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" काय हवं आपणांला? असं अेकदम वाक्पीठावर चढणें सभाविनयाला धरून नाहीं ?"

परंतु तो गृहस्थ तें अैकलें न अैकलेसें करून थेट महंतांच्या जवळ गेला आणि त्यांना म्हणाला,

"तुम्हांला बाहेर कुणीं मोठे गृहस्थ भेटायला बोलावीत आहेत, चला."

महंतांनीं त्या गृहस्थांना स्वतः अुत्तर न देतां शिष्याकडे बोट दाखविलें. शिष्य म्हणाला,

" त्या थोर गृहस्थांना स्वतः आंत येअू द्या. महंत अेका देवालाच काय ते समोरे जातात; माणसाला नाहीं. "

त्या शिष्याकडे दुर्लक्ष करून तो गृहस्थ योगानंदांना दटावून म्हणाला,

" तुम्हालांच आलं पाहिजे बाहेर. "

त्या दटावण्यासरशीं महंतहि चमकल्यासारखे झाल्यावांचून राहिले नाहींत.

" भजन संपतों आम्हांला येतां येत नाहीं. " ते कांहीं तरी शंकेनें अडखळत अुत्तरले.

" तुम्ही होअून येत नसाल तर मी तुम्हांला न्यायला आलों आहें. बोला, येतां की नाहीं ?"

" हां, अुद्धटपणा कामाचा नाहीं. " शिष्यानें रागावून त्या गृहस्थाला फटकारलें, " असे आहेत तरी कोण ते अेवढे थोर गृहस्थ ? नांव सांगा. "

" पोलिस सुपरिंटेंडेंटसाहेब ! "

ह्या शब्दासरशी योगानंदस्वामींची ती प्रशान्त मुद्राच नव्हे तर त्यांचा तो भक्तिशील नखशिखान्त आविर्भावहि झटक्यासरसा पालटून तो कोणी दुसराच तल्लख, तापट आणि भांडखोर पुरुष दिसूं लागला. त्या बोलावूं आलेल्या गृहस्थानें तें पोलिस सुपरिंटेंडेंटचें नांव पुरतें अुच्चारलें नाहीं तोंच अेखादा वज्रमुष्टीसारखा बळकट ठोसा त्याच्या नाकावरच लगावून योगानंदस्वामींनीं जी खालीं अुडी घेतली ती अितक्या लांब पल्ल्यावर होती कीं, नाकावरील ठोशासरशी चक्कर आलेला तो पाचारक गृहस्थ चांगला दांडगा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतांहि स्वतःला सावरून त्यानें योगानंदामागें जी अुडी घेतली ती योगानंदांच्या अुडीच्या अर्धी लांबदेखील पडली नाहीं. त्या चारी शिष्यांनींहि योगानंदांच्या पाठोपाठ आपले धारदार चिमटे अुपसून वाक्पीठावरून खालीं अुड्या झोकल्या होत्या. दाटलेल्या मंडळींत त्या गोसाव्यांच्या तशा धडाधड अुड्या पडतांच तेथें मोटा गोंधळ माजला. आरडत ओरडत तिकडचे लोक अुठून अुभे राहिले, रेटारेटी सुरूं झाली.

अिकडे ज्या समोरच्या द्वाराकडून पोलिस सुपरिंटेंडेंटचा म्हणून निरोप आणणारा तो मनुष्य घुसला होता त्या द्वाराच्या बाजूला अुडी न घालतां दुसऱ्या दाराच्याच बाजूला त्या गोसावी मंडळींनीं ज्या अुड्या घातल्या आणि तिकडल्या दाटींत मिसळून जाण्याचा यत्न केला, तो बुद्ध्याच केलेला होता. त्या द्वाराकडे बहुतेक असेच लोक बसविलेले होते कीं, जे भजनाला प्रत्यहीं येत होते, फार भाविक दिसत आणि सगळ्यांच्या आधीं येअून मोठ्या आस्थेनें आपापल्या जागा धरून बसत. तसा आस्थेवाअीक भजनलोलुप समाज त्या द्वाराशीं होता त्या द्वारानेंच आपल्याला सुखरूपपणें बाहेर पडतां येअील अशी महंतांनीं तात्काळ अटकळ बांधली. पोलिस सुपरिंटेंडेंटचा निरोप ज्या समोरच्या द्वारानें आला, त्याच बाजूला ते असल्यास पोलिस येअून अुभ राहिले असण्याचा संभव फार, ह्यासाठीं त्या चतुर महंतानें आणि त्याच्या शिष्यांनीं त्या समोरच्या द्वाराला टाळून त्या भाविक लोकांनीं दाटलेल्या द्वाराकडे मुसंडी मारली. त्यांच्यामागोमाग त्या पोलिस सुपरिंटेंडेंटच्या निरोप्याच्या हातून निसटून ते गोसावी त्या भाविक जनांना बसविलेल्या द्वारापाशीं आले देखील. आतां आणखी अेक मुसंडी कीं द्वारांत, कीं लगेच द्वाराबाहेर.

अशा कृतनिश्चयानें तें पांची गोसावी त्या द्वाराशीं भिडले आणि तेथें दाटी करून अुभे राहिलेल्या त्या त्यांच्या नित्याच्या भाविक श्रोत्यांना 'वाट द्या' म्हणून घाअीघाअीनें म्हणाले.

तों सहसाच त्या भाविक भक्तांची त्या द्वारापुढची ती दाटीच अेकेरी ओळीनें खांद्याशीं खांदा भिडवून पसरत पसरत त्या पांची गोसाव्यांना मधोमध घेणारें वर्तुळ घालून अुभी ठाकली. त्यांतील प्रत्येकानें आपापलें पिस्तुल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देखतां देखतां अुपसलें आणि त्या गोसाव्यावर रोखून त्यांच्या पुढाऱ्यानें योगानंदाला आज्ञा सोडली,

"थांब. अेक पाअूल पुढें टाकशील तर मारलाच जाशील."

वैष्णवी गंधे, वैष्णवी मुद्रा, माळा, भगवीं वस्त्रें प्रभृति धारण केलेले, भजनांत तल्लीन दिसणारे, नित्य नेमानें अगदीं आरंभापासून येअून भाबड्या मुद्रा करून बसणारे आणि साध्यासिध्या माणसांसारखे दिसणारे हे नेहमींचे श्रोते अेकदम अेकजात पिस्तुलें रोखून त्या बिचाऱ्या साधुशील सत्पुरुषाच्याच अंगावर अुलटले! देवावतारी भगवद्भक्त म्हणून प्रत्यहीं ज्याच्या पायां पडले त्याच्याच जिवावर अकस्मात् अेकजुटीनें अुठले!! 'हें आहे तरी काय?' असें दिङ्मूढ झालेले शेकडों लोक कुजबुजूं लागले, शेकडों भयभीत होअून प्रांगणाच्या बाहेर निसटून जाअूं लागले. कांहींच्या मनांत सहानुभूतीहि जागून त्या धर्मपरायण भक्ताला सोडविण्यासाठीं दंगल करावी असेंही येअूं लागलें.

पण त्या महंताच्या पक्कें ध्यानांत आलें कीं, 'ह्या ना ना ढंगांखालीं आणि ढोंगाखालीं छपून वेषांतर केलेलें हे तीस–चाळीस गुप्त पोलिसांतील लोकच ह्या तिन्ही द्वारांशीं प्रत्यहीं भजनाला येअून बसत असले पाहिजेत! त्यांचं कपट आपणाला अुमगलं नाहीं खरं! आपण त्यांच्या पंजांत पुरतेपणीं गवसलों खरें!!' तरीहि अेक शेवटचा अपाय म्हणून त्यांनी अत्यंत कर्कश आणि अुंच स्वरानें त्या खळबळलेल्या समाजाला होकारलें,

"अहो, अिथं धर्माचा अभिमानी कुणीच नाहीं का? भगवाना, आतां तूंच तुझ्या भक्तासाठीं धाव!"

त्या सरशीं समाजांतील कित्येक प्रामाणिक सज्जन चिडले. त्या महंता-विषयीं जी काय प्रत्यक्ष माहिती होती ती त्यांच्या मनांत अढळ श्रद्धा जाग-विणारी होती. त्या अपरिग्रही, निर्लोभी, स्वधर्मप्रचारक भक्तावर, न जाणो मिशनरी प्रभृति परधर्मीयांनीं कांहीं कुभांड रचलें नसेल कशावरून? अशा भावनेनें कांहीं धाडसी स्वधर्माभिमानी लोक खवळले. पोलिसांवर दोन–तीन दगडहि पडले, शिव्यागाळीचा तर नुसता मारा चालला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अितक्यांत मुख्य द्वारानें लाठीबंद पोलिसांच्या तुकडीसह स्वत: सुपरिंटेंडेंट आंत आले, वाक्पीठावर चढले आणि खणखणीत आवाजांत सर्व लोकांना अुद्देशून आज्ञापिते झाले,

"लोकहो, योगानंद हें नांव घेतलेल्या ह्या मनुष्यानें अिथें जें अवडंबर आजपर्यंत रचलं त्यावरून हा कुणी महान् भगवद्भक्त आहे असं आपणां-सारख्या निर्बंधशील नागरिकांना वाटणं साहजिक होतं, पण आम्हांला ह्याची माहिती आहे ती अैकतांच ती आपली सहानुभूति साहजिक असली तरी जी सर्वस्वीं अनाठायीं होती हें आपणां सर्वांना कळूनच येअील. ह्या स्वामीचं सोंग घेअून वावरणाऱ्या योगानंदाचं खरं नांव जरी आपण अैकाल तरी आपण आश्चर्यानें थक्क व्हाल. ह्या योगानंदस्वामीचं खरं नांव रफिअुद्दिन अहमद असं आहे. हा पंजाबी मुसलमान. ह्याच्यावर, पूर्वी अत्यंत क्रूरतेनें घातलेल्या दोन दरोड्यांचा आरोप सिद्ध होअून ह्याला पूर्वी पंजाबमध्यें सात वर्षं काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती. त्याप्रमाणें ह्याला काळ्या पाण्यावर धाडण्यांत आलं असतां हा चार वर्षांनीं तिथून पळाला. गेलीं दोन वर्षं ह्यानें ह्याच्या ह्या चार शिष्यांप्रमाणेंच अनेक दुष्ट लोकांना भोवतीं जमवून पुन्हा अनेक चोऱ्या, दरोडे, अपहरण, प्रभृति भयंकर अुपद्रव द्यायला आरंभलं आहे. गेल्या वर्षी पोलिसांनीं ह्याच्या टोळीला अरण्यांत वेढलं असतां तिनें पोलिसांवर अचानक गोळ्या झाडल्या नी पोलीस अधिकाऱ्याला घायाळ करून नी त्याच्याच घोड्यावर स्वार होअून हा धाडसी दुष्ट पसार झाला. त्यानंतर तो बेपत्ताच होता; पण हाच तो, असा संशय आल्यावरून ह्याच्या भजनांत आम्ही, हा मथुरेला आल्यापासून गुप्त पोलिसांना नाना वेषांनीं दारादारावर ठेवून सक्त पहारा करीत आलों. अशासाठीं कीं, पूर्ण शोध होअून वॉरंट सुटतांच ह्याच्या सारख्या धाडसी अपराध्याला साथीदारांसह अचानक पकडतां यावं. सर्व पुरावा जुळून, खाणाखुणा पटून, ह्याच्या अेका साथीदाराच्याच बित्तंबातमी-वरून अलाहाबादेहून सुटलेलं वॉरंट हें पाहा. हें आजच संध्याकाळीं आमच्या हातीं आलं. ही टोळीं तर आतां भजन संपतांच गुप्त होअून निसटणार असा ह्यांचा बेत कळल्यावरूनच भर भजनामध्येंच ह्यांना पकडायचं ठरलं. अेका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोघांना हे बेरड दाद देणार नाहींत हीं अटकळ आम्हांला आधींच असल्यामुळें ह्यांच्यावर असा सशस्त्र छापा घालावा लागला. आपल्यांतील कांहीं जणां-कडून अेका साधूचा छळ होतो आहे अशा भलत्याच समजुतीनें कांहीं दांडगाअी, दंडेली होअूं नये म्हणून आम्हीं अितका अुलगडा केला आहे. आतां आपण सर्वांनीं दहा मिनिटांच्या आंत हें पटांगण मोकळं केलं पाहिजे. तसंच रस्त्याला अुद्या सकाळपर्यंत कोणत्याहि प्रकारचा जमाव होतां कामा नये. नाहीं तर लाठी चालवून पोलिसांना तो मोडावा लागेल. वॉरंटाप्रमाणें आमचं कर्तव्य आम्हांला बजावलंच पाहिजे. त्यांतील तथ्यातथ्य निवडा-यचं कर्तव्य न्यायालयाचं. पोलीस, दहा मिनिटांच्या आंत ह्या पांची अपराध्यांना बेडचा ठोकून तुरुंगाकडे घेअून चला नी हें पटांगण मोकळं करा."

दहा मिनिटांच्या आंत त्या पांची गोसाव्यांच्या हातापायांत बेडचा ठोकून त्यांना तुरुंगाकडे नेण्यांत आलें आणि त्या साऱ्या जमा-वाची आपोआपच पांगापांग होअून त्या पटांगणांत चिटपांखरूं सुद्धां दिसेंनासें झालें !

परंतु तो पकडलेला गोसावी खरोखर कोण होता ? स्वामी योगानंद कीं रफिअुद्दिन अहमद ?

आणि मालती ? तिचें काय झालें ?

✠ ✠ ✠

(काळें पाणी (मराठी हिंदी) अंदमानांतील जीवनावरील कादंबरी. १९५७ मध्यें द्वितीयावृत्ति प्रकाशित, मूल्य ५ रुपये.)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्णावती हिंदु महासभा - अध्यक्षीय भाषण : : २६

* * *

[१९३७ मध्यें स्वातंत्र्यवीर सावरकरांची रत्नागिरीच्या स्थानबद्धतें-तून सुटका झाल्यावर त्याच वर्षीं डिसेंबरमध्यें त्यांची हिंदु महासभेच्या अध्यक्षपदीं जी अेकदां निवड झाली ती पुढें लागोपाठ सहा वर्षेंहि तशीच होत गेली. त्या हिंदु महासभेच्या अध्यक्षपदावरून स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं जीं महत्त्वाचीं राजकीय भाषणें केलीं आहेत तीं 'हिंदु-राष्ट्रदर्शन' ह्या पुस्तकांत संग्रहित करण्यांत आलीं आहेत.

कर्णावती (अहमदाबाद) येथें १९३७ सालीं "अखिल भारतीय हिंदु महासभेचें" १९ वें अधिवेशन भरलें, त्याच्या अध्यक्षपदावरून वीर सावरकर यांनीं जें भाषण केलें, तें पहिलें दिलें आहे. त्यांत त्यांनीं स्वतः रचलेली हिंदुत्वाची सुप्रसिद्ध व्याख्या, तसेंच हिंदु महासभेची भूमिका पूर्णपणें राष्ट्रीय व स्वातंत्र्यवादी कशी आहे याचेंहि सविस्तर विवेचन समाविष्ट झालेलें आहे.]

* * *

जातीय व राष्ट्रीय यांतील अविरोध

अखिल भारतीय 'हिंदु महासभे'च्या ह्या १९ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावर माझी निवड व नेमणूक करून आपण मजवर जो विशेष विश्वास टाकिला आहे त्याकरितां प्रथमच मी आपले अत्यंत मनापासून आभार मानतों. माझ्या गतकालांतील सेवेच्या सन्मानार्थ म्हणून हें स्थान माझ्या राष्ट्रानें मला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समर्पिलें आहे असें तितकेंसें न मानतां, माझ्या अंगीं अद्यापिहि अुर्वरित असलेली सर्व शक्ति अखिल हिंदजगत् नी हिंदुस्थान—आपणां सर्वांची समान मातृभू नी समान पुण्यभू—यांच्या संरक्षणाचा आणि आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा नेटानें निकरानें पुढें रेटण्याच्या पवित्र कार्यीं अर्पिण्याची ही आज्ञा आहे असेंच मी मानतों. नुसतें हिंदूपुरतेंच सांगावयाचें झालें तर आमच्या जातीय नि राष्ट्रीय या दोन्ही प्रकारच्या कर्तव्यांत रतिमात्रहि भेद किंवा विरोध असणेंच शक्य नाहीं,—कारण हिंदुजगाचे सारे हितसंबंध अखिल हिंदुस्थानाच्या हितसंबंधांशीं पूर्णतः अेकरूपच आहेत. जोंपर्यंत आपली मातृभूमि स्वतंत्र झालेली नाहीं आणि जोंपर्यंत अेका प्रबल हिंदी राज्याच्या रूपाची स्थिरता तिला लाभलेली नाहीं—आणि तें हिंदी राज्यहि असें की ज्यांत आपले सर्व देशबांधव, मग ते कोणत्याहि धर्माचे वा पंथाचे वा वंशाचे असोत, पूर्ण समानतेनें वागविले जातील आणि प्रत्येकजण सर्वंच हिंदी राष्ट्राच्यासंबंधींचें आपापलें सर्वसामान्य ऋण व कर्तव्यें बजावीत आहे तोंवर कोणाचेंहि स्वातंत्र्य नागरिकत्वाचे न्याय्य व समान अधिकार ज्यांत बुचाडले जाणार नाहींत किंवा कोणालाहि दुसऱ्या कोणावर अन्याय्य अतिक्रमण करूं दिले जाणार नाहीं—तोंपर्यंत हिंदुसमाजाला आपल्या आयुष्याचें नियतकार्य प्रगत किंवा परिपूर्ण करतांच येत नाहीं. यास्तव कोणताहि हिंदु हिंदु म्हणून स्वतःशीं जितका प्रामाणिक असेल तितकेंच त्याला राष्ट्रीय म्हणूनहि प्रामाणिक राहिल्यावांचून गत्यंतरच नाहीं. माझ्या ह्या भाषणांत पुढें ही गोष्ट मी सिद्ध करणारच आहें.

ह्या दृष्टीच्या निश्चयात्मक विचारसरणीला अनुसरूनच हिंदु संघटनेच्या चळवळीच्या कांहीं मूलभूत गोष्टींचें ह्या महासभेच्या तत्त्वाप्रमाणें किंवा माझ्या समजुतीप्रमाणें मी माझ्या ह्या अध्यक्षीय भाषणांत मुख्यतः विवेचन करणार असून अितर बारीक सारीक नि आजूबाजूंच्या प्रश्नाचा विचार नि निर्णय ह्या अधिवेशनाला जमलेल्या आपणां प्रतिनिधींवरच सोपविणार आहे.

नेपाळच्या हिंदु राजाला अभिवंदन

पुढील अितर विवेचनाला प्रारंभ करण्याच्या पूर्वी अखिल हिंदु जगाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वतीनें नेपाळचे परमपूज्य राजे, नेपाळचे मुख्य प्रधान श्री युद्धसमशेर राणाजी आणि तेथील आपले सर्व सहधर्मी देशबांधव या सर्वांना आपलीं अेकनिष्ठ प्रेमाचीं अनेकानेक अभिवंदनें पाठविणें हें मी माझें महत्त्वाचें विहित कर्तव्य समजतों. कारण केवळ त्यांनींच आपल्या अितिहासाच्या ह्या पराकाष्ठेच्या अवनतीच्या काळांतहि अेक हिंदु राज्यसत्ता म्हणून टिकाव धरून राहण्यांत आणि हिंदु स्वातंत्र्याचा ध्वज हिमराजाच्या प्रोत्तुंग शिखरावर निष्कलंकपणें फडकत ठेवण्यांत महनीय यश संपादिलेलें आहे. नेपाळचें राज्य हें अेकच अेक हिंदुराज्य आज असें पृथ्वीच्या पाठीवर विद्यमान आहे कीं ज्याचें स्वातंत्र्य अिंग्लंड, फ्रान्स, अिटली नि अशींच अितर बलाढ्य राष्ट्रें यांच्याकडून मान्यता पावलें आहे.

महत्तर हिंदुस्थान

त्याचप्रमाणें आपल्या सहधर्मीय देशबांधवांपैकीं जे आफ्रिका, अमेरीका, मॉरिशस् नी असेच जगाचे अितर भाग यांतून जाअून तेथें कसलाहि गाजा-वाजा न करतां महत्तर हिंदुस्थानाची अुभारणी करीत आहेत आणि तसेच जे बलिद्विपांतल्याप्रमाणें अद्यापहि आपल्या हिंदुजातीच्या प्राचीन जागतिक साम्राज्याचे अभिमानास्पद अवशेष टिकवून धरून राहिलेले आहेत, त्यांहि सर्वांना सहानुभूतीचा नि प्रेमळ स्मृतीचा संदेश पाठविण्याचें हिंदु महासभेची ही बैठक विसरूं शकत नाहीं. त्यांचीं भाग्येंसुद्धा समग्र हिंदुजगाची ' पितृभू ' नी ' पुण्यभू ' असें जें हें आपलें भारतवर्ष त्याची स्वतंत्रता, सामर्थ्य नि महत्ता यांच्याशींच अविमोच्य रीतीनें बद्ध झालेलीं आहेत.

तद्वतच हिंदुस्थानांतीलच तथाकथित ' फ्रेंच हिंदुस्थान ' नी ' पोर्तुगीज हिंदुस्थान ' या भागांत राहत असलेल्या हिंदूंचाहि हिंदु महासभेला विसर पडणें शक्य नाहीं. खरोखर त्यांच्या त्या भागाचीं नांवें आमच्या कानांना घडधडीत मूर्खपणाचीं नी अत्यंत अपमानास्पद लागतात. आजच्या ह्या कृत्रिम नि बलात्कृत राजकीय विभागणीचा विचार अेकीकडे ठेवला तर आपण सर्व रक्त, धर्म नी देश यांच्या टिकाअू बंधांनीं अविभाज्य रीतीनें अेकत्र बांधले-लेच आहोंत. कांहीं झालें तरी आपण आपलें ध्येय म्हणून निश्चयपूर्वक घोषित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलेंच पाहिजे कीं, अुद्यांचा हिंदुस्थान हा काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत नी सिंधपासून आसामपर्यंत केवळ संयुक्त म्हणून नव्हे तर अभिन्न राष्ट्र म्हणून अेक अविभाज्यच राहिला पाहिजे. मी अशी आशा करतों कीं, अेकटी 'हिंदु-महासभाच'च नव्हे तर 'हिंदी राष्ट्रसभा' नी हिंदुस्थानांतील अितरहि तशाच राष्ट्रीय संस्था यांना गोमांतक, पांडेचरी नी तत्सम हिंदुस्थानचे अितर विभाग हे महाराष्ट्र वा बंगाल वा पंजाब यांच्यासारखेच आपल्या राष्ट्राचे दुसऱ्या कोणासहि तोडूं न देतां न येण्याजोगे नी अंगभूतच भाग आहेत असें सत्तेनें सांगण्याला यत्किंतहि संकोच वाटणार नाहीं.

हिंदूंचें अेकराष्ट्र

'हिंदु महासभे' चें नियतकार्य जें मी समजतों त्याप्रमाणें ती मुख्यत: अेक राष्ट्रीय सभाच आहे. ह्या माझ्या भूमिकेला कांहींजण अुगाच दोष लावतील, आणि 'जीवनाच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींतहि ज्यांच्यांत अतीव भेद आहेत त्या हिंदूंना मुळीं राष्ट्र म्हणून संबोधितांच कसें येअील ?' असा प्रश्नहि आव्हानपूर्वक मला विचारतील ! त्यांना माझें सरळ अुत्तर असें आहे कीं भाषा, संस्कृति, वंश नि धर्म यांविषयींची संपूर्ण अेकात्मता आढळेल अितकी समानता पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याच लोकांत नाहीं. कोणतेहि लोक त्यांच्या आपापसांतील विसंवादी भेदांच्या अभावामुळें राष्ट्र ह्या संज्ञेला तितकेसे कधींच पात्र होत नाहींत कीं जितके आपापसांतील भेदापेक्षांहि अितर लोकांशीं अधिक ठळक स्वरूपांत असणाऱ्या त्यांच्या भिन्नतेच्या योगें ते पात्र ठरतात. हिंदूंना राष्ट्र म्हणून संबोधण्याचें जे अमान्य करताता तेच ग्रेट–ब्रिटन, युनायटेड स्टेट्स रशिया, जर्मनी नि अितर लोक यांन मात्र राष्ट्रें म्हणून मानतातच ! त्यांना मी विचारतों- 'त्या लोकांना तरी जें स्वयमेव राष्ट्रें म्हणून लेखण्यांत येतें तें तरी कोणत्या कसोटीनें हो ?'

अेकसंध हिंदु

अुदाहरणार्थ, 'ग्रेट ब्रिटन'च घ्या. त्यांच्यामध्यें कांहीं झालें तरी तीन तरी भिन्न भाषा आहेत, त्यांच्यांत गतकालीं आपापसांतच भयंकर रणकंदनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालेलीं आहेत, त्यांच्यांत भिन्न बीजांचा नी रक्तांचा नी जातींचा संकर झाल्याचाहि सुगावा लागतोच. अर्थात् या सर्व गोष्टीं असतांनासुद्धां त्यांना सध्यां अेकदेश, अेकभाषा, अेकसंस्कृति नि अनन्य अशी पुण्यभूमि आहे. अेवढ्याच कारणाकरितां जर तुम्हीं त्यांना राष्ट्र म्हणून मानतां,—तर मग हिंदूनांसुद्धां हिंदुस्थान ह्या स्पष्टार्थवाचक नांवाची अनन्य अशी पितृभूमि आहे; जिच्यापासून त्यांच्या सर्व प्रचलित भाषा अुगम पावल्या व पुष्ट होत आहेत, जी आजहि त्यांच्या धर्मग्रंथांची नि वाङमयाची सर्वसाधारण भाषा म्हणून गणली जाते, आणि प्राचीन धर्मशास्त्रांची नी त्यांच्या पूर्वजांच्या अुक्तींचा पवित्रतम ठेवा म्हणून जिचा गौरव होत असतो ती संस्कृत ही समान अशी भाषा त्यांच्यापाशीं आहे; अनुलोम नी प्रतिलोम विवाहांच्या योगानें त्यांचें बीज नी रक्त मनूच्या कालापासून सतत परस्परांत संमिश्र होत आलेलें आहे, त्यांचे सामाजिक अुत्सव नि संस्कारविधि अिंग्लंडांत आढळतात त्यापेक्षां यत्किंचित्‌हि समानतेंत अुणें नाहींत; वैदिक ऋषि हा त्यांचा समान अभिमानविषय आहे; पाणिनि नी पतंजली हे त्यांचे व्याकरणकार, भवभूति नी कालिदास हे त्यांचे कवि, श्रीराम नी श्रीकृष्ण—शिवाजी नी प्रताप—गुरु गोविंद नी बंदा या त्यांच्या वीरविभूति हे सर्व त्यांच्या समान स्फुरणाचीं स्थानें आहेत; बुद्ध नी महावीर, कणाद नी शंकराचार्य हे त्यांचे अवतारी पुरुष नी तत्त्ववेत्ते समानतेनें सन्मानिले जातात; संस्कृत ह्या त्यांच्या प्राचीन व पवित्र भाषेप्रमाणेंच त्यांच्या लिपीहि अेकाच मूळानुसार वळविलेल्या आहेत नी ती त्यांची नागरी लिपि गतकालांतील कित्येक शतकांपासून त्यांच्या पवित्र लिखितांचें समान साधन होअून राहिलेली आहे, त्यांचा प्राचीन नी अर्वाचीन अितिहासहि अेकच आहे; त्यांचे मित्र नी त्यांचे शत्रूहि अेकच आहेत, त्यांनीं अेकाच आपत्तीशीं टकरा दिलेल्या आहेत नी अेकत्रच विजयहि मिळविलेलें आहेत; राष्ट्रीय वैभवांतहि अेक नी राष्ट्रीय अुत्पातांतहि अेकच राष्ट्रीय निराशांतहि अेक नी राष्ट्रीय आशाआकांक्षांतहि अेकच; अशा प्रकारें समान जीवनाचीं नी समान निवसनाचीं युगानुयुगें लोटून हिंदु हे परस्परांशीं अगदीं अेकसंधच होअून गेलेले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर्ण राष्ट्रीय दृष्टि

'हिंदु महासभा' काय साध्य करूं पाहत आहे तें पाहा. हिंदु जगाची राष्ट्रीय प्रतिनिधिभूत संस्था ह्या नात्यानें हिंदु लोकांचें सर्वांगीण पुनरुज्जीवन किंवा पुनर्घटना करणें हेंच तिचें साध्य आहे. परंतु हिंदुजगाचें तें सर्वांगीण पुनरुज्जीवन किंवा पुनर्घटना करणें हेंच तिचें साध्य आहे. परंतु हिंदु जगाचें तें सर्वांगीण पुनरुज्जीवन घडवून आणावयाला हिंदुस्थानच्या निर्भेळ राजकीय स्वातंत्र्याची अपरिहार्य आवश्यकता आहे. आम्हां हिंदूंचें भाग्य नी भवितव्य ह्या हिंदुस्थान देशाशीं आमच्या दुसऱ्या कोणत्याहि अहिंदु वर्गांतील देशबांधवां-पेक्षां अधिक अविमोच्य रीतीनें निगडित झालेलीं आहेत. सर्व दृष्टींनीं विचार करतां ज्याच्यावर स्वतंत्र हिंदी राज्याची अुभारणी करतां येणें शक्य आहे तो पायाचा खडक केवळ हिंदु हेच आहेत. पुढें कांहीं शतकांनीं काय व्हावयाचें असेल तें होवो, आज तरी हिंदुस्थानांतील लोकांच्या मनावर धर्मांचा प्रबळ पगडा वर्तत आहे आणि विशेषतः मुसलमानांच्या संबंधांत तर धर्मविषयक जिव्हाळा नेहमीं नाहीं तरी वारंवार माथेफिरूपणाच्याच मर्यादेला पोहोंचतो ही धडधडीत असणारी वस्तुस्थिति विचाराआड करून चालावयाचेंच नाहीं. मातृभूमि ह्या नात्यानें हिंदुस्थानाविषयीं मुसलमानांना वाटणारें प्रेम हें हिंदुस्थानाबाहेर असणाऱ्या त्यांच्या पुण्यभूमीविषयीं त्यांना वाटत असलेल्या प्रेमाच्या केवळ अेका बटिकीसारखेंच आहे. त्यांचीं तोंडें सर्वदा मक्का आणि मदिना यांच्यांकडेच वळलेलीं असतात. परंतु हिंदुस्थान ही हिंदूंची मात्र पुण्यभूअितकीच पितृभूहि असल्यामुळें त्यांच्या ठायीं हिंदुस्थानाविषयीं बसणारे प्रेम हें अखंडित नि अनिर्बंध असेंच आहे. हिंदी लोकसंख्येंत त्यांची फार मोठी बहुसंख्या आहे अितकेंच नव्हे, तर तेच सर्वथा देशकार्याचे खरे खरे नि फार काळापासूनचे विश्वसनीय असे कैवारी वीर आहेत.

मुसलमानांची बहिर्मुख दृष्टि

कोणताहि अेखादा मुसलमान घेतला तर त्याच्या ठायीं बहिर्देशीय राज्यनिष्ठाच वारंवार वागत असलेली आढळून येते. राष्ट्र ह्या नात्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानाशीं संबंध असणाऱ्या गोष्टीपेक्षांहि पॅलेस्टाअीनमधील घडामोडींनीं तो अधिक विचलित होतो, हिंदुस्थानांतील आपल्या शेजाऱ्यांच्या नि देशबांधवांच्या कल्याणापेक्षांहि अरबांच्या कल्याणाविषयींच्या चिंतनानेंच तो अधिक त्रस्त होतो ! ह्या भूमींत मुसलमानी राज्यसत्ता जर तेणेंकरून प्रस्थापित होण्याची शक्यताच असेल तर सहस्रो मुसलमान हिंदुस्थानावर परकीय स्वारी आणण्याच्या अुद्देशानें तुर्कस्थानांतील खिलाफतवाले नी अफगाण यांच्याशीं गुप्त कट रचीत असलेले आढळणें अगदीं शक्य आहे. परंतु तोच कोणताहि हिंदु मात्र हिंदुस्थान हेंच सर्वतोपरीं आपलें राष्ट्रीय अस्तित्व मानतो. ह्या देशावरील अिंग्लंडचें राजकीय अधिराज्य झुगारून देण्याकरितां चाललेल्या झगड्यांत हिंदूंचेंच जें प्रामुख्य आहे त्याचें हेंच कारण होय.

भौगोलिक दृष्टि अपुरी

नुसतें भौगोलिक दृष्ट्याच बोलावयाचें तर, अेखाद्या अल्लाअुद्दीन खिलजीचें किंवा औरंगजेबाचें राज्य चालू असतें वेळीहि दुसऱ्या कोणत्याहि अहिंदु सत्तेपासून भूमि व राज्य या नात्यांनी हिंदुस्थान पूर्णपणें स्वतंत्रच होतें. परंतु हिंदुस्थानचें त्या प्रकारचें स्वातंत्र्य हें हिंदु राष्ट्राला खरें खरें मृत्यूचेंच आज्ञापत्र ठरलें. संग आणि प्रताप–गुरु गोविंदसिंह नी वीर बंदा,–शिवाजी नि बाजीराव आपल्या या मातृभूमींत सर्वत्र जे लढले नी पडले नी अंतीं जयहि पावून मराठ्यांच्या नी रजपूतांच्या नी शीखांच्या नी गुरख्यांच्या सत्तेखालीं हिंदु साम्राज्याची प्रस्थापना करते झाले नो अहिंदु अतिक्रमणाच्या मुठींतून आपलें हिंदु-जगत् रक्षिते झाले ते ह्याच कारणानें होत. यावरून हिंदुस्थानचें निव्वळ भौगोलिक स्वातंत्र्य नव्हे; अितकेंच नव्हे, तर अुलट केव्हां केव्हां त्यांच्या जातीला तें दारुण शापच ठरतें असेंच स्पष्ट होत नाहीं काय ?

पूर्वजांशीं नातें

हिंदुस्थान हें हिंदुजातीचें आरंभापासून आजपर्यंतचें निवासस्थान आहे, ती आमच्या धर्मप्रवर्तक ऋषिमुनींची नी वीरपुरुषांची, नी देवांची नी संतमहंतांची जन्मभूमि आहे. ह्याच कारणानें तें आम्हांला प्रिय आहे. नाहीं तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केवळ भूमीस भूमि अेवढ्यापुरताच विचार करावयाचा तर पृथ्वीच्या पाठीवर सोन्यारुप्यानें अितकेच संपन्न असलेले पुष्कळ देश असतील.नुसतें नदीला नदी अितकेंच पाहावयाचें तर मिसिसिपी हीहि जवळजवळ गंगेअितकीच निर्मळ आहे आणि तिचें पाणीहि कांहीं अेकंदरीनें कडवट नाहींच. हिंदुस्थानांतील दगड नी झाडें नी हिरवळी हीं अितर देशांतल्या त्या त्या जातीच्या दगड नी झाडे नी हिरवळी अितकींच अुत्कृष्ट वा निष्कृष्ट ठरतील.हिंदुस्थान हें जी आमची पितृभू नि पुण्यभू आहे ते कांहीं पृथ्वींतल्या दुसऱ्या कोणत्या भूमीहून पूर्णपणें विसदृश भूमि आहे म्हणून नव्हे, तर त्याचा आमच्या अितिहासाशीं जिव्हाळ्याचा संबंध आहे आणि ते आमच्या वाडवडिलांचें पिढ्यानुपिढ्यांचें घर आहे—कीं ज्यांत आमच्या मातांनीं पिढीपिढीला आपल्या हृदयांशीं धरून आम्हांला पहिलें स्तन्य पाजलें नी आमच्या पित्यांनीं आपल्या मांड्यांवर घेअून आम्हांला थोपटलें या कारणामुळेंच होय.

निव्वळ भूगोलावरील 'हिंदुस्थान' नांवाच्या अेका मातीच्या तुकड्याचें स्वातंत्र्य हा कांहीं स्वराज्याचा खरा अर्थ नव्हेच. हिंदूंना त्यांचें हिंदुत्व—त्यांची धार्मिक नी वांशिक नी सांस्कृतिक अेकात्मता—अबाधित राहण्याची शाश्वती जर त्यांत असेल तर तेंच हिंदुस्थानचें स्वातंत्र्य, काय तें मोलाचें वाटू शकेल. आमच्या 'स्वत्वा'चें-आमच्या साक्षात् 'हिंदुत्वा'चें-मोल देअूनच जें मिळणें शक्य असेल त्या तसल्या 'स्वराज्या'-करितां झगडण्याला नी मरण्याला आम्हीं सिद्ध नाहीं !

संयुक्त हिंदी राज्य

ह्या योग्य नी खऱ्या अर्थाचें जर स्वराज्य अभिप्रेत असेल तर हिंदी स्वातंत्र्याकरितां चाललेल्या चळवळींत नी झगड्यांत आणि अेक संयुक्त हिंदी राज्य स्थापण्याच्या कार्यांत हिंदु सर्वांच्या पुढें आघाडीवरच राहत आले आहेत. संयुक्त हिंदी राज्याचें स्वप्न जर पहिल्यानें कोणाला पडलें असेल तर ते त्यांनाच होय. आपल्या त्यागांनीं नी झगड्यांनीं तें राज्य कोणीं आजच्या

(सा....२५)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवहार्य राजकारणाच्या कक्षेंत आणलें असेल तर तेंहि पुन: हिंदूंनींच होय. आपल्या बलाबलाचा योग्य विचार करून हिंदु हे अेक समान नी संयुक्त हिंदी राज्य स्थापण्याच्या हेतूनें चाललेल्या ह्या सार्वलौकिक झगडयांत आपल्या अहिंदु वर्गांतील देशबांधवांची सहकारिता मिळविण्याला केव्हांहि अनुकूलच होते व आहेत. हिंदुस्थानांत आपली प्रचंड बहुसंख्या आहे. अितर अहिंदु वर्ग नि विशेषत: मुसलमान हे राष्ट्रीय झगडा चालू असतांना कोठेंच आढळत नाहींत नि त्या झगडयाचीं फळें तोडण्याच्या वेळीं मात्र नेमके आघाडीस असलेले आढळतात, आणि आपण अेकटेच आजवर सर्व लढा लढत नी त्यांतले आघात सोशीत आलों आहोंत-या सर्व गोष्टींची जाणीव असूनसुद्धां तें अेकीकडे ठेवून हिंदु हे सार्वलौकिक संयुक्त हिंदी राष्ट्र बनविण्यास समुत्सुक आहेत आणि आपले कोणतेहि राखून ठेविलेले असे स्वतंत्र हक्क वा सत्ता वा अधिकार हिंदुस्थानांतील अहिंदु वर्गावर मुळींच लादूं अिच्छीत नाहींत.

आमचा राजकीय आदर्श

पण तें हिंदी राज्य मात्र निर्भेळ हिंदीच असूं द्या. त्या राज्यानें मताधिकार, नोकऱ्या, हुद्दे, कर यांच्यासंबंधांत धर्माच्या व जातीच्या तत्त्वावर कसल्याहि मत्सरोत्तेजक भेदाभेदांना मुळींच थारा देअू नये. कोणताहि मनुष्य हिंदु आहे कीं मुसलमान आहे कीं ख्रिस्ती आहे कीं ज्यू आहे अिकडे लक्षच जाअूं नये. त्या हिंदी राज्यांतील सर्व नागरिक, सर्वसामान्य लोकसंख्येंतील त्यांची धार्मिक किंवा जातीय शेंकडेवारी विचारांत घेतली न जातां त्यांच्या त्यांच्या वैयक्तिक गुणावगुणानुसार वागविले जाअूं द्या. अिंग्लंड किंवा अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें यांसारख्या जगांतील अितर प्रत्येक राष्ट्रांत असते त्याप्रमाणें देशांतील प्रचंड बहुसंख्य लोकांना समजत असेल तीच भाषा नी तीच लिपी त्या हिंदी राज्याची राष्ट्रीय भाषा नी राष्ट्रीय लिपी होअूं द्या. आणि कोणत्याहि लादलेल्या नी वेडयावांकडया संकरानें ती भाषा नी ती लिपी भ्रष्ट करण्याला कोणत्याहि धार्मिक कारणाला मोकळीक न मिळूं द्या. कोणतीहि जाति किंवा पंथ, वंश किंवा धर्म विचारांत न घेतां 'अेक **मनुष्य,**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अेक मत ' असा सर्वसामान्य नियम होअूं द्या. अशा स्वरूपाचें हिंदी राज्य जर दृष्टीपुढें धरावयाचें असेल तर हिंदुसंघटनावादी स्वत: हिंदुसंघटनाच्याच हितार्थ त्या राज्याला अंत:करणपूर्वक पहिल्यानें आपली निष्ठा अर्पितील. मी स्वत: आणि मजप्रमाणें सहस्त्रों ' हिंदु महासभा 'वाले यांनीं आपल्या राजकीय चरिताच्या प्रांरभापासून अशा हिंदी राज्याचा आदर्श आमचें राजकीय साध्य म्हणून सतत दृष्टीपुढें ठेविलेला आहे आणि आमच्या जीविताच्या अंतापर्यंत त्याच्या परिपूर्तिकरितां झगडण्याचें आम्हीं चालूंच ठेवणार. हिंदी राज्या-संबंधींची ह्याहून अधिक राष्ट्रीय अशी कोणती कल्पना असूं शकेल काय ?

खरें राष्ट्रियत्व

न्यायदेवतेच्या आज्ञेनें मी असें स्वच्छपणें घोषित करतों कीं, हिंदी राज्यासंबंधीचें ' हिंदु महासभे 'चें नियत कार्य नी धोरण हीं प्रत्यक्ष ' हिंदी राष्ट्रीय सभे 'च्या सद्य:कालीन धोरणाहून अधिक राष्ट्रीय आहेत.

मुसलमानांचे अराष्ट्रीय बेत

हिंदूंच्या सद्भाग्यानें म्हणा, मि. जिना व अितर ' मुस्लिम लीग ' वाले यांनीं ह्या वर्षीं ' मुस्लिम लीग'च्या लखनौ येथील बैठकींत जाणून बुजूनच आपले खरे अंत:स्थ हेतु ह्यापूर्वींपेक्षां अधिक अधिकृतरीत्या, अधिक अुघड-पणें नि अधिक धिटाअीनें बोलून दाखविले आहेत. त्याकरितां मी त्यांचे आभार मानतों. संगतींत वागतांना अेखाद्या संशयास्पद मित्रापेक्षां अुघड शत्रू अधिक पुरवतो. लखनौस झालेले त्यांचे ठराव वस्तुत: आम्हांस कांहीं नव्या वार्तेसारखे वाटणारे नाहींत, पण मुसलमानांची अराष्ट्रीय प्रवृत्तींनीं त्यांच्या ' सर्व-मुस्लिमीकरणा'च्या आकांक्षा सिद्ध करण्याचा भार आतां-पर्यंत अुणाअधिक हिंदूवरच जो होता त्याचें आयतेंच काम झालें. आतां मुसलमानांच्या त्या सर्व हिंदूविरोधी, हिंदी-विरोधी नि बहिर्देशीय कारवाया स्पष्ट करून सांगण्याकरितां नुसतें लखनौच्या बैठकींत करण्यांत आलेल्या लीगच्या अधिकृत भाषणांकडे नी ठरावांकडे बोट दाखविलें कीं झालें. त्यापेक्षां आपल्याला अधिक कांहींच करावयाला नको. त्यांना निर्भेळ अुर्दू हीच हिंदी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्याच्या राष्ट्रभाषेच्या पदवीला चढविली जावयाला पाहिजे आहे. राष्ट्रीय लिपीच्या संबंधांतहि अुर्दू लिपीच स्वीकारण्याविषयीं मुसलमानांचा आग्रह आहे. आणि कांहीं झालें तरी नागरी लिपीशीं मात्र त्यांना कर्तव्य नाहीं ! असें कां ?

‘ वंदे मातरम् ’ चें वावडें.

आजच्या गरजेला लागू न पडणारीं म्हणून केमालनें प्रत्यक्ष अरबी लिपीचा त्याग केलेला असो; नागरी अधिक सशास्त्र नि अधिक मुद्रणक्षम असो, ती शिकावयाला अधिक सोपी असो, हिंदुस्थानांतील सुमारें पंचवीस कोटि लोकांत ती आधींच प्रचलित असो किंवा त्यांना आधींच ती समजत असो,-तरीसुद्धां मुसलमान आपली सांस्कृतिक मत्ता म्हणून मानतात अेवढ्याच अेका गुणाकरितां अुर्दू लिपी हीच राष्ट्रलिपी नि अुर्दू भाषा हीच राष्ट्रभाषा झाली पाहिजे ! मुसलमानांना ‘ वंदे मातरम् ’ गीतहि सहन होअीनासें झालें आहे. काटाकाट करून ठेवलेला त्याचा भागहि मुसलमान सहन करतील असें नाहीं. तुम्हीं तें संबंध गीत गाळून टाका, कीं लागलीच नुसतें ‘ वंदे मातरम् ’ हे शब्दसुद्धां मुसलमान आपला मूर्तिमंत अपमान असल्याची हाकाटी करतांना तुम्हांला आढळतील ! अेखाद्या अत्युदार अशा रवींद्राकडूनहि अेखादें नवीन गीत रचून घ्या, पण तरीहि मुसलमानांचा त्यांच्याशीं कांहींहि संबंध असणार नाहीं. कारण किती झालें तरी रवीन्द्र हा हिंदु माणूस पडल्यामुळें ‘ कअुम् ’ च्या ठिकाणीं ‘ जति ’ किंवा ‘ पाकस्तान ’ च्या ठिकाणीं ‘ भारत ’ वा ‘ हिंदुस्थान ’ असे कांहीं संस्कृत शब्द वापरण्याचा घोर अपराध तो केल्यावांचून राहणें शक्य नाहीं ! अेखाद्या अिक्बालनें किंवा जिनानेंच स्वतः निर्भेळ अुर्दूंत रचिलेलें नि हिंदुस्थानाला अेक ‘ पाकस्तान ’- मुस्लिम अधिराज्याला अर्पिलेली भूमि—म्हणून जयजयकार करणारें असें अेखादें राष्ट्रगीत सिद्ध झाल्यावांचून त्यांचें समाधान होणें शक्य नाहीं !

दोन राष्ट्रांचा लढा

मुसलमानांच्या ह्या असंतोषाच्या मुळाशीं असलेला खरा प्रश्न अिक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ङचा अेखादा शब्द किंवा तिकडचें अेखादें गीत अशा प्रकारचा नाहीं हें आमच्या अैक्यबुभुक्षितांना ओळखणार तरी केव्हां ? हिंदुस्थानच्या अैक्यांत नी वीरवृत्तींत जर त्यायोगें आमच्याकडून खरी खरी भर पडूं शकती तर आम्हीं बारा गीतें नी शंभर शब्द यांचा आपण होअून त्याग केला असता. पण हा दिसतो तितका साधासुधा प्रश्न नाहीं हें आम्हीं ओळखतों. दोन विभिन्न संस्कृति नी वंश नी राष्ट्रें यांच्यांतला हा लढा आहे आणि या क्षुल्लक गोष्टी म्हणजे मुसलमानांच्या मनांत खोल मुरलेल्या त्या रोगाची केवळ वरवरचीं नी ओझरतीं लक्षणें आहेत. त्यांना हिंदुजगत् नि हिंदुस्थानांतील अितर मुसलमानेतर वर्ग यांच्या कपाळावर आत्मशरणागतीची नी मुस्लीम वर्चस्वाची तप्तमुद्राच ठोकावयाची आहे. पण आम्हीं हिंदु केवळ हिंदुजगाच्या हितार्थंच नव्हे तर हिंदी राष्ट्राच्या हितार्थसुद्धां ती गोष्ट यापुढें यत्किंचित्‌हि सहन करणार नाहीं.

मापास माप

आम्हीं ती गोष्ट सहन केली नाहींतर आमचें काय होअील तें नामदार फझलुल हक्कांनीं लखनौलाच तेथल्या तेथें सांगूनहि टाकिलें ! ' मुख्य मंत्र्या 'च्या गादीच्या अुच्च अुंचीवरून त्यांनीं अुघडपणें आश्वासन दिलें आहे कीं, जर अितर हिंदूंनीं अितर कोठें ' मुस्लिम लीग ' च्या आज्ञा प्रतिधिटाअीनें धाब्यावर बसविल्याचें आढळलें तर आपण बंगालांतील हिंदूंना ' सतावूं ' (–' **मैं हिंदूओंको सताअूंगा** '). वास्तविक बंगालमधील मुख्य मंत्र्याची ती गादी म्हणजे बंगालमधील हिंदु देशभक्तांनींच आपल्या हौतात्म्यानें नि त्यागानें अिंग्रजांच्या हातांतून झगडून घेतलेल्या सुधारणांचें फल आहे. अितर ठिकाणच्याप्रमाणेंच तेथील मुसलमानांनीहि हालअपेष्टांत नी त्यागांत कांहीं विशेष भाग किंवा भार अुचललेला नाहीं. पण सुधारणा येअून प्राप्त होतांच मुख्य मंत्र्याच्या गादीला मात्र कोण पात्र ठरूं नी ती बळकावूं शकला ? तर नामदार फजलुल हक्क ! आणि जे सर्वांत अधिक झगडले नी ज्यांनी सर्वांत अधिक हालअपेष्टा सहन केल्या नी खरोखरच मि. हक्कांची गादीहि ज्यांच्या हालअपेष्टांचेंच ऋण आहे, त्या बंगाल्यांतल्या हिंदूंनाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां ते मि. हक्क साधा त्रास देण्यापासून तों पूर्ण चेपून टाकण्यापर्यंत सब छटांच्या अर्थानीं आपण ' सतावूं ' (–' सतायगा '–) म्हणून धमकी घालीत आहेत ! नामदार फझलूल हक्क यांना मी असें निश्चितीनें सांगूं अिच्छितों कीं, बंगालमधील हिंदु फुटण्याला फार कठिण कवचीचे ठरतील, त्यांचें काम फार बिकट आहे. त्यांनीं केव्हां केव्हां बलाढ्य ब्रिटिश सम्राटाच्याहि लॉर्ड कर्झनसारख्या घोड्यावर चढलेल्या पुरोधिकाऱ्यांना खालीं अुतरावयास लाविलेंलें आहे ! पण जर फझलूल हक्कांनीं बंगाली हिंदूंचा कधीं छळवाद आरंभिलाच, तर आम्हीं हिंदूंहि महाराष्ट्रांत नि अितरत्रहि पुरतें कांठोकांठ नी हलवून भरलेलें मापास माप ह्या न्यायानें त्यांच्या जातभाअींना तसेंच वागवूं शकूं हें त्यांनीं कदापि विसरूं नये !

मातृभूमीची चीरफाड

' जातीय निवाडा ' (कम्युनल अवॉर्ड) नि ' संयुक्त राजघटना ' (फेडरेशन) यांच्या संबंधांतल्या मुसलमानांच्या प्रवृत्तीचा मला येथे निर्देश करण्याची आवश्यकता नाहीं. त्या संबंधांतहि हिंदूंना पूर्ण नमविण्याचा त्यांचा विचार आहे नी शायलॉकसारखा शेरभर मांसाचा ते हट्ट धरीत आहेत ! मी तुम्हांला भाराभर आंकड्यांनीं हैराण करूं अिच्छित नाहीं. ते तुम्हां सर्वांना पाठच आहेत. काश्मीर, पंजाब, पेशावर नी सिंध या प्रांतांचा मिळून ' पाकस्थान ' नांवाचा अेक निराळा मुसलमानी देश बनविण्याच्या हेतूनें ' मुसलमानी हिंदुस्थान ' नि ' हिंदु हिंदुस्थान ' असे आपल्या मातृभूमीच्या **राज्यमंडळाचे दोन तुकडे** पाडण्याच्या मुसलमानांच्या मागणीसंबंधींच्या निर्लज्ज नी धाष्टर्याच्या सूचनेवर ' मुस्लिम लीग ' मध्यें जो वादविवाद झाला त्याचीच तुम्हांला आठवण करून दिली कीं पुरे आहे.

खरी अेकी केव्हां होअूं शकेल ?

हिंदूंच्या हें ध्यानांत येअूं द्या कीं, ह्या खोडसाळपणाचें खरें कारण दुसरें तिसरें कोणतें नसून हिंदु–मुस्लिम–अैक्यरूपी पिशाच्चदीपिके (' वुईलो––द–विस्प ') च्या मागें लागण्याचा हिंदूंनाच लागलेला सोस हेंच होय. ज्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिवशीं आपण "मुसलमानांनीं हिंदूंशीं सहकार्य करण्याचा अुपकार केल्या-वांचून स्वराज्य मिळूं शकणार नाहीं" अशी त्यांची समजूत करून दिली त्याच दिवसापासून आपण सन्मान्य अैक्य अशक्य करून बसलों आहोंत.

हिंदूंनीं आतां अेकदांचें रोखठोख सांगून टाकून त्यांची ती धमकी गप्प करावी कीं– "मित्रहो ! आम्हांला केवळ त्याच प्रकारची अेकी पाहिजे होती नी पाहिजे आहे कीं, जिच्या योगानें ज्यांत जाति वा पंथ वा वंश वा धर्म यांचा विचार न करतां सर्व नागरिक 'अेक माणूस, अेक मत' ह्या तत्त्वावर समसमान रीतीनें वागविले जातील असें हिंदी राज्य निर्माण होअील." आमची ह्या देशांत जरी प्रचंड बहुसंख्या असली तरी हिंदुजगा-करितां आम्ही कोणतेहि विशेष अधिकार मागत नाहीं; अितकेंच नव्हे, तर जर आपापल्या घरांतून आपापले मार्ग अनुसरण्याचा हिंदुस्थानांतील अितर जातींच्या समान स्वातंत्र्यांत ढवळाढवळ करणार नाहीं.

"कोरे कागद" संपले

अलिकडे आक्रमक नी संरक्षक संधींनीं परस्परांशीं बांधल्या गेलेल्य अरबस्थानपासून अफगाणिस्थानापर्यंतच्या मुसलमान राष्ट्रांची सांखळी जोडून सर्व अिस्लामीकरणाच्या चळवळीच्या चालू असलेल्या हिंदविरोधी योजना आणि धार्मिक नि सांस्कृतिक द्वेषानें हिंदूंना चिरडण्याच्या वायव्य सीमेवरील टोळ्यांच्या क्रूर प्रवृत्ति आम्ही हिंदू पुरेपूर ओळखून असल्यामुळें आम्ही अितःपर केव्हांहि तुमच्यावर विश्वास टाकून आणखी कोणते 'कोरे कागद' तुम्हांला देणार नाहीं. अितर सर्व घटकांच्या 'स्वत्वा' सवेंच आमचें 'स्वत्व' हि ज्यांत सुरक्षित राहील तें स्वराज्य जिंकून घेण्याला आम्ही सन्नद्ध झालों आहोंत. केवळ अेक धनी जाअून दुसरा धनी यावा म्हणून कांहीं अिंग्लंडशीं झुंज खेळण्याला आम्ही अुद्युक्त झालेलों नाहीं, तर आमच्या स्वतःच्या घराचे आम्ही स्वतःच धनी झालों पाहिजे हाच आम्हां हिंदूंचा रोख आहे. आमच्या शरणागतीवर नी स्वतः हिंदुत्वाचेंच मोल देअून जें मिळूं शकणार असेल तें तसलें स्वराज्य आम्हां हिंदूंना आमच्या आत्महत्ये-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारखेंच आहे. परकीय अधिराज्यांतून जर हिंदुस्थान स्वतंत्र झालें नाहीं तर हिंदी मुसलमानांना स्वत: दास होण्यावांचून गत्यंतर नाहीं. जर त्यांना ह्या गोष्टीची सत्यता पटेल, जर नि जेव्हां हिंदूच्या साहाय्यावांचून ना सदिच्छेवांचून आपलें चालणार नाहीं हेंहि त्यांना कळून येईल, तर त्यांनाच त्या वेळीं अैक्याची मागणी करण्याला नी तेहि हिंदूंवर अुपकार करण्याकरितां म्हणून नव्हे तर स्वत:च्याच अुपकाराकरितां येअूं द्या. अशा प्रकारें जें हिंदु-मुस्लिम अैक्य घडून येईल तेंच मोलाचें होय. मागें लागून अैक्य मिळविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे तें गमावणेंच आहे हें ह्या प्रकरणांत हिंदूंना भरपूर मोल जाअून पटलेलें आहे. यापुढें हिंदु-मुस्लीम अैक्यासंबंधींचें हिंदूंचें सूत्र हेंच राहणार कीं— " याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावांचून, विरोधाल तर तुमच्या विरुद्धहि, हिंदु राष्ट्र आपलें भवितव्य बनेल तसें घडवील ! "

मी हिंदूंना बजावून सांगतों कीं, जर नी जेव्हां अिंग्लंडची सत्ता निघून जाईल तर नी तेव्हांहि मुसलमान हे आपल्या हिंदु राष्ट्राला नि समान हिंदी राष्ट्राच्या अस्तित्वाला मोठेंच धोक्याचें ठरण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांत मुस्लिम राज्य स्थापण्याच्या धर्मवेडचा योजना मनांत काळजीपूर्वक पोसण्याचें त्यांचें सबंध जातीचेंच अद्यापिहि चालूच आहे. ह्या वस्तुस्थितीची आपण आंधळे दगड बनून अुपेक्षा करतां कामा नये. आपण अेकतेकरितां झटूं या, आपण चांगल्याचीच आशा धरूं या, पण त्याच वेळीं आपण आपल्याविषयीं दक्ष नि सावधहि असूंच या !

हिंदूंनीं स्वत:पुरताच विचार करावा, आपल्या स्वत:च्या पायावर अुभें रहावें आणि अिंग्रजांच्या वा मुसलमानांच्या अितर वा कोणाच्याहि असो, कोणत्याहि अहिंदूंच्या जोखडापासून हिंदुस्थानची मुक्तता करण्याकरितां आपल्या सर्व शक्तींनिशीं अेकाकी लढावें.

हिंदुत्वाचा अभिमान धरा

हें अंतिम ध्येय दृष्टीपुढें ठेवून मी तुम्हां सर्वांना अुपदेशितों कीं, तुम्हीं ठासून आपण हिंदु आहों म्हणून सांगत चला ! क्षमायाचकाची वा शरमिंधे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पणाची वृत्ति पार नाहींशी करून टाका; कारण तिच्या योगेंच आपल्यापैकीं कित्येकांना हिंदु म्हणून सांगण्याची लाज वाटते. जणूं काय ती म्हणजे कांहीं अराष्ट्रीयच गोष्ट आहे किंवा श्रीराम नी श्रीकृष्ण–शिवाजी नी प्रताप नी गोविंदसिंग यांच्या परंपरेंत जन्मास येणें म्हणजे मोठा कलंकच आहे ! आपणां हिंदुनासुद्धां ह्या सूर्यमालिकेंत आपला स्वतःचा असा देश असलाच पाहिजे आणि त्यांत हिंदु म्हणून–अेका बलाढच नी प्रतापी लोकांचे वंशज म्हणून अविच्छिन्नपणें आपण नांदलेंच पाहिजे.

शुद्धीचें केवळ मार्मिक दृष्टचाच महत्त्व आहे असें नाहीं, तर राजकीय दृष्टचाहि ती तितकीच महत्त्वाची आहे ! संघटनाला अुचलून धरा. तें साधण्याकरितां आपल्या गतकालांतील प्रयत्नांनीं जी कांहीं राजकीय सत्ता प्रचलित सुधारणानिर्बंधाच्या रूपानें आपण पिळून घेतली आहे, ती हस्तगत करणें आपणां हिंदूंचें केवळ कर्तव्यच आहे. मुसलमान लोक जो अुघडपणें नी धिटाअीनें त्यांच्या रक्षणाची आणि मुसलमानांकरितां अति-क्रमण करूनसुद्धां अधिक अधिकार मिळवून देण्याची हमी देतो त्यांनाच मतें देतात. पण आम्हीं हिंदू मात्र जे आपण हिंदूहि नाहीं, मुसलमानहि नाहीं असें अुघडपणें घोषित करतात नि तरीसुद्धां मुसलमानांच्या संघ-टनांना मान्यता देअून त्यांच्याशीं व्यवहारहि करतांना कधींहि त्रासत नाहींत, आणि हिंदूंच्या नांवानें हिंदूंच्या हितसंबंधांना नित्य विघातक अशा तडजोडी करून हिंदूंची असह्य मानखंडना करतात–त्यांनाच मतें देण्याची आत्मघातकी घोडचूक करतों. तुम्ही यापुढें आपल्या मतांचा दुरुपयोग करतां कामा नये. तुम्ही यापुढें त्यांनाच मतें दिलीं पाहिजेत की, ज्यांना आपण हिंदू असल्याविषयीं लाज वाटणार नाहीं, जे अुघड अुघड हिंदूकरितांच अुभे राहतील आणि हिंदूंची मत्ता विकून अेखाद्या अपमानास्पद अैक्याच्या क्षुद्र दैवतापुढें धूप जाळणार नाहीं: अशा वचनानें आपल्याला बांधून घेतील. ‘ वर्णाश्रम स्वराज्य संघ ’ हिंदु महासभा ’ ‘ शिरोमणी शीख सभा ’ तसेच आर्यसमाजी, महाराष्ट्रांतला ‘ लोकशाही स्वराज्य पक्ष’ या सारख्या सन्मान्य अैक्य नि खरेंखरें राष्ट्रीय हिंदी राज्य याचा पक्ष घेणाऱ्या राजकीय संस्था,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि हिंदुत्वावर अधिष्ठित असलेले मोठमोठे आश्रम नि संघ नि जातीय सभा या सर्वांचा मिळून विधिमंडळांत अेक '**संयुक्त हिंदु पक्ष**' अुभारला जाअू द्या आणि अेकाहि हिंदूचें मत संघटनी नसणाऱ्या माणसाला कदापिहि न मिळूं द्या.

असें झालें म्हणजे मुसलमान मंत्रिमंडळें ज्याप्रमाणें त्यांच्या हिताकरितां झटत आहेत तशीं तुमचींहि मंत्रिमंडळें हिंदु राष्ट्राच्या न्याय्य कार्याचा कैवार घेअून अुठूं लागलेलीं तुम्हांला आढळतील. हाच अेक अुपाय आपल्या हिंदु राष्ट्राचेंच नव्हें तर आगामी हिंदी राज्याचें तारण करील.

पौरुषशाली हिंदूंचें दार्ढ्य

आतां सरतेशेवटीं, अहो हिंदुबांधवहो ! मी तुम्हांला निश्चितीनें सांगतों कीं, जर तुम्हीं आपल्या ठिकाणचा आत्मविश्वास गमावला नाहींत आणि वेळीं अुठून कामाला लागलांत तर तुमचें गमावलेलें सर्व तुम्हांला पुनः परत मिळेल. तुमच्या वंशांत आनुवंशिकच असें कांहीं पौरुष नि चिकाटी आहे, कीं, जगाच्या अितिहासांत त्यांना फारच थोडी जोड आढळेल. तुमच्या चरितांच्या पौराणिक नि प्रागैतिहासिक काळांत तुम्ही पराभूत करून धुळीस मिळविलेले दैत्य नि असुर सोडून द्या, पण तरीसुद्धां तुमचा साक्षात् अितिहास ख्रिस्तपूर्व सुमारें दोन सहस्र वर्षांपासून चालूं होतो ! सृष्टीमध्यें जो भयंकर नि प्रचंड जीवनकलह अखंडपणें चालू आहे त्यांत सर्वसमर्थ असतो तोच जगतो हाच नियम आहे. अिकास नि फाराव्ह नी नेबुखडनेझार यांच्यासारख्या बलाढ्यांचीं राष्ट्रें केव्हांच धुळीस मिळालीं नी त्यांचा पाठीमागें मागमूससुद्धां राहिला नाहीं. परंतु तुम्ही जे त्या राष्ट्रीय प्रळयांतून टिकून अद्यापपर्यंत जिवंत राहिला आहां तें तुम्ही टिकण्याला सर्वांत समर्थ होतां म्हणूनच होय. प्रत्येक राष्ट्राच्या आयुष्यक्रमांत चढ नि अुतार हे असतातच. आज जें अेका साम्राज्यावर सत्ता चालवीत आहे तें प्रत्यक्ष अिंग्लंड हें अनेक वेळां रोमन, डेन्स, डच नि नॉर्मन यांच्या सहज भक्ष्यस्थानीं पडलेलें होतें. आपणांला मोठमोठ्या राष्ट्रीय अुत्पातांना तोंड द्यावें लागलेलें आहे. पण प्रत्येक वेळीं आपण वर अुठलों आणि त्या अुत्पातांना मागें हटविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा अितिहास स्मरा.

प्रतापी शिकंदराच्या आधिपत्याखालीं ग्रीक लोक सर्व जग पादाक्रांत करीत आले, पण हिंदुस्थान कांहीं ते जिंकूं शकले नाहींत. तेव्हां चंद्रगुप्त अुठला आणि सामरिक नि सांस्कृतिक दोनहि प्रकारचे पुरेपुरे पराभव देअून आम्हीं ग्रीकांना मागें हांकून लावलें. पुढें तीन शतकांनीं अेकाद्या हिमलोटा-प्रमाणें हूण आमच्यावर चालून आले. सर्व युरोप नि अर्धा आशिया त्यांच्या पायांशीं नम्र होता, त्यांनीं रोमन साम्राज्याचे तुकडे तुकडे केले. पण सुमारें दोन शतकें त्यांच्याशी निकराची झुंज करून शेवटीं महाराज विक्रमादित्यांच्या आधिपत्याखालीं आम्हीं त्यांचा पूर्ण पाडाव केला. शकांनाहि कांहीं अधिक चांगला अनुभव आला नाहीं. शालिवाहन आणि यशोधर्मन यांच्या पराक्रमी बाहूंनीं त्यांना पुरें पिंजून काढलें. ते हूण नि ते पार्थियन नी ते शक हे आपले तेव्हांचे शत्रू आज कोठें आहेत ? त्यांचीं नांवें विसरलीं गेलीं आहेत ! गेले, हिंदुस्थानच्या नी जगाच्याहि दृष्टीपुढून पार पुसून गेले. आमच्या वंशाचें पौरुष नि दाढर्च हीं मात्र त्या सर्वांवर विजय मिळवितीं झालीं.

दिल्लीच्या तख्ताचा चुराडा

त्यानंतर कांहीं शतकांनीं मुसलमानांनीं हिंदुस्थानावर धांवणी केली आणि पुढें दिसलें तें तें सारें लुटून नेलें. त्यांचीं राज्यें नि साम्राज्यें वर्चस्वानें राज्य करतांना दिसलीं. पण पुन: आम्ही अेकत्र झालों आणि शिवाजीच्या जन्मापासून पुढें सतत युद्धाचा देवच आमचा कैपक्षी झाला. लढायांमागून लढाया देअून आम्हीं मुसलमानांना शेकडों रणक्षेत्रांतून मार दिला; त्यांचीं राज्यें नि साम्राज्यें, त्यांचें नबाब नि शहाबादशहा यांना आमच्या वीर योद्धयांनीं गुडघे टेकीत शरण आणले, आणि शेवटीं हिंदूंचें मुख्य सेनापति भाअूसाहेब यांनीं जणूं काय प्रतीकार्थच आपला घण अुचला आणि दिल्लीं-तील मोंगलांच्या बादशाही तख्ताचा, घाव घालून, अक्षरश: चुराडा केला. महादजी शिंद्यांनीं निर्बुद्ध मोंगल बादशहांना बंदिवान नी वेतनी अंकित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून आपल्या रखवालींत आणलें, आणि सर्व देशभर हिंदूचें सर्वसत्ताधीशत्व पुन: अेकदां प्रस्थापित केलें.

अितक्यांत मुसलमानांशीं झालेल्या शेकडों वर्षांच्या लढचांतून आम्ही पुन्हां तरतरीत होण्याच्या पूर्वींच अिंग्रज आमच्यापुढें ठाकले नी त्यांनीं आम्हांला सर्व बाजूंनीं जिंकलें. त्यांच्या विजयाकरितां आम्हीं त्यांच्यावर कुरकुरत नाहीं कीं, त्यांचा हेवादावा करीत नाहीं. कारण जरी काल आम्ही रणांगणावर पराभूत झालेलों असलों, तरी युद्धाची रग आजहि आमच्यांत अुरलेली आहेच. हरलों म्हणून कांहीं आम्हीं लढा टाकून दिलेला नाहीं. छे, यापूर्वींच हल्ल्याकरितां पुन्हां परतलोंहि आहों.

भावी भाग्यशाली अध्यक्ष

कोणाला माहीत ? ह्याच आपल्या ' हिंदुमहासभे ' चा पुढील काळांतील अेखादा अधिक भाग्यशाली अध्यक्ष ह्या पिढींत नाहीं तरी आपल्या मुलांच्या पिढींतच त्या वेळच्या त्या भावी अधिवेशनापुढें अुभा राहून अशी विजयाची वार्ता अुच्च रवानें घोषित करण्याला समर्थ होणार नाहीं म्हणून कोणी सांगावें कीं, –" हूण नि ग्रीक नि शक यांची मागें जी गत झाली तद्वत्च ब्रिटिश वर्चस्वाचा ह्या देशांत मागमूसहि अुरला नाहीं ! हिंदु जगाचा ध्वज, हिमालयाच्या प्रोत्तुंग शिखरांवर अुंच फडकत आहे ! हिंदुस्थान पुनश्च स्वतंत्र नि हिंदुजगत् विजयशाली झालें आहे ! ! "

✠ ✠ ✠

(हिंदुराष्ट्र दर्शन:–(मराठी आणि अिंग्रजी) मूल्य प्रत्येकीं ६ रुपये.)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या : : २७

✠ ✠ ✠

['लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या ' हा संदेश कोणत्या मराठी सुशिक्षिताला माहीत नाहीं ? वीर सावरकरांनीं ही घोषणा महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून जेव्हां केली तेव्हां साहित्यिकांत केवढी खळबळ माजली. परंतु हा संदेश देणारे सावरकर 'बोरू आणि बंदूक' दोन्हीहि सारख्याच कुशलतेनें हाताळणारे सव्यसाची स्वातंत्र्य-वीर आहेत. मराठी साहित्यांत त्यांनीं टाकलेली बहुमोल भर ही चिरंतन टिकणारी असून मराठी भाषेवर त्यांचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. अशा कृतिशूर साहित्यिकाच्या भाषणांतील हा अेक महत्त्वाचा अुतारा आहे. हें भाषण 'सावरकरांचीं भाषणें' ह्या श्री. दा. न. शिखरे यांनीं संपादिलेल्या पुस्तकांत संग्रहित करण्यांत आलें आहे.

ह्या भाषणांत देशभक्त सावरकरांनीं ज्याचा अनेक वर्षें हिरीरीनें प्रचार केला त्या 'भाषाशुद्धि' आणि लिपी सुधारणा' ह्या विषयांवरील त्यांचीं मतें ह्यांत संक्षिप्तपणें आलीं असल्यामुळें त्यांविषयी आणखी स्वतंत्र लेख दिलेले नाहींत.]

✠ ✠ ✠

मुंबअीच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांतील
अध्यक्षीय भाषण

सन्मान्य सभासद हो !

अध्यक्षपदावरून जें साहित्यविषयक निवेदन मला आपणांस करावयाचें तें मी मनांतल्या मनांत जेव्हां प्रथम योजूं लागलों, तेव्हां अेक–दोन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गमतीच्या गोष्टी घडल्या; त्या मी आपणांस प्रथमत: सांगतों. माझ्या मनांत खरेंखुरें असें अध्यक्षीय भाषणच करावयाचें होतें. भाषण म्हणजे अध्यक्षीय करावयाचें होतें. भाषण म्हणजे अर्थात् जें आपण बोलतों तें; पण ह्या साहित्य-संमेलनाच्या अुत्साही चालकांनीं माझी अध्यक्षपदीं निवडणूक होतांच मला भेटून सांगितलें कीं 'हें पाहा, तुम्हीं साहित्यसंमेलनांतून बडोदें–नागपूरकडे आयत्या वेळचीं भाषणें केलींत. तशी लटपटपंची अिथें चालणार नाहीं.अध्यक्षीय भाषण म्हटलें म्हणजे तें आधीं लिहून, आधीं छापून, त्याच्या छापील प्रती श्रोतृवृंदांच्या हातीं आधीं वाटलेल्या हव्यात, आणि मग तुम्ही त्याप्रमाणें तोंडी बोललें पाहिजे !' असें त्यांनीं मला हडसून–खडसून सांगतांच माझ्या पोटांत भीतीचा गोळाच अुठला ! अेखाद्या साग्रसंगीत नाटकाच्या पुस्तका-अेवढें हें भाषण छापून तोंडपाठ करावयाचें नी बिनचूक बोलून दाखवावयाचें हें काम करूं गेल्यास गणपतराव जोश्यांसारख्या कसलेल्या नटाचीहि बोबडी वळावयाची ! त्यांतहि छापील भाषणें तोंडपाठ म्हणून दाखविण्याच्या कलेची मला तर तोंडओळखहि झालेली नाही !

तत्त्वात्मक नव्हे–कार्यात्मक

पण निबंध लिहूं लागलों, तों दुसरी अेक सांगण्यासारखी गंमत घडली. मला पहिल्या पायींच तत्त्वाचें मांजर आडवें आलें ! मीं निबंधांत काय लिहावें याविषयीं अिष्ट मित्रांच्या नी अनिष्ट मित्रांच्यासुद्धां अनेक सूचनांचा माझ्या-वर नुसता मारा चालू झाला. त्यांत बहुतेकांनीं व्यक्तविलेली आशा म्हणजे मी कांहीं तरी तात्त्विक अूहापोह करावा ! आणि बहुतेकांनीं व्यक्तविलेली भीति म्हणजे मी त्यांत भाषाशुद्धीचाच काय तो प्रपंच थाटूं नये. परंतु, या आशेला कोणतेंहि आश्वासन किंवा या भीतीला अभयदान मला देतां आलें नाहीं. ही गोष्ट जितक्या खेदाची तितक्याच निरुपयाची होती. साहित्या-विषयींहि तात्त्विक नि बौद्धिक चर्चेचा अुपयोग आहेच आहे, यासंबंधीं माझें दुमत नाहीं. साहित्यविषयक तात्त्विक प्रश्नासंबंधीं माझीहि कांहीं मतें आहेत अशी केवळ बौद्धिक करमणूक मलाहि आवडते. चांदण्या रात्रीं मांडीवर मांडीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठोकून किंवा जेठा मारून बसल्याबसल्या मनोराज्यांचीं मनोराज्यें जिंकीत चालण्याची सुखाची सोय ह्या जगांत आहे हें मला ठाऊक आहे. परंतु, केवळ अशा तात्त्विक नि केवळ बौद्धिक काथ्याकुटींत रूतून बसल्यामुळेंच आपण क्रियादुर्बल होऊन पडतों आहोंत. आपलीं भौतिक राज्यें गमावून बसलों आहोंत, याचें शल्य माझ्या हृदयांत सारखें बोचत आहे त्याला काय करणार!

कार्यशक्तीचें दौर्बल्य

ज्या काळीं अलंकारशास्त्रावर जगन्नाथपंडितांसारख्याचें अुत्कृष्टांतील अुत्कृष्ट ग्रंथ लिहिले जात होते, त्याच वेळीं आपल्या राष्ट्रमातेच्या अंगांवरील मुकुटकुंडलादि राणीपणाचे अलंकार अेकामागून अेक ओरबडून अकबर–औरंगजेब तिला बटिक बनवित होते ! आणि ज्या काळीं स्मृतीच्या समन्वयास्तव निर्णयसिंधु–धर्मसिंधूसारखे प्रचंड ग्रंथ लिहीत, संध्येची पळी किती मोठी असावी याची तात्त्विक नि शास्त्रीय चर्चा करीत, नि गीतेच्या अेकेका शब्दावर पांचपांचशें श्लोकांत आपली बुद्धि तात्त्विक विवेचन करीत बसली होती, त्याच वेळीं अनेक अल्लाअुद्दीन आणि मलिकंबर त्या स्मृतीच्या नि गीतेच्या लाखों अनुयायांवर अवघ्या दीड दोन हजार सैनिकांनिशीं झडपा घालून त्यांना कापून काढीत होते--रामेश्वरापर्यंत आपलीं राज्यें पालथीं घालून बसले ! ते कां ? आपली तत्त्वप्रवणता किंवा बुद्धिशक्ति दुर्बल होती म्हणून नव्हे, तर आपली कृतीप्रवणता, आपली कार्यशक्ति दुबळी होती म्हणून ! त्या अलंकारशास्त्रावरील वा वेदान्तावरील ग्रंथांचा किंवा त्या आपल्या बुद्धिवैभवाचा मलाहि अभिमान वाटतो. अलंकार, कविता, काव्य, तत्त्व, याची मलाहि अतिशय आवड आहे, पण जी अपथ्य आवड तेंच व्यसन ! आणि **जे अप्रासंगिक तेंच अपथ्य**, हें कृतिदौर्बल्य आपल्या हाडीपेरीं आजहि मुरलेलें आहे. राजकीय, सामाजिक वा साहित्यिक अशा ज्या कोणत्या क्षेत्रांत मी काम करीत आलों, त्या प्रत्येक क्षेत्रांत मला, आम्हां सर्वांचें हें कृतिदौर्बल्य पाहून अत्यंत विषाद वाटत आलेला आहे, मीहि आपल्यांतीलच अेक ! पण मला माझें मन या दोषासाठीं जसें खात आहे तसेंच आमच्या सर्व राष्ट्राचें लक्षहि या दोषाकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
Library

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेधलें जावें अशी मला तळमळ लागली आहे. विशेष कांहीं असेल तर अितकेंच काय तें !

या संमेलनाच्या पूर्वींच्या अनेक विद्वान् अध्यक्षांनीं साहित्यविषयक अवश्य ती बहुतेक तात्त्विक चर्चा आधींच केलेली आहे. तेव्हां साहित्याच्या अुत्पत्ति, अुपपत्ति, प्रतिपत्ति प्रभृति विषयांसंबंधीं तीच ती घटपटादि तार्किक वा तात्त्विक खटपट पुनः अेकदां करीत बसण्याची आवश्यकताहि अुरलेली नाही. यास्तव त्या तात्त्विक भागाकडे पाठ फिरवून ज्या ज्या लहान मोठ्या साहित्यविषयक सुधारणा किंवा जीं जीं लहानमोठीं साहित्यविषयक कार्यें आपण करून टाकावीं असें मला वाटतें, त्या क्रियात्मक भागाकडेच मी वळतों.

मराठीचें क्रियापददारिद्र्य

या क्रियात्मक भागाकडे वळतांना प्रथमपदीच मला क्रियापदाची आठवण व्हावी हें नामसादृश्यामुळें तरी अगदीं स्वाभाविक आहे. आपल्या मराठींतच नव्हे, बंगाली, हिंदी, गुजराथी अित्यादि आपल्या सर्वच प्राकृतांत, क्रियापद–दारिद्र्य पदोपदीं अनुभवावें लागतें. या सर्व भाषांमध्यें देणें, घेणें, असणें, करणें अशीं कांहीं मोजकीं क्रियापदें तेवढीं स्वतन्त्रपणें रुळलेलीं आहेत, आणि अुरलेल्या शतावधि क्रियापदांचें कार्य त्याच त्या मोजक्या क्रियापदांच्या मागें भिन्न भिन्न नामें किंवा अितर शब्द लावून साधावें लागतें. त्यामुळें अेका शब्दानें जें काम व्हावयाचें त्यासाठीं दोनतीन शब्द वापरावे लागतात. जसें संमती देणें, अुत्तेजन देणें, प्रचार करणें, निषेध करणें, प्रकाशित करणें, अनुमोदन देणें, अित्यादि अित्यादि. या द्विशब्दी क्रियापदांमुळें त्याच त्या देणें, करणें, असणें अित्यादि शब्दांची कंटाळवाणी पुनरुक्ति करावी लागते. केव्हां केव्हां तर अेकाच धातूची द्विरुक्ति हास्यास्पद वाटूं लागते; जसें, प्रतिकार करणें, स्वीकार करणें, धिक्कार करणें, अंगीकार करणें अित्यादि अशा टिकाणीं तरी आपण प्रतिकारणें, स्वीकारणें, धिक्कारणें, अंगीकारणें अित्यादि. अेकेरी स्वतंत्र क्रियापदें वापरण्याची पद्धत अेक वैकल्पिक पर्याय म्हणून तरी पाडावी असें मला वाटतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाक्यरचनेचें वैचित्र्य

नवीं अेकेरी नी स्वतंत्र क्रियापदें रुळविण्याच्या सुधारणेप्रमाणेंच आपल्या वाक्यरचनेंत अर्थानुरोधानेंच थोडेसें वैचित्र्य आणण्याची पद्धतहि पाडावी असें मला वाटतें. आपल्या वाक्यरचनेची ठराविक घाटणी म्हणजे क्रियापद घालावयाचें तें शेवटींच, आणि शेवटीं क्रीयापद हें असलेंच पाहिजे. आजच्या गद्य लिखाणांतच ही घाटणी ठराविक झाली आहे; बखरींतील मराठींत मी म्हणतों तशीं क्रीयापदें, अर्थात बळकटी येत असेल तर, शेवटीं न घालतां मध्यें घालून जो शब्द विशेष साभिप्राय असेल तोच शेवटीं घातलेला आढळतो. जसें–'आतां तुमची-आमची गांठ पडेल रणांगणांतच !' होय, आहे, होते अित्यादि क्रीयापदें जीं अेकसारखीं आजच्या गद्य लिखाणांत शेवटीं येतात तीं बखरीतील लिखाणांत बहुधा साफ गाळलेलींच असतात. जसें–'समर्थ परम तपस्वी, निश्चयाचे केवळ मेरु. त्या युद्धास अुपमा तर अेक कुरुक्षेत्राचीच! म्हणतील तें प्रमाण !' अित्यादि. बंगालीमध्यें शेवटचीं अशीं अनावश्यक क्रियापदें गद्य लिखाणांतून आजहि गाळतात. संस्कृतमध्यें तर अर्थानुरोधें क्रियापद, कर्ता, कर्म यांचीं स्थानें वाक्यरचनेंत पालटण्याचा आहे संप्रदायच! त्यायोगें संस्कृत वाक्यरचना किती वैचित्र्यपूर्ण असते तें बाणाच्या कादंबरी-सारख्या अभिजात ग्रंथांत पदोपदीं आढळते.

लिपिशुद्धी

वरील दोन्ही सुधारणा अेकवेळ झाल्या नाहींत तरी चालतील, अेकवेळ. सांस्कृतिक नि भावनिक दृष्ट्या महत्त्वाची असलेली भाषाशुद्धीची चळवळहि आजची अुद्यांवर ढकलतां येयील. परंतु जर आपल्या नागरी लिपीला राष्ट्रीय लिपी करून सोडावयाची असेल तर लिपीशुद्धीची सुधारणा मात्र आपल्याला शक्य तितक्या लवकर हातानिराळी करून टाकलीच पाहिजे. कारण कीं आपल्या आजच्या लिपींत ह्या दोनचार लहानसहान सुधारणा करतांच ती मुद्रणक्षमतेंत नि शिक्षणसुलभतेंत अिंग्रजींहून वरचढ ठरणारी आहे. आपली नागरी

(सा...२६)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिपी अिंग्रजीहून मूळचीच शास्त्रशुद्ध असल्यामुळें तिच्यांत ज्या सुधारणा अवश्य आहेत त्या मुळांतच आहेत अगदीं थोडच्या नी अगदीं सहजसाध्य ! त्या अशा:-

(१) 'अ' ची बाराखडी:–या सुधारणेमुळें सातआठ अक्षरें शिकण्यांत अुणीं होतील आणि सातआठ टंक टंकपेटिकेंत कमी लागतील.

(२) सलग जोडाक्षरें:–आपल्या लिपींत शिकण्यांत नि छापण्यांत जें अवजड रूप आलेलें आहे तें मुख्यत: विक्षिप्त नी नियमबाह्य जोडाअक्षरांमुळेंच होय. क्त, क्व, त्र, क्का (जसें पक्का), ल्ला (जसें पल्ला) अित्यादि जोडाअक्षरांचीं सध्यांचीं रूपें स्वतंत्र टंकानेंच छापावीं लागतात. अशीं रूपें ३०।४० तरी भरतात; पण जोडाक्षर म्हटलें कीं, काना गळून अुच्चाराप्रमाणें सरळ नी सलग लिहीत गेलें कीं हें ४०।५० टंक टंकपेटींतून अुडून जातील आणि मुलांना जोडअक्षरें अशीं शिकवावींच लागणार नाहींत. अेक नियम शिकविला कीं, सारीं जोडाक्षरें आपोआप लिहितां येतील. व्यंजनांच्या मूळच्या थोडचाशा शिळचावरच छापतां येतील. जसें:–क्त, क्व, ल्ला, ष्वा, त्र अित्यादि.

(३) क, फ, र–हीं तीन अक्षरें कानायुक्त करणें ! आज अेकटें 'र' हें अक्षर आपण पांच प्रकारांनी लिहितों. जसें:–र, ऱ्या, ट्र, प्र, सर्व......परंतु 'र' हा कानायुक्त केला कीं हा घोटाळा मोडतो. तीच स्थिति 'क' ची व 'फ' ची. त्यायोगें शिक्षण सुलभ होतें. दहा टक तरी छापण्यांत अुणावतात. रेफहि वाचते. जसें:–'सऱ्प'.

(४) शेंडीवाल्याची पायमोड !–ह वर्ग, छ, ह, प्रभृतींना जोडाक्षरांत व्यंजनरूप द्यायचें म्हणजे त्यांना पायमोड चिन्ह लावावें ! जसें मोठ्या, ह्या अित्यादि.

दुप्पट स्वस्त मुद्रण

झालें ! या चार अगदीं सोप्या सुधारणा केल्या कीं, आज मराठी टंकपेटिकेंत जे न्यूनांत न्यून २०० टक तरी लागतात ते अुणावून अवघ्या ६० अेक टंकांत संस्कृतसुद्धां सारें लिखाण शास्त्रशुद्धपणें छापतां येतें. लिपी शिक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तांना मुलांना ६० अेक अक्षरें कमीं शिकावीं लागून शिक्षण सुलभतर होतें. छापखान्यांत पूरणाचा (डिग्रीचा) जो अेक अिंग्रजीला नसलेला अुपसर्ग आपल्या लिपीला असतो तोहि अगदीं नाहींसा होतो. या चार अगदीं सोप्या सुधारणा करतांच आपल्या लिपीचें मुद्रण दुप्पट सुलभच नव्हे, तर दुप्पट स्वस्तहि होओील. अर्थात् ही लिपिशुद्धीची सुधारणा नुसति भावनिक नाहीं तर हा रुपये आणे पैचा अगदीं व्यवहारिक नी त्वर्य (urgent) प्रश्न आहे.

हीहि अेक राष्ट्रीय सुधारणाच

लिपिसुधारणेची चळवळ प्रथम काढली आपल्या महाराष्ट्रानें. आतां ती सहजसाध्य सुधारणा व्यवहारामध्यें रुळवून नागरी ही अितर कोणत्याहि लिपीपेक्षां अधिक शिक्षणसुलभ नि मुद्रणसुलभ आहे हें प्रत्यक्षपणें साऱ्या हिंदुस्थानांत पटवून दिलें पाहिजे महाराष्ट्रानेंच ! लिपिशुद्धी ही महाराष्ट्राची क्लृप्ति आहे. आतां तिच्या प्रयोगानें आपली राष्ट्रलिपी अिंग्रजीहून वरचढ करून सोडण्याचा मानहि महाराष्ट्रानें पटकाविला पाहिजे ! हा लिपि-शुद्धीचा प्रश्न म्हणजे अेक राष्ट्रीय सुधारणेचा प्रश्न ! कारण, नागरी हीच राष्ट्रीय लिपी होणार ! त्यांतहि हा प्रश्न अेका दमडीचाहि व्यय न करतां किंवा अेका दिवसाचाहि बंदिवास भोगावा न लागतां, केवळ मनांत आलें कीं सुटण्यासारखा आहे. **वापरीत चला कीं, लिपीसुधारणा रुळलीच** म्हणून समजा. ही अेक राष्ट्रीय सुधारणा तरी हातानिराळी झालीच म्हणून समजा!

शुद्धीकरणींची दोन सूत्रें

तीच गोष्ट भाषाशुद्धीच्या प्रकरणींहि तंतोतंत लागू आहे, याविषयाचा यथास्थित अूहापोह आजवर झालेला आहे. प्रचार म्हणून आणखीहि होत राहील. परंतु, या निबंधांत तो अूहापोह करण्याचें कारण वा स्थळहि नाहीं. अितकें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, भाषाशुद्धीवर येणारे शेकडा नव्वद आक्षेप तरी अशा अेका गैरसमजानें आलेले असतात, की मराठींत कोणताहि अुर्दू वा अिंग्रजी शब्द असा वापरावयाचाच नाहीं असें भाषाशुद्धीचें म्हणणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे ! परन्तु, असें तिचें म्हणणेंच नाहीं मुळीं. भाषाशुद्धीचीं मुख्य सूत्रें दोनचः--

(१) आपल्या भाषेंत ज्या अर्थाचे शब्द होते, आहेत किंवा अुद्भवणें सुसाध्य आहे अशा अर्थाचे परकीय शब्द काय ते आपण वापरूं नयेत. मग ते जुने असोत वा नवे. आपले तदर्थक शब्द मारून जे परशब्द रुळतात त्यांनीं कांहीं आपली शब्दसंपत्ति वाढत नाहीं.

(२) परन्तु ज्या अर्थांचे शब्द, त्या वस्तुच पूर्वी आपल्यात नव्हत्या म्हणून आपल्या भाषेंत मुळांतच नाहींत किंवा अुद्भवणें दुर्घट आहेत असे परकी शब्द वापरण्यास आडकाठी नाहीं. त्या परशब्दांनीं मात्र आपली शब्द-संपत्ति कांहीं अंशीं वाढेल, जसें-कोट, बूट, गुलाब, जाकीट, पेन्सिल अित्यादि.

हीं भाषाशुद्धीचीं दोन मुख्य सूत्रें जर ध्यानांत ठेविलीं तर तिच्यावर गैरसमजानें येणारे शेकडा नव्याण्णव आक्षेप गळून पडतील. मुसलमानी राजसत्तेच्या काळांत लब्धप्रतिष्ठितांच्या परधार्जिणेपणामुळें घरींदारीं अुर्दू शब्द घुसून तदर्थक जे मराठी शब्द साहित्यांतून नामशेषले; दरंतु, जे जुन्या ग्रंथांतून आणि विशेषतः आमच्या खेडयापाडयांतून आजहि कसेबसे जीव धरून राहिलेले आढळतात त्यांना पुन्हां प्रचलविण्याकडे प्रबोधनकार श्री. ठाकरे यांच्यासारख्या लेखकांचा ओढा वाढत आहे, अशा स्वकीय, सुटसुटीत नी सकस जुन्या मराठी शब्दांची आम्हांलाहि नव्या बोजड शब्दापेक्षां अधिक आवड आहे. पुनः जे नवे स्वकीय शब्द भाषाशुद्धीच्या आंदोलनामुळें मराठींत भर टाकीत चालले आहेत, त्यांतहि अनेक संग्रहणीय असेच ठरलेले आहेत; मराठी साहित्यांतच नव्हेत तर बोलतां बोलतां सर्व हिंदुस्थानभरहि कांहीं कांहीं रुळून जात आहेत.

कांहीं शुद्ध शब्द

आमच्यापुरतेंच बोलावयाचें तर आम्हीं काढिलेल्या वा अितरांनीं रूढाविलेल्या अशा कांहीं शब्दांचेंच अुदाहरण घ्या. अुपस्थित (हजर), विधिमंडळ (कायदे कौन्सिल), जुळारी (Compositor), स्तंभ (Column), दंडविधान (पिनल कोड), अुपमुद्रितें (प्रुफस्), विश्वस्त (ट्रस्टी),

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निक्षेप किंवा विश्वस्तपत्र (ट्रस्ट डीड), परिपत्र (सर्क्युलर), व्ययसंकल्प (बजेट), प्रासिद्धकें (जाहिराती), टंकलेखक (टाअिपरायटर), आजीवन किंवा आजन्म (तहाहयात), छेदक (पॅरिग्राफ), संचलन (ड्रिल), अेक-टंकक (मोनोटाअिप), पंक्तिटंकक (लिनोटाअिप), अुच्चांक वा विक्रम (रेकॉर्ड), राजबंदी, स्थलबंदी (Interned), अखंड टाक वा झरणी (फाअुंटन पेन), ग्रंथविक्रेते (बुकसेलर्स), घडयाळजी, (वाचमेकर), सैनिकाभिवादन (गार्ड ऑफ ऑनर), पुनर्न्याय (अपील), क्रमांक (नंबर), गृहांक (हाअुस नंबर), गण किंवा गणसंख्या (कोरम), अिच्छुक किंवा स्पर्धालु (कॅन्डिडेट्स), अुत्तरदायित्व वा दायित्व (जबाबदारी), प्रनिवृत्त (रिपोर्ट), ध्वनिक्षेपक (लाअुड स्पीकर), कालादर्श किंवा मितीपट (कॅलेंडर), निश्चित (खात्री), पूर्वसिद्धता वा पूर्वसज्जता (पूर्वतयारी), हुतात्मा (Martyr), हुतात्मता (Martyrdom), निर्बंध (कायदा), निर्बंधपंडित (कायदेपंडिप), निर्बंधशास्त्र (कायदेशास्त्र), बोलपट, अद्यावत (Up-to-date) अित्यादि !

‘कायदा’ शब्द बहिष्कारा

अितर सर्व शब्दांपेक्षां कायदा ह्या अुर्दू शब्दाची आम्हांस अत्यंत लाज वाटते. मराठींतच नव्हे तर साऱ्या भरतखंडांत ‘कायदा’ ह्या शब्दाला आपला स्वकीय हिंदु प्रतिशब्द असा अेकहि अुरलेला नाहीं ! ज्या तत्त्वावर सुसंस्कृत समाजाची मूलभित्ति त्याच तत्त्वाला, ज्यांनीं जगांतील विविध विज्ञानावरचा अत्यंत प्राचीन असा मनुस्मृतीसारखा ग्रंथ जस्टिनियनच्या शतकोशतकें आधीं ग्रंथिला, ज्यांनीं चंद्रगुप्ताचीं साम्राज्यें चालविलीं, चाणक्याचें अर्थशास्त्र रचलें, त्या आमच्या हिंदु जगतांत शब्द अुरूं नये याचा आम्हांस तीव्र विषाद वाटतो ! कायद्याला ‘निर्बंध’ हा शब्दच अुत्तम. अटकाव याला ‘प्रतिबंध’ योजावा म्हणजे कायदेशीर, कायदेपंडित, कायदेशास्त्र यांसारख्या धेडगुजरी, कर्णकटु नि करंटया शब्दांना निर्बंधशील, निर्बंधपंडित, निर्बंधशास्त्र, नैर्बंधिक असे श्रुतिसुखद स्वकीय सामाजिक शब्द हवे तितके अुद्भावितां येतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लीपीशुद्धीची सुधारणा शक्य तितक्या लवकर हातानिराळी केली पाहिजे.

महाराष्ट्रानें अेकदां निर्बंध शब्द सुचविला कीं, त्याची देणगी सगळ्या भारतवर्षांतील काश्मिरी तें तामिळ तेलगूपर्यंतच्या आपल्या हिंदु भाषासंघांस देतां येअील. विधिमंडळ हा शब्द जसा आतां सर्व वृत्तपत्रांनीं अुचलला तसाच जर ते निर्बंध (कायदा) हा शब्द नेटानें वापरतील तर अवघ्या अेका वर्षांत तो बद्धमूल होअील. अिंग्रज नि मुसलमान या देशीं येअीतों जणूं काय आम्हांस 'Law' ची, 'कायद्या' ची कल्पनाच नव्हती असा जो लज्जास्पद ध्वनि, त्या कल्पनेस स्वतःचा प्रतिशब्द आज मुळींच नसल्यानें, निघतो त्याचें यापुढें तोंडच वंद होअील. भाषाशुद्धीवाल्यांनीं तरी अगदीं तत्काळ 'कायदा' वा 'Law' हे शब्द बहिष्कारून 'निर्बंध' हाच शब्द वापरण्याचा कृतनिश्चय करावा !

भाषांतर मंडळ स्थापा

अशी भर टाकण्यासारखे मराठी ग्रंथ आजहि लिहिलें जात आहेत. पण आपली भाषा, संस्कृत वा पाली जशी पूर्वी अेकदां जागतिक भाषा झाली होती तशी पदवी पावलेली नसल्यामुळें, तशा पदवीस जी आज चढलेली आहे त्या अिंग्रजी भाषेंत आपले ते मराठी ग्रंथ भाषांतरिले पाहिजेत. ते विचार अशा मराठी विद्वानांनीं जसे मराठींत तसेच अिंग्रजींतहि ग्रंथिले पाहिजेत. हें काम कांहीं अंशीं ज्याचा तोच करूं शकेल. साहित्यपरिषदेनेंहि वर्षाकांठीं अेक दोन ग्रंथ तरी अिंग्रजींत भाषांतरिले पाहिजेत. परंतु हें काम मुख्यतः साऱ्या महाराष्ट्रानेंच आपलें समजून त्यासाठी अेक स्वतंत्र नी सधन मंडळच स्थापिलें पाहिजे. पूर्वी अिंग्रजींतून मराठींत महत्त्वाच्या ग्रंथांचीं भाषांतरें करण्याची जशी आवश्यकता होती आणि तें काम करण्यासाठीं श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज, कै. दाभोळकर प्रभृति कार्यकर्त्यांनीं मोठमोठ्या व लहानसहान माला काढून जें कार्य केलें, तशीच आतां मराठींतील ग्रंथ अिंग्रजींत अनुवादिण्याची अुलटी लाटहि अुठली पाहिजे.

महाराष्ट्रांतील विद्यापीठ

या निबंधांत येथवर ज्या लहानमोठ्या कार्यात्मक योजना आम्ही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुल्लेखिल्या त्यापैकीं **क्रियापददारिद्र्य घालविण्याची, वाक्यरचनावैचित्र्याची, लिपीशुद्धीची नि भाषाशुद्धीची सुधारणा** ह्या केवळ मनांत येतांच ज्याच्या त्याला पटतील तर लगोलग करतां येणाऱ्या आहेत. "संकृतनिष्ठ परिभाषा कोशाचें" अखिल भारतीय कार्यहि करूंच म्हटलें तर साहित्यपरिषद नी संमेलन यांना पार पाडतां आलें पाहिजे. परंतु मराठींतील अुत्कृष्ट ग्रंथांचा नि विचारांचा अनुवाद अिंग्रजींत करण्याचें कार्य मात्र अितकें व्यापक नि व्ययाचें आहे कीं, तें पूर्णपणें पार पाडावयास आजच्या परिस्थितींत तरी साहित्य-परिषद असमर्थच ठरेल. आणि वास्तविक पाहतां अशीं अवजड कामें, तिनें दिशा दाखविण्यापुरतें दहापांच ग्रंथ अिंग्रजींत अनुवादून प्रकाशिले तरी, पूर्णपणें नी सातत्यानें करित राहण्याचा भार अशा साहीत्यपरिषदांवर टाकणेंहि अयोग्यच आहे. त्यासाठीं आणि मराठी साहित्याच्या अेकंदर विवर्धनास्तव आपणांस महाराष्ट्र विद्यापीठच स्थापिलें पाहिजे, न्यायमूर्ति रानडयांपासून हा विचार चालू आहे. आणि त्याविषयीं आपण आपली नेहमीची कृतिपंगुता जर सोडली नांहीं तर तो विचार आणखी दहा वर्षे 'अेक विचार' म्हणूनच रेंगाळत राहील.

अनुकूल काळ

यास्तव माझें आपणां सर्वांना अत्याग्रहाचें सांगणें आहे कीं, या सम्मेलनानें आम्हीं या दोन वर्षांच्या आंत महाराष्ट्र विद्यापीठ प्रस्थापूंच प्रस्थापूं, असा कृतनिश्चय करून अुठावें, प्रत्येक वर्षाला पांचशें तत्त्वांचीं काथ्याकूट, पांचशें ठराव, पांचशें बेत करीत बसण्यापेक्षां अेक कोणचें तरी विशिष्ट नी निकडीचें कार्य हातीं घेअून तें पार पाडीत चलावें, असें केल्यावांचून आपल्या राष्ट्रापुढें सर्वच प्रकरणीं जे कामाचें डोंगर पडलेले आहेत, प्रगतीची वाट अडवीत आहेत, त्यांचा अुठाव कसा होअील बरें ? त्यांतहि आंता काल थोडा अनुकूल आला आहे. करून टाकूंच अशा अिरेनें हात घातला तर कितीतरी तुंबलेलीं कार्यें आतां करून टाकतां येतील. साहित्यविषयक नव्हेत, तर राष्ट्रीय प्राबल्याच्या नि स्वातंत्र्याच्या प्रकरणींहि अत्यंत अुपयुक्त अशा–प्राथमिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षण मुलांना आवश्यक करणें, नैतिक शिक्षण तरुणांना सक्तीनें देणें; प्रभृति अनेक गोष्टी ज्या संस्थेच्या द्वारें सुसाध्य होणार आहेत तें महाराष्ट्र विद्यापीठ स्थापण्याचें कामहि आतां सहजीं करून टाकतां येणाऱ्या कार्यांतील अेक निकडीचें कार्य आहे. असें महाराष्ट्र विद्यापीठ लगोलग स्थापण्यासारखी भूमिका सर्व दृष्टीनें योग्य अशी जर आपल्या हातीं आजच्या आज कुठें असेल तर ती अेका पुण्यासच !

विद्यापीठ अद्यतन हवें

तें महाराष्ट्रीय विद्यापीठ जें स्थापावयाचें तें नुसत सत्याचे प्रयोग करणारें नको. जगाच्या अनुभवानें जीं विद्यापीठें अद्यावत् म्हणून ठरलीं आहेत, अमेरिकेसारख्या बलाढ्य नि अद्यतन प्रगतीच्या देशांत जीं चालू आहेत, त्यांच्याअितकें तें प्रगत असलें आणि सिद्ध झालेल्या सत्यावरच काय तें अधिष्ठानिलेलें असलें कीं सध्यांपुरतें पुरें आहे. ह्या दोन गोष्टी ध्यानीं ठेवून ह्या संमेलनानें वा साहित्यपरिषदेनें ह्या वर्षीं आपला सर्व भर पुण्यास महाराष्ट्र विद्यापीठ स्थापण्याच्या कार्यावर द्यावा. अेक व्यापक मंडळ नेमून महाराष्ट्रभर अेकच चळवळ अुडवून द्यावी. प्रत्येक नगरीं सभांमागून सभा भरवाव्या. लाखों सह्यांचीं आवेदनें मुंबअी सरकारकडे धाडावीं. विधिमंडळांतून प्रश्नांचा, ठरावांचा भडीमार करावा. प्रधानमंडळाच्या दाराशीं शिष्टमंडळानें सारखें ठोठावीत वसावें. जिकडे पहाल तिकडे भित्तिपत्रकांतून (Wall posters), हस्तपत्रकांतून, वृत्तपत्रादि नियतकालिकांतून अेकच कंठशोष अैकू यावा. '**पुण्यास महाराष्ट्र विद्यापीठ स्थापा !**' अशी चळवळ अेक वर्षभर सारखी करा नि पाहा महाराष्ट्र विद्यापीठ दोन वर्षांच्या आत प्रस्थापिलें जातें की नाहीं तें ! हें कार्य साहित्यपरिषद नी संमेलन यांच्या शक्तींतलें आहे. कृतिदौर्बल्य झाडून अशीं कांहीं विधायक नि प्रत्यक्ष कार्यें करण्याची धमक तेवढी धरली पाहिजे !

हीं वैयक्तिक मतें

येथवर आपणां सर्व महाराष्ट्रियांनी नी साहित्यपरिषद वा संमेलन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांनीं आजच्या आज अशीं कोणतीं कार्यें करून टाकलीं पाहिजेत आणि तीं करून टाकणें शक्य आहे यांची चर्चा मीं केली. येथेंच हेंहि सांगून टाकणें अवश्य नसतां अवश्य वाटतें कीं, हीं किंवा ह्या निबंधांत पुढें येणारीं मतें हीं, जरी तीं अध्यक्षपदावरून सांगितलीं गेलीं तरी माझीं वैयक्तिक मतें आहेत· माझें अध्यक्षीय मत म्हणजे अर्थातच जें या संमेलनाचें ठरावांत आपलें सामुदायिक मत व्यक्तविलें जाअील तें. माझीं सर्व मतें आपना सर्वांना पटलींच आहेत वा पटतीलच असा अवास्तव भरंवसा मी केंव्हांहि बाळगणार नाहीं· हीं माझीं वैयक्तिक मतें असल्यामुळें आपल्या कोणाच्याहि वैयक्तिक मत-स्वातंत्र्यास त्यांच्यामुळें आळा बसण्याचें किंवा त्यांच्याविरुद्ध ठराव जरी आपणांस संमतिणें योग्य वाटलें तरी ती संमतिण्याच्या कामीं कोणास संकोच वाटण्याचें कांहीं अेक कारण नाहीं.

राष्ट्रभाषा संस्कृतनिष्ठ हिंदी हीच

मी येथवर अेकंदरींत महाराष्ट्राच्या साहित्यविषयक कर्तव्याचा, त्यांतल्या त्यांत स्वतंत्रपणें विचार केला असला तरी आपण हें नेहमीं ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, महाराष्ट्र हा जसा अखिल भारताचे अेक अुपांग आहे तसेंच नित्याच कारणांसाठीं महाराष्ट्र साहित्य हेंहि अखिल भारतीय साहित्याचें अेक अुपांगच आहे काय तें. अुपांगाचा विकास वा संकोच हा जसा शरीराच्या आरोग्यावर अंतीं अवलंबतो, तसेंच भारतीय साहित्यजीवनाचें बरे वा वाअीट परिणाम महाराष्ट्रीय साहित्यावर झाल्यावांचून राहणार नाहींत या अवयवावयवी संबंधांमुळें आपल्या राष्ट्रभाषेच्या भवितव्याशीं आपल्या महाराष्ट्रीय साहित्याचा संबंध त्यांतल्या त्यांत अधिकच अुत्कटत्वानें निगडित आहे· ह्यामुळें महाराष्ट्र साहित्यास त्या प्रश्नाची अुपेक्षा करून चालणार नाहीं आपली राष्ट्रभाषा हिंदी हीच व्हावी असा आपल्या राष्ट्रांतील फार मोठ्या वर्गाचा, निदानक्षीं हिंदुजनताचा, निर्धार झाल्यापासून बंगालप्रभृति कांहीं प्रांतांतील साहित्यिकांत असा अेक वर्ग निघत आहे, कीं ज्याला आपापली बंगालीप्रभृति भाषाच राष्ट्रभाषा व्हावी—हिंदी होअू नये असें वाटत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी कां नको ?

त्या वृत्तीला अनुसरून आपल्या मराठी साहित्यिकांतहि कांहीं मित्रांना असें वाटणें साहजिक आहे कीं, महाराष्ट्रीय साम्राज्य अटकेपर्यंत जेव्हां दिग्विजयी झालें होतें, तेव्हां भारतीय साम्राज्यांच्या भाषेचा मान ज्या मराठीला मिळण्याची संधी जवळजवळ हातीं आली होती आणि जी मराठी हिंदीहून साहित्यश्रींत कांकणभर सरसच ठरेल, ती मराठी राष्ट्रभाषा न करतां हिंदीसच तो मान देण्यांत मराठीची किंचित् तरी अन्याय्य उपेक्षा होत आहे. परंतु आपण हें ध्यानीं घेतलें असतां आपणांस वा बंगाली प्रभृति अितर प्रांतिक भाषांना, असा अपमान वाटणार नाहीं, कीं हिंदीला जी आपण राष्ट्रभाषेची पदवी अर्पित आहों ती कांहीं ती भाषा वा तिचें साहित्य बंगाली, मराठी, तेलगू, तामीळ यांहून समृद्धतर वा अुच्चतर आहे म्हणून नव्हे. अुलटपक्षीं अगदीं काल परवांपर्यंत हिंदी साहित्य बंगाली–मराठीहून न्यूनतर होतें. परंतु हिंदीलाच राष्ट्रभाषा करण्याचें मुख्य कारण हें आहे कीं, जी भाषा अेकंदरींत अखिल भारतांत बहुजनसमाजांत अितर कोणत्याहि भाषेहून अत्यधिक प्रमाणांत बोलली जाते, समजली जाते, लिहिली जाते, आणि ती अितर कोणत्याहि रीतीनें राष्ट्रीय विचारांच्या विकासाला वा प्रगतीला साहाय्यभूत होण्यास कोणत्याहि प्रकारें अक्षम नाहीं. हीं दोन्हीं लक्षणें हिंदीस अितर कोणत्याहि प्रांतिक भाषेपेक्षां अधिक अंशीं लागू आहेत.

हिंदीचा विस्तार

हिंदी ही तिच्या पोटबोलीसुद्धां आठ कोटीं लोकांची मातृभाषाच आहे मुळांत. त्यांतहि खरें पाहतां हिंदुस्थानची ती आधींच राष्ट्रबोली तरी झालीच होती. रामेश्वरापासून काश्मीरपर्यंत, आज दोन सहस्र वर्षें झालीं, लाखो हिंदु प्रवासी, तीर्थयात्री, संतमहंत नी व्यापारी–व्यवसायी जे अव्याहतपणें जात-येत दळणवळण ठेवीत आले ते या हिंदी बोलीच्याच बळावर काय तें! तुकाराम, नामदेव, चैतन्य, नानक प्रभृति निरनिराळ्या प्रांतांतील संतमंडळें हिंदींत आपलीं कांहीं कवनें तरी रचल्यावांचून राहिलीं नाहींत तें तिच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या पुरातन सार्वदेशिक स्वरूपामुळेंच होत. अिंग्लिशनें मध्येंच आडवें येअून शिक्षित वर्गाला जर अिंग्लिशचें नवें माध्यम दिलें नसतें तर आज त्या शिक्षित वर्गापुढेंहि राष्ट्रभाषा ठरविण्याचा प्रश्नच बहुधा अुद्भवला नसता. कारण आजहि शिक्षित वर्गाव्यतिरिक्त लाखों लोकांची अेक, जी राष्ट्रभाषा नसली तरी, राष्ट्रबोली आहे ती हिंदीच होय ! कुंभ मेळयांत जाअून पाहा कीं आपणांस दिसेल–लाखों लोक तामील, तेलगू, काश्मिरी, सिंधी, बंगाली--हिंदींत बोलत आहेत. हिंदुस्थानांत येतांच मुसलमानांनीं जी हिंदी बोलीच अुचलली त्याचेंहि कारण हेंच होतें कीं, तीच हाटाहाटांतून नि घाटाघाटावर यच्चयावत् भरतखंडामध्यें निरनिराळ्या प्रांतांत त्यांतल्या त्यांत अत्यधिक प्रमाणांत समजली जाअू शके.

हिंदींतील तेज नि विशालत्व

हिंदीचें पुरातन साहित्यहि सर्वसामान्यतः अितर प्रांतिक भाषांच्या मानानें कमी विस्तृत किंवा कमी सरस नाहीं. चंदभाटाचें जुन्या हिंदींतील ' पृथ्वीराज रासो ' हें प्रचंड अैतिहासिक काव्य पाहा. गुरुगोविंदसिंगानें रचलेलें जें त्यांचें आत्मचरित्र तें विचित्र नाटक किंवा त्यांचा दशमग्रंथ पाहा. हम्मीररासो, अलाअुदल, भूषण काव्य, छत्रसाल--विजय प्रभृति हिंदुत्वाभिमानानें नी वीररसानें रसलेलीं वीरचरित्रें हिंदीच्या जुन्या वाङमयाचें तेज आणि सुप्रसिद्ध तुलसीरामायणासारखे अनेक धर्मग्रंथ त्याचें विशालत्व प्रस्थापित आहेत.अर्वाचीन हिंदी साहित्यास अद्यावत् बनविण्याच्या कामीं तर आपल्या महाराष्ट्रीय वाङमयानें नी हिंदींतच ग्रंथरचना करणाऱ्या अनेक महाराष्ट्रीय लेखकांनीं किती तरी हातभार लावलेला आहे. तिचें साहित्य मराठी वा बंगाली यांच्या अितकें आज परिपुष्ट नसलें तरी ती त्यांच्याअितकीच प्रगतिक्षम आहे. मराठीची ती सख्खी बहीणच आहे. संस्कृतनिष्ठा तिचेंहि कुलव्रत. तेव्हां ती बहुसंख्य हिंदूंची आधींच राष्ट्रबोली असल्यामुळें त्या न्याय्य कारणासाठीं ती राष्ट्रभाषाहि झाल्यास मराठीला तें योग्यच वाटावें, हेवा तर वाटूच नये. मराठीच्या हितासहि अितर कोणती तरी राष्ट्रभाषा व्हावयाचीच तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदीच होणें अधिक अनुकूल. कारण तिची वरचढ वृत्ति मुळांतच नाहीं. महाराष्ट्राच्या हाताचा प्रेमाधार घेवूनच ती राष्ट्रभाषा-पदावर चढत आहे.

अुर्दूची धोंड

पुनः, आपण हें विसरतां कामा नये कीं, जर कोणती राष्ट्रभाषा झाल्यानें मराठी साहित्याचीच नव्हे तर अखिल हिंदुसाहित्याचीच भयंकर हानी नी अपमान होणार असेल तर ती हिंदी नव्हे—अुर्दू ! जों जों आपण हिंदीला राष्ट्रभाषा करून टाकण्याच्या कामीं टाळाटाळ वा दिरंगाअी करूं, तों तों जर कोणा भाषेची धोंड राष्ट्रीय भाषेच्या प्रश्नांवर आदळणारी असेल तर ती न मराठीची, न बंगालीची, तर अुर्दूचीच होय ! कारण, जरी अुर्दू ही मूळची हिंदीचीच 'बवर्जी' प्रत असली तरी, अेखाद्या श्रीयुत दळवीचा मेहेरबान देहलवी होतांच तो गोतास काळ झाल्यावांचून राहात नाहीं, त्याप्रमाणेंच ती अुर्दू हिंदीच्या, तिच्या गोताच्याच जिवावर अुठलेली आहे. तिची प्रकृति परसंस्कृतीच्या अन्नपाण्यानें विकृत झाली आहे. वास्तविक ती मुसलमानांची धर्मभाषी नाहीं, ती अरबी आहे. वास्तविक ती सात कोटी, मुसलमानांपैकीं पांच कोटींची मातृभाषाहि नाहीं.—त्यांची मातृभाषा तामील, तेलगू, बंगाली प्रभृति त्या त्या प्रांतांची मूळ भाषा असतें. तीस पसतीस कोटि लोकांच्या ह्या देशांत जी अुर्दू दोन कोटि लोकांचीसुद्धां मातृभाषा वा धर्मभाषा नाहीं, आणि वीस कोटींवर लोकाच्या संस्कृतीशीं, साहित्याशीं वा भाषेशीं बहुताशीं असंबद्ध, अपरिचित नी विरोधीहि आहे, तिलाच त्या राष्ट्राची राष्ट्रभाषा करा असें नुसतें म्हणण्याचें धाडससुद्धां, अितर कोणत्याहि देशांत कोणीहि अल्पसंख्यांक करूं शकले नसते. पण हिंदुस्थानांत मुसलमान तें करूं शकतात !

स्वतंत्र राज्याचें चिन्ह

वरें म्हणा, वाअीट म्हणा, पण आज मुसलमानांच्या मनांत ज्या ज्या गोष्टीनें त्यांचा समाज हिंदूंपासून अधिकांत अधिक निराळा दिसेल, तें अेक हिंदूंपासून अगदीं विभिन्न, अगदीं अुलट, अगदीं विरुद्ध, अगदीं निराळें राष्ट्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भासेल असें स्वरूप त्यास देण्याचा दृढ निर्धार झालेला आहे. त्याच्या राजकीय कारणांची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. साहित्यापुरतें अेवढेंच सांगणें भाग आहे कीं, भिन्न राष्ट्राची अेक अत्यंत महत्त्वाची खूण जी विभिन्न भाषा तीहि आपल्यांत असावी यास्तव मुसलमानांनीं अुर्दू ही निवडली आहे. अेवढ्याचसाठीं संस्कृतहिंदूभाषासंघापासून तिला विलग करण्यासाठीं तिची मूळची संस्कृत प्रकृतीहि प्रयत्नें करून बलात्कारानें तें अधिकाधिक विकृत करीत चालले आहेत. पंजाबकडच्या मुसलमानांनी अुर्दू आमची म्हटलें तर अेक वेळ शोभेल. पण बंगाली हीच ज्यांची मातृभाषा कालपर्यंत होती ते बंगाली मुसलमान, किंवा शेंकडा दहाजणहि तामीळवांचून दुसरी भाषा जे बोलत नव्हते, अुर्दूचें वाक्यहि वाचूं शकत नव्हते ते मद्रासी मुसलमान, मराठींत घरच्या वह्या नि पत्रें लिहिणारे कोकणी मुसलमान हेसुद्धां अुर्दूलाच राष्ट्रभाषा करा म्हणून जो अकस्मात टाहो फोडूं लागले आहेत, आम्हां सात-आठ कोटि मुसलमानांची तरी अुर्दू हीच राष्ट्रभाषा आहे म्हणून धडाधड् ठराव संमतीत आहेत, अितकेंच नव्हे तर वीस पंचवीस कोटि हिंदूंची देखील तीच अुर्दू राष्ट्रभाषा झाली पाहिजे म्हणून मुस्लिम लीगनेंच ठराव केला, अितकेंच नाहीं तर जिथें शेंकडा पांच मुसलमान वस्ती नाहीं, त्या सुदूर तामीळभाषी मद्रासच्या भर विधिमंडळांत अेक विगतप्रधान नामदार खविच-अुल्ला यांनी गेल्या मार्च महिन्यांत तेंच मत प्रतिपादण्यास सोडलें नाहीं हें सर्व जमेस धरतां, मुसलमान असा अरबीनिष्ठ अुर्दूसच अुचलून धरणार हें सत्य दृष्टीआड करून कसें चालेल ?

हातीं धुपाटणें येअील

अशा वेळीं सर्व हिंदूंनीं पण संस्कृतनिष्ठ हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा असा अेकमुखी निर्धार केला पाहिजे. नाहीं तर मराठी, बंगाली, तामील वादांत हिंदीचें पाठबळ जर अुणावलें तर तेलहि गेलें तुपहि गेलें आणि हातीं अुर्दूचें धुपाटणें मात्र आलें अशीं आपल्या राष्ट्रभाषेची स्थिति होअून मराठी साहित्यालाहि, त्या अरबीनिष्ठ अुर्दू मुसलमानी सत्तेंत जसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हानिकारक नी अपमानकारक धक्का बसला, तसा बसल्यावांचून राहणार नाहीं ! बिहारमध्यें महाराष्ट्राप्रमाणेंच हिंदु बहुसंख्या, जवळजवळ शेंकडा नव्वद; पण तिकडे हिंदूंच्याच घरघालू प्रवृत्तीमुळें, मुस्लिमांच्या अतिक्रामक नेटामुळें, कॉंग्रेस सरकारनेंच अेक भाषासमिति नेमून क्रमिक पुस्तकांतून घातलेल्या भाषेंत अुर्दू शब्दांची अर्धीमुर्धी तरी रेलचल असावी असें सरकारी धोरण ठरविण्याचाच घाट घातला आहे ! तीच दुर्दशा मराठी क्रमिक पुस्तकांचीहि त्याच वेडापायीं झाल्यावांचून राहणार नाही हें ध्यानांत ठेवा ! आतां आंतून आंतून बोटें मोडीत बसण्याचा भ्याडपणा सोडून, आम्ही सर्व हिंदूंनीं तरी मुसलमानांना नि कॉंग्रेसला रोखठोक बजावून सांगितलें पाहिजे, कीं आम्हां हिंदूंची तरी राष्ट्रभाषा संस्कृतनिष्ठ हिंदी ही, आणि हीच काय ती ! मुसलमानांनी वाटेल तर त्यांनीं त्याची राष्ट्रभाषा अुर्दू करावी वा प्रत्यक्ष अरेबी! राहतील राष्ट्रांत दोन भाषा ! स्वित्सर्लंडमध्यें चार आहेत. पण म्हणून प्रत्येक क्रमिक पुस्तकांत प्रत्येक वाक्यांत अेक शब्द अिटालियन, अेक शब्द फ्रेंच, अेक जर्मन, अेक स्विस असावा अशी कांहीं खिचडी करण्याची खुळचट तोड त्यांनीं काढली नाहीं; आणि काढली असती तरी ती त्या स्वाभिमानी भाषांपैकीं सर्वांनीं झिडकारुन तिचा बोजवारा अुडविला असता.

धर्मांतराचा भाषांतराशीं संबंध नाहीं

अेथें हें हेतुत: स्पष्टपणें सांगून ठेवतों कीं, या निबंधांत मागें जे अुल्लेख आले वा पुढें येतील ते ज्या आमच्या मुसलमान देशबंधूंना नी भाषाबंधूंना मराठी ही आपलीच मायबोली वाटत आहे, आमचे ख्रिचन, यहुदी, पारशी देशबंधु जसे आपल्या मराठी, गुजराथी प्रभृति प्रांतिक नी त्यांच्याहि मूळ-पासूनच असलेल्या मातृभाषांना जसे सावत्रभावानें न लेखतां हिंदुअितक्यांच ममत्वानें लेखतात, तसे जे मुसलमान त्या भाषांना आपलीच भाषा मानतात त्यांना ते अुल्लेख लागू नाहीत. परंतु मराठी-प्रभृति भाषा ह्या त्यांच्या पूर्वीच्या मातृभाषा असतांहि त्यांना परकी मानून आपली स्वत:ची अशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अरबी, पर्शियन, शब्दनिष्ठ अुर्दू हीच काय ती स्वकीय भाषा आहे अशी जी विकृत चळवळ मुसलमानांत चालली आहे तिला पाठींबा देणाऱ्या मुसलमानांना काय ते ते अुल्लेख लागू आहेत. **धर्मांतराचा भाषांतराशीं संबंध असतोच असें नाहीं, हें आमचे खिश्चन बंधू मराठी–हिंदींना किती प्रेमानें आपणावतात ह्या वरून दिसून येअील.**

'याने'चा अरबी खिळा

भाषेच्या अैक्यासाठीं हपापलेल्या 'हिंदी याने हिंदुस्थानी'च्या नव्या खुळाचाहि बोजवारा अुडाल्यावाचून राहणार नाहीं; आणि शेवटीं हा 'याने हिंदुस्थानी' अुर्दूच बनविल्यावांचून मुसलमान सोडणार नाहींत. महाराष्ट्रातील लोकांना ही 'हिंदी याने हिंदुस्थानी' म्हणजे काय वस्तु आहे हें ध्यानीं यावयास 'तो अेक सत्याचा प्रयोग आहे' अितकें सांगणें पुरें ! हिंदी म्हणतांच मुसलमानाचें माथें फिरतें ना ! ठीक तर तें हिंदी हें अेकेरी नांव बदलून त्यांत 'म्हणजे अर्थात्' हा अरबी शब्द घालूं या; नांवांतच हिंदुमुस्लिम अैक्य त्या 'यानेचा' खिळा ठोकून अरबी खिळवून टाकूं या ! आपल्या राष्ट्रभाषेचें नांव 'हिंदी याने हिंदुस्थानी' असेंच ठेवलें, नुसते हिंदी ठेवलें नाहीं. हिंदींत चिरफाड करून तिच्यांत अर्धे संस्कृतीय नी अर्धे अरबी शब्द वापरीत गेले की हिंदु-मुस्लीमांची राष्ट्रभाषा अेक झालीच पाहिजे अशी आहे ही योजना. मागें अेका बुद्धिमान मध्यस्थानें दोघां पक्षकारांत अेका जिवंत गायीची यथान्याय वांटणी करण्यांसाठीं तिचे मधोमध दोन तुकडे केल्याची गोष्ट सांगतात; आणि तरीदेखील त्या भागांतील तोंडाचा भाग न घेतां दुधाच्या कासेचा भागच मला हवा म्हणून त्यांतील भांडखोर पक्षकार भांडतच बसला (!) तीच गत ही ! सरसीमेवरील पठाणांची टोळधाड हिंदुस्थानावर आल्यास, त्यांच्या प्रतिकारासाठीं हिंदवी स्त्रियांचीच अेक निःशस्त्र सेनाच तिथें धाडावी; म्हणजे बंदूक न झाडतांच ते पठाण लोक लाजेनें परत फिरतील असा अेक सत्याचा प्रयोग मागें सुचविला गेला होता, त्याच्याच तोडीचा हा दुसरा ! पठाण लुटारूं अशी स्त्रीसेना सामोरी आली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर बंदूकहि न झाडतां परततील, नव्हे पळत सुटतील हें अगदीं खरें—पण ते लाजेनें नव्हे—तर त्या स्त्रियांतील पाठुंगुळीं टाकवतील तितक्या स्त्रिया पाठीवर घालून ! तसेंच या 'याने हिंदुस्थानी' च्या प्रयोगांत हिंदीमध्यें अर्धे अरबी शब्द घालतां घालतां त्या हिंदीसच ते अुर्दू बनवून सोडतील ! त्यांची बटीक करून टाकतील !

मुसलमानांची वृत्ति.

आणि त्याचें मूलग्राही कारण हें कीं, जें राजकारणांत, समाजकारणांत, तेंच साहित्यांत नी भाषेंत, कीं—मुसलमानांना तुमच्याशीं अेकमेकपणा, सामाअिकपणा असा मुळांतच नको आहे. त्यांना त्यांचेंपणा काय तो हवा, तुमच्या तुमचेपणाचा गंधहि नको; त्यांना निराळेंपणाच हवा आहे. अेकत्रपणा नको, अेकता हवी. तुम्हीच मुसलमान व्हा, तुम्हीच शिका अुर्दू हवें तर ! असा जोंवर त्यांचा मानस, तोंवर कसली तडजोड ? अर्धे शब्द अरबी मिसळले तरी हिंदी ते मानणार नाहींत. पुन: तुमचे कोणते शब्द ठेवणें, त्यांचे कोणते हा वाद आलाच. त्यांना वंदे मातरम् नको, विद्यामंदिर नको, विकास नको, सरस्वती नको, श्रीयुत नको, श्रीसुद्धां नको. यांत अतिशयोक्त अक्षरसुद्धां नाहीं ! घडत असलेल्या घटना आहेत ह्या ! त्यांच्या संस्थानांत ते शाळांतून मराठी, तामीळ, तेलगू, हिंदी शिकवूंच देत नाहींत; अुर्दूच बळानें शिकवितात, आमच्या मुलाबाळांनासुद्धां ! तेथें ही कसली घेअून बसले आहांत 'याने हिंदुस्थानी !'

बाजारू भाषा नको.

पुन: असें पाहा कीं, आपल्यापुढें कोण्या चोरबाजारांतील किंवा चौपाटीवरील बाजारू भाषा काढण्याचा प्रश्न नाहीं; तर या भारतीय राष्ट्राची राष्ट्रभाषा बनविण्याचा प्रश्न आहे. आतां अशा या आपल्या प्रौढ नि सुसंस्कृत राष्ट्राची राष्ट्रभाषा म्हटली कीं, ती तितकीच प्रौढ नी सुसंपन्न हवी. तिच्यांत काव्य, कला, तत्त्व, शासन, विज्ञानप्रभृति सर्व विषयांची परिभाषा हवी. अशी परिभाषा आपल्या मराठीप्रभृति हिंदीभाषाप्रकृतीस मानवणार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नी पुरविली जाअू शकणार त्या अेका देववाणींतूनच, त्या शब्दरत्नाकर संस्कृतांतूनच ! पण तिचाच तर मुसलमानांना विटाळ ! केमालपाशानेंसुद्धां ज्या अरबीला नी तिच्या लिपीला अप्रगत नि टाकावू म्हणून झिटकारिली तिच्या भिकार दाराशींच ते परिभाषेची भीक मागणार ! तुमच्या मराठींत वा हिंदींत तुम्ही अर्थशास्त्र म्हटलेंत कीं ते म्हणणार अिलमे अिकते–सदियात्. भाषाशास्त्र म्हटलेंत कीं ते म्हणणार अलमुन अत्सना. खनिजशास्त्र म्हटलें कीं, अिल्म–मदनियात्. प्रकृतिविज्ञान म्हटलें कीं, ते म्हणणार अिलम तबअि-यात. साम्यवाद म्हटलें कीं ते म्हणणार अिलममसा वाम्; ग्रहाला सैयारा भाग्याला तकसीम; विकासाला तरक्की ! !

आमची राष्ट्रलिपी नागरी हीच

मागचीं दोन वर्षे पंडित जवाहिरलाल हे काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनीं हिंदुमुस्लिम अैक्यास्तव आम्हां हिंदूंना आज्ञा सोडली कीं, अुर्दूच राष्ट्रभाषा करा. आतां श्री. सुभाषबाबू सवाअी अध्यक्ष झाले; तेव्हां औदार्यांत पंडित नेहरूंवरहि थोडिशी मात करावयासाठींच कीं काय, त्यांनीं काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणांतच आम्हां हिंदूंना दुसरी अेक आज्ञा सोडिली कीं, आपली लिपीहि सोडून रोमन स्क्रिप्टच स्वीकारा, म्हणजे मुस्लिमांशींच काय पण जगाशींहि आपलें अैक्य होण्याचा पाया घातला जाअील !

आदर्श लिपी

अैक्याची सर्वाधिक झुरणी लागलेली असणार दुर्बलतमालाच. परंतु, दुर्बलतमतेचें, आत्मदौर्बल्याचें हें कीट जर आमच्या मनावर चढलेलें नसतें, तर आमच्या राष्ट्रपति म्हणविणाऱ्या अध्यक्षानें जगालाच असें खडसावून विचारलें असतें कीं, जगाच्याच अैक्यासाठीं तुम्ही तुमची अरबी, रोमन, लॅटिन लिपी सोडून आम्हा पंचवीस कोटि हिंदूंची ही नागरी लिपीच कां स्वीकारीत नाहीं ? जगाच्या हितार्थच अुत्तम ती लिपी जागतिक लिपी होणें अिष्ट. म्हणून अरेबीची तर गोष्टच तुलनेंत बोलावयास नको. शिलाछापाच्या

(सा...२७)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढें जी जाअूं शकत नाहीं, अशी ती अरेबी लिपी म्हणजे लिपीचा अेक शिलास्थि, अेक Fossil होअून पडलेली ! पण रोमन लिपीसुद्धां तुलनेंत नागरीहून किती तरी हीन आहे ! आजहि जगताला देण्यासारख्या ज्या आदर्श वस्तू आम्हांपाशीं आहेत त्यांत जसें योगशास्त्र, तशीच ही नागरी !

शास्त्रशुद्ध व्यवस्था

तिची ती 'वर्णस्थान समीरिता' अशी नुसती अक्षरांची क्रमव्यवस्थाच पाहा ! अनाहत असा जो आद्य ध्वनी मनुष्यास करतां येतो तो 'अ' म्हणूनच तो प्रथम घातला. त्याच तत्त्वानें अितर स्वर ते ते त्या क्रमानें पुढें घातले. त्या स्वरांवर व्यंजनात्मक असा पहिला आघात कंठांत होतो ! म्हणुन कंठ्य व्यंजनें निवडून, 'क' वर्गांत घालून, त्यांना त्यापुढें घातलें. ओठ कापले तरी 'क' वर्ग अुच्चारता येणारच. दुसरा आघात तालुचा, पुढें दंतांचा, शेवटीं ओठांचा. यास्तव तालव्य, दंत्य, ओष्ठ्य तीं तीं व्यंजनें निवडून, वर्गवून क्रमानें रचलीं. नाहींतर अरेबी पाहा, पहिलेंच अक्षर त्रिदली अुच्चारांचें-अलेप् ! दुसरें अेकदम ओष्ठ्य बे ! तिसरेंच अुलट जाअून ये ! अिंग्रजीचीहि तीच गत : पहिली अेकदम अे तर दुसरी अेकदम बी, तर तिसरी सी ! ! ! ध्वनीच्या आघातानुवर्ती स्थानांचा क्रम असाच नाहीं !

लिपिशुद्धतेचीं लक्षणें

लिपी शास्त्रशुद्ध असण्याचें दुसरें लक्षण, म्हणजे अक्षराचें जें नांव तोच त्याचा अुच्चार हवा. नागरींत ज्या अक्षराचें नांव 'स' त्याचा अुच्चारहि स; नांव क तर अुच्चारहि क; पण रोमन स्क्रिप्टमध्यें नांव बी तर अुच्चार ब, नांव सी तर अुच्चार क आणि नांव डब्ल्यू तर अुच्चार व ! तीच गत अरबीचीं.

तिसरें लक्षण म्हणजे अेका अक्षराचा अेकच अुच्चार. नागरी क कुठेंहि आला तरि तो 'क' च, 'अ' आला कीं तो 'अ' च राहणार. पण रोमन लिपींत कोण अडाणीपणा ! सी कोठें स होअील तर कुठें 'क'; but मध्यें 'u' अ होतो, तर 'put' मध्यें 'अु' ! !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शास्त्रशुद्ध लिपीचें चवथें लक्षण म्हणजे अेका अक्षराचें अेकच रूप ह्या प्रकरणीं आजच्या नागरींत चारपांच अपवाद आहेत नि तेंहि लिपिशुद्धीच्या चळवळीनें नष्ट केले आहेत. पुनः रोमन स्क्रिप्टप्रमाणें युरोपीय भाषा लिहितांना स्पेलिंगमध्यें जो लिपीचा विचका अुडतो तो विचारूंच नये. नुसता 'कमिशन' हा चार अक्षरी शब्द लिहितांना अक्षरें लागणार दहा; Commission: कांहीं अक्षरें पूर्वीच्या रावबहादूरांप्रमाणें सभेंत नुसत्या खुर्च्या अडवून चूप बसणारीं; त्यांना स्वतःचा ध्वनीच नाहीं. Through हा शब्द पाहा ! पुनः, आमच्या भाषेंतील कित्येक 'थ, त' सारखे ध्वनि व्यक्तविणारीं अक्षरें रोमन स्क्रिप्टमध्यें मुळांतच नाहींत.

सुभाषबाबूंच्या सूचनेप्रमाणें काँग्रेसकडून जेव्हां सारे वेद, वेदांगें, रामायण, महाभारत हे ग्रंथ A, B, C, D मध्यें छापले जातील, तेव्हां गीतेच्या पाठास असा श्रुतिमंजुळ आरंभ होईल--

॥ ढर्म्यः क्शेट्र् कुरुक्शेट्रे शमवेटा युयुट्शवाः ॥

मराठी क्रमिक पुस्तकांतून 'मीं जातों' हें Mee jato असें छापलें जाअील आणि असें आमचें संस्कृतसुद्धां सारें प्रचंड साहित्य, जगाच्या हितासाठीं A B C D करून सोडावयाचें ! काय वाखाणावी सुधारणा ! जितकी विक्षिप्त तितकीच बाटगी !

अशा प्रकारें नागरीहून सर्वतोंपरी हीनतर असलेल्या रोमन स्क्रिप्टला आम्हीं स्वीकारण्यापेक्षां युरोपनेंच आमची नागरी स्वीकारावी. लिपिशुद्धीप्रमाणें दोन चार रूपें पालटलीं कीं ती नागरी शास्त्रशुद्धतेंत मूळचीच अुत्तमोत्तम असल्यानें, आजच्या आज मुद्रणसुलभतेंत नी शिक्षणसुलभतेंतहि रोमन स्क्रिप्टहून वरचढ होणारी आहे.

हा डाव हाणून पाड

कारण, अिथेंच हेंहि सांगून ठेवतों कीं, अिंग्रज लोकांचा नी अमेरिकन मिशनरींचाहि नागरी मारून रोमन लिपी रुळविण्याचा डाव फार दिवसांपासून चालू आहे. ख्रिस्तपुराण मराठी भाषेंत पण रोमन लिपींत पोर्तुगीजांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेकडों वर्षांपूर्वी रचलें होतें. आजहि नागा प्रभृति वन्य जातींत मिशनरी लोकांच्या ज्या शाळा आहेत त्यांतून सहस्रावधि मुलांना त्यांच्या भाषेचीं क्रमिक पुस्तकें मिशनरी रोमन लिपींतच छापून शिकवीत आहेत. अितकेंच नव्हे पण सैन्यासाठीं सरकारनें चालविलेल्या " फौजी अखबर " प्रभृति वृत्तपत्रांतून हिंदी भाषा रोमन लिपींत छापण्याचा अुपक्रम झालेला आहे, तिकडेहि कानाडोळा करून चालणार नाहीं. या सर्व कारणांसाठीं राष्ट्रभाषेच्या प्रश्नाप्रमाणेंच माझें निश्चित मत आहे कीं, राष्ट्रीय लिपीच्या प्रकरणींहि आपणा हिंदूंनीं आणि त्यांतहि ज्यांच्या साहित्याची लिपी प्रत्यक्ष नागरी ही आजहि आहे त्या आम्हां महाराष्ट्रीयांना स्पष्टपणें असें अुद्घोषावें कीं,नागरी हीच आमची राष्ट्रीय लिपी राहणार !

दोन भाषा नी दोन लिपी

मुसलमानांनीं हवी तर त्यांची अुर्दू भाषा नी साहित्य हेंहि त्यांच्या परीनें चांगलें आहे हें मी जाणतों. जशा आमच्या प्रांतिक भाषा त्या त्या प्रांतांत राहतील, तशी अुर्दू भाषा नि लिपी मुसलमानांनीं आपल्यापुरती वाटल्यास ठेवावी. भाषेच्या वा लिपीच्या अैक्यासाठीं अेकमेकांच्या पायांत पाय अडकविल्यानें दोघांचीहि प्रगती खुंटेल, वाद वाढेल, अुणावणार नाहीं. राष्ट्रांत दोन भिन्न प्रवृत्तींच्या हिंदुमुस्लीम संस्कृति जोंवर आहेत तोंवर दोन भाषा नि दोन लिपी रहाणारच. त्याला अुपाय नाहीं, त्याची चिंताहि नाहीं. हिंदूंनीं मात्र चक्क निर्धार करावा कीं, आमची राष्ट्रलिपी नागरी ! ! आपण पंचवीस कोटि हिंदु जर अेकमुखानें हा निर्णय अुद्घोषवूं आणि आपल्यापुरती अेकच राष्ट्रभाषा नी अेकच राष्ट्रलिपी करून सोडूं, तर अितरांनीं काय वाटेल ते केलें तरी ह्या हिंदुस्थानची अेकंदरींत अशी तीच राष्ट्रभाषा नी तीच राष्ट्रलिपी झाल्यावांचून शेवटीं राहणार नाहीं ही गोष्ट अगदीं ठाम !

साहित्याचें ध्येय काय असावें ?

कार्यात्मक असें ह्या वर्षापुरतें महाराष्ट्र साहित्य संमेलनास मला जें कांहीं सांगावयाचें होतें त्याचा शक्य तितका थोडा असा हा कार्यक्रम मी येथ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर सांगितला. आतां आपल्या अनेक साहित्यिक मित्रांनीं मला जें कांहीं तात्त्विक किंवा मतमतांतराचे प्रश्न विचारले त्यांतील दोन चार प्रश्नांना अगदीं त्रोटक अशीं अुत्तरें देअून मी माझा हा निबंध संपविणार. पुष्कळांनीं विचारलेला अेक मुख्य प्रश्न म्हणजे " साहित्याचें ध्येय काय असतें ? " तो प्रश्न तसा न मांडतां ' साहित्याचें ध्येय काय असावें ? ' असा मांडला असता तर त्याचें अुत्तर अधिक निश्चितपणें मला देतां येअील.

ध्येय कोणतें ?

ध्येयाचा प्रश्न आला कीं त्यांत लहरीच्या, हौशीच्या, वैयक्तिक आवडीच्या अंतर्भावापेक्षां कर्तव्याचाच अंतर्भाव मुख्यत: अनुस्यूत झालेला असणार, अर्थात् जीवनाच्या सामुहिक कर्तव्याची जी व्याख्या तीच, त्या जीवनाचें जें अेक अुपांग सारस्वत, त्याचीहि व्याख्या त्याचेंहि ध्येय असलें पाहिजे. मानवी जीवनाच्या भौतिक ध्येयाची मला पटलेली व्याख्या, ही आहे कीं, मनुष्यजातीचें **अधिकांत अधिक हित ज्यायोगें साधतां येतें** तेंच मनुष्याचें अैहिक कर्तव्य होय. तात्कालिक कर्तव्यहि त्याच न्यायानें असें कीं, प्राप्त परिस्थितींत त्या त्या कालीं मनुष्य जातीचे जें अधिकांत अधिक हित साधतां येअील तें तें साधावें. या दृष्टीनें साहित्याच्या परम वा तात्कालिक ध्येयाचीहि व्याख्या अशीच असणार, कीं मनुष्य जातीच्या अधिकांत अधिक हितास साधण्यासाठीं झटेल तेंच साहित्य श्रेष्ठ, तेंच सुप्रासंगिक. आनंद नी करमणूक हीं मानव हितास कांहीं प्रमाणांत हितकारकच असल्यामुळें त्यांचाहि अंतर्भाव योग्य त्या प्रमाणांत वरील ध्येयांत होतोच. पण **केवळ करमणूक हें कांहीं कर्तव्य नव्हे**. घरांत आअी मरणान्तिक वेदनांनीं अंथरुणास खिळली असतां, जर अेखादा बहकलेला कलावंत बंगल्यांत नायकिणीच्या नाचांत रमूं शकला तर त्यास कलावंत म्हटलें तरी कुलदीपक कांहीं म्हणतां यावयाचें नाहीं ! कारण खऱ्या कलावंताला तशा वेळीं ती कलाच विकल केल्यावांचून रहाणार नाहीं ! तशा स्थितींत ती त्याला केव्हांहि आनंदविणार नाहीं, तर अुलट अेखाद्या कलाहीन माणसापेक्षां अधिक अुत्कटतेनें व्याकुळवील !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवमतवाद नी पुरोगामी वाङ्मय

कोणतीहि गोष्ट केवळ नवी आहे म्हणूच ग्राह्य वा त्याज्य ठरत नाहीं. नवें मूल जन्मास आलें म्हणजे तें आओपेक्षां अनुभवी वा बापापेक्षां शहाणें असतें असें नाहीं. कोणतेंहि वाङमय नुसतें पुरोगामी आहे म्हणूनच कांहीं सत्य वा तथ्य ठरेलच, असें गृहीत धरतां येत नाहीं. आओच्या पुढें दुडदुड धांवत जाणारें पुरोगामी मूल खड्डयांतहि पडण्याचा संभव असतो. लक्ष्याच्यापुढें निघून जाणारी गोळी पुरागामी असली तरी चुकलेली ठरते. वास्तववामङयाचें जें साध्य तें सत्य वा तथ्य; त्याच्या कसोटीस तीं नवमतवादी वा पुरोगामी मतें कितपत अुतरतात, कोणत्या तरी नव्या सत्यास वा तथ्यास तीं आविष्कारीत आहेत किंवा नाहींत, या प्रश्नावरच त्यांचा चांगुलपणा वा टाकाअूपणा ठरणारा आहे- पण तें ठरवावयाचें तर त्यांना त्यांचा पक्ष यथावत् मांडूं दिला पाहिजे. तीं नवीं वा पुरागोमी म्हणून हुरळूनहि जाता कामा नये, किंवा जुन्याविरुद्ध वा अुच्छृंखल वाटतात म्हणून त्यांची अेकदम मुस्कुटदाबीहि करतां कामां नये. जर तीं अशीं वाटतील तर त्यांच्यांतील तो अुच्छृंखलपणा वा अतथ्य अुघडकीस आणणारें नी जुन्यांतील सत्य प्रस्थापित करणारें विरुद्ध साहित्य प्रतिपक्षानें निर्मावें, हाच त्यावर अुपाय. साहित्यांत दोघांनाहि स्थान हवें. कारण अनेक वेळां नवीं मतें हीं अुपद्व्याप न ठरतां जुन्या अपायकारक अंधेरांत घुसलेलीं प्रकाशाचीं नी आरोग्याचीं किरणेंहि ठरलेलीं आहेत !

सयमक नि निर्यमक काव्य

निर्यमक काव्याविषयीं ज्या मित्रांनीं मला कित्येक प्रश्न विचारिले आहेत त्यांना विनंति कीं, यासंबंधीं माझीं मतें मीं 'रानफुलें' या पुस्तकास अेक स्वतंत्र परिशिष्ट जोडून त्यांत सविस्तर ग्रथिलीं आहेत, तीं जिज्ञासूंनीं पहावीं. मला स्वतःला अर्थास बाध न आणणाऱ्या प्रासांची नी यमकांची भारी हौस आहे. यमक हें रसाला प्रतिकूल न होओील अशा कौशल्यानें जर सहजासहजींच्या ओघांत योजतां आलें तर तें कवितेची शोभा वाढवितें;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसोत्कर्षाला साहाय्यक होतें, काव्यशैलीचा तो विकास आहे; पूर्वींच्या निर्यमक कवितेस खुलविणारा तो अेक नवा अलंकार आहे. पण तरीसुद्धां कांहीं सुविशाल गुंफणीच्या नी वक्तृत्वपूर्ण भावनांना वा विचारांना व्यक्तविण्यास Blank verse सारखीं निर्यमक वृत्तेंच अुपयोगीं. सयमक वृत्तांत येणारा अेकसुरीपणा पण अशा प्रसंगीं टाळतां यावा यास्तवच मी निर्यमक अशा 'वैनायक' वृत्ताची घडण केली आहे; मुक्तछंदादि वृत्तें हीं निर्यमकांचींच वृत्तांतरें होत. तीं सापेक्षतः दुय्यम चर्चा करण्याची मला संधि मिळती नी आजच्या स्थितींत त्यांतच गुरफटून घेणें अप्रासंगिक वाटलें नसतें, तर मी वैनायक वृत्ताचा प्रचार करण्याची माझी हौस फेडून घेतली असती; पण आपल्या बहुमूल्य वृत्तभांडारांत विशिष्ट प्रसंगांना अधिक अनुकूल अशा आणखी अेका वृत्ताची भर,–अितकेंच काय तें मी त्या वैनायक वा मुक्तछंदादि निर्यमक वृत्तांचें महत्त्व मानीत असल्यानें आणि तें कार्य मला स्वतः-पुरतें तरी आजच्या परिस्थितींत अगदीं दुय्यम–तिय्यम वाटत असल्यानें मी त्यांत येथें अधिक वेळ घालीत नाहीं.

साहित्याचें सापेक्ष महत्त्व

आणि आतां सरते शेवटीं मला हें सांगितल्यावांचून गत्यंतरच दिसत नाहीं, कीं, केवळ यमक वा काव्य वा कादंबरीच नव्हे तर स्वतः **सांगोपांग साहित्य हेंहि आपल्या आजच्या राष्ट्राच्या परिस्थितींत मला तरी दुय्यम तिय्यम कर्तव्यच वाटत आहे.** साहित्यिक सज्जनहो, विज्ञहो, सुज्ञहो! राष्ट्रांतील तुम्ही विज्ञ आहांत, सुज्ञ आहांत म्हणून मी तुम्हांसच विचारतों कीं, साहित्यासाठीं जीवन आहे कीं, जीवनासाठीं साहित्य ? जर आपलें राष्ट्रीय साहित्य–आणि अशा सामुदायिक संमेलनांत साहित्याचा सामूहिकच अूहापोह मुख्य कर्तव्य असणार !– जर आपले सामूहिक, आपलें राष्ट्रीय साहित्य हें राष्ट्रीय जीवनाचें अेक अुपांगच काय तें असेल, तर **राष्ट्रीय जीवनाचें संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्यचिंता** मुख्य साध्य असलें पाहिजे. अगदी कलेसाठीं कलेचा जो कलावन्त अुपासक आहे, वा साहित्यासाठींच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साहित्याचा जो साहित्यिक भक्त आहे त्याच्याविषयींहि मला आदरच वाटेल. पण असे कलेसाठींच कलेची अुपासना करणारे साहित्यिक अेखाद्या नाटचगृहांत नाटच-नृत्यसंगीताच्या भर रंगांत अगदी दंगले असतांनासुद्धां जर त्या नाटचगृहास अकस्मात् आग लागली तर कलेसाठींच कलेला झिडकारून तें तत्क्षणीं त्या आगींतून जीव बचावण्याच्याच मार्गास तडकाफडकीं लागतील, कां त्या संगीताचा तन्मय ताल धरीत तेथेंच डुलत रहातील ? त्याचप्रमाणें राष्ट्राच्या प्राणावरच बेतली असतां, केवळ साहित्याची कथा काय ?

परराष्ट्राकडे पाहा

आपल्या राष्ट्राची आजची **मृत्युंजय मात्रा म्हणजे त्याचें शस्त्रबळ-साहित्य नव्हे** ! जपानांत प्रत्येक प्राथमिक शाळेंत मुलामुलींना प्रथम सैनिक शिक्षण सक्तीनें देण्यांत येतें अलंकारशास्त्राचें नंतर ! आजकाल आयर्लंडांत प्रत्येक दैनिकांत पहिल्याच पानावर डी व्हॅलेराच्या आज्ञेनें मोठमोठ्या अक्षरांत प्रसिद्धकें फडकत आहेत– ! " Wanted recruits " ! सैनिक हवेंत ! साहित्यिक नव्हे ! ! अिटलींत तर पाळण्यांतील मुलांना काय तें सैनिक शिक्षण अद्याप आवश्यक केलेंलें नाहीं ! बाकी बालक पायावर चालूं लागलें कीं ' बालिरत्ना ' तुकड्यांतून त्याला लहान बंदूक खांद्यावर घेअून सैनिक संचलन शिकविलें जाअूं लागतें. तरुणांना मशिनगन्स प्रभृतीचीं सैनिक तंत्रें !–लघुकथांचीं तंत्रें नव्हेत ! ऑस्ट्रियाची मरणाची किंकाळी अैकलीत ना गेल्या महिन्यांतच ? शेवटच्या प्राणत्याग-पत्रांत त्याच्या शेवटच्या अध्यक्षानें शेवटचें वाक्य अुच्चारलें ! 'We yeild under German swords not under German sonnets ! आणि आपण ? जपानच्या, रशियाच्या मुस्लिम राष्ट्रांच्या बॉंबफेकीच्या वैमानिक हल्ल्याची आगलावी काळछाया ज्या मुंबअीवर दाट पसरत चालली आहे, त्या मुंबअींत या साहित्य संमेलनांतील नृत्यनाटचगीतांत रंगून गेलों आहोंत. ज्या मुंबअींत गल्लोगल्लींत जीर्ण साहित्य, नव साहित्य, पुराण साहित्य, पुरोगामी साहित्य, सयमक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंडळें, निर्यमक मंडळें थाटून राहिलेलीं आहेत; लक्षावधी तरुणतरुणी अेक आणा मालेपासून सोळा आणे मालेपर्यंतच्या कादंबऱ्या वाचण्यांत गढून गेलीं आहेत;—त्या मुंबअीत म्हणण्यासारखा रायफल क्लब असा अेकहि नाहीं. संबंध मुंबअी अिलाख्यांत सैनिक कॉलेज औषधालासुद्धां नाहीं! अेक हाताची गुप्ती अेका कॉंग्रेसवाल्याजवळ सांपडली म्हणून पुण्याला परवां त्याला बंदिवासाची कडक शिक्षा कॉंग्रेसच्या सरकारनें दिली! सरकार अहिंसक म्हणावें तर, सरकारी लाठीमार नी गोळीबार प्रजेवर मात्र प्रत्यहीं चालू आहेत! त्यांवाचून सरकार चालूं शकणार नाहीं असें तेच म्हणतात!

शस्त्रबळ प्रथम, शास्त्रबळ नंतर

चीन मेला तो त्यांत वाङ्मयीन साहित्य नव्हतें म्हणून मेला नाहींतर सैनिक साहित्य नव्हतें म्हणून! आपलें हें अेवढें विस्तीर्ण भारतीय राष्ट्र आज जगतांत निर्माल्यवत् जें होअून पडलें आहे तें आपलें साहित्य अुणें म्हणून नव्हें शस्त्रबळ अुणें म्हणून! ही गोष्ट सगळ्या आधीं, साहित्यिक हो, तुमच्या लक्षांत आली पाहिजे! सगळ्यांत साहित्यिक वर्गच सुज्ञ, विज्ञ असणार! म्हणून सगळ्या आधीं तुम्ही गर्जून अुठा कीं, **आजच्या परिस्थितींत आमचें राष्ट्रीय साहित्य म्हणजे शस्त्रबळ! -शास्त्रचर्चा नव्हे!** जें थोडें साहित्य हवें तें तुम्हीं – आम्ही जे चाळीशीच्या वर गेलेले लोक, ते काय तें हवें पुरवितील! माझा हा साहित्यिक निबंधसुद्धां त्या पाठीचा कणा वांकलेल्या वाक्पीठ वृद्धांपुरताच आहे. शेष जे तरुण, ज्या तरुणी, जी पाठीचा कणा ताठ असलेली पुढची पिढी त्या साऱ्यांना माझा या साहित्यपदावरून हाच निर्वाणीचा आदेश आहे कीं,

राष्ट्रास आज साहित्यिक नकोत! सैनिक हवेत!!

तरुण हो, आमच्या दुर्बळ पिढीच्या देखोदेखीं सुनीतें नि कादंबऱ्या लिहिण्याकरतां लेखण्या सरसावूं नका. तर त्या जपान, अिटली, जर्मनी, अिंग्रज, आयरिश तरुणांच्या देखोदेखीं आधीं बंदुका सरसावा! **आज राष्ट्रीय शस्त्रबळ हें मुख्य कर्तव्य, राष्ट्रीय साहित्य हें तिय्यम!** राष्ट्रसंरक्षणार्थ प्रथम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रायफल क्लबांत, घुसा; रडगाण्यांच्या नि रडकथांच्या साहित्यसंमेलनांत नंतर वेळ राहिल्यास !

जसें राष्ट्र तसें साहित्य

साहित्यासाठींसुद्धां आज साहित्याच्या पोथ्या गुंडाळून सैन्याच्या शिबिराकडे वळलें पाहिजे. कारण जें राष्ट्र खुरटें, दुबळें, त्याचे साहित्यिक खुरटे नी दुबळेच असणार. ज्या दुबळ्या राष्ट्राला परवयांची प्रबळ दारू आग लावते, त्याच्या साहित्यालाहि कशी आग लागते तें तक्षशिलेला विचारा, नालंदेला विचारा ! मुस्लिम तवारिखा अैटींत सांगतात कीं, खिलजी राजवटींत नालंदा विध्वंसिली गेली तेव्हां त्या प्रचंड ग्रंथभांडारास त्यांनीं जी आग लावली ती तीन महिने धुमसत होती–हजारों ग्रंथ जळत होते ! ! अुलटपक्षीं, त्यांना लिहितां अेत होतें कीं नव्हतें याचा पुरावा धुंडाळावा लागतो, अितके शिवराय होतें अेक तुच्छ साहित्यिक ! पण म्हणून तर ते युगधर्म न ओळखतां सुनीतें रचीत बसते, किंवा नुसतीं रणगीतें खरडते तर आज मराठी साहित्याची दुर्गति सिंधी, पंजाबी साहित्यासारखीच होती कीं नाहीं तें ध्यानांत आणा ! तिकडे जसा गायत्रीमंत्रसुद्धां 'अले पेबे' मध्यें अुलटा लिहावा किंवा वाचावा लागतो, तसा महाराष्ट्रांतहि वाचावा लागतो. 'ज्ञानेश्वऱ्या' ज्ञानेश्वराच्याच भाअुबंदांनीं जाळून टाकून हातीं कुराणें धरलीं असतीं. नेवाशाला ज्ञानेश्वराच्या भिंतीची मशीद करूं पाहणारे आजचे कित्येक मुसलमान पूर्वीचे हिंदूच होते हें विसरूं नका ! पण युगधर्म ओळखून, शिवाजीनें सरस्वतीच्या रक्षणार्थच सरस्वतीकडे कांहीं काळ पाठ फिरवून शुंभ–निशुंभ–मर्दिनीचींच अुपासना केली; लेखणी टाकून भवानी अुचलली म्हणून तर आज महाराष्ट्र–सारस्वत असा कांहीं पदार्थ जिवंत राहिला आहे !

लेखण्या मोडा, बंदुका अुचला

तुमच्या डोळ्यासमोर तुमच्या विद्यापीठांतून श्रीची नि सरस्वतीची विटंबना कां ? विद्यापीठाच्या दाराशीं अष्टायुधधारिणी दुर्गा पहारा देत नव्हती म्हणून ! सरस्वतीचा अेक अुपासक या नात्यानें मी तुम्हांस सांगतों

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कीं, आपल्या तरुण पिढींनीं आतां **लेखणी मोडून टाकावी आणि बंदुक अुचलावी !** साहित्यिक बनूं नये तर आधीं बनावें सैनिक ! मी ज्या ज्या साहित्य-संमेलनांत अध्यक्ष म्हणून गेलों, त्या त्या ठिकाणीं जातांच शरीराच्या सनकड्या झालेलीं आमचीं तरुण मुलें, मुली--कोरी करकरीत कोणती तरी कादंबरी, कथा, काव्य हातांत घेअून जेव्हां शेंकड्यांनीं येतां--जातां मला दिसत, त्यांत दिवसरात्र तन्मय होतांना आढळत, तेव्हां माझ्या हृदयाला खरोखरच चरका बसत आला; अध्यक्षपदीं मान लाजेनें खालीं घालावी लागली. वाटे, आपणहि या पापाचे वांटेकरी होत आहोंत ! यास्तव मी आपणांस स्पष्टपणें सांगतों कीं, राष्ट्राच्या आजच्या परिस्थितींत साहित्याचें सापेक्ष महत्त्व तिय्यम आहे आणि तरुण पिढीचें पहिलें कर्तव्य आहे सैनिक शिक्षण--दुसऱ्याला अुपद्रव देणारें नव्हे, नसतें वैमनस्य शिलगविणारें नव्हे, पण स्वसंरक्षणाचें नैर्बंधिक (कायदेशीर) कर्तव्य बजावणारें, असलेल्या वैमनस्यास आपल्याला अुपद्रव देण्याची छातीच ज्यायोगें होअूं नये असें स्वराष्ट्र-संरक्षक शस्त्रबळ आम्हांस हवें आहे.

हें मला पहावत नाहीं !

पुढील दहा वर्षांत सुनीतें रचणारा अेकहि तरुण न निघाला तरी चालेल, प्रत्यहीं साहित्य--संमेलनें न झालीं तरी चालेल, पण दहा दहा हजार तरुण सैनिकांच्या वीर--चमू आपल्या खांद्यावर नव्यांतील नव्या रायफली टाकून, राष्ट्राच्या मार्गामार्गांतून, शिबिराशिबिरांतून टप्टप् करीत संचलन करतांना दिसल्या पाहिजेत ! ग्रंथालयाअितकीं तरी, बौद्धिक कॉलेजाअितकीं तरी नगरानगरांतून सैनिक कॉलेजें गजबजलेलीं आढळलीं पाहिजेत ! मग अधूनमधून त्यानीं अेखादी कादंबरी वा प्रेमकथा वाचली वा सुनीत लिहिलें तरी चालेल. नेपोलियनहि रणांगणावर करमणूक म्हणून शीळ वाजवी. ‘दिल्लीच्या बादशहाची दाढी जाळून’ आल्यावर पहिले बाजीरावहि मस्तानीच्या अंत:पुरांत अेखादें पान खातांना आढळत ! पण जन्मभर नुसती झाडांचीं पानेंच चघळणाऱ्या आणि तमाशांतील तबलेच झडत राहिलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसऱ्या बाजीरावाचें अेक ब्रह्मावर्तच या राष्ट्रानें बनावें--हें मला पहावतच नाहीं.

साहित्यिक हो, आजच्यासारख्या प्रसंगीं साहित्यिकांचेंहि प्रासंगिक कर्तव्य तें हेंच होय असें मीच कांहीं म्हणत नाहीं, तर साहित्यिकांचा सम्राट् जो व्यास तोहि म्हणतो कीं, शास्त्री साहित्यिकांचा म्हणजेच जो ब्राह्मणांचा वर्ग त्यासुद्धां--

अमर्यादप्रवृत्ते च शत्रुभिस्संगरे कृते
सर्वे वर्णाश्च दृश्येयुः शस्त्रवंतो युधिष्ठिर ।।

कारण साहित्यापुरतें पाहिलें तरी हेंच खरें आहे कीं--
शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिंता प्रवर्तते ।।

✠ ✠ ✠

(सावरकरांचीं भाषणें : मूल्य रु. २;
भाषाशुद्धि : मूल्य रु. २।।.
नागरी लिपि शुद्धीचें आंदोलन : मूल्य रु. २–५० न. पै.)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुपकारक हिंसा ही अहिंसाच होय ! : : २८

✠ ✠ ✠

[दि. ४–११–५१ ला विलेपार्ले येथील लोकमान्य सेवासंघ, महाराष्ट्र मंडळ आदि संस्थांच्या वतीनें वीर सावरकरांचा सत्कार झाला. तेव्हां ' माणूस, माकड आणि टोळ ' ह्या विषयावर त्यांचें खालील भाषण झालें.]

✠ ✠ ✠

विलेपार्ले येथील वीर सावरकरांचें भाषण

आज आपण जो माझा सत्कार करतां आहांत त्याविषयीं मी आपला अत्यंत आभारी आहें. आज साधारणतः दहा वर्षांनंतर मी येथें येत आहे. आज नवीन मंडळींची भेट आणि दर्शन झालें याविषयीं मला आनंद होत आहे. लोकमान्य सेवासंघासारख्या प्रत्यक्ष काम करणाऱ्या संस्था चालविणें हें अेक कठीण आणि अुपयुक्त काम आहे. अनेक लोक व्याख्यानें अैकतात. पण व्याख्यानांत जें काय सांगितलें तें करणें हें मुख्य काम. प्रौढ शिक्षणावर व्याख्याता अर्ध्या तासांत बोलून जातो. पण दैनंदिन विद्यार्थ्यांना आणून अ, आ, ओ, शिकवीत बसणें आणि वर्षांनुवर्ष ही चिरचिर करीत बसणें हें कठीण काम आपण जें करीत आहां तेंच अुपयुक्त आहे. व्याख्यानमालेपेक्षां अशा संस्थाच मला अधिक आवडतात. अर्थात् नुसते. रिकामटेकडे चित्रपट मंडळ काढण्यापेक्षां व्याख्यानमाला बऱ्या. आपण व्यायामशाळा चालवितां हेंहि अुत्तमच आहे. आपणाला कोषाध्यक्षहि चांगले लाभले आहेत. कोषाध्यक्ष दोन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारचे असतात. अेक आलेला कोष घेअून त्यांतील अर्धे पैसे परत देणारे नी दुसरे आलेल्या पैशांत स्वतःची भर घालून परत करणारे. आपणाला दुसऱ्या तऱ्हेचे निधिधारक लाभले आहेत, हें पाहून मला आनंद वाटतो. आपल्या संस्थेला सुयश चिंतून मी माझ्या विषयाकडे वळतों.

आवश्यक तेंच बोलतों

मी घेतलेला विषय 'माणूस, माकड आणि टोळ.' हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. सध्याच्या परिस्थितींत तर तो विचारा आहेच आहे. कारण सध्यां धान्याची परिस्थिति कठीण आहे. गरीब नि श्रीमंत्र या दोघांनाहि ही परिस्थति सारखीच कठीण आहे. धान्य थोडें असल्यानें पूरक अन्न कसें मिळवावयाचें यासाठीं मोठमोठे लोक चिंताग्रस्त झालेले आपण पाहतों. वनमहोत्सव करतों आहोंत, पण झाडांना फळें येणारच दहावर्षांनीं. तिथपर्यंत आपण काय करावें ? देशाला ज्या वेळीं जें आवश्यक तेवढें मी बोलतों नाहींतर मी बोलत नाहीं. आज धान्यप्रश्न महत्त्वाचा म्हणून मी हा विषय घेतला.

अरे माकडांना मारतोस ?

केव्हां केव्हां असें दिसतें कीं आज माणसापेक्षां आपली अधिक प्रीति माकडावर आहे ! कारण काय तर रामचंद्रापासून त्यांचा आपला संधि झाला म्हणून ! ! जें आपण खातो तेंच माकडें खातात. जें काय 'छाप्यांत आलें तें आपण आजकाल खरें मानतों. तेव्हां मी आपल्याला छाप्योतीलच अुतारे वाचून दाखवितो. हें पहा ५ टक्के धान्य माकडें खातात. अुत्तर हिंदुस्थानांत हा माकडांचा लाख फार जर आपज अेखाद्या स्थानकावर अुतरलांत तर स्थानकअधिकाऱ्याआधीं तेथें माकडच आपणाला दिसेल. तें तुमचें अन्न खाअील. पण जर कां त्याला मारूं लागलांत तर लोकच म्हणतील 'अरे' माकडांना मारतोस '. आपणांतील धर्मवेडानें आपण असें करतों-माणूस अुपाशी मारून माकडाला जगवितो. ही 'भुतदया कीं भूतद्या ? '

दुसरें अुदाहरण पाहा:-बार्शी येथील गिरणींत अेक माकड मेलें. लोकांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याची प्रेतयात्रा काढली. त्याला शेंकडों स्त्री-पुरुष होते. शेवटीं त्या माकडाचा दहनविधि करून तेथें समाधि बांधली. अेकादा अनाथ माणूस मेला तर आपण त्याला हें करीत नाहीं. ही आपली भूतदया !

ही भूतदया नसून तीभुत-पिशाच्चावर केलेली दया आहे ! ! ज्या समाजाची जेथें असावी तेथें आस्था नसते आणि नसावी तेथें असते तो समाज नामशेष होतो, हें आपण लक्षांत ठेवा. आज आपणांस माणसें जगवावयाचीं आहेत, माकडें नाहींत !

कुठें हनुमान नी कुठें माकडें

माकडांना आम्हीं पूज्य कां मानतों तर तें म्हणे हनुमानाचे वंशज वानरांनीं केव्हां अेकदां रामाला त्रेतायुगांत साहाय्य दिलें म्हणून आजहि आमचें त्याच्यावर प्रेम. हनुमान हा आजच्या माकडांचा जे पूर्वज मानतात त्या भोळसटांना काय म्हणावें ? हनुमान हा अतिशय विद्वान् होता. लक्ष्मण रामापाशीं त्याच्या विषयीं म्हणतात:-

नूनं व्याकरणं कृत्स्नमनेन बहुधा श्रुतम् ।
बहुव्याहरतानेन न किंचिदपभाषितम् ॥

(अर्थ-व्याकरणाचें याचें प्रगाढ अध्ययन असलें पाहिजे. अितका वेळ बोलून यानें अेकहि अपशब्द वापरलेला नाहीं)

अितका हनुमान हा सुशिक्षित होता. त्याला व्याकरण अुत्तम माहीत होतें. वेदान्त्याप्रमाणें तो बोलत असें. सीतामाअीना अंगठी दाखवून त्यांचें सांत्वन करतांना हनुमानानें वापरलेली भाषा आपण वाचा. आणि आजच्या माकडाला अेखाद्या स्त्रीकडे पाठवा. पाहा तें काय चाळे करतें तें ? हें माकड काय त्या हनुमानाचे वंशज ? पूर्वी जातीचें अेकेक प्रतीक असें. जसें नाग. अर्जुनानें नागकन्येशीं लग्न केलें म्हणजे काय ? सरपटणाऱ्या सर्पिणीशीं लग्न केलें होतें ? आजहि रशियाचें प्रतिक दाखवितांना व्यंगचित्रांत आपण अस्वल (ऋक्ष) दाखवितों. ब्रिटिशांचें प्रतीक सिंह दाखवितों. तसेंज पूर्वीचे हनुमान वगैरे माणुसच होते. त्या जाति वनांत राहत म्हणून वानर. त्या वन्य जाती-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चेंहि प्रतीकचित्र वानर असे. रशियाचें प्रतीक वानरें नव्हतीं अस्वल. म्हणजे रशियन हे जसे अस्वलें नव्हत तसे या वन्य जातींचे प्रतीक वानर म्हणून त्यांचे हनुमंतादिक पुढारी आजच्या माकडासारखीं कांहीं माकडें नव्हतीं, त्या वानर जातीनाहि राक्षस त्रास देत. रावणाला जेव्हां विचारलें तूं सीतेला का त्रास देतोस तेव्हां दहा तोंडाच्या वीस मिशांवर पीळ देत तो म्हणाला, 'हा माझा परम धर्म आहे.'

राक्षसाणां अयं धर्मः परदार विघर्षणम्

ह्या समान शत्रुविरुद्ध राम–हनुमान सख्य झालें.

सर्व जात नष्ट करीन

बरें धरून चाला की आजचीं माकडें हीं हनुमानाचींच वंशज आहेत, तरीहि त्यांच्यावर दया करण्याचें कारण नाहीं. हेंच रामाच्या वागणुकीनेंहि सिद्ध होतें. कारण कीं वाली सुग्रीव युद्धांत वालीचा पराभव झाल्यावर सुग्रीव सीतेचा शोध न घेतां स्वस्थ बसला तेव्हां प्रभू रामचंद्रांनीं लक्ष्मणाच्या हस्तें त्याला निरोप पाठविला तेव्हां

न संकुचितः पंथा येन वाली हतोगतः ।
समये तिष्ठ सुग्रीव मा वालीपथमन्वगाः ।।
अेक अेव रणें वाली शरेण निहितो मया ।
त्वां तु सत्यादतिक्रांतं हनिष्यामि सबान्धवम् ।।

"वाली ज्या मार्गानें गेला तो मार्ग मोठा आहे तूं मला फसविलेंस तर तुझ्यासकट सर्व जात ठार करीन."

☆ यावरून हेंच सिद्ध होतें कीं वेडगळ लोक म्हणतात त्याप्रमाणें ☆
माकड जरी हनुमानाच्या पोटचें असलें तरी जोंपर्यंत तें माकड वा वानर आमचें काम करील तोंपर्यंत आमचें सहकारी ! पण, आज जें माकड आम्हांला त्रास देतें त्याला मारणें हेंच कर्तव्य ! जे बरोबर वागतात त्यांच्याशीं संधि, पण जे अुलट वागतात त्यांना मारच ! त्यांच्याशीं
☆ युद्धच केलें पाहिजे. हीं स्वतः रामचंद्राचींच वाक्यें आहेत. ☆

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुम्हीं म्हणाल आम्हांला कशाला हें सांगतां ? अडाणी शेतकऱ्यांना सांगा. पण सुशिक्षितांनीं नी अर्धवट आचार्यांनींच अशिक्षितांना ही वाहयांत भूतदया शिकविली आहे. मोठमोठ्याना ही शंका आली होती. गांधीजींच्या आश्रमांत अेकदां वानरांचा त्रास चालू झाला. तेव्हां त्यांनीं गंभीरपणें वृत्तपत्रांत प्रश्न केला 'ह्या माकडांना मारावें कीं नाहीं ?' पिसाळलेल्या कुत्र्यांना मारावें कीं नाहीं याचीहि चर्चा या असल्या आचार्यांनीं महिनोगणती चालविली होती.

☆ कोणताहि सद्‌गुण अति झाला कीं तो दुर्गुण होतो. हा धर्मभोळेपणा वाओट जोंपर्यंत कोणीहि प्राणी मनुष्यमात्राच्या अुपयोगीं पडेल तोंपर्यंत तो चांगला; नाहींतर तो वर्ज्यच होय. जर तुम्हांला जगावयाचें असेल तर असें वागा, नाहींतर अुलट वागा. मरणाचा मार्ग मोकळा आहे. ☆

मला टोळ व्हावेसें वाटतें

आतां दुसरें अुदाहरण टोळांचें ! हे वाळवंटांत अुत्पन्न होतात ही अलिकडेच छाप्यांत आलेली वार्ता अैका. मी वाचतों, "होशीयारपूर जिल्हयांत पांच सहस्र मण धान्य नी छत्तीस गांवें टोळांनीं नाहींशीं केलीं. टोळ हा लहान प्राणीं आहे पण संघटनेमुळें त्यांच्यांत फार मोठी शक्ति आली आहे. त्यांचे प्रचंड थवे बाराबारा मैल भूमीवरील आकाश व्यापून अितक्या दाटीनें निश्चित् मार्गानें चाललेले असतात कीं दिवसां सूर्याचें दर्शनहि होत नाहीं. अंधःकार पडतो. त्यांची प्रजाहि फार झपाट्यानें वाढते.

आतां दुसरी ताजी वार्ता अैका. पतियाळा जिल्हयांत ७५ टक्के पीक नि सदुसष्ट खेडीं टोळांनीं बेचीराख केलीं. हे टोळ पर्शियांत अुत्पन्न झाले होते. १६०० मैलांत टोळांनीं अंडीं घातलीं, पण अमेरिकेनें विमानें पाठवून त्यांचा नाश केला. त्यासाठीं औषधें काढलीं. पण आम्हीं तीं काढणार नाहीं (सा....२८)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारण आम्हांला टोळ तर काय पण बाहेरचे टोळभैरव जितके येतील तितके हवेच आहेत ! टोळ नुसतें अुत्पन्न खात नाहींत तर शेतांत निजविलेलीं लहान बालकें सांपडलीं तर क्षणार्धांत त्यांचें सारें मांस खाअून टाकतात. आतां टोळांच्या नाशासाठीं आपल्या देशांतहि अेक टोळ तज्ज्ञ-समिति नेमली आहे. त्या समितीच्या कक्षेंत टोळभैरव येतात कीं नाही मला माहीत नाहीं. भारत सरकार आतां तरी टोळांविरुद्ध लढाअी करणार आहे. अितर लंढाया आम्हीं लढत नाहीं. पण टोळांविरुद्ध लढतों हें तरी काय कमी झालें ? लढतों हेंच विशेष. आता राजाज्ञाच टोळ मारण्याची आहे. त्याकरिता प्रचार नी स्वयंसेवकहि नेमले आहेत.

टोळ कीं माणूस ?

पण ह्या टोळ मारण्याला आमच्या लोकांचाच विरोध आहे. रामानें माकडांशीं संधि केला, पण टोळांशीं कुणीं संधि केला ? पण शेतकरी म्हण-तात टोळांच्या पंखावर रामाचें प्रतिबिंब असतें ! रामाच्यावेळीं कांहीं छाया-चित्रकला नसावी मग ही छाया आली कोठून ? भोंगळ भूतदयेच्या कल्प-नेंतूनच ना ? पण या टोळमारीविरुद्ध गुजराथेंत शेतकऱ्यांनीं अलिकडेच बंड केलें. टोळांची हत्या होअू नये म्हणून शेतकऱ्यानीं शिपायांना मारलें. टोळांची हत्या थांबविण्यासाठीं; आपलें अन्न नासविणाऱ्या टोळांचा संहार थांबविण्यासाठीं; माणसांना मारलें ! काय म्हणावें या भूतदयेला ? पूर्वीं मुसलमानहि गाअींचा कळप पुढें करून मागून सैन्य पाठवित. गाय मारा-वयाची नाहीं या खुळचा समजुतीनें हिंदु मागें हटत. मुसलमान पुढें येत. अशा वेळीं आपण याच गाअी मारल्या असत्या तर पुढें मुसलमानी राज्य आल्यामुळें मारल्या गेलेल्या लक्षानुलक्ष गाअींचे नी लाखो गोरक्षकांचे प्राण वांचले असते गोभक्षक येथें दिसले नसते. रामानें संधि केला म्हणून माकडांना मारावयाचें नाहीं, पण रामाच्या वंशजांना मात्र मरूं द्यावयाचें ? काय ही आपली अुलटी नीति ! संरक्षण द्यावयाचें माकडाना, टोळांना, पण हिंदूना मात्र नाहीं ! अशी ही आपली भूतदया आहे. जं जें माणसांना अुपयुक्त तें तें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भूत, त्यावर दया करावी पण माणसाना अुपद्रव देणाऱ्या भुतावर, पिशाच्चांवर दया मात्र करूं नये. भुतांनीं आमचीं सिंहासनें घेतलीं नाहींत, पण भूतदयेनें मात्र आम्हांस पराभूत केलें आहे.

नृसिंहाची पूजा करा

आणखी अेक अुदारहरण पाहा. आपण लोक नागाची पूजा करतों. नागनरसोबाची पूजा करणाऱ्या स्त्रियांना विशेषतः मी सांगतों, तुम्हीं नागाची पूजा करूं नका, नरसोबाची–नृसिंहाची पूजा तेवढी अवश्य करा. आज आपणाला नृसिंहाची आवश्यकता आहे. ही अेक वार्ता अैका. मी वाचतों. छाप्यांतीलच आहे हं ! म्हणजे तुमच्या समजुतीप्रमाणें खरी आहे. शिराळ्यांतील लोकांनीं नागपंचमीच्या दिवशीं दहा नाग आणि पंधरा नागिणी धरून आणल्या. त्यांना दूध पाजलें. त्यांची पूजा केली. नी परत त्यांना वारुळांत सोडून दिलें. याचा परिणाम अर्थातच हा होणार कीं पुढच्या वर्षाच्या आंत त्या दुष्ट नागाची वीण अेक सहस्रानें वाढणार ! याला काय भूतदयेचा अुत्सव म्हणावयाचा ? त्या नागाला काय अक्कल असते ? त्याच्यावर जो दया करतो त्याची ही चूक आहे.

अेका साधूची गोष्ट

आतां मला माहीत असलेल्या अेका साधूची गोष्ट सांगतों. माझ्या 'गोमांतक' काव्यांत मीं ती दिली आहे. अेक साधू होता. त्यानें अनेक प्राणी पाळले होते. आणि ते सर्व खेळीमेळीनें असत असें त्याचें म्हणणें. तो म्हणें असे साप चावतात याचें कारण तुम्हीं त्यांना चिडवितां म्हणून. तुम्ही प्रेमानें वागा, तेहि तुमच्याशी प्रेमानें वागतील. पण अेक दिवस काय झालें, तो साधू निजला होता. शेजारीं सापहि होता. झोपेंत त्या साधूचा हात त्या सापावर पडला. झालें, साप त्या साधूला चावला नी तो साधू मरण पावला. त्या सापाला काय माहीत साधूनें रागानें हात मारला कीं झोपेंत हात पडला तें ! त्याचा धर्म, तो चावला. अशा भोळेपणानें आपण वागूं नये.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अहिंसा कुठपर्यंत पाळावी ह्यालाहि नियम आहेत. कांहीं लोक म्हणतात अहिंसेला अपवाद नाही.

☆ पण हें चूक आहे. मनुष्याला जी हिंसा अुपकारक होओील ती हिंसा अहिंसाच होय. अुलट जी अहिंसा मनुष्याला मारक होओील ती अहिंसा, हिंसा आहे ! ☆

अेक सत्यकथा

अेकदा अेका अहिंसाचार्यांना मोठा प्रश्न पडला. अेका ठिकाणीं चार मुलें खेळत होतीं. तेथें अेक साप आला. तेव्हां कांहीं लोक सापाला मारण्यास धांवले. पण त्यांचे गुरु अर्धवट अहिंसाचार्य म्हणाले, अरे, सापाला मारूं नका ? ' त्यावर अुलट प्रश्न झाला, ' अहो, पण मुलें मरणार त्याचें काय ? ' त्यावर अहिंसाचार्य म्हणतात, ' अहो, त्यांचें आयुष्य भरलें. त्याचें दैव ! हा दोष दैवाचा. तीं मरतील. पण आपणहून सापाला मारूं नये ! ' त्यावर अेकानें झणझणीत प्रत्युत्तर दिलें, ' **अहो, मुलांचें दैव म्हणून जर तीं सापाकडून मरणार असतील.** तर **सापाचें दैव म्हणून** तो आमच्याकडून **कां मरूं नये ? साप मरेल त्याच्या दैवानें त्याचें पाप** आम्हांला नाहीं. '' असें म्हणून त्यांनीं साप मारूनच टाकला. ही झाली तोडीस तोड. साप दिसला कीं त्याला मारावा दूध कधींहि पाजूं नये. कांहीं लोक हिंसा पाळण्यासाठीं काय करतात. सापाचे दांत पाडून त्याला सोडून देतात. त्याला मारीत नाहींत. महंमद घोरीला नाहीं कां पृथ्वीराजानें अनेक वेळां सोडून दिला ? पण तोच दांत पडलेला महंमद घोरी दांत आल्यानंतर परत आला नि शेवटीं त्यानें काय केलें तें आपण जाणतांच ! बरें समजा त्या सापाला विषारी दांत आले नाहींत तरी त्या सापाला दुसरी सर्पीण भेटून त्याची विषारी प्रजा वाढते तिचें काय ? अशा दांत पाडलेल्या अेका सापाचे, शंभर विषारी दांतांचे साप होतात. **पहिलाच साप मारला कीं सर्व थांबूं शकेल.** तेव्हां **साप म्हटला, नाग म्हटला कीं त्याला दूध न पाजतां त्याला मारणें हेंच कर्तव्य ठरतें.**

आतां समारोपांत भूतदयेचें स्वरूप थोडक्यांत सांगतों. म्हणजे भूतदया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्रा सद्‌गुण केव्हां ठरूं शकतो आणि भूतदया हा दुर्गुण केव्हां ठरूं शकतो तें तें स्पष्ट होअील. मानवी धर्म हा--अभ्युदयार्थच असणार ! यासाठीं भूतदया हा मानवाचा धर्म तेव्हांच ठरूं शकतो कीं जोंपर्यंत मानवाना अुपकारक असलेल्या प्राण्यांचें लालन करण्यांत येतें. अशा गाय, म्हैस, शेळी, कुत्रा, घोडा, गाढव अित्यादि मनुष्याला अुपयुक्त असणाऱ्या प्राण्यांविषयीं योग्य ती दया दाखविली पाहिजे. आणि तीहि ते प्राणी मनुष्यांना अुपद्रव देअूं लागले नाहींत तोंपर्यंतच. कुत्रा झाला पण तो जर पिसाळला तर त्याला तत्काळ गोळी घालून ठार मारलें पाहिजे. त्यासाठीं अर्धवट अहिंसाचार्यांकडून शास्त्राधार मागणें म्हणजे आपल्याच भाबडेपणाचें प्रदर्शन करणें होय. अशी सापेक्ष भूतदया जी आहे तीच काय ती पुण्य होय. सद्‌गुण होय. परंतु साप, नाग, विंचू, टोळ, वाघ, लांडगे, प्रभृति मनुष्यांना केव्हांहि केवळ अुपद्रवच काय तो देणारे जे प्राणी आहेत, त्यांच्यांतील कांहीं धादांत मनुष्यभक्षकच आहेत. त्यांच्यावर दया करूं नये. त्यांच्यावरहि दया करणारी आत्यंतिक भूतदया ही पुण्य नसून आत्यंतिक पाप आहे. मनुष्येतर प्राण्यांमधील तिसरा अेक वर्ग असतो. जसा माकडांचा. त्याचें आणि माणसाचें अुपजत हाडवैर नसतें.

☆ **ते जोंवर मनुष्यांना कोणचाहि** अुपद्रव न देतां आपापल्या वनांतून वा स्थळांतून वावरताहेत तोंवर ते अुपेक्षणीय समजतां येतील. परंतु जेव्हां मनुष्याचें ज्यावर जीवन अवलंबून आहे अशा खाद्यवस्तूच खाअून जगूं पाहतात, मनुष्यांच्या वस्तींत जथ्यानें शिरून भयंकर अुपद्रव देअूं लागतात तेव्हां त्यांचाहि नाश करणें हीच खरी भूतदया होय. ☆

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माणसांनों ! माकडें व्हा ! : : २९

✠ ✠ ✠

[स्वातंत्र्यवीर सावरकरांचा हा लेख 'मनोहर' मासिकाच्या एप्रिल १९३५ च्या अंकांत प्रसिद्ध झाला.]

✠ ✠ ✠

मनुष्याविषयीं माकडाचें मत

वर्तमानपत्राचा बातमीदार होणें हेंच ध्येय पुढें ठेवल्यामुळें स्वतःचें मूळचें गांवसुद्धां साफ विसरून जाऊन ज्या अेकनिष्ठ बातमीदारानें स्वतःस चित्रगुप्त हेंच साभिप्राय नांव काय तें ठेवून घेतलें आणि त्या नांवास साजेल अशा अितर बातमीदारास अगदीं अगम्य असणाऱ्या प्रदेशांत नी विषयांत शिरून तेथील अत्यद्भूत बातम्या प्रसिद्धिण्यांत त्याचा हात जगांतील कोणीहि धरूं शकत नाहीं अशी ज्याच्या स्वतःच्या असाधारण तज्ज्ञतेविषयीं प्रामाणिक समजूत आहे, त्या 'चित्रगुप्तांनीं' मनुष्याविषयीं माकडाचें ताज्यांतलें ताजें मत काय आहे तें समजावून घेण्यासाठीं अेका सुप्रसिद्ध माकडाची भेट घेअून ती सारी मनोरंजक माहिती आमच्याकडे धाडली आहे. ती जशीच्या तशीच, 'मनोहर'च्या वाचकांचें मन क्षणभर तरी हरण करण्यासारखी अेक करमणूक म्हणून तिकडे पाठवीत आहों.

श्रीयुत चित्रगुप्ते यांच्याविषयीं आम्हांस या त्यांच्या पत्रांत लिहिलेल्या वृत्तावांचून कांहींहि अधिक माहिती वा परिचय नाहीं.

मनुष्येतर प्राण्यांची भेट घेअून त्यांचीं मतें आमच्या आजच्या मनुष्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समाजांतील प्रचलित विषयांवर काय आहे हें समजावून घेण्याच्या कामांतील मुख्य अडचण म्हणजे भाषा !

भाषा मनुष्याला तेवढी आहे, अितर कोणत्याहि प्राण्याला ती देणगी नाहीं अशी अनेक विद्वानांची समजुत आहे. डार्विननें माकडाच्या देहरचनेंत नी मनुष्याच्या देहरचनेंत हडूक नी हडूक मोजून जें विलक्षण साम्य आहे तें पुढें केलें. कांहींजण म्हणाले " पण मनुष्य हसतो, तसें माकड वा वानर हंसतें कुठें ? हंसणें हा मनुष्याचा विशेष तो ज्या अर्थी माकडाच्या कोणत्या क्रियेपासून विकासला हें दाखविता येत नाहीं, त्या अर्थी मनुष्य ही स्वतंत्र सृष्टि आहे. माकडाचाच विकास–अिव्होल्यूशन नव्हे ! पण नंतर प्रयोगांतील माकडें-वानरें हीं हंसतात हें सिद्ध झालें. त्यांच्या त्या अपरिपक्व हंसण्याचाच विकास म्हणजे मनुष्याचें आजचें दोन दोन तीन तीन मजली मनमोकळें खो खो हंसणें हें होय. विकासवाद्यांच्या विरुद्ध हंसण्याचा हा पुरावाहि डळमळला तेव्हां मॅक्सम्युलरनीं तो पुरावाहि अनिश्चित समजून अगदीं सुनिश्चित पुरावा म्हणून जो पुढें केला तो म्हणजे भाषा. मॅक्सम्युलर म्हणत कांहीं झालें तरी ज्या अर्थी माकडावानरांस भाषा नाहीं आणि अगदीं रानटींतल्या रानटी माणसांनाहि भाषा आहे त्या अर्थी माणूस हा माकडापासून विकासलेला प्राणी नव्हें.

भाषाशास्त्र्यांनीं हा जो आक्षेप विकासवाद्यांवर अिव्होल्युशनिस्टवर घेतला तो कांहीं काळ कांहींजणांना अितका अनुत्तरणीय (अन्‌ॲन्सरेबल) वाटला कीं, मनुष्य हा माकडाची अुत्क्रांति आहे असें म्हणणाऱ्या विकासवाद्यांना या आक्षेपाचा विचार करणें भाग पडलें. मनुष्य म्हटला कीं भाषा आहे; माकड - वानर म्हटला कीं भाषा नाहीं, हा आक्षेप खुडायचा तर दोनच मार्ग अुघडे होते. अेकतर भाषेवांचून असणारी मनुष्याची अेखादी जात तरी शोधून काढायची, नाहींतर माकडावानरानाहि भाषा आहे हें तरी सिद्ध करावयाचें. या दोन्हीहि गोष्टी सिद्ध झाल्या तर अुत्तमच; तेव्हां वर दिलेल्या दोन्ही बाजूंनीं अवलोकनमूलक शोध चालला. अेका बाजूस भाषेवांचून मनुष्य सांपडतो कीं नाहीं, याचा शोध करतां करतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगदीं रानटींतल्या रानटी जातींपैकीं कांहीं जाती अशा सांपडल्या कीं ज्यांच्या भाषेच्या प्रचंडांतील प्रचंड विश्वकोषांतहि फारफार तर पाऊणशें शब्द सांपडूं शकावेत. अगदीं भाषा नसलेला मनुष्यगट जरी सांपडेना तरी पाऊणशे शब्दांतच अवघा आयुष्यक्रम निभावतां येणारी अशी मनुष्य-संस्कृति असूं शकते अितकें अेका बाजूस सिद्ध होत असतांच दुसऱ्या बाजूस अनेक आश्चर्यकारक प्रयोगांतीं असें सिद्ध करतां आलें कीं, माकडा-वानरांना निदान वीस पंचवीस शब्दांची भाषा तरी येतेच येते आणि त्यांचे व्यवहार त्या त्या मर्कटीय भाषेंतच चालतात ! तो शोध लावण्यासाठीं अगदीं आफ्रिकेच्या ज्या दुर्गम अरण्यांतून मनुष्याच्या जवळ जवळ सारखे ज्यांचे देह आहेत अशा गोरीला, ओरांग ओटांग प्रभृति वानरांचे कळप अगदीं प्राचीनतम स्वतंत्रतेनें अजूनहि वावरत आहेत, त्या अरण्यांत जाअून कांहीं वैज्ञानिक लोक राहिले. वानरांचे नी माकडांचे निरनिराळे संवादासारखे भासणारे प्रसंग साधून त्यांचें ध्वनिलेख (फोनोग्राफ्स्) घेतले त्या ध्वनिलेखाच्या तबकड्यांस न दिसेल अशा बेतानें लावून त्यांच्यांतील प्रत्येक भागाच्या ध्वनीसरशीं त्या प्राण्यांच्या काय हालचाली हाव भाव, अुत्तर प्रत्युत्तरें निश्चितपणें होतात त्यांचें परीक्षण नी वर्गीकरण करून शेवटीं कोणत्या वस्तूस वा भावनेस व्यक्तविण्यास तें प्राणी कोणचा ध्वनिसमुच्चय योजतात तें ठरविलें ह्या विद्वानांची अशी निश्चिति त्यायोगें पटली कीं, मर्कटीय भाषा म्हणून अेक भाषा आहे तिचे निदान वीस पंचवीस शब्द तरी निश्चियले जाअूं शकतात. आणि त्या भाषेनें वानरमर्कटांशीं त्या त्या वस्तुभाव-भावनांपुरतें संभाषण करतां येतें. ह्या भाषेचे अधिक शब्द मिळविण्यास्तव अजूनहि प्रयोग चालूं आहेत.

सत्तर अैंशी शब्दांचीच काय ती अप्रगत भाषा असणारा रानटी मनुष्य नी पंचवीस शब्दांच्या भाषेपर्यंत प्रगति झालेला सुधारलेला मर्कट--ही जोडी अेकत्र शेजारीं बसविण्यांत माकडापासून मनुष्य विकसला हें मत भाषा-दृष्टीनेंहि असमर्थनीय नाहीं असें सिद्ध झालें. पण कांहीं झालें तरी केवळ वानरीय वा मर्कटीय भाषा मनुष्याच्या आजच्या विविध, विशाल नी जटिल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवहाराविषयींची नी संस्कृतीविषयींची सविस्तर चर्चा करण्यास कशी पुरी पडणार ! रात्रंदिवस ती चिंता श्री. चित्रगुप्ते यांस लागून राहिली. पण अुपाय सुचेना.

अेक दिवशीं अकस्मात् त्यांच्या मनांत अेक विचार आला. सध्यां परलोक विद्यातज्ज्ञांनीं जी भूतभाषिका (प्लँचेट) किंवा 'बोलभूती' म्हणा हवें तर-शोधून काढली आहे, तिचा अुपयोग केला तर ! त्या प्लँचेटचा हा विशेष गुण आहे म्हणतात कीं, आत्मा कोणचीहि भाषा बोलणारा असला तरी तो त्याचे विचार जो मध्यस्थ (मिडियम) असेल त्याच्याच भाषेंत व्यक्तवूं शकतो. जर मध्यस्थ मराठी असेल तर ज्यूलियस सीझरचें भूत देखील त्या 'बोलभूती'वर (प्लँचेटवर) बोलावतांच शुद्ध मराठींतच बोलूं शकतें मग आपण जर ह्या जिवंत मर्कटाच्या नादीं न लागतां त्यांच्यांतील अगदीं अलिकडेच मेलेल्या अेखाद्या थोर मर्कट यूथाधिपाच्या भूतासच त्या 'बोल भूतीवर' बोलावलें तर थेट आजच्या मराठींत त्या माकडाचे विचार तो व्यक्तवूं शकेन-मी समजूं शकेन. मनुष्याच्या आजच्या संस्कृतिविषयीं नी प्रगति विषयीं माकडांचें काय मत आहे. तें अगदीं माकडांच्या शब्दांत व्यक्तविण्याचें नी प्रकाशिण्याचें अपूर्व यश पहिल्या प्रथम मिळवून मी साऱ्या बातमीदार जगांत अेक असामान्य शककर्ता म्हणून गाजणारा अशा अर्थानें ते 'बोलभूती'कडे धांवले.

कितीतरी वेळ चुचकारतां चुचकारतां शेवटीं अेकदांची ती 'भूतभाषिका' (प्लँचेट) श्री चित्रगुप्ताच्या प्रश्नास सांकेतिक ठोक्यांची अेखाद्या तारायंत्रासारखीं खटाखट अुत्तरें देअूं लागली. अुत्सुकतेच्या आवेगानें चित्रगुप्त्यांनी प्रश्न विचारला—,

" आफ्रिकेच्या निबिड अरण्यांमधील यच्चयावत् मर्कटयूथ ज्यांच्या पराक्रमाच्या स्मृतीनें अजूनहि थरथरतात तें दहा वर्षांपूर्वीं परलोकवासी झालेले मर्कटाधिपति तेंच ना आपण ?"

भूतभाषिकेवर अुत्तर आलें,

" होय !"

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"मी अेक वृत्तपत्रीय वार्ताहर आहे. बातमीदार ह्या नात्यानें मी आपली भेट घेअूं अिच्छितों. पण क्षमा असावी, आपल्याला आम्हीं मनुष्यें, वृत्तपत्रें वार्ताहर अित्यादि कशास म्हणतों, या संस्था काय आहेत, याची माहिती आहे असें गृहीत धरून मी चालूं ना ?"

"निःशंकपणें ! आफ्रिकेसारख्या गहनारण्यांत जरी कांहीं माकडांना या तुमच्या मानवी संस्कृतीच्या अगदीं ताज्यांतील ताज्या अुलाढालींचा पत्ता नसला तरी आमचीं शेंकडों माकडें तुमच्या मोठमोठ्या राजधान्यांतून, देव-स्थानांतून, घाटांवरून नी हाटांतून सारखीं वावरत असतात. आम्हांस तुमच्या सुधारणांची आणि कुधारणांची बित्तंबातमी असते. आणि आम्हीं तुमच्या त्या मानवीय सुधारणेची आमच्या मर्कटीय सुधारणेशीं तुलना करून तिची समालोचनाहि करूं शकतो. त्यांतहि मी तर स्वतः तुमच्या अुन्नतांतील अुन्नत देशांतून फिरून मानवीय सुधारणेच्या सर्व अद्यावत् आविष्कारांस अभ्यासिलें आहे. मला तशीच विशेषश संधि मिळाली !"

"ती कशी ? आफ्रिकेच्या निबिडारण्यांत आपण अर्वाचीन देश विदेश पर्यटिलेत तरी कोणच्या निमित्तें, कोणच्या मार्गें ?"

अिंग्लंडच्या बलाढ्यराजाला आफ्रिकाखंडाचा मर्कटाधिपति असतो तरी कसा हें पाहण्याची अुत्कंठा अेकदां लागली. यास्तव त्यांनीं आम्हांस नानाप्रकारें समजावून त्यांच्या अगदीं पहिल्या प्रतीच्या आगबोटीवर चढविलें, पहारेकरी सदोदित ज्यापुढें अुभे आहेत अशी अेक राखीव स्वतंत्र केबिन—ज्यास अडाणी लोक पिंजरा म्हणतात—त्यांत आमच्या मर्कटीय अैश्वर्यास साजेल अशी अुत्तमोत्तम फळफळावळ प्रभृति सुखसोयींची व्यवस्था केली आणि अिंग्लंड देशास नेलें. धक्क्यावर अुतरतांच अिंग्लिश लोकांच्या झुंडीच्या झुंडी आमच्या दर्शनास लोटूं लागल्या. स्त्रियां मुलें यांची तर नुसती दाटी अुडाली. प्रत्यक्ष लंडनमध्यें मोठ्या थाटानें आम्हीं प्रवेशलों. शेवटीं अेका सुंदर नी विस्तीर्ण राजकीय अुपवनांत आम्हांस ठेअून घेतलें !"

"त्या स्थलाचें नांव काय ?"

"झू म्हणजे झूऑलॉजिकल गार्डन, म्हणजे 'जीवालय अुद्यान' !"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या विश्र्यांत जीवालयांत आमची स्वारी असतां प्रत्यक्ष अिंग्लंडचा राजाहि आमच्या दर्शनास आला नी आमच्याविषयी नानाप्रकारचे कुशल प्रश्न विचारून हस्तांदोनहि करून गेला ! त्यांतहि ह्या लोकांत आल्यापासून मी मानवी वाङमयहि अभ्यासिलें आहे."

"अुत्तम कारण; आपली भेट घेण्याचा माझा अुद्देश त्यायोगेंच सफळ होणार आहे. माझ्या प्रश्नाचें संमीलित अुत्तर देण्यांस जसा विद्वान् हवा होता तसाच मर्कटयुवक मला लाभला याविषयीं मी स्वतःस धन्यवादितों! बरें आमच्या या अद्ययावत् मानवी प्रगतीचा आम्हां मनुष्यास अत्यंत अभिमान वाटत आहे. आपणांस काय वाटतें ?"

"अुद्वेग, तिरस्कार !"

"कां बरें ?"

"कारण आपली स्वतःची सनातन संस्कृति नी सनातन धर्म–येनास्य पितरो याता ये नयाता: पितामहा:'–तो सोडून मनुष्य हा भलत्याच मार्गाला लागला आहे ! तुम्हीं मनुष्यें म्हणजे आम्हां माकडांचे वंशज. डार्विनप्रभृति कित्येक मनुष्यासहि हें सत्य मान्य आहे. मग बाबानों तुमचें खरें पूर्वज जे मर्कटाचार्य त्यांनीं आचरलेली नी अुपदेशलेली जी मर्कटीय संस्कृति नी धर्म तोच तुमचा खरा आद्य, सनातन म्हणजेच पुरातन धर्म नव्हे काय ; पण ती मुळची साधी, सोपी, समाधानी, सनातन संस्कृति सोडून तुम्हीं माणसे या तुमच्या आजच्या अत्यंत कृतिम, क्लिष्ट नि कट्टया यांत्रिक संस्कृतीच्या नादीं लागल्यानें तुमचा केवढा अधःपात होत आहे तें पहातच नाहीं ! साधी राहणी सोडून तुम्ही सुधारणेंच्या मागें लागलांत तेव्हांपासूनच तुमचा अधःपात होत होत तुम्हीं माकडांचीं माणसें झालांत, सुखाचा जीव दुःखांत घातलांत !"

"पण डार्विनसाहेब माकडापासून माणूस झाला हें जरी मानतात तरी तो अधःपात म्हणत नाहींत तर माकडाचा माणूस हा विकास आहे, ही अिव्होल्यूशन आहे असें म्हणतात."

"डार्विन चुकला तें अिथेंच ! त्याला अर्धवट सत्य काय तें कळलें !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संसाराचा पसारा वाटेल तितका वाढविणें आणि यंत्रांचे दास होणें म्हणजे 'विकास' कां अधःपात ?

"आपण आपलें तत्त्व अेकदोन अुदाहरणें देअून विशदाल काय ?"

"नुसत्या आहाराचीच गोष्ट अुदाहरणार्थ घ्या ! तुम्हां माणसांनीं तुमच्या जिभेची रुचि किती विकृत करून ठेविली आहे, पाहा! अर ह्या चुली, फुंकण्या, तीं आवेलें, ते धूर तीं धुराडीं कायरे यांवांचून अडलें आहे ? मूळ रस जे पांच सहा, सात म्हणा–कोणचा आठवा रस ह्या लाटणी पोळपाट किसण्या, विळ्या, भट्ट्या, तळणीं, दळणीं ह्या अुपद्व्यापानंतर तुम्हीं शोधून काढला आहांत सांगा ! जिभेचे चोचले पुरविण्यासाठीं तुम्हांला किती त्रास पडतो नी पुन्हा नवा असा अेकहि रस मिळत नाहीं–हें तुमच्या कसें ध्यानांत येत नाहीं ? पण आम्हां माकडांचें अन्न पाहा ! सृष्टि आमची स्वयंपाकीण, सूर्य आचारी ! ना धूर ना धूराडें ! भूक लागण्याचा अवकाश, भूभूकार करीत दहापांच झाडांवरचा कोवळा रुचकर पाला ओरबाडून तोंडांत टाकला नी आंबे, केळीं, द्राक्षें, मोसंबीं, खजूरप्रभृति पंचपक्वान्नांच्या तोंडांत मारणारीं फळें तोंडांत घातलीं कीं झालें आमचें जेवण. आंबट हवें तर चिंच खाल्लीं, गोड हवें तर आंबा खाल्ला, तुरट हवें तर पालवी ! तुम्हीं मूर्ख मानव त्या सुरेख सृष्टिसहज शाकांना पालवीना, फळांना शिजवितां काय, मुरवितां काय, तळतां काय ! ताज्या शाकांना, हिरव्यागार वनस्पतींना, शिजवून तळून त्यांचा नुसता बोजवारा अडवितांना तुम्हांला कळत नाहीं. का रे, कीं, त्यातलें व्हिटॅमिन अे, बी, सी, डी, अी, अेफ् सारीं नाश पावतात तें ? पंगतींचा तरी कोण तो निरर्थक धिंगाणा ! ताटांचा पाटांचा, काटचांचा, वाट्यांचा, टेबलाचा नी टावेलांचा कोण तो खटाटोप ! तें 'घ्या घ्या' काय, 'वाढा हो वाढा,' काय, 'पुरे, नको घाला'–जशी लढाअी चालली आहे अेखादी ! बरें त्यायोगें तुमच्या नैसर्गिक चावण्यांत, चघळण्यांत, गिळण्यांत कोणची नवी शोभा आली आणि माकडाहून ह्या नैसर्गिक व्यापारांत तुमच्या या दिखाअू नी कृत्रिम मुकटे पैठणी नेसलेल्या संस्कृतीनें तुम्हीं माणसें कोणच्या दृष्टीनें अधिक सभ्य दिसूं लागतात तें तरी सांगा ! अगदीं थोरां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तला थोर असा तुमचा पोप घ्या, शंकराचार्य घ्या, कवि घ्या, कैकाडी घ्या, जेवतांना जेव्हां तुम्हीं घास गालफडांत कोंबता, किंवा मचमच चघळतां, किंवा आ करून तोंडांत तो घेतां–तेव्हां अेकमेकांकडे अेकदां बघून तर पाहा. थेट अगदीं आम्हीं माकडें जेवतांना दिसतों तशीं तुमचीं तीं तिरपीं शिरपीं चघळतीं तोंडें दिसतात कीं नाहीं तीं !

बरें देवाच्या नी धर्माच्या दृष्टीनेंहि आमचा आहार किती शुद्ध, हिंसाशून्य आहे. पाहा ! बैलांना कष्टवून आम्हीं नांगरीत नाहीं. 'हिंसाप्रायां पराधीनां कृषिं वर्जयेत्' हें मूळ सूत्र मर्कट स्मृतीचें. तें तुम्हां मानवांच्या स्मृतींत तुम्ही नुसतें अुतरून वाङ्मय चौर्याचें तेवढें पाप केलेंत, पण तसें आचरण्याचें पुण्य मात्र जोडलें नाहींत. कारण तुमचा जो तो स्मृतिकार 'कृषिं यत्नेन वर्जयेत्' हा श्लोक म्हणत म्हणत भातावर नी लाडवावर हात मारतो आहेच आपला ! मुसलमानी धर्माचा खलिफा कोंबड्या खातो आहे, ख्रिस्त्यांचा पोप मांस खातो आहे ! पण आम्हीं माकडें पाहा कधीं तरी असें क्रूर अन्न खातों का ? पोटासाठीं प्राणिहत्या करतों कां ? अहिंसक जैनांनीं देखील आम्हाला आदर्श मानावें अितक्या निर्विवादपणें आम्ही हिंसेच्या दोषापासून अलिप्त आहों. फारच त्रास झाला तर अंगावरच्या अुवा पिसवा दांतांत पकडून कचाकच ज्या काय चावत असूं तेवढीच काय ती हिंसा ! पण 'आततायी वधे दोषो हन्तुर्भवति कश्चन' हें तत्त्व जैनांना देखील मान्य असून तेहि 'मन्युस्तन्मन्युर्हति' असेंच म्हणतात.

"मांसाहार तर दूरच, पण गाअी म्हशी प्रभृति दुभत्या पशूंचें दुध त्यांच्या कच्च्याबच्च्यांचीं तोंडें हिसडून आपल्या चरव्यांतून ओतून घेण्याचें पापदेखील आम्हीं माकडें करीत नाहीं. अहो आमच्या माकडांत गवळ्यांची जातच नाहीं, 'डॉक्टरनें सांगितलें म्हणून बकरीचें तेवढें दूध पितों' अशा ढोंगानें देखील आम्हीं गायींचें तर काय पण बकरींचें दूध देखील पीत नाहीं. रक्तमांसासाठीं बोकड पाळणें नी दुधासाठीं बकरी पाळणें हें आम्ही सारखेंच त्याज्य समजतों. दूध हेंहि रक्तच नव्हे काय अेकप्रकारचें ? "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" आपण म्हणतां तेंच विचार कोणाकोणा मानवी ग्रंथकारांनींहि व्यक्तविले आहेत खरेंच ! "

" सहाजिक आहे ! असा ग्रंथकार मनुष्यांत अेखाददुसरा अधूनमधून निघणारच ! कांहीं झालें तरी मनुष्यांत त्याच्या मूळच्या माकडपणाचे थोर गुण आनुवंशाच्यामुळें लेशमात्रतरी मधूनमधून प्रकटणारच. यासाठीं मनुष्यानें आजचें हें कलियुगीन कृत्रिम नी यांत्रिक जीवन सोडून त्या सत्ययुगीन साध्या राहणीचें जंगली जीवन अनुसरावें असें अुपदेशिणारा अेखाददुसरा थोर पुरुष निघतो. 'तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्' दुसरें काय ! यालाच पूर्वानुवृत्ति, मूळ पूर्वजांचे गुण प्रकटणें असें म्हणतात ! "

" बरें मनुष्याच्या आजच्या खाण्याविषयीं माकडांचें मत काय तें साधारणतः माझ्या ध्यानांत आलें, पण--"

" पण काय ? तेंच पिण्याविषयीं ! पिण्याच्या प्रकरणीं तर मनुष्य हा माकडाचा विकास कीं अःधपात हें न सांगतांहि तुमचें तुम्हांस कळलें पाहिजे. अरे अुसाचा रस, आअिसक्रिम, लेमोनेट, सोडा, सायरपें, सरबतें— काय हा कृत्रिमपणा नी अनैसर्गिकपणा ! काय हे चोचले ! कशाला रे हवेत हे पेले, रामपात्रीं, फुलपात्रीं, गडू, झाऱ्या, कप, ग्लासेस, टमरेलीं, वंपरें ! — बाप रे ! बाप रे ! काय हा नसता अुपद्व्याप नी कटकट तुम्ही माणसांनीं नुसतें पिण्यासाठीं म्हणून मागें लावून घेतली आहे ! ती करण्याचे किती कारखाने ! कोण ती तांबट गल्ल्यांतली सारखी ठोक ठोक, ठणठण !

" आणि दारू ? आम्हा माकडांत या पदार्थाला शब्द तरी आहे का ! तुम्ही मनुष्यें माकडें होतांत तेव्हां नारळांतील मधुर पाणी—अेवढेंच काय तें निसर्गाचें सुंदर मद्य तुम्हांस माहीत होतें; पण जशी जशीं माकडांची तुम्हीं माणसें होत गेलांत तसें तसें ताजीं फळें नी धान्यें सडवून, फेंसाळून, अुकळून मग तें विकृत द्रव्य पिण्याची घाण संवय तुम्हाला लागत चालली, तुम्ही दारूबाज बनलांत ! यंत्र नी ब्रँडी बस्स ! या दोन शब्दांतच काय तें तुमच्या मानवीय संस्कृतीचें आमच्या मर्कटीय संस्कृतीपासून प्रभेद दर्शविणारें वैशिष्टच ! —असें म्हटलें तर आम्हां माकडावर तुम्हीं माणसें रागावाल ;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण खरें सांगा, दारू पिऊन गटारांत लोळणारीं माकडें किती सांपडतात नी माणसें किती ? दारूच्या गुत्यांचे लिलाव घेण्यासाठीं जी हजारों माणसांची झुंबड अुडते त्यांत अेखाद्या तरी गुत्त्याचा लिलांव बोलण्यासाठीं कोणी माकड वा वानर कधीं आलेला दाखवाल का तुम्ही ? " रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विक प्रियाः " या नियमानें आम्हां माकडां वानरांचाच आहार तुम्हा मानवानरांच्या आहाराहून रम्य आणि हृद्या असल्यामुळें सत्त्व गुणांचा अुदय अम्हा माकडांतच अधिक दिसून येतो, नी आमचा सर्वच विषयोपभोग अधिक संयत असतो यांत काय नवल ! "

" क्षमा असावी, पण आपण अिथें मात्र माकड जातीस मनुष्याहून नसतें मोठेपण देतां. माकडाचीं स्वयंवरें नी प्रेमकलह जे हवेतिथे बोकळतात, त्याला का ध्येयसंयम म्हणायचें ? "

" नाहीं, तोहि ध्येयसंयम नव्हे खरा; पण प्रश्न माणूस हा माकडाचा विकास कीं अधःपात हा असल्यामुळें तुम्ही माकडावानरांच्या ज्या प्रेमसंबंधीय अंतर्गलपणास अुपरोधानें स्वयंवरें म्हणून म्हणालांत, त्या शब्दानेंच कोणाचा प्रेमसंबंध अधिक संयत त्याचा निर्णय होतो. स्वयंवरें दोघांतहि गाजतात. आम्हां माकडांच्या ज्या स्वयंवरास तुम्ही अुपहासतां त्यांचींच रूपांतरें तुमचीं सीता स्वयंवरें, रुक्मिणी स्वयंवरें, बुद्धयशोधरा स्वयंवरें, संयोगिता स्वयवरें, अीलियडें आणि रामायणें नव्हेत काय ? छप्पन देशीचे राजे, प्रसिद्धकें लावून लावून दळबळासह अेकत्र आणावयाचे नी कोण्या अेका फाटक्या मुलीसाठीं त्यांची कोणती लठ्ठा लठ्ठी, ती झुंज, त्या झोंब्या, त्या लढाया, ते पाठलाग, ते रक्तपात! आजवर कोणत्याहि मोहक माकडीणीसाठीं साऱ्या अरण्यभर आम्हीं हजारों माकडांनीं जमून असा हलकट गोंधळ घातल्याचें तुम्हीं दाखवून द्याल का ? किंवा त्या त्रासास कंटाळून कोण्या माकडानें अेखाद्या आपल्या पोटच्या कृष्णाकुमारीस विष पाजून ठार मारल्याचें अुदाहरण घडलें आहे का ? अेखाद–दुसरा भुभूकार साध्या नखांनीं थोडेंफार परस्पर ओरबाडणें, कीं संपलें आमचें स्वयंवर ! या माकडी स्वयंवराचें रूपांतर जें तुमचें मानवी स्वयंवर, तें संयमाचा विकास कीं अधःपात ? आम्ही सभ्य कीं तुम्ही ? "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"ह्या सभ्य शब्दाविषयींच मला थोडें विचारणें आहे. आहारविहार-प्रभृति वैयक्तिक राहणींत मानवी संस्कृतिविषयीं माकडाचें मत काय असतें तें मला आतां कळलें, पण सभ्य कोण हें ठरवितानां व्यक्तिपेक्षां समाजच पाहिला पाहिजे. कारण सभ्य हा शब्द सभा ह्या शब्दापासून झालेला. सभेंत जो समाज व्यवस्थित वागतो..."

"थांबा, थांबा! तुमचें पुढचें सारें अनुसंधान आलें ध्यानांत. पण तितकें पुढें जाणेंच नको! ही सभांचीच गोष्ट घ्या! आम्हा माकडांच्याहि सभा नसतात की काय? पण किती साध्या! न खुर्ची न टेबल! तुमच्यांतील साधेपणाचा जास्तींत जास्त डौल मिरविण्याचा सभांतून देखील खुर्च्या नसल्या तरी अुंच ओटे, सतरंज्या, लोड, तक्के, हें असतेंच. पण आमच्या सभांनी तेवढादेखील डामडौल नको, शेपटी हीच आमची सतरंजी, झुडुपें ह्या खुर्च्या, झाडें ही अुच्च वाक्पीठें! किती नैसर्गिक साधेपणा हा! बरें, अशा आमच्या सभा आम्ही केव्हां चालवितों तेव्हां यावेळची आमची वागणूक पाहा—नी तुमच्या सभा, परिषदा, संगसंगती, पार्लमेंट, पंचायती पाहा—! कचेरींत कारकून अेकमेकांवर शाअीच्या दौती फेकताहेत, महिलांच्या सफ्रेजेट परिषदांत स्त्रिया अेकमेकींस बोचकारताहेत, झिंज्या अुपटताहेत; पार्लमेंटांत माननीय सभासद परस्परांवर पिस्तुलें झाडताहेत; फार काय, तुमच्या अहिंसक पक्षाच्या सभापरिषदांमधून देखील सारी सभा आरडत ओरडत अुठून, डोक्यावरच्या टोप्या अेकमेकांच्या पाया-खालीं तुडवीत, ढूंगणाखालच्या खुर्च्या अेकमेकांच्या डोक्यांवर घालूं लागला कीं सभा भर रंगांत आलीच म्हणून समजावें! अत्यंत यशस्वी नी चिरस्मरणीय परिषद म्हणजे जो अुठते ती नव्हे तर जी अुधळते ती! सभेंत व्यवस्थित वागतो तो सभ्य ह्या तुमच्याच व्याख्येनें सांगा तर मग कोण सभ्य तें? माणूस कीं माकड?"

"बरें मानवी वाङमयाविषयीं आपणा माकडांचें काय मत आहे?"

"तें बहुशा वाङमयचौर्य आहे, दुसरें काय! तुमच्या प्रहसनादि विनोदी वाङमयाचें मूळ आम्हा माकडावानरांच्या दांत विचकण्यांत आलें;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नी तुमच्या यच्चयावत् विडंबनाचें मूळ आमच्या वांकुल्यांत आहे ! पण वांकुल्या अेकहि अशब्द बोलल्यावांवून दाखवितां येतात आणि तीं तुमचीं विडंबनें–चार चारगट शिव्या दिल्यावांवून साधावीं तशीं साधतच नाहींत ! तेव्हां वांकुल्यांचा विडंबन हा विकास कीं अधपात? तुमचें शृंगारिक काव्यवाङ्मय म्हणजे पहाडी नी पोरट्या वासनांचें रडगाणें ! अलंकारशास्त्र म्हणजे खोटें कसें बोलावें नी खोटें कसें लिहावें याचें पद्धतशीर शास्त्र ! आमच्या मनोहर माकडीच्या मुखाला आम्ही मुखच म्हणूं, तुम्ही मुखाला म्हणणार चंद्र ! चंद्रावर जीं भगदाडें आहेत तशीं का तुमच्या सुंदरीचीं गालफडें खोलखोल गेलेलीं आहेत ? ”

“ पण निदान अेका गोष्टींत तरी मनुष्याचें वैशिष्टय आणि श्रेष्ठता निर्विवाद आहे, नाहीं का ? आपण अितका वेळ जें म्हणालांत त्यांत पुष्कळ तथ्य आहे हें मनुष्येंहि मानतात. ‘आहार-निद्रा-भय-मैथुनं’ च साधारणं तत् कपिभिनीराणाम् ।। हें आमच्यांतले विचारी लोकहि म्हणतांत; पण मनुष्याचे माकडांस अभिमानपूर्वक आव्हान जें आहे तें हें कीं, “धर्मेहि नृणां अधिको विशेष: । धर्मेण हीना: कपिभिस्समाना: । ”

“ धर्म कोणता ? खिरस्ती कीं मुसलमानी, कीं यहुदी, कीं पारशी ? अिन्कांचा कीं बुशिटोंचा, हॉटेंटांचा कीं अेस्कीमोंचा ? मनुष्याचा विशेष असा धर्म कोणता ? थिअॉसॉफी कीं रशियाभर फैलावलेली आमची ‘गॉडलेस’ फिलॉसोफी ? माकडानां धर्म नाहीं म्हणूनच, देवाच्या नांवें तुम्ही जे रक्तपात केलेत ते सैतानाच्या नांवेंदेखील त्यांनीं केले नाहींत ! प्रॉटेस्टंट माकडांनीं कॅथोलिक माकडांना लाखालाखांनीं कधीं कापून काढलें आहे काय ? का मुसलमान माकडांनीं ‘दीन दीन’ म्हणून खंडेंचीं खंडें रक्तांत बुडविलीं आहेत ? धर्म हा मनुष्याचा मांकडाहून विशेष असेल; पण विकास नसून अध:पात आहे ! ”

“ पण मग माणसासारखा माकडास मोक्षहि मिळत नाहीं. परलोक–”

“ हां थांबा ! तुम्ही न पाहतां परलोकाविषयीं वाह्यात कल्पना

(सा...२९)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोलण्याच्या आधीं परलोक पाहिलेला मी काय बोलतों तें अैका ! प्रत्येक माकड मरतांच मुक्त होतें ! '

"काय म्हणतां तरी काय ? माणसें जी गति अत्यंत तीव्र तपस्येनें नी आचरणशीलतेनें मिळवूं शकत नाहींत ती माकडें सहजासहजीं मिळवितात तरी कशी ? "

"यांत तुम्हाला तरी कां बरें आश्चर्य वाटावें ? तुमचीं शास्त्रें मोक्षाचीं साधनें म्हणून जें जें वर्तन सांगतात तें तें माणसांतील कोणत्याहि साधूपेक्षां माकडें अधिक कसोशीनें आचरतात कीं नाहीं ? तुमच्यांतल्या अगदीं निःसंग साधूलाहि कमरेभोवतीं अेक पंचा तरी गुंडाळावासा वाटतो; पण माकडें लंगोटीदेखील नेसत नाहींत. 'अर्थमनर्थं भावय नित्यम्' म्हणून तुमचे साधुसंन्यासी फारफार तर स्वतः पैसा कमावीत नाहींत, पण दुसऱ्याच्या पैशावर ताव मारीत खाण्यापिण्याचें वा पालखीमोटारींतून हिंडण्याफिरण्याचें सोडीत नाहींत. लोकसंग्रहासाठीं मठाचें नांव. पिठाच्या नांवें रुपयांची संपत्ति नी संस्था ते घेतात. स्वतःच्या नाहींतर लोकांच्या पैशावर सत्ता चालवितात. पण माकडें पाहा, ते संसारी असले तरीहि पैशाला खरोखरीच शिवत नाहींत. "सोनें, रूपें, माती, आम्हां समान दो हातीं ॥" असें वागणारा साधु जर कुठें असेल तर तो माकड हाच होय ! जातीं नकोत, बैलगाड्या नकोत, आगगाड्या नकोत, तार नको, टेलिफोन नको, गुऱ्हाळें नकोत, छापखाने नकोत, गिरण्या तर नकोतच पण चरखेदेखील नकोत. माकडें खातात पाला, पितात केवळ पाणी, वावरतात नागवें, राहतात वनांत, वाढवितात जटा, आजन्म वानप्रस्थ ! त्यांना घराचा तर काय पण मठाचा सुद्धां लोभ नाहीं. ते पावसाळ्यांत छत्री घेत नाहींत कीं अुन्हाळ्यांत पंखा ! 'Back to Nature', Down with the Machine', 'Simple Living', and 'Work in brooks and sermons in every stone' अित्यादी तुमच्या माणसांतील थोर थोर महंतांचीं जीं अुच्च ध्येयें –आम्हा माकडांची ती प्रत्यहींची सहज-वृत्ति. मोक्षाचीं साधुपणांचीं हीं लक्षणें तुमच्याच शास्त्रांत सांगितलेलीं. त्या शास्त्र वर जर तुमचा विश्वास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असेल तर प्रत्येक माकडास त्या साधुशील आचाराचें जें फळ मोक्ष तें परलोकीं मिळालेंच पाहिजे, हेंच तुम्हांस खरें वाटावें. बरें, आतां मला परत गेलें पाहिजे! रामराम!

"अेकच विनंति, ती ही भेट मीं संपविलीच. जातां जातां मानव जातीस अेक दोन वाक्यांत मर्कटीय संस्कृतीचा म्हणून अेक संदेश तेवढा द्याल तर फार आभार होतील."

"यंत्राचा नाश आणि साधी रहाणी हाच तो संदेश! थोडक्यांत म्हणजे माणसांनों माकडें व्हा!!"

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूरक धान्यें : : ३०

✠ ✠ ✠

[दि. २४–२–५२ ला वीर सावरकरांचें आंग्रेवाडी, गिरगांव येथें झालेलें व्याख्यान.]

✠ ✠ ✠

" आज आपल्या देशापुढें अन्नाचा प्रश्न हा अेक महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि मीं 'पूरक अन्नें' हा विषय तेवढयासाठींच घेतला आहे. या विषयाचे मीं दोन भाग पाडणार असून अेक अन्न कसें वांचवावें हा अप्रत्यक्ष मार्ग असून आपल्या या देशांतच पिकणारें अन्न–जें आपण खात नाहीं तें--खावयास लागावें हा आहे.

सुशिक्षितांचें अुत्तरदायित्व

मी मागें पार्लें येथें अेक व्याख्यान 'माणसें, माकडें आणि टोळ' या विषयावर दिलें होतें. त्या व्याख्यानांत अन्नाचा प्रश्न सोडविण्यासाठीं म्हणून आपण पिकवीत असलेलें अन्न खाणाऱ्या माकडें नी टोळ यांस मारून बरेंचसें अन्न वांचवावें असें मीं म्हटलें होतें. तें व्याख्यान अैकून मला अनेक पत्रें आलीं. त्यांमध्यें कांहींनी मीं दाखविलेल्या मनोधैर्याविषयीं माझें अभिनंदन केलें होतें. तर कांहीं संस्थांनीं तें व्याख्यान वाचून माझ्यासारख्या हिंदुधर्मसंरक्षक माणसानें हें व्याख्यान द्यावें नी आपल्यासारखेंच परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्राण्यांना मारण्याचा मीं निर्देश करावा ह्याविषयीं विषाद व्यक्त केला होता आपण म्हणाल की 'आम्हीं सुशिक्षित, आम्हांला कशाला हें सांगतां ? आमचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं माकडें नि टोळ मारण्यास विरोध नाहीं. हें तुमचें म्हणणें त्या अशिक्षितांना सांगा, पण तें आपलें म्हणणें सर्वस्व खरें नाहीं, कारण तुमच्या सुशिक्षितांपैकींच मोठमोठ्या आचार्यांनीं, कीर्तनकारांनीं नी राजकीय महात्म्यांनीं ह्या प्राणिमात्रांना मारूं नये या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला आहे. तुम्हींच खालच्या समाजाला अनेक वर्षं ही शिकवण देत आहांत. तुमच्या सुशिक्षित राजकीय पुढाऱ्यांनीं, महात्म्यांनींसुध्दां गांठी रोगाचा अुंदीर मारावा की लोकांनीं स्वतः मरावें ह्या विषयावर वृत्तपत्रांतून महिनोन महिने चर्चा केली आहे. त्यांच्या फलोद्यानांत शिरलेलीं माकडें मारावीं की नाहीं या विषयीं वादविवाद केलेले आहेत. माझें व्याख्यान वाचून विषाद व्यक्त करणारीं जी पत्रें मला म्हैसूर, कर्णावती येथील भूतदयावादी संस्थांकडून आलीं आहेत त्या संस्थांचे कार्यकारी मंडळावर तर माजी अुच्च न्यायाधीश, विद्वान् नी पंडित लोकच आहेत, तेव्हां सर्व सुशिक्षितांना माकडें टोळ आदी प्राणी मारावेत हे तत्त्व पटलेलेंच आहे असें म्हणतां येणार नाही.

माकड, अुंदीर नी टोळ हे प्राणी असे आहेंत की ते स्वतः कोणतींहि कामें न करतां माणसानें पिकलेलें अन्न फुकटचें फुकट खात असतात. गेल्या वर्षांतले सरकारी आंकडे जरी पाहिले तरी असें दिसून येतें की, नुसत्या माकडांनीं अेक कोटि लोकांना पुरेल अितक्या अन्नाचा फडशा पाडला आहे. टोळधाड आली कीं ते किती अन्नाचा फडशा पाडतात याचा पत्ताच नाहीं. अुत्तर हिंदुस्थानांत तर या माकडांचा अुपद्रव भयंकर असतो तेथें नगरांत माणसें राहतात तर अुपनगरांत माकडें. तीं माणसाला साहाय्य करणारें असें धान्य पेरण्याच्या कार्याला पाणी देण्याचें कांहीं अेक काम करीत नाहींत. पण माणसांनी पिकवलेलें अन्न मात्र फुकटचें खातात. तीं नेहमीच त्या अुपनगरांतून, नगरांतून येअून मिठाअीच्या दुकानांतील पक्वान्नेंसुद्धां खातात. पण त्यांना कोणीहि मारीत नाहींत. कारण त्यांना मारणें ही गोष्ट आपले लोक पाप समजतात. मीं वर अुल्लेखिलेल्या पत्रांत असेंच म्हटलेलें आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, 'माकडें (तीं पत्रेंच वाचून दाखवितो) टोळ आदी सर्व प्राणीमात्र हेसुद्धां परमेश्वरानेंच निर्माण केले आहेत. त्यांनाहि आपल्या सारखाच आत्मा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण आपलें अन्न थोडें अुणें करून त्यांना तें खाअू देणें आपलें कर्तव्य आहे. 'आत्मवत् सर्व भूतेषु' हा आपला सिद्धान्त आहे. त्या परमेश्वराने आपणा-प्रमाणेंच त्या माकडांना नी टोळाना जन्म दिला आहे. तेव्हां त्यांना मारणें हें पाप आहे आणि त्यांना अन्न खाअूं देणें हीं खरी भूतदया आहे."

जीवो जीवस्य जीवनम्

अशा भूतदयावादी संस्थांनीं असें म्हणणें हें अेका अर्थी अगदी नैसर्गिक आहे. दुसऱ्याला मारतांना आपल्या मनाला कांहीं मोठा आनंद होत नाहीं. सृष्टीच्या अुत्पत्तीचा विचार करतांना आपल्या पूर्वजांनीं जेव्हां अद्वैताच' सिद्धान्त मांडला तेव्हां त्यांनीं 'आत्मवत् सर्व भूतेषु' हा सिद्धान्त मांडला. पण तो वेदान्तिक अर्थी होता. त्याचा व्यवहारी अर्थ करणें हा अनर्थ आहे. परमेश्वरानें प्राणी अुत्पन्न करतांना जितकें लक्ष घातलें तितकेंच लक्ष त्यानें त्या त्या प्राण्यांच्या अन्नाची व्यवस्था लावण्यासाठीं कांहीं घातलेले दिसत नाहीं. निसर्गाकडे जर आपण पाहिलें तर असें दिसतें कीं, किडे मुंग्यांना खातात। किड्यांना चिमण्या खातात, चिमणीला ससाणा खातो, ससाण्याला पारधी मारतो. हरीण गवत खातें, तर हरणाला वाघ खातो. लहान माशाला मोठा मासा गिळतो.'

ह्यावरून असें दिसतें कीं Survial of the fittest हा आहे निसर्ग नियम. पण तो दुर्बळांना परवडत नाहीं व स्वत:ला बलिष्टांनीं मारूं नये म्हणून ते दुर्बल निसर्ग नियमाविरुद्ध Survial of the fittest हा नियम प्रतिपादण्याचा-प्रचारण्याचा प्रयत्न करून स्वत:चे जीव वांचविण्यासाठीं धडपडतात. पण जे सबळ असतात ते याच निसर्ग नियमाला आव्हानून तुझ्याच नियमांप्रमाणें मी वागेन असें सांगून त्या निसर्गाला आव्हान देअून आपण स्वत: सबळतम होअून जगतात. आपणालाहि जर जगावयाचें असेल तर 'जीवो जीवस्य जीवनम्' हे निसर्ग पारखूनच मनूनें काढलेलें महान् तत्त्वज्ञान लक्षांत ठेवलें पाहिजे. आणि माणसाचें अन्न खाणारे माकडें, टोळआदि प्राणी मारून टाकून आपलें आपणच पिकविलेलें अन्न वांचविलें पाहिजे. असें करण्यांत कांहीं अेक पाप नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भूतदया हा सद्‌गुण खरा, पण कोणत्या मर्यादेपर्यंत? माणसांनीं अितर प्राण्यांना जें आपणाला अुपद्रवकारक नाहींत त्यांना मारूं नये. कुत्र जोंपर्यंत घराचें रक्षण करतो तोंपर्यत त्याला अवश्य पाळावें, खाअूं घालावें, पण तोच कुत्रा पिसाळला तर त्याला मारलेंच पाहिजे! जर त्याला आपण न मारलें तर तो अनेकांना चावून अनेक प्राणी मारील.

☆ निरुपद्रवी किंवा मनुष्यजातीला अुपयुक्त असणाऱ्या प्राण्यांवर केलेली दया ही भूतदया खरी, पण मनुष्यजातीला अुपद्रव देणाऱ्या प्राण्यांवर केलेली दया ही भूतदया नसून ती भुत-दया! भुत-पिशाच्चावर केलेली दया!! ह्यावरून अेक सूत्र लक्षांत ठेवा कोणताहि सद्‌गुण अतिरेकाला गेला कीं तो दुर्गुण झालाच पाहिजे. ☆

तेव्हां पूरक अन्नाचा प्रश्न सोडविण्याचा पहिला अप्रत्यक्ष अुपाय म्हणजे माणसानें पिकविलेल्या अन्नापैकीं अेक कोटि माणसांच्या अन्नाचा फडशा पाडणाऱ्या अुपद्रवी माकडादिक प्राण्यांना नी अगणित अन्न खाणाऱ्या टोळांना नाहींसें करून तेवढें अन्न वांचविणें.

मत्स्यान्न, मांसान्न नी वालुकान्न खा

दुसरा अप्रत्यक्ष अुपाय असा. आपण आपल्याभोवतीं समुद्रांत पिकणारे मासे खाणें. तुमच्या ह्या देशाच्या भोवतीं तिन्ही बाजूना समुद्र आहे. त्यांत अमाप मासे आहेत. ते कधीं पेरावे लागत नाहींत. पाणवावे लागत नाहींत. असें हे आयतें अन्न सर्व हिंदुस्थानांतील ब्राह्मण, जैन, बौद्ध, लिंगायत, वैष्णव आदि लोक खात नाहींत. कां खात नाहींत, तर तें त्यांना पचत नाहीं म्हणून नव्हे, तर तसा धर्मशास्त्राचा आदेश आहे म्हणून! मासे आणि मांस खाल्ल्यानें आपण दुसऱ्या जिवाची हिंसा करूं म्हणून! बौद्ध कालांत तर ह्या अहिंसेनें लोक अितके वेडे झाले होते कीं, ते स्वतःतर मासे खातच नसत पण माशांनीं माशांना खाअूं नये म्हणून ह्या लोकांनीं समुद्रांत मोठमोठाले स्तूप बांधून त्यांमधून गहूं, तांदूळ आदि खंडोगणती धान्यें प्रतिदिन माशांना अन्नदान म्हणून ते समुद्रांत सोडीत. हेतु हा कीं हीं धान्यें खावून माशांचें पोट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भरेल मग ते अेकमेकांना खाणार नाहींत! पण तें अन्न खाण्यासाठीं जेव्हां अनेक मासे अेकत्र येत तेव्हां अन्न कोणी खावें ह्यासाठीं आपापसांत भांडूनच ते मत्स्य अेकमेकांनाच खाअू लागत. ज्या जाती धर्मशास्त्र म्हणून, किंवा हिंसा होते म्हणून मासे वा मांस खात नाहींत त्यांनीं तो विचार सोडून स्वत: जगण्यासाठीं म्हणून पचेल नि रुचेल तर मासे वा मांस अवश्य खावें. मासें वा

☆ मांस जरी त्यांनीं खाल्लें नाहीं तरी ते मासे जगतीलच असें त्यांनीं समजूं नये. मासे जरी त्यांनीं न खाल्ले तरी दुसरे मोठे मासे त्यांना खातीलच. त्या माशांची हिंसा कांहीं टळणार नाहीं. कारण 'जीवो जीवस्य जीवनम्.' ☆

अिस्रायलनें काय केलें

मासें हें अन्नहि पौष्टिक! युरोपांतील अनेक राष्ट्रें मासे, मांस नी अंडीं खावूनच जगतात. जवळ जवळ २००० वर्षांनंतर ज्या अिस्रायल लोकांनीं पॅलेस्टाअीनमध्यें आपलें राष्ट्र नी राज्य निर्माण केलें त्यांनीं आपला हा अन्नाचा प्रश्न कसा सोडवला तें सांगतों. त्यासंबंधीं हीं चित्रें पाहा. ह्या चित्रांत हीं तळीं आहेत नी त्यामधून हे लोक मासे धरीत आहेत. आपल्याप्रमाणेंच. अिस्रायलमध्यें जेव्हां वाढत्या निर्वासितांमुळें धान्याचा प्रश्न अुत्पन्न झाला, तेव्हां अधिक अन्नासाठीं त्यांनीं तीन प्रकारच्या आघाड्या अुघडल्या. पहिली Fish Front (मत्स्यान्न आघाडी) दुसरी Flesh Front (मांसान्न आघाडी) नी तिसरी Sand Fruit Front (वालुकान्न आघाडी). त्यांच्या त्या नवीन वसाहत केलेल्या कांहीं ठिकाणीं त्यांनीं धान्य पेरलें. पण पाणी खारें असल्यानें धान्य पिकेना. तेव्हां त्यांना कल्पना सुचली कीं धान्य नाहीं तरीं तेथें मासे पिकतील; त्याप्रमाणें त्यांनी तेथें समुद्रांतून आणून कांहीं मासे सोडले, त्यांचें शास्त्रोक्त अुत्पादन वाढविलें नी आज अवघ्या दोन वर्षांत तो धंदा अितका वाढविला आहे कीं स्वत:ला पुरून अुरलेले मासे ते शेजारच्या जिल्ह्यांना धाडतात. त्याचप्रमाणें डोंगराळ प्रदेशांत त्यांनीं मेंढ्यांची निपज वाढविली. त्यांच्यापासून मांस नी लोकर काढून अन्नाचा नी अर्थाचा प्रश्न बऱ्याच प्रमाणांत सोडविला.त्यावांचून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनीं जी तिसरी गोष्ट केली ती वालुकान्नाची. समुद्रावर पसरलेल्या वाळूंत अनेक खेकडे आदी प्राणी असतात. शाळा सुटल्या कीं मुलेंमुली समुद्रावर जाऊन खेळतां खेळतां हे खेकडे यंत्राच्या साहाय्यानें वाळू खोदून चिमट्यानें पकडतात, ह्या वालुकान्नानेंहि त्यांना बराच हात दिला. आपणांलाहि या गोष्टी करुन पूरक अन्नाचा प्रश्न बराचसा सोडवितां येईल.

मनु माझ्या बाजूचा

माझा हा मांस, मासे, अंडीं, खाण्याचा अुपदेश अगदीं धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे असें समजूं नका. या विषयांत आपले प्राचीन श्रौत स्मार्त पूर्वज हे माझ्याच बाजूचे आहेत, तुमच्या बाजूचे नाहींत. स्मृतिकारांत मनु श्रेष्ठ आणि सर्व विधींत श्राद्धविधि हा पवित्र. ह्या श्राद्धविधींत काय काय खावें याविषयीं मनु काय म्हणतो तें पाहा:—

भक्ष्यं भोज्यंच विविधं मूलानीच फलानिच
हृद्या निचैव मासानि पानानि सुरभीणिच
पितृभ्यो विधिवद्येयम् ह्यवक्ष्याम्यशेषत:
द्वौ मासौ मत्स्यमासेन त्रिन्मासान् हरिणेन तु।
षण्मासाच्छन्न मासेन मान्पतेनच सप्तवै ।।
दश मासास्तु तृप्तान्ति वाराह महिषामषै: ।
वार्घिणस्यस्तु मासेन तृप्तिर्द्वादश वार्षिकी ।

याचा भावार्थ असा:—श्राद्धाच्या वेळीं मांस आदि अन्न खावें. माशाचें अन्न खाल्यास दोन महिने, हरिणाचें मांस खाल्यास तीन महिने, बोकडाची सागुती खाल्यानें सहा महिने आणि वाघिणीचें मांस खाल्यानें तर बारा वर्षेपर्यंत पितरांची तृप्ति होते. पण अेवढ्यावरच मनु थांबत नाहींत. ते पुढें म्हणतात

नियुक्तस्तु यथान्यायं यो मांसं नाति मानव:
स प्रेत्य पशुतां याति संभावानेक विंशतिम् ।

म्हणजे ह्या श्राद्धाच्या वेळीं वाढलेलें हें मांस जो मनुष्य खाणार नाहीं तो अेकवीस वेळां पशुयोनींत जन्म घेओल, पुढें मांस खाल्यानें किंवा पशु मारल्यानें अीश्वर आपणाला दोष देणार नाहीं असें सांगतांना मनु म्हणतात:

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नात्ताअिष्यत्यदन्ना प्राणिनोऽ हन्यहन्यपि
धात्रैव सृष्ट: हृद्यश्च प्राणिनोऽ त्तार अेवच।

ह्याच्या अुलटपक्षीं मांस खाअू नये अशीं वचनें मनुस्मृतींत आहेत हें खरें, पण त्यावरून मीमांसकांच्यां 'तुल्यबल विरोधे विकल्प: ।' ह्या न्यायानें परिस्थितीप्रमाणें मांस खावें किंवा खाअू नये अेवढाच अर्थ निघतो. पण जे मनुस्मृति हातांत धरून मांसाहाराला विरोध करतात ते तेवढयाचपुरता मनु पाळतात. अितर विषयांत ते कांहीं मनु मानितात असें दिसत नाहीं. जर सर्वच मनु ते पाळीत असतील तर त्यांना कांदा, लसुणच काय पण गाजरहि खातां येणार नाहीं. दूध विकतां येणार नाहीं. आणि किती तरी गोष्टी करतां येणार नाहींत. ज्या ते आज सरसहा करत आहेत. अगदी सोंवळ्या कुटुंबांतहि औषध म्हणून आजहि स्त्री--पुरुष कॉडलिव्हर ऑअील पितातच. तेंच समजून अुमजून प्या म्हणजे झालें. मनूनें जें लिहिलें तें त्या काळाला योग्य होतें. पण आजच्या काळाला त्याप्रमाणें वागणें योग्य नसल्यानें नी मनुस्मृतींत दोन्हीं बाजूंचीं विधानें असल्यानें मनुस्मृतीवर न विसंबतां आजच्या काळांत काय आवश्यकता आहे तें पाहा नी त्याप्रमाणें वागा.

☆ तुम्हीं आता जें सूत्र शिकायचें तें आहाराविषयींचें सूत्र असें :– तुम्ही काय खावें नी काय प्यावें हा प्रश्न धर्मशास्त्राचा नसून तो वैद्यक शास्त्राचा असल्यानें जें रुचेल नी पचेल तें वैद्यकशास्त्रदृष्टया स्वच्छ नी आरोग्यानुकूल असलेल्या कोणत्याहि माणसाच्या हातून किंवा पंक्तीस बसून खाण्यास कांहीं अेक प्रत्यवाय नाही. ☆

धटिंगण बना

कांहीं जुन्या रूढींनीं तुम्हाला अगदीं जखडून टाकलें आहे. तुम्हीं खावें काय, प्यावें काय, बसावें कसें, अुठावें कसें, देशाबाहेर जाअू नये अित्यादि जे आजच्या काळाला अगदीं अयोग्य नियम आहेत ते तुम्हीं निःशंकपणें धाब्यावर बसवा. तुम्ही खावें काय नी प्यावें काय हा प्रश्न धर्मशास्त्राचा नाहीं, तर तो वैद्यकशास्त्राचा ! ब्रॉंकायटिस झाला तर थोडी ब्रँडीसुद्धां घेतलींच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिजे ! त्या वेळीं ती आवश्यकच असते. आतां यापुढें तुम्हाला धष्टपुष्ट नी धटिंगण बनलें पाहिजे. देशाबाहेर पडून परक्यांच्या बरोबरीनें वावरलें पाहिजे. परके लोक आजपर्यंत तुमच्या देशांत येऊन तुमचेंच अन्न खावून तुमच्यावर राज्य करीत होते. तुम्ही आतां त्यांच्यासारखें वागलें पाहिजे. तुम्हीं आतां लोकांचे अन्न खावयास शिकले पाहिजे. अमेरिका धटिंगण आहे. म्हणून ती म्हणते ती पूर्व दिशा ठरते. तीच गोष्ट रशियाची. तुम्हींहि त्यांच्याप्रमाणेंच मिळेल तें नी पचेल तें खाऊन आणि जित्यांच्या देशांत जाऊन त्यांचीच अद्यपावत् शस्त्रविद्या शिकून या जगांत मानानें जगावयास शिकलें पाहिजे. तीच आहे आजची आवश्यकता ! तोच आहे आजचा धर्म ! ”

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हे सिंधु आम्हीं तुला मुक्त करूं ! : : ३१

✠ ✠ ✠

[अिसवी सन १९०७।८ मध्यें 'अभिनव भारत' ही क्रांतिकारक गुप्त संघटना वीर सावरकरांनीं स्वातंत्र्य मिळविण्याच्या अुद्देशानें स्थापन केली. हिंदुस्थान अिंग्रजांच्या पाशांतून मुक्त झाल्यावर त्या संस्थेचें ध्येय प्राप्त झालें म्हणून त्या संस्थेची सांगता करण्याच्या अुद्देशानें पुणें येथें १९५२ मध्यें अभिनव भारताचा सांगता समारंभ करण्यांत आला. त्या वेळीं वीर सावरकरांनीं जीं तीन महत्त्वाचीं भाषणें केलीं तीं अेका संग्रहांत प्रसिद्ध करण्यांत आलीं असून त्यांतील अेक भाषण येथें संक्षिप्त करून दिलें आहे.]

✠ ✠ ✠

'अभिनव भारता'चा हा 'सांगता समारंभ' अेका अर्थी गुप्त संस्थेचा विसर्जनसमारंभहि आहें. तो कसा ह्याविषयीं आमच्या कांहीं सदिच्छ हितचिंतकांनींहि मला विचारलें आहे. ह्यासाठीं त्याचेंहि स्पष्टीकरण जातां जातां करीत आहे.

अभिनव भारताची आणि अितर बहुतेक गुप्त क्रांतिकारक संस्थांचीहि, मुख्य प्रतिज्ञा ही होती कीं 'ब्रिटिशांच्या राजकीय दास्यांतून भारताची मुक्तता करण्यास्तव आणि आमच्या मातृभूमीस स्वतंत्र करण्यास्तव आम्ही शस्त्र अुपसून सर्व साधनांसह समरांत प्राणान्तापर्यंत लढत राहूं. ह्या प्रतिज्ञेच्या श्रद्धार्थ त्या काळीं जिथें जिथें प्रकटपणें संघटना करणें अशक्य होतें तिथें तिथें वरील संख्यांप्रमाणें गुप्त संघटना अुभारणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग पडलें. पण आतां आपणा भारतीयांच्या पराक्रमानें आपण ती प्रतिज्ञा खरी करून दाखविली आहे. आज तरी सारें हिंदुस्थान ब्रिटिशांच्या परदास्यांतून मुक्त झालेलें आहे. ब्रिटिशांना आम्हीं पराभूत करून समुद्रपार हुसकून देऊन सारा हिंदुस्थान स्वतंत्र केला आहे. कराचीलासुद्धां ब्रिटिश अुरलेला नाहीं. तिकडे दुसरा कोणी घुसला आहे. पण त्याचेंहि पाहून घेऊं. अभिनव भारताची मूळ प्रतिज्ञा भारतावरील ब्रिटिश राज्य अुलथून टाकण्याची होती. ती आज पूर्ण झालेली आहे. त्या वेळीं सारा देश नि:शस्त्र केला गेल्यामुळें अुघडपणें दहा रिव्हाल्वरेंसुद्धां अेकत्र सांठवून ठेवतां येत नव्हतीं किंवा दहा स्वातंत्र्य सैनिकांच्या फुटकळ तुकडीचें सुद्धां अुघड संचलन करतां येत नव्हतें. पण आतां आमच्या स्वतंत्र हिंदुस्थानाचें लक्षावधि पायदळ, आणि प्रचंड भूसैन्य, आम्हीं प्रकटपणें अुभारूं शकत आहों, आमच्यांत तसें करण्याची अिच्छा तेवढी हवी आहे. जर ती प्रबल अिच्छा तेवढी आपल्या राष्ट्रांत वेळ गेली नाहीं तोंच अुत्पन्न झाली तर आपण आज ब्रिटिशांच्या हातून जिंकून घेतलेले हें भारतीय महाराज्य अेका पांच वर्षांच्या आंत अगदीं अद्ययावत् अशा अणुअस्त्रांनीं सुद्धां शस्त्रसज्ज करूं शकूं. दुर्धर्ष करूं शकूं.

अीर्षा, आत्मविश्वास नी शक्ति निर्मिण्यासाठीं

आपण परदास्यांत होतों तेव्हां अिच्छा होती पण साधनें नव्हतीं; आतां ह्या सर्व साधनांनीं आपलें महाराज्य अजिंक्य करण्याचें स्वातंत्र्य नी सुवर्णसंधि हातीं आलेली असतांहि जर तें तसें तत्काल शस्त्रसज्ज करण्याची अिच्छाच आपण धरली नाहीं तर आपल्यासारखें हतभागी आपणच ! ही वस्तुस्थिति ध्यानांत येण्यासाठींच ब्रिटिशांवर आपण विजय मिळविलेला आहे आणि आपल्या भारताचें हें महाराज्य आपण आपल्या पराक्रमानें स्वतंत्र करून संपादिलेलें आहे ही जाणीव अुत्पन्न करण्यासाठींच कोनाकोपऱ्यांतील कांहीं प्रश्न सोडवायचे राहिले असले तरीहि हे स्वातंत्र्यदिनाचे महोत्सव, हे सांगतेचे समारंभ आपण साजरे केलेच पाहिजेत. त्यांतूनच अुरलेलीं काय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि संभाव्य संकटें यांनाहि तोंड देण्याची अीर्षा, आत्मविश्वास नि शक्ति या येत्या तरुण पिढींत अुत्पन्न होअूं शकेल.

बहुधा कोणताहि देश परदास्यांतून सर्वांशीं नि सहसाच स्वतंत्र झालेला नसतो. प्रथम कांहीं पुरेशा प्रमाणांत त्याचा भाग परशत्रूच्या हातून त्यांनीं परत जिंकून घेतला कीं तो त्याच्या स्वातंत्र्याची घोषणा करून, त्या मुक्त केलेल्या भागांतच स्वराष्ट्राचा शक्य तितका प्रबळ पाया खोदून, स्वतंत्र शासन केंद्र आणि सशस्त्र दलभार अुभारून तो स्वतंत्र देश पुढें त्याचा अुरलेला भाग हटत चाललेल्या परशत्रूच्या हातून मुक्त करण्यासाठीं लढूं शकतो. याविषयीं अधिक विस्तारानें बोलण्यास वेळ नसल्यामुळें मी अेकदोन अैतिहासिक अुदाहरणें सांगतों. युरोपीय लोकांच्या अितिहासांत अगदीं मोठें गाजलेलें स्वातंत्र्ययुद्ध म्हणजे अमेरिकेचें, American War of Independence, हें होय.परंतु त्याच्या शेवटीं अमेरिकेनें अिंग्रजांचा पराभव करून जो त्यांच्याशीं संधि केला त्या वेळीं कांहीं अिंग्लंडच्या हातून अमेरिकेंतील सगळीं संस्थानें स्वतंत्र होअूं शकलीं नव्हतीं. अवघीं दहाअेक संस्थानेंच काय तीं अिंग्लंडच्या हातून स्वतंत्र झालेलीं होतीं. अुरलेल्या अमेरिकन संस्थानांतील कांहीं तर ब्रिटनशीं अुघड अुघड राजनिष्ठ राहून ब्रिटनच्या वतीनें लढत होतीं. तथापि त्या स्वतंत्र झालेल्या अमेरिकन संस्थानांनीं आपलें स्वतंत्र नी संयुक्त राष्ट्र तत्काळ प्रस्थापिलें आणि आपलें स्वातंत्र्य साऱ्या जगांत अुद्घोषित करण्यासाठीं मोठा विजयोत्सव केला. त्या त्यांच्या स्वतंत्र राष्ट्राला त्यांनीं अितकें संघटित नि प्रबल केलें कीं त्याच्या नुसत्या गुरुत्वाकर्षणानें नी वर्धिष्णु प्राबल्यानें अितर संस्थानें त्यांत अेकामागून अेक विलीन तरी झालीं नाहीं तर विलीन केलीं तरी गेलीं. आणि अशा प्रक्रियेनेंच हें आजचें अर्धी अमेरिका व्यापणारें सर्व सामर्थ्यसंपन्न अमेरिकन राष्ट्र प्रादुर्भूत होअूं शकतें.

शिवाजीनें ज्या दिवशीं सप्त समुद्रांचें पाणी आणवून औरंगजेबाच्या नाकावर टिच्चून स्वतःस राज्याभिषेक करून घेतला आणि अेका स्वतंत्र हिंदुराज्याच्या प्राणप्रतिष्ठेची अुद्घोषणा द्वीपद्वीपांतरांत अैकूं जाअील अशा आपल्या विजयिष्णु तोफांच्या दुर्धर्ष गडगडाटानें गाजविली त्या दिवशीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वस्तुतः नर्मदा ते कृष्णेपर्यंतचा सारा महाराष्ट्रसुद्धां स्वतंत्र झालेला नव्हता. मग साऱ्या हिंदुस्थानची गोष्टच बोलणें नको. तथापि जिथें अेकहि अिंच भूमि स्वतंत्र नव्हती तिथे अेक स्वतंत्र राज्यचें राज्य स्थापितां येअील अेवढा हिंदुप्रदेश, मुसलमानांच्या यांची पातशहांची आपल्या पराक्रमानें धुळधाण अुडवून मराठ्यांनीं मुक्त केला हा अेवढा विजयसुद्धां अितका अैतिहासिक, सामाजिक नी राष्ट्रीय महत्त्वाचा होता कीं त्याच्या गौरवार्थ तो राज्याभिषेकाचा महोत्सव जर महाराजांनीं साजरा केला नसता तरच अेक मोठी राजकीय चूक झाली असती.

महाराष्ट्रांतील अवघ्या पांच सहा जिल्ह्यांअेवढ्या प्रदेशाला परशत्रूंच्या हातून स्वतंत्र करतांच शिवाजीमहाराजांनीं असा स्वातंत्र्यसंपादनाचा विजयोत्सव गाजविला हें सामाजिक दृष्ट्या आणि राजकीय दृष्ट्याहि अत्यंत समयोचित आणि समर्थनीय होतें असें जर आपण मानतों तर आज केवळ तो महाराष्ट्राच नव्हे तर हा सारा महादेश, आपला हिंदुस्थान ब्रिटिश शत्रूच्या दास्यांतून आपण मुक्त केला असतां त्याचा विजयोत्सव करणें आणि त्या व्रताची सांगता करणें शतपटीनें समर्थनीय असलेंच पाहिजे !

सांगता समारंभ हा संकल्प समारंभहि असतो !

पुन्हां हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं मिळविलेल्या अशा महान् विजयाचें आणि व्रतपूर्तीचे जे असे अुत्सव किंवा सांगता-समारंभ म्हणजे पुढे जें **मिळवायचे** असतात त्या **राष्ट्रीय** विजयाचे, अुरलेल्या राष्ट्रकार्याच्या पूर्ततेचे **संकल्प-समारंभहि असतातच.**

ह्या सर्व कारणांसाठींच कालच्या मे १० ह्या क्रांतिदिनाच्या दिवशीं आपण जो स्वातंत्र्यअुत्सव केला, सर्व दिवंगत क्रांतिकारकांना जी कृतकृत्यतेचीं आणि कृतज्ञतेची श्रद्धांजलि वाहिली आणि तोच मुहुर्त साधून त्या स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यार्थ ह्या शतकाच्या आरंभीं स्थापन झालेल्या आणि ब्रिटिशांच्या हातून हिंदुस्थान मुक्त करितों झुंजत आलेल्या 'अभिनव भारत' ह्या जगप्रसिद्ध क्रांतिकारक गुप्त संस्थेचा जो सांगता-समारंभ साजरा करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या स्वरूपांतलें तिचें विसर्जन केलें तें तसें करणें हें राष्ट्रकर्तव्यदृष्टयाहि अत्यंत समुचित होतें.

स्वदेश बांधवांच्या हातीं सत्ता पडावी हीच धारणा

आणखी अेका विधेयाचा (Point चा) या व्याख्यानांत थोडातरी अूहापोह करणें हें मला अगदीं आवश्यक वाटतें. आजपर्यंत ब्रिटिशांशीं झालेल्या आपल्या स्वातंत्र्याच्या लढयांत ज्यांनीं निःशस्त्र मार्ग्यांनीं प्रयत्न केला त्यांच्या त्या प्रयत्नांचा अितिहास किंवा सविस्तर वृत्त तरी बहुतेकांना माहित आहे. कारण तें तें वृत्त अुघडपणें प्रसिद्ध होअूं शकत होतें. परंतु सशस्त्र क्रांतिकारकांविषयींची माहिती मूलतः कार्यसिद्धीस्तव त्यांनींच गुप्त ठेवलेली असे. त्यांतून शक्यतों त्यांच्या चळवळींचा आपुलकीनें अितिहास लिहिणें हें ब्रिटिशांच्या राज्यांत अगदीं अशक्य होतें. कारण ब्रिटिशांना सशस्त्र क्रांतिकारकांची नांवेंसुद्धां वृत्तपत्रांतून आलेलीं खपत नसत. सशस्त्र क्रांतिकारकांना ब्रिटिश अितर सर्व पक्षांपेक्षां किती घाबरत असत, म्हणजेच सशस्त्र क्रांतिकारकांची चळवळ निःशस्त्र पक्षाच्या चळवळीपेक्षां ब्रिटिशांच्या मर्मावरच कसा प्रहार करीत होती त्याची ब्रिटिश सत्तेनें दिलेली ही अेक पावतीच असे; अेक स्वीकारोक्तीच असे ! ह्या दोन्हीं तिन्हीं कारणांमुळें सशस्त्र क्रांतिकारक चळवळींची कांहींच माहिती सामान्य जनतेस तर काय पण वरच्या सुशिक्षित वर्गालासुद्धां नसे आणि आद्यापहि ती पूर्णपणें नाहीं.

अिंग्लंडचें सामरिक संकट ही आमची स्वातंत्र्यसंधि

सशस्त्र क्रांतिकारकांच्या, ह्या शतकाच्या आरंभींच स्थापन झालेल्या ‘अभिनव भारत’ ह्या संस्थेच्या कार्यक्रमांत तरी ‘भयंकरवाद’ प्रमाणेंच सैनिकीकरण आणि परराष्ट्रीय राजकारण ह्या दोन मुख्य साधनांचा समावेश केलेला असे हें त्या काळच्या आमच्या अजून अुपलब्ध असलेल्या वाङमयांतून नी त्या काळच्या गुप्त चळवळींवरून कोणासहि कळून येअील. सैनिकीकरण म्हणजे अिंग्रजांच्या हाताखालील हिंदुस्थानांत असलेल्या हिंदी सैन्यांत क्रांतीचा प्रचार करणें आणि शक्य तितक्या क्रांतिकारकांनीं त्या सैन्यांत भरती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होणें होय. आमचें परराष्ट्रीय राजकारण म्हणजे अिकडे ब्रिटिशांच्या हातीं असलेलें हिंदी सैन्य पोखरून ठेवण्याचें कार्य करीत असतांच तिकडे, विशेषत: युरोप नी जपानमध्यें अिंग्रजांच्या शत्रूस्थानीं असलेल्या किंवा निदान अिंग्रजांचे मित्र नसलेल्या राष्ट्रांवर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यार्थ सशस्त्र क्रांति करणारा अेक पक्ष प्रबळ होत आहे. ह्या नव्या वस्तुस्थितीचा प्रचार करून त्या कार्यीं तेथील जनतेची नी राज्याधिकारी वर्गाची सहानुभूति संपादण्याचा आटोकाट प्रयत्न करणें होय. केव्हां तरी अिंग्रजांना पाण्यांत पाहणाऱ्या ह्या परराष्ट्रांपैकीं कोणाचें तरी युद्ध अिंग्रजांशीं छेडलें जाण्याचें संकट अिंग्रजावर गुजरलेंच; अर्थात् अिंग्लंडवरचें सामरिक संकट म्हणजेच हिंदुस्थानची स्वातंत्र्यसंधि होय. हें आमचें युद्धनीतीचें सूत्र असल्यानें अशा अेखाद्या युद्धांत ब्रिटनला गांठून, त्याच्या त्या परराष्ट्रीय शत्रूकडून मिळेल तें रणसाहाय्य घेअून, हिंदी सैन्यांत, आणि शक्यतों हिंदी जनतेंत क्रांतीची अुठावणी करावी आणि हिंदुस्थानाबाहेरूनहि त्या परराष्ट्रीय साहाय्याच्या बळावर हिंदुस्थानांतील ब्रिटिशसत्तेवर बाहेरून चाल करून यावें, ही आम्हां क्रांतिकारकांच्या सामरिक कार्यक्रमाची रूपरेषा होती. अशा प्रकारची पहिली अुठावणी फसली तर संधि येतांच दुसरी अुठावणी करावी, यश येअीतों असेंच, वेळीं, पिढ्यानुपिढ्या झुंजत राहावें. ह्या सैनिकी धोरणाचें सर्व सार माझ्या त्या वेळच्या ज्या अेका सूत्रांत गोवलेलें होतें तें सूत्र आतां बहुमुखी झालेलें आहे कीं, Revolutionary war knows no truce save victory or death.

क्रांतीचा सैनिकांत प्रचार

ह्या रणनीतीच्या कागदी कार्यक्रमांतील अनेक अुपांगांची बजावणी आम्हीं तत्काल कशी करीत चाललों त्याचा ह्या व्याख्यानांत मावेल अितकाच अत्यंत तुरळक अुल्लेख काय तो येथें करतां येअील. तो असा, मीं अिंग्लंडला जाअून अभिनव भारताचें ठाण भर लंडनमध्यें मांडतांच, हिंदी सैनिकांमध्यें राज्यक्रांतीचा आणि ब्रिटिशद्वेषाचा प्रचार करण्यासाठीं शतावधि लहान

(सा...३०)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपणालाहि जगावयाचें असेल तर ‘ जीवो जीवस्य जीवनम् ’ चें तत्त्व पाळावें.

लहान हस्तपत्रकें गुप्तरीतीनें छापून हिंदुस्थानांतील सैनिकभरतीचें मुख्य केंद्र जें पंजाब त्यांतील सैनिकशिबिरांत धाडण्यास आरंभ केला.

ह्या अुपक्रमाच्या मागोमाग अिंग्लंडमध्यें माझा ‘१८५७ चें स्वातंत्र्य-समर ’ (War of Indian Independence of 1857) हा ग्रंथ प्रसिद्ध झाला ! हिंदी सैनिकांत, ब्रिटिश राज्य अुलथून पाडणार प्रचंड सैनिकी युद्ध कसें अुभारावें ह्याचा तो प्रयोगसिद्ध नी प्रस्फोटक अितिहासच होता. हिंदुस्थानांत त्या ग्रंथाचा गुप्तपणें केवढा प्रचार झाला, पुढें अमेरिकेंतील गदर पक्षानें त्याचें पंजाबी, हिंदी, अुर्दू प्रभृति भाषांतून कसें भाषांतर करविलें, त्यानंतर भगतसिंग मंडळानें त्याच्या दोन अिंग्रजी गुप्त आवृत्त्या कशा छापल्या आणि तेथून थेट नेताजी सुभाषचंद्रांनीं अुभारलेल्या स्वातंत्र्य-सैन्यापर्यंत त्या ग्रंथानें अखिल भारतीय क्रांतिकारक पक्षाला वैचारिक आत्मा देअून सशस्त्र अुठावणीचें प्रत्यक्ष मार्गदर्शन कसें केलें, क्रांतिकारकांची ‘गीता’ म्हणून सहस्रावधि क्रांतिकारकांनींच त्यास कसें गौरविलें तें वृत्त आतां अितकें सर्वश्रुत झालेलें आहे कीं त्याचा अिथें अधिक अूहापोह करण्याचें कारणच नाहीं.

ब्रिटिशांच्या हिंदी सैन्यांत हा सारा गुप्त प्रचार करतांना आम्हीं ‘ ब्रिटिशांच्या सैन्यांत जाअूं नका ’ असें केव्हांहि सांगितलेलें नाहीं. तर अुलट ब्रिटिशांच्या सैन्यांत राहूनच, हातीं पडलेलें सारें शस्त्रबळ संभाळूनच, नवनव्या हिंदी तरुणांची शक्य तितकी अधिकाधिक भरती ब्रिटिश सैन्यांत करून, संधि येअीतों हिंदी सैनिकांनीं परराष्ट्राशींहि अिंग्लंडचीं प्रत्यक्ष युद्धें जुंपलीं असतां त्या युद्धांतून जिवंत लढाया लढण्याचें शिक्षण घेत राहावें, असेंच ह्या प्रचारपत्रकांतून नी ग्रंथांतून आग्रहानें सांगत असूं. म्हणजे सशस्त्र क्रांतीची वेळ येतांच, शस्त्रास्त्रांनीं सज्ज, युद्धें खेळण्यांत मुरलेलें असें हें ब्रिटिशांच्या हाताखालचें लक्षावधि सैनिकांचें हिंदी सैन्य १८५७ च्या प्रसंगीं ब्रिटिशांवरच अुलटलें तसें स्वदेशाच्या स्वातंत्र्यार्थ पुन्हां अकस्मात् अुलटवून देतां येअील. माझ्या ‘ सैनिकीकरण ’ चा अर्थ ह्या शतकाच्या अगदीं आरंभापासून तों थेट ब्रिटिशांची राजसत्ता सन १९४७ मध्यें अुलथून पाडीतों हाच होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्याच धोरणानें पुढें निघालेल्या साऱ्या क्रांतिकारक संस्था शेवटपर्यंत झटत नी झुंजत राहिल्या. हिंदुस्थानांतील ब्रिटिश अधिकाऱ्यांना तोंड देणें आणि ब्रिटिश सत्तेला हादरा बसेल असा परिणामकारक प्रतिकार करणें अशक्य आहे असें अनुभवास आलेल्या काँग्रेसमधील शेकडो नेत्यांनीं नी अनुयायांनीं शेवटीं सशस्त्र क्रांतिकारकांचाच मार्ग पत्करला. त्यांनीं पटापट भूमिगत होऊन गुप्तपणें ब्रिटिश सत्तेचा सशस्त्र प्रतिकार चालविला नी अेकच रक्तपाती धुमाकूळ अुडवून दिला. शेवटीं निःशस्त्रवादी काँग्रेसच कांहीं काळ सशस्त्र क्रांतिकारकांची मठी बनली.

हिंदुस्थानशीं संधि करण्यास ब्रिटन सिद्ध

अेकीकडे हिंदुस्थानांत सशस्त्र क्रांतिकारकांचा धुमाकूळ आणि दुसरीकडे क्रांतिकारकांचीं हिंदुस्थान मुक्त करण्यासाठीं बाहेरून चालून येणारीं मोठमोठी सैन्येंची सैन्यें यांच्या कात्रींत हिंदुस्थानांतील गांगरलेली ब्रिटिश सत्ता सांपडली असतां जपानवर अमेरिकेचा पहिला अॅटम बॉम्ब पडला नी जपान शरण गेला ! तिकडे युरोपमध्यें हिटलर-मुसोलिनींचा सपशेल पराजय झाला. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स ह्या त्रयीनें तें दुसरें महायुद्धहि जिंकलें !

परंतु ब्रिटनपुरता तरी त्याचा विजय हा जिवावरच बेतलें होतें तें शेपटावर गेलें, अितकयाच पुरता होता. ब्रिटन देश जरी वांचला तरी त्या दोन महायुद्धांच्या माऱ्याखालीं ब्रिटनच्या साम्राज्यशक्तीचा आणि अुन्मत्तपणाचा चक्काचूर झाला. हिंदुस्थानपुरतें बोलावयाचें तर ब्रिटनची त्या महायुद्धाच्या शेवटीं अशी स्थिति झाली होती कीं (१) हिंदुस्थानांतील भूदल, नौदल नि आकाशदल ह्या तीनहि विभागांतील झाडून साऱ्या हिंदी सैन्यानें ब्रिटिशविद्रोहाचा अुठाव केलेला होता, किंवा तें सैन्य तसा अुठाव करण्याच्या मनःस्थितींत होतें, (२) १८५७ मध्यें हिंदी सैन्य ब्रिटिशसत्तेवर जेव्हां अुलटलें तेव्हां सहस्रावधि जातिवंत ब्रिटिशांचें नवें सैन्य ब्रिटन हिंदुस्थानांत धाडूं शकलें आणि त्या विद्रोहाचा नायनाट केला गेला. परंतु महायुद्धाच्या शेवटच्या ह्या कामांत जर्मनी जपान जरी धुळीस मिळालीं तरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोल्शेव्हिक रशियाच्या विजयामुळें ब्रिटनला पाण्यांत पाहणारा अेक नवीन बलाढ्य शत्रु अुत्पन्न झाला. आणि मित्र म्हणून म्हणविणाऱ्या अमेरिकेच्या हातातला अणुध्वम् (अॅटमबॉम्ब) पाहून त्या मित्राचीहि धास्ती ब्रिटनला शत्रूअितकीच वाटूं लागली. अशा स्थितीत प्रत्यक्ष आपल्या स्वदेशाचेंच संरक्षण करण्यासाठीं सारें जातिवंत ब्रिटिश सैन्य ब्रिटनला आपल्या घरींच आणून ठेवणें भाग पडलें. हिंदुस्थानसारख्या विस्तीर्ण नी आतां कट्टर ब्रिटिश-विद्रोही बनलेल्या देशावर स्वतःची साम्राज्यसत्ता शस्त्रशक्तीनें चालविण्यासाठीं जुनें वा नवें असें कोणचेंहि जातिवंत ब्रिटिश सैन्य अिकडे धाडणें ब्रिटनला अशक्य गेलें. (३) ह्या दुहेरी पेचामध्यें सांपडल्यामुळें पूर्वीप्रमाणें हिंदुस्थानांतल्याच हिंदी सैन्याच्या बळावर हिंदुस्थानवर राज्य करणें ब्रिटिशांना अशक्य झालें. आणि स्वातंत्र्यासाठीं ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र विद्रोह करून अुठलेल्या हिंदुस्थानला शरण जाण्यावांचून ब्रिटनला गत्यंतर अुरलें नाहीं.

तेव्हां निरुपाय म्हणून ब्रिटननें हिंदुस्थानला कांहीं अटींवर स्वातंत्र्य देण्याचें आणि हिंदुस्थानांतून आपला गाशा गुडाळण्याचें ठरविलें आणि हिंदुस्थानाशीं संधि करण्यास ब्रिटन सिद्ध झालें. *

परंतु अशा अत्यंत आणिबाणींच्या वेळीं ब्रिटनशीं हिंदुस्थानच्यावतीनें संधि करण्यास जे त्यांतल्या त्यांत कच्चे तेच प्रतिनिधि तुम्हीं धाडले. Quit Imdia चळवळीचा परिणाम Split Imdia मध्यें होअील, छोडो हिंदुस्थानचा परिणाम तोडो हिंदुस्थानांत होअील, म्हणून ज्या हिंदी

---

* Independence of India Act च्या वेळीं ब्रिटिश पार्लमेंटमध्यें साम्राज्यसत्ता सोडण्याचा प्रसंग आल्यामुळें दुःखी कष्टी झालेल्या चर्चिलच्या अेका प्रश्नास निरुपाय आहे म्हणून अुत्तरितांना त्या वेळचे ब्रिटिश पंतप्रधान अॅटली ह्यांनीं ज्या तीनचार वाक्यांत ब्रिटनच्या अवशतेचें अगदीं सूत्ररूपानें वर्णन केलें तीं वाक्यें अशीं—

"Britain is transferring power due to the fact that (1) The Indian mercenary army is no longer loyal to

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजकीय पक्षाला तुम्ही आपले प्रतिनिधि म्हणून निवडूं नका ' असें माझ्यासारखे सशस्त्र क्रांतिकारक आणि हिंदुसंघटक तुम्हां हिंदु बांधवांना कंठशोष करून सांगत होते, त्याच पक्षाला तुम्हीं आपले प्रतिनिधि म्हणून धाडलेत अर्थात् त्यांच्याशींच त्यांच्या राजकीय कच्चेपणाचा लाभ घेऊन ब्रिडननें देशाचे तुकडे पाडण्याच्या अटीवर सत्तांतराचा संधि केला.

पण आता जें झालें तें होऊन गेलें. उरलें आहे तें पराक्रम करून उद्यांपुरतें करून घेऊं. परंतु जें साधलें आहे तें यशहि अितकें अुदंड आहे कीं निदान गेल्या अेक सहस्त्र वर्षांत, आज आपण मिळविलेल्या ह्या यशाला आपल्या अितिहासांत तोड सांपडणार नाहीं ब्रिटिशांसारख्या शत्रूच्या हातून आज निदान ३-४ हिंदुस्थान तरी आपण स्वतंत्र केला आहे. हें आजचें आपलें स्वतंत्र भारतीय महाराज्य जसें आतां सर्वांचें समाअिक राज्य आहे तसेंच तें जिंकून परत घेण्यासाठीं सन १८५७ ते सन १९४७ पर्यंतच्या आम्हीं ब्रिटिशांशीं छेडलेल्या स्वातंत्र्ययुद्धाचें नी त्यांत मिळविलेल्या विजयाचें श्रेयहि आमच्यांतील सर्व प्रामाणिक पक्षोपपक्षांचें आम्हां सर्वांचें सामाअिक श्रेय आहे हें माझ्या हातूनहि पक्षपात घडूं नये म्हणून मी पुन्हां अेकदां सांगत आहे. परंतु ह्या स्वातंत्र्ययुद्धांत अगदीं आघाडीवर लढणाऱ्या सशस्त्र क्रांति-

Britain and (2) Britain cannot afford to have a large British Army to hold down India." ह्या दोन सैनिक दुर्बलतेच्या कारणांमुळें ब्रिटनला हिंदुस्थानला सोडावें लागलें. ' अहिंसेचें तत्त्व आम्हांस पटल्यामुळें आमचें ' हृदयपरिवर्तन ' झालें, किंवा साम्राज्यवाद अन्याय्य आहे म्हणून स्वेच्छेनें आम्हीं हिंदुस्थान सोडलें " असें कांहीं ब्रिटनचे पंतप्रधान अॅटली किंवा कोणताहि ब्रिटिश सभासद म्हणाला नाहीं !! अर्थात् सन १९०६ पासून ४७ पर्यंत सशस्त्र क्रांतिकारक पक्षानें हिंदी सैन्यांत ब्रिटिश विद्रोह जो फैलावला आणि परराष्ट्रीय राजकारण लढवून दोन्ही महा-युद्धांत ब्रिटनच्या शत्रूंशीं संधि करून त्यांच्याकडून शस्त्रबळ संपादून सशस्त्र क्रांतिकारकांनीं रणांगणांत जी झुंज दिली त्यामुळेंच ब्रिटिशसत्ता ह्या पेचांत सांपडली. ह्याचा प्रत्यक्ष ब्रिटिश प्रधानांच्या तोंडूनच हा पडताळा मिळाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारक पक्षाच्या कार्यक्रमाचा नी पराक्रमाचा अितिहास सर्वसामान्य जनतेला यथावत् अवगत नसल्यामुळें मी कालच्या आणि आजच्या व्याख्यानांत त्या अितिहासाची कल्पना येण्यापुरता हा अेक चलत्--चित्रपट प्रदर्शविला आहे.

गंगा यमुना आज मुक्त झाल्या ! पण— ?

ब्रिटिशांना पराभूत करून आज आपल्या ह्या स्वतंत्र हिंदुस्थानचें जें महाराज्य आपण स्थापिलें आहे त्याला मी जें महाराज्य म्हणून अुल्लेखितों तें केवळ स्वदेशाभिमानाच्या आवेगानेंच म्हणतों असें नाहीं. अिंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, पोर्तुगाल, अिटली, स्वित्झर्लंड–अर्ध्या अधिक युरोपांतील आजचीं सारीं राष्ट्रें अेकत्र केलीं तरी त्या भूक्षेत्राहून अधिक विस्तृत असलेला प्रदेश ह्या आपल्या स्वतंत्र महाराज्याच्या चतुःसीमेंत सामावलेला आहे. आणि तो आज बहुतांशीं अेकजीवी, अेकराट्, अेकछत्र झालेला आहे. व्याख्यानाच्या आरंभीं मी सांगितलें होतें कीं गोदावरी ते कृष्णा ह्यांमधील काय तो परिमित भूभाग म्लेंच्छांच्या हातून शिवछत्रपतींनीं जेव्हां मुक्त केला नी स्वतंत्र हिंदुराज्य स्थापिलें तेव्हां समर्थ रामदासांसारख्या निःसंग साधूंनाहि आनंदाचें भरतें आलें ! मग आज तर सेतुरामेश्वरापासून हरिद्वारपर्यंतचा आणि पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंतचा हा महादेश, ही आमची पितृभूमि, ही आमची पुण्यभूमि अेकछत्री झालेली आहे.

आमच्या प्राचीन चेल, चोल, पांड्य राज्यांच्या राजधान्या, चंद्रगुप्ताचें पाटलीपुत्र, विक्रमाची अुज्जयिनी, शालिवाहनाचें प्रतिष्ठान, यादवांची देवगिरी, हरिहरबुक्कांचें विजयनगर प्रभृति आमचीं प्राचीन राज्य–केंद्रें हीं सारीं अेककेंद्रित करून, अेकराट् करून आम्ही आमच्या पांडवांच्या प्राचीन अिंद्रप्रस्थांतच आज आमचें हिंदुप्रस्थ पुन्हां स्थापिलेलें आहे ! आणि त्या ह्या महाराज्यावर आमचा सुदर्शन चक्रांकित ध्वज अुभारलेला आहे.

आम्हांला प्रत्यहीं ज्यांचें नामस्मरण धार्मिक कर्तव्य म्हणून करावें लागतें तीं आमचीं सारीं पुण्यक्षेत्रें तीं ' अयोध्या, मथुरा, माया, काशि, कांची, अवंतिका, पुरी, द्वारावती ते जगन्नाथपुरीपर्यंत, मदुरेच्या मीनाक्षीपासून तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कामरूपांतील कामाक्षीपर्यंत, आमचीं पुण्यक्षेत्रें आज स्वतंत्र मुक्त, शुद्ध झालीं आहेत. ह्या आमच्या पुण्यक्षेत्रांप्रमाणेंच प्रत्यहीं आम्हांस आमच्या राष्ट्रैक्याचें स्मरण करून देणारा आणि आमच्या पुण्यतीर्थांना आवाहन करणारा जो मंत्र प्रत्येकाला स्नाच्या वेळीं म्हणावा लागतो त्या "गंगेच यमुनेचैव गोदावरि सरस्वति। नर्मदे सिंधु कावेरि जलेस्मिन् संनिधिं कुरु ॥" ह्या मंत्रांतील ती गंगा, ती यमुना, ती गोदावरी, ती नर्मदा, ती कावेरी हीं आमचीं पुण्यतीर्थेंहि, ह्या आमच्या राष्ट्रीय पुण्यसरिताहि, ह्या भारतीय महाराज्यांत आज विमुक्त आणि विशुद्ध होऊन सामावलेल्या आहेत–

पण, ह्या पुण्यसरितांत सिंधु कां दिसत नाहीं ?

सिंधु कोठें आहे ?

हाय ! हाय ! ह्या पुण्यसरितांतील पुण्यतम सरिता जी सिंधु ती मात्र अद्याप ह्या महाराज्यांत सामावलेली नाहीं ! सिंधु आम्हांस अजूनहि अंतरलेली आहे.

काय म्हणतां ? आतां सिंधुस विसरा ! तिचें नांव त्या मंत्रांतून गाळून टाका आणि तो तुमचा स्नानाचा मंत्र आतां यापुढें अर्धाच म्हणत जा ? नाहींतर अमके सोमे गोमे आमच्यावर रागावतील, आमचा द्वेष करुं लागतील ! म्हणून सिंधूचा संबंध सोडून द्या ?

छे ! छे !! सारें जग जरी आमचा द्वेष करूं लागले, किंवा साऱ्या जगाचा जरी आम्हांस द्वेष करावा लागला तरी सिंधूचा संबंध आम्हीं सोडणार नाहीं, तोडणार नाहीं. सिंधूस आम्हीं विसरू ? सिंधूवांचून हिंदु !! अर्थावांचून शब्द ! प्राणावांचून कुडी ! अशक्य, अशक्य, ! जोंवर अेकतरी हिंदु जिवंत आहे तोंवर तो सिंधूस विसरणें शक्य नाहीं !

सिंधु सूक्त !

जिच्या कांठावर आमच्या प्राचीनतम वेदर्षींनीं ऋचांचीं पहिलीं सामगायनें गाअिलीं, जिच्या पुण्यसलिलांनहीं आपल्या संध्यावंदनांतील अर्घ्यें दिलीं आणि जिला अत्यादरानें वेदांतील देवतांमध्यें स्थान देऊन तिच्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुंदरांतील सुंदर सूक्तें रचलीं त्या तुला, हे 'अंबितमे नदीतमे, देवितमे,' सिंधू, आम्हीं कधींहि विसरणार नाहीं. तुझ्या परिसरांमध्यें आमच्या प्राचीनतम राजर्षींनीं नी ब्रह्मर्षींनीं केलेल्या यज्ञांच्या प्रदीप्त हुताशनांत जेव्हा हवी समर्पिले तेव्हां अंतराळांत अुंच अुंच दरवळत गेलेल्या त्यांच्या सुगंधांनीं लालायित होअून अिंद्र वरुण, मरुतादिक देव त्यांचे त्यांचे हविर्भाग स्वीकारण्यास तुझ्या तीरीं येत आणि सोमरसा-समवेतच तुझें सुमधुर सलिल पिअून प्रसन्न होत! त्या तुला हे सुरसरिते सिंधू आम्हीं कधींहि विसरणार नाहीं.

त्यांतहि ह्या आमच्या महाराष्ट्रास तरी पूर्वीपासूनच तुझी अवीट ओढ लागलेली आहे. पूर्वी अेकदां जेव्हां तूं आम्हांस अशीच अंतरली होतीस तेव्हांहि पारतंत्र्याच्या बंदिवासांतून तुला मुक्त करण्यासाठीं ह्या महाराष्ट्राचें चतुरंग सैन्य अुत्तरदिशेला चढून गेलें. कारण दक्षिण दिग्विजय साधला पण अुत्तर दिग्विजय अुरला असें हळहळत आमचा शिवाजी राजा मरण पावला होता. त्याची ती अपुरी अिच्छा पुरी करण्यासाठीं नर्मदा ओलांडून बाजीरावानें चंबळ गांठली. पण नुसतें चंबळचें पाणी पिअून कांहीं आमच्या विजविष्णु घोडयांची तहान भागली नाहीं! म्हणून 'त्या मोंगल बादशहाची दाढींच जाळून टाकतो' असें गर्जत बाजीराव दिल्लीवर चालून गेला. आमचे जयिष्णु घोडे यमुनेचें पाणी प्यायले, गंगेचें पाणी प्यायले. पण त्यांची विजयतृष्णा भागेना. म्हणून ते पुढें घुसले. त्यांनीं शतद्रु (सतलज) ओलांडली, वितस्ता (जेहलम) ओलांडली आणि म्लेंच्छांना पादाक्रांत करीत त्यांनीं जेव्हां अटकेवर भगवाजरिपटका अुभारला आंणि तुझे तीर गाठून, तुझें तें पवित्र सलिल आकंठ प्राशिलें तेव्हांच काय ती त्यांची विजयतृष्णा क्षणभर भागली! त्या तुला अितर कोणीहि जरी अेकवेळ विसरले तरी हे स्रोतःस्विनि सिंधु, हा आमचा अेकटा महाराष्ट्र अुठून तुला पुन्हा विमुक्त केल्यावांचून राहणार नाहीं!"

✠ ✠ ✠

(अभिनव भारत सांगता समयींचीं भाषणें : मूल्य १ रुपया २५ न. पैसे)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यवनांतक पुष्यमित्र : : ३२

✠ ✠ ✠

[भारताच्या अितिहासांतील 'सहा सोनेरी पानें' या संकल्पित पुस्तकापैकीं पहिला भाग प्रसिद्ध करण्यांत आला असून त्यांत पहिल्या चार सोनेरीं पानांचा अितिहास आला आहे. आणि पुढचा भाग सध्या वीर सावरकर लिहीत आहेत. 'यवनांतक पुष्यमित्र' हें वीर सावरकरांच्या मताप्रमाणें दुसरें सोनेरी पान आहे. या पुस्तकांत दैनिक अितिहास कथन केलेला नसून स्वतंत्र राष्ट्रानें अितिहास कसा वाचावा, अैतिहासिक घटनांचा अुलगडा कसा करावा हें वीर सावरकरांनीं आपल्या राष्ट्रप्रेमी, तर्कशुद्ध, अैतिहासिक बुद्धीनें दाखविलें आहे.]

✠ ✠ ✠

सोनेरी पान दुसरें

कलिंगाच्या प्रतापी खारवेल राजाच्या विजयामुळें अुत्तर भारतांतील वैदिक धर्मीय नेत्यांत नी जनतेंत वीरश्रीची लाट आधींच अुसळली होती. त्यांतच मिन्यांडरचें ग्रीक सैन्य पुन्हां मगधावर चालून येतें आहे ही बातमी आली. त्यांतहि भारतीय बौद्ध जनतेंत स्वदेशद्रोही प्रवृत्ति वळावत असून राष्ट्रशत्रु ग्रीकांचें राज्य भारतांत स्थापिलें जावें म्हणून ती मिन्यांडरला अनुकूल होत आहे अशीं स्पष्टचिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां ग्रीकांचा अेकदाचा निःशेष निःपात करण्यासाठीं प्रथमतः मगधाचा तेव्हांचा बौद्धधर्मी राजा जो बृहद्रथ मौर्य त्यालाच सिंहासनावरून खालीं ओढून कोण्या अेकाद्या चंद्रगुप्तांसारख्या पराक्रमी वैदिक धर्मीय पुरूषासच सम्राट्पदी स्थापावें या हेतूनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गंगेंत मिठाचा खडा विरावा तसे ग्रीक भारतीयांत विरून गेले.

अुत्तरेंत राष्ट्राभिमानी भारतीय नेत्याचें अेक मोठें राज्यक्रांतिकारक कारस्थान रचण्यांत आलें. पण त्या सर्वांसमोर मुख्य प्रश्न जो होता तो हा कीं यवनांचा नि:पात करणारा आणि ह्या राज्यक्रांतीचें धुरंधरत्व पत्करणारा असा पराक्रमी पुरुष आहे कोण ?

पुष्यमित्र ?

मगधाच्या अुपर्युक्त बृहद्रथ मौर्य ह्या राजाचें जें कांही 'सैन्य' म्हणून अुरलेलें होतें त्यांत पुष्यमित्र नावाचा अेक सैनिक होता. पुष्यमित्र हा जन्मानें ब्राह्मण होता. वैदिक धर्माचा नी भारतीय राष्ट्राचा तो कट्टर अभिमानी होता. आणि त्यांतहि निष्ठावंत शिवभक्त होता. त्याच्या कुलाचें नांव शुंग होतें. मगधाच्या त्या सैन्यामध्ये तो आपल्या क्षात्र तेजानेंहि अितकें वर्चस्व पावलेला होता कीं त्या बृहद्रथ मौर्य राजांनें ग्रीकांनीं केलेल्या स्वारींच्या प्राणसंकटांत पुष्यमित्रालाच निरूपायानें मुख्य सेनापतिपदावर नेमलें. सेनापतित्व हातीं येतांच त्यानें मगधाच्या सैन्याचें शस्त्रबळ नी संख्याबळ वाढविण्यास लगोलग आरंभ केला. ह्या योगायोगानें साऱ्या वैदिक धर्मीय राष्ट्रभक्त जनतेचे डोळे आपण होअून सेनापति पुष्यमित्र ह्याच्याकडे लागले. ज्याला त्याला अशी अुत्कट अशा वाटू लागली कीं जर सेनापति पुष्यमित्रच ह्या क्रांतीचें नेतृत्व घेअील तर ? तर त्या पराक्रमी पुरुषाहून आज भारतीय साम्राज्याच्या परंपरागत सिंहासनावर बसण्यास ह्या पिढींत तरी त्याच्याहून अधिक योग्य कोण आहे ?

केव्हां केव्हां अितिहासामध्यें

॥ फलानुमेयाः प्रारंभाः संस्काराः प्राक्तना अिव ॥

ह्या न्यायानें पुढें प्रकटपणें घडलेल्या घटनांवरूनच काय तें कूटनीतिज्ञांनीं त्या पूर्वी आणि त्या घडवून आणण्यासाठीं काय काय गुप्त कट आणि कारस्थानें रचलीं असलींच पाहिजेत त्यांचा छडा लावतां येतो. मगधांतील ह्या राज्यक्रांतींत पुढें लवकरच वर्णिल्या जाणाऱ्या अितिहाससिद्ध घटनांमुळें हें स्पष्टच होतें कीं स्वतः सेनापति पुष्यमित्रानें आधींपासूनच ह्या भावी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यक्रांतीच्या कटाचें नेतृत्व गुप्तपणें स्वीकारलेलें असलें पाहिजे. अितकेंच नव्हे तर त्याच्या हातीं असलेल्या राज्यीय सैन्याची आणि त्यांतील प्रमुखांचीहि त्यानें हृया क्रांतीला प्रत्यक्षाप्रत्यक्ष संमति मिळविली असली पाहिजे.

बृहद्रथ मौर्याचा शिरच्छेद

ही सर्व पूर्वसिद्धता चालली असतां अेके दिवशीं पाटलीपुत्र हृया राजधानीच्या भव्य पटांगणांत सर्व सैन्याचा शस्त्रसंचलनसमारंभ करण्याचें योजिलें गेलें. त्याप्रमाणें त्या सैनिक समारंभाचें निरीक्षण करण्यासाठीं सम्राट् बृहद्रथ मौर्य हा स्वतः अुपस्थित होता. सेनापति पुष्यमित्राच्या आज्ञेनुसार त्या चतुरंग सैन्यांतील विविध शस्त्रविभागांचे कार्यक्रम मोठ्या गाजावाजानें चालू असतां, ज्याचा अितिहासांत अुल्लेख सांपडत नाहीं अशा कोणत्यातरी कारणानें राजा बृहद्रथ बसला होता त्या बाजूला कांहींतरी अुत्क्षुब्ध कटकट चालूं झाली. त्या अुत्क्षोभांतच स्वतः सेनापति पुष्यमित्र हृयानें नांवानेंच काय तो सम्राट् असलेल्या बृहद्रथ मौर्यावर चालून जाअून त्याचा तेथल्या तेथेंच शिरच्छेद केला !

हृया शिरच्छेदांतच अशोकाच्या वंशाचा राजकीय अंत झाला ! बौद्धधर्मीय मौर्य राज्य लयाला गेलें ! !

हृया अकस्मात् घडलेल्या भीषण घटनेसरशी तेथें जमलेल्या जनसागरांत मोठी खळबळ अुडाली. परंतु त्या साऱ्या शस्त्रसज्ज दळभारांतील किंवा बृहद्रथाभोवतीं बसलेल्या राजपुरुषांतील कोणीहि बृहद्रथाच्या वतीनें सेनापति पुष्यमित्रावर तुटून पडला कां ? नाहीं. अुलट त्या शस्त्रसज्ज दलभारांतून सेनापति पुष्यमित्राच्या नांवाचा जयघोष अुठूं लागला.

कारण सैनिकांसुद्धां अनेकांच्या मनांत जें करावयाचें होतें, परंतु जें महासाहसी कृत्य करण्याचें अुत्तरदायित्व स्वतःकडे घेण्यास साऱ्या अुत्तर भारतांत कोणीहि धजत नव्हता, तेंच भारतीय साम्राज्याच्या स्वातंत्र्यसंरक्षणास अपात्र ठरलेल्या अशोकवंशज बृहद्रथ मौर्याचा शिरच्छेद अशोकाच्या भर राजधानींतच करण्याचें अपरिहार्य राष्ट्रीय कर्तव्य सेनापति पुष्यमित्रानें केलें होतें !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय स्वातंत्र्य-रक्षणार्थ जें पूर्वी चंद्रगुप्तास करावें लागलें तेंच साहसी कृत्य पुष्यमित्रानें केलें !

शिकंदराच्या अगदीं पहिल्या स्वारीच्या वेळीं ग्रीकांचा प्रतिकार करण्यास असमर्थ ठरलेल्या नामधारी सम्राट् महापद्मनंदाचा शिरच्छेद, भारतीय स्वातंत्र्याच्या आणि भारतीय साम्राज्याच्या संरक्षणार्थ ज्याप्रमाणें आर्य चाणक्य नि सम्राट् चंद्रगुप्त ह्यांना राष्ट्रीय कर्तव्य म्हणूनच करावा लागला, अगदीं त्याच कारणासाठीं मगधच्या ह्या बौद्ध धर्मीय नामधारी सम्राट् बृहद्रथ मौर्याचा शिरच्छेद सेनापति पुष्यमित्रास राष्ट्रीय कर्तव्य म्हणूनच करावा लागला.

सम्राट् पुष्यमित्र शुंग

ही घटना अिसवी सन पूर्व १८४ व्या वर्षाच्या आसपास घडली. वैदिक विध्यनुसार पाटलिपुत्रांत भारतीय सम्राटपदाचा अभिषेक होअून पुष्यमित्र अशोकाच्या सिंहासनावर आरूढ झाला. मौर्य राजवटीचा अंत होअून सम्राट् पुष्यमित्राच्या शुंग वंशाची राजवट चालू झाली.

सम्राट् पुष्यमित्राची ग्रीकांवर चढाअी

प्रथमत: राजधानींतील नि आसपासच्या प्रदेशांतील सारा राज्यप्रबंध व्यवस्थित नि बळकट करून आणि चतुरंग, प्रबळ नि रणोत्सुक असें भारतीय सैन्य अुभारून सम्राट् पुष्यमित्रानें अयोध्येस ठाण मांडून मिन्यांडरवर स्वारी केली. भारतीय शस्त्रबळापुढें रणांगणांत टिकाव धरणें अशक्य झाल्यामुळें यवन सेनापति मिन्यांडर, मागें पंचनदाकडे सैन्यासह पण झुंजत हटूं लागला. परंतु पूर्वी डेमिट्रियसचा पिच्छा पुरविण्याचें जसें राहून गेलें तशी ढिलाअी ह्या वेळीं न करतां सम्राट् पुष्यमित्रानें ग्रीकांच्या सैन्याचा कडोनिकडीनें पाठलाग केला. पराभवामागून पराभव खाल्ल्यामुळे नी त्याच्या ग्रीक सैन्याचा सारा व्यूह ढांसळून गेल्यामुळें अगदीं हतवीर्य झालेल्या मिन्यांडरला पुष्यमित्रानें सिंधुपार हुसकून दिलें. सारें सिंधूपर्यंतचें भारत ग्रीकांच्या राजकीय दास्यांतून मुक्त झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रीकांची तलवार तोडून टाकली, ढाल फाडून टाकली, त्यांच्या राजसत्तेचा कंदच अुपटून टाकला

भारतावरील ग्रीकांची हीच शेवटची स्वारी झाली. सम्राट् पुष्यमित्रानें केलेल्या ग्रीकांच्या ह्या पराभवामुळें त्यांची शस्त्रशक्ति अितकी क्षीण झाली कीं पुन्हां सिंधुनदी ओलांडून भारतावर स्वारी करण्याची धमकच त्यांच्यांत अुरली नाहीं. शिकंदरापासून भारतास अुपद्रव देत आलेल्या ह्या यवनशत्रूचा भारतानें असा नित्याचा निःपात केला.

ग्रीकांच्या हातून सोडविलेला सारा प्रदेश पुष्यमित्रानें आपल्या साम्राज्यास जोडला. अुज्जयिनीला तिकडच्या राज्य-विभागांचा मुख्य राजप्रतिनिधि म्हणून त्यानें आपला पुत्र सेनापति अग्निमित्र यास नेमलें. सेनापति अग्निमित्र हाहि बापाप्रमाणेंच शूर आणि कर्ता पुरुष होता. त्यानें दक्षिणेकडील विदर्भ देशापर्यंत आपल्या साम्राज्याचें आधिपत्य मान्य करविलें. परंतु पुढें विदर्भाचा राजा तें आधिपत्य मानीना यास्तव अग्निमित्रानें त्याच्यावर स्वारी केली. तींत विदर्भराजाचा पराभव झाला. त्याच घडामोडींत विदर्भ राजाची कन्या मालविका अग्निमित्राच्या पराक्रमादि गुणांनीं मोहित होअून त्याच्याशीं विवाह करावयास अुत्सुक झाल्यामुळें विदर्भ राजानें पुष्यमित्राच्या संमतीनें अग्निमित्राशीं मोठ्या समारंभपूर्वक तिचें लग्न लावून दिलें. ह्यामुळें त्या दोन्ही राजकुलांचा केवळ स्नेहसंबंधच नव्हे तर रक्तसंबंधहि जुळून आला. ह्या रमणीय कथेवरच कालिदासानें आपलें ' मालविकाग्निमित्र ' हें नाटक लिहिलें आहे.

अशोकाच्या पाटलिपुत्रांतच अश्वमेध यज्ञ !

ग्रीकांसारख्या पुरातन परकीय शत्रूंचा निःशेप निःपात करून भारतीय साम्राज्याचें पुनरुज्जीवन करणाऱ्या सम्राट् पुष्यमित्रास आपल्या वैदिक परंपरेनुसार आतां अश्वमेध यज्ञ करण्याचा अधिकार स्वपराक्रमानेंच प्राप्त झालेला होता. सम्राट् पुष्यमित्राच्या ह्या अधिकाराविषयीं व्हिन्सेंट स्मिथहि त्याच्या The Early History of India ह्या ग्रंथांत गौरवपूर्ण लिहितो कीं:—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

The Yavanas and all other rivals having been disposed of in due course Pushyamitra was justified in his claim to reign as the paramount power of North India and straightway proceeded to announce his success by a magnificent celebration of the Ashwamedha sacrifice at his capital (Page 189) "

सम्राट् पुष्यमित्रानें अश्वमेध यज्ञाचा सोडलेला संकल्प अैकतांच साऱ्या भारतवर्षांत, अत्यंत अल्पसंख्य असलेली बौद्ध जनता सोडून दिली असतां, भारतीय राष्ट्राभिमानाची नी विजयानंदाची लाट अुसळली. ज्या अशोकानें वैदिक धर्मीयांचें धार्मिक आचारस्वातंत्र्य राजदंडाच्या बळानें छिनावून घेतलेलें होतें त्याच बौद्ध अशोकाची राजधानी असलेल्या पाटलिपुत्रांत वैदिक धर्माभिमानी सम्राट् पुष्यमित्राचा हा अश्वमेध यज्ञ होणार होता. वैदिक धर्मीयांच्या धर्माचार-स्वातंत्र्यावरील अशोकानें लादलेले सारे प्रतिबंध काढून टाकलेले आहेत अशी सम्राट् पुष्यमित्रानें केलेली, तो अश्वमेध यज्ञ म्हणजे अेक प्रकट सम्राटीय घोषणाच होती !

आशियायी ग्रीक वंशाचाच नायनाट

वर वर्णिल्याप्रमाणें सम्राट् पुष्यमित्रानें साधारणत: अिसवी सनापूर्वी १९०ते१८० वर्षांच्या मध्यंतरीं ग्रीक आक्रमकांना नित्याचें सिंधुपार हुसकून देअून भारत स्वतंत्र केल्यानंतर ग्रीकवंशाच्याच अितिश्रीस आरंभ झाला. सिंधुपलिकडे गांधारांत नी व्याक्ट्रियांत (बाल्हीक देशात) त्यांचीं कांहीं दुर्बळ होत चाललेलीं लहान सहान फुटकळ राज्यें टिकाव धरून होतीं. परंतु अिसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या आरंभाच्या आगेमागें जेव्हां मध्यअेशियांतील शक जातीचा प्रचंड लढाअू लोंढा व्याक्ट्रीया (बाल्हिक,) अिराण नी गांधार ह्या प्रांतांवर येअून आदळला तेव्हां त्या कडव्या नी रानटी शकांच्या खड्गापुढें तिकडील साऱ्या ग्रीक जनतेस पळतां भुअी थोडी झाली. पुरुष, स्त्री, मुलाबाळांसुद्धां ते पुढे पळत, थांबत, पुन्हां पुढें पळत, आपला जीव वांचविण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साठीं शेवटीं सिंधु अुतरून भारतीय साम्राज्यांत शिरले, पण आतां केवळ आश्रयार्थी म्हणून, शरणार्थी म्हणून ! – कुठें ते अिसवी सनपूर्व ३२९ ते ३२७ मध्यें 'युद्धं देहि' म्हणून गर्जत भारतावर चढून आलेले, शिकंदर सेल्युकसचें विजयार्थी ग्रीक आणि कुठें हे भारतीय पराक्रमापुढें शेवटीं हतवीर्य झालेले अिसवी सनाच्या आरंभीं आरंभीचे 'भिक्षां देहि' म्हणत भारतीयांच्या दारोदार हिंडणारे त्यांचे वंशज शरणार्थी ग्रीक !

पण अशा दुर्दशेंतहि जुनें वैर विसरून भारतानें त्यांना आश्रय दिला. भारतीयांच्या अुदारतेचा त्यांच्या त्या टोळ्यांपैकीं जिला जिथें आश्रय मिळाला त्या त्या नगरांत, प्रांतांत ती ती ग्रीकांची टोळी फुटकळपणें वसत गेली. त्यांच्यापैकीं कांहीं बौद्ध झाल्या, कांहीं वैदिक धर्मीय झाल्या. परंतु त्या काळीं वैदिक धर्मीयांचींच राज्यें असल्यामुळें ह्या ग्रीक समाजांतील व्यक्तिव्यक्तीचा धर्म बौद्ध असला काय, वैदिक असला काय, तरी कोणच्याहि प्रकारचा राजकीय अुपद्रव देणें त्यांना शक्य झालें नाहीं. हळुहळु ते स्वतःची ग्रीक भाषाहि विसरले. भारतीय भाषा, चालीरीति हीं सारीं आत्मसात् करून भारतीय समाजांत ते अेकरूप होत गेले. त्यांच्यांत भारतीयांपासून आपण अलग आहोंत, अन्य राष्ट्र आहोंत अशी प्रेरणा देणारी जी अहंकारी ग्रीकपणाची भावना तीच मुळीं त्यांचे विवाहादि संबंधहि भारतीयांत होत गेल्यानें अेक दोन शतकाच्या आंत नष्ट झाली. गंगौघांत मिठाचा खडा विरून जावा तसें त्यांचें ग्रीकपणच भारतीय जीवनांत विरुन गेलें.

म्लेंच्छांना प्रथम संग्रामांत जिंकूं शकलों म्हणूनच त्यांना संस्कृतींत आत्मसात् करूं शकलों

तथापि ह्या प्रकरणीं बहुतेक अितिहास लेखकांचें आणि आपल्या लोकांचें अेका महत्त्वाच्या विधेयाकडे लक्ष आकर्षिलें गेलेलें नाहीं. त्यासाठींच ते विधेय अिथें अुल्लेखिणें अवश्य आहे. ती गोष्ट ही कीं भारतावर चढाअी करून आलेले विजयार्थी यवन काय किंवा पुढें आणखी जे जे कोणी म्लेंच्छ भारतावर चालून आले ते परशत्रु काय, त्यांच्यापैकीं ज्यांना ज्यांना शतकव्यापी संघर्षानंतर कां

 CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होओीना पण भारतीयांनीं जिकून, गिळून, पचवून आपल्या संस्कृतींत, समाजांत आत्मसात् करून टाकलें, नाहीसें करून टाकलें, त्या त्या प्रत्येकाच्या प्रकरणीं हेंच सिद्ध झालेलें आहे कीं त्या त्या आक्रमकांची ती चढती तलवार भारतीय पराक्रमानें प्रथम जेव्हां तोडून टाकली, त्यांना सशस्त्र संगरांतहि जेव्हां चारी मुंडया चीत पाडलें, तेव्हांच काय तें, ते ते परकीय सशस्त्र आक्रमक आमच्या भारतीय संस्कृतींत नी समाजांत आत्मसात् करून टाकण्याअितके चर्वणीय नी पचनीय होअू शकले. केवळ शांतिपाठानें नव्हे, तर शस्त्रबलवत्तर शस्त्रपाठानें !

धर्मच्छळ केला नाहीं

राष्ट्रद्रोहाच्या पापाचा योग्य तो दंड दिला !

सम्राट् पुष्यमित्रानें बौद्ध भिक्षूंचा फार छळ केला, कांहींना ठार मारलें, कांहीं मठ अुद्ध्वस्त केले असे पौराणिक पद्धतीनें रंगविलेले अुल्लेख जुन्या बौद्धग्रंथांतून सांपडतात. युरोपियन अितिहासलेखकांनीं सुद्धां ह्या अुल्लेखांना अतिशयोक्तिपूर्ण म्हणूनच बाजूस सारले आहे, तथापि कांहीं जणांनीं ह्या अतिशयोक्तिच्या बुडाशीं थोडेंतरी तथ्य असलें पाहिजे, पुष्यमित्रानें केवळ धर्म-द्वेशानें बौद्धांवर केवळ अन्याय्य सूड अुगविण्यांसाठीं थोडाफार छळ केला असला पाहिजे असें प्रतिपादिलें आहे. आमच्या मतेंहि बौद्धांपैकीं अनेकांना सम्राट् पुष्यमित्रानें धारेवर धरलें असलेंच पाहिजे. परंतु तें केवळ तात्त्विक नी धार्मिक मतभिन्नतेसाठीं नव्हतें.

बौद्धलोक लोक शून्यवाद किंवा अज्ञेयवाद मानीत किंवा त्यांत कोणी नास्तिक होते किंवा अहिंसक होते किंवा वेदनिंदक होते किंवा त्यांच्या जपजाप्याच्या पद्धति वैदिकाहून सेगळ्या होत्या म्हणन कांहीं बौद्धांचा सामुदायिक 'धर्मच्छळ' झालेला नव्हता. स्वतः गौतमबुद्धाला त्याच्या धर्मांचा प्रसार करतांना कोणाचीहि आडकाठीं झालेली नव्हती ! तेंहि राहो. पण पुढें चंद्रगुप्ताच्या अखिल नी अखंड भारतवर्षीय साम्राज्यांत नी धर्मनिष्ठ अशा स्वतः आर्य चाणाक्याच्या प्रधानवटींत, बौद्ध धर्माला अुणींपुरीं ३००

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्षे अस्तित्वात येअून झाली असतांहि त्यांचा छळ होत असल्याची कुणकुणहि त्यावेळचा प्रख्यात ग्रीक राजदूत जो चंद्रगुप्ताच्या राजसभेंत वर्षानुवर्षे राहिलेला होता त्या मेग्यास्थिनीसनें आपल्या अितिहासप्रसिद्ध प्रतिवृत्तांत नोंदलेलें नाहीं. मेग्यास्थिनीसच्या प्रतिवृत्तांत बुद्धधर्माचें नांवसुद्धां आलेलें नाहीं कारण तेव्हां शिकंदर किंवा सेल्यूकस ह्या बलाढ्य ग्रीक सेनानींशीं किंवा त्यांच्या सैन्याशी बौद्धांनी राजद्रोहात्मक किंवा राजकीय असें देशघातक संबंध ठेवलेले नव्हते. त्यांना तें शक्यच नव्हतें. म्हणूनच अशा अितर अनेक पंथांप्रमाणें बौद्धानाहि चंद्रगुप्ताच्या नी आर्यचाणक्यांसारख्यांच्या वैदिकधर्मीय साम्राज्यांत आपापल्या धर्माप्रमाणें आचरण करतां आलें. अितकेंच नव्हे तर त्यांच्या अुपदेशानें जो कांहीं प्रचार करतां येअील तो प्रचारहि करतां आला.

परंतु शिकंदर सेल्यूकसनंतर ग्रीकांची जी दुसरी चढाअी डेमेट्रियस – मिन्यांडरच्या वेळीं भारतावर झाली नी ते राष्ट्रशत्रू थेट अयोध्येपर्यंत येअून मगधाच्या सम्राट् पीठावरच ग्रीक सम्राटाचा राज्याभिषेक करण्याच्या बेतांत आले तेव्हां अशा भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य धोक्यांत आणणाऱ्या राजकीय संकटांत भारतीय बौद्धांनी मागें वर्णिल्याप्रमाणें धडधडीत राष्ट्रद्रोह केला. अिथेंच हेंहि सांगणें विषयानुकूल होणार आहे कीं मिन्यांडर–ज्याला बौद्ध 'मिलिंद' म्हणतात– स्वत: बौद्ध धर्म स्वीकारता झाला तेव्हां त्या ग्रीक राजालाच भारतीय बौद्धांनीं आपली राजनिष्ठा विकली. त्याला त्या त्या भारतीय प्रदेशाचा राजा मानलें. त्या ग्रीकांच्या भारतीय प्रदेशांतील राजसभेंत बौद्धपंडीत नी बौद्धधर्म भिक्षु कोण्या स्वराष्ट्रीय राजाच्याच राजसभेंत मिरवावें तसें मानानें मिरवू लागले. अशीं ही भारतीय बौद्धांचीं भयंकर देशद्रोहक कृत्यें मठामठांतील स्वराज्यघातक कट नी राष्ट्रस्वातंत्र्यविरोधी अुठावण्या करण्याचा जनतेंत केलेला प्रचार हाणून पाडण्यासाठीं ग्रीकांशीं प्रत्यक्ष युद्ध चाललेल्या काळांत सम्राट् पुष्यमित्राला नी त्याच्या सेनाधिकाऱ्यांना अशीं राष्ट्रद्रोही कृत्यें नी प्रचार करणाऱ्या भारतीय बौद्धांना देहान्त शासन

(सा...३१)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देणें, नी अशा भारतद्रोही कटांचीं केंद्रें असणाऱ्या बौद्ध मठांना अुद्ध्वस्त करून टाकणें भागच होतें. भारतीय स्वातंत्र्याच्या नी साम्राज्याच्या संरक्षणार्थ स्वदेशद्रोह नी परराष्ट्रांस मिळणाऱ्या स्वराष्ट्रघातक्यांना दिलेला तो न्यायोचित राजकीय दंड होता, तो त्यांचा केलेला धार्मिक छळ नव्हता. भारतीय साम्राज्याचा प्रमुखतम दंडधारक असणाऱ्या सम्राटानें अशा राष्ट्रघातक पाप्यांना, मग ते वैदिक असोत व बौद्ध असोत, दंड करणें हें पुष्यमित्राच्या वैदिक धर्मीय दंडनीतीप्रमाणें त्याचें राजकर्तव्यच होतें. धर्मकर्तव्यच होतें.

कोण धर्मसहिष्णु ?
अशोक कीं पुष्यमित्र ?

गतानुगतिक अितिहासलेखकाला अशोकाला परधर्मसहिष्णु म्हणून गौरविण्याचा जो परिपाठ पडून गेला आहे आणि पुष्यमित्राच्या धर्मस्वातंत्र्य प्रथापिणाऱ्या महत्कृत्याविषयीं अुल्लेख करण्याचें भानहि कोणा स्वदेशीय वा परदेशीय अितिहासकाराला न राहतां अुलट त्यानें बौद्धांचा 'धर्मच्छळ' केला असल्याच्या बौद्ध पौराणिक कथा मात्र अुल्लेखिण्याचा नी त्यामुळें पुष्यमित्र हा कांहीं परधर्मसहिष्णु नव्हता असें सुचविण्याची किंवा ठासून सांगण्याची जी परंपरा चालू आहे तिचाहि बिमोड केला पाहिजे. जर कोणी धार्मिक असहिष्णुतेचा अधिक दोषभागी असेल तर तो अशोकच होय. कारण नुसत्या प्रचारानें नव्हे तर राजशक्तीच्या बळानें साऱ्या भारतवर्षभर वैदिक धर्मीयांचे म्हणजेच भारतीय राष्ट्रांतील त्या काळच्या अधिकाधिक जनतेचे यज्ञयाग मृगयाप्रभृति अनेक मूलगामी धर्माचार सर्व भारतभर दंड्य ठरविले होते पण अशोकाचें अुट्टें काढण्यासाठीं सुद्धां सम्राट् पुष्यमित्रानें कांहीं अशी राजाज्ञा काढली नाहीं कीं, 'बौद्धांनीं मठामठांतून सामुदायिक यज्ञ वैदिक पद्धतीनेंच केलेले पाहिजेत !" किंवा 'निदान प्रत्येक गृहस्थाश्रमी बौद्धानें घरोघर वैश्वदेव केलाच पाहिजे !' राष्ट्रशत्रूंशीं कोणताहि राजकीय संबंध न ठेवतां आपआपला धर्माचार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंवा धर्मप्रचार करणाऱ्या पण वैदिक धर्मीय नसलेल्या अनेक पथांचे समूहांना भारतांत त्या काळींहि जसें धर्मस्वातंत्र्य नी सुरक्षितता अुपभोगितां येत होती तशीच ती तितक्या निरुपद्रपणें वावरणाऱ्या बौद्धांनाहि अुपभोगितां येत होती. आतां हें शक्य आहे कीं भर युद्धकालांत देशद्रोह करणाऱ्या बौद्धांची अवश्य ती ससेहोलपट चालली असतां सुक्याबरोबर ओलेंहि कांहीं प्रकरणीं जळलें गेलें असेल. पण तो नियम नव्हे — अपरिहार्य अपवाद.

पुष्यमित्रानें केलें तें हेंच सत्कृत्य होतें कीं अशोकानें अुच्छेदिलेलें धर्मस्वातंत्र्य भारतीय साम्राज्यांत पुन्हां प्रस्थापिलें. धार्मिक असहिष्णु किंवा पक्षपाती म्हणावयाचें तर अशोकास म्हणावें पुष्यमित्रास नव्हे. शिकंदराच्या वेळेपासून भारताला अुपद्रव देत असलेल्या यवनांच्या राजसत्तेला, शस्त्रशक्तीचा आणि म्हणूनच परिणामीं त्यांच्या वांशिक अस्तित्वाचा ज्याच्या प्रतापी खड्गानें शेवटीं शिरच्छेद करून टाकला आणि अेतदर्थच ज्यास **'यवनांतक'** ही पदवी यथार्थपणें शोभते आहे त्या सम्राट् पुष्यमित्रानें, त्यानेंच मुक्त केलेल्या आपल्या भारताच्या स्वातंत्र्याचें नी साम्राज्याचें संरक्षण, संगोपन् नी संवर्धन ३६ वर्षें पर्यंत केल्यानंतर अिसवी सन पूर्व १४९ व्या वर्षांच्या आगेंमागें आपला देह ठेवला.

ज्या अर्थी **यवनविजेत्या** सम्राट् चंद्रगुप्ताच्या राजमुद्रेनें अंकित झालेलें पान आपल्या भारतीय अितिहासांतील 'पहिलें सोनेरी पान' ठरतें त्याच अर्थी **'यवनांतक'** सम्राट् पुष्यमित्राच्या राजमुद्रेनें अंकित झालेलें, आपल्या भारतीय अितिहासांतील जें पान तें ठरतें.

सोनेरी पान दुसरें.

✠ ✠ ✠

(सहा सोनेरी पानें (भाग पहिला : मूल्य २ रुपये.)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुःशाप : : ३३

✠ ✠ ✠

[रत्नागिरींत असतां १९२६ मध्यें स्वा. वीर सावरकरांनीं हें अस्पृश्योद्धावरील नाटक लिहिलें. त्याची प्रथमवृत्ति १९२७ मध्ये प्रसिद्ध झाली. नाटकांत राजकारण असेल म्हणून या नाटकांचें इंग्रजी भाषांतर सरकारनें करविलें होतें. नंतरच परवानगी देण्यांत आली. या नाटकांतलीं दोन भाषणें केवळ विषयाचा परिचय होण्यासाठीं दिलीं आहेत.]

✠ ✠ ✠

अंक ३, प्रवेश ६

किसन—ठीक आहे तर शिकंदर ! मी हिंदु धर्माचा त्याग करून मुसलमानी धर्म स्वीकारला असता मला केवढी महती प्राप्त होअील हें माझ्या मनावर ठसविण्यासाठीं तूं अितका वेळ पराकाष्ठा केलीस. हिंदु समाजाच्या हातून महारांचा छळ होत आहे हें तूं सिद्ध करूं पाहतोस. परंतु महारहि हिंदु समाजाचाच भाग आहे. तेव्हां महार महाराचा छळ करतात, असंच तुझ्या विधानाचें विलक्षण तात्पर्य निघतें. हिंदु समाजांतील अेक भाग अज्ञानानं आणि भ्रान्त गर्वभरानं त्याच समाजाच्या अस्पृश्य मानल्या गेलेल्या अन्य भागाचा छळ करतात हें खरं आहे. परंतु त्या अेका भागाच्या चुकीकरितां मी हिंदु समाजच सोडण्याचा यत्न करणें म्हणजे मी मलाच सोडून जाण्याची अिच्छा करण्यासारखें, वेडगळपणाचें होअील. तूं हिंदुत्वाला मुकल्यानें केवढं थोरपण पावला आहेस त्याचें प्रदर्शन मजसमोर करून हिंदुत्व सोडण्याला माझं मन वळविण्याचा यत्न करणें म्हणजे मी मलाच सोडून जाण्याची अिच्छा करण्यासारखें वेडगळपणाचें होअिल. तूं हिंदुत्वाला मुकल्यानें केवढें थोरपण पावला आहेस त्याचं प्रदर्शन मजसमोर करून हिंदुत्व सोडण्याला माझं मन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वळविण्याचा तूं अितका प्रयत्न केलास असा प्रयत्न पूर्वीं अेका शेपूट तुटून गेलेल्या कोल्ह्यानं केला होता. त्या लाडच्या कोल्ह्याप्रमाणें तुझा हा प्रयत्नहि मला हास्यापद वाटत आहें. या पाटलाच्या मांडीशीं मांडी लावून बसण्याचें अेक साधन, ही कांहीं माझ्या हिंदु धर्माची व्याख्या नाहीं. या कारभाऱ्याच्या हाताला हात लावण्याची योग्यता अंगीं असावी म्हणून मी कांहीं हिंदु धर्मांत जन्मलों नाहीं. अनेक जन्म पुण्यसंचय करतां करतां या हिंदु धर्मांत मी अेवढ्याचसाठीं जन्मलों आहे कीं भगवंतांनीं माझा हात आपल्या हातांत धरावा. ही तुझी दस रुपड्यांची शिकंदरखानी काय, पण अैश्वर्याच्या दिग्गजावर विलासाची रत्नखचित अंबारी चढअून जर मला तींत कोणीं बसविलें, परंतु त्या अंबारीवर मी चढतांच तिच्यावरील हिंदु धर्माचा भगवा ध्वज काढून हिरवा चांद किंवा रक्ताळलेला क्रूस तिच्यावर अुभारला तर त्या विलासाच्या अंबारीवर थुंकून आणि त्या अैश्वर्याच्या हत्तीला लाथाडून त्या रत्नखचित अुंची वरून मी जी अुडी घेअीन ती नीट या हिंदूंच्या पायाखाली तुडविल्या जाणाऱ्या अस्पृश्यतेच्या धूळींत होय. हिंदु धर्माची ही नीच धूळहि तुझ्या त्या बाटग्या अंबारीच्या श्रीमंतीहून अत्यंत श्रेष्ठ आहे. कारण या धुळींत, या माझ्या हिंदुत्वाच्या देवालयाच्या मार्गावरील धुळींत वसिष्ठाचे पदरज मिसळलेले आहेत. तींत श्रीकृष्णाचे पदरज मिसळलेले आहेत, तींत श्रीरामाचे पदरज मिसळलेले आहेत. तींत वाल्मिकीचे पदरज मिसळलेले आहेत. विक्रम आणि शालिवाहन, ज्ञानेश्वर आणि अेकनाथ रोहिदास आणि चोखामेळा यांनीं याच हिंदुत्वाच्या मार्गावरील धूळ अंगारा म्हणून आपल्या मस्तकावर धारण केली आणि ते मुक्त झालेल्या हिंदु योगाच्या धुळींत लोळतांना लागणारें सुख तुझ्या कुराणाच्या भोगांच्या स्वर्गांतील गाद्यागिरद्यांवर लोळणाऱ्या सुखाहून मला अधिक चिरंतन आनंद देत आहे. या पाटलाच्या मांडीला मांडी लावून बसण्यासाठीं तर काय पण त्या दिल्लीच्या मयुरासनावर बसण्यासाठींहि मी हिंदुत्वाचा त्याग करणार नाहीं. अस्पृश्यतेचा छळ सोशीन, माझ्या हिंदूबंधूंच्या दाराशीं पाण्याविना तळपत पडेन, हिंदूंच्या महारवाड्यांत त्यांचा पायपोस होअून राहीन, हिंदूंच्या रूढीच्या हत्तीखाली चिरडून जाअून मरेन पण हिंदु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून मरेन, जेव्हां केव्हां ते माझे हिंदुबंधु बंधुप्रेमाचा हात पुढें करतील तेव्हांच त्या हाताचा आधार घेऊन या अस्पृश्यतेच्या धुळींतून अुठेन पण परधर्माचा आणि परकीयांचा हात धरणार नाहीं. मी माझ्या बापाशीं कृतघ्न होणार नाहीं. माझा बाप तुझ्या बापाप्रमाणेंच हिंदु आहे, महार आहे, मीहि हिंदु म्हणूनच मरणार, हिंदु म्हणूनच हिंदु कुळांत परत जन्म घेणार.

अंक ५, प्रवेश २

कमलिनी:–हिंदु कुमारीकांनों, ही रक्तानं माखलेली कटचार पाहा ! पावित्र्यरक्षण आणि धर्मसंगोपन आमच्या पुरुषांना अन् देवालाहि जेव्हां करता येत नाहीं, तेव्हां तें अेकतर चितोडची चिता करूं शकते नाहींतर ही सूडाची सुरी ! त्या दोहींत अेक महत्त्वाचा फरक आहे. चितोडची चिताहि दुष्टांसाठीं सुष्टांचा बळी घेते, चोरासाठीं संन्याशाला फांशीं देते. बलात्काराला वाव मिळूं नये म्हणून अबलांचा संहार करून टाकते. आगलाव्याला आपल्या घराला आग लावता येअूं नये म्हणून आपलं घर आपणच जाळून टाकते. चितोडची चिता दुष्टांची निराशा करूं शकते पण त्याचं निर्दालन करूं शकत नाहीं. परंतु सूडाची सुरी ही क्रोधाची कटचार दोन्ही कार्यें करूं शकते. आपला देह वा धर्म बलात्कारानें बाटविणाराला आज नाहीं अुद्यां, रात्रीं नाहीं दिवसां, आधी वा मागून, अुजेडांत वा अंधारांत–आक्रमानें वा आलिंगनांत, जागेपणीं वा झोपेंत–जिथं जशी संधि सापडेल तिथें ही सात्त्विक क्रोधाची राक्षसी कटचार गांठून त्याला पापाचा दंड दिल्यावांचून सोडीत नाहीं. म्हणूनच चितोडच्या चितेपेक्षां या या सूडाच्या सुरीला बलात्कार थरथर कापत असतो, ही कटचार क्वचित् अेकाद्या कुमारीकेची शुद्धता संरक्षूं शकणार नाहीं ! परंतु त्या भ्रष्ट शुद्धतेचा सूड अुगवल्यावांचून मात्र राहणार नाहीं ! ही या सूडाच्या प्रतापानेंच अितर शेंकडों कुमारिकांची शुद्धताहि पण संरक्षण करील कारण अशा अदृश्य कटचारी धारण करणाऱ्या आकसबाज अंगनांना आपल्या अंतःपुरांत पाळायला दुर्जन बलात्कार तसा दचकून राहील कीं जसा मनुष्य आपल्या अस्तनींत विस्तव बाळगायला दचकत असतो !

✠ ✠ ✠

(अुःशाप : (मराठी) नाटक. पृष्ठें १५६. मूल्य १। रुपया.)

✠ ✠ ✠

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधुसंतांचे बोलपट कसे पहावेत ? : : ३४

✣ ✣ ✣

['साधुसंतांचे बोलपट कसे पहावेत' हा लेख स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं साप्ताहिक 'राष्ट्रधर्म' च्या दि. २९-३-५२ व दि. ५-४-५२ च्या अंकांत दोन भागांत लिहिला आहे. वानगीदाखल फक्त पूर्वार्ध येथें सादर केला आहे.

चमत्कारांनीं भरलेले साधुसंतांचे बोलपट पाहतांना श्रद्धाळू प्रेक्षक अितका भारावून जातो कीं तो केवळ भक्तिमार्गी बनून 'असेल हरि तर देअील खाटल्यावरी' म्हणत हरि हरि करीत बसतो तर तोच बोलपट पाहून चिकित्सक प्रेक्षक 'हाच का आमचा धर्म' असें म्हणत हिंदुधर्मापासून परावृत्त होअू लागतो. ह्या दोन्हीं प्रकारच्या प्रेक्षकांनीं साधुसंतांचे चित्रपट पाहण्यापूर्वी हा लेख अवश्य वाचावा. अन्य कोणत्याहि पुस्तकांत हा लेख प्रसिद्ध केलेला नाहीं.]

✣ ✣ ✣

महाराष्ट्रांत साधुसंतांच्या बोलपटाचा ऋतु नेहमींच बहरलेला दिसतो. त्या बोलपटांना सहस्रावधि स्त्री-पुरुषांचा समाज लोटावा हें अगदीं साहजिकच आहे.

हे बोलपट पाहिले असतां त्यापासून होणारे लाभ नी करमणूक पदरांत पाडून घेअूनहि भलत्याच दृष्टीनें ते पाहिले असतां समाजाची जी अपरिमित हानि होणारी आहे ती शक्य ती कशी टाळतां येअील त्याविषयी कांहीं सूचना दिग्दर्शनार्थ म्हणून देत आहों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधुसंतांचे बोलपट आज कसे पहावे हें सुचविताना साधुसंतांचीं चरित्रेंच मुळीं कशीं वाचावीं, मननावीं तें सांगितलें पाहिजे.

संतांचे बोलपट पाहतांना मुख्य गोष्ट जी ध्यानांत ठेवायची ती ही कीं तीं चरित्रें अैतिहासिक नाहींत, तर आहेत दोन्ही अर्थीं निव्वळ चमत्कारिक संतांचीं जीं चरित्रें आज अुपलब्ध आहेत तशीं तरी आजपर्यंत जिवंत ठेवलीं हें महिपतिसारख्या संतचरित्रकारांचे अुपकारच आहेत.

त्या काळच्या समाजाच्या भावभावना तरी कशा असत हा सामाजिक अितिहासाचाच अेक भाग आहे. तो तरी त्यांनीं म्हणूनच जिवंत ठेवला. परंतु ह्या पलिकडे त्या चरित्रांत अैतिहासिक सत्य काय तें निश्चितपणें सांगणें फारच दुर्घट झालेलें आहे. अितकेंच नव्हे, तर ह्या आज अुपलब्ध असणाऱ्या चरित्राविषयीं जर कांहीं निश्चितपणें सांगतां येत असेल तर तें हेंच कीं तीं चरित्रें भाबडट कथांनीं नी अैतिहासिक प्रमादांनीं खच्चून भरलेलीं आहेत. पुन्हां जुन्या अैहिक बखरींतील वृत्त पडताळून पाहण्याचीं साधनेंहि संतविजय, भक्तिविजय, प्रभृति, दैविक ग्रंथाची कसोटी पाहण्यास सर्वथैव अपुरीं पडतात. संत हे बहुधा स्वभावतःच व्यवहारपराङ्मुख; अनेक असें कीं ज्यांच्या हातची साध्या घडामोडीची वा पत्रव्यवहाराची बोटभर चिठ्ठीसुद्धां बहुधा धाडलेली नसावयाची; सांपडणें त्याहूनहि निरळा.

दुसरें साधन परकीय अितिहासांतील अुल्लेख. परंतु आपल्या राजकारणी पुरुषांविषयीं परकीय लिखाणांत भरपूर अुल्लेख आढळत असतांहि ज्ञानेश्वर, अेकनाथ, नामदेव, तुकारामादि संतांविषयीं तर काय, पण प्रत्यक्ष रामदास ब्रह्मेंद्राविषयींहि जे अुल्लेख त्यांचीं चरित्रें पडताळून पाहण्यास अुपयोगी पडतीलच असें धुंडाळूनहि सांपडणें कठीणच जाते. त्या संतांनीं अनेक वेळां मुसलमानी बादशहांना नाकीं नव आणल्याचे जे चमत्कार त्यांच्या चरित्रांत वर्णिलेले आढळतात, त्यांचा मागमूसहि मुसलमानी वा अिंग्रज, डच, फ्रेंच ह्यांच्या समकालीन लिखाणांत सांपडत नाहींत. बरें मुसलमान युरोपियनांना ते त्यांचे आमच्या संतांनी केलेले पराभव लज्जास्पद वाटले म्हणून मुसलमानादिकाच्या लिखाणांत आलेले नाहींत असें म्हणावें तर मुसलमानादिकांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक संग्रामांतून हिंदुवीरांनीं जो वारंवार बोजवारा अुडविला त्यांचीं वर्णनें या वा त्या प्रकारें पण परकीय अितिहासांत भरपूर सांपडतात. अुल्लेख असा तर सहसा टाळलेलाच नाहीं. तुकारामांच्या कीर्तनप्रसंगी शिवाजी राजे आले असतां त्यांना पकडण्यासाठीं आलेल्या मुसलमानांनीं वेढा दिला. त्या वेळीं तुकारामांच्या भक्तीचा चमत्कार होअून जिकडे तिकडे शिवाजीच शिवाजी दिसूं लागले नी त्या गोंधळांत राजे निसटले. हा तुकारामाचा चमत्कार मुसलमानांनीं त्यांच्या अितिहासांत त्यांना अपमानकारक म्हणूनच गाळला असें म्हणावें तर तेंच शिवाजी राजे औरंगजेबाच्या हातावर तुरी देअून दिल्लीहून जे निसटले त्या मुस्लिमांच्या पराभवाचीं वर्णनें मुस्लिमांनी दिलेलीं आहेत.

संतांचे चमत्कार हे संताजीच्या चमत्कारांअितके परकियांना खरेखुरे वाटले नाहींत किंवा खरेखुरे नव्हते किंवा तुच्छविलें जाण्याअितके भाकड भासले. ह्यावरून परकीयांनीं त्यांच्या चमत्कारांचा तर काय, पण संतांच्या अस्तित्वाचासुद्धां महत्त्वापूर्वक असा अुल्लेख फारसा केलेला नाहीं. असें म्हणा वा म्हणूं नका, पण ते अुल्लेख नाहींत हें कांहीं नाकारतां येणें शक्य नाहीं. त्यामुळें संतांचीं चरित्रें पडताळून पाहण्याचें तेंहि साधन मुळीच अुपलब्ध नाहीं.

संतांचे स्वतःचे अैहिक पत्रव्यवहार वा लिखाण आणि त्यांच्या विषयीचे परकीय शत्रूमित्रांचे अुल्लेखहि दोन्ही अैतिहासिक साधनें अगदीं विरळा असल्याच्या अशा अडचणींतच तिसरी अत्यंत महत्त्वाची अडचण जी त्या प्रकरणीं अितिहाससंशोधकांना अडते, ती त्यांच्या असलेल्या महिपतीप्रभृति चरित्रकारांच्या चरित्रांतील अंतर्गत सुसंगति-विसंगती-तुलनेची. अितर पुरुषांच्या अैहिक दृष्टचा लिहिलेल्या चरित्रांतील पुष्कळ गोष्टी त्याच्यावर्णनांतील विसंगति धरून केव्हां केव्हां तत्काळ खोटचा-खऱ्या ठरविता येतात. समजा, अेखाद्या बखरींत असें वर्णन आलें कीं चिमाजी अप्पानें वसअी घेतांच थोरल्या शिवाजीमहाराजांनीं त्यांना रायगडावर बोलाविलें; ‘ पोर्तुगिजांचा सूड अुगविलास, परशुराम क्षेत्रीं धर्म राखलास ! ’ असें गौरविलें आणि श्रीपतराव प्रतिनिधीकडून प्रधानपद काढून चिमाजी अप्पांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिलें. तर ह्या वाक्यांतील विसंगती स्थलकालपात्रदृष्टचा तत्काल सिद्ध करून देतां येते. शिवाजीमहाराज म्हणजे शाहुमहाराज असावे अशी कांहीं चुकी काढून सुधारून त्या विसंगतींतहि अंतर्गत पुराव्याच्या रूपानें जें सत्य असतें तें पाखडून काढतां येतें. कारण, तीं चरित्रें बोलून चालून अैहिक बुद्धिवादाचा, मानुषीय तर्काचा विषय हें सर्वांनीच गृहित धरलें असतें. पण संतचरित्रांचें मूळ गृहित अध्यात्मिक, दैविक, अतिमानुष असते, जी जी घटना तितकी विसंगत, तितकीच त्यांत संग्राह्य. 'चमत्कार' नसला तर ते संतचरित्र सांगण्यासारखेंच नव्हे ! त्यामुळें त्यांतील घटना दैविक वा अध्यात्मिक भाषेंत तर्कातीत, म्हणजेच अैहिक वा बौद्धिक भाषत तर्क-शून्यच असणार ! हीं संतचरित्रें बोलूनचालून असंभव अलंकाराचीं अुदाहरणें ! समजा वर शिवाजीमहाराज चिमाजी आप्पांना भेटले व श्रीपतरावांचें प्रधानपद चिमाजी अप्पास दिलें गेलें हीं जशीं विपयस्त विधानें केलीं आहेत तशीं अेखाद्या संतचरित्रांत जर विधानें आलीं कीं श्रीधरस्वामींना ज्ञानेश्वरमहाराज भेटले नी त्यांचा पांडव-प्रताप ग्रंथ ते ज्ञानेश्वर वाचीत बसले, किंवा महिपतींचे अध्याय नामदेवानीं लिहिले, तर तीं तशीं अैतिहासिक दृष्टचा धडधडीत चुकीचीं ठरणारीं विधानेंसुद्धां चुकीचीं म्हणून भक्तिपंथियांना पटवून देणें अशक्य आहे. स्थलकाल, संभवा-संभव प्रभृतीवर अुभारलेल्या मानुषीय तर्काची कसोटी त्यांना मुळीं लाग-तच नहीं हें तर या संतचरित्रकारांचें आद्य नी अशंकनिय गृहित (Axiom)! ते म्हणणार 'ज्ञानेश्वरांची' योगसिद्धीच तशी होती किंवा विठ्ठलाला अशक्य तें काय ! त्यानें ज्ञानदेवाची भेट श्रीधरांशीं, नामदेवांची भेट महिपतीशीं करविली ! अशा प्रकारचीं अनेक अनैतिहासिक अुदाहरणें ह्या संतचरित्रां-तून सांपडतांनाहि 'अलौलिक सिद्धि' 'नामप्रताप' 'देवाची करणी' अशा तर्कातीत म्हणजेच अैतिहासिक भाषेंत तर्कशून्य असलेल्या गृहितांमुळें संत चरित्रांतून अैतिह्य असें ठामपणें काढणें वा पटवून देणें हें अितिहास-संशोधनाचें जें अंतर्गत पुराव्याचें तिसरें लौकिक साधन, त्याच्या साहाय्यानेंहि दुर्घट ठरतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदूंचेच नव्हे तर ख्रिचन, मुस्लिम, यहुदी प्रभृति धर्मछाप असे जें जें संतवाङ्मय जगांत आहे त्या साऱ्यालाच ही गोष्ट लागूं आहे.

कोणत्याहि अैतिह्य संशोधनांच्या साधनांनीं पडताळून न पाहतां येणारीं हीं आज अुपलब्ध असलेलीं सारीं संतचरित्रें अैतिहासिक दृष्टचा केव्हांहि जशींच्या तशींच खरीं मानतां येणार नाहींत. हीच गोष्ट अेका पुराव्यानेंहि लक्षांत येअूं शकते. ह्या चमत्कारांत अनेक चमत्कार केवळ लाक्षणिक वर्णनें शब्दशः खरीं समजणाऱ्या भक्तमंडळींच्या कल्पनेचे प्रपंच आहेत. संतांची भावना सर्व कांहीं भगवान् करवितात ती ! त्यांची वृत्ति निरहंकारी. जें स्वतः करावयाचें तें स्वतः केलें म्हणून न सांगतां भगवंतानें केलें अशी भाषा भावनेच्या लाक्षणिक अर्थी वापरण्याचा त्यांचा प्रघात श्रीधरस्वामी, रामविजयादि ग्रंथ लिहितांना किंवा महीपति भक्ति–विजय लिहितांना वारंवार म्हणतात,

" मी मंदमति ग्रंथ कसा रचणार ? पण पांडुरंगानें लेखणी हातीं दिली नी म्हटलं लिही, लिहविता तो ! तो सांगेल तसं लिहिलं ! अि."

संतांच्या अभंगांत, ओव्यांत, ग्रंथांत ही भाषा वरील लाक्षणिय अर्थी येअी. पण त्यांचा पुढील भक्तगण ती भाषा शब्दशःच वस्तुस्थिति समजून प्रत्यक्ष पांडुरंग अवतरले, लेखणी स्वतःच त्यांनीं संताच्या हातीं दिली किंवा संत सांगत तें पांडुरंग लिहीत वा पांडुरंग स्वतःच सांगत जात ते लिहीत, किंवा संत कीर्तन करीत, नी हनुमंत मागें साथ देत, स्वतःच प्रत्यक्षपणें अुभे रहात, अशीं वर्णनें संतचरित्रांतून घालीत चालले. पिढीमागें पिढी. कीर्तनकारामागून कीर्तनकार त्या वर्णनांत अधिकाअधिक भडक रंग भरीत चालले. लक्षावधि भक्तजन तो 'चमत्कार' अक्षरशः घडला असें प्रामाणिकपणें समजत चाललें. संतजन म्हणत ' सोनें आणि माती । आम्हां समान दो हातीं ॥' किंवा वैराग्याचा परीस माझ्या हातीं आला आतां दगडदेखील सोनें झालें !, सोनेंसुद्धां दगड झालें ! रामकृष्णाची अेक साधना अशी होती कीं, अेका हातांत सोनें घ्यावें, अेकांत माती, आणि त्या वस्तू ह्या हातांतून त्या हातांत वाटेल तशा चाळवीत सोनें माती, माती सोनें असें अुलट सुलट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तोंवर म्हणत बसावें कीं जोंवर कशांत माती नी सोनें तें ध्यानांतहि येअू नये.--सोन्याला माती शब्द लागावा, मातीला सोनें ! पण अशा प्रखर वैराग्याच्या लाक्षणिक शब्दांना संत जे अुच्चारीत तें पुढें पुढें तोंडोतोंडीं सतचरित्र. लेखक, भक्तगण नी कितनकार शब्दश: खरे समजून नी तींत मन मानेल तसा रंग भरून त्याचे अनेक 'चमत्कार' करून सोडीत. खऱ्या खऱ्या मातीचें अमक्या संतानें खरें खरें सोनें केलें किंवा श्रीनामदेवांनी दगड अुचलविले ते परिस झाले. परिस म्हणून ज्यांनीं हपापून ते घेतले त्यांचे दगड झाले अित्यादि चमत्कारहि ह्या वर्गांतीलच होत.

अेका संताच्या अनुयायांनीं त्याचा अेक चमत्कार वर्णिला कीं दुसऱ्या संताच्या अनुयायांनीं तोच चमत्कार आपल्याहि गुरुच्या चरित्रांत जसाच्या तसाच ठोकून दिलाच म्हणून समजावें. नामदेवानें देअूळ फिरविलें, तशीच नानकांना मशिदींतून काढून बाहेर घालविलें तेव्हां मशीद फिरविल्याची कथा ! तशीच अितर संतांची गोष्ट. जनाबाअीपाशीं पांडुरंगाचा शेला सांपडला, तीवर बडव्यांनीं चोरीचा आळ घातला, तिला सुळावर चढवण्याची शिक्षा झाली. तसेंच अगदीं चोखामेळ्याचें घडलें. त्याच्यापाशीं पांडुरंगाचा हार सांपडला, बडव्यांनीं चोरीचा आळ घेतला. त्याला गाडीला बांधून ठार मारण्याची शिक्षा झाली. दोन्हीं प्रकरणीं पांडुरंग धांवून आले. भक्तांना सोडविलें. पण त्या भक्तांवर जीव कासावीस करून टाकणारें नी त्यांच्या आप्तेष्टांना त्यांच्या मृत्युदंडामुळें भयंकर दु:ख देअून तळमळविणारें हें संकट पांडुरंगानें मुळांतच कां आणलें, असल्या जीवघेण्या विचित्र लीलांची खोड लागलेली आहे हें वर्णिण्यांत दयाळू देवाला आपण किती अुपद्रवी नी निर्दय बनवित आहोंत हें कांहीं ह्या अद्‌भुत कथा आळवून सांगणाऱ्या भक्तजनांच्या नी संतचरित्रकारांच्या ध्यानीं आलें नाहीं !! वरील दिग्दर्शनार्थ सुचबलेल्या सर्व कारणांसाठीं आज अुपलब्ध असलेलीं संतचरित्रें शब्द न् शब्द यथार्थ असलेलें अैतिहासिक सत्य नव्हे. फार फार तर अेक अैतिहासिक काव्य आहे असें समजूनच तीं वाचलीं पाहिजेत, त्यांचे बोलपट तर निव्वळ चमत्कारिक नाटक आहे या अेकाच भावनेनें पाहिले पाहिजेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संत चरित्रांना फार तर अैतिहासिक काव्यें म्हणतां येअील.

संत चरित्रें आहेत तशींच वाचलीं जावींत–
चित्रपटविलीं जावींत

आज अुपलब्ध असलेलीं संतचरित्रें अैतिहासिक दृष्टीनें आणि तें अक्षर नी अक्षर सत्य आहे, अशा भाकड श्रद्धेनें पाहण्याचें वा वाचण्याचें तेवढें टाळलें कीं मग तीं आहेत तशींच रंगविलीं जाण्यांत कांहीं विशेष धोका नाहीं. आम्ही तर असें म्हणूं कीं, त्या संतचरित्रांची मोडतोड करून त्यांतील चमत्कारादिकांना फाटा देअून, त्या भोळ्या नी साधुशील महात्म्यांचें यथार्थ स्वरूप लपवून, त्यांच्या जुन्या भक्तिविजयाची नी संतलीलामृताची नवी सुधारलेली आवृत्ति काढणें हें अगदीं चुकीचें, लुच्चेगिरीचें नी अरसिकपणाचेंच द्योतक होअील. त्यांच्या त्या भोळ्या भावाच्या, अद्‌भुत चमत्कारांच्या, टाळचिपळ्यांच्या वातावरणांतच ही आमची संतमंडळी खुलून दिसतात. त्यांना अद्ययावत् बनविणें हें अेक असह्य विडंबन होअील. नामदेव, तुकारामाच्या त्या वंदनीय नी लोभनीय मूर्ति त्या पागोट्यांत, त्या नामघोषांत, त्या तुळसीमाळांत, त्या बुक्क्यांत, त्या अंगरख्यांतच शोभतात. नामदेवांना आजच्या दुचाकिवर बसविणें किंवा तुकोबारायांना आजच्या सुटाबुटांत जखडणें हा बुद्धिवेडाचा मूर्खपणा आहे. कारण महिपती चरित्रांतून त्या काळचें जें वातावरण नी भावभावना होत्या त्या जशा यथावत् व्यक्तविल्या जातात तशा त्यांत आम्हांस हवी तशी गाळागाळ केल्यानें केंव्हांहि व्यक्तविल्या जाणार नाहींत. त्या काळचें समाजदर्शन यथावत घडविणें हेंहि अितिहासाचेंच अेक कर्तव्य आहे, आणि महिपतीप्रभृति कवींचें काव्य हाहि ह्या अर्थी अेक अितिहासच आहे.

दुसरें असें कीं, संतांच्या ह्या बोलपटांतून बहुतेक चमत्कार जरी लाक्षणिक किंवा अविश्वसनीय किंवा बनावट असेच असले तरीहि त्यामुळें त्या साधुपुरुषांच्या खऱ्या थोरवीस कांहींच बाध येत नाहीं. कारण संतांची खरी थोरवी ही चमत्कारांत नसून त्यांच्या पवित्र वाणींत, ग्रंथांत आणि परोपकारी नी अुदात्त चारित्र्यांतच सांठविलेली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जोंवर ती ज्ञानेश्वरी, ते तुक्याचे अभंग, ते अेकनाथ नामदेवादिकांचें अत्युदार चरित्र आपल्या डोळ्यासमोर आहे तोंवर त्यांच्याविषयीं वाटणारा आदर नी पूज्यता ही अुणावण्याची भीतीच नको. पण जर तो आदर नी पूज्यता बुद्धिपूर्वक नी यथाप्रमाण वाटावयास हवी असेल, तर त्यांचीं तीं जुनीं चरित्रें आहेत तशींच राहूं देणें अवश्य आहे.

या सर्व कारणांसाठीं सध्यांच्या बोलपटांत संतचरित्रें आहेत तशींच नी त्यांच्या काळच्या बऱ्यावाअीट पण खऱ्याखुऱ्या वातावरणांतच चित्रपटविलीं जावींत.

पण संत म्हटला, कीं तो सर्वज्ञ किंवा सर्वशक्तिमान् किंवा देव ज्याच्या अर्ध्या वचनांत आहे असा असलाच पाहिजे ही समजूत मात्र खोटी नी खुळचट आहे !

अुलटपक्षीं शब्दश: खरी घडलेली घटना लाक्षणिक अर्थी सांगतांच चमत्कार बनें, हा दुसरा वर्ग. तुकारामाच्या जाड पुठ्ठयांच्या वाणी छाप वह्या पाण्यांत बुडविल्या त्या फुगून वर आल्या. ही घटना खरी पण साधी, तुकारामासारख्या परम श्रद्धाळू नि निरहंकारी भगवद्भक्तानें सहाजिकचपणें म्हटलें 'विठ्ठलाने माझी अभंगवाणी परत दिली'. तीच भावना बळावून त्याच लाक्षणिक रंगांत ती साधी घटना रंगत रंगत आज तिची अेक अद्भूत कथा होअून बसली आहे ! साध्या घटनेचा अेक दैवी चमत्कार बनला ! दामाजीपंतांच्याहि कथानकाची अशीच फोड कागदपत्रांच्या आधारेंच राजवाडयांनीं केलेली आहे. दामाजीपंतांचा दंड विठू नांवाच्या महारानें भरला. आणि त्यांना बंदीगृहांतून सोडविलें. ही खरी पण साधी गोष्ट. परंतु त्या महाराचें नांव विठू आणि दामाजी होते सन्त ! त्या योगें भाविक जनांनी विठूचा बोलतां बोलतां विठ्ठलच करून सोडला !

खऱ्या नांवांवर नुसते श्लेष करून त्यांवर अद्भुत चमत्कारांच्या रचलेल्या ज्या निव्वळ काल्पनिक कथा तो चमत्कारांचा अेक तिसरा प्रकार आहे.

जाट हें जातीचें खरें नांव त्यावर श्लेष सुचला नी त्याची अेक अद्-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भुत अुत्पत्ति कथा त्यावर रचली गेलीं कीं ‘ महादेवाच्या जटेपासून अुत्पन्न झाले म्हणून त्यांना जाट नांव पडलें.’ न्हाव्याचें नांव नामिक असे कल्पून त्यावर लगेच कोटी लढविली गेली कीं ते ब्रह्मदेवाच्या नाभीपासून जन्मले. ब्राह्मण मुखांतून नी क्षत्रिय बाहूपासून जन्मले या सुंदर रूपकाला अक्षरशः सत्य मानण्याच्या भावडेपणाअितकाच न्हावी–नापिक नाभिक हे ब्रह्मदेवाच्या नाभीपासून प्रकटले हा विश्वासहि भावडट ! कर्णाच्या नांवावर श्लेष झाला. लगेच त्याचा अेक अद्‌भुत चमत्कार बनला कीं कर्ण हा कुंतीच्या कर्णांतून–कानांतून जन्मला म्हणूनच त्याचें नांव कर्ण ! जन्म अलौकिकच असला तर शोभतो. ह्या खुळचा आदरापायीं अनेक थोर पुरुषांना अीशसंभव वा अयोनिसंभव कल्पिण्याकडे सामान्य जनांचा जगांत कुठेंहि गेलांत तरी भारी कल ! जीजस हा सुताराचा मुलगा नसून कुमारी मेरीला अीश्वरी गर्भापासून झाला ही ख्रिश्चन कथा पहा. तीच गोष्ट संत नामदेवाची ! श्री नामदेव अलौकिक संत, त्यांचा जन्महि अलौकिक असला पाहिजे ! तो शोध लावण्याचें कांहीं साधन ? हो ! हो ! ते शिंपी होते ना ? अर्थात् शिंपी शब्दाचें तें गुढ अुकलवूं शकेल ! या भावनेनें शिंपी शब्दाची लगोलग फोड केली गेली. शिंपी म्हणजे शिंपेंतला, शिंपेंतून अुद्‌भवलेला ! पुराणकथा होत्याच तशा कांहीं. त्या साच्यांत घालतांच ही कथाहि अेक अद्‌भूत चमत्कार होअून बाहेर पडली, नामदेवांच्या मातापितरांना अेक दैविक शिंप सांपडली. घरीं आणून पहातात तों तिच्यांत अेक अद्‌भुत बालक ! म्हणून नामदेवांना शिंपी म्हणतात ! !

* * *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनंताची आरती :: ३५

✠ ✠ ✠

['अनंताची आरती' ही 'रानफुलें' या सावरकरांच्या काव्य-संग्रहांत प्रसिद्धिलेली आहे.] ✠ ✠ ✠

निरंजनासी निरांजनाचा देवा दीप तुला ।
दाविती । देवा दीप तुला ।। धृ०।।

आकाशाच्या अंगणांत तव
सूर्यसहस्त्रीं जो दीपोत्सव
पाजळिती हे पंथीं अपुली त्यास करूं साजरा ।
दाविती, देवा दीप तुला ।। १ ।।

सूर्यसहस्त्रींही जो उरला
पंथीनेंची जाओ स्फुरला
नयनीं असा अंधकार[1]लव आहे तोचि भला ।
दाविती, देवा दीप तुला ।। २ ।।

आओच्याची बागेमधुनी
ताजीं ताजीं वेंचुनि वेंचुनी
मुली गुंफिती आओच्याची वेणींतूनि फुलां ।
दाविती, देवा दीप तुला ।। ३ ।।

[1] भायिक भक्ति.

[समाप्त]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय,
हरिद्वार

पुस्तक लौटाने की तिथि अन्त में अङ्कित है । इस तिथि को पुस्तक न लौटाने पर दस नये पैसे प्रति पुस्तक अतिरिक्त दिनों का अर्थदण्ड आप को लगाया जायेगा ।

५०००.११.१४ ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकालय, गुरुकुल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar